विधिसंस्था

व

धर्मविषयक संस्था

हा ग्रंथ

हर्बर्ट स्पेन्सर

ह्यांच्या

“ The Principles of Sociology ” नामक ग्रंथाधारें

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए.

ह्यानीं लिहिला.

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर

नं. ४६८ नारायण पेठ, पुणें सिटी.

शकवर्ष १८३१-३० सन १९०९.

पुणें पेठ बुधवार येथें **गंगाधर गोविंद गोंधळेकर** ह्यांच्या

“ **भारतभूषण** ” छापखान्यांत छापिला.

पुढील ग्रंथ

उद्योग-संस्था
व
धंदे-संस्था

हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या समाजशास्त्राचे एकंदर आठ भाग असून त्यांपैकीं १. समाजशास्त्राचे मूलसिद्धान्त, २. समाजशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त व ३. गृहसंस्था, ४. राजकीय संस्था, ५. विधिसंस्था व ६. धर्मविषयक संस्था, हे आतांपर्यंत प्रसिद्ध केले. राहिलेले वरील (उद्योग-संस्था व धंदे-संस्था) भाग प्रसिद्ध झाले म्हणजे हें समाजशास्त्राचें प्रकरण पुरें होत आहे, सबब सदरील पुस्तक आक्टोबरअखेर बहुधा बाहेर पडेल. खेरीज स्पेन्सर साहेबांच्या कल्पनांची वाढ ह्या परिशिष्टाचा उत्तरार्ध ह्यांत येणार आहे. पुस्तक सुमारें ६०० पृष्ठांचें होईल. वर्गणीदारांस किंमत २ रु०.

नं० ४६८ नारायण पेठ, पुणें सिटी. — बळवंत गणेश दाभोळकर. ग्रंथप्रकाशक.

आतांपर्यंत प्रकाशित झालेले माझे उपयुक्त ग्रंथ.

* फुली केलेल्या पुस्तकांच्या प्रती शिल्लक नाहींत.

१ **नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें**-हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The
* Data of Ethics" ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० चिंतामण गंगाधर भानु, बी. ए. ह्यांजकडून लिहविला.

२. **न्यायतत्त्वें**-सदरप्रमाणें "Justice" ह्या ग्रंथाच्या आधारानें. किंमत २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

३. **ज्योतिर्विलास** अथवा **रात्रीची दोन घटका मौज**-रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** यांजकडून लिहविला. किंमत १॥ रु.; ट. ह. ३ आणे.

४. **संसारसुख**—दी राइट ऑनरेबल सर **जॉन लबक**, एम्. पी. ह्यांच्या "The Pleasures of Life" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० सा० कृष्णाजी परशुराम गाडगीळ ह्यांकडून लिहविला. किंमत १॥। रु.; ट. हं. २ आणे.

५. **शास्त्ररहस्य**—रा० रा० **ना० ल०** फडके, बी. ए.;
* रा० रा० **शं० बा० दीक्षित**; प्रि० **म० शि० गोळे**, एम्. ए.; प्रो० **वि० बा० भाटे**, बी. ए.; प्रो० **धों० के० कर्वे**; बी. ए.; रा० सा० **कृ० प० गाडगीळ**; प्रो० **चिं० गं० भानू**, बी. ए.; रा०रा० **ह० ना० आपटे** व रा०रा० **रा० भि० जोशी** ह्या नऊ विद्वानांकडून निरनिराळ्या ९ विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला.

६. **आत्मनीतीचीं तत्त्वें** आणि **परोपकार**—हर्बर्ट स्पेन्स-
* रच्या "The Ethics of Individual Life" व "Beneficence" ह्या ग्रंथांच्या आधारानें यथाक्रम रा० रा० **नारायण लक्ष्मण** फडके, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांजकडून लिहवून एकत्र केला.

७. **नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धांत**-हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The Inductions of Ethics" ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. यांजकडून लिहविला. किं० १॥। रु.; ट० हं० ३ आणे.

८. **धर्ममीमांसा**-**नैसर्गिक धर्म** आणि **भौतिक धर्म**—भट्ट **मोक्षमूलर** यांच्या "Natural Religion"

व " Physical Religion " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांजकडून लिहविला. किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

९. **राजनीतीचीं मूलतत्त्वें**—(भाग १)—हेनरी सिजविक् ह्यांच्या " The Elements of Politics" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० रा० **वासुदेव बळवंत पटवर्धन**, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१०. **अज्ञेयमीमांसा** (स्पेन्सरचरित्रासह)—**हर्बर्ट स्पेन्सर**
* ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Unknowable " भागाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.

११. **धर्ममीमांसा पितृमूलक धर्म** आणि **आध्यात्मिक धर्म**—भट्ट मोक्षमूलर ह्यांच्या " Anthropological Religion व " Psychological Religion " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला. किंमत २॥ रुपये; ट० हं० ३ आणे.

१२. **जीवनशास्त्राचीं सामान्य तत्त्वें** (पुस्तक १)—रा० रा० **विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी. ए. यांजकडून स्वतंत्र ग्रंथरूपानें लिहविला. किंमत १॥। रुपये; ट० हं० ३ आणे.

१३. **ज्ञेयमीमांसा**—(पूर्वार्ध)—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Knowable " भागाच्या पूर्वार्धाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांजकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; ट. हं. ३ आणे.

१४. **भारतवर्षीय भूवर्णन** (प्राचीन)—रा० रा० **शंकर**
* **बाळकृष्ण दीक्षित** ह्यानीं लिहिला.

१५. **ज्ञेयमीमांसा** (उत्तरार्ध)—**हर्बर्ट स्पेन्सर** ह्यांच्या " Frist Principles " ग्रंथाच्या " The Knowable " भागाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी.ए. ह्यांकडून लिहविला. किं०२॥रु. ट.हं. ३आणे.

१६. **जीवितकर्तव्य** अथवा **संसारकर्तव्य**—दी राइट ऑन-
* रेबल **लॉर्ड एव्हबरी** ह्यांच्या " The Use of Life " ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० रा० **दत्तात्रेय नारा-**

यण नावर, बी. ए. एलएल्. बी. ह्यांजकडून लिहविला.

१७. **राणीच्या राज्याचा इतिहास**—जस्टिन् मॅकार्थीकृत "A History of Our Own Times" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण** फडके, बी. ए. यानीं लिहिला. किंमत २ रुपये; टपालहंशील २ आणे.

१८. **आत्मविद्या**—रा० रा० हरि **गणेश गोडबोले**, बी. ए. * ह्यानीं आर्यतत्त्वज्ञानाच्या प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांच्या आधारें स्वतंत्र रीतीनें लिहिला.

१९. **समाजशास्त्राचे मूलसिद्धांत**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या * "The Principles of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण** फडके, बी. ए. ह्यानीं लिहिला.

२०. **समाजशास्त्राचे अनुभवजन्य सिद्धान्त व गृह-** * **संस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या "The Principles of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण** फडके, बी. ए. ह्यानीं लिहिला.

२१. **जननमरण-मीमांसा**—रा० रा० **विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी. ए. ह्यांजकडून स्वतंत्र ग्रंथरूपानें लिहविला. किंमत १॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

२२. **राजकीय संस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या "The * Political Institutions" नामक ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण** फडके, बी. ए. ह्यानीं लिहिला.

२३. **निबंधरत्नमाला**—प्रो० **गो० चि० भाटे**, एम्. ए.; ले० क० डॉक्टर **का० र०** कीर्तीकर.; प्रो० **के० रा०** कानिटकर, एम्. ए., बी. एस्सी.; प्रो० **वा० ब०** पटवर्धन, बी. ए.; प्रि० **र० पु०** परांजपे, एम्. ए., बी. एस्सी.; प्रो० **ह० गो०** लिमये, एम ए.; प्रो० **वै० का०** राजवाडे, एम. ए. ह्या ७ विद्वानांकडून निरनिराळ्या ७ विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला. किं० २॥ रु. टपालहंशलि ३ आणे.

२४. **विधिसंस्था व धर्मविषयकसंस्था**—हर्बर्ट स्पेन्सरच्या "The Principles of Sociology" ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण** फडके, बी. ए. ह्यानीं लिहिला. किं० २॥ रु०; ट० हं० ३ आणे.

कायम वर्गणीदार व त्यांस मिळणारा फायदा.

प्रतिवर्षी बहुधा दोन नवीन ग्रंथ मी प्रसिद्ध करीत असतों. हे ग्रंथ कोणत्या प्रकारचे असतात त्याची दिशा वरील यादीवरून कळेल. प्रत्येक ग्रंथाच्या अमुक एक प्रती स्वीकारण्याचें लेखी वचन देऊन ठेवलेले ते कायम वर्गणीदार होत. ग्रंथ लहान अगर मोठा असेल त्या मानानें आगाऊ वर्गणीदारांस १॥ किंवा २ रुपये किंमत ठेवली जाते, व त्या किंमतींतहि खालीं लिहिल्याप्रमाणें कायमच्या वर्गणीदारांस फायदा मिळतो.

(१) पुण्यांतल्यास ४ आणे कमी पडतात.

(२) बाहेरगांवच्यांस पोस्टेज व व्ही. पी. खर्च पडत नाहीं.

(३) पांच प्रती घेणारांस ६ प्रती मिळतात.

ह्या उद्योगास ज्यांस मदत करावीसें वाटत असेल त्यांस कायम वर्गणीदार होण्याविषयीं अगर मिळवून देण्याविषयीं विनंति आहे.

नं० ४६८ नारायण पेठ, पुणें सिटी. } बळवंत गणेश दाभोळकर. ग्रंथप्रकाशक.

प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तकांत " समाजशास्त्राचीं तत्त्वें " या ग्रंथाच्या " विधिसंस्था " आणि " धर्मसंस्था " या दोन भागांचा समावेश केलेला आहे. हे या शास्त्राचे अनुक्रमें चवथा व सहावा असे भाग असून, पांचवा भाग " राजकीय संस्था" हा आधींच प्रसिद्ध झालेला आहे. असो. आतां या दोन भागांपैकीं विधिसंस्थांचा प्रथम विचार करूं.

माणसावर जीं अनेक प्रकारचीं बाह्य शासनें चालतात त्यांत विधिविषयक शासन हें सर्वांत अगोदर उत्पन्न होतें. राजकीय शासन आणि धार्मिक शासन हीं त्याच्या मागून येतात. ही गोष्ट ध्यानांत यावयास एवढी गोष्ट लक्षांत घेतली तरी पुरे आहे कीं हें शासन केवळ मनुष्य- जातींतच दृष्टीस पडतें असें नाहीं, तर इतर प्राणिवर्गांतहि आढळून येतें. उदाहरणार्थ,लहान कुत्रा मोठ्या कुत्र्या- समोर नमून चालतो, आणि आपल्या हालचालींनीं आपण त्यास वश झालेलों आहों असें दाखवितो. दुसरी एक गोष्ट अशी ध्यानांत आणावी कीं ज्या रानटी लोकांत राज- कीय किंवा धार्मिक शासन उत्पन्न झालेलें नसेल त्यांच्यां- तहि हें विधिशासन किंवा चालीरीतींचें सरकार दिसून येतें. आणि असें असणें हें साहजिकच आहे; कारण कोणत्याहि समाजांत किंवा मनुष्यसमूहांत राजकीय किंवा धार्मिक शासन उत्पन्न होण्याच्या अगोदर त्यांच्यांत अंकितपणाचा प्रादुर्भाव झालेला असला पाहिजे, आणि तो विधिशासनापासूनच होत असतो, किंवा त्यामध्यें अंतर्भूत होत असतो. आणखी तिसरी गोष्ट अशी कीं राजकीय

व धार्मिक शासनांची उत्पत्ति ह्या शासनापासूनच झालेली आहे. असो. अशी स्थिति असल्यामुळें **स्पेन्सर** साहेबांनीं ह्या शासनाचा विचार राजकीय शासनाच्या अगोदर केलेला आहे, आणि तद्विषयक लेखास समाजशास्त्राचा चवथा भाग कल्पून राजकीयशासनविषयक लेखास त्या शास्त्राचा पांचवा भाग कल्पिलें आहे.

निरनिराळ्या विधिसंस्थांचा विचार करण्यापूर्वी ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं निरनिराळे विधी जे उत्पन्न होतात ते कोणी मुद्दाम उत्पन्न करीत नसून स्वाभाविकरीत्या उत्पन्न होत असतात. कारण विधी हे कृतिरूप असून कृति ह्या स्नायूंच्या आकुंचनापासून उत्पन्न होत असतात; आणि स्नायूंचें कमजास्त प्रमाणावर किंवा विशिष्ट रीतीनें आकुंचन होणें हें निरनिराळ्या मनोविकारांच्या कमजास्त जोरावर अवलंबून असतें. उदाहरणार्थ, कांहीं जातींत हुंगून एकमेकांस नमन करण्याची किंवा एकमेकांचें स्वागत करण्याची चाल आहे. आतां ही चाल स्वाभाविकरीत्या कशी उत्पन्न होते हें पहाण्यास फार दूर जावयास नको. आपलें कोंकरूं कोठें भटकत गेलें म्हणजे मेंढी त्याच्या मागून बेंबटत जाते आणि जवळच्या कोंकरांपैकीं कधीं हें व कधीं तें हुंगून शेवटीं जें तिच्याकडे धांवत येईल तें त्याच्या अंगाच्या वासावरून आपलें म्हणून ओळखिते, आणि त्याबरोबर तीस आई या नात्यानें मोठें समाधान होतें. आतां ही जी गोष्ट इतर प्राणिवर्गास लागू आहे तीच मनुष्यवर्गासहि लागू आहे. म्हणजे, माणसांमध्येंहि अंध वगैरे लोक एकाद्याच्या अंगाच्या वासावरून तें माणूस अमुक आहे म्हणून ओळखीत असतात, आणि तें आपलें

आहे असें समजलें म्हणजे त्यांस समाधान होतें. ह्यावरूनच आपल्यामध्येंहि विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट माणसाचें डोकें हुंगण्याची चाल पडलेली आहे. असो. यावरून फिलिपाइन बेटांतील लोक किंवा सामोआमधील लोक यांच्यामध्यें हस्तस्पर्श करण्याच्या ऐवजीं हुंगून एकमेकांचें स्वागत करण्याची चाल कशी पडली आहे याचा उलगडा होतो. आणि ही जी गोष्ट या विशिष्ट विधींस लागू आहे, तीच सामान्यतः सर्व विधींस लागू आहे. म्हणजे ते कृत्रिमरीत्या कोणीं बनविलेले नसून स्वाभाविकरीत्या कनिष्ठाचा श्रेष्ठाप्रत अंकितपणा दर्शविण्याचा जो मनोभाव त्यापासून उत्पन्न होऊन संकीर्ण झालेले आहेत. सारांश, इतर प्रकारच्या संस्थांना जी गोष्ट लागू आहे, तीच यांसहि लागू आहे; म्हणजे, त्यांचीहि उत्पत्ति व वाढ हीं उत्क्रांतितत्त्वाला अनुसरूनच झालेलीं आहेत. त्या प्रथम सरल मागून हळूहळू संमिश्र बनलेल्या आहेत, प्रथम अनिश्चित असून मागून निश्चितस्वरूप बनलेल्या आहेत, आणि प्रथम असंबद्ध असून मागून सुसंबद्ध बनलेल्या आहेत. आणि ह्या गोष्टी कशा झाल्या आहेत हें प्रस्तुत ग्रंथांत सविस्तररीतीनें निरनिराळ्या विधिप्रकारांच्या संबंधानें सांगितलेलें आहे.

रानटी लोकांत बहुधा शिकार करून निर्वाह करीत असतात, आणि शेजारच्या टोळ्यांशीं त्यांचें बहुधा वैर असून त्यांशीं वरचेवर लढण्याचा प्रसंग त्यांस बहुधा येत असतो. म्हणून अशा प्रसंगीं आपल्यास यश आल्याचें कांहीं चिन्ह, उदाहरणार्थ, वाघाचें कातडें, हत्तीचे सुळे, किंवा शत्रूचें शिर, आपल्याबरोबर आणावें असें

त्यास वाटतें. अशा रीतीनें विजयाचिन्हें आणण्याची व बाळगण्याची चाल उत्पन्न होते. म्हणून तिचें सविस्तर विवेचन दुसऱ्या प्रकरणांत केलेलें आहे.

रानटी लोक तरी लढाईत वगैरे जिंकलेल्या सर्वच लोकांस ठार करितात असें नाहीं, तर बहुधा लढवय्यास तेवढें ठार करून त्यांच्या मुलांमाणसांस पकडून गुलाम करून आणीत असतात, आणि आपल्या कामास लावीत असतात. पण तीं आपण जिंकिलीं व आपलीं दास करून ठेविलीं हें दर्शविण्याकरितां त्यांच्या शरीरांस कांहींतरी खूण किंवा व्यंग करून ठेवितात. अशा रीतीनें निरनिराळ्या अंगकर्तनांची जी चाल उत्पन्न होते तिचें विवेचन तिसऱ्या प्रकरणांत केलेलें आहे.

माणसाचा रानटीपणा कमी होऊन जशी सुधारणा होत जाईल तसा विजिताचें अंगविकर्तनच न करितां त्यानें आपला अंकितपणा व्यक्त करण्याकरितां दुसरी एकादी गोष्ट केली, म्हणजे एकादी वस्तु अर्पण केली तरी त्याची तृप्ति होते. अशा रीतीनें, सामान्यतः कनिष्ठानें श्रेष्ठाकडे अंकितपणा दर्शविण्याकरितां आणि त्यास संतुष्ट करण्याकरितां नजराणे घेऊन जाण्याची रूढी उत्पन्न होते. ह्या रूढीचें विवेचन चवथ्या प्रकरणांत केलेलें आहे.

आतां एकाद्यास नजराणा करावयाचा, म्हणजे अर्थात् त्याच्याकडे तो घेऊन जाणें हें त्यांत आलेंच. म्हणून अशा रीतीनें श्रेष्ठास कनिष्ठानें नजराणा घेऊन किंवा एरवींहि सन्मानार्थ व संतर्पणार्थ भेटावयास जाण्याची जी चाल उत्पन्न होते तिचें विवेचन पांचव्या प्रकरणांत आहे.

अंकितपणा दर्शविण्याकरितां कनिष्ठ माणूस श्रेष्ठाकडे

गेला म्हणजे मी तुझा अंकित आहें, आणि तुझ्या अगदीं स्वाधीन आहें हें दर्शविण्यासाठीं कांहीं तरी तशा प्रकारची कृति करणारच, आणि ह्या कृतीस केवळ डोकें लवविण्यापासून साष्टांगप्रणिपात करण्यापर्यंतच्या निरनिराळ्या प्रकारांचें स्वरूप येणार. म्हणून नमनरूपी विधीचा विचार सहाव्या प्रकरणांत केलेला आहे.

कनिष्ठानें श्रेष्ठास नमन करणें हा जसा अंकितपणा दर्शविण्याचा एक मार्ग आहे, तसाच त्याला मोठेपणा लावून संबोधणें हा त्याच्या पुढचा मार्ग आहे. म्हणून ह्या संबोधनप्रकारांचा सविस्तर विचार सातव्या प्रकरणांत केलेला आहे.

एकाद्यास गौरवून संबोधणें म्हणजे त्यास अर्थात् मोठेपणाचीं दर्शक अशीं नांवें देणें होय. ह्यापासूनच पदव्यांची उत्पत्ति होत असते. ह्या पदव्यांचा विचार आठव्या प्रकरणांत केलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणांत ज्या विजयचिन्हांचा विचार केला तीं विजेता अंगावर वापरून मिरवूं लागला म्हणजे त्यांपासूनच पट्टे व पोषाक ह्यांची उत्पत्ति होत असते. त्यांचा विचार नवव्या प्रकरणांत केलेला आहे.

विधिविषयक ह्या मुख्य मुख्य, रूढींव्यतिरिक्त कमज्यास्तपणा किंवा श्रेष्ठकनिष्ठपणा दर्शविणाऱ्या आणखी कांहीं रूढी समाजांत उत्पन्न होत असतात. त्यांतील मुख्य मुख्य रूढींचें विवेचन १०व्या प्रकरणांत केलेलें आहे.

इतका वेळ श्रेष्ठ हा कनिष्ठापासून निराळा व कमी दर्जाचा आहे, हें दर्शविण्याकरितां जे निरनिराळे विधि होत असतात त्यांचा विचार झाला. पण श्रेष्ठास संतोषवि-

ण्यासाठीं हे विधी करणें कनिष्ठास जसें इष्ट वाटतें, तसें तो करितो तें आपणास पसंत आहे असें दर्शवून त्यास संतुष्ट करण्याकरितां त्याचें जें निरनिराळ्या प्रकारचें अनुकरण तो करीत असतो त्यावरून कांहीं अनुकरण-रूपी चालीरीतींची उत्पत्ति होत असते. ह्या चालीरीतींचें विवेचन अकराव्या प्रकरणांत केलेलें आहे.

अशा रीतीनें निरनिराळ्या विधिसंस्थांचा विचार झाल्यानंतर त्यांचें एकंदर सार बाराव्या म्हणजे शेवटच्या प्रकरणांत काढून भविष्यत्काळीं ह्या विधींस कशा प्रकारचें स्वरूप येण्याचा संभव आहे ह्या गोष्टीचाहि विचार त्यांतच केलेला आहे, आणि अशा रीतीनें ह्या विषयाचें नेहमींच्या पद्धतीस अनुसरून समापन केलेलें आहे.

एवंच "विधिविषयक संस्थां"चा विचार झाला. आतां प्रस्तुत ग्रंथाचा दुसरा भाग जो " धर्मविषयक संस्था " त्यांचा विचार करूं.

ह्या भागाच्या पहिल्या प्रकरणांत धर्मविषयक कल्पना माणसांमध्यें कशा रीतीनें प्रथम उत्पन्न झाली, ह्या प्रश्नाचा विचार केलेला आहे, आणि त्याचें विवेचन ह्या शास्त्राच्या पहिल्या भागांत फारच सविस्तर रीतीनें (वीस प्रकरणांत) केलेलें असल्यामुळें त्याबद्दल येथें विशेष सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. ह्या प्रकरणांत विशेषत: हें दाखविण्याचा रोंख आहे कीं, इतर धर्म जसे स्वभावजन्य आहेत तसाच ख्रिस्तीधर्महि आहे. आणि त्याचाच उद्गम तेवढा निसर्गोत्तर आहे असें म्हणणें युक्तीस व पुराव्यास दोहोंसहि सोडून आहे.

धर्मविषयक कल्पना पिशाचविषयक कल्पनेपासून

उत्पन्न झालेली असल्यामुळें आणि पिशाचें हीं हितकारक आणि अहितकारक दोन्ही प्रकारचीं असतात असा समज असल्यामुळें पहिल्या प्रकारच्या भुतांचें निवारण करणारे आणि दुसऱ्या प्रकारच्या भुतांचें संतर्पण करणारे असे दोन प्रकारचे लोक उत्पन्न होतात, आणि त्यांस वैदू व उपाध्ये अशीं नांवें पडतात. पण प्रारंभीं ते एकच असून हळूहळूच पृथक् बनत जातात. ह्या विषयाचा विचार दुसऱ्या प्रकरणांत केलेला आहे.

वर सांगितलें कीं भुतें दुष्ट व सुष्ट दोन्ही प्रकारचीं असतात; पैकीं पहिलीं अर्थात् मृतशत्रूचीं असून दुसरीं मृत आप्तांचीं असतात. आणि पाहिल्याचें निवारण करण्याचें काम वैदूकडे किंवा तज्ज्ञ समजलेल्या माणसाकडे जसें जातें, तसें दुसऱ्यांचें संतर्पण करण्याचें काम सहजच मृताच्या वंशजांकडे येतें. म्हणून या बाबतींत वंशजांचीं काय कर्तव्यें असतात त्यांचा विचार ३ऱ्या प्रकरणांत केलेला आहे.

अगदीं प्रारंभीं हें काम जरी मृताच्या सर्वच वंशजांकडे असतें तरी कालान्तरानें तें करण्याची मुख्य जबाबदारी सहजच मृताच्या वडील मुलावर येऊन पडते. ह्या गोष्टीचा विचार चवथ्या प्रकरणांत केलेला आहे.

मृताचें संतर्पण करण्याचें काम जसें इतर माणसांच्या वडील मुलाकडे जातें तसेंच तें मृतनायकाच्याहि वडील मुलाकडे जातेंच. अशा रीतीनें जिवंत नाईक किंवा शास्ता मृतनायकाचा मुख्य संतर्पक किंवा उपाध्याय बनतो. शिवाय प्रारंभीं इहलोक व परलोक आणि तेथील व एथील शास्ते ह्यांजमध्यें फारसा भेद समजला जात नसतो. म्हणून जिवंत शास्त्याचें संतर्पण करणें हें जसें टो-

ळींतील माणसांचें कर्तव्य असतें तसेंच मृतशास्त्याचें करणें हेंहि असतें. आणि म्हणून हे लोक त्याचे संतर्पक बनून ते मुख्यशास्त्याच्या अध्यक्षत्वाखालीं देवभूत मृतशास्त्याचें पूजन करितात ह्या गोष्टीचा विचार पांचव्या प्रकरणांत केला आहे.

अशा रीतीनें मुख्य शास्ता तो टोळीचा जरी मुख्य उपाध्या बनतो, तरी, विजयामुळें किंवा अन्य कारणांनीं टोळीचा मुलूख व त्यांतील वस्ती वाढत चालली म्हणजे राजकीय बाबतींत जसे त्यास मुनीम नेमावे लागतात, तसेच धार्मिक बाबतींतहि नेमावे लागतात; आणि अशा रीतीनें उपाध्येवर्गाची उत्पत्ति कशी होते हें सहाव्या प्रकरणांत सांगितलें आहे.

एका टोळीनें दुसऱ्या टोळीवर विजय मिळवून त्यांचा मुलूख काबीज केला म्हणजे जेत्या टोळीच्या मुख्याचे मृतपूर्वज किंवा देव आणि जित टोळीचे देव ह्या दोघांचीहि पूजा तेथें होऊं लागते. ह्या व अन्य कारणांनीं अनेकेश्वरी पंथ उत्पन्न होऊन एकेश्वरी पंथाप्रमाणें त्यांचेहि उपाध्येवर्ग उत्पन्न होतात. ह्या गोष्टीचा विचार सातव्या प्रकरणांत केलेला आहे.

राज्याचें क्षेत्र जसें वाढत जाईल तसें राजकीय अधिकाऱ्यांप्रमाणें धार्मिक अधिकाऱ्यांचेंहि जाळें विस्तृत होत जाऊन त्यांच्यांत वरिष्ठ अधिकारी, गौण अधिकारी, इत्यादि वर्ग कसे बनतात हें आठव्या प्रकरणांत सांगितलेलें आहे.

अशा रीतीनें जीं धर्ममंडळें किंवा धर्मसंस्था उत्पन्न होतात त्यांचा उपयोग समाज एकवटलेले ठेव-

ण्याच्या कामीं आणि राजाचीं लष्करी व दिवाणी कर्तव्यें करण्याच्या कामीं प्रारंभीं कसा उपयोग होत असतो आणि पुढें पुढें हीं धर्ममंडळें आपलें धर्माचेंच तेवढें काम विशेषेंकरून कसें करूं लागतात, ह्याचें विवेचन क्रमानें नवव्या तें अकराव्या प्रकरणांत केलेलें आहे.

वर सांगितलेल्या रीतीनें ऐहिक सरकार आणि धार्मिक सरकार हीं प्रारंभीं एकच असून मागाहून भिन्न झालीं म्हणजे कोणाचा पगडा कोणावर कोणत्या स्थितींत असतो, ह्याचें विवेचन बाराव्या प्रकरणांत केलेलें आहे.

अशा रीतीनें ह्या दोन संस्थांमध्यें पुढच्या पुढच्या पायऱ्यांवर जसे झगडे सुरू होतात, तसे त्याच पायऱ्यांवर मुख्य धर्मापासून कांहीं लोक भिन्न मतें धारण करूं लागून त्यांच्यामध्यें आणि मुख्य किंवा स्थापित धर्मसंस्थेमध्यें झगडे कसे सुरू होतात, आणि त्यामध्यें ह्या विरोधी मतांची सरशी कोणत्या परिस्थितींत होत जाते ह्याचा विचार तेराव्या प्रकरणांत केलेला आहे.

चवदाव्या प्रकरणांत उपाध्येवर्गाचा नीतिवर्धनाच्या कामीं किती उपयोग असतो, हें सांगून, धर्मसंस्थांच्या आजपर्यंतच्या स्थितीचें आणि त्यांना भविष्यत्काळीं काय स्थिति प्राप्त होईल ह्याचें पंधराव्या प्रकरणांत विवेचन केलें आहे; आणि खुद्द धर्माची आजपर्यंतची स्थिति कशी आहे आणि पुढें त्यास काय स्वरूप येण्याचा संभव आहे हें सोळाव्या म्हणजे अखेरच्या प्रकरणांत,सविस्तर आणि मार्मिक रीतीनें सांगितलेलें आहे.

शुद्धिपत्र

विधिसंस्था

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६	२६	दप्रेश	प्रदेश
१२	४	माणसलेल्या	मागसलेल्या
३०	२२	नाहींत	नाहींत.
३८	२४	पहात.	पहात,
४३	२	त्या	त्यास
४४	२६	मथाळ्याखालीं	मथळ्यांखालीं
५५	६	असें	जसें
६१	१८	त्यास	तें त्यास
८४	१५	पडत	पडत असे
८५	१३	होता.	होता,
९३	२३	त्यांचें	यांचें
११५	२४	असें	असे असें
१४०	६	आहे	आहें
१४८	८	नेबुचाडचे झारनें	नेबुचाडनेझारनें
१४८	२२	भाल्यासारखें	भ्याल्यासारखें
१५०	५	लागावीं,	लागावीं.
१५०	७	तितका	तिसरा
१५३	७	किंकाळते	किंकाळले
१५६	२५	मीसभू	भूमीस
१५७	१७	विसरून	विखरून
१८३	१४	उदास	उदात्त
२०१	६	कसा	कसें
२३४	६	नाहीं,	नाहीं.
२४१	२०	जसे हे	जसे
२४१	२१	किंमतीचीहि	किंमतींचींहि
२५८	३	पडतो;	पटतो;
२५९	१५	ते	तें
२५९	१६	तें	ते
२६४	५	म्हटलेले	म्हटलेलें

धर्मविषयक संस्था

१४	१४	घेतलेल्या	घेरलेल्या
४०	१	मतांचे	मृतांचे
४०	१३	असतात.	असतात,
४४	८	त्यांचे	यांचे
४९	१०	त्याचा	त्यांचा
५५	१७	दृर्ष्टीनें जितकें	दृष्टीनें
५५	१८	हें जितक्या	जितक्या
५८	१६	राजाचीहि	राजाचींहि
५९	५	तेथें तो	तेथें
६१	२०	राजकीम	राजकीय
७४	१३	तदाहरण	उदाहरण
९.१	२	मान्टिझूमानाला	मान्टिझूमाला
९४	१८	नसतील.	नसतील,
९९	१७	सूळ	मूळ
११७	१५	शास्त्रांच्या	शास्त्यांच्या
१३३	६	त्याचा	त्यांचा
१५१	२३ २४	वेस्कियन	वोस्लयन
१५६	६	आवडतो	चाहातो
१५७	१३	धडकेल	भडकेल
१५७	२२	हें	त्या बद्दल
१५८	४	निवडील.	निवडीत.
१६२	१९	देशांत देशांतल्या	देशांतल्या देशांत
१६४	७	ख्रिस्ती लोकांचें	प्यूरिटन लोकांचें
१६५	९	विचारांनीं	विचारान्तीं
१७२	१५	लोकनीतीच्या	लोक नीतीच्या
१९४	२२	होतें	होतें.
२००	२४	जो	तो
२०१	२	म्हणजेच	म्हणजे

अनुक्रमणिका

विधिसंस्था

धर्मविषयक संस्था

परिशिष्ट पृष्ठ १ ते ४०

विधिसंस्था

प्रकरण पहिलें

विधिविषयक सामान्य विचार

१. जें वर्तन सर्वांशीं खासगी आहे त्याचा विचार न करितां ज्याचा इतरांशीं प्रत्यक्ष संबंध येतो त्याचाच विचार केला, आणि ‘ सरकार ’ या नांवाखालीं ह्या वर्तनावरील सर्वप्रकारच्या दाबांचें समावेशन केलें, तर मग आपणास असें म्हणावें लागेल कीं, सर्वांत अगोदरचें सरकार किंवा शासन, सर्वांत अतिशय सामान्य सरकार, आणि नेहमीं आपोआप पुनःपुनः सुरू होणारें सरकार म्हटलें म्हणजे विधिविषयक सरकारच होय. याबद्दल आणखी असेंहि म्हणतां येईल कीं, हें सरकार सर्वांत अगोदरचें, आणि सर्वकाळीं व स्थळीं बहुतेक सर्व मानवजातीवर आपला पगडा बसविणारें असें असून त्याचें आजपर्यंत माणसांचें जीवितनियमन करण्यामध्यें सर्वांत जास्त अंग असून अद्यापिहि आहेच.

राजकीय व धार्मिक बंधनांनीं जे वर्तनबदल उत्पन्न होतात ते होण्याच्यापूर्वींच रीतीभाती व वागणूक हे फेरबदल उत्पन्न होत असतात ह्याबद्दलचा पुरावा असा सांपडतो कीं, हे बदल सामाजिक उत्क्रमण होण्याच्या पूर्वींच होतात असें नाहीं, तर मानवी उत्क्रमण हो-

ण्याच्याहि पूर्वीं होतात; म्हणजे, ते प्राणिवर्गांतील उच्च-तर जातींमध्येंहि दिसून येतात. कुत्र्यास माराची भीति वाटून तो धन्यापुढें अगदीं वांकून येतो; यावरून धन्याला नमून राहण्याची त्याची इच्छा असते हें स्पष्ट होतें. बरें, असल्या ह्या प्रसन्न करून घेण्याच्या क्रिया कुत्रे माणसांच्याचसंबंधानें करितात असें नाहीं, तर ते त्या क्रिया एकमेकांच्यासंबंधानेंहि करितात. एकादा मोठा कुत्रा जवळ आला म्हणजे लहान कुत्रा उताणा पडून तंगडया वर कशा करितो हें पुष्कळांनीं केव्हां तरी पाहिलेंच असेल. दुसरा एकादा बरोबरीचा कुत्रा आल्यास जसा तो गुरगुरूं लागतो व दांत दाखवूं लागतो, तसें आतां न करितां तो पराजित झाल्याच्या खुणा करितो, आणि जणूं काय म्हणतो कीं, " मी जित झालों आहें, माझें पाहिजे तें करा." ह्यावरून, तर मग, असें स्पष्ट दिसतें कीं, माणसाहून हलक्या दर्जाच्या प्राण्यांमध्यें प्रेमदर्शक वर्तनसरणी जशा स्थापन झालेल्या आहेत तशाच वशतादर्शक वर्तनसरणीहि स्थापन झालेल्या आहेत.

ही गोष्ट लक्षांत आणिली म्हणजे दुसरी एक गोष्ट लक्षांत आणण्याची आपली तयारी होईल. ती गोष्ट ही कीं, ज्या अगदीं हलक्या रानटी लोकांच्या जमावांत राजकीय किंवा धार्मिक नियंत्रण मुळींच नसतें त्यांच्यांत देखील विधिविषयक नियमन बरेंच असतें. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियन लोकांच्या लहान जमावांत श्रेष्ठ माणसाच्या स्वाभाविक अधिकाराव्यतिरिक्त नियामक संस्था मुळींच नसते, पण त्यांना कांहीं विधि अवश्यच पाळावे लागत

असतात. उदाहरणार्थ, त्यांच्यांत दोन अनोळखी गृहस्थांची गांठ पडली म्हणजे कांहीं वेळ त्यांनीं एकमेकांशीं बोलतां कामा नये; त्यांची छावणी असेल तिच्या नजीक एक मैलावर आलें म्हणजे एकदां मोठी कुई केली पाहिजे; आणि स्नेहसंबंध दाखविण्यास एक हिरवी डहाळी बरोबर आणिली पाहिजे. त्यांच्यांत बंधुप्रेम एकमेकांचीं नांवें धारण करून दाखवीत असतात. तास्मेनियन लोकांतहि लढाईच्या वेळच्या नायकाच्या प्राबल्याव्यतिरिक्त सरकार मुळींच नसून ते स्नेहभाव व वैरभाव नेमक्या रीतींनीं व्यक्त करीत असत. एस्कीमो लोकांतहि सामाजिक पदव्या किंवा नायकी ही मुळींच नसून पाव्हण्याशीं वर्तन करण्याच्या ठराविक रूढी आहेत. ह्यासारखाच आणखीही पुरावा येथें देतां येण्यासारखा आहे. जेथें इतर नियमनसरणी अगदीं कोंवळ्या स्थितींत आहेत, अशा पुष्कळ ठिकाणीं विधिरूप नियमन फारच पक्क अशा स्थितींत दृष्टीस पडतें. रानटी कोमांची इतरांकडून आपले शिष्टाचारविधी जबरीनें पाळून घेतो, आणि ते किंचित्‌हि मोडिल्यास फार क्रुद्ध होतो. दोन ऑराकेनियन लोकांची गांठ पडली म्हणजे विचारपूस,आनंदप्रदर्शन आणि दुःखप्रदर्शन हीं करण्याचे विधी त्यांना इतके पाळावे लागतात कीं, त्या एकंदर कृत्यास दहा किंवा पंधरा मिनिटांहून कमी वेळ पुरत नाहीं. सरकारविहीन जे बेडुइन लोक त्यांच्यासंबंधानें आपण असें वाचितों कीं, त्यांच्या रीतीभातींत कधीं कधीं विलक्षण प्रकारची विधिपूर्वकतेची झांक मारत असते; आणि आरब लोकांचीं नमनें

इतकीं चालतात कीं, चांगल्या कुळांतील माणसाचे न-
मस्कार चमत्कार सारखे दहा दहा मिनिटें चालतात.
लिव्हिंग्स्टन म्हणतो, बालोंडा लोकांमध्यें हे शिष्टाचार
आह्माला विशेषच दिसले. मालागासी लोकांमध्यें नमन-
विधी पुष्कळ प्रकारचे असून त्यांचा ते सढळपणें उप-
योग करीत असतात. म्हणून त्यांच्या सामान्य व्यवहा-
रांत ठराविक, नेमकें, क्रियारूप असें पुष्कळ आढळतें.
सामोआन लोकांतील वक्ता त्यांच्या पार्लमेंटापुढें उभा
राहिला म्हणजे "सभ्यगृहस्थ हो" एवढ्याच शब्दांनीं
त्यानें सभासदांस संबोधून भागत नाहीं, तर प्रत्येक
सभासदाचें नांव, त्याच्या पदव्या, त्याच्या पूर्वजांचीं नांवें
इत्यादि किती तरी गोष्टींस उल्लेख करून संबोधावें लागतें.

इतर प्रकारच्या नियंत्रणांच्या अगोदर उत्पन्न होणारें
हें विधिविषयक नियंत्रण नेहमीं सर्वांत जास्त पसरलेलें
राहतें ही गोष्ट ह्यावरून दिसून येते कीं, निरनिराळ्या समा-
जांच्या परस्परव्यवहारांत जोमाची अशीं कोणतींहि कृत्यें
करण्यापूर्वीं हें विधिविषयक कृत्य अगोदर होत असतें. एका
राष्ट्रानें दुसऱ्याकडे पाठविलेला वकील यश घेऊन न
येवो; तहाचें बोलणें सुरू असूनहि शेवटीं लढाईवर प्र-
करण येवो; किंवा एक राष्ट्र दुसऱ्यावर जबरीनें आपला
अंमल स्थापून त्यास आपल्या अगदीं मुठींत घेवो; सर्व
ठिकाणीं वर्तनाचें हें सामान्य व अस्पष्ट असें नियंत्रण
जास्त विशिष्ट व स्पष्ट अशा नियंत्रणाच्या पूर्वीं नेहमीं
येत असतें. त्याप्रमाणेंच समाजांतल्या समाजांतहि दि-
वाणी धार्मिक अधिकारी आपले कडक अधिकारहि चा-
लविण्यापूर्वीं विधिविषयक गोष्टी करीत असतात; आणि

विधिपूर्वकता ही सर्व कृत्यांना लागू आहे इतकेंच नाहीं, तर ती एका दृष्टीनें सर्व कृत्यांस जणूं काय व्यापूनच टाकिते. धर्मोपाध्याय आपल्या अधिकाराचा केवढाहि मोठा दिमाख करीत असला, तरी नमस्कार नम्रपणेंच करितो, आणि न्यायाधिकारीहि न्याय देतांना दुसऱ्यांस संतुष्ट करण्यासारखे कांहीं शब्द उच्चारितो, व कांहीं हालचाली करितो.

विधिविषयकनियंत्रण सर्वांच्या अगोदरचें आहे हें आणखी एका गोष्टीवरून दिसून येतें. व्यक्तींमध्यें कोणताहि नवा संबंध स्थापन व्हावयाचा म्हणजे तो विधिपूर्वक स्थापन होतो. अगदीं परिचित लोक देखील जेव्हां जेव्हां एकमेकांस भेटतील तेव्हां नमस्कार करितात, किंवा सन्मानदर्शक दुसरी कांहीं कृति करितात. आणि आगगाडींत देखील परका मनुष्य जवळ असेल तर आपण तितके बेतानें वागतों, किंवा आपल्याजवळ विडी किंवा वर्तमानपत्र असेल तर त्यास देतों; यावरून, अत्यन्त रानटी माणसांत देखील दिसणारी दुसऱ्यास खुष करण्यासारखी वागणूक सहजगत्या कशी उत्पन्न होते हें दिसून येतें.

एवंच दुसरीं माणसें हजर असल्यामुळें माणसांच्या कृतींच्या स्वरूपांमध्यें जो फेरबदल होतो तोच अनिश्चित असा पहिला नियंत्रणप्रकार होय; आणि त्याच्यांतून असे अन्य नियंत्रणप्रकार उत्क्रान्त होत असतात; म्हणजे, हें सरकार प्राथमिक व समस्वरूप असें असून त्यापासून पुढें राजकीय व धार्मिक सरकारें विभिन्नीकरण पावत असतात.

२. हा सिद्धांत विलक्षण दिसतो ह्याचें मुख्य कारण हें कीं, आपल्याहून कमी प्रगति पावलेल्या समाजांचा विचार करीत असतां, कायदा व धर्म ह्यासंबंधाच्या आपल्या ज्या पक्क कल्पना त्या आपण आपल्याबरोबर घेत असतों. त्यांचा पगडा आपल्यावर बसल्यामुळें, आपणास धर्मविषयक व संसारविषयक कायद्यांचे जे भाग मुख्य म्हणून वाटतात ते प्रारंभीं गौण भाग होते, आणि मुख्य भाग विधिविषयक आचारांचे बनलेले होते, हें आपल्या लक्षांत येत नाहीं.

आतां सामाजिक चमत्कार जर उत्क्रमणसरणीनें उत्पन्न झालेले असतील, तर हें असेंच असलें पाहिजे हें विचारदृष्टचाच स्पष्ट दिसतें. एकादी राजकीय सरणी किंवा ठराविक पंथ एकाद्या समाजांत एकदम अस्तित्वांत येऊं शकत नाहीं, तर त्याच्या अगोदर त्यांतील लोकांत अंकितपणा स्थापन झालेला असावा लागतो. ह्यावरून हें स्पष्टच आहे कीं, दृश्य किंवा अदृश्य शास्त्यानें लादिलेलीं ऐहिक किंवा धार्मिक बंधनें उत्पन्न होण्याच्या अगोदर त्याची आज्ञा मान्य आहे असें दर्शविणारें वर्तन लोकांत उत्पन्न झालेलें असलें पाहिजे. म्हणजे, विधिविषयक सरकार सर्वांच्या अगोदर स्थापन झालें पाहिजे; आणि तसें तें सर्वत्र आढळून येतें.

राजकीय बाबतींत अंकितभावदर्शक विधींचें पालन ही पहिली गोष्ट कशी असावी लागते हें प्रारंभींच्या यूरोपच्या इतिहासावरून दिसतें. धनी कोणीं व्हावें हा प्रश्न कोठें लहान प्रदेशांत, आणि कोठें अनेक लहान प्रदेश एकत्र होऊन बनलेल्या मोठाल्या प्रदेशांत, सो-

ढविला जात असतां, पक्क झालेल्या सरकाराबरोबर जें नियमन उत्पन्न होत असतें त्यापैकीं बहुतेक मुळींच नव्हतें; तरी पण राजनिष्ठाप्रदर्शन नम्रपणें करण्याबद्दलची जबरी तेव्हांही असे. ज्याकाळीं प्रत्येकास आपलें संरक्षण आपणच करावें लागे, आणि निरनिराळ्या कुटुंबांमध्यें रक्तस्राव करणारे कलह चालत असून सरकारास ते मुळींच कमी करतां येत नसत, तेव्हां देखील राजकीय मुख्यांपुढें राजनिष्ठाप्रदर्शक शपथा घेण्याबद्दल आणि त्या निष्ठेचें काळाकाळानें प्रदर्शन करण्याबद्दल कडक जबरी असे. लहान लहान शास्ते मोठाल्या शास्त्यांना आपली नम्रता दर्शवीत; आणि जो छोटा जमीनदार मुख्य जमीनदारापुढें आपल्या कमरेंतील पट्टा व तरवार काढून लवेल व आपला अंकितपणा कबूल करील, आणि नंतर जमीन ताब्यांत घेईल, त्यास दरबारांत व छावणींत, तो आपली छोटी जमीनदारी कबूल करील तोंपावेतों, बहुधा मुळींच त्रास होत नसे. पण हे विधि जो पाळणार नाहीं तो बहुतेक बंडवाला म्हणूनच समजला जाई. हल्लीं चीन देशांतहि असेंच आहे; तेथें प्रत्येक पायरीवरच्या अधिकाऱ्यांशीं कसें वागावें ह्याबद्दल घालून दिलेले नियम मोडणें म्हणजे जवळ जवळ त्यांचा अधिकार नाकबूल करण्यासारखेंच समजतात. सामाजिक विशेषांचा हा संबंध ह्याच्याहून हलक्या दर्जाच्या लोकांमध्यें ह्याच्याहूनही ज्यास्त चांगल्या रीतीनें दिसून येतो. उदाहरणार्थ, ताहितियन लोकांची अत्यन्त विधिपूर्वकता त्यांच्या देवळांतून, दरबारांत, लोकांच्या राजाशीं होणाऱ्या वर्तनांत, सारांश एकंदर

सामाजिक व्यवहारांत भरलेली दृष्टीस पडत असे. इतर्के असून त्यांच्यांत तोंडी कायदेकानू देखील नसत, किंवा सार्वजनिक न्यायदानपद्धति नसे. तद्वतच, टांगन लोकामध्यें एकाद्या श्रेष्ठ सरदारास एकादा माणूस योग्यप्रकारचें वंदन करण्यास चुकला तर त्याबद्दल देव त्याच्यावर कांहीं तरी संकट आणावयाचेच म्हणून समजत; आणि त्या लोकांच्या सद्‍गुणांची मारिनरनें जी यादी केली आहे तिच्यांत देव, सरदार, व वृद्ध यांस नमस्कार करणें हा गुण प्रथम घातला आहे. शिवाय, त्यांच्यासंबंधानें तो असें म्हणतो कीं, टाँगन लोक जीं कृत्यें चुकीचीं म्हणून समजतात त्यांपैकीं पुष्कळ वस्तुतःच सदोष आहेत असें नाहीं, तर तीं देवांना किंवा सरदारांना अनुलक्षून केलीं तर सदोष ठरतात. यावरून असें सिद्ध होतें कीं, ज्या मनोभावांपासून व कल्पनांपासून दिवाणी सरकाराची उत्पत्ति होते ते अगदी दुर्बल स्थितींत असले तरी विधिरूपी नियमन किंवा सरकार प्रौढ असें बनूं शकतें. मेक्सिकन राजा पहिला माँटि झीमो ह्याचे बहुतेक कायदे वर्गावर्गांमधील भेद आणि दळणवळण ह्यांच्यासंबंधाचेच होते. पेरूमध्यें अगदीं सामान्य शिक्षा म्हणजे देहान्त असे, कारण ते लोक असें म्हणत कीं अपराध्यास शिक्षा करावयाची ती त्याच्या अपराधाबद्दल नव्हे, तर राजाची आज्ञा मोडल्याबद्दल होय. म्हणजे, ज्या पायरीवर एका माणसानें दुसऱ्याचें केलेलें जें अतिक्रमण त्याबद्दल शिक्षा होते, व म्हणून ती त्या अतिक्रमणानुरूप असते, त्या पायरीवर ते लोक गेलेले नव्हते; तर दांडपणा हा ते वास्तविक

अपराध म्हणून समजत. सारांश, अंकितपणाचें प्रदर्शन लोकांकडून करून घेणें हें त्यावेळीं सरकारचें मुख्य स्वरूप किंवा नियमनाचें मुख्य अंग होतें. जपानमध्यें जी इतकी संकीर्ण विधिपूर्वकता असे ती ह्याच समजुतीवरून उत्पन्न झालेली होती. आणि इंग्लंदासारख्या सुधारलेल्या समाजामध्येंही पूर्वी असलीच स्थिति असल्याचा पुरावा सांपडतो. कारण व्हार्टन म्हणतो:–मोठ्या गुन्ह्याबद्दल जो एकाद्यावर खटला होतो तो आमचा धनी जो राजा त्याची शांतता, त्याची गादी, आणि त्याचा एकंदर मानमरातब ह्यांचें अतिक्रमण केल्याबद्दल होतो; म्हणजे, ह्याच्यांत ज्याच्याविरुद्ध गुन्हा झाला त्याचा मुळींच संबंध येत नाहीं. ह्यावरून हें उघडच दिसतें कीं, प्रारंभीं आज्ञाधारकपणा ही पहिली आवश्यक गोष्ट समजत असत, आणि तद्दर्शक वागणूक ही वर्तनामध्यें पहिली सुधारणा झाली पाहिजे म्हणून जोरानें सांगत.

हें सामान्य सत्त्व राजकीय नियमनापेक्षां धार्मिक नियमनावरून कदाचित् ज्यास्त चांगल्या रीतीनें व्यक्त होतें. जे विधी प्रथम थडग्यांपाशीं करीत असून मागाहून धार्मिक विधी बनून देवळांतून स्थंडिलांपुढें करूं लागले, ते प्रथम भुताच्या फायद्यासाठीं म्हणून करीत असत ही गोष्ट लक्षांत घेतां; तद्वतच जीं हवनें, संतर्पणें, रक्तदानें, दहनें, आणि अंगविकर्तनें (सुंता वगैरे) मृत माणसाच्या दुय्यमाचा फायदा करण्याकरितां किंवा त्यास संतुष्ट करण्याकरितां प्रथम करीत तीं जेथें मृत माणसांस विशेषतः भीत तेथें ज्यास्त प्रमाणावर करीत हें लक्षांत घेतां; आणि मृतासाठीं करावयाच्या उपवासा-

पासून धार्मिक उपवासाची उत्पत्ति झाली, आणि मृताच्या स्तुतीस व प्रार्थनेस धार्मिक स्तुतीचें व प्रार्थनेचें स्वरूप आलें ही गोष्ट ध्यानांत आणतां, प्राथमिक धर्म बहुतेक सर्वांशीं संतर्पणरूपविधींचे का बनलेले असत, हें स्पष्ट होतें. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या कांहीं रानटी समाजांत संतर्पणविधींपैकीं एक असा आहे कीं, मृतनायकानें किंवा बापानें केलेल्या आज्ञांचा पाठ करावयाचा, आणि त्याबरोबर कधींकधीं त्या मोडल्याबद्दल पस्तावा करावयाचा; ह्यावरून शेवटीं ज्या पवित्र आज्ञा म्हणून उत्पन्न होतात त्यांचें बीज प्रारंभापासून दृष्टीस पडतें, हें जरी खरें आहे, तरी मृतांचे बनलेले जे देव त्यांच्या ठिकाणीं जिवंतपणींच्या इच्छा व मनोवृत्ती कायम असतात असें ज्याअर्थीं समजतात, त्याअर्थीं नीतीचें वरील बीज प्रारंभीं अगदीं क्षुल्लक असतें, व स्तुति, हविर्दानें, आणि नमस्कृति, यांचे योगानें भुताची किंवा देवाची मर्जी संपादणें हा धर्माचा मुख्य भाग असतो, हें स्पष्ट दिसतें. ह्याबद्दलचा पुरावा सर्वत्र सांपडतो. ताहितियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं त्यांच्या जीविताच्या बहुतेक प्रत्येक कृत्याशीं धर्मविधींचा संबंध असे, आणि ही गोष्ट असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें सामान्यच आहे. सांडविच बेटवाल्यांमध्यें धर्मांत नीतीचा समावेश बहुतेक मुळींच होत नसून विधींचें बाड मात्र मोठें व कडकडीत असे. उदाहरणार्थ, त्यांच्यामध्यें वर्षाचे कांहीं दिवस देवांचे म्हणून पवित्र समजून त्या दिवसांत त्यांच्या घरांतून कोठें विस्तव दिसावयाचा नाहीं; नवीन होडी पाण्यांत ढकलावयाची

नाहीं; कोणी स्नान करावयाचा नाहीं. आणि देवांच्या पुजाऱ्याखेरीज घराबाहेर कोणी पडावयाचा नाहीं. ह्या दिवसांत कुत्र्यानें भुंकता कामा नये, डुकरानें ओरडतां कामा नये, आणि कोंबडयानें आरवतां कामा नये; ह्यासाठीं कुत्र्यांचीं व डुकरांचीं तोंडें आणि कोंबडयांचे डोळे ते बांधीत असत. असल्या दिवसांत कोणी गोंगाट केल्यास तो मेलाच पाहिजे असें ते समजत; ह्यावरून विधिपालन करण्यास चुकणें म्हणजे धर्मातिक्रमण करणें अशी त्यांची पूर्ण कल्पना कशी बनलेली होती हें स्पष्ट दिसतें. ह्याच्यापेक्षां बऱ्याच वरच्या पायऱ्यांवरूनहि धर्माची कल्पना हीच असते. उदाहरणार्थ, निकाराग्वामधील लोक सण न पाळणें म्हणजे पाप करणें असें समजत असें ओव्हीडो सांगतो. तद्वतच पेरुव्हियन लोकांमध्यें भुतांच्या वगैरे नोकरींत चुकणें हें सर्वांत मोठें पाप समजत, आणि देव म्हणून समजलेल्या मृतांचें संतर्पण करण्यांत ते आपला बराच वेळ घालवीत. दैविक सत्त्वांची मर्जी संपादण्याकरितां प्राचीन इजिप्शन लोक किती व्रतनेम पाळीत, किती सण करीत, आणि किती पैसे खर्चीत, हें त्यांच्या इतिहासावरून स्पष्ट दिसतें. मोझेसच्यापूर्वी यहुदी लोकांत असेंच होतें. ग्रीक लोकांची पवित्रतेची कल्पना म्हणजे थडग्यांपाशीं काळजीपूर्वक कांहीं विधी करावयाचे अशी असे, आणि संतर्पणविधी न केल्यास त्यांच्या देवास विशेष राग येत असे. ख्रिस्तीधर्मांत देखील प्रथम विधींपेक्षां नीतीला जरी ज्यास्त महत्त्व दिलेलें होतें, तरी मध्ययुगांत नीतीपेक्षां विधींचेंच प्रस्थ त्यांच्यांत ज्यास्त माजलें. त्यावेळीं माणसें आप-

त्या अपराधांचें प्रायश्चित्त म्हणून देवळें बांधीत किंवा यात्रा करीत. तेव्हांपासून हल्लीं विधि कमी होऊन नीति वाढली आहे हें खरें आहे; तरी नेपल्स किंवा सिसिली असल्या माणसलेल्या देशांतून नीतीपेक्षां विधींचेंच प्राबल्य ज्यास्त आहे. आणि प्राटेस्टंट व प्यूरिटन हे पंथ किती अलीकडील आहेत हें ध्यानांत आणतां विधि गौण बनून नीति प्रबल होते ती धर्माच्या पुढच्या पुढच्याच पायऱ्यांवर होते हें स्पष्ट दिसतें.

असो. यावरून तर मग काय अनुमान निघतें तें लक्षांत आणा. ज्या दोन प्रकारच्या नियमनांपासून अखेरीस लौकिक व धार्मिक सरकारांची उत्पत्ति होते, त्यांत प्रारंभीं विधिपालनापलीकडे बहुतेक कांहींच नसतें हें जर खरें आहे, तर विधिरूप नियमन हें इतर सर्व नियमनांच्या अगोदरचें आहे हें उघडच सिद्ध होतें.

३. उत्क्रमणापासून उत्पन्न झालेल्या गोष्टी ज्या गोष्टीपासून उत्क्रान्त झालेल्या असतील तिचे कांहीं विशेष त्या धारण करीत असतात, आणि त्यामुळें त्यांचें परस्परनातें व्यक्त होत असतें; ह्यावरून असें अनुमान निघतें कीं त्यांच्यामध्यें जे सर्वसामान्य विशेष आहेत ते जे विशेष परस्परभिन्न आहेत त्यांच्या अगोदर उत्पन्न झाले असले पाहिजेत. उदाहरणार्थ, मासे, साप, पक्षी आणि स्तनवत् प्राणी ह्या सर्वांचे ठिकाणीं ज्याअर्थीं पाठीचा कणा दृष्टीस पडतो त्याअर्थीं उत्क्रमणाच्या कसोटीवरून असें सिद्ध होतें कीं, स्तनवत् प्राण्याचे स्तन आणि दांत, किंवा पक्ष्याची दंतविरहित चोंच आणि पंख इत्यादि उत्पन्न होण्यापूर्वीं. हा कणा उत्पन्न झाला

असला पाहिजे. हेंच तत्त्व प्रस्तुत विषयास लावितां त्यावरून असें अनुमान काढतां येतें कीं, ज्या नियमनांस आपण लौकिक, धार्मिक व सामाजिक असें म्हणतों त्यांच्या ठिकाणीं जर कांहीं सामान्य विशेष असतील तर ते विशेष हल्लींच्या ह्या विशिष्टीभूत नियमनांहून जुने असल्यामुळें, हीं नियमनें ज्या मूळ नियमनापासून उत्पन्न झालीं, त्याचे असले पाहिजेत. म्हणून विधि हे सर्वांत अगदीं जुने आहेत; कारण ते ह्या सर्व विभिन्नीभूत नियमनांमध्यें दृग्गोचर होतात.

पहिला विधि नजराणे देण्याचा: हा जो विधि आहे तो प्रारंभींच्या पायऱ्यांवर शास्त्याचे आपण अंकित आहों हें दाखविण्याचा एक मार्ग असतो. तो धार्मिकविधि असून तो प्रथम थडग्यापाशीं आणि मागून स्थंडिलापाशीं करीत असतात; आणि प्रारंभापासूनच सामाजिक व्यवहारांतील तें संतर्पणाचें साधन असतें. दुसरा विधि नमनांचा: हीं अनेक प्रकारचीं असून देव, शास्ते, आणि खासगी लोक ह्यांच्याबद्दल तीं अनेक प्रमाणांनीं सन्मान दर्शवीत असतात. कांहीं ठिकाणीं साष्टांग प्रणिपात कधीं देवापुढें, कधीं शास्त्यापुढें, आणि कधीं एखाद्या प्रबळ माणसापुढें केलेले दृष्टीस पडतात; कांहीं ठिकाणीं ह्यांच्याचपुढें गुडघे टेंकलेले दृष्टीस पडतात; कांहीं ठिकाणीं सलाम; कांहीं ठिकाणीं टोपी वगैरे डोक्यावरचें आच्छादन काढण्याचा प्रकार; आणि कांहीं ठिकाणीं डोकें लवविण्याचा प्रकार. पदव्यांचेंहि असेंच आहे. उदाहरणार्थ, बाप हें नांव देवाला, राजाला, आणि सन्मानित पुरुषाला लावीत असतात: तसेंच धनी किंवा

मालक हें लावितात; आणि तशींच आणखी कांहीं लावितात. नम्र भाषणांनाही हीच गोष्ट लागू आहे. आपण कनिष्ठ आहों व आज्ञाधारक आहों असें दर्शविणारे शब्द देवाची, शास्त्याची, किंवा एकाद्या खासगी माणसाची प्रसन्नता करून घेण्यास योजीत असतात. प्रशंसापर शब्दांचेंहि असेंच आहे. देवापुढें त्याची महती गाणें हाच देवपूजेचा मोठा भाग असतो; स्वेच्छाचारी राजांचीहि यथेच्छ स्तुति करीत असतात; आणि सामाजिक व्यवहारांत जेथें विधींचें प्राबल्य असेल तेथें खासगी व्यक्तींची भलतीच प्रशंसा होत असते.

कमी सुधारलेल्या पुष्कळ समाजांत, आणि ज्यास्त सुधारलेल्या पण पूर्वींच्या व्यवस्था कायम ठेवणाऱ्या कांहीं समाजांत, अंकितभावदर्शक अशा विधींचीं आणखी उदाहरणें दृष्टीस पडतात. मलाया व पॉलिनिशिया येथील लोकांत प्रथम सांपडतील ते मासे व फळें देवांस व नायकांस सन्मानपूर्वक अर्पण करण्याची चाल आहे. फीजीयन लोकहि नायकांस जें देतात तेंच देवांसहि देतात. म्हणजे अन्न, कांसवें, आणि देवमाशांचे दांत. टॉंगामध्यें मोठा नाईक शपथ घ्यावयाची ती देवाच्या नांवानें घेतो, आणि धाकटा नाईक मोठ्या नायकाच्या नांवानें घेतो. फीजी बेटामध्यें देवाच्या पूजेकरितां राखून ठेविलेल्या जाग्याच्या उंबरठ्यावर कोणी पाऊल टेंकावयाचा नाहीं. सरदार लोक इकडून तिकडे ढेंग टाकून तो ओलांडून जातात, आणि बाकीचे लोक त्याच्यावरून रांगत जातात; नायकाच्या घराचा उंबरठाही असाच वलांडतात. सयामामध्यें वर्षाच्या पां-

चऱ्या महिन्याच्या पौर्णिमेस उपाध्ये सुगंधि पाण्यानें देवांस स्नान घालितात; लोक भटांस स्नान घालितात, आणि मुलें आईबापांस घालितात. ह्याचीं उदाहरणें चीन देशांत चांगलीं सांपडतात. तेथील बादशहा गादीवर बसतेवेळीं आपल्या बापाच्या स्थंडिलापुढें तीन वेळां गुडघे टेंकितो आणि नऊ वेळां नमन करितो, आणि सिंहासनावर पूर्वीची राणी बसलेली असेल तिच्यापुढेंहि असेंच करितो. नंतर तो सिंहासनारूढ होतो, त्याचे कामगार आपापल्या दर्जाप्रमाणें तसेंच करितात. चिनी लोकांसारखेच विधिप्रिय जे जपानी लोक त्यांच्यामध्येंहि असलाच पुरावा सांपडतो. बादशहापासून तों हमालापर्यंत प्रणिपातांचा सारखा क्रम लागलेला दृष्टीस पडतो. बादशाहापेक्षां दुसरा कोणी श्रेष्ठ माणूस नसल्यामुळें तो कोणत्या तरी देवास नमन करितो, आणि बाकीचे लोक आपापल्या दर्जाप्रमाणें आपापल्या श्रेष्ठांस नमन करितात. त्यांच्यांत धार्मिक, राजकीय आणि सामाजिक अंकितभाव अशाच रीतीनें व्यक्त करितात.

एका सामान्य सिद्धांताचें जें हें दिग्दर्शन केलें आहे (आणि ज्यांचीं पुढील प्रकरणांतून प्रत्येक प्रकारच्या विधीचा विचार करतांना आणखी पुष्कळ उदाहरणें दिलीं जातील) तें करण्याचा असा उद्देश आहे कीं, विधिविषयक नियमन जें आहे त्याचें उत्क्रमण सामाजिक व धार्मिक नियमनांच्या अगोदर होत असतें, आणि म्हणून त्याचें विवेचन प्रथम केलें पाहिजे, ही गोष्ट आणखी व्यक्त व्हावी.

४. आतां विधिविषयक नियमनाच्या कमी सामा-

न्यस्वरूपांकडे वळतां असा प्रश्न उद्भवतो कीं, ज्या वर्तनविषयक प्रकारांचें तें बनलेलें असतें ते प्रकार कसे उत्पन्न होतात? सामान्यतः लोक असें गृहीत करीत असतात कीं पूज्यभाव किंवा सन्मानबुद्धि ह्यांचीं निदर्शक म्हणून हे निरनिराळे वर्तनप्रकार माणसें जाणूनबुजून स्वीकृत करीत असतात. मूळच्या लोकांच्या रूढींविषयीं कल्पना लढविण्याच्या त्यांच्या नेहमींच्या शिस्तीप्रमाणें आधुनिक माणसें आपल्या ज्या पक्क कल्पना त्या अपक्क मनाच्या मूळच्या माणसांच्याहि असतील असें समजून चालतात. पण माणसांनीं आपापसांत करार करून प्रथम समाज बनविले ह्या समजाइतकाच त्यांनीं हे विधिप्रकार जाणूनबुजून अमलांत आणिले हा समज निराधार आहे. चिन्हरूप प्रकारांपैकीं अत्यन्त पक्क झालेला प्रकार जी भाषा तिच्याकडे लक्ष दिल्यास वरील समजुतींतील चूक उत्तम प्रकारें ध्यानांत येते. एखादा आस्ट्रेलियन किंवा फ्यूजियन मुद्दाम बसून शब्द बनवीत नाहीं; तर जे शब्द पूर्वीपासून चालू असतील, किंवा त्याच्या अमदानींत प्रचारांत येतील त्यांच्यांत वस्तूंच्या ध्वनींवरून, किंवा कांहीं दृश्य सादृश्यावरून सुचणाऱ्या रूपकांवरून नवे शब्द उत्पन्न होऊन भर पडत असते. पण शब्द हे वस्तूंचे चिन्हांक आहेत ही गोष्ट सुधारलेल्या लोकांच्या ध्यानांत आलेली असल्यामुळें नव्या कल्पना चिन्हांकित करण्यासाठीं ते नवे शब्द मुद्दाम बनवीत असतात. लिहिण्याच्या भाषेचें किंवा लिपीचेंही असेंच आहे. विशेष ध्वनि प्रदर्शित करण्यासाठीं विशेष खुणेचा उपयोग करण्याचें ठरवून टाकावें

असें प्राचीन ईजिप्शन माणसाच्या मनांत कधीं आलें नव्हतें, तर जे व्यवहार ध्यानांत ठेवावयाचे असतील त्यांचीं चित्रें काढण्याच्या रूपानें त्याच्या लेखांस सुरवात झाली; आणि लेख करून ठेवण्याची चाल जशी वाढत चालली तसतशीं हीं चित्रें संक्षिप्त व सामान्यीकृत होत जाऊन वस्तू व कृति ह्यांशीं जीं त्यांचीं सादृश्यें तीं ज्यास्त ज्यास्त नष्ट होत चाललीं. शेवटीं विशेषनामें प्रदर्शित करण्याची जरूरी उत्पन्न होऊन त्यांपैकीं कांहीं उच्चाराप्रमाणें योजूं लागले, आणि अशा रीतीनें उच्चारांचीं चिन्हें अस्तित्वांत आलीं. ह्यावरून काय शिकावयाचें हें उघडच आहे. आपण कल्पनांस चिन्हांकित करण्यासाठीं मुद्दाम कांहीं ध्वनि ठरवितों आणि ध्वनींस चिन्हांकित करण्यासाठीं कांहीं खुणा ठरवितों, म्हणून प्रारंभीं रानटी लोक तसेंच करीत असत असें अनुमान करणें जसें चुकीचें होईल, तद्वतच सुधारलेले लोक कांहींप्रकारचे विधि मुद्दाम प्रचारांत आणितात म्हणून रानटी लोकही तसेच आणीत असत असें अनुमान करणें चुकीचें होईल. अगोदरच, विधिविषयक नियमन सर्वांहून जुनें आहे हें दाखवितांना, स्वाभाविक रीतीनें उत्पन्न होणाऱ्या अंकितभावप्रदर्शक कांहीं वर्तनप्रकारांचीं उदाहरणें आह्मीं दिलीं आहेत; आणि त्यावरून एथें अनुमान काढावयाचें तें हें कीं, कोणत्याहि विधीची स्वाभाविक उपपत्ति आपल्यास समजल्याविना त्याचा उद्गम आपल्या लक्षांत आला असें समजतां कामा नये. मनाच्या टकळीच्या स्वाभाविक प्रदर्शनावरून नव्या ठराविक विधींची उत्पत्ति अ-

नेक तऱ्हांनीं कशी होते हें लक्षांत आणिल्यानें ह्या अनुमानाचें याथार्थ्य ज्यास्त स्पष्टपणें ध्यानांत येणार आहे.

मेंढी आपलें कोंकरूं कोठें भटकत गेलें म्हणजे त्याच्यामागून बेंबटत जाते, आणि जवळच्या कोंकरांपैकीं कधीं हें व कधीं तें हुंगून शेवटीं जें तिच्याकडे धांवत येईल तें आपलें म्हणून त्याच्या अंगाच्या वासावरून ओळखते, आणि त्याबरोबर तीस आई या नात्यानें मोठें समाधान वाटतें. आणि ही गोष्ट पुनःपुनः झाल्यानें हा वास व हें समाधान ह्यांच्यामध्यें असें कांहीं साहचर्य उत्पन्न होतें कीं, पहिल्याच्या योगानें नेहमीं दुसऱ्याची उत्पत्ति होऊं लागते. म्हणजे काय, तर, त्या वासाच्या योगानें तिची मातृरूप मनोवृत्ति जागृत होऊं लागल्यामुळें तीस तो नेहमीं सुखकारक भासूं लागतो. कांहीं जातींच्या माणसांमध्यें व्यक्ती अशाच रीतीनें ओळखून काढीत असतात असें बैबलावरून दिसून येतें. उदाहरणार्थ, त्यांत असें सांगितलें आहे कीं, ऐझाकचीं ज्ञानेंद्रियें म्हातारपणामुळें मंद झालीं असल्यानें त्यास त्याचे मुलगे अमका अमूक म्हणून जरी ओळखत नाहींत, तरी तो त्यांच्यापैकीं एक जो जेकब तो त्यास न दिसल्यामुळें आणि त्याचे हात व त्याचा स्वर ह्यांवरून त्याचा गोंधळ झाल्यामुळें, तो त्याच्या वस्त्रांचा वास घेतो, आणि त्यावरून त्यास ओळखून आशीर्वाद देतो. ह्यावरून असें स्पष्ट होतें कीं, एकाच कुटुंबांतील निरानिराळ्या माणसांच्या अंगांचे गंध देखील निरनिराळे असतात ही गोष्ट हीब्रूलोकांच्या लक्षांत आलेली होती. आणि ज्याच्यावर आपली

प्रीति असेल त्याचा गंध प्रत्ययास आला म्हणजे सुख होतें ह्याबद्दलचा पुरावा आणखी एका जातीच्या इतिहासांत सांपडतो. उदाहरणार्थ, एका मोंगलाबद्दल टिंकोस्की असें लिहितोः—"त्यानें आपल्या सर्वांत धाकटचा मुलाचें शिर वरचेवर हुंगलें; आणि मोंगल लोकांत आलिंगनाऐवजीं हुंगणें हेंच प्रेमाचें लक्षण म्हणून समजतात." फिलिपाइन बेटांमध्यें लोकांचें घ्राणेंद्रिय इतकें तिखट झालेलें असतें कीं ते लोक हातरुमालाच्या वासावरून तो कोणाचा आहे हें सांगूं शकतात; म्हणून त्यांच्यांत प्रियकरें एकमेकांपासून दूर जाऊं लागलीं म्हणजे एकमेकांचे रुमाल घेऊन ठेवितात, आणि ते वरचेवर हुंगून त्यांचे मुकेहि घेतात. चितागंग डोंगरांतील लोकांमध्येंहि मुके घेण्याची एक विलक्षण चाल आहे. ओंठाला ओंठ लावण्याच्या ऐवजीं ते तोंड व नाक गालावर टेंकितात, आणि जोरानें हुंगतात. म्हणून ते "मला मुका दे" असें न म्हणतां, "मला हुंग" असें म्हणतात. ब्रह्मी लोकांमध्येंहि असेंच करितात. आतां ह्यावरून कोणती चाल उत्पन्न होते ती पहा. प्रीति असलेल्या माणसाचा वास घेणें हें त्याच्यावर किंवा तिच्यावर आपली प्रीति आहे असें दाखविण्याचें चिन्ह बनल्यामुळें आणि माणसांस आपणावर लोकांनीं प्रीति करावी व आपण लोकांवर करतोंसें दाखवावें अशी इच्छा असल्यामुळें, ह्या प्रेमदर्शक कृतीवरून स्वागतरूप एका विधीची सुरवात होते, आणि सन्मानदर्शक कांहीं चाली उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, सामोआमधील लोक नाकाजवळ नाक आणून व हुंगून एकमेकांस नमन क-

रीत असतात. ते हातांत हात घालितात व हातांचा वासहि घेतात, व विशेषतः आपल्याहून श्रेष्ठाच्या हाताचा घेतात. एस्कीमो व न्यूझीलंडर लोकांमध्येंहि असेंच आहे.

गंध व रुचि यांच्यामध्यें निकट संबंध असल्यामुळें, वास घेण्यापासून जसल्या कृती उत्पन्न होतात तशाच प्रकारच्या कृती चाटण्यापासून उत्पन्न व्हाव्या असें अनुमान सहज होतें; आणि वास्तविकस्थितीहि तशीच आहे. कबूतरें किंवा पारवे चोंचींत चोंची घालितात ह्याचा अर्थ उघड उघड असाच दिसतो कीं, त्यांच्या प्रेमाची ह्या चाटण्यापासून तृप्ति होत असते. तद्वतच गाय आपल्या वासरास चाटीत असते ह्या गोष्टीची उत्पत्ति तिला तशी वासना होऊन तसें केल्यानें ती तृप्त होते ह्यापासूनच झाली असली पाहिजे. आणि ह्याठिकाणीं समाधान होतें तें आईला आपलें पोर ढळढळीत रीतीनें दृश्य झाल्यापासून होतें. हात चाटणें आणि साधल्यास तोंड चाटणें अशा रीतीनें कुत्रा बहुधा आपलें प्रेम व्यक्त करीत असतो; आणि कुत्रा वासावरून आपल्या धन्याचा पत्ता लावीत असल्यामुळें त्याचें घ्राणेंद्रिय किती तिखट असलें पाहिजे ही गोष्ट ध्यानांत आणतां त्याच्या जिव्हेवरहि चाटण्याचा कांहीं ठसा उमटला पाहिजे, म्हणजे, धनी समोर असल्यानें जें त्याचें प्रेम तृप्त होतें त्याच्याशीं सहचारी असा तो ठसा असला पाहिजे, असें स्पष्ट दिसतें. प्रेमाचें दर्शक म्हणून चुंबन घेण्याची जी चाल माणसांत दृष्टीस पडते तीहि अशाच रीतीनें उत्पन्न झाली असली पाहिजे, हें अनुमान बरेंच संभवनीय दिसतें. आतां मुके घेण्याची चाल जरी सार्व-

त्रिक नाहीं, उदाहरणार्थ, नीग्रोलोकांस जरी ती समजत नाहीं, आणि पूर्वी सांगितल्या प्रकारें दुसरे कांहीं लोक जरी प्रेम व्यक्त करण्यासाठीं एकमेकांस हुंगीत असतात, तरी अगदीं भिन्न भिन्न व दूरदूरच्या लोकांमध्यें चुंबनक्रिया दिसत असल्यामुळें इतर प्राण्यांमध्यें तसल्याच क्रिया ज्या रीतीनें उत्पन्न झाल्या, तसल्याच रीतीनें माणसामध्येंहि उत्पन्न झाली असेल असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. तथापि ह्या ठिकाणीं ह्याचा अप्रत्यक्ष परिणाम काय होतो हें आपणास मुख्यत्वेंकरून पाहणें आहे. प्रेमाचें स्वाभाविक चिन्ह म्हणून चुंबनाची चाल सुरू झाली म्हणजे तिजपासून, एकाद्यावर आपलें प्रेम आहे असें भासविण्याकरितां त्याचें चुंबन घेण्याची आणि अशा रीतीनें त्याची मर्जी संपादण्याची चाल उत्पन्न होते. अशा रीतीनें हात, पाय, वस्त्रें इत्यादिकांचें चुंबन घेण्याचा विधि उत्पन्न होतो.

कोणत्याहि प्रकारच्या मनोवृत्तीपासून स्नायुविषयक आकुंचनें होत असतात; आणि ती मनोवृत्ति ज्या मानानें बळकट असेल त्या मानानें तींहि जोरदार असतात; आणि इतर मनोवृत्तींप्रमाणें प्रेम व आवड ह्या मनोवृत्तींचा अशाप्रकारचा परिणाम होत असतो, व त्यास योग्य तें स्वरूप येत असतें. अशा रीतीनें उत्पन्न होणाऱ्या क्रियांपैकीं अत्यंत अर्थप्रचुर अशी जी आलिंगनरूपी क्रिया ती इतर प्राण्यांमध्यें फारशी दृष्टीस पडत नाहीं; कारण त्यांचे अवयव त्या क्रियेस योग्य असे नाहींत; पण मानवी जातीमध्यें तिची उत्पत्ति कशी झाली आहे हें बरेंच स्पष्ट आहे. आई मुलास हातांनीं

कशी घट्ट आंवळून धरिते ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे हें कमजास्त घट्ट आंवळून धरणें तिच्या प्रेमाच्या कमजास्त जोरावर अवलंबून असतें हें ध्यानांत येईल; आणि दुसरें असें ध्यानांत येईल कीं ह्या प्रेमरूपी मनोविकाराचा उद्गार आलिंगनरूपी स्नायुविषयक क्रियांच्या रूपानें स्वाभाविकरीत्या होत असून, त्या क्रियांनीं प्रेमाची वस्तू आपल्यापाशींच आहे असें अगदीं ढळढळीत ज्ञान झाल्यानें त्या मनोविकाराची तृप्ति होत असते. आतां वयांत आलेल्या माणसांमध्यें असल्याच मनोवृत्तींपासून असल्याच कृतींची उत्पत्ति होते हें सांगण्याचें प्रयोजनच नाहीं. पण ह्या ठिकाणीं ह्या गोष्टींचा आह्मांस विशेष विचार कर्तव्य नाहीं, तर त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुसऱ्या कांहीं गोष्टींचा विचार कर्तव्य आहे. म्हणजे, एकप्रकारचा विधि उत्पन्न होण्यास हें एक कारण होत असतें. कारण, आलिंगनाच्यायोगानें आवड व्यक्त होत असल्यामुळें तेंहि दुसऱ्याची मर्जी संपादन करण्याच्या कामीं उपयोगीं पडतें. जेथें सरकारविषयक अंकितपणा फारसा वाढलेला नसेल तेथें तें दिसून येतें. उदाहरणार्थ, कांहीं स्नेकइंदियन लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, “त्या तिघाजणांनीं एकदम घोड्यांवरून खालीं उड्या टाकिल्या, ते क्यापटिन ल्युइसपाशीं आले, आणि त्यांनीं त्यास अगदीं मनःपूर्वक आलिंगिलें.” एका कोमांची माणसाबद्दल मार्सी असें सांगतों कीं, “आह्मी घोड्यांवरून उतरण्याच्यापूर्वींच त्यानें मला आपल्या बाहूंनीं पकडिलें, आणि आपलें तेलकट डोकें माझ्या खांद्यावर

टेंकून, मला अगदीं आस्वलाप्रमाणें मिठी मारिली. ” आणि **स्नो** म्हणतो कीं, “ फ्यूजियनलोकांची वंदन-सरणी आवडण्यासारखी मुळींच नव्हती; कारण त्या लोकांनीं येऊन मला आस्वलाप्रमाणें कवटाळिलें. ”

आतांपर्यंत मनोवृत्तींना कांहीं तरी हेतु साधण्यासाठीं मुद्दाम केलेल्या स्नायुक्रियांचें स्वरूप कसें येतें हें सांगितलें; पण कांहीं ठिकाणीं मनोवृत्तींस अनियंत्रित क्रियांचेंहि स्वरूप येत असतें. त्यायोगानें होणारे फेरबदल बहुतकरून तालबद्ध असतात. एकाद्या अवयवानें बरीच हालचाल केली म्हणजे तो अशा स्वरूपाप्रत येतो कीं त्याठिकाणीं उलट दिशेनें हालचाल करणें सुलभ होत असतें; ह्याचें एक कारण हें कीं त्यावेळीं उलट हालचाल करणारे स्नायू आकुंचन पावण्यास योग्यतम अशा स्थितींत असतात, आणि दुसरें कारण हें कीं, त्यांस थोडी विश्रांति मिळालेली असते. म्हणून हातावर हात मारणें (टाळी देणें) किंवा शरीराच्या दुसऱ्या भागावर मारणें ही गोष्ट स्वाभाविकरीत्या घडत असते. मुलांमध्यें आनंदाचें स्वैच्छिक प्रदर्शन अशा रीतीनें होत असतें हें आपण पहातों; आणि असुधारलेल्या लोकांमध्यें ह्यापासून एकप्रकारचा विधि उत्पन्न होत असतो असेंहि आपल्यास आढळून येतें. उदाहरणार्थ, लोआंगोमध्यें टाळी देणें ही सन्मानाची सर्वांत मोठी खूण समजतात; आणि किनाऱ्यावरील नीग्रोलोक, पूर्व-आफ्रिकनलोक, आणि डाहोमन लोक ह्यांच्यामध्येंहि तशीच चाल आहे. बाटोकामधील लोक स्वागतार्थ आपल्या मांड्यांवर हात मारितात; बलोंडा लोक टा-

ळ्या वाजवून शिवाय आपलीं कोंपरें आपल्या कुशींवर आपटून घेतात; आणि डेहामीमध्यें बोटें मोडणें हा एक वंदनप्रकार आहे. दुसरें माणूस आलें म्हणजे खरा किंवा खोटा संतोष दाखविण्याकरितां हातांच्या व बाहूंच्या ह्या तालबद्ध हालचालींव्यतिरिक्त कोठें कोठें ह्या कामीं तंगड्यांचाहि उपयोग करितात. मुलें वरचेवर आनंदानें उड्या मारीत असतात, आणि कधीं कधीं मोठीं माणसेंहि तसें करितात. म्हणून ह्या हालचालीहि सत्कारार्थ होऊं लागण्याचा संभव उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, लोआंगोमध्यें पुष्कळ सरदारलोक मागें व पुढें मोठ्या जोरानें दोनदां किंवा तीनदां उड्या मारून आणि हातांस झोंके देऊन राजास वंदन करितात. फयूजियन लोक देखील अशाच उड्या मारून स्नेहप्रदर्शन करितात.

मनोवृत्तीस उद्गार येऊं लागला म्हणजे इतर स्नायूंप्रमाणें ध्वनिविषयक इंद्रियांच्या स्नायूंचेंहि आकुंचन होत असतें. म्हणून सामान्यतः आनंददर्शक जी आरोळी तिच्या योगानें आवडता मनुष्य भेटल्यानें होणारा आनंदहि दर्शविला जातो, आणि तिचा उपयोग ज्याची मर्जी संपादावयाची असेल तो दिसला म्हणजे आपणास आनंद होतो असें दाखविण्याच्या कामींहि होतो. उदाहरणार्थ, फीजीयनलोकांमध्यें एकादा नाईक किंवा एकादें मोठें शहर दिसलें म्हणजे हलक्या दर्जाचे लोक सम्मानार्थ आरोळी देत असतात. पूर्वीं आह्मीं सांगितलेंच आहे कीं आस्ट्रेलियामध्यें एकाद्या छावणीनजीक एका मैलाच्या आंत आलें म्हणजे मोठाल्या आरोळ्या देतात; त्यांच्या योगानें पुनः भेट होणार ह्याबद्दलचा

आनंद व्यक्त होत असून शिवाय स्नेहभावहि व्यक्त होत असतो; तो कदाचित् मुकाट्यानें येण्यानें होणार नाहीं.

ह्याचें आणखी एक उदाहरण देण्यासारखें आहे. मनोवृत्ति बळकट झाली म्हणजे अश्रू येतात; ते बहुधा दुःखाच्या मनोवृत्तीपासून उत्पन्न होत असतात, पण कधीं कधीं सुखाची मनोवृत्ति अत्यन्त जोरदार झाली म्हणजेहि येतात. म्हणून कधीं कधीं आनंदाचें चिन्ह म्हणून रडण्याला सत्कारार्थ केलेल्या विधीचें स्वरूप येतें. ह्या विधीचा उगम आपणास हीब्रू लोकांत दिसून येतो; कारण त्यांच्यांत अशी कथा आहे कीं टोबियास हा आपल्या भाऊबंदाचा मुलगा आहे असें समजल्याबरोबर राग्वेलनें आनंदानें उड्या मारिल्या, त्यास चुंबिलें, आणि अश्रू ढाळिले. कांहीं जातींमध्यें ह्यापासून एका सामाजिक विधीची उत्पत्ति होते. उदाहरणार्थ, न्यूझीलंदमध्यें दोन आप्त एकमेकांस नव्यानें भेटले म्हणजे कांहींवेळ रडतात, आणि मग नाकाशीं नाक लावून समाधानदर्शक आरोळ्या देतात. मलाया व पालिनिशियामधील दुसऱ्या कांहीं जातींतहि अशीच चाल आहे, आणि दक्षिण अमेरिकेंतील तुपी लोकांतहि आहे.

इतका वेळ मनोवृत्तीच्या स्वाभाविक प्रदर्शनापासून उत्पन्न होणाऱ्या विधींचीं उदाहरणें दिलीं; आतां अशा कांहीं विधींचीं उदाहरणें देऊं कीं जे स्वैच्छिक क्रियांपासून जरी प्रत्यक्षरीत्या उत्पन्न झालेले नाहींत, तरी त्यांपासून स्वाभाविक क्रमानें उत्पन्न झालेले आहेत.

मध्यदक्षिणआफ्रिकेंत दोन माणसांनीं एकमेकांचें थोडेंसें रक्त चाखिलें म्हणजे त्यांच्यामध्यें कौटुंबिक नातें

उत्पन्न होतें. मादागास्कार, बोर्निओ वगैरे पुष्कळ ठिकाणीं अशाच रीतीनें बंधुत्वाचें नातें स्थापन होत असतें. इंग्लिश लोकांच्या फार प्राचीन पूर्वजांमध्येंहि असेंच असे. ह्या विधीची वास्तविक उपपत्ति अशी आहे कीं प्राथमिक माणसास कोणत्याहि वस्तूचे गुणधर्म तिच्या सर्व भागांमध्यें वसत असतात असें वाटत असतें; म्हणून त्याची अशी समजूत झालेली असते कीं एकाद्या शूर माणसाचें काळीज खाल्ल्यानें त्याचें शौर्य आपल्या अंगीं येतें, आणि एकाद्या मृत आप्ताच्या हाडांचें पीठ करून पाण्यांत कालवून प्याल्यानें त्याचे सद्गुण आपल्या अंगीं येतात. यावरून एकमेकांचें रक्त अंगांत ओढून घेतल्यानें स्वभावैक्य स्थापन होतें असें त्यांस कसें वाटत असेल हें लक्षांत येतें.

नांवांची अदलाबदल करण्याचा विधि अशाच रीतीनें उत्पन्न होतो.—शोशोन लोकांमध्यें आपलें नांव दुसऱ्यास देणें म्हणजे त्यास मोठा मान देणें म्हणून समजतात. आस्ट्रेलियन लोक युरोपियन लोकांशीं आपलें बंधुत्वाचें नातें दाखविण्याकरितां नांवांची अदलाबदल करितात. हा प्रघात फार लोकांत असून तो अशा समजुतीपासून उत्पन्न झालेला आहे कीं, नांवाचा तें धारण करणाराशीं अगदीं निकटसंबंध असतो. म्हणून एकाद्याचें नांव धारण करणें म्हणजे त्याच्या जीविताचा कांहीं भाग आपलासा करणें म्हणून समजतात, आणि तसें केलें तर त्यास इजा करतां येते म्हणूनहि समजतात. यावरून पुष्कळ लोकांत आपलें नांव चोरून ठेवण्याची चाल दृष्टीस पडते. एवंच नांवांची अदलाबदल

करणें म्हणजे एकमेकांच्या जीवितांमध्यें कांहीं संबंध स्थापन करणें होय, आणि एकमेकांवर सत्ता चालविण्याचा अधिकार एकमेकांस देणें म्हणजे परस्परांनीं परस्परांवर फार विश्वास टाकणें होय, म्हणून समजतात.

व्हेटमधील लोकांमध्यें अशी चाल आहे कीं, त्यांच्यांत जेव्हां तह करावयाचा असेल तेव्हां ते आपल्यापैकीं एकादोघांस मारितात, आणि ज्यांच्याशीं ते लढत असतील त्यांच्याकडे त्यांचीं प्रेतें खावयास पाठवितात; आणि सामोआमध्यें एक पक्ष दुसऱ्या पक्षास शरण गेला म्हणजे पहिल्या पक्षाचे लोक दुसऱ्यापुढें हातांत एक जळाऊ लांकडाचा तुकडा आणि कांहीं पानें घेऊन उभे राहतात; यांत त्यांचा अर्थ असें म्हणण्याचा असतो कीं, " वाटल्यास, आह्मांस मारून शिजवून खा. "

डाकोटा लोकांत लढाई बंद केल्याचें लढाईचें शस्त्र पुरून टाकून प्रदर्शित करितात, आणि ब्राझिलियन लोकांत धनुष्य व बाण शत्रूस नजर करून करितात; आतां शस्त्रें एकीकडे ठेविल्यानें किंवा शत्रूच्या स्वाधीन केल्यानें लढाई आपोआपच बंद होते हें उघडच आहे, आणि म्हणूनच ह्या विधीची उत्पत्ति झालेली आहे. सुधारलेल्या लोकांत जितशत्रु आपली तरवार जेत्याच्या हवालीं करितो. अशा रीतीनें आपलें संरक्षणसाधन नाहींसें करून टाकणें म्हणजे आपला स्वताचा अंकितपणा व्यक्त करणें होय, अशा रूपानें ह्या विधीची उत्पत्ति होते; पण शेवटीं, एकाद्या सेनापतीनें असें करणें म्हणजे आपलें सैन्यच शरण आलें असें दर्शविणें असा त्याचा अर्थ होऊं लागतो. ह्याप्रमाणेंच, आफ्रिकेच्या

कांहीं भागांत कांहीं स्वतंत्र सिद्धीलोक आपल्या भावी धन्यासमक्ष भाला मोडून त्याचे गुलाम बनतात; म्हणजे, लढाईंत शत्रूचें शस्त्र मोडून त्यास गुलाम करण्याची जी प्रत्यक्ष क्रिया तिचेंच तो एथें गुलाम होण्यासाठीं कृत्रिम अनुकरण कारितो.

ह्याचें पुढील उदाहरण मोठें बोधप्रद आहे; तें तह करण्याची खूण म्हणून, संतर्पण करण्यासाठीं म्हणून, किंवा धर्मविधि म्हणून, हिरव्या डहाळ्या घेऊन जाणें हें होय. पहिल्या दृष्टीनें ही चाल आराकेनियन, आस्ट्रेलियन, तास्मेनियन, न्यूगिनीमधील लोक, न्यूकालिडोनियन लोक, सांडविच बेटवाले, ताहितियन, सामोअन, आणि न्यूझीलंदर लोक इतक्यांमध्यें आढळून येतें; आणि हीब्रयू लोक देखील कोणास प्रसन्न करण्यासाठीं जातांना झाडाच्या फांद्या घेऊन जात. कांहीं ठिकाणीं त्यांचा उपयोग केवळ तह करण्याची इच्छा प्रदर्शित करण्यासाठींच कारितात असें नाहीं, तर शरण गेल्याचें दाखविण्यासाठीं देखील कारितात. उदाहरणार्थ, पेरुव्हियन लोकांविषयीं सिएझा असें म्हणतो कीं, "पुरुष व मुलगे हिरव्या डहाळ्या व ताडाचीं पानें घेऊन दया करा असें म्हणण्यासाठीं आले." ग्रीक लोकांत देखील, माफी मागणारा माणूस आलिव्ह नामक वृक्षाची फांदी हातांत घेऊन येत असे. प्राचीन इजिप्शन लोकांच्या भिंतींवरील चित्रांवरून असें दिसतें कीं, प्रेतविधीचे समयीं मृतास संतुष्ट करण्यासाठीं ते ताडाचीं पानें हातांतून नेत असत; आणि हल्लींहि त्या देशांत मुसलमानांच्या थडग्यांवर ताडपत्रीच्या माळा बहुधा दृष्टीस पडतात. ताहि-

तियन लोकांबद्दल वालिसनें केलेल्या एका विधानावरून असें दिसतें कीं, झाडांच्या फांद्या नजर करणें हा एक धर्मविधि बनलेला आहे.

विधींच्या स्वाभाविक उत्पत्तीविषयीं आणखी एक उदाहरण येथें देणें जरूर आहे; कारण ही स्वाभाविक उपपत्ति माहीत नाहींशी झाली, म्हणजे विधि हे मुद्दाम कृत्रिमरीत्या बनविलेले आहेत अशी त्यांची उपपत्ति कशी लावूं लागतात हें त्यावरून स्पष्टपणें दिसतें. बेकर म्हणतो, " आरब लोकांत लग्नाच्यावेळीं पुष्कळ भोजनसमारंभ होत असतात, आणि त्यावेळीं वराच्या धैर्याची परीक्षा करण्याकरितां वधूची आप्तमंडळी त्यास पुष्कळ चाबूक लगावतात. वरास आपल्याबद्दल त्या मंडळींचें चांगलें मत करून घ्यावयाचें असेल तर त्यानें हे चाबूक मोठ्या आनंदानें घेतले पाहिजेत; आणि तसे ते त्यानें घेतले म्हणजे सभोंवतालचा बायकांचा घोळका आनंदाचा कल्होळ उडवून देतो. " आतां, ह्यासंबंधानें वास्तविक स्थिति अशी आहे कीं, प्रारंभीं बायको जबरीनें धरून आणीत असून त्यावेळीं ती स्त्री व तिचे आप्त त्यास जोरानें प्रतिबंध करीत असत; पुढें ह्या चालीस असें रूप आलें कीं, गांवांतल्या सर्व बायका मारीत सुटल्या असतां वरानें वधूस धरून न्यावयाचें; आणि नंतर ह्या वास्तविक धरून नेण्यास कृत्रिम धरून नेण्याचें स्वरूप येऊन, पुढें बायकांनीं त्याच्या पाठीस लागावयाचें हें जाऊन त्याबद्दल त्यास तेथल्या तेथेंच मारावयाचें, व तो मार त्यानें मुकाट्यानें खावयाचा, असें स्वरूप आलें. अशी वास्तविक स्थिति असतां बेकर सा-

हेच वराच्या धैर्याच्या परीक्षा पाहण्यासाठीं मुद्दाम त्यास मार देतात असें म्हणतो.

ज्या कृति प्रथम कांहीं उद्दिष्ट हेतु साधण्यासाठीं सहजगत्या होत असतात त्यांच्यांतच फेरबदल होऊन विधींची उत्पत्ति होत असते, आणि परिस्थिति बदलली तरी ते कायम राहिल्यानें ते अमुक अमुक दर्शविण्यासाठीं करितात असें त्यांजबद्दल पुढें वाटूं लागतें, ह्या गोष्टी पूर्णपणें सिद्ध करण्यासाठीं वरील उदाहरणें आम्हीं दिलेलीं नाहींत. विधि हे जाणूनबुजून अमुक अमुक गोष्टींचें चिन्ह म्हणून प्रचारांत आणितात अशी जी त्यांच्यासंबंधानें रूढ समजूत आहे ती चुकीची आहे असें अगदीं संक्षिप्त रीतीनें दाखविण्यासाठीं, आणि सर्वत्र त्यांची उत्पत्ति उत्क्रमणानें होते हें दाखविण्याकरितां, वरील उदाहरणें दिलेलीं आहेत. हें आमचें मत सयुक्तिक आहे असें दाखविणारीं ह्यापुढें पुष्कळ कारणें आपल्या लक्षांत येणार आहेत.

५. विधिविषयक चमत्कार जरी सर्वव्यापी व ठळक असे आहेत तरी त्यांजकडे लोक फारसें लक्ष देत नाहींत ह्याचें एक मुख्य कारण असें आहे कीं, बहुतेक सामाजिक व्यापारविषयक रचना सहज लक्षांत येतील इतक्या ठळक असून विधिविषयक रचना इतक्या सूक्ष्म आहेत कीं, त्या लक्षांत येत नाहींत. राजकीय व धार्मिक सरकारांच्या जशा घटना आहेत तशीच विधिविषयक सरकाराचीहि घटना आहे; पण ही गोष्ट सहसा कोणाच्या लक्षांत येत नाहीं; कारण पहिल्या दोन घटना जरी सारख्या वृद्धिंगत होत गेल्या आहेत, तरी

तिसरी क्षीण होत गेली आहे; निदान ज्या समाजांमध्यें सामाजिक चमत्कारांबद्दल लोक विचार करूं लागले आहेत त्या समाजांच्या पायरीवर चढलेल्या समाजांत तरी ती क्षीण झालेली आहे. पण, प्रारंभीं, राजकीय अंकितपणा दर्शविणारे विधि करणारे जे अधिकारी त्यांचें महत्त्व धार्मिकविधि करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या खालोखाल असतें; आणि हे दोन्ही अधिकारीवर्ग सदृशस्वरूप असतात. हे अधिकारी कोणत्याहि वर्गातील असले तरी संतर्पणविधि करीत असतात; फरक इतकाच कीं, पहिले वर्गातील अधिकारी दृश्य शास्त्याचें संतर्पण करीत असतात, आणि दुसऱ्या वर्गातले अदृश्य झालेल्या शास्त्याचें करीत असतात. दोघेहि पूजा करितात व करवितात; एक, जिवंत राजाची पूजा; व दुसरे, मृत राजाची पूजा. आपल्या ह्या सुधारलेल्या स्थितींत मानुषापासून दैविकाचें विभिन्नीकरण इतकें मोठें झालेलें आहे कीं, वरचें हें आमचें विधान कोणास खरें देखील वाटणार नाहीं. पण ज्या पायऱ्यांवर कल्पिलेल्या देवतेचे गुणविशेष दृश्य मनुष्याच्या गुणविशेषांहून कमी कमी भिन्न असतात अशा पायऱ्यांवरून मागें मागें जातां, आणि ज्या प्रारंभींच्या पायरीवर मृतमाणसाचा दुय्यम देव व माणूस अशा दोन्ही दृष्टींनीं मानीत असून जिवंत माणूस निराळा म्हणून माणसास भासावयास लागलेला नव्हता त्या पायरीवर जाऊन पोहोंचतां, आपल्या खातीनें असें लक्षांत येईल कीं, मृतशास्त्याच्या गरजा पुरविणारांचीं कर्तव्यें त्याच्या जागीं आलेल्या शास्त्याच्या गरजा पुरविणारांच्या कर्तव्यांशीं सदृश अशीं होतीं. ह्या सादृश्या-

बद्दल जर कांहीं संशय राहिला असेल तर, कांहीं प्राचीन समाजांत मृतराजांची जशी पूजा करीत तशीच अगदीं जिवंत राजाचीहि करीत ही गोष्ट ध्यानांत आणतां, तो नष्ट होणार आहे.

ज्या सामाजिक देहांमध्यें विभिन्नीकरण फारच अल्प झालेलें असेल, त्यांच्या ठिकाणीं हें सादृश्य अनेक स्वरूपीं आपल्या दृष्टीस पडतें. रानटी माणसांचा नाईक आपल्या स्वताच्या कृती आणि आपल्या पूर्वजांचे पराक्रम स्वतःच वर्णीत असतो; आणि ही आत्मप्रशंसेची चाल पुढें पुष्कळ काळपावेतों सुरू रहाते हें इजिप्शन व आसीरियन लोकांच्या शिलालेखांवरून दिसून येतें. पाटागोनियन लोकांमध्यें ह्या चालींत जरा फेरबदल झालेला आढळून येतो. त्यांच्यांतील शास्ता आपल्या प्रजेपुढें भाषण करीत असतां आपलें शौर्य व गुण ह्यांची नेहमीं प्रशंसा करितो. तो जर चांगला बोलका असेल तर त्याची फार वाखाणणी होते; आणि तो गुण जर त्याच्यांत नसेल तर तो दुसऱ्या एकाद्या वक्त्याची योजना त्या कामावर करितो. आतां ह्याची पुढची पायरी ह्या कामावर एका कामगाराची कायमची योजना होणें ही होय, व ती इंग्लंदच्या प्राचीन इतिहासांत दिसून येते. पुढें राजाचा मुलूख वाढत जाऊन त्याची सत्ता जशी अधिक होत जाईल तसे त्याच्या भोंवतीं पूर्वींहून जास्त कामगार गोळा होतात व ते सर्वच त्याची स्तुति करीत असतात; पण पुढें त्यांपैकीं कांहीं निवडक कामगारांकडेच हें काम जातें; म्हणजे, सरकारी स्तुतिपाठकांचा एक वर्गच जणूं काय तयार होतो. सामोआमध्यें

नाईक फिरतीवर निघाला म्हणजे त्याचा मुख्य वक्ता त्याच्या बरोबर जात असतो. फीजीमध्यें प्रत्येक टोळीचा एकेक वक्ता असून तो उत्सवप्रसंगीं संभाषणें करीत असतो. आशान्टीमध्यें नायकाचे कामगार मोठ्या उत्सुकतेनें आपल्या धन्यांचीं नांवें मोठ्यानें घेत असतात, आणि त्यांच्या पदव्या व गुण यांचें वर्णन करीत असतात. योरूबामध्यें राजा फिरतीवर गेला म्हणजे त्याच्या बायका त्याची स्तुति गाण्यासाठीं त्याच्याबरोबर जात असतात. मादागास्कारमध्यें राजापाशीं स्त्रीस्तुतिपाठकांचा मोठा ताफा असतो, त्या स्त्रिया राजा कोठेंहि मोठ्या किंवा लहान फिरतीवर जाईल तेव्हां त्याच्या बरोबर जातात. चीन देशांत बादशाह बाहेर निघाला म्हणजे त्याच्या पुढें त्याचे गुण व सत्ता ह्यांची प्रशंसा मोठ्यानें करणारे चालत असतात. चिब्चालोकांमध्येंहि असेंच असे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां असें स्पष्ट दिसतें कीं उपाध्ये व उपाध्यायिणी मृतराजाकरितां, आणि त्याच्यापासून उत्क्रान्त झालेल्या देवाकरितां, जें करितात तेंच हे स्त्री व पुरुष गायक जिवंत राजाकरितां करितात. ज्या समाजांत विधिविषयक सरकाराची वाढ फार झालेली असेल त्यांच्या ठिकाणीं हें स्वरूपसादृश्य जास्तच स्पष्टपणें दिसून येतें. अशा समाजांत सामान्यतः निरनिराळ्या प्रभावांचे अनेक देव असून त्यांचे त्यांचे जसे निरनिराळे स्तुतिपाठक असतात, तसेच त्यांच्यामध्यें अनेक दर्जाचे शास्ते असूनही त्यांचे निरनिराळे सरकारी भाट असतात. उदाहरणार्थ, सामोआमध्यें प्रत्येक नायकाच्या

समोर कांहीं पावलांवर एक चोपदार चालत असतो, आणि कोणी दृष्टीस पडला म्हणजे आपल्या नायकाचें नांव मोठ्यानें ललकारितो. मादागास्कारमध्यें नाईक पालखींत बसून निघाला म्हणजे एकदोन भालदार हातांत भाले घेऊन त्याचें नांव पुकारीत त्याच्यापुढें धांवत असत. जपानमध्यें सरकारी वकील निघाला म्हणजे त्याच्यापुढें चार असामी हातांत चवऱ्या घेऊन लोकांस " थांबा, थांबा, मान खालीं लववा," असें ओरडत त्याच्यापुढें चालत असत. चीन देशांत एकादा माजिस्ट्रेट बाहेर निघाला म्हणजे त्याची पदवी ज्याच्यावर रंगवलेली आहे अशी एक फळकुटी घेऊन त्याच्यापुढें त्याचे चोपदार धांवतात आणि रस्त्यांतून जाणारांस, " मागें व्हा, मागें व्हा, गप्प रहा, रस्ता मोकळा करा," असें ओरडतात. त्याच्यामागून घंटा वाजवणारे चालतात, आणि नियमित अंतरांवर आपल्या मालकाची पदवी व हुद्दा हीं ललकारण्यासाठीं घंटेवर नियमित टोले देतात. प्राचीन रोममध्यें पदवीवाल्या लोकांपुढें त्यांचे चोपदार असेंच पुकारीत असत. राजाची इच्छा पुकारणारा कामगार आणि देवाची इच्छा पुकारणारा कामगार ह्यांच्यामध्यें आणखी एक सादृश्य दृष्टीस पडतें. जेथें राजसत्ता फार मोठी अशा पुष्कळ ठिकाणीं राजा अदृश्य असतो किंवा निदान त्याच्याशीं प्रत्यक्ष संभाषण तरी करितां येत नाहीं; म्हणजे काय, तर, जिवंत शास्ता मृत शास्त्याचें अनुकरण साधेल तितकें करितो, आणि मध्यस्थाखेरीज बोलत नाहीं. उदाहरणार्थ, प्राचीन आसीरियन लोकांमध्यें असें असे. तेथील राजाशीं

कांहीं बोलावयाचें असलें तर त्याचा वजीर किंवा मुख्य कंचुकी ह्याच्याच द्वारा बोलतां येत असे. प्राचीन मेक्सिकोमध्येंही असेंच असे. उदाहरणार्थ, दुसऱ्या मांटिझीमोबद्दल असें सांगतात कीं त्याच्या तोंडाकडे कोणीं सामान्य माणसानें पाहिल्यास तो फांशीच जात असे; आणि शिवाय, तो दुभाष्याविना कोणाशीं बोलत नसे. निकाराग्वामध्यें नाईक लोक इतके एकान्तांत असत कीं इतर नायकांबरोबर देखील ते व्यवहार ठराविक हपीसरांच्या द्वारा करीत असत. पेरू देशांतील कांहीं शास्त्यांची अशी चाल असे कीं प्रजेच्या दृष्टीस क्वचित् प्रसंगाशिवाय पडावयाचेंच नाहीं. चिब्चा लोकांत पुकारणारा हा दरबारांतील पहिला हपीसर समजला जाई, कारण त्याच्या द्वाराच राजाची इच्छा लोकांस कळत असे. सर्व आफ्रिकेंत हल्लीं असेंच आहे. उदाहरणार्थ, उगांडाच्या राजाशीं बोलावयाचें असल्यास त्याच्या हपीसराच्या द्वारा बोलावें लागतें. डेहामीमध्यें राजा कंचुकीपाशीं बोलतो, कंचुकी दुभाष्यापाशीं बोलतो, आणि दुभाष्या पाव्हण्यापाशीं बोलतो; आणि पाव्हण्याचेंहि उत्तर इतक्याच मध्यस्थांच्या द्वारा परत जावें लागतें. आबिसीनियामध्यें सामान्य माणसाची नजर आपणावर पडूं नये म्हणून नाईक लोक देखील घरांतील अंधाऱ्या खोलींत बसत असून, तेथील राजाबद्दल असें सांगतात कीं राजा दरबारांत बसला म्हणजे लोकांस दिसूं नये म्हणून काळोखांत बसत असे; आणि बाहेर दरबारांत काय चाललें आहे तें खिडकींतून पहात असे; आणि शिवाय त्याचा दुभाष्या असून दरबाराच्या वेळीं तो लोकांशीं त्याच्या-

द्वारा संभाषण करीत असे. ऐहिक व पारलौकिक शास्त्यांमधील हें साम्य ज्यांच्या संस्थांमध्यें दिसून येतें त्यांपैकीं कांहीं लोकांच्या तें लक्षांत आलेलें आढळून येतें. उदाहरणार्थ, न्यूझीलंदर लोक आपल्या उपाध्यांस देवांचे वकील म्हणून समजतात, आणि जपानी लोक त्यांस देवांचे दूत म्हणून म्हणतात.

ह्या स्वरूपसादृश्याबद्दल आणखीहि पुरावा सांपडतो. ज्या ठिकाणीं सामाजिक प्रगति बरीच झालेली असून पितृपूजा जोरांत असेल, आणि म्हणून देव व माणसें ह्यांमध्यें फारसें विभिन्नीकरण झालेलें नसेल, त्या ठिकाणीं ह्या दोन घटनाहि फारशा विभिन्नस्वरूप झालेल्या नसतात. उदाहरणार्थ, प्राचीन ईजिप्तमध्यें दरबारांत कोणते विधी पाळावयाचे हें सांगणें उपाध्यायवर्गाच्या हातीं असून ते शुद्धाचरणाचे नियम जो पाळणार नाहीं त्यास राजाची भेट घेऊं देत नसत. चीन देशांत ह्याचें चांगलें उदाहरण आढळतें. तेथील बादशाह ज्या दिवाणी किंवा लष्करी अंमलदारानें कांहीं विशेष कामगिरी बजाविली असेल त्यांना देवांची पदवी देत असतो, आणि मग माण्डारीन (हपीसर) लोक त्यांस सरकारी रीतीनें पुजूं लागतात. शिवाय तेथील बादशाह योग्य अशा मृत कामगारांना देखील पाताळांतील सुभेदार, अध्यक्ष, पाहणी करणारे, अशा पदव्या देत असतो. आणि आपण असें वाचितों कीं तेथील विधिखात्याच्या एका शाखेचें काम दरबारांत कसें वागावें, पोषाक काय घालावे, गाड्या कशा असाव्या, घोड्यावर कसा पोषाक करून बसावें, खिजमतगार किती घ्यावे, आणि को-

णतीं चिन्हें धारण करावीं हें ठरविण्याचें असतें; आणि दुसऱ्या एका शाखेचें काम देवतांची आणि मृत राजाच्या, साधूंच्या व इतर योग्य माणसांच्या आत्म्यांची पूजा करतांना कोणते विधी पाळावयाचे हें ठरविण्याचें व अमलांत आणण्याचें असतें. ह्यावरून असें दिसतें कीं एकच खातें ऐहिक विधि व धार्मिक विधि ह्यांजवर देखरेख करीत असतें. शिवाय आपण असें वाचितों कीं, दरबारांत विधिखात्याचा मुख्य उच्च ठिकाणीं उभा राहतो, आणि दरबाऱ्यांस उभे राहण्यास किंवा गुडघे टेंकण्यास, स्तब्ध राहण्यास किंवा चालूं लागण्यास, मोठ्यानें सांगत असतो; म्हणजे काय. तर, मुख्य उपाध्याय देवाची पूजा करणाऱ्यांस जसले हुकूम देत असतो, तसलेच हा हपीसर राजपूजकांस देत असतो. जपानमध्यें परवांपर्यंत हें सादृश्य इतकेंच ठळक असे. तेथील मिकाडो किती पवित्र समजला जातो, आणि देवाप्रमाणें त्याच्यापाशीं कोणाचा प्रवेश कसा होत नाहीं, हें तिकडे जाऊन आलेले लोक सांगतच असतात; पण ह्यावरून दिसणारें जें दैविक व ऐहिक ह्यांजमधील साम्य तें त्या लोकांत ह्याच्यापेक्षांहि पुष्कळ पुढें गेलेलें होतें. तेथील बादशाहाचा अंमल सर्वांवर असून तो देशांतील भुतांवरहि चालतो असें तेथील लोक समजत, आणि तो त्यांस पदव्या देखील देऊं शके शिवाय तेथें रीतिभाति, चालचलणूक, पूजा, आणि जिवंत व मृत ह्यांच्याबद्दलचे विधी, ह्यांजवर देखरेख ठेवणारें एक खातें असून त्याच्या दोन शाखा असत; पैकीं एका शाखेचें काम देवसंतर्पण करण्याचें असे, आणि दुसरीचें

काम देव बनलेल्या मृत मिकाडोचें संतर्पण करण्याचें असे.

पाश्चिमात्य लोकांमध्यें ख्रिस्ती धर्माच्या अमदानींत मानवीपासून दैविकाचें विभिन्नीकरण फारच ठळक झालेलें असल्यामुळें, त्यांच्यांत विधिविषयक घटना आणि धर्मविषयक घटना ह्यांच्यांतील स्वरूपसादृश्य फारसें स्पष्ट दिसत नाहीं. तरी तें एका काळीं स्पष्टपणें दिसत असे. लष्करी जमीनदारीच्या अमदानींत राजांच्या दरबारांतून " लॉर्ड हायचेम्बर्लेन "," ग्रांड मास्टर आव्ह सेरिमनीज ", " अशर " इत्यादि अनेक विधिविषयक कामगार असून, शिवाय " हेरल्ड " नामक स्तुतिपाठक असत. ह्या अनेक कामगारांचें उपाध्यायवर्गातील अनेक अधिकाऱ्यांशीं साम्य असे. कारण धर्माधिकाऱ्यांप्रमाणें हेहि कामदार देवळांतून नियमित काळानें एकत्र जमत असत. आपल्या धन्यांचे निरोप नेत असतां ते त्यांच्यासारखाच पोषाक करीत असत, म्हणजे राजांचे दूत राजांसारखा, आणि सरदारांचे सरदारांसारखा, करीत असत, आणि ज्यांच्याकडे ते निरोप घेऊन जातील तेहि त्यांस राजांप्रमाणें किंवा सरदारांप्रमाणेंच मान देत. म्हणजे, उपाध्यांच्या अंगीं जसा देवांचे प्रतिनिधी म्हणून देवपणा आलेला असे, तसा ह्यांच्या अंगीं राजांचे किंवा सरदारांचे प्रतिनिधी म्हणून राजेपणा किंवा सरदारपणा आलेला असे. शिवाय, उपाध्ये धर्मखात्यांत शिरूं पहाणारे उमेदवार योग्य आहेत किंवा नाहींत हें जसें पहात. तसें हे हेरल्ड लोक जे " शिव्हल्री " च्या किंवा शूर सरदारीच्या वर्गांत येऊं पाहत असतील, त्यांना तसें करण्याचा काय हक्क आहे हें पहात असत; आणि

ते फिरतीवर निघाले म्हणजे कांहीं वाईट गोष्ट दिसेल ती ताळ्यावर आणीत असत, आणि राजांस उपदेश करीत असत; तात्पर्य, हीं त्यांचीं कर्तव्यें धर्माधिकाऱ्यांच्याच कर्तव्यासारखीं असत. शिवाय, धर्माधिकारी जशा पारलौकिक शास्त्यांच्या इच्छा काय आहेत हें लोकांस कळवीत असतात तसे हे ऐहिक शास्त्यांच्या कळवीत असून, ते जसे देवांचे स्तुतिपाठक असत तसे हे राजांचे स्तुतिपाठक असत, कारण त्यांचें एक कर्तव्य परदेशांमध्यें आपल्या यजमानांची कीर्ति गाणें हें असे. राजे व राजपुत्र ह्यांच्या स्मशानविधीच्या वेळीं जिवंतांना मान देण्याचे विधी व मृतांना मान देण्याचे विधी एकत्र होत असल्यामुळें, तेथं स्तुतिपाठकाचें कर्तव्य आणि धर्माधिकाऱ्याचें कर्तव्य ह्यांच्यामधील नातें चांगलें दिसून येत असे; कारण मृताच्या पदवीचीं जीं कांहीं चिन्हें असतील तीं त्याच्या थडग्यांत हेरल्ड हा पुरीत असून, आणि अशा रीतीनें त्याचें एकप्रकारचें संतर्पण करून, शिवाय त्यास मृताची प्रशंसा लिहावी किंवा लिहवावी लागत असे; म्हणजे, ज्या मृतपूजेपासून उच्चतर पूजेची उत्पत्ति होते तीस तो सुरवात करीत असे. ही फ्रान्सांतील गोष्ट झाली. पण इंग्लंदांतहि इतकी संकीर्ण नाहीं तरी असलीच पद्धति असे. तेथें हेरल्ड लोक मुकूट घालीत, राजासारखा पोषाक करीत, आणि स्वतःविषयीं बोलतांना बहुवचनी सर्वनामाचा उपयोग करीत शिवाय फ्रान्सांतल्याप्रमाणें तेथेंहि ते लोक सरदारांच्या पदव्या बरोबर आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां व नव्या देण्याकरितां देशांतून फिरतीवर जात असत, व सरदारांपै-

कीं कोणाचाहि स्मशानविधि त्यांच्या संमतिविना होत नसे.

ऐहिक व धार्मिक रचनांची पुढें पुढें वृद्धि झाली असतां ह्या संस्थाच क्षीण कां होत गेल्या हें सहजच लक्षांत येण्यासारखें आहे. प्रारंभापासून मृताच्या संतर्पणापेक्षां जिवंताचें संतर्पण ज्यास्त स्थानविशिष्ट सहजच झालेलें आहे. कारण जिवंत शास्त्याची पूजा त्याच्या समक्षच करितां येण्यासारखी असते, किंवा फार तर त्याच्या वाड्यांत किंवा त्याच्या नजीक करतां येण्यासारखी असते. आतां पेरू देशांत जिवंत राजाच्या (इन्काच्या) मूर्तींची जरी पूजा करीत असत, आणि मादागास्कारमध्यें रादमा राजा गैरहजर असला तरी त्याची स्तुति " देव पश्चिमेकडे गेला आहे; रादमा हा मोठा बलिष्ठ नंदी आहे, " अशा शब्दांनीं करीत असत, तरी सामान्यतः मोठ्या माणसाची प्रशंसा तो जिवंत असतां त्याला किंवा निदान त्याच्या आश्रितांला ऐकूं जाणार नाहीं अशा रीतीनें करीत नसतात. परंतु तोच माणूस मेला, आणि त्याच्या भुताविषयीं लोकांच्या मनास तें पाहिजे तेथें दिसूं लागेल अशी भीति वाटूं लागली, म्हणजे त्याचीं संतर्पणें तितकीं विशिष्ट स्थानबद्ध रहात नाहींत; आणि मोठाले समाज बनत जातील त्या मानानें ज्यास्त प्रबल व ज्यास्त मुलखावर सत्ता चालविणाऱ्या म्हणून समजल्या जाणाऱ्या देवतांची उत्पत्ति झाली म्हणजे त्यांच्याबद्दल भीति व पूज्यबुद्धि हीं दोन्हीहि ज्यास्त ज्यास्त विस्तीर्ण प्रदेशावर वाटूं लागतात. म्हणून त्यांचे सरकारी संतर्पक ज्यास्त होऊन आणि चोहोंकडे पसरून, ते त्यांच्या पूजा एकाच समयीं अनेक ठिकाणीं करूं

लागतात; म्हणजे काय, तर, धर्माधिकाऱ्यांची संख्या मोठी होऊन जाते. पण इतर संस्थांप्रमाणें विधिसंस्था वाढत नाहींत त्या ह्याच कारणांमुळें नव्हे; तर इतर संस्थांची वाढहि ह्या संस्थांच्या क्षीणतेस कारण होते. सामाजिक संकलनाच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर स्थानिक शास्त्याचीं स्थानिक दरबारें असून त्यांत योग्य असे विधिविषयक कामगार असतात; पण समाजांचें घनीभवन वाढत जाईल आणि स्थानिक शास्ते मुख्य सरकारचे ज्यास्त ज्यास्त अंकित होत जातील, तसा त्यांचा मानमरातब कमी होत जातो, आणि तो मानमरातब राखून ठेवणारे जे कामदार ते नाहींसे होतात. उदाहरणार्थ, प्राचीन काळीं ड्यूक, मार्किस आणि अर्ल इत्यादि निरनिराळ्या वरिष्ठ दर्जाच्या सरदारांचे हेरल्ड व पर्स्विव्हंट नामक श्रेष्ठ व कनिष्ठ स्तुतिपाठक असत; आणि व्हायकौंट, बॅरन इत्यादि कमी दर्जाच्या सरदारांचे आणि नैट लोकांचेहि कनिष्ठ वर्गातील स्तुतिपाठक असत; पण राजाची सत्ता जशी वाढत चालली तसा हा प्रघात हळूहळू नष्ट होत चालला, आणि इलिझाबेथ राणीच्या वेळीं तो अगदींच बंद झाला. विधिविषयक नियमन करणाऱ्या घटना हळूहळू नष्ट होण्यास आणखी एक कारण असें होतें कीं, त्यांचीं कामें हळूहळू दुसऱ्या घटना करूं लागतात. राजकीय व धार्मिक संघटना प्रथम जरी दैविक व मानवी शास्त्यांच्या आज्ञा पाळण्यासारखें वर्तन करावें एवढीच जबरी लोकांवर मुख्यत्वेंकरून करीत असतात, तरी हळूहळू व्यक्तींचें जें एकमेकांच्या संबंधाचें वर्तन त्याच्यावरहि

योग्य अशी नजर त्या ठेवूं लागतात, आणि अशा वर्तनांच्यासंबंधानें नैतिक हुकूम सोडूं लागतात. अशा रीतीनें त्या विधिविषयक संघटनांचा प्रदेश हळूहळू बळकावूं लागतात. फ्रान्सामध्यें हेरल्ड लोकांकडे वर सांगितलेलीं अर्धवट उपाध्यायिक कामें असून शिवाय सरदारांनीं केलेल्या गुन्ह्यांची चवकशी ते करीत असत; आणि अशा गुन्हेगाराचा दर्जा कमी करणें, त्याचा माल जप्त करणें, त्याचीं घरें जमीनदोस्त करणें, त्याचीं शेतें उध्वस्त करणें, आणि त्यास निःशस्त्र करणें, इतके अधिकार त्यांजकडे असत. इंग्लंदामध्यें देखील हे विधिविषयक कामगार कांहीं दिवाणी कामें करीत असत. १६८८ पर्यंत हेरल्डलोकांच्या संस्थेचे प्रांतिक अध्यक्ष राजाच्या हुकुमानें प्रांतांतून फिरत असत, आणि प्रेतविधि करण्याबद्दलचीं सर्टिफिकिटें, सरदारांचे वंश, व त्यांचे संबंध, इत्यादिकांची नोंद काळजीपूर्वक करीत असत. ह्या नोंदींचा उपयोग कायद्याच्या सर्व कोर्टांतून करीत असत. ह्यावरून हें उघड दिसतें कीं, ह्या प्रकारचीं कामें धार्मिक व राजकीय कामगारांनीं आपल्या हातीं घेतल्यामुळें विधिविषयक घटनांचें काम राजांशीं लोकांनीं कसें वागावें हें ठरविणारे जे दरबारी कामगार त्यांच्या कामावरच येऊन बसलें आहे.

६. आतां विधिविषयक नियमनाच्या निरनिराळ्या रूपांचें सविस्तर विवेचन करावयास लागण्याच्यापूर्वी ह्या आतांपर्यंतच्या प्रास्ताविक सिंहावलोकनापासून काय निष्पन्न होतें तें पाहूं.

ज्या वर्तनाविषयक नियमनास आपण विधि म्हणून

म्हणतों तें धार्मिक व राजकीय नियमनांच्या अगोदर येतें. त्या माणसाहून कमी दर्जाच्या प्राण्यांमध्यें सुरुवात होते; इतर प्रकारचें नियमन नसणाऱ्या रानट्यांत तें दिसून येतें; पुष्कळ वेळां इतर नियमनें जेथें फार पक्क झालेलीं नसतील अशा पुष्कळ ठिकाणीं तें चांगल्या प्रगल्भ दशेस येतें; तें सर्व समाजांतून व्यक्तीव्यक्तींच्या वर्तनामध्यें पुन:पुन: आपोआप उत्पन्न होत असतें; आणि सरकार व धर्मसंस्था जीं ज्यास्त नियामित नियंत्रणें चालवीत असतात त्यांस तें व्यापून टाकितें. विधिविषयक नियमन सर्वांच्या अगोदरचें आहे हें ह्याशिवाय आणखी ह्या गोष्टीवरून दिसतें कीं, प्रारंभीं राजकीय व धार्मिक नियमनें हीं देखील बहुतेकांशीं विधिविषयकच बाडें असतात, आणि ते विधि जिवंत व मृत पुरुषांच्या संबंधानें होत असतात; आणि त्यांच्या संबंधाचीं कायद्याचीं व नीतीचीं बाडें मागून येतात. शिवाय, सामाजिक, राजकीय व धार्मिक नियंत्रणांचीं जीं कांहीं सामान्य अंगें आहेत त्यांवरूनहि वरील गोष्ट सिद्ध होतेच; कारण निष्ठादर्शक व पूजाविषयक जे कांहीं प्रकार आहेत ते जसे सामाजिक व्यवहारांत दृष्टीस पडतात, तसे राजकीय व धार्मिक व्यवहारांतहि दृष्टीस पडतात. ह्याच्याहून ज्यास्त महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, विधींचा उगम कांहीं साहजिक क्रियांपासून होत असतो, आणि ह्या क्रिया अर्थातच राजकीय व धार्मिक कायद्यांच्या अगोदरच्या आहेत. सारांश, विधि हे कोणाच्या तरी हुकुमावरून किंवा परस्परांच्या कबुलीवरून उत्पन्न होण्याच्या ऐवजीं, व्यक्तिविषयक उद्देश साधण्या-

साठीं केलेल्या क्रियांमध्यें फेरबदल होऊन तें उत्पन्न होतात; आणि ह्यावरून असें दिसतें कीं, व्यक्तिवर्तनास आळाबंदा घालण्यास सामाजिक व्यवस्था उत्पन्न होण्याच्या पूर्वीं त्या वर्तनावरूनच ते उत्पन्न होत असतात. शेवटची गोष्ट आपल्या ध्यानांत अशी येते कीं, जेव्हां राजकीय मुख्य उत्पन्न होतो तेव्हां प्रारंभीं लोकांकडून अंकितपणा व्यक्त करून घेण्यासाठीं जरी तो त्या विधींवर स्वतःच देखरेख ठेवितो, तरी लवकरच त्याच्या भोंवतीं त्याचे अनुयायी जमा होतात; आणि ते त्याचें संतर्पण पुनःपुनः करीत असल्यामुळें तद्विषयक कृती स्पष्ट व ठराविक अशा होऊन, त्यांच्यापासून विधिविषयक कामगारांची उत्पत्ति होते. जरी दिवाणी कायदे अमलांत आणणाऱ्या आणि नैतिक नियम घालून देणाऱ्या घटनांच्या वाढीबरोबर विधिविषयक घटनेला क्षीणावस्था प्राप्त होत गेलेली आहे, तरी प्रारंभींच्या पायऱ्यांवर श्रेष्ठ व कनिष्ठ शास्त्यांचें संतर्पण करणारें जें कामगारमंडळ तें श्रेष्ठ व कनिष्ठ अशा देवपदवीस चढलेल्या मृत शास्त्यांचें संतर्पण करणाऱ्या अधिकारीमंडळांशीं सदृशस्वरूप असून समाजरचनेचें तें एक महत्त्वाचें अंग असतें; आणि ह्याच्याहून ज्यास्त निश्चित व ज्यास्त विस्तृत नियमन करणाऱ्या राजकीय व धार्मिक संघटना जशा त्या मंडळाचें काम बळकावून टाकितील तसेंच तें क्षीण होत जातें.

ह्या सामान्य कल्पना मनांत वागवून आतां आपण विधिरूप नियमनाच्या अनेक अंगांचा विचार करण्यास लागूं या. त्यांचें विवेचन आपण पुढील मथाळ्याखालीं

करूं:—विजयचिन्हें, अंगविकर्तनें, नजराणे, भेटी, नगनें, संबोधनप्रकार, पदव्या, पट्टे आणि पोषाक, आणखी वर्गभेद, श्रीमंतीच्या तऱ्हा, विधिविषयक भूत व भावि स्थिति.

प्रकरण दुसरें

विजयचिन्हें

७. कोणत्याहि प्रकारचें सामर्थ्य आत्मसमाधानाचें मोठें साधन असतें; आणि तें अंगीं असल्याचे दाखले दाखविल्यापासून शाबासकी मिळत असल्यामुळें त्यांची माणसास मोठी किंमत वाटत असते. म्हणून शिकारी माणूस संधि साधेल तेव्हां आपले पराक्रम लोकांस सांगत असून, पारधीपैकीं जें कांहीं राखून ठेवण्यासारखें असेल तें जमा करून ठेवीत असतो. तो जर कोळी असेल तर त्यानें धरलेल्या प्रत्येक सामन माशाबद्दल मासे धरण्याच्या काठीला एक एक खांच पाडून ठेवीत असतो; किंवा एकादा दुर्मीळ मासा सांपडल्यास तो बाटलींत घालून ठेवीत असतो. तो जर हरणांची किंवा सांबरांची पारध करणारा असेल, तर तो आपल्या दिवाणखान्यांत किंवा भोजनसमारंभाच्या खोलींत त्यांचीं डोकीं टांगून ठेवितो; आणि त्यांच्या शिंगांस जर पुष्कळ फांटे फुटलेले असतील तर त्यांची किंमत तो ज्यास्तच मानितो. तो जर वाघाची शिकार करणारा असेल तर त्यांचीं कातडीं टांगून ठेवण्यांत त्यास ज्यास्तच अभिमान वाटतो; कारण त्यावरून त्याचें शौर्य चांगलें व्यक्त होत असतें.

अशा प्रकारच्या विजयचिन्हांपासून सुधारलेल्या राष्ट्रांतहि माणसास कांहीं महत्त्व प्राप्त होत असतें. एकाद्या प्रवाशानें आफ्रिकेंतून हत्तीचे सुळे आणिल्यास किंवा गेंड्याचें एकादें अगडबंब शिंग आणिल्यास, त्या-

च्या स्नेही व ओळखीच्या लोकांस हा मोठा शूर व युक्तीचा माणूस आहे असें वाटूं लागतें, आणि म्हणून ते त्याच्याशीं विशेष अदबीनें वागूं लागतात. तात्पर्य, तेणेंकरून त्याच्या अंगीं एकप्रकारचें शासनसामर्थ्य येत असतें.

आतां, सहजच, प्राथमिक माणसें भक्ष्यशोधन करून त्यावर निर्वाह करणारीं असल्यामुळें, आणि शिकारीच्या कामांत ते जसे कमज्यास्त वाकबगार असतील त्याप्रमाणें त्यांची किंमत कमज्यास्त होत असल्यामुळें, त्यांस सावजें मारल्याच्या खुणांची ज्यास्तच किंमत वाटत असते, आणि त्यांच्या योगानें त्यांस ज्यास्तच मान मिळून त्यांचा प्रभावहि ज्यास्तच वाढत असतो. म्हणून व्हेटमध्यें घरांत टांगून ठेविलेल्या सर्व प्रकारच्या हाडांच्या संख्येवर घरधन्याची पदवी अवलंबून असते. शोशोन लोकांमध्यें पांढरें आस्वल मारणारास मोठा मान मिळतो; कारण तीं आस्वलें फार भयंकर असतात; म्हणून असला पराक्रम करील त्यासच मारलेल्या जनावराचे पाय किंवा नखें हें जें कीर्तीचें उच्चतम चिन्ह तें धारण करतां येतें. मिश्मी लोकांमध्यें प्रबल नायकाच्या घरांत जाण्याच्या मार्गावरील भिंतीवर मारलेल्या जनावरांचीं शेंकडों डोकीं टांगलेलीं असतात, आणि त्याची संपत्ति ह्या विजयचिन्हांच्या संख्येप्रमाणें कमज्यास्त समजत असतात; शिवाय हीं डोकीं त्या टोळीमध्यें नाण्यासारखींहि चालतात. सांताळ लोकांत हीं चिन्हें बापाकडून मुलाकडे वंशपरंपरेनें येत असतात. आपण असें वाचितों कीं कूसा लोकांत राजाचें घर इतर घरांपा-

सून निराळें म्हणून ओळखण्याची खूण ही असते कीं त्याच्या घराच्या छपराला एकाद्या सिंहाची किंवा बिबळ्याची शेंपटी लटकाविलेली असते; पण आतांपर्यंतच्या पुराव्यावरून असें स्पष्ट होतें कीं हें राजचिन्ह प्रारंभीं विजयचिन्ह असून त्याच्या आधारावर एकाद्या नायकानें श्रेष्ठत्व संपादून अशा रीतीनें त्याचें प्रदर्शन केलें असावें.

परंतु असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें पशुरूपी शत्रूंपेक्षां मानवी शत्रूंची भीति ज्यास्त असल्यामुळें माणसांवर जय मिळविला म्हणजे ते ज्यास्त धन्यता समजतात, आणि म्हणून असल्या जयांच्या चिन्हांचीं किंमत ते ज्यास्त मानतात. शूर माणसानें लढाईवरून परत येतांना विजयचिन्हें बरोबर न आणिल्यास त्यास मान मिळत नाहीं; पण आपला शत्रु आपण मारिला आहे हें सिद्ध करण्याकरितां त्यानें जर त्याच्या शरीराचा एकादा अवयव आणिला, आणि विशेषतः दुहेरा नसेल असा अवयव आणिला, तर त्याची टोळीमध्यें मानमान्यता वाढते, व सत्ताहि वाढते. म्हणून असलीं विजयचिन्हें त्यांचें प्रदर्शन करण्याकरितां संभाळून ठेवावयाचीं, आणि अशा रीतीनें आपलें स्वतःचें वर्चस्व वाढवावयाचें, अशी चाल उत्पन्न होते. उदाहरणार्थ, आशान्टीमध्यें मारलेल्या माणसांचे लहान लहान सांधे, हाडें आणि दांत हीं मारणारा माणूस आपल्या अंगावर घालीत असतो. उत्तर अमेरिकेंतील सीरिस व ओपाटा लोकांमध्यें पुष्कळ लोक आपण मारिलेल्या शत्रूंचें मांस शिजवून खातात, आणि हाडें विजयचिन्हें म्हणून राखून ठेवितात. आणि चिचिमेक

नांवाच्या दुसऱ्या एका मेक्सिकन जातीचे लोक एकाद्या शत्रूस त्यांनीं मारिलें म्हणजे एका हाडावर एक ज्यास्त खूण करीत असत, असें कीं तेणेंकरून प्रत्येकानें किती शत्रू मारिले हें समजावें.

अशा रीतीनें विजयचिन्हें कां जमा करितात, व त्यांपासून सामाजिकदृष्ट्या काय फायदा होतो, हें आपल्या लक्षांत आलें असल्यामुळें, आतां या रूढीचीं जीं अनेक रूपें त्यांचा विचार करूं.

८. ठार केलेल्या माणसांच्या शरीरांच्या भागांपैकीं डोकीं राखून ठेवण्याचा प्रघात सर्वांत ज्यास्त सामान्य आहे; ह्याचें कारण शत्रूवर विजय मिळविल्याचा तो सर्वांत बिनचूक दाखला आहे हें असावें.

ह्या प्रघाताचीं व त्याच्या मुळीं असलेल्या हेतूंचीं उदाहरणें विपुल सांपडतात. बैबलांत देखील याबद्दल दाखला आहे. डेव्हिडनें गोलियाथ यास मारिलें तेव्हां तो त्याचें डोकें घेऊन जरुशलेम येथें गेला. ईजिप्तमध्यें-हि हा प्रघात होताच. उदाहरणार्थ, आबूसिम्बेल या ठिकाणीं दुसऱ्या राम्सीस राजानें हातांत बारा डोक्यांचा झुपका धरिला आहे असें चित्र काढिलेलें आहे. आतां इतक्या श्रेष्ठ जातींमध्यें विजयचिन्हें म्हणून डोकीं घरीं आणण्याची चाल जर दृष्टीस पडते, तर कनिष्ठ जातींमध्यें ती पृथ्वीवर सर्वत्र आढळते यांत मुळींच नवल नाहीं. उदाहरणार्थ, उत्तर अमेरिकेंतील चिचिमेक लोकांमध्यें मारून आणलेल्या माणसांचीं शिरें बांबूवर घालून गांवांतून विजयचिन्हें म्हणून मिरवीत नेत असत, आणि गांवांतील लोक त्यांच्या सभोंवतीं नाचत अ-

सत. दक्षिण अमेरिकेंत आविपोन लोक समरांगणांतून शिरें खोगिरास बांधून आणितात, आणि मंडुकस लोक आपलीं भिकार व ओबडधोबड झोंपडीं त्यांनीं शृंगारितात. न्यूझीलंदर लोकांत अशीच चाल आहे. कांगोनदीवरील लोक शत्रूचीं शिरें विजयचिन्हें म्हणून राखून ठेवितात; आणि दिंकिराच्या शेवटच्या राजाच्या कपाळाचीं व मांड्यांचीं हाडें आशांटीच्या राजाच्या दरबारांत अद्यापि विजयचिन्हें म्हणून ठेविलेलीं आहेत. हिंदुस्थानांतील डोंगरी टोळ्यांपैकीं कुकी लोकांत असा प्रघात आहे. पर्शियामध्यें बादशाहाचा दरबार शृंगारण्याकरितां युद्धांत पकडलेल्या कैद्यांचीं डोकीं उडविण्यासाठीं पैसे देऊन मारेकरी लावितात. तुर्कस्थानांत कधीं कधीं पुरलेल्या शत्रूंचीं प्रेतें उकरून काढून पुनः शिरच्छेद करितात. ह्यावरून अर्धवट सुधारणा झाली तरी शिरें गोळा करण्याची चाल कशी कायम राहते हें स्पष्ट दिसतें.

ज्या ठिकाणीं युद्धशीलता अत्यन्त तीव्र असेल त्याठिकाणीं ही चाल फारच जोरावर दृष्टीस पडते. ह्याचें प्राचीन उदाहरण म्हटलें म्हणजे तैमुर्लंगाचें होय; कारण त्यानें बगदादपासून नव्वद हजार शिरांची खंडणी चोपून घेतली. अर्वाचीन उदाहरणांपैकीं डेहामीचें उदाहरण अत्यन्त प्रसिद्ध आहे. तेथील राजाच्या निजण्याच्या खोलीची भुई शेजारच्या संस्थानिकांच्या व नायकांच्या डोक्यांची बनवलेली असे; असें कीं राजास तीं पायांखालीं तुडवण्यास सांपडावीं; आणि त्याच्या देवडीवरील पांखें हाडांचें बनवीत असत; म्हणून तें दुरुस्त

करावयाचें असलें म्हणजे त्याचे सेनापती शत्रूवर लढाईस जात.

आतां हीं उदाहरणें पुरीं करून आपण ही गोष्ट लक्षांत आणूं कीं विजयचिन्हें म्हणून डोकीं गोळा करावयास लागण्यापासून राजकीय सत्ता बळकट करण्याच्या एका साधनाची प्राप्ति कशी होते, बळी देण्याच्या विधींपैकीं तो एक कसा होऊन बसतो, आणि त्यापासून सामाजिक व्यवहाराच्या दळणवळणाचें नियमन कसें होतें.

तैमुर्लंगानें बगदाद व आलेप्पो ह्या शहरीं जे शिरांचे बुरुज व मनोरे बांधिले तेणेंकरून त्याचे शत्रू अगदीं गर्भगळीत होऊन, आणि त्याचा आज्ञाभंग केल्यास तो सूड उगवील अशी भीति त्याच्या अनुयायांमध्यें उत्पन्न होऊन त्याचें श्रेष्ठत्व वाढलें असलें पाहिजे, आणि डेहामीमध्येंहि डोयांच्या भुईचा असाच परिणाम होत असला पाहिजे, ह्याबद्दल संशय वाटत नाहीं. उत्तर ऐलीबिसमध्यें १८२२ सालाच्या पूर्वीं माणसांच्या कपाळाचीं नरोटीं नायकांच्या घरांतून भूषणें म्हणून टांगीत असत, व तीं लढाईंत जय मिळविल्याचीं चिन्हें असत; त्यामुळें त्यांच्या अधिकारास जोर आलाच असला पाहिजे. आणि ह्याचा परिणाम असा होतो ह्याबद्दल आपणास निश्चित पुरावा असा सांपडतो कीं, मंद्रुकसलोकांमध्यें शत्रूचीं वाळवून ठेविलेलीं दहा डोकीं ज्याच्यापाशीं असतील तो नायकाच्या पदवीस योग्य म्हणून समजला जातो.

आतां मृताच्या संतर्पणार्थ डोकीं अर्पण करितात, आणि अशा रीतीनें ह्या अर्पणविधीस अर्धवट पूजेचें स्वरूप

येतें, ह्याबद्दल स्पष्ट पुरावे सांपडतात. पैकीं एक पुरावा वर सांगितलेल्या सेलीबीस येथील लोकांमध्येंच सांपडतो. त्यांच्यांत एकादा नाईक मेला म्हणजे त्याचें थडगें दोन ताज्या मानवी शिरांनीं विभूषित करावें लागे, आणि त्या कामाकरितां शत्रूंचीं शिरें न मिळाल्यास गुलामांस मुद्दाम मारीत. डायाक लोक जरी पुष्कळ बाबतींत बरेच पुढें गेलेले आहेत तरी ही क्रूर चाल त्यांच्यांत आहेच. उत्तर हिंदुस्थानांतील कुकी लोकांत बळी देण्यासाठीं शिरें मिळविण्याची ही चाल ह्याच्याहि पुढें गेलेली आहे. डोकीं मिळविण्यासाठीं ते शेजारच्या मुलखांत स्वाऱ्या करितात, आणि एकेका वेळीं पन्नास पन्नास डोकींहि घेऊन येतात. यांचा उपयोग नायकांच्या प्रेतविधीच्या वेळीं करितात; आणि असल्या ह्या स्वाऱ्या त्यांचा राजा मृत झाला म्हणजे होत असतात.

विजयाच्या ह्या भयंकर चिन्हांमुळें माणसास सामाजिक व्यवहारांतहि वजन प्राप्त होत असतें हें सेंट जॉनच्या ग्रंथांतील पुढील उताऱ्यावरून स्पष्ट दिसतें. शिरें मिळविणें हा बोर्निओमधील पकाटनलोकांमध्यें फारसा धर्मविधि नसून त्याचा उद्देश शौर्य व वीर्य ह्यांचें प्रदर्शन करण्याचा असतो. ते भांडले म्हणजे एकमेकांस नेहमीं असा प्रश्न करितात कीं, तुझ्या बापानें किंवा आजानें किती शिरें मिळविलीं होतीं? आणि तीं प्रश्न करणारानें मिळविल्यापेक्षां कमी असल्यास तो त्यास उलट लावून असें बोलतो कीं, तर मग तुला गर्व वाहण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं.

९. माणसाचें डोकें म्हणजे जरा अवजडच असतें;

आणि घर जेव्हां लांब असतें तेव्हां सहजच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, शत्रु आपण मारिला ह्याचा पुरावा डोक्याचा एक भागच नेल्यानें दिल्यासारखा होईल किंवा नाहीं? कांहीं ठिकाणीं रानटयास वाटतें, होईल, आणि त्याप्रमाणें तो वागतो.

ह्याचें उदाहरण आशान्टीमध्यें दृष्टीस पडतें. तेथें सेनापति मारलेल्या शत्रूंच्या जबडयांचीं हाडें राजाकडे पाठवून देतो. ताहितियन लोक प्रथम उमगले तेव्हां त्यांनीं मोठया दिमाखानें शत्रूंच्या जबडयांचीं हाडेंच दाखविलीं; आणि प्रसिद्ध प्रवासी कूक ह्याला एका घरावर पंधरा शिरें टांगलेलीं आढळलीं. तद्वतच व्हेटमध्यें जेवढा नाईक मोठा असेल तेवढें तो हाडांचें प्रदर्शन ज्यास्त करीत असून, शिवाय आपण असें वाचितों कीं, तेथील नयकाची जो निंदा करील त्या शत्रूच्या जबडयाचीं हाडें त्या नायकाच्या घरांत विजयचिन्ह म्हणून टांगून ठेवितात; ह्याचा उद्देश दुसऱ्यांस मुकाटयानें दहशत बसावी हा असतो. बॉइगु नामक प्रांतांत राहणाऱ्या दुसऱ्या एका पापुअन जातीबद्दल स्टोनसाहेब असें म्हणतोः—हे लोक जात्या लढाऊ व क्रूर आहेत; ते शत्रूंवर वरचेवर हल्ले करून त्यांचीं शिरें व जबडे आणीत असतात; डोकें मारणाराकडे जातें, आणि जबडा शिर तोडणाराकडे जातो; ह्यामुळें जबडयाचें हाड फार मोलाचें समजतात, आणि ज्याच्यापाशीं हीं हाडें ज्यास्त असतील तो ज्यास्त मोठा समजला जातो. दक्षिण अमेरिकेंत तुपी लोकांमध्यें विजयी योद्धयाच्या मणगटांत त्याच्या शत्रूचें तोंड कडयाप्रमाणें अडकवितात.

जबड्यांचा जसा विजयचिन्हें म्हणून उपयोग करितात तसाच दांतांचाहि करितात. उदाहरणार्थ, क्यारिब लोक लढाईंत मारिलेल्या शत्रूंच्या दांतांच्या सांखळ्या बनवून हातांत व पायांत घालीत असत. तुपी लोक कैद्यास खाऊन टाकून त्यांच्या दांतांच्या माळा करून गळ्यांत घालीत. माक्सोसमधील बायका नवऱ्यानें लढाईंत मारिलेल्या शत्रूंच्या दांतांच्या माळा घालीत. मध्य-अमेरिकेंतील लोक एक पुतळा बनवून त्याच्या तोंडांत लढाईंत मारिलेल्या स्पानिश लोकांचे दांत बसवीत.

सहज काढतां येण्यासारख्या डोक्याच्या दुसऱ्या भागांचाहि ह्याच कामीं उपयोग करितात. जेव्हां पुष्कळ शत्रू मारिलेले असतील तेव्हां ते किती होते हें दाखविण्यास त्यांचे कान सहज नेतां येण्यासारखे असतात; आणि झेंगीसखानानें पोलंदांत मारिलेल्या शत्रूंच्या कानांचीं जीं नऊ पोतीं भरिलीं त्याचा हेतु हाच असावा. कांहीं ठिकाणीं ह्या कामीं नाकांचाहि उपयोग म्हणूनच करितात. प्राचीन काळीं पांचव्या कान्स्टंटाइनला ताटभर नाकें कोणीं नजराणा म्हणून दिलीं तीं त्यानें आनंदानें स्वीकारिलीं; आणि हल्लींहि मान्टिनीग्रोमध्यें शिपायांनीं शत्रूंचीं नाकें गोळा करून सेनापतींकडे नेल्याचें उदाहरण घडलेलें आहे.

१०. प्राचीन मेक्सिकन लोक आपल्या देव बनलेल्या नरभक्षक पूर्वजांच्या संतर्पणार्थ रोज अत्यन्त क्रूर विधि करीत असून ते कधीं कधीं विजित शत्रूच्या सर्व अंगाचें कातडें काढून तेंच विजयचिन्ह म्हणून घेऊन जात असत. लढाईंत जो पहिला शत्रु हातीं लागेल

त्यास ते जिवंत सोलीत; आणि नंतर ज्या लढवय्यानें त्यास पकडलें असेल तो तें त्याचें रक्तबंबाळ कातडें घालूनच कांहीं दिवस लढत असे; नंतर तो सर्व देवळांतून जाई, आणि त्याच्या मागून स्त्रीपुरुष आनंदाच्या आरोळ्या देत जात. ह्या ठिकाणीं विजयचिन्ह विजेत्याच्या शौर्याचा पुरावा म्हणून प्रथम घेतलेलें असें दृष्टीस पडतें, तसेंच त्यापासून मागाहून एका धर्मविधीची उत्पत्ति कशी झाली तेंहि दृष्टीस पडतें; कारण हें विजयचिन्ह अंगांत घालून तो जो देवळांतून फिरत असे, तो त्याच्या रक्तस्राव पाहून आनंद पावणाऱ्या देवतांच्या संतर्पणार्थच फिरत असे. ह्या विधीचा उद्देश हाच असे ह्याबद्दल आणखी पुरावा सांपडतो. "सोनारांचा देव जो टोटेक त्याच्या उत्सवाच्या वेळीं एक पुजारी एका कैद्याचें कातडें अंगावर घेई; आणि असा त्यानें पोषाक केला म्हणजे त्यास टोटेक देवाचा पुतळा म्हणून समजत." तद्वतच युकाटनच्या राष्ट्रांत कैद्यांचीं प्रेतें पायऱ्यांवरून खालीं लोटीत, सोलीत, आणि नंतर उपाध्ये तीं कातडीं अंगावर घेऊन नाचत.

तथापि सामान्यतः त्वचारूपी विजयचिन्ह लहान असतें; कारण विजयचिन्हास आवश्यक गोष्ट एवढीच असते कीं, त्याची दुसरी प्रत सांपडूं नये. ह्या लहान चिन्हाची उत्पत्ति कशी होते तें आबिपोन लोकांमधील पुढील प्रघातावरून दिसून येतें. "ते शत्रूंचीं शिरें राखून ठेवितात, आणि लढाईचा रंग दिसूं लागल्यामुळें जेव्हां ते ज्यास्त सुरक्षित ठिकाणीं जातात तेव्हां त्या शिरांवरचें कातडें केंसासहित मोठ्या युक्तीनें का-

ढितात, आणि तीं कातडीं तेवढीं घेऊन जातात. ज्या आबिपोनपाशीं असलीं कातडीं सर्वांत ज्यास्त असतील तो सर्वांत मोठा लढवय्या समजला जातो. ” तथापि एकादें शिर आपल्यापाशीं होतें हें सिद्ध करण्यासाठीं त्याचें सगळेंच कातडें जवळ ठेवण्याची जरूरी नाहीं. शेंडी जेथें असते तेवढाच त्याचा भाग जवळ ठेविला तरी पुरे. ह्याच मुद्यावर शत्रूच्या माथ्याची कातडी काढून घेण्याचा प्रघात सुरू होतो, व तो अमेरिकेंतील इंदियन लोकांत फार असे. उदाहरणार्थ, शोशोन लोकांत अशी समजूत असे कीं, एकाद्या शत्रूच्या माथ्याची कातडी काढून घेणें ही गोष्ट त्यास जित करण्यापासून अगदीं भिन्न आहे; आणि ती कातडी आणिली नाहीं तर त्यास नुसतें मारण्याचें महत्त्व कांहींच समजत नाहींत; तें इतकें कीं, एकानें कांहीं शत्रू मारिले व दुसऱ्यानें त्यांच्या माथ्याची कातडी सोलून आणिली, तर शत्रूस मारिल्याचा सर्व मान त्या दुसऱ्यास मिळतो. हा प्रघात केवळ इंदियन लोकांतच नसून प्राचीन सिथियन लोकांमध्यें असे, आणि अर्वाचीन नाग लोकांमध्यें आहे.

विजयचिन्ह म्हणून नुसते केंसच राखून ठेवण्याची चाल वरच्याइतकी सामान्य नाहीं; ह्याचें कारण त्यावरून केंसवाल्यास लढाईंत जिंकलेंच असें खात्रीनें सिद्ध होत नाहीं. तथापि अशीं उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, एका नागजातीच्या माणसाबद्दल ग्रेंजसाहेब असें म्हणतो कीं, त्यानें आपली ढाल मारिलेल्या शत्रूंच्या केंसांनीं आच्छादिलेली होती. एका मण्डन नाय-

कानें आपल्या ज्याकिटास असल्या केंसांची झालर लाविल्याचें वाचण्यांत येतें. आणि कोचिमिस लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, कांहीं उत्सवप्रसंगीं त्यांचे जादूगार केंसांनीं भूषविलेले कातड्याचे लांब लांब झगे घालीत असत.

११. आतां शत्रूवर विजय मिळविल्याचें सिद्ध करण्यासाठीं दुसरा सहज नेतां येण्यासारखा पुरावा म्हटला म्हणजे हात व पाय हा होय. म्हणून मेक्सिको देशांतील सीरिस व ओपाटास ह्या दोन जातींचे लोक "ठार केलेल्या शत्रूच्या कपाळाची कातडी सोलितात, किंवा एक हात कापून घेतात. आणि तो घेऊन समरांगणांत नाच करितात." तद्वतच कालिफोर्नियामधील इंदियन लोक विजयचिन्हें म्हणून हात व पाय कापून घेत असून शिवाय डोळेहि काढून घेत असत. आतां हे हात किंवा पाय डावे किंवा उजवे कांहीं तरी ठराविकच असले पाहिजेत हें उघडच आहे; कारण तसें नसल्यास एक शत्रु मारून दोन मारिले असें कोणीं म्हणण्याचा संभव आहे. खोंड लोकांत शत्रूंचे उजवे हात कापून झाडावर टांगून ठेवीत असत. इजिप्शन लोकांत अशा हातांची रास करून ती राजास नजर करीत असें त्यांच्या भिंतीवरील चित्रांवरून दिसतें.

ह्याच चित्रांवरून आणखी एक अंगभाग विजयचिन्ह म्हणून कापून घेत असें दिसून येतें. तो भाग शिश्नरूपी होय; कारण ह्या चित्रांमध्यें हातांच्या राशीजवळ शिश्नांची रासहि आढळून येते. आबिसिनियन लोकांत शिश्नांच्याऐवजीं त्यावरची कातडीच विजय-

चिन्ह म्हणून काढून घेण्याचा प्रघात आहे. त्यांच्या-बद्दल ब्रूस म्हणतो:–“ लढाई संपली म्हणजे संध्याकाळीं प्रत्येक नाईक आपल्या तंबूच्या दरवाजापाशीं बसतो, आणि त्याचे अनुयायी आपण मारिलेल्या शत्रूंच्या शिश्नत्वचा त्याच्यापुढें नजराणा म्हणून आणून ठेवितात. नंतर त्या घेऊन जाऊन ते वाळवितात, आणि परेडीच्या दिवशीं राजाच्यापुढें टाकितात. ” ह्यावरून विजयचिन्ह हें प्रथम एकाद्यानें जय मिळविल्याचा दाखला असून मागून तें राजास संतुष्ट करण्याचें साधन कसें होतें, आणि शिवाय मारिलेल्यांची संख्या ठरविण्याचेंहि साधन तें कसें बनतें हें स्पष्ट दिसतें. हिब्रू लोकांतहि ही चाल होतीच, व तिचा उद्देशहि तोच होता; कारण आपण असें वाचितों कीं, डेव्हिडनें दोनशें फिलिस्टाइन लोक मारले, आणि त्यांच्या शिश्नत्वचा आणून राजास त्या त्यानें मोजून समर्पण केल्या.

१२. विजयचिन्हें घेण्याचा जो प्रत्यक्ष उद्देश आहे त्याशिवाय तसें करण्यांत एक अप्रत्यक्ष हेतुहि साध्य होत असतो, व तेणेंकरून बहुधा त्या प्रघातास जोर येत असतो. प्राथमिक कल्पनांचा विचार करतांना आपल्या हें लक्षांत आलेंच आहे कीं, रानट्याचें मन विवेकशक्तिविहीन असल्यामुळें त्यास असें वाटत असतें कीं कोणत्याहि पदार्थाचे गुणधर्म त्याच्या सर्व भागांत वसत असतात; आणि विशेषतः माणसाचे गुणधर्म त्याच्या शरीराच्या सर्व शरीरभागांत वसत असतात असें त्यास वाटत असतें. ह्यावरून मृत आप्तांचे गुण आपल्या अंगीं आणण्यासाठीं त्यांच्या शरीरांचे भाग किंवा

हाडांचें पीठ पाण्यांत घालून खाण्याची चाल उत्पन्न होते; तद्वतच मेलेल्या शूर माणसाचें काळीज त्याचें शौर्य मिळविण्यासाठीं खाण्याची किंवा दूरदृष्टि प्राप्त करून घेण्यासाठीं त्याचे डोळे खाण्याची, आणि आपल्या अंगीं भितरेपणा येऊं नये म्हणून भित्ऱ्या प्राण्यांचें मांस न खाण्याची चाल रानटयांत उत्पन्न होते. प्रत्येक माणसाचा आत्मा त्याच्या सर्व शरीरांत पसरलेला असतो या समजुतीपासून दुसरी एक अशी समजूत उत्पन्न होते कीं, त्याच्या शरीराचा कांहीं भाग आपल्यापाशीं ठेविल्यास त्याच्या आत्म्याचाहि कांहीं भाग आपल्यापाशीं येतो, आणि त्यामुळें त्याच्या आत्म्यावर आपला ताबा उत्पन्न होतो. ह्यावरून दुसरी एक अशी समजूत उत्पन्न होते कीं, प्रेताच्या राखून ठेविलेल्या भागास कांहीं इजा केल्यास भुताच्या त्या भागास ती होते; आणि अशा रीतीनें त्या भागास त्रास देऊन भुतास वठणीवर आणतां येतें. पूर्वींच्या भागांत सांगितल्याप्रमाणें जादूटोण्याची उत्पत्ति अशा रीतीनें होते. प्राथमिक वैदू हाडांचा जो इतका आवाज करीत तो ह्यावरून होय; आणि ह्यावरूनच चेटूक करणाऱ्या बाया प्रेतांचे कांहीं भाग चोरून नेतात अशी समजूत उत्पन्न होते.

एवंच विजयचिन्ह शत्रूस जिंकल्याचें सिद्ध करून शिवाय त्याचें भूत ताब्यांत आणण्यासहि उपयोगीं पडतें; आणि तें जवळ असल्यानें त्याचें भूत आपला गुलाम बनतें अशी कांहीं लोकांमध्यें तरी समजूत दिसते. पण सर्वच रानटी लोकांमध्यें अशी समजूत आढ-

ळून येते कीं, थडग्याजवळ मारलेल्या माणसांचे व इ॰तर प्राण्यांचे दुय्यम मृताच्या दुय्यमाबरोबर त्याची नोकरी करण्यासाठीं त्याच्याबरोबर जातात; ह्या समजुतीमुळें कांहीं ठिकाणीं मृताचा परलोकीं संसार करण्यासाठीं त्याच्या बायकांस त्याच्या प्रेताबरोबर जाळितात किंवा पुरितात; कांहीं ठिकाणीं त्यास परलोकीं नेण्यासाठीं घोडे मारितात; आणि कांहीं ठिकाणीं त्यास वाट दाखविण्यासाठीं कुत्रे मारितात. ह्या समजुतीवरून दुसरी एक अशी समजूत उत्पन्न होते कीं, मृताच्या थडग्यावर माणसांच्या व जनावरांच्या शरीरांचे भाग ठेविल्यानें तीं माणसें व जनावरें त्याच्या आधीन होतात. पुष्कळ ठिकाणीं थडग्यांवर हाडें वगैरे टाकिलेलीं जीं दिसतात, आणि कांहीं ठिकाणीं शत्रू किंवा गुलाम ह्यांचीं शिरें किंवा शेंड्या त्यांजवर ज्या ठेवितात, त्याचें बीज हेंच आहे. उदाहरणार्थ, ऑसेजीस लोकांबद्दल टायलर असें सांगतो कीं, ते कधीं कधीं प्रेतावर रचलेल्या दगडांच्या ढिगांत एक बांबू पुरून त्याच्या शेंड्यावर शत्रूची शेंडी टांगून ठेवितात. त्यामध्यें त्यांची अशी कल्पना असते कीं, मृतमित्राच्या थडग्यावर मारलेल्या माणसांची शेंडी ठेविल्यास त्याचा आत्मा त्या मित्राच्या आत्म्याचा परलोकीं नोकर बनतो. आजिब्वे लोकांमध्येंहि अशीच चाल आहे; व तिच्याहि मुळीं बहुधा हीच कल्पना असावी.

१३. विजयचिन्हें घेण्याच्या चालीबरोबर आणखी एक चाल उत्पन्न होते तिचा एथें उल्लेख केला पाहिजे; कारण शेवटीं ती सरकारी नियमनाचा एक भाग बनत

असते. ती चाल म्हटली म्हणजे गुन्हेगारांच्या शरीरांच्या भागांचें प्रदर्शन करण्याची होय.

आपल्या जास्त प्रौढ बनलेल्या मनांत शत्रू, गुन्हेगार, आणि गुलाम ह्यांमधील भेद चांगला येत असतो; पण प्राथमिक माणसाच्या मनांत तो बहुतेक मुळींच येत नाहीं. ज्या मनोभावांस व कल्पनांस आपण नैतिक म्हणून म्हणतों त्यांची त्याच्या ठिकाणीं बहुतेक अगदींच वाण असल्यामुळें—त्याचें जें कांहीं मालकीचें म्हणून असेल तें जबरीनें त्यानें प्राप्त करून घेतलेलें असतें; उदाहरणार्थ, आपल्याहून दुर्बल माणसापासून तो त्याची बायको किंवा चीजवस्त हिसकावून घेत असून स्वतःच्या मुलांचेंहि ओझें झाल्यास त्यास, किंवा बायकोनें त्रास दिल्यास तो तीस बेलाशक मारीत असतो, आणि आपल्या जातवाल्यांस हा ठार मारितो असें लोकांनीं म्हणण्यांत त्यास कधीं कधीं भूषण वाटत असतें; ह्यामुळें बरोबर व चुकीचें, किंवा न्याय्य व अन्याय्य, ह्याची त्यास स्पष्ट कल्पना मुळींच नसते. गोष्टी किंवा कृति ह्यांस तो चांगल्या किंवा वाईट म्हणून म्हणतो, त्यास त्यांपासून जें तत्काल सुख किंवा दुःख होईल त्यावरून म्हणतो. म्हणून त्याच्यावर हल्ला करणारा टोळींतील असो किंवा टोळीच्या बाहेरचा असो, त्याच्या शत्रुत्वापासून, आणि तो जी त्यास इजा करील तिजपासून, त्याच्या ठिकाणीं एकच प्रकारचा मनोभाव उत्पन्न होतो; म्हणजे, शत्रू आणि गुन्हेगार ह्यांच्यांत तो भेद करीत नाहीं. हें असें कां होतें ह्याचें आपणास आश्चर्य वाटतें; परंतु आपण असें लक्षांत आणावें कीं सुधारलेल्या रा-

ष्ट्रांच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर देखील कुटुंबसमूह हेच राष्ट्रीयसमूहांचे घटक असून ते बऱ्याच अंशीं स्वतंत्र समाजच असत; आणि हल्लीं राष्ट्रांचे जसे परस्परसंबंध आहेत तसे त्यांचे एकमेकांशीं बऱ्याच अंशीं असत. राष्ट्रांचीं जशीं मोठालीं हाडवैरें असत तशीं त्यांचीं लहान सहान हाडवैरें असत. अपराध करणाऱ्या राष्ट्राच्या निरपराधी नागरिकांवर जसा सूड उगवीत तसा अपराध करणाऱ्या कुटुंबाच्या निरपराधी घटकांवरहि उगवीत. आणि अशा रीतीनें अनेक रीतींनीं अंतः-कौटुंबिक अतिक्रमण करणाराची (हल्लीं ज्यास गुन्हेगार म्हणतात त्याची) अंतर्राष्ट्रीय अतिक्रमण करणारासारखीच सरासरी स्थिति असे. म्हणून त्यांस सहजच सारख्याच रीतीनें वागवीत. मध्ययुगीन कालांत मारिलेल्या कुटुंबशत्रूंचीं (म्हणजे त्यांतील माणसांस मारणारांचीं किंवा त्याची मालमत्ता चोरणाराचीं) शिरें विजयचिन्हें म्हणून कशीं मिरवीत असत हें अगोदरच आपल्या लक्षांत आलेलें आहे. गॉल व यूरोपस्थ इतर उत्तरेकडील लोकांबद्दल स्ट्राबो असें म्हणतो कीं, लढाईत मारिलेल्या शत्रूंचीं डोकीं आणून कधीं कधीं घराच्या मुख्य दरवाज्यास अडकवून ठेवीत असत; आणि सालिक नांवाचा कायदा होई तोंपर्यंत मारिलेल्या खासगी शत्रूंचीं शिरेंहि दरवाज्यासमोर बांबूवर अडकवून ठेवीत. ह्यावरून असें दिसतें कीं सार्वजनिक व खासगी शत्रूंपासून विजयचिन्हें घेत असल्यामुळें ते एकच म्हणून समजत असत. ज्यू लोकांच्या रूढींमध्येंहि असलेंच सादृश्य दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, ज्यू-

डास असा हुकूम करितो कीं निकानोरच्या शिराबरोबर त्याचा हातहि कापा; आणि तीं दोन्ही तो जरुशलेम येथें विजयचिन्हें म्हणून आणितो (हात कापण्याचा हेतु त्यानें धर्मलंडपणाची ऐट करून तो पुढें केला होता). आतां ज्यूडासनें परकी शत्रूस ही जी शिक्षा केली तसली डेव्हिडनें स्वकीय शत्रूंस केलेली दिसते; कारण त्यानें इश्बाशेथ ह्यास मारणाराचीं प्रेतें टांगून ठेविलीं इतकेंच नाहीं, तर त्यांचे हात व पाय कापून टाकिले.

ह्यावरून, तर मग, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं फांशीं दिलेल्या शत्रूंचीं प्रेतें सुळावर किंवा त्यांचीं शिरें बांबूवर टांगून ठेवण्याची चाल ठार केलेल्या शत्रूपासून घेतलेलीं विजयचिन्हें घरीं आणण्यापासून उत्पन्न होते. बहुतकरून मारलेल्या शत्रूच्या शरीराचा जरी एक भागच टांगून ठेवितात, तरी कधीं कधीं त्याचें सर्व शरीरच टांगून ठेवितात. आणि गुन्हेगाराचें सगळें प्रेतच अडकवून ठेवण्याचा प्रघात ज्यास्त दिसतो याचें कारण शत्रूच्या प्रेताप्रमाणें त्याचें प्रेत दुरून आणावें लागत नाहीं हें होय.

१४. विजयचिन्हें घेणें आणि विधिविषयक सरकार ह्यांजमध्यें जरी प्रत्यक्ष संबंध कांहींच दिसत नाहीं, तरी आतांपर्यंत दिलेल्या उदाहरणांवरून त्यांच्यामध्यें असा अप्रत्यक्ष संबंध दिसून येतो कीं त्यावरून ही चाल लक्षांत घेणें आवश्यक आहे हें स्पष्ट होतें. कारण नियमनाचे सामाजिक, राजकीय, आणि धार्मिक असे जे तीन प्रकार त्या तिघांमध्येंहि ह्या चालीचें अंग आहेच.

प्राथमिक राष्ट्रांमध्यें माणसांस त्यांच्या शौर्याप्रमाणें

मान देत असतात, कांहीं ठिकाणीं हें शौर्य ते जितकीं शिरें दाखवितील तेवढ्यांवरून मापीत असतात, कांहीं ठिकाणीं जबड्यांच्या संख्येवरून, आणि कांहीं ठिकाणीं शेंड्यांच्या संख्येवरून. अशा प्रकारचीं विजयचिन्हें पिढ्यानुपिढ्या मौल्यवान् म्हणून जपून ठेवीत असतात, आणि पूर्वजांनीं त्या जितक्या ज्यास्त मिळविल्या असतील तितका आपल्या कुटुंबाबद्दल त्यांच्या वंशजांस ज्यास्त अभिमान वाटत असतो. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां विजयचिन्हांवरून एकप्रकारचा वर्गभेद सुरू होतो असें उघड होतें. कांहीं ठिकाणीं माणसाच्या घरांत किंवा घरावर जितकीं हाडें असतील त्यांच्या मानानें त्याचा दर्जा कमीज्यास्त होत असतो ही गोष्ट ध्यानांत आणतां, व्यक्तिविषयक श्रेष्ठत्व दर्शविणाऱ्या ह्या चिन्हांपासून सामाजिक व्यवहारांत एकप्रकारच्या नियामक प्रभावाची उत्पत्ति कशी होत असते ही गोष्ट स्पष्ट होते.

राजकीय नियमनाचें जसें उत्क्रमण होत जाईल तसें विजयचिन्हग्रहण अनेक तऱ्हांनीं अधिकार कायम राखण्याच्या कामीं साधनीभूत होऊं लागतें. नायकाच्या अनेक विजयचिन्हांवरून त्याची संहारकशक्ति व्यक्त होऊन त्याच्याबद्दल जी भीतियुक्त पूज्यबुद्धि वाटत असते, ती तो जेव्हां राजा बनून त्याचे अंकित नाईक व टोळ्या बनतील, तेव्हां इतर लोक त्याच्याकारितां विजयचिन्हें आणूं लागल्यामुळें त्यांची संख्या वाढून, ज्यास्तच होते; आणि जेव्हां मारिलेल्या शास्त्यांच्या शरीरभागांचें तो प्रदर्शन करितो तेव्हां त्या बुद्धीस दराऱ्याचेंच स्वरूप येतें. पुढें वरील प्रघातास जेव्हां प्रौढ स्व-

रूप येतें तेव्हां इतरांनीं मिळविलेल्या ह्या विजयचिन्हांच्या ग्रहणास एका राजकीय विधीचें स्वरूप येतें. प्राचीन इजिप्शन राजापुढें हातांची रास करून ठेविली म्हणजे तो प्रसन्न होत असे; तद्वतच हल्लीं आशान्टीच्या राजापुढें सेनापतीनें दाढांची रास नेऊन ठेविली म्हणजे तो प्रसन्न होतो. आपण असें वाचितों कीं तैमुर्लंगाच्या शिपायांवर अमुक शिरें त्यांनीं आणिलींच पाहिजेत अशी सक्ती असल्यामुळें त्यांस क्रूरपणानें वागणें भागच पडे; ह्यावरून विजयचिन्हें आणून देण्याच्या प्रघातास आज्ञाधारकत्व प्रदर्शित करण्याच्या विधीचें स्वरूप कसें येतें हें अगदीं उघड होतें. पण अशा रीतीनें ह्यापासून एकप्रकारचें राजकीय कार्यच उत्पन्न होतें असें नाहीं; तर जे अपराधी किंवा मगरूर असतील त्यांचीं शरीरें किंवा शिरें प्रसिद्ध ठिकाणीं लावून ठेविल्यानें शासनविषयक नियंत्रणहि उत्पन्न होतें.

भुतास प्रसन्न करून घेण्याकरितां मारिलेल्या शत्रूच्या शरीराचा एकादा भाग अर्पण करणें ही गोष्ट जरी सामान्यतः ज्यास धर्मविषयक विधि म्हणतात त्यांत येत नाहीं, तरी एकाद्या पूर्वजाच्या भुतास जेव्हां देवाचें स्वरूप आलेलें असेल तेव्हां त्यास प्रसन्न करून घेण्याच्या उद्देशानें तो विधि केल्यानें त्यास उघडच धर्मविधीचें स्वरूप येतें. हें संक्रमण आपणास पुढील उदाहरणावरून दिसून येतें. तें हें कीं खोंड लोकांच्या दोन टोळ्यांमध्यें लढाई चालली असतां ज्यानें प्रथम आपल्या शत्रूस मारिलें त्यानें त्याचा उजवा हात तोडिला, आणि तो घेऊन मागच्या बाजूस जो उपाध्या होता

त्याजकडे धांवत घेऊन गेला; आणि तो उपाध्या तो हात घेऊन थडग्यांत पुरलेल्या "लाहा पेनू" कडे घेऊन गेला; हा लाहा पेनू त्यांचा रणदेव होता. दुसरी एक गोष्ट आपण अशी वाचितों कीं ताहितियन लोकांचा देव "ओरो" याला माणसांचे बळी वरचेवर देत असत, आणि त्यांच्या राखून ठेविलेल्या शिरांच्या भिंती बांधीत; हीं शिरें मुख्यत्वेंकरून शत्रूंचीं असत. ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, बहुधा देवांच्या आज्ञा पाळण्यासाठीं म्हणून मारिलेल्या शत्रूंच्या शरीरभागांनीं त्यांचें (देवांचें) संतर्पण करीत असत. लढाईत मिळविलेल्या इतर वस्तूंचा अशाच रीतीचा उपयोग करीत हें ध्यानांत आणतां वरील अनुमान बरोबर दिसतें. उदाहरणार्थ, फिलिस्टाइन लोकांनीं मृत सॉलच्या शरीरभागांचें प्रदर्शन करून शिवाय त्याचें चिलखत त्यांनीं आशतराथच्या घरांत नेऊन ठेविलें. ग्रीक लोक जित शत्रूपासून घेतलेल्या शस्त्रांचें, शिरस्त्राणांचें, आणि ढालींचें विजयचिन्ह कोणत्या तरी देवतेला अर्पण करीत असत; आणि रोमनलोक लढाईत मिळविलेली लूट ज्युपिटरच्या देवळांत नेऊन ठेवीत. ह्याचप्रमाणें फीजियन लोक लढाईत मिळालेलीं निशाणें आपल्या रक्ताभिलाषी देवाच्या देवळांत टांगून ठेवितात.

एथें आणखी एक सत्य सांगणें इष्ट दिसतें. तें हें कीं. विजयचिन्हें गोळा करण्याच्या चालीचा युद्धशीलतेशीं फार निकटसंबंध आहे. ज्या प्राथमिक स्थितींत माणसें आणि जनावरें यांशीं लढण्यांत माणसाचें आयुष्य खर्च होत असतें त्या स्थितींत ह्या चालीस सुरवात

होते; पुढें विजेते समाज वाढत जातील तशी हीहि चाल वृद्धिंगत होत जाते, कारण असल्या समाजांत लढाया सारख्या चालल्यानें युद्धशील घटना उत्पन्न होत असते; पुढें उद्यमशीलता वाढत जाऊन संहारक उद्योगांबद्दल उत्पादक उद्योगांची जशी वृद्धि होत जाईल तशी ती कमी होत जाते; आणि उद्यमशीलता पूर्ण होईल तेव्हां ती अर्थात् अगदींच बंद पडते.

विजयचिन्हें गोळा करण्याच्या चालीचें मुख्य महत्त्व अद्यापि सांगावयाचेंच राहिलें आहे. ह्या चालीस जरी विधिवर्गांत घालण्यास फारसें कारण दिसत नाहीं तरी तिचा एथें विचार केला आहे ह्याचें कारण हें कीं, तेणेंकरून पृथ्वीच्या सर्व भागांवर असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें सुरू असणाऱ्या अनेक विधींची उपपत्ति तिच्यावरून लागते. कारण मृत शरीराचे भाग कापून घेऊन जाण्याच्या चालीपासून जिवंत शरीराचे भाग कापण्याची चाल उत्पन्न होत असते.

प्रकरण तिसरें

अंगविकर्तनें

१५. ह्या ठिकाणीं ज्या गोष्टींचें व सिद्धांतांचें निरूपण करावयाचें आहे त्यांचा विचार अप्रत्यक्षरीत्या केल्यास त्यांचें स्पष्टीकरण सुलभरीत्या होणार आहे. म्हणून एथें त्या मार्गाचें अवलंबन करूं.

कुळाच्या स्वाधीन जमीन करण्याचा प्राचीन विधि स्काटलंदांत पुढील रीतीनें पुरा होत असे. " जमीनदाराचा वकील खालीं वांकत असे, आणि एक दगड व मूठभर माती उचलून नव्या कुळाच्या वकीलाच्या हवालीं करीत असे, आणि अशा रीतीनें तो त्याला त्या जमिनीचा खरा, प्रत्यक्ष व मूर्तिमंत ताबा देत असे. असाच प्रघात थोडयाशा सुधारलेल्या या देशांतील एका जातीमध्यें आढळतो. ती खोंड लोकांची जात होय. एकादा खोंड आपली शेतजमीन विकूं लागला म्हणजे आपल्या ग्रामदेवतेस साक्ष ठेवून त्या शेताची मूठभर माती ती विकत घेणाराच्या हातीं देतो. ही जमिनीच्या विक्रीची गोष्ट झाली; आतां राजकीय अंकितभाव दर्शविण्यासाठीं जमिनी स्वाधीन करतांना असाच प्रकार करीत असतात तिकडे नजर फेंकूं. क्लिआभीनीसच्या हल्लयानंतर स्पार्टन लोकांपासून स्वसंरक्षण करण्यासाठीं आथीनियन लोकांनीं जेव्हां मदत मागितली, तेव्हां त्यांस मदत करण्यापूर्वीं, ' तुम्ही आमचे अंकित आहां असें कबूल करा ' अशी त्यांच्यावर मागणी करण्यांत आली; तेव्हां त्यांनीं मातीचें ढिकूळ व पाणी पाठवून

आपला अंकितभाव व्यक्त केला. फीजीमध्येंहि अशा हेतूनें असेंच करितात. लढाईमध्यें ज्या पक्षाचा पराभव होईल तो आपण आपली जमीन तुमच्या स्वाधीन केली असें दाखविण्याकरितां दुसऱ्या पक्षाकडे एक टोपलीभर माती पाठवितो.

ज्या ठिकाणीं सगळीच्या सगळी वस्तु प्रत्यक्षरीत्या देतां येण्यासारखी नसेल तेथें तिचा एक भाग देण्याची जी ही चाल तो एक कृत्रिम विधि आहे असें कदाचित् कोणी म्हणेल. पण तसें मानण्याची जरूर नाहीं. कारण ह्याच्यापेक्षांहि सरळ असा एक दुसरा विधि आहे त्याच्यासारखाच हा दिसतो, व त्याच्यावरून ह्याचें व ह्याच्यावरून त्याचें स्पष्टीकरण होऊं शकतें. तो विधि सर्व शरीर स्वाधीन केलें असें दाखविण्यासाठीं त्याचा एक भाग स्वाधीन करणें हा होय. उदाहरणार्थ, फीजीमध्यें मांडलिक राजे मुख्य राजाकडे येऊं लागले म्हणजे त्याचा दूत त्यांस शेंडीसारखा जो त्यांच्या डोक्यावरील केंसांचा भाग तो कापून देण्यास सांगतो. कोणी म्हणेल हाहि विधि स्वाभाविकरीत्या उत्पन्न झालेला नसून कृत्रिमरीत्या उत्पन्न झालेला आहे. पण हें विवेचन आणखी एक पायरी मागें नेलें म्हणजे तो स्वाभाविक कसा आहे हें आपल्या लक्षांत येईल.

प्रथम, विजयचिन्हें बरींचशीं जमविण्यापासून जी मानमान्यता उत्पन्न होते तिचा विचार करूं. उदाहरणार्थ, शोशोन लोकांमध्यें जो सर्वांत कपाळाच्या कातडीसहित ज्यास्त शेंड्या मिळवील त्याची कीर्ति सर्वांत ज्यास्त होते. चिचिमेक लोक लढाईंत केलेल्या कैद्यां-

च्या कपाळाच्या कातडीसहित शेंड्या जिवंतपणींच सोलून काढीत, आणि तें रक्तबंबाळ विजयचिन्ह आपल्या डोक्यावर ठेवीत. तो शेंडी सोललेला कैदी जिवंत राहिल्यास तो सोलणाराचा गुलाम बनतो, आणि तो त्याचा गुलाम होय हें त्याच्या बिनशेंडीच्या डोक्यावरून दिसून येतें. अशा रीतीनें लढाईत धरलेल्या कैद्यांस मारून खाण्यापेक्षां त्यांस जिवंत ठेवून आपले नोकर बनविणें ज्यास्त फायद्याचें होईल अशा प्रकारची सामाजिक स्थिति झाली म्हणजे जी चाल स्थापन होते, तीस सुरुवात होते. रानटी माणूस पुराणप्रिय असल्यामुळें तो आपल्या वर्तनांत साधेल तितका कमी बदल करीत असतो. म्हणून कैद्यांस गुलाम करण्याचा प्रघात सुरू झाला तरी विजयचिन्हें म्हणून त्यांचे शरीरभाग कापण्याचा जुना प्रघात सुरूच राहतो; आणि त्याच्या ज्या खाणाखुणा त्याच्या अंगावर राहतील त्या त्याला जित केल्याच्या खुणा म्हणून कायम राहतात. हळूहळू अशा खुणा ज्याच्या अंगावर असतील तो गुलाम असें समजलें गेल्यामुळें तसल्या खुणा गुलाम म्हणून जन्मास आलेल्यांच्या, म्हणजे गुलामांच्या मुलांच्याहि, अंगावर करूं लागतात; अशा रीतीनें असल्या खुणा अंगावर असणें हें सामान्य अंकितपणाचें चिन्ह बनून जातें.

अंगविकर्तनास लोक कबूल व्हावयास लागले म्हणजे अखेरीस गुलाम बनण्याचा जो करार तो कायम करण्याची ती एक खूण बनूं लागते हें हीब्रूलोकांच्या इतिहासावरून दिसून येतें. उदाहरणार्थ, नाहाशनें जाबेशलोकांचे उजवे डोळे काढून त्यांस आपले गुलाम

करून घेतले असा लेख त्या इतिहासांत सांपडतो. म्हणजे काय, तर, ते त्याची प्रजा होण्यास कबूल झाले आणि हें अंगविकर्तन ते प्रजा किंवा अंकितजन बनल्याची खूण किंवा साक्ष म्हणून करण्यांत आली. आणि अशा रीतीनें धनगरानें आपल्या मेंढ्यांच्या अंगावर दिलेल्या डागांप्रमाणें हीं विकर्तनें प्रथम खासगी मालकी, आणि नंतर राजकीय मालकी, दर्शविण्याच्या कामीं जशीं उपयोगीं पडतात, तशीं तीं शास्त्याच्या सत्तेचीं कायमचीं स्मारकं किंवा आठवण देणारीं म्हणूनहि उपयोगीं पडतात; कारण, अशा रीतीनें, ज्या भीतीमुळें लोक राजाच्या आज्ञेंत राहतात ती त्यांच्या मनांत कायम राहते. ही गोष्ट पुढील हकीकतीवरून सिद्ध होते; ती ही कीं, दुसऱ्या बासिलानें जेव्हां पंधरा हजार कैद केलेल्या बल्गेरियन लोकांचे डोळे काढिले, तेव्हां ह्या भयंकर उदाहरणानें सर्व राष्ट्र भीतीनें अगदीं दरारून गेलें.

आतां येथें एवढेंच सांगूं कीं, ज्या विजयचिन्हग्रहणापासून ह्या अंगकर्तनास सुरुवात होते ती विजयचिन्हग्रहणाची चाल बंद झाली तरी अंकितभावाची खूण म्हणून तें अंगकर्तन कायमच राहतें. एवढें सांगून आतां अंगकर्तनाचे निरनिराळे प्रकार कोणते आहेत, आणि राजकीय, धार्मिक व सामाजिक ह्या तीन प्रकारच्या नियमनांत त्यांचा समावेश निरनिराळ्या मार्गांनीं कसा होतो, ह्याचा विचार करूं.

१६. जेव्हां ऑराकेनियन लोक लढाईस जावयाचें असतां आपल्याशीं संयुक्त असलेल्या टोळ्यांना बोलावण्याकरितां दूत पाठवितात तेव्हां ते दूत आपलें व-

कीलपत्र म्हणून कांहीं तीर बरोबर घेऊन जातात; आणि जर लढाई अगोदरच सुरू झालेली असेल तर त्या बाणांबरोबर मारलेल्या शत्रूचें एक बोट किंवा हात घेऊन जातात.

कांहीं ठिकाणीं अशा रीतीचें विजयचिन्ह घेतल्यानें निर्हस्त झालेले शत्रू समरांगणावरून जिवंत घरीं आणितात. परंतु हात कापिल्यानें गुलाम या दृष्टीनें त्याची किंमत फार कमी होत असल्यामुळें हाताखेरीज दुसरें कांहीं विजयचिन्ह बहुधा घेत असतात.

आतां बोटाची तशी गोष्ट नाहीं; म्हणून प्राचीनकाळीं जित शत्रूंचें एक बोट कापून त्यांस गुलाम म्हणून करून ठेवीत ह्याचा पुरावा बैबलावरूनहि सांपडतो. पुष्कळ ठिकाणीं जिवंत शास्ते, मृत शास्ते, आणि मृत आप्त ह्यांना प्रसन्न करण्याकरितां बोटें कापून देत असतात. ह्याचीं उदाहरणें फीजीयन लोकांमध्यें सांपडतात. त्यांच्यापैकीं एकानें दुसऱ्याचा अपमान केला; त्यास अनुलक्षून विल्यम्स् म्हणतो:—"ज्याचा अपमान झाला त्याच्या नायकानें अपमान करणाराच्या नायकाकडे ह्याबद्दलचें कारण काय तें कळवा असें सांगून एक दूत पाठविला; तें त्यानें लागलेंच कळविलें, आणि त्याबरोबर त्या रागावलेल्या नायकास तुष्ट करण्याकरितां चार असामींचीं बोटें पाठविलीं." तो आणखी म्हणतो:— "एक नाईक मेला; तेव्हां असा हुकूम सोडण्यांत आला कीं शंभर बोटें कापून काढावीं; पण साठच बोटें कापून काढिलीं, आणि त्यामुळें एक स्त्री मरण पावली." तो आणखी असें म्हणतो कीं, एका मुलाच्या हाताचें

बोट त्याच्या मृत बापाबद्दलच्या प्रेमाचें दर्शक म्हणून कापिलें, आणि त्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. बोटें किंवा बोटांचे तुकडे अर्पण करून मृतांचें संतर्पण करण्याची ही चाल इतरत्रहि दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, चारुआलोकांमध्यें कुटुंबांतील मुख्य मनुष्य वारला म्हणजे त्याच्या मुली, बायको आणि विवाहित बहिणी यांना आपापल्या बोटाचें एक एक पेर कापून द्यावें लागे; आणि अशा प्रकारचा दुसरा आप्त जेव्हां जेव्हां मरेल तेव्हां तेव्हां त्यांस असेंच करावें लागे; त्यास सुरवात करांगुळीपासून करीत. मण्डनलोकांमध्यें कोणी आप्त मेला म्हणजे दुःखप्रदर्शनार्थ करांगुळीचीं दोन पेरें कापीत, आणि कधीं कधीं दुसऱ्या बोटांचीं कापीत. डाकोटा व अन्य अनेक अमेरिकन जातींमध्यें अशीच चाल असे. ज्या अंकितपणाच्या प्रदर्शनानें मृत आप्त किंवा नाईक जिवंत असतां संतुष्ट झाला असता, तें अंकितपण दाखविण्यासाठीं हा बोटाचा बळी प्रथम देत असून, मागाहून त्या मृताच्या भुताचा बनलेला जो देव त्यास तो बळी कोठें कोठें दिलेला आढळून येऊं लागतो. उदाहरणार्थ, मण्डन लोकांमध्यें एकादा माणूस शिपाईगिरीचें काम प्रथम शिकूं लागला म्हणजे आपल्या डाव्या हाताची करांगुळी वर करून " मोठ्या महात्म्यास " ती अर्पण करण्याची आपली खुषी दर्शवितो, आणि नंतर वाळलेल्या रेड्याच्या कपाळाच्या करटीवर ती धरून लहानशा कुऱ्हाडीनें ती तोडितो. टांगामधील लोक कोणी वडील आप्त माणूस आजारी पडल्यास त्यास बरें वाटण्याकरितां देवांना आपल्या

करांगुळीचा एक लहानसा तुकडा कापून देतात. हें अंगकर्तन प्रथम मृत किंवा जिवंत प्रबल माणसांना आपला अंकितपणा व्यक्त करण्याकरितां होत असून मागाहून कोठें कोठें तें घरगुती अंकितपणा दर्शविण्याचेंहि चिन्ह बनूं लागतें. उदाहरणार्थ, आस्ट्रेलियन लोक आपल्या बायकांच्या करांगुळीचें शेवटचें पेर कापीत असतात; आणि हाटेंटॉटलोकांमध्यें विधवा स्त्री पुनः लग्न करूं लागली म्हणजे तिला हाताच्या एका बोटाचें पेर कापून द्यावें लागतें; आणि प्रत्येक नव्या नवऱ्याचे वेळीं तसेंच करावें लागतें.

हीं अंगकर्तनें माणसाचा उपयुक्तपणा होईल तितका अल्प कमी व्हावा अशा रीतीनें करितात हें यावरून दिसतें कीं, करांगुळीचें शेवटचें पेर प्रथम कापितात, आणि जरूर लागलीच तर हाताच्या दुसऱ्या भागांकडे जातात. आणि जेथें प्रारंभींच्या प्रघातास अनुसरून सगळा हातच कापितात तेथें तो अपराध्यास शिक्षा करण्यासाठीं म्हणून कापितात. उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें खोटे कागद करणाऱ्या वगैरे अपराध्यांचे दोन्ही हात तोडीत असत. जपानमध्यें राजकीय अपराध्याचे दोन्ही हात कापीत असत, आणि ती सर्वांत लाजिरवाणी शिक्षा म्हणून समजत. मध्ययुगीन यूरोपामध्यें अनेक प्रकारच्या अपराधांबद्दल हीच शिक्षा करीत असत.

१७. कांहीं ठिकाणीं विजयचिन्ह म्हणून जेते जितांचीं नाकें कापितात, आणि नाकें कापिलेलीं सर्वच माणसें मरत नाहींत. उदाहरणार्थ, मध्यअमेरिकेंत याप्रमाणें जित शत्रूंचीं नाकें कापून त्यांस गुलाम करीत.

आशान्टीमध्येंहि असेंच करीत असें राम्सेयर म्हणतो.

कोठें कोठें याच उद्देशानें आणि अपराधाबद्दल शिक्षा म्हणूनहि नाकाच्या ऐवजीं कान कापितात. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकोमध्यें जो कोणी खोटें बोलून दुसऱ्याचें नुकसान करील त्याचे कधीं कधीं ओंठ कापीत आणि कधीं कधीं कान कापीत. हॉंडुरासमधील लोकांमध्यें चोराची मालमत्ता जप्त करीत, आणि चोरी मोठीच असल्यास ते त्याचे कान व हात कापीत. त्यांच्या शेजारचे जे मिट्झेकलोक त्यांजमध्यें असा कायदा असे कीं जो जारकर्म करील त्याचे कान, नाक व ओंठ कापावे; आणि कांहीं झापोटेकलोक व्यभिचारी स्त्रियांचे कान व नाकें कापून टाकीत.

कांहीं ठिकाणीं दास्यत्व किंवा अंकितपणा दर्शविण्यासाठीं कानांस भोकें पाडितात, आणि कांहीं ठिकाणीं नाकांत एक कडी अडकवून देतात. उदाहरणार्थ, आसीरियनलोकांच्या चित्रांवरून त्यांच्यांत कैद केलेल्या लोकांच्या नाकांत वळीं घालून त्यांत दोऱ्या अडकवीत असें दिसतें. गोंडलोक अंकितपणा दर्शविण्यासाठीं हातांत कान धरून पुढें येतात.

१८. विजयचिन्हें म्हणून दाढा काढून घेतल्यास माणूस जिवंत राहूं शकत नाहीं; पण दांत काढून घेतल्यास तो जिवंत राहूं शकतो. म्हणून ती चाल कांहीं ठिकाणीं दिसून येते.

ठार केलेल्या शत्रूंचे दांत आशान्टीमध्यें व दक्षिण अमेरिकेंत लोक अंगावर घालितात हें अगोदर आपल्या लक्षांत आलेलेंच आहे. आतां गुलाम केलेल्या कैद्यांपा-

सून विजयचिन्हें म्हणून जर दांत काढून घेतात, तर उघडच दांत नसणें ही एक अंकितपणाची खूण बनून जाते. ह्यापासून पुढें एका संतर्पणविधीची उत्पत्ति होते ह्याबद्दल एक उदाहरण सांपडतें. तें सांडविच बेटवाल्यांचें होय. तेथें राजा किंवा नाईक मेला म्हणजे लोक पुढचा एकेक दांत पाडितात किंवा कान कापितात. मृत राजाचा विशेष दरारा असेल तर तो मेल्यानंतरची पिढीहि तसेंच करिते. अशा रीतीनें ह्या विधीस पवित्र चालीचें स्वरूप येतें. ही गोष्ट ह्यावरून दिसून येते कीं हा विधि वयाच्या अमक्या वर्षीं करावा आणि अमक्याच दर्जाच्या माणसानें करावा असें ठरून जातें. उदाहरणार्थ, न्यूसौथवेल्समध्यें हा विधि धर्मोपासक लोक करितात; आणि एक अर्धवट माणसाळलेला आस्ट्रेलियन हेगार्थ यास म्हणाला, "मी आतां मोठा झालों; मला दांत पाडून घ्यावयास एकदां गेलें पाहिजे." बाकोटा, डोर, वगैरे आफ्रिकन जातींमध्यें आपले दोन किंवा तीन दांत पाडून घेतात; आणि असें करणें त्यांस भागच असतें. पण याचा उत्तम पुरावा प्राचीन पेरूव्हियन लोकांमध्यें सांपडतो. त्यांच्यापैकीं कांहींकांमध्यें अशी दंतकथा असे कीं, "ह्याना कापाक" ह्या विजेत्यानें ते आज्ञाभंग करूं लागले हें पाहून असा कायदा केला कीं त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं खालचे व वरचे तीन तीन दांत पाडून टाकावे. यासंबंधानेंच त्यांच्यांत दुसरी एक दंतकथा अशी होती कीं, बापानें मुलाचे अशा रीतीनें दांत उपटल्यास तेणेंकरून देव फार संतुष्ट होतो. पुढें ही दंतकथा लोक विसरून गेल्यावर या-

संबंधानें अशी समजूत उत्पन्न झाली कीं, दांत पाडावयाचे ते तेणेंकरून तोंड सुरेख दिसावें म्हणून होय.

१९. जितशत्रू खाऊन टाकण्यापासून त्यांना गुलाम करून ठेवण्याकडे संक्रमण होऊन, जीव जाणार नाहीं अशा प्रकारचें विजयचिन्ह ग्रहण जसें सुरू होतें; आणि गुलामाची उपयुक्तता होईल तितकी अल्प कमी व्हावी अशा रीतीनें त्याला इजा करण्याची प्रवृत्ति जशी सुरू होते; आणि गुलामगिरींतच जन्मास आलेला वर्ग उत्पन्न होऊन, त्याच्या अंगावर केलेली खूण त्यास लढाईत जित केल्याचें जशी दाखवीत नाहींशी होते; तसें त्याला मोठेंच व्यंग उत्पन्न होईल अशा प्रकारची खूण त्याच्या अंगावर करण्याचें कारण नष्ट होत जातें. म्हणून सहजच पुढें पुढें कमी कमी अपायकारक अशीं अंगकर्तनें सुरू होऊं लागतात. केंस कापून टाकणें हें अंगकर्तन सर्वांत जें ज्यास्त सामान्य दिसतें त्याचें कारण हेंच होय.

ह्या केशकर्तनाचा उगम बहुधा काय असावा हें फीजीच्या उदाहरणांत अगोदर लक्षांत आलेलेंच आहे; तेथें मांडलिक राजे मोठ्या राजाच्या दर्शनास गेले म्हणजे केंसांचे झुपके त्यांस अर्पण करावे लागत असत. इंग्लंदांत प्राचीनकाळीं अशाच प्रकारची चाल असे असा पुरावा आढळतो. तेथें राजाकडे गेलें म्हणजे संस्थानिक आपल्या दाढ्या कापून त्यास समर्पण करीत.

गुलाम केलेल्या कैद्यांचे केंस काढून घेण्याची चाल मृतशत्रूची कपाळाच्या कातडीसहित शेंडी काढून घेण्याच्या चालीपासून बहुधा उत्पन्न झाली असावी असें

मानण्यास असें कारण दिसतें कीं, कांहीं ठिकाणीं संतर्पणार्थ काढून दिलेले केंस आणि कांहीं ठिकाणीं यजमानाचे म्हणून त्याच्या परवानगीनें राखून ठेविलेले केंस, हे शेंडीच्या ठिकाणचेच असतात. उदाहरणार्थ, फीजीयन लोक जे केंस देत ते शेंडीचेच असत. कालमक-मध्यें एकानें दुसऱ्याची शेंडी धरून ओढिल्यास त्याबद्दल शिक्षा होत असे, कारण शेंडी ही नायकाची असे, किंवा नायकास अंकितपणा दर्शविण्याची खूण असे. तेच पुढच्या कपाळावरील आंखूड केंस ओढिल्यास त्याबद्दल शिक्षा होत नसे, कारण ते केंस ज्याचे त्याचे मालकीचे म्हणून समजले जात. दुसऱ्या एका पुराव्यावरून असें दिसतें कीं, जित माणसास न मारतां जिवंत ठेविल्यास त्यास शेंडी राखण्यास मालकाची परवानगी घ्यावी लागे.

जिताचे केंस कातडीसहित किंवा कातडीविना घेण्याच्या ह्या चालीपासून बहुतेक सर्वत्र गुलामगिरी व आंखूड केंस यांमध्यें साहचर्य उत्पन्न झालेलें आहे. हें साहचर्य ग्रीक व रोमन ह्या दोन्ही लोकांत दिसत असे. कारण गुलामगिरीचें दर्शक म्हणून ते लोक गुलामांचे केंस कातरून आंखूड करीत असत. अमेरिकेंतहि सर्वत्र हीच चाल आढळून येते. उदाहरणार्थ, नूटका लोकांबद्दल ब्रॅक्रॉफ्ट असें म्हणतो कीं, तेथें समाजदृष्ट्या गुलामाचा तिटकारा करितात, आणि त्यांचे केंस कातरून आंखूड करितात; आणि क्यारिबलोकांविषयीं असें म्हणतो कीं, त्यांच्यांतील कैद्यांस व गुलामांस लांब केंस ठेवण्याची परवानगी कधींहि मिळत नसे. अपराधाबद्दल शिक्षा म्हणून गुलाम केल्यास त्यांसहि असेंच

वागवीत. उदाहरणार्थ, निकाराग्वामध्यें चोराचे केंस कातरीत असत, आणि ज्याची चोरी त्यानें केली असेल त्याचें नुकसान भरून येईपर्यंत त्यास त्याचा गुलाम होऊन रहावें लागे. पुढें सहजच गुलामगिरीची खूण एकाद्यावर लादणें ह्यालाच शिक्षेचें स्वरूप येऊं लागलें. उदाहरणार्थ, दक्षिणअमेरिकेंतील लोक कोणीं जारकर्म केल्याचा संशय आल्यास त्यास उघडा करून त्याचे केंस कातरीत. मेक्सिकनलोकांत केशकर्तन हा एक शिक्षेचा प्रकार असे; आणि मध्ययुगीन यूरोपांत हि असे. यावरून सहजच लांब केंस असणें हें एक मोठेपणाचें चिन्ह कांहीं लोकांत समजलें जाई. उदाहरणार्थ, टाँगन लोकांत लांब केंस असतील त्याची पदवी मोठी समजतात; आणि मुख्य मुख्य लोकांखेरीज इतरांस लांब केंस राखण्याची परवानगी नसते. न्यूक्यालिडोनियन आणि इतर बऱ्याच रानटी जातींमध्यें असेंच आहे. तुर्की राजपुत्र राज्यकर्त्या बादशहाचे अंकित आहेत हें दाखविण्याकरितां त्यांची दाढी अगदीं काढीत असतात. ग्रीक लोक मोठ्या वयांत लांब केंस ठेवीत, आणि लांब केंसांचें कांहीं राजकीय महत्त्वहि असे. उत्तरयुरोपांत देखील फ्रांकलोकांमध्यें दासलोक स्वतंत्र नागरिकांपेक्षां आंखूड केंस ठेवीत, आणि कमी काळजीनें विंचरीत; आणि सरदारांचे केंस केवळ नागरिकांच्याहि केंसाहूनहि लांब असत. तद्वतच त्यांच्या राजांचे केंस फार पवित्र समजत; आणि तो राजकुलाचा विशेष सन्माननीय हक्क मानिला जाई. क्लोथेर व शाइल्डबर्ट ह्यांनीं आपल्या भावाचें राज्य वांटून घेण्याचें मनांत आणिलें तेव्हां त्या

भावाच्या मुलांचे केंस कातरून त्यांची पदवी कमी करावी किंवा त्यांस ठारच मारावें, असा विचार ते एकमेकांशीं करते झाले. जपानी मिक्याडोबद्दल (बादशहाबद्दल) असें सांगतात कीं त्याचे केंस, दाढी किंवा नखें कधीं प्रसिद्धपणें कातरीत नाहींत; अशासाठीं कीं त्याच्या पवित्र देहाचें कर्तन होऊं नये; आणि जेव्हां कातरितात तेव्हां तो निजलेला आहे अशा समजुतीवर कातरितात.

माणसांमध्यें जें हें मोठेंपणाचें चिन्ह म्हणून समजलें जातें तें देवांमध्येंहि समजलें जातें. म्हणून पुष्कळ लोकांचे देव आणि विशेषत: मोठाले देव छातीवर लोळणाऱ्या दाढ्या व लांब लांब झुलपें ह्यांसंबंधानें प्रसिद्ध असतात.

आंखूड केंस हें पुष्कळ ठिकाणीं घरगुती अंकितपणाचेंहि चिन्ह समजलें जातें. हलक्या सामाजिकस्थितींत बायकांवर हें दास्यत्वाचें चिन्ह बहुतकरून लादिलेलें असतें. उदाहरणार्थ, सामोआमध्यें पुरुषांचे केंस लांब असून बायकांचे आंखूड असतात. हीच गोष्ट ताहितियन, न्यूझीलंदर इत्यादि इतर मलायोपालिनिशियन लोकांत दिसून येते. नीग्रीटो जातींचें असेंच आहे. न्यूक्यालिडोनियामध्यें नाईक आणि प्रतिष्ठित लोक लांब केंस ठेवितात; आणि बायका कातरून अगदीं आंखूड करितात. ताना, लिफू, व्हेट आणि तास्मोनिया एथील स्त्रियांत असेंच आहे. मुलांचा अंकितपणा अशाच रीतीनें दर्शविण्याची चाल आहे. एका काळीं यूरोपांत दत्तविधानाचे वेळीं मुलाचे केंस कातरून आंखूड करीत. उदाहरणार्थ, चार्लस मार्टेल यानें आपला

पुत्र मार्टिन यांस लॉंबर्ड लोकांचा राजा लूथप्रांड याजकडे पाठविलें; अशासाठीं कीं त्यानें त्याचीं पहिलीं झुलपें कातरावीं, आणि अशा रीतीनें त्याचा बाप बनावें; आणि क्लाव्हिसनें अलारिकशीं तह करण्याकरितां त्याला आपली दाढी कातरावयास देऊन त्याचा मुलगा होण्याचें कबूल केलें.

ह्या व्यंगीकरणापासून याबरोबरच मृतपुरुषांना अंकितभाव दर्शविण्याचा अर्थ निघूं लागला. प्रारंभीं, मृतास केंस अर्पण करणें हा विधि त्यास विजयचिन्ह अर्पण करण्यासारखें कसें असे, हें डाकोटांच्या उदाहरणावरून चांगलें दिसून येतें. त्यांच्यांतील पुरुष शेंडीच्या ठिकाणीं केंसांचा लहानसा झुपका ठेवून बाकीची हजामत करितात, आणि त्या केंसांची वेणी त्यांच्या पाठीवर नेहमीं लोळत असते; पण जवळचे आप्त वारल्यास त्यांस ती ते अर्पण करीत असतात. म्हणजे काय, तर, शेंडीसहित कातडी अर्पण करण्याच्या विधीचें ते होईल तितकें जवळ जवळ अनुकरण करितात. क्यारिब लोकांच्या पुढील वर्णनावरून तीच गोष्ट व्यक्त होते. " त्यांचे केंस त्यांस अशा रीतीनें फार अभिमानास्पद वाटत असल्यामुळें त्यांचा एकादा आप्त किंवा मित्र मेल्यावर त्याच्या गुलामांप्रमाणें किंवा कैद्यांप्रमाणें जेव्हां ते ते कातरून टाकीत तेव्हां त्यांस खरोखर दुःख झाल्याचें निःसंशयरीतीनें दिसून येई. सर्वत्र असुधारलेल्यांमध्यें अशा प्रकारचे प्रघात दिसून येतात. प्राचीन ऐतिहासिक (ज्यांचा इतिहास उपलब्ध आहे अशा) जातींमध्येंहि असेंच असे. उदाहरणार्थ, हीब्रूलोक प्रे-

तत्विधि म्हणून कपाळावरचे केंस काढीत आणि दाढीचा एक भाग तासटून टाकीत. ग्रीक व रोमन लोकांत कोणी जवळचें मेलें म्हणजे केंस कातरून काढीत; आणि हा विधि स्त्रिया व पुरुष दोन्ही करीत. शिवाय त्यांच्यांत असा विशेष असे कीं, निधन नुक्तेंच झालेलें असलें म्हणजे ते सगळें डोकें तासटीत, व त्यास बरेच दिवस झालेले असले म्हणजे एकच झुलूप काढून टाकीत.

आतां, मृतांपैकीं कांहीं देव बनत असल्यामुळें त्यांच्या संतर्पणापासून धार्मिक संतर्पणाची उत्पत्ति होते हें जर खरें आहे,तर,केशसमर्पण हा विधि धार्मिक विधि म्हणून पुन: दृष्टीस पडणें हें स्वाभाविकच आहे; आणि तसा तो दृष्टीस पडतोहि. उदाहरणार्थ, ग्रीक व रोमनलोकांत मुलाचे केंस प्रथम तासटले म्हणजे ते कोणत्या तरी देवाला अर्पण करीत असत, आणि ग्रीक लोकांत बहुधा जलदेवतेला अर्पण करीत. हीब्रूलोकांतहि केशसमर्पण हा एक पूजनविधि समजला जाई. आपण असें वाचितों कीं, "ऐंशीजण आपल्या दाढ्या तासटून टाकून आणि कपडे फाडून, हातांत धूप व बळी घेऊन देवाच्या देवळांत येते झाले." अरबलोकांबद्दल कैरल अशाच गोष्टी सांगतो. प्राचीन पेरूमध्यें या प्रघातांत कांहीं चमत्कारिक फेरबदल झाले होते. थोडथोडे केंस ते वरचेवर अर्पण करीत असत. शिवाय ते पापण्या व भिवया यांचे केंस काढून सूर्य, डोंगर व वारे यांस अर्पण करीत. देवळांत गेले म्हणजे ते भिवयांकडे हात नेत, आणि त्यांतील केंस काढल्यासारखें करून ते देवाकडे फेंकल्यासारखें करीत. ह्यावरून विधीस

संक्षिप्त स्वरूप कसें येऊं लागतें हें स्पष्ट दिसतें.

आणखी एक गोष्ट यापासून उत्पन्न होते. ती ही कीं, ह्या समर्पणास कोठें कोठें सामाजिक संतर्पणाचें स्वरूप येतें. उदाहरणार्थ, ताहितियनलोक आपल्याच केसांच्या वेण्या करून सन्मानार्थ इतरांस अर्पण करीत असत. फ्रान्सांत पांचव्या व सहाव्या शतकांत आपल्याहून श्रेष्ठ माणसाकडे जातांना दाढीचे थोडेसे केंस काढून त्यास नजर करण्याची चाल असे. कधीं कधीं ही गोष्ट श्रेष्ठ लोक कनिष्ठावर मेहरनजर दाखविण्याकरितां करीत. उदाहरणार्थ, टुलूसचा बिशप भेटावयास आला म्हणून खुष होऊन क्लॉव्हिस राजानें आपला दाढीचा एक केंस काढून त्यास दिला, व त्याच्या दरबाऱ्यांनींहि तसेंच केलें. पुढें या विधीस संक्षिप्तस्वरूप प्राप्त होऊन त्याचा अर्थ कोणास कळेनासा झाला. शिव्हल्रीच्या किंवा शूर व उदार सरदारीच्या अमदानींत मिशी ओढणें हा एक बहुमान देण्याचा मार्ग असे.

२०. विजयचिन्हांचा विचार करतांना, शिश्नवर्गीय चिन्हें घेण्यांत इतर चिन्हें गोळा करण्यांत जो हेतु असे तोच असे असें आपल्या ध्यानांत आलेलें असल्यामुळें प्रस्तुत कलमांत ज्या कर्तनांचा विचार आह्मी करणार आहों त्यांची प्रस्तावना अगोदर झालेलीच आहे. शिवाय आपल्या नजरेस असें आलेलें आहे कीं, जितशत्रूंस ठार न करतां जेव्हां गुलाम करूं लागले तेव्हां त्यांच्या जीवितास धक्का न लागेल किंवा त्यांस फारशी मोठी इजा होणार नाहीं, अशा रीतीनें त्यांजपासून वि-

जयचिन्हें घेऊं लागले; म्हणजे, जबड्यांबद्दल दांत, हातांबद्दल बोटें, आणि शेंडीसहित कपाळाच्या कातडें ऐवजीं कपाळावरील केंस घेऊं लागले. त्याचप्रमाणें शिश्नवर्गीय विजयचिन्हहि शत्रूची नोकर या दृष्टीनें किंमत फारशी किंवा मुळींच कमी होणार नाहीं अशा रीतीनें घेऊं लागले.

आतां माणसाची खच्ची करणें ही चाल विजयचिन्हग्रहणाच्या चालीपासून उत्पन्न झाल्याबद्दल प्रत्यक्ष पुरावा मिळत नाहीं; पण लढाईत केलेल्या कैद्यांस कधीं कधीं अशा रीतीनें वागवितात ह्याबद्दल प्रत्यक्ष पुरावा आढळतो. उदाहरणार्थ, प्राचीन पर्श्यनलोक आपल्या जित शत्रूंच्या मुलांची खच्ची करीत असत. स्पोलीटोचा मार्किस थिओबॉल्ड याजबद्दल आपण असें वाचितों कीं त्याच्या कैद्यांची निर्दयपणानें खच्ची केली. आतां अशा प्रकारचें बलिसमर्पण विजेत्याप्रत करणें भाग पडत असें मानण्यास आणखी एक असें कारण आहे कीं, अशाच प्रकारचा बलि एकादे वेळेस दिलेला आपल्यास आढळून येतो. उदाहरणार्थ, फिजियन लोकांच्या आम्मा नांवाच्या देवतेच्या वार्षिक उत्सवाच्यावेळीं पुष्कळ तरुण एका तीक्ष्ण शस्त्रानें आपल्यास नपुंसक करून घेत असत, आणि “ देवते, हें घे, ” असें मोठ्यानें ओरडत असत. फिनीश्यन लोकांमध्यें असलाच प्रघात असे. कांहीं ठिकाणीं इतर विधिविषयक प्रघातांप्रमाणें हा प्रघातहि त्याचा अर्थ समजत नाहींसा झाल्यावरहि कायम राहिलेला आढळून येतो. उदाहरणार्थ, हाटेंटाट लोक आठव्या किंवा नवव्या वर्षीं मुलांची जबरीनें खच्ची करितात; आणि आ-

स्ट्रेलियन लोकांमध्येंहि असलाच प्रकार आढळून येतो.

आतां साहजिकच असल्या अंगकर्तनांपैकीं कमी अपायकारक असेल तें ज्यास्त लोकांमध्यें आढळून येतें. उदाहरणार्थ, सुंता जगाच्या पुष्कळ भागांत परस्परभिन्न अशा जातींमध्यें आढळून येते; उदाहरणार्थ, ताहिती, टाँगा, मादागास्कार ह्यांमधील मलायोपालिनिश्यनलोकांमध्यें, न्यूक्यालिडोनिया आणि फीजी यांमधील निग्रीटोलोकांमध्यें, उत्तरेकडील आबिसिनियनलोकांपासून तों दक्षिणेकडील काफरलोकांपर्यंत सर्व किनाऱ्यावरील व आंतील आफ्रिकनलोकांमध्यें; अमेरिकेंतील मेक्सिकन, यूकाटानीस, आणि सान्साल्व्हाडोरियनलोकांमध्यें; आणि आस्ट्रेलियामध्यें; इजिप्शनलोकांमध्यें हा प्रघात फार प्राचीनकाळापासून होता. हें त्यांच्या मनोऱ्यांवरून सिद्ध होतें; आणि आरबलोकांमध्येंहि तो सर्वत्र असल्याचें आढळून येतें.

पूर्वीं आपण असें दाखविलें आहे कीं, आबिसिनियन लोकांमध्यें शत्रूच्या मृतशरीरापासून सुंता करून घेतलेलें विजयचिन्ह प्रत्येक शिपाई आपल्या नायकास आणून देत असतो; आणि अशा प्रकारें मिळविलेलीं सर्व विजयचिन्हें शेवटीं राजास नजर करीत असतात. आतां जित शत्रूंस मारण्याच्या ऐवजीं जर गुलाम बनविलें, आणि आपल्या शौर्याचे नेहमींचे पुरावे नजर करण्याची शिपायांची चाल जर कायम राहिली, तर त्या जिवंत कैद्यांची सुंता करण्याचा प्रघात उत्पन्न झालाच पाहिजे; कारण तेणेंकरून ते लोक जित म्हणून ओळखले जाऊं लागतात. यापासून आणखी एक गोष्ट सहजच उत्पन्न

होते. ती ही कीं, शत्रूंपासून घेतलेल्या ह्या विजयाचिन्हांच्या समर्पणानें नाईक व राजे ज्याअर्थीं संतुष्ट होत असतात, आणि माणसास जिवंतपणीं जें आवडत असेल तें तो मेल्यावर त्याच्या भुतास आवडतें अशी ज्याअर्थीं रानटी माणसाची समजूत असते, त्याअर्थीं सहजच असलीं विजयचिन्हें मृतशास्त्याच्या भुतास समर्पण करण्याची चाल उत्पन्न होते. आतां, फार युद्धशील अशा समाजांत देवकुलोत्पन्न राजा ही दास्यत्वाची खूण सर्वांनींच धारण केली पाहिजे असें म्हणत असेल, तर दासकृत शत्रूंपासून घेतलेलीं हीं विजयाचिन्हें त्यास समर्पण करण्याच्या चालीपासून, सर्व पुरुषांनींच आपण देवदास आहों असें दर्शविण्याकरितां ह्या चिन्हाचें देवास समर्पण करण्याची चाल उत्पन्न होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, फिनीश्यनलोकांमध्यें शनीला संतुष्ट करण्यासाठीं सुंता करीत असत; आणि सान्साल्व्हेडॉरमधील लोक सुंता करून तें रक्त एका मूर्तीस वहात असत.

हीब्रूलोकांतहि सुंता करण्याची जी चाल होती तिचा अर्थ असाच असे ह्याबद्दल पुष्कळ पुरावा सांपडतो.

बरें, ह्याच्या उलट कांहीं गोष्टी दृष्टीस पडतात त्याहि ह्याच्याशीं सुसंगतच आहेत. टोंगालोकांचा मोठा दैविक नाईक जो टुइटोंगा त्याची इतरांप्रमाणें सुंता करीत नाहींत; कारण तो कोणासहि वश नसल्यामुळें वशतेचें हें चिन्ह धारण करीत नाहीं. तद्वतच, ज्या जातींत सुंता करण्याची सामान्य चाल आहे त्यांच्यांतील देखील कांहीं टोळ्या स्वतंत्र असल्यामुळें सुंता करीत नाहींत. उदाहरणार्थ, मोरोक्कोमधील कांहीं रानटी बर्बेरलोक

रिफ डोंगरांत स्वतंत्ररीत्या रहात असून ते सुंता करीत नाहींत, आणि कुराणांतील आज्ञांस न जुमानतां रानडुकराचें मांस खातात.

२१. मांस, हाड, कातडी, किंवा केंस हीं काढून घेतलीं जावीं अशा रीतीच्या ह्या अंगकर्तनांशिवाय, दुसरीं कांहीं अंगकर्तनें अशीं आहेत कीं त्यांपासून कायमची तरी हानि होत नाहीं. ह्याचें पहिलें उदाहरण म्हटलें म्हणजे शरीराच्या घनभागाचें अर्पण न करतां द्रवभागाचें, म्हणजे रक्ताचें, अर्पण करावयाचें हें होय.

ह्या अंगकर्तनाचें मूळकारण इतर अंगकर्तनांच्या कारणासारखेंच आहे. सामाइडिससारखे कांहीं रानटी लोक प्राण्यांचें गरम गरम रक्त पितात; तद्वतच फिजियनलोकांसारखे कांहीं नरभक्षक लोक जिवंत माणसांचेंच रक्त पितात. ह्यावरून जितशत्रूचें रक्त काढून घेण्याच्या चालीपासून भुतांस व देवांस रक्तसमर्पण करण्याची चाल कशी उत्पन्न झाली असेल हें लक्षांत येतें. शिवाय आपण असें वाचितों कीं आमापोंडामधील काफरलोकांत नवा नाईक गादीवर बसतेसमयीं एका जवळच्या आप्तास आणि बहुधा भावास मारून त्याच्या रक्तानें न्हात असतो. असल्या गोष्टी वाचतां विजेत्या नरभक्षक रानटयांच्या शत्रूंचें रक्त पिण्याच्या चालीपासून देवांस रक्ताचें समर्पण करण्याची चाल उत्पन्न झाली असावी असा सहजच संशय येतो. दुसरी एक गोष्ट ह्यासंबंधानें ध्यानांत धरावयाची ती ही कीं, कांहीं रानटी लोकांत एकमेकांच्या रक्ताचें सेवन करून कांहीं पवित्र नातें स्थापन करण्याची चाल दृष्टीस पड-

ते; ह्यावरून मृत माणसाच्या भुतास आपलें रक्त अर्पण केल्यानें त्याच्याशीं आपला संबंध उत्पन्न होऊन त्यास आपला अंकितपणा व स्नेहभाव दोन्ही दाखविल्यासारखीं होतील अशी कल्पना रानट्याच्या मनांत उत्पन्न होण्याचा संभव आहे हें ध्यानांत येतें.

प्रेतविधि म्हणून स्वतःचें रक्त अर्पण करण्याची चाल हल्लींच्या रानटी लोकांतच केवळ नव्हे, तर ज्यू, ग्रीक, हूण व टर्क असल्या प्राचीन व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें जी दृष्टीस पडते तिचें कारण लक्षांत येतें. तद्वतच जीं ज्यास्त भीति उत्पन्न करणारीं भुतें देव बनतात त्यांचीं नेहमींचीं संतर्पणें कशीं उत्पन्न होतात ह्याचेंहि कारण लक्षांत येतें. उदाहरणार्थ, मेक्सिकन लोक आपल्या देवांस कधीं आपलें व कधीं आपल्या अर्भकांचें रक्त अर्पण करीत; बॉल देवाचे भक्त त्यास संतुष्ट करण्यासाठीं आपणास जखमा करून घेत; आणि ज्यूलोकहि असेंच कधीं कधीं करीत. शिवाय, सामाजिक दळणवळणामध्यें दुसऱ्यास मोठेपणा देण्याकरित अंगांतील रक्त काढण्याच्या चालीचेंहि यावरून स्पष्टीकरण होतें. सामोअनलोकांत विवाहविधीच्या समयीं वधूचे मित्र आपली सन्मानबुद्धि दर्शविण्याकरितां दगड घेऊन डोकीं फुटून रक्त येईपर्यंत हाणून घेत असत. दक्षिणअमेरिकेंतील पोटान्चान्मधील इंदियनलोक जेव्हां आपल्या मित्रांचें स्वागत करितात, तेव्हां स्नेहप्रदर्शनार्थ आपल्या जिभेचें, हाताचें, दंडाचें, किंवा दुसऱ्या एकाद्या शरीरभागाचें रक्त काढितात. आणि न्यूसौथमधील एजंट जनरल असें लिहितो कीं आस्ट्रेलियन

जातीच्या एका आईला तिचा मुलगा जेव्हां सहा महिन्यांनीं भेटला, तेव्हां तिनें एका काठीच्या टोंकानें आपल्या तोंडाचें रक्त काढिल्याचें आपण स्वतः पाहिलें आहे.

२२. अंगास छेद केल्यास त्याची खूण कायम राहते. आतां असें छेद करून काढिलेलें रक्त सामान्य माणसाच्या भुतास त्याच्या आप्तांनीं अर्पण केल्यास त्यापासून अंकितपणा व्यक्त होईलच असें नाहीं. पण तें मृतनायकाच्या संतर्पणार्थ त्याच्या आप्तांनींच केवळ नव्हे तर त्यास भिणाऱ्यां त्याच्या टोळींतील इतर लोकांनीं तें अर्पण केल्यास इतर अंगकर्तनांप्रमाणें हेंहि अंकितपणाचें एक दर्शक होतें. उदाहरणार्थ, हूणलोक व टर्कलोक राजाच्या प्रेतविधीच्या समयीं आपल्या तोंडावर घाव घालून घेत असत, आणि तेणेंकरून ते त्यांचे नोकर म्हणून कायमपणाचे ओळखले जात असत. त्याप्रमाणेंच लासिडिमोनियन लोकहि त्यांचा राजा मेला म्हणजे बायकांमुलां व गुलामांसहित सर्व एकत्र जमत असत, आणि मृताच्या भुतास संतुष्ट करण्याकरितां आपल्या कपाळाचें मांस सुयांनीं व टांचण्यांनीं भोंसकून काढीत असत. असल्या चालींपासून दुसऱ्याहि कांहीं चाली उत्पन्न होतात. म्हणजे, असल्या खुणा मृत राजाचे समकालीनच लोक स्वतः करून घेतात असें नाहीं, तर आपल्या मुलांसहि करावयास लावितात; आणि अशा रीतीनें त्या राष्ट्रीय खुणा बनून जातात.

प्रेतविधीच्या समयीं अंगांतून रक्त काढिल्यानें शरीरावर कायम राहिलेल्या खुणांनीं त्या खुणा असलेले लोक मृताचे बंदे बनतात असें समजलें जातें याबद्दल

चांगला पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, लेव्हिटिकस नामक बैबलच्या भागामध्यें अशी आज्ञा आहे कीं, "मृतासाठीं आपल्या अंगावर तुम्हीं घाव करून घेऊं नये, किंवा कांहीं मुद्रा घेऊं नये." यावरून त्यावेळीं रक्तसमर्पण केल्यानें राहिलेला व्रण कांहींअंशीं कौटुंबिक अंकितपणा आणि कांहीं अंशीं अन्यप्रकारचा अंकितपणा यांचा व्यंजक होता असें दिसतें. आणि स्कांडिनेव्हियनलोकांच्या दंतकथांवरून हे व्रण ते कोणत्या तरी देवाकरितां किंवा देव बनलेल्या मृतशास्त्याकरितां करून घेत असत असें दिसतें. उदाहरणार्थ, त्यांचा राजा ओडिन जेव्हां मरावयास टेंकला तेव्हां त्यानें भाल्याच्या टोंकानें आपणास जखम करून घेतली; आणि नायार्ट यानें मरणाच्या समयीं ओडिनसाठीं तसेंच करून घेतलें.

गोंदून घेण्याची चाल ह्यापासूनच उत्पन्न होत असावी असें दिसतें. ह्याचे निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे प्रकार आढळतात. आंडामन बेटवाले लोक कातडी चिरून घेतात, पण आंत कांहीं रंग घालीत नाहींत; कारण मानेची कातडी इतर कातडीपेक्षां पांढरी असल्यामुळें आपोआपच तिच्याहून निराळी दिसते. आस्ट्रेलियामधील कांहीं लोक अंगाच्या कांहीं भागांवर उंच कडा उत्पन्न करितात, आणि कांहींजण आपल्यास डागून घेतात. टानामध्यें लोक आपल्या बाहूंवर व छात्यांवर वर आलेले व्रण करून घेतात. बर्टन म्हणतो कीं, आपणास आफ्रिकनलोकांमध्यें अगदीं बारीक गोंदण्यापासून तों मोठाले घाव आणि फोडांसारखे गोळे

उत्पन्न करून घेण्यापर्यंत गोंदण्याचे निरनिराळे प्रकार दिसून आले. सारांश, यूरोपियन लोकांत प्रत्येक कुटुंबांतील सरदारी पट्ट्यावरील रेघा व आकृती जशा निरनिराळ्या असतात, तशा ह्या लोकांत प्रत्येक टोळीच्या व पोटटोळीच्या गोंदण्याच्या पद्धती निरनिराळ्या दिसतात. ह्यावरून ह्या गोंदण्याच्याच चालीपासून ह्या सरदारी पट्ट्यांची चाल उत्पन्न झाली असावी असें दिसतें.

पण ह्याबद्दल नुसते तर्क करीत बसावयास नको; कारण त्याबद्दल प्रत्यक्ष पुरावाच सांपडतो. उदाहरणार्थ, मध्यअमेरिकेंतील स्यूबालोकांमध्यें एकाद्या नायकाच्या मुलास आपल्या घराण्याची खूण जर नको असली तर त्यास पाहिजे तें नवें चिन्ह धारण करतां येतें; पण असें करणें त्याच्या बापास आवडत नाहीं. आतां हें केवळ अंग रंगवण्यासंबंधानें झालें; म्हणून जेथें ही खूण अंगास व्रण पाडून करून घेत असतील, तेथें तिचा अर्थ त्या जातीचा जो कोणी मोठा मूळपुरुष त्याच्याकडून आपली उत्पत्ति झाली, किंवा त्याला आपण अंकित आहों, असें दाखविण्याचा असल्यामुळें ती न करून घेणें म्हणजे राजद्रोहच करणें होय असें अर्थात् समजलें जाईल. म्हणून पुढच्यासारखीं वर्णनें वाचण्यांत येतात. " हे सर्व इंदियनलोक (म्हणजे, प्राचीन पेरूंतील लोक) कांहीं खुणा अंगावर करून घेतात आणि त्यावरून ते ओळखले जातात; त्या त्यांचे पूर्वजहि करून घेत असत." " सांडविचबेटांमध्यें पुरुष व स्त्रिया दोन्ही एकप्रकारचें गोंदून घेतात; आणि त्यावरून त्यांचा प्रांत किंवा नाईक हीं ओळखलीं जातात."

आतां गोंदण्याचा एक विशिष्ट प्रकार वर सांगितल्याप्रमाणें जातीची खूण बनतो ह्याबद्दल कांहीं प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, सांडविचबेटवाल्यांमध्यें नाझिक मेला म्हणजे जे प्रेतविधि करितात त्यांमध्यें दांत पाडणें, कान कापून घेणें, या विधींबरोबरच जिभेवर थोडेंसें गोंदून घेणें हा एक विधि होत असतो. ह्या ठिकाणीं हें अंगकर्तन मृतशास्त्याबद्दल निष्ठादर्शक चिन्ह बनलेलें आढळून येतें; आणि जेथें मृतशास्ता विशेषच प्रख्यात असल्यामुळें देव बनतो, त्या ठिकाणीं हें गोंदणें तो देव या दृष्टीनें त्याचें आज्ञाधारकत्व दर्शविण्याचें चिन्ह बनतें. उदाहरणार्थ, ग्रिम म्हणतो कीं, कित्येक प्राचीन लोकांमध्यें अमक्या देवाचा भक्त असें दाखविण्यासाठीं लोक कांहीं विशिष्टठिकाणीं भाजून घेतात किंवा चिरून घेतात. हीब्रूलोकांमध्यें असेंच असे. हल्लीं देखील सर्व पंथांच्या आरबलोकांमध्यें हातांवर व बाहूंवर ह्या धार्मिक खुणा करून घेण्याची चाल बहुतेक सार्वत्रिक आहे. शिवाय, कांहीं ख्रिस्तीलोक व विशेषतः नाखवेलोक आपल्या बाहूंवर व शरीराच्या इतर भागांवर क्रूस किंवा मेरी हीं गोंदून घेतात; आणि मुसलमानलोक अल्लाचें नांव गोंदून घेतात. प्राचीन मेक्सिकोमध्यें जेव्हां मूल देवास अर्पण करीत तेव्हां त्याच्या छातीवर सुरीनें थोडासा छेद करीत. हल्लींहि अंगोलाच्या कांहीं भागांमध्यें मूल जन्मास आल्याबरोबर त्याच्या पोटावर तें एका वस्तुदेवास अर्पण करण्याकरितां गोंदून टाकितात.

आणखी एक प्रकारचा अर्थप्रचुर पुरावा अद्यापि सां-

गणें आहे. आपण हें अगोदर पाहिलेंच आहे कीं, जेथें आंखूड केंस हे दास्याचे दर्शक असतील तेथें लांब केंस हे सन्मानदर्शक असतात; आणि तद्वतच सुंता ही अंकितभावदर्शक असून, तिचा अभाव हा श्रेष्ठत्वदर्शक असतो. अशाच प्रकारचा विरोधभाव ह्या ठिकाणींहि दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, टांगनलोकांचा मोठा दैविक नाईक, इतर सर्व टांगनलोकांच्या उलट, सुंता करून जसा घेत नाहीं, तसा गोंदूनहि घेत नाहीं. इतरत्र कांहीं ठिकाणीं सगळे वर्गच्या वर्ग गोंदल्याशिवाय राहतात. पण असले हे भेद सर्वत्र सारखे दिसत नाहींत; कांहीं ठिकाणीं उलट प्रकार दिसून येतो. उदाहरणार्थ, गोंदून घेणें हें कांहीं ठिकाणीं जरी कनिष्ठपणाचें दर्शक आहे, तरी कांहीं ठिकाणीं श्रेष्ठपणाचें दर्शक आहे. पण असले उलटसुलट प्रकार असणें ह्यांत कांहीं आश्चर्यकारक नाहीं. कारण जातीजातींच्या लढायांत एकाद्या गोंदून घेणाऱ्या जातीनें गोंदून न घेणाऱ्या जातीस जिंकलें असतां, गोंदून घेणें ही गोष्ट सामाजिकश्रेष्ठत्वाची दर्शक सहज बनणार आहे.

ह्या उलटसुलट समजुतींचें आणखी एक कारण आहे. ह्याहून अन्यकारणानें उत्पन्न झालेल्या व अन्यअर्थीय त्वचाकर्तनाच्या प्रकाराचें कथन अद्यापि करावयाचें आहे तें आतां करूं.

२३. मृत आप्त, मृत नाईक, आणि देव, त्यांचें संतर्पण करण्यासाठीं करून घेतलेल्या जखमांपासून उत्पन्न होणाऱ्या खुणांखेरीज, लढाईत झालेल्या जखमांपासूनहि खाणाखुणा उत्पन्न होत असतात. जगामध्यें सर्वत्र ह्यां-

जबद्दल इतर लोकांस मोठा पूज्यभाव वाटतो, आणि त्या माणसास मोठा गर्व वाटतो. ही गोष्ट सुधारलेल्या लोकांमध्येंहि दिसून येते.

आतां हे मनोविकार सुधारलेल्यांपेक्षां रानट्यांमध्यें ज्यास्तच प्रमाणावर असल्यामुळें, त्यापासून सहजगत्या काय होण्याचा संभव आहे बरें? लोकांकडून मान मिळावा म्हणून कधीं कधीं मुद्दाम असल्या खुणा करून घ्याव्यासें वाटणार नाहीं काय? सहजच वाटेल; आणि तसें वाटतें याबद्दल पुरावाहि सांपडतो. उदाहरणार्थ, बेचुआनामधील लोकांमध्यें ज्या ज्या योद्ध्यानें एकाद्यास लढाईत ठार केलें असेल त्याच्या त्याच्या अंगावर त्यांचा उपाध्या मांडीपासून गुडघ्यापर्यंत एक लांबच्या लांब छेद करितो. बाचापिनमधील काफिरलोकांमध्यें असलाच प्रकार आहे. डमारालोकांमध्यें एखाद्या तरुणानें एकादें रानटी जनावर मारिलें कीं त्याचा बाप त्याच्याबद्दल त्याच्या अंगाच्या पुढच्या भागावर सन्मानदर्शक चार लहानसे छेद करितो. आणि कांगोमधील कांहीं लोक असेच छेद करून घेतात; त्यांजबद्दल टकी असें म्हणतो कीं, त्या लोकांचा असें करण्यांत मुख्य हेतु बायकांस आपण सुरेख दिसावें हा असतो. ह्यावरून असले छेद प्रथम लढाईत मिळत असून ते शौर्याचे व्यंजक असत हें उघडच आहे. शिवाय आपण असें वाचितों कीं, यूकाटनमधील कांहीं लोक सुरेख असतात; तथापि कांहींजणांनीं आपण शूर आहों असें दाखविण्याकरितां आपल्या तोंडावर कांहीं चरे पाडून घेतलेले दिसतात.

दुसऱ्या कांहीं अमेरिकन जातींच्या इतिहासावरून पा-

हतां असें दिसतें कीं, माणूस वयांत आल्यावर इजा करून घेण्याचा जो प्रघात उत्पन्न होतो त्यास मूळ कारण लढाईंतल्यासारखे छेद कृत्रिमरीत्या करून घेणें हें होय. लढाईस जाण्याचा प्रसंग टाळण्यासाठीं स्वतःस अधू करून घेण्याची चाल भित्र्या लोकांत जर वरचेवर दृष्टीस पडते, तर ज्या शूर लोकांस जखमा झाल्या नसतील त्यांच्यामध्यें मान मिळविण्यासाठीं कृत्रिमरीत्या जखमा करून घेण्याची चाल दृष्टीस पडावी ह्यांत नवल नाहीं. प्रथम ही गोष्ट गुप्तरीत्या थोडके लोक करीत असून मागून ती पुष्कळ लोक प्रसिद्धरीत्या करूं लागले असतील; आणि शेवटीं तसें करून घेणें ही गोष्ट सर्वलोकसंमत ठरून ती करणें भागच पडूं लागलें असेल. आणि आबिपोनलोकांमध्यें सात सात वर्षांचे मुलगे आपल्या बापांप्रमाणें आपल्या कोंवळ्या बाहूंस जखमा पाडून घेतात असें जेव्हां आपण वाचितों, तेव्हां या मनोवृत्तीवरून मोठ्या वयांत आपणास जखमा करून घेण्याचा प्रघात रानटी लोकांत कसा सुरू होत असेल हें सहज लक्षांत येतें. आतां हे छेद सर्वत्र करून घेऊं लागले म्हणजे अर्थात् त्यावरून मोठेपणा व्यक्त होत नाहींसा होतो, आणि मग सोशिकपणाची संवय लावण्याकरितां ते करून घ्यावयाचे असें म्हणूं लागतात; तथापि हें मूळकारण असूं शकणार नाहीं. रानटी माणसें सर्व तऱ्हांनीं अदूरदर्शी असल्यामुळें पुढील फायदा लक्षांत आणून एकादी रूढी त्यांनीं मुद्दाम स्थापिली असें कधीं होत नाहीं. सारांश, ते कायदे करीत नाहींत, तर सहजगत्या रूढींत पडतात.

एवंच, त्वचेवरील खुणा जरी सामान्यतः अंकितभावव्यंजक असतात तरी कांहीं ठिकाणीं त्या सन्मानदर्शक व कधीं कधीं पदवीदर्शक कशा बनतात ह्याचें ह्यावरून आणखी स्पष्टीकरण होतें.

२४. विजयचिन्हें घेण्याचा जसा दुय्यम हेतु आहे तसा कैदी व गुलाम ह्यांस छिन्नभिन्न करण्याचाहि एक दुय्यम हेतु आहे. गतप्रकरणांत आपण असें अनुमान केलें कीं, प्रेतांत भूत भरलेलें असतें ह्या समजुतीवर रानटी माणूस मृतशत्रूंचे कांहीं शरीरभाग राखून ठेवितो; आणि त्यामध्यें त्याचा असा उद्देश असतो कीं, तेणेंकरून स्वतः नाहीं तरी वैदूमाणसाच्या मदतीनें त्यांच्या भुतांवर आपणास आपला ताबा चालवतां यावा. ज्यास आपण गुलाम केलें असेल, त्याच्या अंगाचा कापून घेतलेला कांहीं भाग राखून ठेवण्यास त्यास असलेंच कारण सांपडतें; कारण त्यास व त्या गुलामास दोघांसहि असें वाटतें कीं, तेणेंकरून त्यास त्याला इजा करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. जादूगार लोक ज्याच्यावर जादू करावयाची असेल त्याचे कांहीं केंस किंवा नखें किंवा त्याच्या अंगाच्या वासानें व अतएव त्याच्या आत्म्यानें परिपूरित म्हणून समजल्या जाणाऱ्या त्याच्या कपड्यांचा कांहीं भाग मिळवीत असतात; ही गोष्ट ध्यानांत आणतां, त्यावरून सहजच असा समज उत्पन्न होतो कीं जो धनी आपल्यापाशीं आपल्या गुलामाचा एकादा दांत किंवा करांगुळीचा तुकडा, किंवा केंसाचा लहानसा झुपका बाळगील, त्याला त्यास जादूगाराच्या हातीं देण्याचें सामर्थ्य प्राप्त होईल; अशासाठीं कीं त्या-

नें त्याला भुतांकडून पीडा करवावी, किंवा आजारी करावें, किंवा मारावें.

ह्यामुळें शेक्सपियरच्या टेंपेस्ट नाटकांतील क्यालिबन प्रास्पेरोनें आपल्या जादूच्या सामर्थ्यानें केलेल्या पीडांबद्दल जसली अत्यन्त भीति प्रदर्शित करितो, तसलीच भीति मनांत उत्पन्न होऊन जित माणूस आपल्या जेत्याच्या आज्ञेंत वागूं लागतो.

२५. एवंच जिवंतांचें अंगकर्तन हें मृतापासून विजयचिन्हग्रहणाच्या चालीपासून उत्पन्न झालेलें आहे ह्याबद्दल अनेक तऱ्हेचा पुष्कळ पुरावा सांपडतो. विजयचिन्ह काढून घेणें म्हणजे शत्रु मरेल अशा रीतीनें त्यास जिंकणें असा अर्थ होतो;आणि कैद्याच्या शरीराचा एकादा भाग कापून घेण्याची जी चाल त्यावरून उत्पन्न होते तिचा अर्थ त्यास आपला गुलाम बनाविणें असा असतो. सरतेशेवटीं असला शरीरभाग स्वेच्छेनें देणें याचा अर्थ अंकितभाव प्रदर्शित करणें असा होऊं लागतो; आणि मग त्यावरूनच या करण्यास संतर्पणविधीचें स्वरूप येऊन जातें.

मृतशत्रूंचे हात कापून घेत असतात; आणि गुन्हेगारांचीं अशींच कर्तनें करीत असून, शिवाय जिवंत नाईक, मृतमाणसें, आणि देव यांस संतुष्ट करण्याकरितां बोटें किंवा बोटांचीं पेरें हीं कापून देत असतात. मृतशत्रूंपासून घ्यावयाच्या विजयचिन्हांमध्यें नाकें हीं येतात; आणि तद्वतच, कैदी, गुलाम, आणि कांहीं प्रकारचे गुन्हेगार ह्यांचींहि नाकें कापीत असतात. समरांगणावरून परत येतांना कान आणीत असतात; आणि प्रसंगवशात् कैदी, गुन्हेगार किंवा गुलाम ह्यांच्यापासूनहि ते कापून

घेत असतात; शिवाय, कांहीं लोकांमध्यें कानांना भोंकें पाडणें हें नोकराचें व प्रजेचें चिन्ह समजलें जातें. दाढा आणि दांत हीं देखील विजयचिन्हें आहेत; आणि कांहीं ठिकाणीं मृतनायकाच्या संतर्पणार्थ दांत पाडून टाकीत असून, कांहीं ठिकाणीं अर्धवट धार्मिकविधि म्हणून धर्मोपाध्या ते पाडून टाकीत असतो. शेंडीसहित डोक्याची कातडी मारलेल्या शत्रूंपासून घेत असतात, आणि कधीं कधीं त्याच्या शेंडीच्या केंसांचा उपयोग जेत्याच्या पोषाकास शोभा आणण्यासाठीं करीत असतात; आणि नंतर त्यापासून दुसऱ्या अनेक चाली उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, कांहीं ठिकाणीं गुलाम केलेल्यांचे केंस कापून आंखूड करितात; कांहीं ठिकाणीं नायकाची म्हणून शेंडी राखितात, आणि कधीं कधीं अंकितभाव दर्शविण्यासाठीं त्यास ती अर्पण करितात; कांहीं ठिकाणीं लोक आपल्या दाढ्या शास्त्यांस अर्पण करितात; आणि ह्या रीतीनें केंस न कापतां वाढूं देणें हें कांहीं ठिकाणीं मोठेपणाचें चिन्ह बनून जातें. पुष्कळ जातींच्या लोकांमध्यें आप्तांच्या भुतांच्या संतर्पणार्थ केंस अर्पण करितात; राजा किंवा नाईक मेला म्हणजे सगळी जातच्या जात हजामत करिते; आणि देवांप्रत अंकितभाव दर्शविण्यासाठीं देखील केशसमर्पण करीत असतात. कधीं कधीं जिवंत श्रेष्ठाप्रत ते सन्मानार्थ अर्पण करितात; आणि नंतर इतरांसहि त्याच अर्थानें ते अर्पूं लागतात. लिंगविषयककर्तनांचें असेंच आहे; म्हणजे, शिश्नाचे कांहीं भाग मारलेले शत्रू आणि जिवंत ठेवलेले कैदी ह्यांच्यापासून सारखेच घेत असतात; आणि ते राजे व देव

यांस अर्पण करीत असतात. स्वतःचें रक्त वाहून घेण्याची चाल कदाचित् कांहीं अंशीं नरमांसभक्षणाच्या प्रघातापासून, पण ज्यास्त प्रमाणावर परस्परानिष्ठाप्रदर्शनार्थ एकमेकांस एकमेकांचें रक्त काढून देण्याच्या चालीपासून, उत्पन्न होत असून, तिच्यापासून अंकितभावदर्शक अनेक विधि उत्पन्न होतात; म्हणजे, भुतें व देव यांच्या संतर्पणार्थ, आणि कधीं कधीं जिवंत माणसांस मान देण्यासाठीं म्हणून, रक्तसमर्पण केलेलें आपल्यास आढळून येतें. या छेदांपासून ज्या खुणा उत्पन्न होतात त्यांचीहि गोष्ट अशीच आहे. ह्या बऱ्याच झालेल्या जखमा किंवा हे सुकलेले व्रण प्रारंभीं आकार व स्थान ह्यांसंबंधानें अनिश्चित असून पण पुढें रूढीनें निश्चित बनून, सरतेशेवटीं त्यांस पुष्कळ ठिकाणीं भूषणस्वरूप येतें; तद्वतच, प्रथम हे व्रण मृतमाणसांच्या आप्तांनाच करीत असून मागाहून जिवंत असतांना ज्यास फार भीत अशा नायकाच्या सर्व अनुयायांना करूं लागतात; आणि अशा रीतीनें प्रथम मृतशास्त्याप्रत आणि अखेरीस देवाप्रत अंकितभावाचे ते दर्शक बनून जातात; म्हणजे, अशा रीतीनें त्यांस जातीच्या व राष्ट्रीय खुणांचें स्वरूप येतें.

गतप्रकरणांत आपण पाहिलेलेंच आहे कीं, विजयचिन्हग्रहण हें विजयापासून उत्पन्न होत असून, त्याचा उपयोग विजयानें उत्पन्न झालेल्या सरकारी नियंत्रणास मदत करण्याच्या कामीं होतो; तेव्हां विजयचिन्हग्रहणापासून उत्पन्न झालेलीं जीं अंगकर्तनें त्यांचाहि उपयोग तसाच व्हावा हें साहजिकच आहे; आणि तसा तो

होतो ह्याबद्दल प्रत्यक्ष पुरावाहि सांपडतो. अंगकर्तनें हीं प्रथम दास्याचीं दर्शक म्हणून सुरू होऊन आणि नंतर राजकीय व धार्मिक अंकितपणाचीं तीं चिन्हें बनून, त्यांस पुढें राजनिष्ठेच्या शपथा आणि धार्मिक आत्मार्पणें ह्यांचें स्वरूप येऊन जातें. शिवाय, दृश्य वा अदृश्य शास्त्याचे आपण अंकित आहों अशाबद्दलची ह्या खुणा ही एक-प्रकारची कबूली असून, शिवाय त्याचा प्रभाव केवढा मोठा आहे हें दर्शवून त्या त्याच्या अधिकारास दुजोरा आणितात. आणि जेथें त्यांपासून गुन्हेगारांच्या अंकित-पणाप्रमाणेंच वर्गविषयक अंकितभावहि व्यक्त होत असेल तेथें त्यांच्यामुळें नियामक घटनेला आणखी जोर येतो.

अंगकर्तनांची उत्पत्ति वर सांगितल्याप्रमाणें जर होत असेल, तर त्यांचा प्रसार आणि समाजाची स्थिति ह्यां-मध्यें कांहींतरी संबंध असलाच पाहिजे. बावन जातींच्या लोकांमध्यें दिसणाऱ्या गोष्टी एकत्र करून पाहतां असा संबंध जितक्या स्पष्टपणें दिसणें शक्य आहे तितक्या स्पष्टपणें तो दिसूं लागतो. आतां अंगकर्तनांस विजय आणि त्यापासून होणारें निरानिराळ्या समाजांचें संकलन ह्यांपासून सुरवात होत असल्यामुळें हीं अंगक-र्तनें संयुक्त रानटी समाजांपेक्षां आणि अर्धवट सुधारले-ल्या राष्ट्रांपेक्षांहि अगदीं रानटी अशाहि सरलसमाजांत कमी प्रमाणावर दृष्टीस पडावीं असें अनुमानानें आप-ल्या लक्षांत येतें; आणि पुराव्यावरूनहि तीच गोष्ट स्पष्ट होते. सरलसमाज करून असणारे आणि अंगक-र्तन मुळींच नसलेले किंवा अल्प प्रमाणावर असलेले, असे अकरा जातींचे लोक आपल्यास आढळून येतात--

फ्यूजियन, वेड्डा, आंदामानी, डायाक, टोडा, गोंड, सांताळ, बोडो, ढिमाल, मिश्मी, कामस्चाडेल, स्नेकइं-दियन; आणि ह्या सर्व लोकांमध्यें नायकी मुळींच नाहीं किंवा अस्थाईक प्रकारची आहे. आतां अंगकर्तन मुळींच न करणारे किंवा फार अल्पप्रमाणावर करणारे असे दोनच जातींचे लोक असुधारलेल्या संयुक्तसमाजांत आपल्यास आढळून येतात; त्यांपैकीं एक किरघीजलोक होत; ते भटकणारे असल्यामुळें त्यांस कह्यांत ठेवणें कठिण जातें; दुसरे लोक इरोक्वाइज हे होत, आणि त्यांचें सरकार लोकसत्ताकरूपी होतें. आतां थोडक्या प्रमाणावर अंगकर्तनें करणाऱ्या समाजांकडे पाहतां, त्यांमध्यें संयुक्तांपेक्षां सरलांचें मान कमी आहे; म्हणजे दुसऱ्या वर्गाचे दहा समाज असून पहिल्याचे पांचच आहेत; पहिले हे—तास्मेनियन, तानीस, न्यूगिनीमधील लोक, क्यारेन, नाग, ऑस्टियाक्, एस्कीमो, चिनूक, कोमांची, चिपिवायन; दुसरे हे—न्यूझीलंदर, ईस्टआफ्रिकन्, खोंड, कुकी, कालमक. आणि ह्या उदाहरणांसंबंधानें हें ध्यानांत ठेवावयाचें कीं पहिल्या वर्गांत सरलनायकी व दुसऱ्यांत संयुक्तनायकी असून त्या दोन्ही अस्थिर आहेत. आतां ज्यांच्यांत अंगकर्तनें ह्याच्याहून ज्यास्त कडक प्रकारचीं आहेत त्या समाजांकडे पाहतां तेथें हें प्रमाण उलट झालेलें दिसतें. म्हणजे, सरलसमाजांचीं तीनच उदाहरणें दृष्टीस पडतात; न्यूक्यालिडोनियन (पण ज्यांच्यांत विशेष कडक कर्तनें फारशीं दिसत नाहींत), बुशमेन (जे उच्चस्थितींतून नीच स्थितींत आलेले आहेत म्हणून म्हणतात), आणि आस्ट्रेलियन

(ज्यांच्याबद्दलहि असेंच सांगतात); पण संयुक्तसमाजांचीं एकवीस सांपडतात—फीजियन, सांडविचबेटवाले, ताहितियन, टाँगन, सामोअन्, जाव्हन्, सुमात्रन्, मालागासी, हॉटेंटाट, डमारा, बेचुआना, काफिर, काँगोमधील लोक, किनाऱ्यावरील नीग्रो, आंतील नीग्रो, डाहोमन्, आशान्टीज्, फुल्हा, आरब, आबिसिनियन, डाकोटा. दुसरी गोष्ट अशी कीं, सामाजिकसंकलन बहुधा विजयांच्या योगानें होत असल्यामुळें, आणि म्हणून संयुक्त व दुबारसंयुक्तसमाज प्रारंभींच्या पायऱ्यांवर रचना व उद्योग ह्या बाबतींत युद्धशील असल्यामुळें, अंगकर्तनाच्या चालीचा समाजाच्या स्वरूपाशीं प्रत्यक्ष संबंध असून त्याच्या आकाराशीं अप्रत्यक्ष असला पाहिजे; आणि प्रत्यक्ष पुराव्याकडे पाहतां तसेंच दिसतें. अंगकर्तनाच्या संबंधानें परस्परांपासून फारच भिन्न अशा समाजांच्या समोरासमोर रांगा लाविल्या असतां असें दिसतें कीं, त्यांच्यामध्यें युद्धशीलतेच्या संबंधानेंहि तितकाच भेद आहे; म्हणजे, एका रांगेंतील समाजांची घटना अगदीं अयुद्धशील असून दुसऱ्या रांगेंतील समाजांची अगदीं युद्धशील आहे. एका टोंकास आपल्या दृष्टीस वेड्डा, टोडा व ढिमाल हे लोक पडतात, आणि दुसऱ्या टोंकास फीजियन, आबिसीनियन आणि प्राचीन मेक्सिकन हे समाज दृष्टीस पडतात.

अंगकर्तनांची उत्पत्ति विजयचिन्हग्रहणापासून, आणि त्यांची वाढ युद्धशील नमुन्याच्या वाढीबरोबर, होत असल्यामुळें, युद्धशीलतेबरोबर पक्क झालेल्या समाजांची युद्धशीलता जशी कमी होत जाईल तशीं हीं कर्तनें कमी

झालीं पाहिजेत, आणि समाजाचा औद्योगिक नमुना उत्क्रान्त होत जाईल तशीं तीं बंद झालीं पाहिजेत. तशीं तीं होतात हें सगळ्या यूरोपच्या इतिहासावरून स्पष्ट दिसतें. आणि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, इंग्लिशसमाज आतां मुख्यत्वेंकरून उद्यमशील असल्यामुळें, जीं अल्पस्वल्प अंगकर्तनें त्याच्यांत अद्यापि चालू आहेत तीं युद्धशीलतेमुळें जी नियामकघटना प्रथम उत्पन्न होऊन अद्यापि कायम राहिलेली आहे, तिच्यासंबंधाचींच आहेत; उदाहरणार्थ, खलाशी लोक अद्यापि गोंदितात, लष्करांतून किंवा आरमारांतून पळून जाणारांस परवांपर्यंत डागीत असत, आणि मोठ्या गुन्हेगारांचे केंस अद्यापि कातरून टाकितात.

प्रकरण चवथें

नजराणे

२६. प्रवासी लोकांचा विलक्षण अनोळखी लोकांशीं संबंध आला म्हणजे बहुतकरून ते त्यांस नजराणे देऊन संतुष्ट करीत असतात. यापासून दोन फायदे होत असतात. एक हा कीं, दिलेल्या वस्तूच्या मूल्यामुळें संतोष उत्पन्न होऊन त्यामुळें ती घेणाराच्या मनांत स्नेहभाव उत्पन्न होतो; आणि शिवाय तेणेंकरून दात्याची त्यास संतुष्ट करण्याची इच्छा व्यक्त होते, व त्याचाहि परिणाम तोच होतो. नजराणा देण्यास विधीचें जें स्वरूप येतें तें ह्या दुसऱ्या गोष्टीवरून येतें.

अंगकर्तनें आणि नजराणे ह्यांमधील—म्हणजे, शरीराचा एकादा भाग अर्पण करणें किंवा दुसरें कांहीं अर्पण करणें ह्यांमधील—संबंध प्राचीन पेरूव्हियन लोकांविषयींच्या एका विधानावरून चांगला दिसून येतो; आणि नजराणे देणें ही गोष्ट तिच्या किंमतीविनाहि संतर्पणरूपी क्रिया कशी बनते हेंहि त्यावरून व्यक्त होतें. त्या देशांतील उंच खिंडींतून जे लोक ओझीं नेतात त्यांचें वर्णन करतांना गार्सिलासो असें म्हणतो कीं ते तीं ओझीं खिंडीच्या माथ्यावर उतरतात, आणि प्रत्येकीं त्यांचा देव पाचाक्यामाक ह्यास म्हणतात, " हें ओझें वर आलें ह्याबद्दल मी तुझे आभार मानितों; " आणि असें म्हणून ते आपल्या भिवयांचा एक केंस ओढितात, किंवा कुका नांवाच्या वनस्पतीचा एक तुकडा आपल्या तोंडांतून काढितात, आणि आपल्या जवळची अत्यन्त

मोलवान् वस्तु म्हणून तो त्यास अर्पण करितात. कधीं कधीं ह्याच्या अभावीं एकादी लहानशी काटकी किंवा काडी, किंवा एक लहानसा दगड अथवा मातीचें ढिकूळ, हेंहि ते त्यास अर्पण करितात. अशा रीतीनें खिंडींच्या माथ्यांवर ह्या देणग्यांच्या राशीच्या राशी जमलेल्या आहेत. ह्या गोष्टी प्रथमदर्शनीं मोठ्या चमत्कारिक दिसतात; पण फ्रान्सांत देखील आडरस्यावरील क्रूसाच्या पायथ्याशीं कांबटीवर कांबटी आडवी घालून मध्यें एक खिळा ठोकून केलेले लहान लहान क्रूस ज्यांनीं पाहिलेले आहेत त्यांस याचा चमत्कार वाटावयाचा नाहीं. ह्या दोन्ही उदाहरणांवरून नजराणा करण्याच्या क्रियेस संतर्पणविधीचें स्वरूप कसें येतें हें ध्यानांत येतें. वास्तविक नजराण्याबद्दल नांवाचा नजराणा अशा रीतीनें कसा उत्पन्न होतो हें समजूतदार प्राण्यांच्या उदाहरणावरून देखील व्यक्त होतें. उदाहरणार्थ, ज्या कुत्र्यास मारलेले पक्षी वगैरे तोंडांत धरून आणण्याची संवय आहे तो ओळखीचें कोणी माणूस भेटलें म्हणजे आनंदानें उड्या मारितो इतकेंच नाहीं, तर एकादी सुकलेली काटकी किंवा पान शोधून काढून तोंडांत धरून त्याच्याकडे आणितो.

नजराणा देण्याच्या क्रियेस विधीचें स्वरूप कसें येतें हें समजण्याची आपली अशा रीतीनें तयारी झाली असल्यामुळें, त्याच्या निरनिराळ्या प्रकारांचा, आणि त्यांपासून शेवटीं उत्पन्न होणाऱ्या सामाजिक व्यवस्थांचा, आतां आपण विचार करूं.

२७. नायकविहीन टोळ्यांत, ज्यांच्यांत नायकी अ-

स्थिर आहे अशा टोळ्यांत, आणि ज्यांच्यांत नायकी स्थिर असली तरी दुर्बल आहे अशा टोळ्यांत, नजराणे देण्याच्या क्रियेस कायमच्या रूढीचें स्वरूप येत नाहीं. आस्ट्रेलियन, तास्मेनियन आणि फीजियन, हीं ह्याचीं उदाहरणें होत. आणि ज्यांच्यांत राज्यव्यवस्था फार अल्प आहे अशा एस्कीमो, चिनूक, स्नेक, कोमांची, चिपिवाज वगैरे लोकांत, किंवा ज्यांची राज्यव्यवस्था लोकसत्ताक आहे अशा इरोक्वाइज, व क्रीक अशा लोकांत, जोरदार एकछत्री शासनाच्या अभावाबरोबर, राजकीयविधि म्हणून नजराणे देणें ह्या गोष्टीचाहि अभाव दिसून येतो.

ह्याच्याविरुद्ध, प्राचीन काळीं स्वेच्छाचारी सरकाराखालीं बऱ्याच सुधारलेल्या कांहीं अमेरिकन राष्ट्रांच्या रूढी दिसून येतात. उदाहरणार्थ, टॉर्किमीडा असें लिहितो कीं, मेक्सिकोमध्यें कोणी राजास किंवा उमरावास वंदन करावयास गेला म्हणजे बरोबर फुलें आणि नजराणा घेऊन जातो. चिब्चा लोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, नायकाशीं बोलणें करण्याकरितां ते गेले म्हणजे बरोबर कांहीं नजराणा घेऊन जात, आणि मान खालीं वांकवीत. युकाटानीजलोकांमध्यें पारध केली किंवा मासे धरले किंवा मीठ गोळा केलें म्हणजे त्याचा कांहीं अंश ते आपल्या नायकास नेहमीं देत. मालेपालिनिशयनसारख्या अन्य नमुन्यांच्या पण समाजसुधारणेच्या असल्याच पायरीवर असलेल्या अन्य लोकांमध्येंहि हीच चाल दिसून येते. खाण्याचे पदार्थ, कापड वगैरे घेऊन त्यांच्यामोबदला ताहितियन लोकांस दिलेल्या वस्तूंसंबंधानें फार्स्टर असें म्हणतो कीं, ही सर्व संपत्ति

लवकरच नजराणे म्हणून निरनिराळ्या नायकांच्या तिजोरींत गेली. तद्वतच, फीजीमध्यें ज्याला म्हणून नायकापासून कांहीं काम करून घ्यावयाचें असेल, किंवा त्याच्याशीं शिष्टव्यवहार करावयाचा असेल, त्यानें त्याजकडे नजराणा घेऊन गेलें पाहिजे.

ह्या शेवटच्या उदाहरणावरून, नजराणे देण्याच्या क्रियेचें जें स्वैच्छिकसंतर्पणाचें स्वरूप तें जाऊन तीस जबरीच्या संतर्पणाचें स्वरूप कसें येतें हें ध्यानांत येतें. कारण आपण असें वाचितों कीं, ताहितियनलोकांचे नाईक आपल्या प्रजेच्या बागा पाहिजे तेव्हां लुटीत असत, आणि फीजीमध्यें नाईकलोकांची मालमत्ता जबरीनें घेतात, व त्यांस जबरीनें आपले दासहि करितात. म्हणून ह्यांतून आपला बचाव करण्याकरितां लोक आपल्या वित्ताचा कांहीं भाग द्यावयास कबूल झाले तर त्यांत नवल नाहीं. कारण तेणेंकरून नायकांची धनतृष्णा तृप्त होते आणि त्यांजप्रत अंकितभाव प्रदर्शित केल्यासारखा होतो. यासाठींच मालागासीलोकांमध्यें गुलाम व इतर कधीं कधीं आपल्या नायकांप्रत निष्ठा प्रदर्शित करण्याकरितां, धान्य वगैरे नजराणा नेतात. आतां या नायकांची सत्ता ज्या मानानें ज्यास्त असेल त्या मानानें त्यांस संतुष्ट करण्याची इच्छा ज्यास्त असणार हें उघडच आहे; आणि तें संतर्पण त्यांच्या वासना तृप्त करून आणि त्यांजप्रत निष्ठेचें प्रदर्शन करून होणार हेंहि उघडच आहे.

परंतु नायकास देणग्या देण्याच्या क्रियेस साध्या टोळींत इतकें पक्व स्वरूप फारच विरळा येतें. प्रारंभीं टो-

ळींतील मुख्य माणूस इतरांपासून फारसा विशिष्ट झालेला नसल्यामुळें, नजराणे देण्याच्या क्रियेस नित्यविधीचें स्वरूप यावें इतकी त्याजबद्दल लोकांस भीति वाटत नसते. एका विजेत्या टोळीनें पुष्कळ टोळ्या जिंकून संयुक्तसमाज बनला आणि त्यामध्यें एक मुख्य नाईक व अनेक पोटनाईक यांचा इतरांपासून भिन्न दिसणारा एक शास्तावर्ग बनला, म्हणजे मग तो (वर्ग) लोकांच्या मनांत दरारा उत्पन्न करील इतका प्रबल होतो. म्हणून वर जीं उदाहरणें घेतलीं आहेत तीं सर्व ज्या समाजांत राजाची सत्ता उत्पन्न झाली आहे अशा समाजांपैकीं घेतलेलीं आहेत.

२८. पण राजकीयसत्ता उत्पन्न झाली म्हणजे त्याबरोबर ह्या विधीस पूर्वींहून ज्यास्त विस्तृत स्वरूप येतें. कारण जेथें गौणशास्त्यांखेरीज मुख्य शास्ता असेल तेथें त्यास संतुष्ट करणें हें जसें लोकांस करावें लागतें तसेंच गौणशास्त्यांसहि करावें लागतें. म्हणून दोन प्रकारचे जे हे नजराणे उत्पन्न होतात त्यांची वाढ आपण लक्षांत आणिली पाहिजे.

ह्या चालीचें प्राथमिकस्वरूप तिंबक्तूमध्यें कायम राहिलेलें दृष्टीस पडतें. तेथें राजा आपल्या प्रजेवर किंवा परकी व्यापाऱ्यांवर कांहीं कर लादीत नाहीं, तर त्यांजपासून केवळ नजराणे घेतो. पण तेथें व्यवस्थित सरकार नाहीं; तर राजा मुलांचें नियमन करणाऱ्या बापासारखाच आहे. लोकांमध्यें तंटे उत्पन्न झाले म्हणजे तो पोक्त माणसांचें कौन्सिल भरवितो. ह्याचा अर्थ असा कीं जेथें राजाची सत्ता मोठी नसेल तेथें नजराणे दे-

ण्याची चाल स्वैच्छिक राहते. पण काफिरलोकांत ह्या चालीचें स्वैच्छिक स्वरूप नष्ट झालेलें आढळून येतें. त्यांच्यांत राजाचें उत्पन्न लोकांचीं गुरें-ढोरें, पहिलें पीक, इत्यादिकांच्या वार्षिक हप्त्यांचें बनलेलें असतें. त्या लोकांत अशी चाल आहे कीं कोणीं आपलें धन्याचें पेंव उघडलें म्हणजे त्यानें त्यांतील कांहीं धान्य आपल्या शेजाऱ्यांकडे पाठविलें पाहिजे, आणि त्याहून ज्यास्त राजाकडे पाठविलें पाहिजे. आबिसीनियामध्यें जबरीचा वसूल आणि स्वैच्छिक देणग्या यांचें असेंच मिश्रण आढळून येतें; कारण तेथील राजा वार्षिक हप्तयांखेरीज खुषीचे नजराणे घेत असतो. सारांश, जेथें कांहीं नजराणे नेहमींचे बनल्यामुळें जबरीचे बनतील, तेथें त्यांपासून संतर्पण होत नाहींसें झाल्यामुळें, अनपेक्षित आणि म्हणून संतर्पक असे नजराणे देण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते.

खासगी माणसानें केलेल्या नजराण्यावरून जर अंकितपणा व्यक्त होतो, तर गौणशास्त्यानें मुख्य शास्त्यास केलेल्या नजराण्यावरून तो ज्यास्तच व्यक्त होतो. म्हणून नजराणे देण्याच्या चालीस रीतीप्रमाणें श्रेष्ठत्व कबूल करण्याच्या क्रियेचें स्वरूप येतें. उदाहरणार्थ, प्राचीन व्हेरापासमध्यें, एकादा मनुष्य राजा म्हणून निवडला गेला म्हणजे तेथील टोळ्यांचे सर्व सरदार नजराणे घेऊन स्वतः त्याच्याकडे येत किंवा आपल्या आप्तांस पाठवीत. चिब्चालोकांमध्यें नवा राजा गादीवर बसला म्हणजे त्यांच्यांतील मुख्य माणसें आह्मी तुमच्या आज्ञा पाळूं आणि निष्ठेनें राहूं, अशी शपथ घेत,

आणि राजनिष्ठाप्रदर्शनार्थ त्यास प्रत्येकीं एकेक रत्न आणि कांहीं सोनें नजर करीत. मेक्सिकनलोकांबद्दल टारिबियो असें म्हणतो कीं, प्रत्येक वर्षीं कांहीं उत्सवांच्या समयीं जे इंदियन कर देत नसत ते आणि नाईकलोकहि अंकितपणाप्रदर्शनार्थ राजास नजराणे देत. आणि पेरूमध्येंहि अंकितभावव्यंजक कांहीं नजराणा घेतल्याशिवाय राजाकडे कोणी जात नसे. हीब्रूलोकांच्या लेखांतहि नजराणे देण्याचा हा हेतु दृग्गोचर होतो. उदाहरणार्थ, सालोमनचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठीं असें सांगितलें आहे कीं, पृथ्वीवरील सर्व राजे त्यास भेटावयात येऊं लागले, आणि ते सर्व नजराणे घेऊन येत. उलटपक्षीं, जेव्हां झॉल यास राजा निवडलें तेव्हां बेलियलचीं मुलें म्हणूं लागलीं कीं, हा आमचें संरक्षण कसें करणार ? म्हणून तीं त्याचा तिरस्कार करूं लागलीं, आणि त्यास नजराणे आणीतनाशीं झालीं. सर्व प्राच्यदेशांमध्यें नजराणे आणण्याचा उद्देश हाच असतो; आणि त्याचीं उदाहरणें जपान, चीन, ब्रह्मदेश यांच्या इतिहासांत सांपडतात.

प्राचीन यूरोपीय इतिहासांतहि ही चाल व तिचा हेतु हीं दोन्ही दृष्टीस पडतात. मेरोव्हिंजियन राजांच्या अमदानींत वर्षांतून एकदां लोक राजांस नजराणे आणून देत असत; आणि ही चाल क्यारोलिंजियन राजांच्या अमदानींतहि सुरू होतीच. हे नजराणे व्यक्ती व जाती दोन्ही करीत असत. प्राचीन इंग्लंदांत देखील राजा एखाद्या शहरीं गेला असतां त्यास नजराणे देणें लोकांस इतकें जड जाई कीं राजा आपल्या गांवीं येणें म्हणजे

आपलें मोठें दुर्दैवच होय असें लोकांस वाटे.

२९. वरच्या एकंदर पुराव्यावरून असें दिसतें कीं प्रारंभीं संतर्पक नजराणे हे खुषीचे व अपवादात्मक असून राजकीय सत्ता वाढत जाईल तसे पहिल्यापेक्षां कमी स्वैच्छिक व ज्यास्त सामान्य बनून जातात; आणि त्यांपासून सार्वत्रिक व जबरीच्या खंडांची उत्पत्ति होते; आणि नाण्याची उत्पत्ति झाली म्हणजे त्यांस करांचें स्वरूप येतें. हें रूपान्तर कसें बनत जातें हें इराणच्या इतिहासावरून चांगलें दिसून येतें. तेथील लोकांना जे अनियमित व जुलमी कर द्यावे लागतात त्यांस उद्देशून मालकम असें म्हणतो कीं, ह्यांपैकीं पहिल्या करास नेहमींचे व विशेष नजराणे असें म्हणतां येईल. नवरोजच्या किंवा वासंतिक संक्रान्तीच्या उत्सवाच्या समयीं प्रांत व जिल्हे ह्यांचे सुभेदार, टोळ्यांचे नाईक, प्रधान, आणि इतर सर्व मोठाले कामदार जे नजराणे देतात ते नेहमीचे होत. ह्या प्रसंगीं कोणीं किती द्यावयाचें हें बहुधा रूढीवरून ठरलेलें असतें; त्याहून कमी दिल्यास नोकरी जाते, आणि ज्यास्त दिल्यास बादशहाची ज्यास्त मर्जी बसते.

नजराणे नियमित कालानें देऊं लागले म्हणजे त्यास खंडणी देण्याचें स्वरूप कसें येतें हें ज्या लहान समाजांत सरकारी सत्ता चांगली स्थापन झालेली असते तेथें चांगलें दिसून येतें. उदाहरणार्थ, टाँगामध्यें वरिष्ठ दर्जाचे नाईक बहुतकरून पंधरवड्यांतून एकदां डुकर व बटाटे यांची नजर राजास करितात, आणि आपल्याहून कमी दर्जाच्या नायकांपासून असलेच नजराणे घेतात;

त्याप्रमाणेंच हे दुसरे नाईक त्यांच्याहून कमी दर्जाच्या लोकांपासून घेतात; आणि असें हें गाडें सामान्यलोकांपर्यंत चालतें. प्राचीन मेक्सिको निरनिराळ्या प्रमाणांनीं मुख्य सरकारावर अवलंबून असणाऱ्या अनेक पोटप्रांतांचा बनलेला असल्यामुळें ह्या संक्रमणाच्या निरनिराळ्या पायऱ्या तेथें दिसत असत. शूर मेक्सिकनलोकांनीं हे प्रांत जिंकून टाकलेले असल्यामुळें त्यांनीं त्यांचा विध्वंस करूं नये एतदर्थ ते त्यांस ह्या खंडण्या देत असत; ह्यावरून प्रारंभीं ह्या देणग्या संतर्पक असत हें स्पष्ट दिसतें. बरें, मेझटिटलनमध्यें ह्या खंडण्या ठराविककाळीं देत नसत, तर जरूर लागेल तेव्हां देत असत. मांटीझूममध्यें ह्यांतील कांहीं खंड वर्षांतून एकदां देत असत, कांहीं सहा महिन्यांनीं आणि कांहीं ऐंशी दिवसांनीं. आणि उत्सवप्रसंगीं अंकितभाव व्यक्त करण्याकरितां ज्या देणग्या देत त्यांजबद्दल टोरिनियो असें म्हणतो कीं, ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, नाईक, व्यापारी व जमीनदार ह्यांस कर देण्याची जबरी नसे, तर ते ते खुषीनें देत.

अशाच प्रकारचें संक्रमण प्रारंभींच्या यूरोपच्या इतिहासांतहि दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, मेरोव्हिन्जियन राजांच्या उत्पन्नाच्या बाबींमध्यें अनेक प्रसंगीं लोक आपखुषीनें जे नजराणे देत त्यांची गणना वेट्झ् करितो. आतां क्यारोलिन्जियन राजांच्या कारकीर्दींत ह्या नजराण्यांचें स्वैच्छिक स्वरूप नाहींसें झालें होतें असें तोच ग्रंथकार म्हणतो, आणि हिन्कोमार त्यांस कर असेंहि नांव देतो. ह्या नजराण्यांत घोडे, सोनें, रुपें, रत्नें,

वस्त्रें, आणि राजवाड्यांतील जरूरीच्या गोष्टी ह्यांचा समावेश होत असे. मांडलिक राजांस त्यांचे जमीनदार असल्याच वस्तू नजर करीत असत; आणि त्यांस बाराव्या शतकांत जमिनीवरील करांचें स्वरूप आलें.

पदार्थांच्या किंमती जशा ज्यास्त निश्चित झाल्या आणि नाण्याच्या रूपानें देणीं देण्याचें काम पूर्वींपेक्षां ज्यास्त सुलभ झालें, तसे ह्या नजराण्यांबद्दल पैसे देण्याची चाल उत्पन्न होऊं लागली. उदाहरणार्थ, क्यारोलिन्जियन राजांच्या अमदानींत "इन्फरेंडा" नांवाचा कर प्रारंभीं गुराढोरांच्या रूपानें देत असून नंतर पैशाच्या रूपानें देऊं लागले. तद्वतच, त्या काळीं छोटे जमीनदार मोठ्यांस एक कर भाकरीच्या रूपानें देत असून तोहि पुष्कळ वेळां पैशाच्या रूपानें देत असत. इंग्लंदांतहि राजाची स्वारी ज्या शहरांतून जाईल तेथील लोकांनीं त्यास कांहीं माल द्यावा असें असून पुढें ते त्याबद्दल त्यास पैसे देऊं लागले. सारांश, सर्वत्र स्वैच्छिक देणग्यांस जबरीच्या खंडणीचें, आणि पुढें त्या खंडणीस करांचें स्वरूप येतें.

३०. मुख्य माणसास स्वेच्छेनें दिलेल्या नजराण्यांस हळू हळू जर खंडणीचें स्वरूप येऊन शेवटीं कायमच्या करांचें स्वरूप येतें, तर तो मुख्य माणूस आपल्या हाताखालच्यांस त्यांची मदत लागेल तेव्हां ज्या देणग्या देतो त्यांस कायमचें स्वरूप येऊन तें त्यांचें निर्वाहसाधन बनणार नाहीं काय? अर्थात् बनेल; आणि तसें तें बनलेलें आढळून येतें.

ह्यासंबंधानें पहिली गोष्ट अशी ध्यानांत ठेवावयाची

कीं, प्रारंभीं राजास आपल्या प्रजेपैकीं कोणाचा अन्याय होईल तेव्हां जी त्यास न्यायदानरूपी मदत करावी लागते त्याबद्दल तो त्याजपासून विशेष देणगी घेत असतो. उदाहरणार्थ, चित्रचालोकांमध्यें राजास अर्ज करावयाच्या पूर्वीं एक नजराणा द्यावा लागत असे. सुमात्रामध्यें नाईक कर मुळींच बसवीत नाहीं किंवा तंटे तोडल्याबद्दल जें त्यास कांहीं मिळतें त्याखेरीज त्यास दुसरें कांहीं उत्पन्न नसतें. जम्मूचा माजी राजा गुलाबसिंग याच्याबद्दल ड्यूसाहेब असें म्हणतो कीं, नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें कोणीं एक रुपया त्यास नजर केला म्हणजे तो लागलाच त्याच्या तक्रारीकडे लक्ष देत असे; मोठ्या गर्दींत देखील बोटांत रुपया धरून तो वर करून, "महाराज, अर्ज आहे," असें कोणी ओरडलें कीं लागलेंच त्याचें लक्ष त्याच्याकडे जात असे. इंग्लंदामध्येंहि प्राचीन काळीं अशीच चाल असे याबद्दल पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, ब्रूम असें म्हणतो कीं आंग्लो-साक्सनलोकांच्या अमदानींत मर्जींतल्या लोकांनीं विनवणी केल्यास, लांचाची लालूच दाखविल्यास, किंवा लोभाच्या भरीस पडून, राजे न्याय करीत असत. आणि नार्मन लोकांच्या अमदानींतहि प्रथम प्रथम न्यायदान करणें ही राजाच्या खुषीची गोष्ट असून त्याबद्दल त्यांस कांहीं द्यावें लागे असें ब्लॅकस्टोनच्या लिहिण्यावरून दिसतें.

म्हणून सहजच न्यायविषयक व इतर व्यापार आपल्या प्रतिनिधींच्या हातीं राजा देऊं लागला म्हणजे त्यांनीं आपलें कार्य करावें एदतर्थ लोक त्यांसहि देणग्या देऊं लागतील; आणि ह्या देणग्या प्रारंभीं स्वैच्छिक

असून मागाहून जबरीच्या बनतील. ह्याबद्दलचा पुरावा प्राचीन लेखांवरून सांपडतो. बैबलावरून न्यायाधीश नजराणे घेत असें दिसतें; ज्याप्रमाणें हल्लींहि टर्किश म्याजिस्ट्रेट करीत असतात. किरधीजलोकांमध्यें तर न्यायाधीश दोन्ही पक्षकारांकडून नजराणे घेत असतो. सन १२५६ सालीं फ्रान्सांत राजानें असा हुकूम केला कीं, आपण नजराणे घेणार नाहीं, आणि निःपक्षपातानें न्याय करूं, अशी शपथ न्यायाधिशांनीं घ्यावी. तरी देखील तेथें न्यायाधीश नजराणे घेतच असत. ज्या पक्षकारासारखा खटला होईल त्याजपासून न्यायाधीश "मसाले" घेत असत. सन १३६९ च्या सुमारास त्यांच्याऐवजीं ते पैसे घेऊं लागले, आणि १४०२ सालीं त्यांस नियमित फीचें स्वरूप आलें. इंग्लंदच्या इतिहासांत बेकनच्या खटल्यावरून हा प्रघात त्याच्या अगोदरचा व सामान्य होता असें स्पष्ट दिसतें. स्थानिक बखरींवरून असें दिसतें कीं, न्यायाधीश व त्यांचे नोकर ह्यांस नजराणे देण्याची चाल इंग्लंदांत सामान्य होती; आणि एकादा मोठा माणूस म्याजिस्ट्रेट, किंवा मानकरी ह्याची गांठ घ्यावयाची म्हणजे बरोबर कांहीं दक्षिणा न्यावी लागत असे. दस्तऐवजांची नोंद करणारांस कांहीं फी देण्याची चाल सतराव्या शतकांत ठरीव झालेली होती. बाराव्या शतकांत राजवाड्यांतील मोठाल्या हुद्यांच्या नोकऱ्या लोक पैसे देऊन मिळवीत ह्यावरून नजराणे हाच त्यांच्याबद्दलचा काय तो पगार असें दिसतें, आणि नजराणेहि मोठाले असत असेंहि दिसतें. याबद्दल रशियामध्यें चांगला पुरावा सांपडतो. क-

राम्सिन, सोळाव्या शतकांत त्या देशांत जाऊन आलेल्या लोकांच्या आधारावर असें म्हणतो कीं, तेथील बादशाह फार श्रीमान् असे यांत नवल नाहीं; कारण तो आपल्या फौजेला पगार देत नाहीं, किंवा वकिलांनाहि देत नाहीं; उलट परदेशांतून ते ज्या मोलवान् चिजा आणितील त्या सर्व तो घेतो; तरी ते लोक त्याच्याविरुद्ध कधीं तक्रार करीत नाहींत. यावरून असें अनुमान निघतें कीं, त्यांस वरून पगार न मिळाल्यामुळें ते खालून देणग्या घेत असत. यावरून दुसरें असेंहि अनुमान निघतें कीं, हल्लीं तेथील हपीसर जो लांच म्हणून घेतात त्याची उत्पत्ति ह्या प्रारंभींच्या पगाराऐवजींच्या देणग्यांवरूनच झाली असावी. स्पेनविषयींहि असेंच अनुमान करतां येण्यासारखें आहे; त्याबद्दल रोजसाहेब म्हणतो कीं, तेथें न्यायाधीशापासून तों पोलीस शिपायापर्यंत लांच व लुच्चेगिरी हीं सर्वत्र सुरू आहेत. पण असें करण्यास त्या बापड्यांस अशी सबब आहे कीं, त्यांस स्प्यानिश सरकार पगार मुळींच देत नाहीं, आणि त्यांजपासून सर्व गोष्टींची अपेक्षा करितें.

विशिष्ट काम करून घेण्यासाठीं विशिष्ट रक्कम देण्याची गोष्ट संवयीमुळें आपणास इतकी स्वाभाविक झाली आहे कीं, कामगिरी व मुशाहिरा ह्यांमधील हा संबंध प्रारंभापासूनच चालू असेल असें आपण गृहीत करितों. पण जेव्हां आपण असें वाचितों कीं, बेचुआनालोकांसारख्या अल्पसंघटित समाजांमध्यें नाईक आपल्या नोकरांस अन्न किंवा दूध यांचा थोडकासा भाग देतात, आणि त्यांस कमी पडेल तें पारध करून किंवा

मुळें खणून त्यांनीं मिळवावें म्हणून त्यांस सांगतात; आणि जेव्हां असें वाचितों कीं, डेहामीसारख्या बऱ्याच पुढें सरसावलेल्या समाजांत कोणत्याहि सरकारी कामगारास पगार मिळत नाहीं; तेव्हां प्रारंभीं मुख्य माणसाचे चेल्यांस सरकारी रीतीनें निर्वाहसाधन मिळत नसल्यामुळें त्यांस तें स्वतःच कसें मिळवावें लागत असतें हें आपल्या ध्यानांत येतें. आणि त्यांना हातीं अधिकार असल्यामुळें लोकांस त्रास देण्याचें किंवा त्यांचा फायदा करून देण्याचें असल्यामुळें, मुख्यमाणसाप्रमाणें त्यांनाहि संतुष्ट ठेवण्याची इच्छा लोकांस सहजच होते; आणि अशा रीतीनें त्यांचींहि उत्पन्नें राजाप्रमाणें वाढत जातात.

३१. प्रथम मृत माणसाचा दुय्यम सर्व बाबतींत त्याच्यासारखाच समजला जात असल्यामुळें त्याच्याप्रमाणें त्यालाहि दुःख. थंडी, भूक, तहान इत्यादिकांची बाधा होत असते असें समजत असतात; आणि म्हणून त्यास खाद्य, पेय, वस्त्र इत्यादिकांचा पुरवठा केल्यानें ते संतुष्ट होतात असेंहि लोक समजतात. म्हणून प्रारंभीं मृतांस जे नजराणे देतात, ते जिवंतास ज्या हेतूनें देतात त्याच हेतूनें देत असतात.

ह्याचा पुरावा पृथ्वीवरील सर्व हलक्या समाजांतून सांपडतो. पापुअन, ताहितियन, सांडविचबेटवाले, मलाना, बदगा, क्यारेन, पेरुव्हियन, ब्राझिलियन वगैरे लोकांत मृतांच्या प्रेतांपाशीं खाद्य व पेय ठेवीत असतात. आफ्रिकेंतील शेरब्रो लोक, लोआंगो लोक, आंतीलनीग्रो, डेहामी लोक वगैरे; हिंदुस्थानांतील भिल, सां-

ताळ व कुकीलोक; अमेरिकेंतील क्यारिब, चिब्चा, व मेक्सिकनलोक, आणि प्राच्य देशांतील बहुतेक प्राचीनलोक इतक्यांमध्यें खाद्य व पेय प्रेत पुरल्यानंतर थडग्यापाशीं ठेवण्याची चाल आहे. एस्कीमोलोक मृताजवळ वस्त्रें नेऊन ठेवितात. पाटागोनियामध्यें थडगीं दरवर्षीं उघडितात आणि मृतांस पुनः वस्त्रें नेसवितात; आणि प्राचीन पेरूव्हियनलोक असेंच करीत. कांगोलोकांत राजा मेला म्हणजे वेळोवेळीं इतकीं वस्त्रें देतात कीं ज्या झोंपड्यांत राजाचें प्रेत ठेविलें असेल त्यांत तीं मावेनाशीं होऊन, दुसरें, तिसरें, चवथें, अशीं सहापर्यंत मोठालीं झोंपडीं त्यावर बांधितात. आणि कधीं कधीं, मांडलिकराजे मुख्यराजाच्या भुतास जे नजराणे देतात ते तो जिवंत असतां त्यास दिलेल्या देणग्यासारखेच असतात. उदाहरणार्थ, टांकिनमधील एका राजाच्या प्रेतविधीबद्दल टॅव्हर्नियर असें लिहितो कीं, " मागून सहा राजकन्या मृत राजाकरितां खाद्य व पेय घेऊन येतात. चार मुख्य परगण्यांचे चार सुभेदार खांद्यावर काठीला सोनें व सुवास ह्यांनीं भरलेल्या पिशव्या टांगून येतात, आणि हे त्या चार प्रांतांचे त्या मृतराजास परलोकीं उपयोगांत आणण्याचे नजराणे असतात." ह्यामध्यें त्यांचा उद्देश काय असतो हें पुढील उदाहरणावरून स्पष्ट दिसतें. न्यूकालिडोनियनलोकांचा नाईक आपल्या पूर्वजाच्या भुतास बळी देतांना असें म्हणतो, " दयाळू बापा, तुला हें अन्न अर्पीत आहें; हें तूं खा, आणि आमच्यावर दया कर." " तद्वतच, वेड्डाजातीचा माणूस मृत आप्तास नांवानें हाक मारून म्हणतो, ये

आणि हें अन्न ग्रहण कर. तूं जिवंत असतां जसें आमचें पोषण करीत होतास तसें कर." ह्यावरून स्पष्ट दिसतें कीं जिवंत माणसास नजराणा देण्यांत जो हेतु असतो तोच मृतास देण्यांतहि असतो; फरक एवढाच कीं एकेठिकाणीं नजराणा घेणारा दृश्य असतो, आणि दुसऱ्या ठिकाणीं अदृश्य असतो.

आतां मृतापासून बनलेल्या दैविक सत्त्वास जे विशेष नजराणे देतात त्यांचा विचार करूं. त्यांना द्यावयाच्या वस्तू आणि त्या देण्याचे हेतू पूर्वींचेच कायम राहतात; त्यांस शब्द मात्र निराळे लावितात; उदाहरणार्थ, जिवंत माणसास नजराणे द्यावयाचे असें म्हणतात, आणि देवास हवी अर्पण करावयाचे असें म्हणतात. म्हणून ह्या सादृश्याचा आतां बारीक रीतीनें विचार करूं.

जिवंत माणसास आणि त्याच्या भुतास संतुष्ट करण्यासाठीं जें खाद्य व पेय अर्पण करीत असतात तेंच देवतेस हवी देतांना मुख्यत्वेंकरून अर्पण करीत असतात. म्हणजे, प्रारंभीं राजास दिलेले नजराणे जसे पोषकपदार्थांचे बनलेले असतात, तसेच, मृतराजाच्या भुतापासून उत्क्रान्त झालेल्या देवासहि बळी पोषकपदार्थांचे देत असतात. ह्याचा पुरावा उच्चतर व नीचतर दोन्ही प्रकारच्या समाजांत दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, झुलू माणूस आपल्या मृत आप्ताच्या भुताची मर्जी संपादण्यासाठीं त्यास बैल मारून अर्पण करितो; कारण तो त्यास स्वप्नांत येऊन सांगतो कीं, मी उपाशीं मरत आहें. याच खासगी कृत्यापासून ज्यांच्यांत कांहीं ठराविक काळानें

राजाच्या मृतबापाच्या भुताचें संतर्पण करण्यासाठीं सार्वजनिकरीत्या बैल मारण्याची चाल उत्पन्न होते. त्याप्रमाणेंच इजिप्शन लोकांचा राजा शेंकडो बैल मारून त्यांचा नैवेद्य आपल्या मृतबापाच्या भुतास दाखवीत असे. आणि तद्वतच यहुद्यांच्या जाहवे देवास गुराढोरांचे बळी देत असत. ग्रीक लोकांत माणसांना जें जें द्यावयाचें तें तें देवांना देत असतः—माणसांना घरें तर देवांना देवळें; माणसांना खाद्य तर देवांना हवी; आणि माणसांना मेजें तर देवांना स्थंडिलें. तद्वतच जाहवेला मांस, भाकर, फळें, व मद्यें अर्पण करीत असत. खुद्द महाराणी व्हिक्टोरियास राज्याभिषेक केला तेव्हां तिनें आर्चबिशपाच्या हातानें स्थंडिलावर त्यास आच्छादण्याकरितां सोन्याचा रुमाल, आणि सोन्याचा गट अर्पण केला; शिवाय एक तरवार, नंतर भाकर व मद्य आणि नंतर सोन्याची पिशवी, हीं अर्पण करण्यांत आलीं, आणि शेवटीं हे हवी मान्य करण्याबद्दल देवास प्रार्थना करण्यांत आली.

ह्याप्रमाणें जगाच्या सर्व भागांतून असा पुरावा सांपडतो कीं हवी हे प्रथम खरोखरच नजराणे असतात. राजांस प्राणी अर्पण करितात, त्यांच्या थडग्यांवर त्यांस ठार करितात, आणि देवळांतून त्यांचे बळी देतात; रांधलेलें अन्न राजांस देतात, थडग्यांवर नेऊन ठेवितात, आणि स्थंडिलावर पसरितात; पहिलें पीक जिवंत शास्त्यांस देतात, मृत शास्त्यांस देतात, आणि देवांस अर्पितात; प्राचीन राजांपुढें धूप जाळीत असून, आणि कधीं कधीं इतर प्रसिद्ध पुरुषांपुढेंहि जाळीत असून,

पुष्कळ ठिकाणीं देवांपुढेंहि जाळितात. आणि ह्या सेव्य वस्तूंखेरीज प्रत्येक प्रकारच्या मोलवान् चिजा राजांची व देवांची मर्जी संपादण्यासाठीं देत असल्यामुळें सरकारी खजिने आणि पवित्र देवळें ह्यांमध्यें त्यांचा संचय जमत असतो.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट एथें सांगितली पाहिजे. आपण पाहिलें कीं दृश्यशास्त्यास केलेला नजराणा खराखुरा मोलवान् असल्यामुळेंच प्रथम संतर्पक होत असे, पण मागाहून राजनिष्ठेचा प्रदर्शक ह्या दृष्टीनें त्यास कृत्रिम संतर्पक किंमत प्राप्त झाली. तद्वतच, अदृश्यराजास दिलेले नजराणे प्रथम प्रत्यक्षरीत्या उपयुक्त म्हणून समजत असून मागाहून आज्ञाधारकत्वदर्शक म्हणून अप्रत्यक्षरीत्या ते उपयुक्त बनतात; आणि बळीचें अद्यापि कायम राहिलेलें विधिस्वरूप जें त्यास प्राप्त होतें तें ह्या दुसऱ्या अर्थीं प्राप्त होतें.

३२. ह्यापासून एक ध्यानांत ठेवण्यासारखा परिणाम उत्पन्न होतो. राजास दिलेल्या नजराण्यापासून अखेरीस जशी राजकीय उत्पन्नाची उत्पत्ति होते तशी देवास दिलेल्या नजराण्यापासून धार्मिक उत्पन्नाची उत्पत्ति होते.

आतां ज्या प्रारंभींच्या पायरीवर धार्मिक संघटना मुळींच नसते तेथून सुरुवात करूं या. या पायरीवर देवाला दिलेला नजराणा बहुधा तो देव आणि त्याचे पुजारी हे दोघे वांटून घेत असतात. एकीकडे अन्नाच्या अर्पणानें तो देव तृप्त होत असून दुसरीकडे त्याच्याबरोबर त्याचें सेवन केल्यानें त्याच्यामध्यें व त्याच्या

पूजकांमध्यें एकप्रकारचें संयोगबंधन स्थापन होतें; आणि तें, देवानें रक्षण करावें आणि पूजकांनीं त्याजवर निष्ठा ठेवावी, अशा स्वरूपाचें असतें. प्राथमिक माणसाची कल्पना अशी असते कीं वस्तूचा स्वभाव तिच्या सर्व भागांत वसत असल्यामुळें ती जे खातील त्यांच्यांत तो येतो; आणि म्हणून जे दोघे एकाद्या वस्तूचे भाग खातात त्यांच्यामध्यें कांहीं तरी सामान्य (परस्परसदृश) स्वभाव उत्पन्न होतो. ह्याच समजुतीवर एकमेकांचें रक्त सेविल्यानें बंधुत्वाचें नातें उत्पन्न होतें असें ते समजतात, रक्तसमर्पण करण्याचा प्रेतविधि उत्पन्न होतो, आणि एकच अन्न खाल्ल्यानें स्थापिलेल्या संबंधास जोर येतो. ह्याच समजुतीवरून देवास किंवा भुतास अर्पिलेल्याचा भाग खाण्याची चाल उत्पन्न होते. कांहीं ठिकाणीं सगळेच लोक ह्या हवीचा किंवा नैवेद्याचा भाग घेतात; कांहीं ठिकाणीं वैदू किंवा भट लोक तेवढेच त्याचा अंश ग्रहण करितात; आणि कांहीं ठिकाणीं दुसरा प्रघात नेहमींचा असून पहिला केवळ प्रासंगिक असतो. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकोमध्यें जे लोक हें पवित्र अन्न सेवितील त्यांनीं पुढें एक वर्ष देवाची सेवा करावी असें असे.

या ठिकाणीं आपण लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें उपयोगांत आणिलेल्या नजराण्यांपासून उपाध्यायवर्गाच्या निर्वाहाची उत्पत्ति होते. कुकीलोकांमध्यें उपाध्या ज्या रागावलेल्या देवानें कोणाला तरी आजारी केलें असेल त्यास गार करण्यासाठीं एकादें कोंबडें घेतो, आणि म्हणतो, देवाला तें पाहिजे आहे; असें

म्हणून तो त्याचें रक्त त्या देवाला नैवेद्य म्हणून जमिनीवर ओतितो, आणि तोंडानें त्याची स्तुति पुटपुटतो; नंतर शांतपणानें खालीं बसतो, तें कोंबडें भाजितो, आणि खातो; आणि पंख वगैरे जंगलांत फेंकून देऊन, घरीं परत येतो. सुमात्रामधील बट्टालोक आपल्या देवांस घोडे, रेडे, बकरे, कुत्रे, कोंबडीं, किंवा जादूटोणा करणाराचें त्यावेळीं ज्या जनावराच्या मांसावर विशेष मन गेलें असेल तें, अर्पण करितात. आणि हिंदुस्थानांतील बुस्तरटोळ्यांचे लोक कोडोपेन देवाची कोंबडीं, अंडीं, धान्य आणि थोडेसे पैसे इतक्या जिनसांनीं उपाध्याच्या द्वारा पूजा करितात, आणि ते जिन्नस मग त्या उपाध्याला मिळतात. आफ्रिकेमध्यें ह्याच्याहून अधिक पुढें गेलेल्या समाजांतूनहि असल्याच व्यवस्था दृष्टीस पडतात. डेहामीमध्यें उपाध्येवर्गास ठराविक पगार नसतो, तर ते भक्तांनीं देवास दिलेल्या जिनसांवर निर्वाह करितात. आशान्टीमध्यें असेंच आहे; तेथें देवापुढें भाविकलोक जें ठेवितील त्यांतील अर्धें उपाध्याचें असतें, पालिनिशियामध्येंहि असेंच आहे. ताहितीमधील डाक्टर हा बहुतकरून उपाध्या असतो असें सांगून एलिस असें म्हणतो कीं, तो जी फी घेतो त्याचा एक भाग देवाचा म्हणून समजला जातो. मध्यअमेरिकेंतील प्राचीन राष्ट्रांतून असेंच असे. पेरूमध्यें मृतांची पूजा हाच जिवंतांचा मुख्य उद्योग असून भुतांस व देवांस दिलेल्या देणग्या जमून जमून देवांचीं मोठालीं इस्टेटें बनलेलीं होतीं; आणि त्यांतून सर्व उपाध्यांचा उदरनिर्वाह होत असे. प्राचीन ऐतिहासिक लोकांमध्यें असलीच

गोष्ट आढळून येते. उदाहरणार्थ, ग्रीकलोकांत नैवेद्याचा जो भाग शिल्लक राहील तो उपाध्याचा असे. हीब्रूलोकांतहि असेंच असे. प्रारंभींच्या ख्रिस्ती धर्माचा इतिहास पाहतां तीच गोष्ट दृष्टीस पडते. उपाध्यांचा निर्वाह लोकांनीं स्वेच्छेनें दिलेल्या बळींवर होत असे. पुढें त्यांस ज्यास्त ठराविक वेतनें देऊं लागले; तरी ही स्वेच्छादानपद्धति सुरूच होती. पुढें मध्ययुगांत यामध्यें आणखी एक फेरबदल उत्पन्न झाला. तो हा कीं देवाला दिलेले हे नजराणे देवळांत न नेतां परस्पर बिशपांकडेच नेऊं लागले. आणि नंतर असल्या देणग्या वाढत जाऊन आणि त्यांस मृत्युपत्रानें दिलेल्या देणग्यांचें स्वरूप येऊन त्यांपासून धर्मसंस्थानाच्या उत्पन्नांची उत्पत्ति झाली.

३३. आतांपर्यंत कनिष्ठांनीं श्रेष्ठांस दिलेल्या नजराण्यांचा तेवढा विचार केलेला आहे; श्रेष्ठांनीं कनिष्ठांस दिलेल्या देणग्यांचा विचार केलेला नाहीं. चीन देशाप्रमाणें ज्या ठिकाणीं ह्या चालीस फार प्रौढ स्वरूप आलेलें आहे तेथें ह्या दोन प्रकारच्या देणग्या देण्याच्या हेतूंमधील भेद चांगला ओळखला जातो. श्रेष्ठ व कनिष्ठ ह्यांच्या ठराविक भेटींच्यावेळीं किंवा नंतर ते एकमेकांस नजराणे देतात; पण श्रेष्ठांच्या नजराण्यांस देणग्या म्हणतात, आणि कनिष्ठांच्यास हवी किंवा बळी असें म्हणतात. असो. म्हणून आतां देणग्यांच्या संबंधानें येथें दोन शब्द लिहूं.

राजकीय मुख्याची शक्ति जशी वाढत जाते, तशी शेवटीं अशी स्थिति उत्पन्न होते कीं, त्या स्थितींत

त्यानें जें आपल्याकरितांच म्हणून ठेविलें असेल त्यांपैकीं कांहीं भाग लोकांस परत देणें त्यास आवश्यक भासूं लागतें; आणि जे त्याचे आश्रित त्यास पूर्वी कांहीं देऊन त्याचे अंकित बनलेले असतात ते आतां त्याजपासून कांहीं घेऊन त्याचे ज्यास्त अंकित बनतात. कुकीलोकांसारख्या ज्या लोकांमध्यें राजाच्या परवानगीनें काय ती लोकांस कोणतीहि मालमत्ता आपलीशी म्हणतां येते, किंवा डेहामींतीलसारख्या ज्या लोकांमध्यें माणसांच्या देहांवर व वित्तावर राजाचीच पूर्ण सत्ता असते, त्या ठिकाणीं सर्व मालमत्ता राजाकडे गेलेली असल्यामुळें तिच्यापैकीं फाजील ती मालमत्ता लोकांकडे परत आलीच पाहिजे. म्हणून डेहामीमध्यें कोणत्याहि सरकारी हपीसरास जरी पगार म्हणून मुळींच नाहीं, तरी राजा त्यास देणग्या देत असतो. प्राचीन जर्मनलोकांबद्दल टासीटस असें म्हणतो कीं, नायकानें देणग्यांच्या बाबतींत सढैल हात सोडावा अशी लोक अपेक्षा करीत असतात, आणि तसें त्यास करावेंच लागतें. राजाच्या घरीं नेहमीं विपुल अन्न शिजलें पाहिजे; कारण लोकांना पगार काय तो हाच असतो. फ्रान्सांत तेराव्या शतकांत राजाचे आप्त, मोठाले हपीसर, वगैरे लोकांनीं भपक्याचे पोषाक करावे म्हणून ते राजा त्यांस योग्यप्रसंगीं बक्षीस म्हणून देत असे. ह्याच काळीं सर्व यूरोपभर राजे, ड्यूक, सरदार वगैरे बडे लोक आपल्या आश्रितांस रोज पोशीत आणि शिवाय कधीं कधीं इनामें देत असत.

एवंच असें स्पष्ट दिसतें कीं, एकीकडे लोकांनीं राजास दिलेल्या नजराण्यांपासून जशी खंडण्या, कर,

आणि फीच्या रकमा यांची उत्पत्ति असते, तशी दुसरीकडे राजांनीं लोकांस दिलेल्या देणग्यांपासून शेवटीं ठराविक वेतनांची किंवा पगारांची उत्पत्ति होते.

३४. ज्या लोकांमध्यें श्रेष्ठ व कनिष्ठ असे स्पष्ट संबंध नाहींत असे लोक जे एकमेकांस नजराणे करितात त्यांबद्दल दोन शब्द येथें सांगितले पाहिजेत.

ह्यांचा विचार आपण करूं लागलों म्हणजे परस्परांना परकी अशा समाजांमध्यें नजराणे देण्याचा जो प्रकार आहे तोंपावेतों जातां जातां आपण मागें जातों; आणि तद्विषयक कांहीं गोष्टींवरून एक बराच महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न होतो. तो हा कीं, ह्या नजराणे देण्याघेण्यापासून दुसऱ्या एका महत्त्वाच्या सामाजिक व्यापाराची उत्पत्ति होते कीं काय? मोबदला हा व्यापार सर्वांस समजत असेल असें आपणास वाटतें; पण तसा तो समजत नाहीं. आस्ट्रेलियन लोकांशीं कोणत्याहि जिन्नसांची अदलाबदल करितां येईना त्यास अनुलक्षून कुक म्हणतो कीं, त्यांस व्यापाराची कल्पना मुळींच नव्हती. त्याच्या दुसऱ्या कांहीं विधानांवरून असें दिसतें कीं, अदलाबदलीस जेव्हां प्रथम सुरुवात होते तेव्हां दिलेल्या वस्तू आणि बदल घेतलेल्या वस्तू ह्या किंमतीनें सारख्या असाव्या ही कल्पना बहुतेक मुळींच उत्पन्न झालेली नसते. ज्या आस्टियाकलोकांनीं बेल यास पुष्कळ माणसें व रानकोंबडीं दिलीं त्यांच्यासंबंधानें तो म्हणतो कीं, त्यांस थोडासा तंबाकू आणि दारू दिली म्हणजे ते ज्यास्त कांहीं मागत नाहींत; कारण त्यांस पैशाचा उपयोग माहीत नाहीं. प्रारंभीं किंमती मोजण्याचें

साधन कांहींच नसतें, आणि अदलाबदल करावयाच्या वस्तू किंमतीनें सारख्या असाव्या ही कल्पना प्रत्यक्ष व्यवहारावरून उत्पन्न होत असते; ह्या गोष्टी ध्यानांत आणतां, ही गोष्ट संभवनीय दिसते कीं, देणग्या देऊन एकमेकांचें संतर्पण करण्याच्या चालीपासून विनिमयाची उत्पत्ति झाली असेल. म्हणजे, मिळणारी देणगी दिलेल्या देणगीच्या बरोबरीची असावी ही समजूत हळू हळू उत्पन्न झाली असेल, आणि त्याबरोबरच दिल्याघेतलेल्या वस्तूंचें देणगीचें स्वरूप नष्ट झालें असेल. यूरोपियन प्रवासी आफ्रिका वगैरे खंडांतून चालले असतां तेथील स्थानिक नायकांस जे नजराणे देत असतात त्यांवरून देखील हा संबंध ध्यानांत येण्यासारखा आहे. उदाहरणार्थ, मंगोपार्क असें लिहितोः-जुलीफंडाचा मुख्य माणूस यास कांहीं स्फटिक, पोंवळीं, आणि जांभळा रंग नजर केला; त्यानें तो अगदीं संतुष्ट झालेला दिसला, आणि परत त्यानें एक बैल पाठविला. असल्या व्यापारांवरून, प्रथम देणाराची देणगी संतर्पक असते, आणि मागून देणाराची परत देणगी जवळ जवळ तितक्याच किंमतीची असते, आणि अशा रीतीनें अप्रत्यक्ष विनिमयास सुरवात होते, ह्या गोष्टी लक्षांत येतात. इतकेंच नाहीं; तर उत्तरअमेरिकेंतील कांहीं इंदियनलोकांच्या चालींवरून, संतर्पक देणग्यांवरून नाण्याचीहि उत्पत्ति कशी होत असेल हें लक्षांत येतें. उदाहरणार्थ, क्याट्लिन असें लिहितोः-या लोकांमध्यें नाण्याची माहिती नसल्यामुळें शिंपा व मणी यांचा ते नाण्याऐवजीं उपयोग करितात, व त्यांस फार मोलवान् समजतात; आणि

घोडा, बंदूक, आंगरखा, याला इतक्या शिंपांच्या किंवा मण्यांच्या माळा, अशी ठराविक किंमत घेतात. तह करतांना त्यांचे केलेले पट्टे स्नेहाची खूण म्हणून शत्रूकडे पाठवितात, किंवा जेत्या शत्रूस खंडणी म्हणून देतात.

हा विचार आतां बाजूस ठेवून संतर्पक नजराण्यास सामाजिकविधीचें स्वरूप कसें येतें तें पाहूं. प्रथम तो राजनिष्ठेचा दर्शक असून मागून त्याचा उपयोग स्नेहसाधन म्हणूनहि करितात, ह्याचें उदाहरण प्राचीन अमेरिकेंत दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, युकाटानीसलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं ते कोणास भेटावयास गेले म्हणजे नेहमीं आपल्या योग्यतेप्रमाणें नजराणे घेऊन जातात, आणि त्यांस तसलेच नजराणे परतहि मिळतात. जपानमध्यें विधींचें हें बंड फार असल्यामुळें याच्या निरनिराळ्या पायऱ्या चांगल्या दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, राजनिष्ठाप्रदर्शनार्थ मिकाडोस कांहीं ठराविक कालानें नजराणे नेत असतात, शिवाय कनिष्ठ लोक श्रेष्ठांकडे नजराणे नेत असतात; आणि सारख्या योग्यतेचे लोक एकमेकांच्या घरीं प्रथम गेले म्हणजे असेंच करितात. इतर जातींमध्यें या परस्परसंतर्पणास अन्यस्वरूपें येतात. उदाहरणार्थ, हिमालयांतील डोंगरी लोकांबद्दल मार्कहॅम असें सांगतो कीं, खालीं मैदानावर राहणारे लोक जसे स्नेहप्रदर्शनार्थ एकमेकांस पागोटीं देतात, तसे हे डोंगरीलोक एकमेकांस टोप्या देतात. भूतानमध्यें या विधीस याहूनहि विलक्षण स्वरूप येतें; कारण ते एकमेकांस प्रत्येकप्रसंगीं लहान लहान रेशमी शेले नजर करितात; इतकेंच नाहीं, तर एकमेकांस पत्रें

पाठवितांना देखील पत्राच्या पाकिटांत त्याची लहानशी गुंडाळी पाठवितात; मग तें कितीहि दूर पाठवावयाचें असो.

नजराणे देण्याची चाल प्रथम मुख्यशास्त्याच्या भीतीमुळें विधिस्वरूपास पावून, आणि प्रबलाच्या भीतीनें तीस ज्यास्त विस्तृत स्वरूप येऊन, आणि शेवटीं समशीलांसहि न संतर्पिल्यास ते शत्रू बनतील या भीतीनें त्यांच्याप्रतहि ती कशी लागू करितात, ही गोष्ट यूरोपच्या इतिहासावरून चांगली दिसते. उदाहरणार्थ, यूरोपांत सर्वजण पाडव्याच्या दिवशीं भेटी देत व घेत. आश्रितलोक त्या आपल्या यजमानांस देत, व सर्व रोमनलोक बादशाहास देत. बादशाह परत त्यांस तेवढ्याच किंमतीच्या किंवा ज्यास्त किंमतीच्या देणग्या देई. पुढें युरोपांत जेव्हां ख्रिस्ती धर्म सुरू झाला तेव्हां ही पूर्वींची अन्यधर्मीयांची चाल म्हणून धर्माधिकारी लोक तिचा निषेध करूं लागले. तरी ती परवांपर्यंत सुरूच होती. शिवाय त्याबरोबरच दुसरे कांहीं कालिकविधि सुरू झाले; उदाहरणार्थ, फ्रान्सांत ईस्टरच्या सणाच्या वेळीं अंडीं देण्याची चाल सुरू झाली. आणि ह्या नजराण्यांमध्यें इतर नजराण्यांसारखेच फेरबदल झाले आहेत; म्हणजे, त्यांस स्वैच्छिक म्हणून सुरवात होऊन पुढें ते कांहींअंशीं जबरीचे बनलेले आहेत.

३५. एवंच, देणगी ही प्राथमिकमाणसांत प्रसन्नता संपादन करण्यासाठीं देत असून, समाजाचें जसें उत्क्रमण होत जाईल तशा तिजपासून पुष्कळ गोष्टी उत्पन्न होतात.

राजकीय मुख्याची सत्ता जशी वाढत जाईल तसे

लोक त्यास कांहीं अंशीं भीतीनें आणि कांहीं अंशीं त्याची मदत मिळावी म्हणून नजराणे देऊं लागतात; आणि असले नजराणे प्रथम त्यांच्या अस्सल किंमतीवरूनच संतर्पक असून मागून ते राजनिष्ठेचे प्रदर्शक म्हणून संतर्पक होऊं लागतात; ह्या दुसऱ्या गोष्टीमुळेंच नजराणे देण्याच्या क्रियेस विधीचें स्वरूप येतें, आणि पहिल्या गोष्टीमुळें तीस खंडणीचें स्वरूप येऊन शेवटीं करांचें स्वरूप येतें. त्याबरोबरच मृतमाणसाच्या पिशाचास खुष करण्याकरितां त्याच्या थडग्याजवळ ठेविलेल्या अन्न वगैरे सामग्रीस प्रसिद्ध माणसाच्या थडग्यांशीं वरचेवर द्यावयाच्या व मोठाल्या हवींचें रूप येऊन शेवटीं त्यांस देवाच्या स्थंडिलापाशीं द्यावयाच्या बळीचें स्वरूप येतें; आणि अशा रीतीनें यांच्यांतहि वरच्यासारखेच फेरबदल होत जातात; म्हणजे, खाद्य, पेय, किंवा वस्त्रें ह्यांचा नजराणा प्रत्यक्ष उपयुक्त म्हणूनच प्रथम संतर्पक समजला जात असून, मागून तो निष्ठेचा प्रदर्शक होऊन जातो. म्हणून देणगी देण्याच्या क्रियेस, वस्तूची किंमत लक्षांत न घेतां, केवळ पूजा करण्याच्या क्रियेचें स्वरूप येतें; इकडे, असल्या देणग्यांमुळें पूजकास निर्वाहसाधन प्राप्त होऊन, पूजकवर्गाची उत्पत्ति होणें शक्य होतें. म्हणजे. हवीपासून धर्मसंस्थानांच्या उत्पन्नाची उत्पत्ति होते.

एवंच, विधिरूप नियंत्रण राजकीय व धार्मिक नियंत्रणांच्या अगोदर येतें ह्याबद्दल आणखी पुरावा अकस्मात् आपल्या नजरेस येतो; कारण वरील विवेचनावरून असें स्पष्ट होतें कीं, पहिल्या नियंत्रणापासून ज्या

कृतींस सुरवात होते त्यांपासून दुसऱ्या नियंत्रणसंस्थांस पोसणारीं उत्पन्नें शेवटीं उत्पन्न होतात.

नजराणे देण्याच्या चालीचा निरनिराळ्या समाजनमुन्यांशीं काय संबंध आहे असा प्रश्न केला असतां, पहिली गोष्ट आपल्या ध्यानांत अशी येते कीं, सरल समाजांत नायकी मुळींच नसल्यामुळें किंवा अस्थिर असल्यामुळें, ती फारशी दृष्टीस पडत नाहीं. उलटपक्षीं, संयुक्त आणि दुबारसंयुक्त समाजांत ती बरीच दृष्टीस पडते; उदाहरणार्थ, आफ्रिकेच्या सर्व अर्धवट सुधारलेल्या राष्ट्रांत, पालिनिशियाच्या राष्ट्रांत, आणि प्राचीन अमेरिकेच्या राष्ट्रांत; कारण असल्या समाजांत प्राथमिक व दुय्यम नायक्या स्थाईक असल्यामुळें नजराणे देण्यास संधि सांपडते, व हेतुहि उत्पन्न होतो. हें सत्य ध्यानांत आणिलें म्हणजे त्यावरून त्याच्याहून अधिक खोल असें दुसरें सत्यहि ध्यानांत येतें; तें हें कीं, नजराण्याची चाल समाजाच्या सरल वा संयुक्त ह्या स्वरूपाशीं जरी अप्रत्यक्षरीत्या संबद्ध आहे, तरी त्याच्या कमी किंवा ज्यास्त युद्धशील घटनेशीं ती प्रत्यक्षरीत्या संबद्ध आहे. ज्या पुरुषाचें संतर्पण करावयाचें त्याच्याबद्दलची भीति जितकी ज्यास्त वाटत असेल तितकी त्यास खुष करण्याची इच्छा लोकांच्या मनांत ज्यास्त असते; आणि म्हणून जेत्या नायकास, आणि त्याच्याहून ज्यास्त, ज्या राजानें लढाई करून आपणास पुष्कळ नायकांचा मुख्य करून घेतलें असेल त्यास, खुष करण्यास आणि त्याच्याप्रत अंकितभाव व्यक्त करण्यास लोक फारच उत्सुक असतात. म्हणून जे समाज प्रस्तुत युद्धशील अ-

सतील, किंवा जे पूर्वीं युद्धशील असून ज्यांच्यांत युद्ध-शीलघटनेस योग्य असें स्वैच्छिक सरकार स्थापन झालेलें आहे, अशा समाजांत राजास नजराणे देण्याचा विधि सर्वांत ज्यास्त दृष्टीस पडतो. म्हणून सर्व प्राच्य देशांत असलीं सरकारें सर्वत्र असल्यामुळें अधिकाऱ्यांस नजराणे पाठविण्याची चाल सर्वत्र सुरू आहे. म्हणूनच, यूरोपांत प्रारंभीं प्रारंभीं समाज मुख्यत्वेंकरून युद्धशील असतां व्यक्तींनीं व संयुक्तमंडळांनीं राजास नजराणे देण्याची चाल सार्वत्रिक होती; शिवाय, युद्धशीलतेबरोबर लोकांची स्थिति पूर्ण परवशतेची असल्यामुळें श्रेष्ठांनीं कनिष्ठांस देणग्या देण्याचीहि चाल सामान्यच होती.

धार्मिक नजराण्यांमध्येंहि असलाच संबंध दृष्टीस पडतो. अमेरिकेंतील प्राचीन युद्धशील राष्ट्रांमध्यें देवांस नेहमीं बळी अर्पण करीत असत, आणि त्यांच्या देवळांना मौल्यवान् नजराण्यांचा प्रवाह सारखा सुरू असे. ताडपत्र्यांवरील लेख, भिंतींवरील चित्रें, आणि खोदिव कामें, ह्या सर्वांवरून असें दिसतें कीं, प्राचीन प्राच्य राष्ट्रें फार युद्धशील असून त्यांच्यांत देवांस मोठाले हवी वरचेवर देत असत; आणि त्यांच्या देवळांचें वैभव वाढविण्याकरितां त्यांस उत्पन्नें लावून देत असत. यूरोपांत प्रारंभींच्या युद्धशीलकाळीं देवांस व देवळांस हल्लींच्या उद्यमशील कालापेक्षां देणग्या ज्यास्त लोक व ज्यास्त मोठ्या देत असत. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी अशी आहे कीं, प्राटेस्टंट राष्ट्रांपेक्षां क्याथलिक राष्ट्रें रचनेनें ज्यास्त युद्धशील असल्यामुळें कांहीं धर्मविधींच्या समयीं भाकर व दारू हीं देवांस अर्पण

करून मग स्वतः सेवन करण्याची चाल त्यांच्यांत ज्यास्त आहे. तद्वतच प्राटेस्टंटलोकांपेक्षां केकरलोकांची धर्मसंस्था बिशप वगैरे नसून ज्यास्त स्वतंत्र असल्यामुळें त्यांच्यांत प्राटेस्टंटांपेक्षां बलिविषयक विधींचें बंड फारच कमी आहे.

सामाजिक संतर्पणासाठीं नजराणे देण्याची जी चाल आहे तिचीहि गोष्ट अशीच आहे. यूरोपियन राष्ट्रांची परस्परांशीं तुलना करतां ही गोष्ट आपल्या लक्षांत येते; कारण तीं राष्ट्रें प्रगतीच्या संबंधानें जरी परस्परसदृश आहेत तरी युद्धशीलतेवर उद्यमशीलतेचा पगडा त्यांच्यांत कमजास्त बसलेला आहे. उदाहरणार्थ, जर्मनी व फ्रान्स हे देश इंग्लंदापेक्षां घटनेनें ज्यास्त युद्धशील असल्यामुळें, जर्मनींत आप्त व मित्र यांनीं एकमेकांस देणग्या देण्याची चाल सार्वत्रिक आहे; आणि फ्रान्सांत पाडव्याच्या व ईस्टर सणाच्यावेळीं हें ओझें लोकांस इतकें जड वाटतें कीं, पुष्कळवेळां तें चुकविण्यासाठीं लोक घरें सोडून अन्यत्र देखील जातात.

म्हणून गतप्रकरणांतून निरूपिलेल्या विधींप्रमाणें प्रस्तुत प्रकरणांत निरूपिलेल्या विधीच्या संबंधानें आपणास असें म्हणतां येईल कीं, युद्धशीलतेबरोबर जी राजकीय नायकी स्थापन होते तिच्याबरोबर त्यास प्रथम आकार प्राप्त होऊन, युद्धशीलता वाढत जाईल तसा तो पक्क होत जातो, आणि उद्यमशीलता वाढत जाईल तसा तो क्षीण होत जातो.

प्रकरण पांचवें

भेटी

३६. एकादा माणूस एकाद्या वाईट मनुष्याच्या घरीं त्यास दोष द्यावयास जाईल, किंवा कोणी गरीब माणूस संकटांत असतां त्यास मदत करावयास जाईल, किंवा एकादा विलक्षण माणूस म्हणून प्रसिद्ध असल्यास त्यास पहावयास जाईल. म्हणजे काय, तर, भेट म्हटली म्हणजे ती निसर्गतः अंकितभावदर्शक असतेच असें नाहीं. तथापि कांहींप्रकारच्या भेटी बाह्यतः निष्ठादर्शक असतात. प्राथमिकस्वरूपीं नजराणा देणें ह्याचा अर्थ ज्यास तो केला असेल त्यास भेटावयास जाणें असा असतो. म्हणून, साहचर्यानें, ही क्रियाच सन्मानदर्शक बनते, आणि शेवटीं तीस सन्मानदर्शकविधीचें स्वरूप येतें.

आतां एकदां स्वैच्छिक असलेला नजराणा मागून जसा जबरीचा बनतो, आणि शेवटीं त्यास कालिकखंडाचें स्वरूप येतें, तद्वतच, त्याबरोबर येणारी जी भेट तिचें स्वैच्छिकस्वरूप निघून जातें, आणि राजकीय श्रेष्ठत्व प्रबल होत जाईल तसें तीस राजकीयशास्त्यानें अमुक अमुक वेळीं म्हणून आज्ञापिलेल्या अंकितपणाच्या खुणेचें स्वरूप येतें.

३७. आतां ज्या ठिकाणीं सत्ता मुख्यत्वेंकरून अनिश्चित असेल तेथें सहजच या विधीस निश्चित स्वरूप येत नाहीं; म्हणून तो सरल टोळ्यांतून फारसा दृष्टीस पडत नाहीं. कांहीं अंशीं संयुक्त बनलेल्या समाजांमध्यें देखील कनिष्ठ शास्ते व श्रेष्ठ शास्ते ह्यांमधील

व्यवहारांत तो जितका दिसून येतो, तितका सामान्यलोक आणि त्यांच्या वरच्या पायरीचे शास्ते यांमधील व्यवहारांत दिसत नाहीं. तथापि कांहीं ठिकाणीं लोक आपल्या स्थानिक शास्त्यांस भेटावयास जात असतात. उदाहरणार्थ, जोलाफ नांवाचे नीग्रोलोक रोज आपल्या गांवनाईकांकडे भेटावयास जात असतात; आणि काफिरलोकांमध्येंहि टोळींतील मुख्य लोक नायकास नमस्कार करण्यासाठीं त्याच्या वाड्यांत रोज जात असतात.

परंतु विधिरूप भेटी मुख्यत्वेंकरून ज्या देतात त्या दुय्यम शास्ते, आणि कांहीं विशिष्टदर्जाचे अधिकारी, मुख्य शास्त्यास ज्या देतात त्या होत. ज्या संयुक्तसमाजांतील मुख्य शास्त्यानें गौण शास्त्यांवर विजय मिळविलेला असेल त्या ठिकाणीं त्यांनीं आपली राजनिष्ठा कांहीं कांहीं काळानें व्यक्त करणें जरूरच असतें. मुख्य शास्त्यास ते बंडें करितील कीं काय असा संशय येऊन तो त्यांस वरचेवर आपल्याकडे भेटावयास येण्याची सक्ती करीत असतो. एणेंकरून त्याचा संशय दूर होऊन, शिवाय, त्यांनीं आणिलेले नजराणे आणि केलेलीं वंदनें यांच्यायोगानें त्यांच्या आपल्यावरील निष्ठेबद्दल त्यास खातरजमा येते.

म्हणून संयुक्तसमाजांत राजास केव्हां केव्हां भेटावयास जाणें हा राजकीय विधि बनतो. प्राचीन पेरूमधील एका जितराष्ट्राबद्दल आपण असें वाचितों कीं, वर्षाचे कांहीं महिने त्यांनीं राजाच्या दरबारीं रहावें असा त्यांतील नायकांस हुकूम असे. प्राचीन मेक्सिकोमध्यें असल्याच कारणावरून असलीच स्थिति उत्पन्न झालेली

होती. चालको प्रांत जिंकल्यानंतर तेथील नायकांनीं वर्षांतून दोनदां आपणास भेटावयास यावें असें मेक्सिकोच्या दुसऱ्या मांटेझूमा राजानें त्यांस फर्माविलें होतें. आफ्रिकेमध्येंहि असेंच आहे. उदाहरणार्थ, आशान्टीमध्यें. डेहामीमध्यें ह्या भेटी अंकितभावदर्शकच असतात हें ह्यावरून दिसतें कीं तेथें राजानें आपल्या अत्युच्च कामगारांस देखील भेटावयास जातां कामा नये. मादागास्कार व सयाम या देशांत सुभेदारांस किंवा राजाच्या प्रतिनिधींस देखील लोक भेटावयास जात असतात ह्यावरून भेटींचें राजकीय महत्त्व लक्षांत येतें. टाव्हर्नियरनें केलेल्या वर्णनावरून मोंगलांच्या राज्यांत ही चाल किती पुढें गेली होती हें स्पष्ट दिसतें. कारण तेथें दरबारांतील सर्व कामदारांनीं बादशहास दिवसांतून दोनदां भेटावयास जावें असें असे; एकदां सकाळीं दहा अकरा वाजतां, आणि एकदां संध्याकाळीं सहा वाजतां; ह्यांत कोणी चुकल्यास त्यास बरीच शिक्षा होत असे. हल्लीं काश्मीर व जम्मू एथें असेंच आहे. परवांपर्यंत जपानमध्यें ही चाल होती. उदाहरणार्थ, वर्षांतून एकदां तेथील ऐहिक राजा मिकाडोस भेटावयास जात असे; प्रथम स्वतः, आणि मागून प्रतिनिधिमार्फत; शिवाय, वर्षांतून एकदां श्रेष्ठ सरदार मिकाडोस भेटावयात जात, आणि कनिष्ठ सरदार त्याच्या प्रधानांस भेटावयास जात. शिवाय कांहीं सरदारांनीं सहा महिने स्वतःच्या मुलखांत राहून सहा महिने जेड्डो येथें बादशहाच्या दरबारीं रहावें, आणि त्यांस जामीन म्हणून त्यांच्या बायकांनीं नेहमींच राजवाड्यांत रहावें, असें असे.

यूरोपांत फयूडलपद्धतीच्या अमदानींत असल्याच कारणावरून असल्याच चाली उत्पन्न झालेल्या होत्या. कनिष्ठ जमीनदार वरिष्ठ जमीनदारांस आणि वरिष्ठ जमीनदार राजास कालाकालानें भेटावयास जात असत; ह्यापासून राजदरबारीं पुष्कळ दिवस राहण्याची चाल उत्पन्न झाली; आणि ह्या भेटी राजनिष्ठाप्रदर्शक समजल्या जाऊं लागल्यामुळें, त्या देण्यास चुकणें हें राजद्रोहाचें दर्शक समजूं लागले. फ्रान्सांत असेंच असे; आणि इंग्लंदांतहि मोठाले कामगार व सरदार ह्यांनीं राजनिष्ठाप्रदर्शनासाठीं राजास कधीं कधीं भेटावयास जावें असें आहेच.

३८. गतप्रकरणांत आपल्या नजरेस असें आलें कीं जिवंतमाणसांप्रमाणें मृतमाणसांसहि नजराणे देत असतात. ह्या ठिकाणीं आपणास ही गोष्ट लक्षांत आणावयाची आहे कीं जिवंतमाणसांप्रमाणें मृतांसहि भेटावयास जात असतात.

प्राथमिक माणसाच्या समजुतीप्रमाणें माणसें मेलीं म्हणजे त्यांचें सामर्थ्य पूर्वींहून अधिक होत असल्यामुळें, जिवंतांस भेटी देण्याच्या अगोदरच मृतांस भेटी देऊं लागतात. उदाहरणार्थ, एस्किमोलोकांमध्यें नाईक नसल्यामुळें राजनिष्ठाप्रदर्शक भेटी त्यांच्यामध्यें देण्याची चाल नाहीं; तरी मृत आप्तांच्या थडग्यांप्रत ते कधीं कधीं देणग्या घेऊन जात असतात. अशा प्रकारच्या यात्रा रानटी व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें पुष्कळ लोक करीत असतात; आणि पुढें ह्या प्रवासांत हळूहळू अर्धवट धार्मिक व धार्मिक अशा यात्रांचें स्वरूप येतें.

देवभूत झालेले आणि देवभूत न झालेले अशा मृत-

लोकांस दिलेल्या ह्या भेटी आणि जिवंतांस दिलेल्या भेटी ह्यांमध्यें संबंध किती निकट आहे ह्याबद्दलचीं दोन उदाहरणें बऱ्याच पुढें गेलेल्या समाजांतून आतां देऊं. " ऑल सेंट्स् डे " ह्या सणाच्या दिवशीं स्पेनदेशांत लोक काय काय करितात ह्याचें वर्णन रोजसाहेब असें करितोः—हा सण तीन दिवस पाळीत असतात; आणि त्यावेळीं रस्त्यांतून लोकांची फार गर्दी असते; तथापि ते आपल्या मृताच्या घरीं जाण्यास व सन्मानपूर्वक त्याचें दर्शन घेण्यास विसरत नाहींत. जपानांत सांसारिक व धार्मिक ह्यांमध्यें फारसा भेद करीत नसल्यामुळें देव, पूर्वज, श्रेष्ठ, आणि बरोबरीचे, ह्यांस द्यावयाच्या ज्या ह्या भेटी त्यांमध्यें फार निकट साहचर्य दिसतें. कारण सणाच्या दिवशीं ते केवळ देवांस व मोठाल्या मृतमाणसांच्या थडग्यांस भेटावयास जातात इतकेंच नाहीं, तर त्यांचे श्रेष्ठ, मित्र आणि आप्त ह्यांसहि भेटावयास जात असतात. शिवाय त्या लोकांमध्यें मिकाडो हा ह्या जगाचा व परलोकचाहि शास्ता समजला जात असल्यामुळें, देवदेखील त्यास त्यांच्या वर्षाच्या दहाव्या महिन्यांत भेटावयास जात असतात, व त्यामुळें त्या महिन्यांत ते देवळांतून नसतात, असें समजतात.

ह्या व दुसऱ्या पुष्कळ असल्याच उदाहरणांवरून असा सिद्धांत सहजच निघतो कीं, कधीं मृतांस व कधीं जिवंतांस दिलेल्या ज्या ह्या भेटी त्यांपासूनच ज्यांस आपण धार्मिक म्हणतों त्या भेटींची उत्पत्ति होते. सारांश, देवळास जाणें आणि दरबारास जाणें ह्या दोन गोष्टी बाहेरून जरी अगदीं भिन्न दिसतात, तरी त्यांचा मूळ

उगम एकच आहे. आतां तो उगम एकच म्हणून प्रथमदर्शनीं लक्षांत येत नाहीं हें खरें आहे; पण प्रारंभीं श्रेष्ठ माणसाच्या घरीं जावयाचें म्हणजे त्यास नजराणा घेऊन जावयाचें, किंवा निष्ठा दर्शविण्यास अथवा अंकितभाव दर्शविण्यास जावयाचें, असें असे; आणि देवळास जावयाचें म्हणजे हवी द्यावयास, आज्ञाधारकपणा दर्शविण्यास, व स्तुति करण्यास जावयाचें, असें असे. ह्या गोष्टी लक्षांत घेतां तो संबंध चांगला ध्यानांत येतो. उच्चतर धर्मसमजुती उत्पन्न होण्याच्यापूर्वीं दृश्यशास्ता जसा दरबारांत हजर असतो तसा अदृश्यशास्ता देवळांत हजर असतो असें समजत; आणि हल्लीं देवळांत देव कसा हजर असतो ह्याबद्दलच्या कल्पना जरी जरा अस्पष्ट आहेत, तरी इतर ठिकाणांपेक्षां तो तेथें आपल्यानजीक अधिक जवळ असतो असें समजतात.

३९. इतर विधींच्यासंबंधानें जी गोष्ट खरी आहे तीच ह्या विधीच्याहिसंबंधानें खरी आहे; आणि ती ही कीं, जो विधि अत्यन्त प्रबळ अशा जिवंत, किंवा मृत, किंवा देवभूत माणसाचें संतर्पण करण्यासाठीं म्हणून प्रथम सुरू होतो, तोच पुढें कमी प्रबल माणसांच्या संतर्पणार्थ करूं लागतात; आणि त्याचा ज्यास्त प्रसार होत जाऊन शेवटीं तो बरोबरीच्यांच्या संतर्पणार्थ करूं लागतात.

भेट ही अंकितभावदर्शक समजली जाऊन कनिष्ठानें ती आपणास दिलीच पाहिजे अशी अपेक्षा श्रेष्ठ माणूस कशी करीत असतो, आणि भेट देणारा ती दिल्यानें आपण आपला कनिष्ठपणा कबूल करितो असें कसें स-

मजतो, हें पालग्रेव्ह ह्यानें सांगितलेल्या एका गोष्टीवरून व्यक्त होतें. वाहाबीलोकांचा राजा फेसूल ह्यानें आपला मुलगा सावूद ह्यास त्याचा वडील भाऊ अबदुल्ला ह्यास भेटावयास जाण्यास सांगितलें. तेव्हां सावूदनें असें उत्तर केलें कीं, मी येथें नवखा माणूस आलेलों आहे, व तो येथील राहिवासी आहे; म्हणून त्यानें मला प्रथम भेटावयास आलें पाहिजे; तेव्हां फेसुलनें अबदुल्लास तसें करण्याची विनंति केली; पण तोहि त्याचें ऐकेना.

अशाच अर्थाचीं उदाहरणें जगाच्या निरनिराळ्या भागांत राहणाऱ्या लोकांमध्यें सांपडतात. उदाहरणार्थ, प्राचीन प्रवासी टॅव्हर्नियर असें लिहितो कीं, धार्मिक उत्सवाच्यावेळीं एकमेकांस भेटावयास जाण्याची चाल पर्शयनलोकांमध्यें फार आहे; पण त्यांतील जे श्रेष्ठ असतात ते कनिष्ठांनीं आपणास भेटावयास यावें म्हणून कनिष्ठांची घरीं वाट पहात बसतात. आफ्रिकेंत असेंच आहे. उदाहरणार्थ, उयानियेंबी येथें राहणाऱ्या मूसा नांवाच्या एका श्रीमान् मुसलमान व्यापाऱ्याबद्दल ग्रांट असें म्हणतो कीं, तो सकाळपासून रात्रीपर्यंत गरीब व श्रीमान् लोकांपासून सलाम घेत घरीं बसला होता. आतां यूरोपखंडाकडे पाहतां, प्राचीन रोममध्यें आश्रित लोक आपल्या पोशिंद्यांस सकाळीं भेटावयास जात असत; आणि सतराव्या शतकांत इंग्रजींत भाषांतर केलेल्या रीतिरिवाजविषयक एका प्राचीन फ्रेंच ग्रंथामध्यें आपण असें वाचितों कीं, मोठा माणूस असेल त्यास व-

रचेवर भेटावयास जावें, आणि " आपली प्रकृति ठीक आहे ना ?" असें त्यास विचारावें.

ह्या उदाहरणांवरून विधि म्हणून दिलेली भेट हळू हळू खालच्या खालच्या पायरीवर येऊन शेवटीं तीस सामान्यशिष्टाचाराचें स्वरूप कसें आलें आहे हें स्पष्ट दिसतें. तथापि अजूनहि कनिष्ठानें ती श्रेष्ठांस देणें योग्य होय म्हणून समजतात, आणि श्रेष्ठानें कनिष्ठास दिल्यास त्यानें त्याजवर मेहरबानी केली म्हणून मानितात. सारांश, कोणासहि सकाळीं भेटावयास जाण्याची जी चाल आहे ती प्रारंभीं मुख्य शास्त्याप्रत निष्ठा दर्शविण्यासाठीं गौण शास्ते जी भेट देत असत तिचा दूरवरचा परिणाम आहे असें उघड होतें.

आतां पूर्व प्रकरणांत केलें त्याप्रमाणें, भेटावयास जाणें आणि समाजघटनेचा नमुना, ह्यांमध्यें काय संबंध असतो तें पाहूं.

ज्या सरलसमजांत नायकी स्थाईक नसते त्यामध्यें भेटीस राजकीय विधीचें स्वरूप येऊं शकणार नाहीं हें उघडच आहे; आणि दुय्यम व तिय्यम प्रमाणावर संयुक्त झालेल्या समाजांत तीस सुरवात होते हें पुराव्यावरून स्पष्ट दिसतें. तथापि पूर्वींप्रमाणें एथेंहि निरनिराळा पुरावा एकत्र ठेवून तुलना करून पाहतां असें दिसतें कीं, ह्या विधीचा संबंध समाजाच्या आकाराशीं तितका नसून घटनेशीं विशेष आहे. तो विधि आज्ञाधारकपणाचा दर्शक असल्यामुळें समाजाची युद्धशील घटना जशी वाढत जाईल, तसा तो वाढत जातो. म्हणून प्राचीन मेक्सिको, प्राचीन पेरू, चीन आणि जपान

असल्या ज्या देशांत युद्धशीलतेमुळें स्वेच्छाचारी सरकारें उत्पन्न झालेलीं आहेत तेथें त्यास विधिविषयक शासनामध्यें मोठें ठळक स्थान प्राप्त झालेलें, वर उदाहरणें दिल्याप्रमाणें, दिसून येतें. यूरोपस्थ समाजांच्याहि पूर्वतर पायऱ्यांवर तीच गोष्ट आपल्यास दिसून येते.

ह्याच्या उलट संबंधहि तितकाच स्पष्ट दिसतो उदाहरणार्थ, स्पेन्सरसाहेब म्हणतात, आमच्यांत युद्धशीलतेवर उद्यमशीलतेचा पगडा बसलेला असल्यामुळें, राजनिष्ठा दर्शविण्यासाठीं राजास भेटावयास जाणें हल्लीं अगदीं आवश्यकच समजत नाहींत; आणि प्रत्यक्ष भेटीच्या ऐवजीं नांवाची चिठी (कार्ड) मित्राच्या घरीं टाकून जाण्याचा जो प्रघात हल्लीं सुरू झाला आहे त्यावरून, सामाजिक व्यवहारामध्यें तीस विधि या रूपानें फांटा देण्याकडेच लोकांची प्रवृत्ति ज्यास्त होत चालली आहे, हें स्पष्ट दिसतें.

प्रकरण सहावें

नमनें

४१. शोशोनलोकांची एक टोळी ल्युइस व क्यारोल यांनीं पकडिली होती त्याबद्दल ते लिहितातः—"दुसरीं दोघें, म्हणजे एक मोठी स्त्री व एक लहान मुलगी, यांनीं आपल्यास पळून जातां येणार नाहीं इतके आह्मी त्यांच्याजवळ आलों आहों असें पाहून, त्या खालीं बसल्या, आणि आपणास आतां हे खचीत मारणार असें समजून त्यांनीं खालीं डोकीं घातलीं. पळून जाण्याची संधि उरली नाहीं म्हणजे डोकें खालीं घालून, "ये, आह्मास मार," असें म्हणण्याचा प्रघात ईजिप्तमध्यें आजमित्तीस आहे." ह्या ठिकाणीं पूर्णपणें वश होऊन दुसऱ्याचें मन प्रसन्न करण्याचा यत्न आपल्यास चांगला दिसून येतो; आणि असल्याच कृतींपासून नमनांची उत्पत्ति होते.

विधीची उत्पत्ति सामाजिक उत्क्रमणाच्याच केवळ नव्हे तर मानवी उत्क्रमणाच्याहि अगोदर होते, ह्या सत्याच्या निदर्शनार्थ मोठ्या कुत्र्यापुढें लहान कुत्रें कसें वागतें ह्याचें जें प्रारंभींच उदाहरण दिलें, तें कदाचित् वाचकांस अतिशयोक्तीचें वाटलें असेल; पण तसलीच कृति माणसांमध्येंहि दिसून येते हें पुढील उदाहरणावरून व्यक्त होतें. उदाहरणार्थ, बाटोकालोकांमधील वंदनप्रकाराबद्दल लिव्हिंग्स्टन असें म्हणतो कीं, ते जमिनीवर उताणे पडतात, आणि इकडून तिकडे सारखे लोळून मांड्यांवर चापट्या मारून घेतात, आणि अशा

रीतीनें कृतज्ञता व स्वागत हीं दर्शवितात. असें ते करितात ह्याचा हेतु स्वतःचें रक्षण करण्याचा अशाप्रसंगीं हाच उत्तम मार्ग असतो हें उघडच आहे. कांहीं लोक शरण आल्याचें दुसऱ्या एका तऱ्हेनें दाखवितात. उदाहरणार्थ, टोंगाटाबू एथें सामान्य लोक आपल्या नायकास अत्यन्त मान देण्याकरितां त्याच्यापुढें साष्टांग नमस्कार घालितात, आणि त्याचा पाय आपल्या मानेवर घेतात. आफ्रिकेमध्येंहि हीच गोष्ट दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, लेअर्ड असें सागतो कीं, फंडा राजाकडून मजकडे जे दूत आले ते सर्व प्रत्येकीं मजपुढें वांकले, आणि त्यांनीं माझा पाय आपल्या मानेवर ठेवून घेतला: आणि ऐतिहासिक लोकांमध्यें पराजयामुळें उत्पन्न झालेला जो हा वन्दनप्रघात तो अंकितभाव प्रदर्शित करण्यासाठीं लोक अंमलांत आणूं लागले.

जेत्यापुढें जित कसे वागतात हें पूर्णपणें व्यक्त करणारे जे हे वंदनप्रकार त्यांपासून गुलामानें धन्याप्रत अंकितभाव व्यक्त करण्याचे प्रकार सुरू होतात. प्राचीन काळीं हा अंकितभाव कांहीं देशांत कमरेभोंवतीं गोणपाट गुंडाळून आणि डोक्याभोंवतीं दोऱ्या गुंडाळून व्यक्त करीत असत. पेरूदेशांत युद्धशीलता इतकी जोरावर असल्यामुळें तेथें हात बांधून व गळ्याभोंवतीं दोरी गुंडाळून येणें हें लीनपणाचें लक्षण समजलें जात असे. म्हणजे, रणांगणांतून शत्रूंस कैदी करून आणतांना जीं बंधनें त्याला घालीत तशासारखीं हीं असत. तेथील इन्काचे (मुख्य राजाचे) आपण अंकित आहों हें दाखविण्याची तेथें दुसरी एक अशी चाल होती कीं

पाठीवर एक ओझें घेऊन त्याजकडे जावयाचें; आणि ही गोष्ट तेथील सगळे शास्ते सरदार करीत असत.

हीं उदाहरणें प्रारंभींच देण्याचा हेतु असा आहे कीं, प्रथम विजेत्यानें आणि नंतर शास्त्यानें आपल्यावर दया करावी ह्यासाठीं ह्या विधीची स्वाभाविकरीत्या उत्पत्ति होते ही गोष्ट स्पष्ट व्हावी. पण वंदनाची पूर्ण कल्पना करावयाची म्हणजे आणखी एका गोष्टीचा त्यांत समावेश केला पाहिजे. प्रास्ताविक प्रकरणांत असें दाखविलें होतें कीं, ज्याच्यावर आपलें प्रेम असेल तें जवळ असलें म्हणजे जीं आनंदाचीं चिन्हें दृश्य होतात त्यांस सन्मानदर्शक विधींचें स्वरूप येतें. कारण लोकांना आपण आवडतों असें वाटल्यानें माणसास संतोष होत असतो, आणि म्हणून आपल्या संगतीबद्दल कोणीं आनंदचिन्ह दर्शविलें म्हणजे तो आनंदित होतो. ह्यासाठीं श्रेष्ठाप्रत अंकितभाव व्यक्त करून त्यास खुष करण्याचा कनिष्ठ माणसाचा यत्न चालला असतां त्याच्यापुढें आल्यानें आपणास आनंद होतो असें दर्शवूनहि त्यास संतुष्ट करण्याचा त्या माणसाचा यत्न चाललेला असतो. वंदनाचे हे दोन्ही घटक लक्षांत ठेवून आतां त्याच्या निरनिराळ्या प्रकारांचा, आणि त्यांच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक उपयोगांचा, विचार करूं.

४२. मनुष्य जमिनीवर ताठ उपडा पडून जो विरोधशक्तीचा अभाव व्यक्त करीत असतो त्याच्या योगानें, उताणा पडल्यानें व्यक्त होणारी पूर्ण स्वसंरक्षणाक्षमता जरी व्यक्त होत नाहीं, तरी उपडें पडणें किंवा नमस्कार घालणें हें फार मोठ्या निष्ठाप्रदर्शनाचें चिन्ह

आहे; आणि म्हणून जेथें जेथें स्वेच्छाचारी सत्ता पूर्ण असून अंकितभाव गुलामासारखा असेल, तेथें तेथें हा वन्दनप्रकार दिसून येतो. प्राचीन अमेरिकेमध्यें चिब्चालोकांत नायकापुढें आलें म्हणजे त्यास साष्टांगनमस्कार घालावा लागत असे. आफ्रिकेमध्यें बोर्गूलोकांत राजाशीं बोलावयाचें तें जमिनीवर पडून बोलावें लागतें. एशियामध्यें ह्याचीं पुष्कळ उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, खोंड व पन्नूलोकांत अर्जदार माणूस जमिनीवर ताठ पडून हात जोडितो. सयाममध्यें सर्व लोक उमरावांपुढें आणि उमराव राजापुढें असेच नमस्कार घालितात. पालिनिशियामध्यें असेंच आहे. उदाहरणार्थ, सांडविच बेटवाल्यांमध्यें साष्टांगनमस्कार घालणें हें सन्मानदर्शक असे; म्हणून कूकची व तेथील राजाची जेव्हां प्रथम गांठ पडली तेव्हां त्यानें त्यास नमस्कार घातला. आणि प्राचीन ऐतिहासिक जातींच्या लेखांतून असलींच उदाहरणें सांपडतात. डेव्हिड पुढें मेफिबॉशेथ यानें, आणि बिथिनियाचे राजानें रोमन सेनेटापुढें साष्टांगनमस्कार घातला होता. कधीं कधीं जेत्यापुढें जित एकाहून अधिक नमस्कार घालितात. उदाहरणार्थ, भूतानांत लोक राजापुढें नऊ नमस्कार घालितात.

प्रत्येक प्रकारचा विधि संक्षिप्त झाल्यानें त्याचें मूळस्वरूप अस्पष्ट होण्याचा संभव असतो; आणि तेणेंकरून त्याची सन्मानदर्शकता पूर्वींहून कमी होत असते. आतां साष्टांगनमस्कार घालतांना अगोदर गुडघ्यावर आंग टेंकून डोकें खालीं लववावें लागत असतें, आणि उठतांनाहि तसेंच करावें लागत असतें. म्हणून असल्या

ह्या बैठकीस अपूर्ण साष्टांगनमस्कार म्हणतां येईल; आणि तो पुष्कळ लोकांत आढळून येतो. उदाहरणार्थ, किनाऱ्यावरील नीग्रोलोकांत श्रेष्ठ माणसाची गांठ पडल्याबरोबर कनिष्ठ माणूस जमिनीवर गुडघे टेंकून तीनदां जमिनीस तोंड लावितो. ब्रासलोकांचा राजा इबॉस देशच्या राजाचें श्रेष्ठत्व कबूल करण्याकरितां प्रत्येक प्रसंगीं त्याच्यापुढें गुडघे टेंकून जमिनीस डोकें लावीत असे. कांगोनदीवर एम्बॉमा या ठिकाणीं वंदन करावयाचें म्हणजे हळूच टाळी वाजवावयाची, आणि गुडघे टेंकून श्रेष्ठाच्या पायाच्या घोट्यांतील वाळ्याचें चुंबन करावयाचें, असा प्रघात आहे.

कधीं कधीं हें वन्दन फारच नम्रपणाचें आहे असें दर्शविण्याकरितां जमिनीशीं शरीराचा संयोग फार जोरानें करितात. उदाहरणार्थ, खालच्या नैजर नदीवरील लोक सन्मानार्थ नमस्कार करून जमिनीवर डोकें आपटितात. प्राचीनकाळीं रशियाच्या बादशाहाच्या राज्याभिषेकाच्या समयीं अमीर-उमराव लोक डोकीं खालीं लववून त्याच्या पायांजवळ जमिनीवर आपटीत असत. चीन देशांत हल्लीं जे वन्दनाचे आठ प्रकार आहेत त्यांमधील पांचवा प्रकार गुडघे टेंकून जमिनीवर डोकें आपटणें हा आहे, आणि तीनदां आपटणें हा सहावा प्रकार आहे; सहादां आपटणें हा सातवा प्रकार असून नऊदां आपटणें हा आठवा प्रकार आहे; आणि ह्या शेवटच्या प्रकारचें वन्दन बादशाह आणि देव यांच्यापुढें करावें लागतें. हीब्रूलोकांत ह्या अधिकाधिक वन्दनाचा असाच अर्थ असे. उदाहरणार्थ, जेकब यानें आपल्या भावा-

नजीक येतांना त्यास सात साष्टांगनमस्कार घातले होते.

आतां गुलामानें धन्यापुढें आणि प्रजाजनानें शास्त्यापुढें धारण केलेला जो हा जितभाव तो सहजच पूजा करणारा देवापुढें धारण करितो. म्हणून देव दृश्य असो व अदृश्य असो त्याच्यापुढें पूर्ण साष्टांगप्रणिपात केलेले आपल्यास आढळून येतात. उदाहरणार्थ, आब्राहामनें जेव्हां देवाशीं करार केला तेव्हां तो त्याच्यापुढें आडवा पडला. नेबुचाडचे झारनें डेनियलला नमस्कार करून त्यास पुजिलें आणि त्यानें जेव्हां एक त्याची सोन्याची मूर्ति तयार केली, तेव्हां त्यानें लोकांस अशी भीति घातली कीं, त्याच्यापुढें पडून जो त्यास पुजणार नाहीं त्यास देहान्तशिक्षा होईल. तद्वतच राजापुढें जसे अपूर्ण प्रणिपात करितात, तसेच देवापुढेंहि करितात. उदाहरणार्थ, मुसलमानलोक गुडघे टेंकून जमिनीस डोकें लावितात.जपानीलोक आपल्या देवळांतून तसेंच करितात.

४३.आतां जमिनीवर उताणें किंवा सपशेल उपडें पडणें, आणि गुडघे टेंकणें ह्या ज्या बैठकी त्यांपासून आपण विरोधाक्षमता दर्शविणाऱ्या दुसऱ्या बैठकींकडे वळूं. उदाहरणार्थ, डेहामीमध्यें लोक सन्मानार्थ जमिनीवर गडबडां लोळतात, किंवा जनावरासारखे हातापायांवर उभे राहतात. डुरन सांगतो कीं मेक्सिकनलोकांमध्यें जमिनीवर भाल्यासारखें मटकन बसणें हा सन्मान दाखविण्याचा मार्ग असे. न्यूक्यालिडोनियन, फीजियन आणि ताहितियनलोकांत हातपाय अगदीं आंगाजवळ घेऊन भ्याल्यासारखें जमिनीवर बसणें हें मोठें सन्मानचिन्ह आहे.

कांहीं ठिकाणीं स्थानान्तर करण्यासाठीं ह्या बैठ-

कींत कांहीं फेरबदल करितात. उदाहरणार्थ, डेहामीमध्यें राजासंनिध जातांना लोक जमिनीवर रांगत जातात किंवा गुडघ्यांवर उडत जातात. सयामीलोक श्रेष्ठापुढें बैठक बदलतेवेळीं हात व गुडघे यांवर चालतात. जाव्हा बेटांत श्रेष्ठाच्या देखत कनिष्ठास घोट्यावर कुल्ले टेंकून जावें लागतें. झुलूराजाचे लोक आणि त्याच्या खुद्द बायका असेंच करितात. लोआंगोमध्यें बायकांना नवऱ्याशीं बोलावयाचें असल्यास गुडघे मोकळे करून ते जमिनीवर टेंकून बोलावें लागतें, आणि त्यांच्याकडे जावयाचें तर रांगत जावें लागतें.

साष्टांगप्रणिपात आंखूड होऊन जसें मुसलमानाचें गुडघे टेंकून जमिनीवर डोकें टेंकणें उत्पन्न होतें, तद्वतच त्यापासून हातांपायांवर रांगणें उत्पन्न होतें, आणि तें आंखूड होऊन नुसते गुडघे टेंकणें उत्पन्न होतें. हें गुडघे टेंकणें सर्वत्र जुलमी सरकारपद्धतीशीं संबद्ध दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, जपानमध्यें लोक बादशाहापासून निघाले म्हणजे गुडघ्यांवर चालत मागें जातात. चीन देशांत असेंच आहे; आणि फ्यूडल पद्धतीच्या वेळीं यूरोपांतहि तसेंच असे.

आतां दोन्ही गुडघे टेंकण्याचा संक्षेप होऊन एक गुडघा टेंकण्याची चाल उत्पन्न होते; आणि त्याचा संक्षेप होऊन गुडघा जरा वांकविणें ह्या चालीची उत्पत्ति होते. ही गोष्ट जपानीलोकांत चांगली दिसून येते. कारण ते लोक एकमेकांची गांठ पडली म्हणजे गुडघा लववून सन्मान दर्शवितात; आणि एकाद्यास विशेष मान द्यावयाचा असल्यास गुडघा टेंकून डोकें जमिनीकडे वां-

कवितात. पण रस्त्यांतून असें कधीं करीत नाहींत; तेथें ते केवळ गुडघा टेंकण्याचा आव करितात, म्हणजे, तो जरा लववितात. पदवीच्या माणसास नमस्कार करतांना ते आपला गुडघा इतका वांकवितात कीं जमिनीस हाताचीं बोटें लागावीं, हीच गोष्ट चीन देशांत ह्याच्याहून ज्यास्त चांगल्या रीतीनें दिसून येते. कारण तेथें वंदनाचे जे निरनिराळे प्रकार आहेत त्यांतील तितका प्रकार गुडघा वांकविणें हा आहे, आणि चवथा गुडघे टेंकणें हा आहे. इंग्लिशबायका सन्मानदर्शनार्थ गुडघा लववितात, आणि पुरुष परवांपर्यंत उजवा पाय झोंका देऊन मागें घेत असत. ह्याहि चाली गुडघा टेंकण्याच्या चालीचा संक्षेप होऊन उत्पन्न झालेल्या आहेत ही गोष्ट उघड आहे.

आतां ह्याच्याबरोबर जें शरीराचें वांकविणें येतें त्याचाच तेवढा विचार करावयाचा राहिला. पूर्णप्रणिपात करतांना ही हालचाल प्रथम सुरू होत असून त्या प्रणिपाताचा संक्षेप होतां होतां अखेरीस ती हालचाल तेवढीच शिल्लक राहते. ह्या संक्रमणाचीं चिन्हें आपणास पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, सुसूलोकांमध्यें मोठ्या माणसाच्या बायका देखील त्याच्याशीं बोलतांना आपलीं अंगें वांकवितात, आणि गुडघ्यांवर हात टेंकितात; त्यांच्या शेजारून जातांना देखील असेंच करितात. सामोआमध्यें जेथें नाईक बसला असेल त्या खोलींतून जातांना ताठ चालणें हें बेमुरवतीचें समजतात; म्हणून माणसास तेथून पुढें वांकून जावें लागतें. प्राचीन मेक्सिकनलोक नायकाजवळून परत जातांना

डोकें खालीं घालून जात असत. आणि चिनीलोकांच्या विधिसमुच्चयामध्यें गुडघा वाकविण्याहून कमी नम्रतेचा जो दोन नंबरचा वंदनप्रकार आहे तो हात जोडून डोकें खालीं वांकविणें हा आहे. मुसलमानलोकांचा नम्र सलाम, युरोपियनाचें फार मान देतांना डोकें फार वांकविणें, आणि सामान्यतः थोडेंसें वाकविणें, हीं सर्व हळूहळू संक्रमण होऊन उत्पन्न झालेलीं आहेत ही गोष्ट ध्यानांत आणतां, हल्लीं जी उगीच कोठें डोकें हालविलें न हालविलें करण्याची चाल आहे ती मूळच्या साष्टांगप्रणिपातापासूनच अतिसंक्षेपानें उत्पन्न झालेली आहे हें उघड होतें.

प्रणिपाताचे जे हे अनेक संक्षेप राजकीय व सामाजिक निष्ठा व्यक्त करण्याच्या कामीं दृष्टीस पडतात तेच धार्मिक निष्ठा व्यक्त करण्याच्या कामींहि दिसून येतात. उदाहरणार्थ, कांगोइसलोकांबद्दल बॅस्टियन असें म्हणतो कीं, त्यांस श्रेष्ठाशीं बोलावयाचें असलें म्हणजे ते गुडघे टेंकितात, तोंड अर्धें फिरवितात, आणि ज्याच्याशीं बोलावयाचें त्याच्यापुढें हात करून प्रत्येक भाषणाचे वेळीं ते एकमेकांवर आपटितात; आणि इजिप्शनलोकांच्या देवळांच्या भिंतींवरून तेथील उपाध्ये काय करीत असत याचीं जीं चित्रें काढिलेलीं आहेत त्यांच्याशीं हें वर्णन अगदीं हुबेहुब जुळतें. यूरोपांतील धर्मविधींमध्यें असलेच सादृश्यसंबंध दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, त्यांच्यांत देवापुढें दोन्ही गुडघे टेंकणें आणि एकच गुडघा टेंकणें हे प्रकार आहेतच; आणि शिवाय, कांहीं प्रसंगीं ख्रिस्ताचें नांव ऐकिलें म्हणजे डोकें लव-

विणें आणि गुडघा लववणें हेहि प्रकार आहेतच.

४४. आधींच सांगितल्याप्रमाणें वंदनामध्यें नम्रतादर्शक कृतीबरोबर संतोषदर्शक कृतीचाहि समावेश होत असतो. आपल्या श्रेष्ठास खात्रीनें प्रसन्न करून घेण्यास, " मी तुझा गुलाम आहें, आणि माझी तुजवर प्रीति आहे," ह्या दोन्ही गोष्टी कनिष्ठानें व्यक्त केल्या पाहिजेत. वर दिलेल्या उदाहरणांपैकीं कांहींमध्यें ह्या दोन्ही गोष्टी समाविष्ट झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, बाटोकालोक अगदीं पूर्ण नम्रतेची बैठक मारीत असून त्याबरोबरच मांड्यांवर हातांच्या बुक्क्यांचा ताल धरीत असतात. कांहीं ठिकाणीं अंकितपणा व्यक्त करणाऱ्या क्रियेबरोबर हातांनीं टाळी वाजवितात असें आपल्यास दिसून आलें आहे; आणि दुसरीं असलींच पुष्कळ उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. उदाहरणार्थ, लोआंगोच्या राजानजीक त्याच्या सरदारांस जावयाचें असेल तेव्हां ते आपल्या हातांनीं दोनदां किंवा तीनदां टाळी वाजवितात, आणि नंतर त्याच्या पायापाशीं वाळूंत लोळण घेतात. युगांडाच्या राजाच्या कांहीं नोकरांबद्दल स्पेक असें म्हणतो कीं, " ते त्याच्यापुढें एका ओळीनें जमिनीवर उपडे पडले, आणि लाथा झाडीत, तोंडें चोळीत, आणि जमिनीवर हात आपटीत, माशांसारखे वळवळत राहिले." बालोंडालोक आपल्यापासून आपले श्रेष्ठ जाईतोंपावेतों टाळ्या वाजविण्याचें वन्दन सुरू ठेवितात, आणि डेहामीमध्येंहि असेंच करितात. आणखी एक अशाचप्रकारची तालबद्ध हालचाल आहे तीस आतां उल्लेख करूं. उड्या मारणें

हें आनंदाचें स्वाभाविकचिन्ह असून फ्यूजियनलोकांमध्यें तो एक वंदनप्रकार आहे ही गोष्ट आपल्या नजरेस अगोदरच आलेली आहे; आणि लोआंगोमध्यें राजाचा मान अशाच रीतीनें करितात. आफ्रिकेमध्यें याचें आणखी एक उदाहरण सांपडतें. **ग्रांट** असें सांगतो कीं, " कारागवेच्या राजानें लोकांचीं वन्दनें घेतलीं तेव्हां एकेकजण त्याच्यापुढें येऊन किंकाळते व उड्या मारते झाले, आणि निष्ठेबद्दल शपथा घेते झाले. " आतां ह्या वन्दनविषयक हालचालींस नियमित स्वरूप येऊं द्या, म्हणजे लागलाच त्यांचा नाच बनेल; आणि राजाचें वन्दन करण्यासाठीं असला नाच कोठें कोठें करीत असतात; उदाहरणार्थ, मागें सांगितल्याप्रमाणें बोगोटाच्या राजापुढें; आणि विलियम्स् फीजी येथील हकीकत अशी सांगतो कीं, " एक कनिष्ठ नाईक व त्याचे अनुयायी जेव्हां तेथील **सो**मोसोमो राजापुढें आले तेव्हां त्यांनीं नाच केला, आणि शेवटीं आपले सोटे आणि उपरणीं हीं पुढें करून त्यास सलामी केली. "

वन्दनामध्यें समाविष्ट होणाऱ्या दुसऱ्या आनंदव्यंजक चिन्हांमध्यें चुंबन हें सर्वांत ज्यास्त ठळक आहे. आतां साष्टांगप्रणिपात किंवा तसलाच प्रणिपात ह्यांमध्यें अंतर्भूत होणाऱ्या लीनतेशीं अनुरूप असें हें चुंबन असलें पाहिजे हें उघडच आहे. ज्या ठिकाणीं राजाच्या पायाचें किंवा वस्त्राचें चुंबन घेण्याइतकें त्याच्या सन्निध जाण्याची सोय नसेल तेथें पूर्वीं कांहीं उदाहरणांत दाखविल्याप्रमाणें जमिनीचेंच चुंबन घेतात. ह्याचीं आणखीहि उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, ए-

बोमध्यें अशी चाल आहे कीं, राजा बाहेर निघाला म्हणजे लोकांनीं जमिनीवर गुडघे टेंकून तिचें तीनदां चुंबन घ्यावें. प्राचीन मेक्सिकन वकील कोर्टीसपुढें जेव्हां आले तेव्हां त्यांनीं तसेंच केलें. प्राचीनकाळीं ह्या चुंबनाचा अर्थ जितानें जेत्यास अंकित झाल्याचें दाखविणें हा असे; आणि जेत्याच्या घोड्याच्या पावलांच्या खुणांचें चुंबन घेण्यापर्यंत तें गेलेलें होतें. आबिसिनियामध्यें ह्यांत थोडासा फेरबदल झालेला आढळून येतो. कारण तेथें श्रेष्ठाचा किंवा हितकर्त्याचा जो पदार्थ अगोदर सांपडेल त्याचें चुंबन घेण्याची चाल आहे. ह्याच्या पुढची पायरी म्हटली म्हणजे पाय चाटणें आणि चुपणें ही होय. उदाहरणार्थ, एका मालागासी नायकाबद्दल इूरी असें सांगतो कीं, " तो दरवाज्याजवळ येऊन बसला नाहीं तोंच त्याची बायको त्याच्यापाशीं हातांवर व गुडघ्यांवर रांगत आली, आणि तिनें त्याचे पाय चाटिले. शहरांतील सर्व बायका आपल्या नवऱ्यांना वन्दन अशाच रीतीनें करितात. " गुलाम आपल्या धन्यांना वन्दन असेंच करीत. म्हणून प्राचीन पेरूमध्यें नाईक राजापुढें आले म्हणजे त्यास मोठालीं वन्दनें करीत आणि त्याच्या हातांचें व पायांचें चुंबन घेत. ईजिप्तमधील भिंतीवरील चित्रांमध्यें हा वन्दनाचा अगदीं पुढचा प्रकार दाखविलेला आहे. हल्लीं आरबलोकांमध्यें कनिष्ठ लोक श्रेष्ठांच्या पायांचें, गुडघ्यांचें आणि वस्त्रांचें चुंबन घेतात. सुलतानाच्या पायांचा मुका घेण्याची चाल टर्कींत आहे; आणि पोर्टर असें सांगतो कीं, "एका पर्शियन माणसास नजराणा दिल्याबद्दल त्यानें माझे

गुडघे व पाय चाटिले, आणि मला साष्टांगप्रणिपात केला."

पायाचें चुंबन घेण्यापेक्षां हाताचें चुंबन घेणें हा कमी मानहानिकारक विधि आहे; ह्याचें कारण तें घ्यावयास प्रणिपात करावा लागत नाहीं हें मुख्यत्वेंकरून होय. हा भेद परस्परांपासून अगदीं दूर राहणाऱ्या लोकांच्याहि लक्षांत आलेला आढळून येतो. उदाहरणार्थ, टोंगामध्यें जेव्हां एकादा माणूस आपल्या श्रेष्ठास वन्दन करितो तेव्हां तो त्याच्या हाताचें चुंबन करितो, आणि तो फारच श्रेष्ठ असल्यास त्याच्या पायाचें चुंबन घेतो. आणि आरब राजकन्या आपल्या दासींवर प्रसन्न होऊन जेव्हां त्यांस आपल्या पायांचें किंवा झग्यांच्या टोंकांचें चुंबन घेऊं देत नाहींत, तेव्हां त्या त्यांच्या हाताचें चुंबन घेतात. प्रेमयुक्त अंकितभाव व्यक्त करण्यासाठीं ह्या वन्दनाचा उपयोग इतका पुष्कळ होत असतो कीं त्याच्याबद्दल विशेष उदाहरणें देण्याची जरूरी नाहीं.

ज्या ठिकाणीं वन्दन करणारा माणूस दुसऱ्याचा हात चुंपण्याच्या ऐवजीं आपला हात चुंपितो तेथें त्याचा अर्थ काय समजावयाचा? ह्या ठिकाणीं हीच क्रिया विशिष्टपरिस्थितींत शक्य असल्यामुळें ती शक्य तेवढी दुसरीची नक्कल म्हणून समजावयाची कीं काय? असा तर्क करणें जरा साहसाचें दिसतें; पण तो बरोबर आहे असें दाखविणारा पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, डी. आर्व्ह्यू असें म्हणतो कीं, "प्राच्य माणूस आपल्याहून श्रेष्ठ माणसास मान देण्यासाठीं त्याच्या हाताचें चुंबन घेतो, आणि तो आपल्या मस्तकास लावितो; पण तो श्रेष्ठ माणूस जर दुसऱ्यास त्रास देऊं नये अशा वृत्तीचा अ-

सला तर तो आपला हात मागें ओढितो; आणि नंतर तो कनिष्ठ माणूस आपलींच बोटें चुंपतो, आणि आपल्याच कपाळास लावितो." ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं दुसऱ्याकडे पाहून आपल्या हाताचें चुंबन घेण्याची जी चाल आहे तिचा मूळ उद्देश त्या दुसऱ्याच्या हाताचें चुंबन घेण्याची इच्छा किंवा खुषी दर्शविण्याचा असे.

पूर्वींप्रमाणें ह्या ठिकाणींहि ह्या विधीस जेत्याचें जितानें आपखुषीनें केलेलें संतर्पण ह्या रूपानें सुरवात होऊन लवकरच त्यास धार्मिकसंतर्पणाचें स्वरूप येतें. भूत आणि भुतापासून बनलेला देव ह्यांच्याप्रत ह्या ज्या प्रेम व आवड दर्शविणाऱ्या कृती त्यांचा उपयोग करितात. उदाहरणार्थ, पायांना मिठी घालणें आणि त्यांचें चुंबन घेणें अशा प्रकारचें जें वन्दन हीब्रूलोकांत जिवंत माणसास करीत असत तें इजिप्शनलोकांत पिंजऱ्यांत ठेवलेल्या मृतमाणसाच्या प्रेताप्रत किंवा ममीप्रत करीत असत; आणि ह्याच कृतीस अनुसरून रोमनलोक आपल्या देवांच्या पुतळ्यांच्या पायांचें आणि ख्रिस्तीलोक आपल्या पवित्र मूर्तींच्या पायांचें चुंबन घेतात. राजकीय अंकितत्व दर्शविण्यासाठीं केलेल्या भूमिचुंबनापासून धार्मिक अंकितत्व दर्शविण्यासाठीं जें अंमळ निराळें भूमिचुंबन उत्पन्न होतें त्या संक्रमणाचें उदाहरण प्राचीन अमेरिकेमध्यें दिसून येत असे. त्यांच्यामधील एका शपथेचें वर्णन करतांना क्लॅव्हिगेरो म्हणतो कीं, नंतर ते मुख्य देवाचें, किंवा जो देव ते विशेष पूज्य समजत असतील त्याचें, नांव घेऊन, आपल्या हातानें भीसभू स्पर्श करून त्याचें चुंबन घेत. पेरू देशांतपूजा कर-

ण्याचा प्रकार असा असे कीं हाताची ओंजळ उघडावयाची, चुंबनासारखा तोंडानें आवाज करावयाचा, आणि देवास बळी अर्पण करून वाटेल तें मागावयाचें; आणि गार्सिलासो सूर्यास जें अर्घ्य ते देत त्याचें वर्णन करून म्हणतो कीं, ते त्याबरोबरच दोनदां किंवा तीनदां हवेचें चुंबन घेतात, कारण तें त्यांच्यांत पूजाचिन्ह आहे. बरें, असलीं उदाहरणें यूरोपस्थ लोकांतहि सांपडतात. उदाहरणार्थ, देवाच्या पुतळ्याकडे हात करून त्याचें चुंबन घेणें हा रोमनलोकांत एक पूजाप्रकार असे.

शिवाय उड्या मारण्याच्या हालचाली साहाजिकरीत्या आनंददर्शक असल्यामुळें दृश्यशास्त्याच्या संबंधानें जशा त्या सन्मानदर्शक क्रिया बनतात, तशा अदृश्यशास्त्याच्या संबंधानेंहि बनतात. उदाहरणार्थ, डेव्हिडनें तरणनौकेपुढें नाच केला. प्रारंभीं ग्रीकलोकांत नाचणें हा धार्मिकविधि असे; प्रारंभापासून अपॉलो देवाची पूजा करतांना नाचत असत. डेव्हिड राजाप्रमाणें " पेपिन राजा आपले रेशमी पोषाक विसरून आनंदाच्या अश्रूंनीं त्यानें ते चिंब करून टाकिले, आणि पुण्यवान् बळीच्या पुढें तो नाचला." मध्ययुगामध्यें ख्रिस्ती देवळांतून धार्मिक नाच होत असत; आणि जरूशलेममध्यें हल्लींहि होतात.

४५. आणखी एका प्रकारच्या विधीची उपपत्ति लावण्याकरितां आपणास वन्दनाच्या मूळ स्वरूपाकडे गेलें पाहिजे. हा विधि म्हटला म्हणजे शरीराच्या कोणत्या तरी भागावर धूळ किंवा राख घालून घेऊन अंकितपणा व्यक्त करणें हा होय.

माणसें जेव्हां आपल्या राजापुढें वाळूंत लोळण घेतात,

किंवा रांगत जातात, किंवा जमिनीवर वरचेवर डोकें आपटितात, तेव्हां त्यांच्या अंगास सहजच धूळ वगैरे लागते. म्हणून हा त्यांच्या अंगास चिकटणारा मळ हें अंकितपणाचें आणखी एक चिन्ह समजलें जाऊं लागतें; आणि श्रेष्ठांचें संतर्पण करण्याच्या भरांत तें मुद्दाम धारण करूं लागतात, व कृत्रिमरीत्या वाढवूं लागतात. ह्याचीं उदाहरणें अगोदरच सहजगत्या आफ्रिकेमधील आलेलीं आहेत; त्याचीं निराळा विधि म्हणून त्याच्याहूनहि अधिक स्पष्ट उदाहरणें त्याच खंडांत सांपडतात. उदाहरणार्थ, कांगोप्रांतामध्यें प्रत्येक गांवनायकापुढें गांवकरी साष्टांगप्रणिपात करितात, जमिनीस तोंड लावितात, आणि डोकें व बाहू ह्यांजवर धूळ उडवून घेतात. आणि बर्टन असें सांगतो कीं, डाहोमनलोकांत वन्दनाचे दोन भाग आहेत; एक प्रणिपात आणि दुसरा डोक्यावर धूळ किंवा रेती ओतून घेणें. त्याचप्रमाणें नैजरनदीवरील काकान्डालोक परक्यास वन्दन करतांना बहुतेक जमिनीपर्यंत लवतात, आणि आपल्या कपाळावर कित्येक वेळां धूळ उडवून घेतात. आणि बलोंडालोकांमध्यें कनिष्ठ लोक श्रेष्ठ लोकांची रस्त्यांत गांठ पडली म्हणजे एकदम गुडघे टेंकितात, आणि बाहूंवर व छातीवर धूळ फांशितात. बरें, इतर विधींप्रमाणें ह्या विधीसहि संक्षिप्त स्वरूप येतें हें ह्या बलोंडालोकांमध्येंच दिसून येतें. कारण त्यांच्याबद्दल लिव्हिंगस्टन असें म्हणतो कीं, नाईक लोक बाहूंना वाळू फांसण्याची केवळ नक्कल करितात, कारण हातांत वाळू मुळींच घेत नाहींत. खालच्या नैजरवरील लोकांमध्यें पुरुष व स्त्रिया

असेंच करितात. एशियामध्यें हा विधि ह्याच हेतूनें पूर्वी करीत होते, व अजूनहि करितात. टर्कीमध्यें ह्या वन्दनविधीचा संक्षेप अजूनहि दृष्टीस पडतो. तेथें परेडीच्या वेळीं घोड्यावर बसलेले हपीसर देखील आपल्या वरिष्ठांस वन्दन करतांना आपल्या डोक्यावर धूळ फेंकण्याची नक्कल करितात; आणि यात्रेकरूंचा तांडा यात्रेस निघाला म्हणजे प्रेक्षक लोक तीच नक्कल करितात.

हीब्रूलोकांचा इतिहास पाहतां, दृश्यलोकांचेपुढें अंकितभाव दर्शविण्याचें जें हें साधन त्याचा उपयोग अदृश्यलोकांपुढेंहि करितात हें दिसून येतें. प्रेतविधीच्या वेळीं भुतास संतुष्ट करण्यासाठीं रक्त काढणें, अंगावर चरे काढणें, केंस कापून टाकणें, इत्यादि जे विधि त्या लोकांत करीत असत त्यांबरोबरच डोक्यावर राख टाकणें हाहि विधि करीत असत. देवास प्रसन्न करण्यासाठींहि असेंच करीत. क्याथलिकलोकांमध्यें अजूनदेखिल विशेष देहदण्डन व मनःखण्डन करून घेण्याच्या प्रसंगीं हा विधि करितात.

४६. अंकितभाव दर्शविणाऱ्या आणखी कांहीं हालचाली आहेत त्यांची उपपत्ति लावण्यासाठीं जेत्यापुढें जितलोक प्रारंभीं जें वन्दन करितात त्याकडे पुनः गेलें पाहिजे. उदाहरणार्थ, मागच्या एका कलमांत वर्णिल्याप्रमाणें खोंडलोक हात जोडून जमिनीवर पडतात. हें हात जोडणें कोठून आलें?

ह्याच्या उपपत्तीची दिशा दाखविणारें उदाहरण पेरूदेशामधील एक अगोदरच दिलेलें आहे. त्या लोकांत हात बांधून घेणें आणि मानेभोंवतीं दोरी गुंडाळणें हें

एक अंकितपणाचें दर्शक असे; म्हणजे काय, तर, लढाईतील कैद्यांच्या सोंगाची बतावणी ते करीत असत. लढाईत धरलेले लोक संरक्षणविहीन करण्यासाठीं त्यांचे हात बांधतात ह्याबद्दल पुरावा पाहिजे असल्यास आसिरियनलोकांच्या भिंतीवरील चित्रांकडे प्रथम बोट दाखवितां येईल; पण पोलीसदेखील पकडून आणिलेल्या आरोपीच्या हातांत बिडी ठोकितात ही गोष्ट ध्यानांत आणतां, कैद्यांस निर्बल करण्यास ह्या साधनाचा उपयोग करणें सहजगत्या कसें सुचतें हें लक्षांत येतें. आणि बांधलेले हात हें अंकितत्वाचें दर्शक म्हणून लोकांनीं मुद्दाम स्वीकारिलें असावें ह्याबद्दल एशिया व आफ्रिका या दोन खंडांमधील दोन विलक्षण चालींवरून पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, युगांडाच्या राजानें जेव्हां **स्पेक** व **ग्रांट** यांची परत भेट घेतली, तेव्हां त्याचे भाऊ हात बांधून त्याच्यामागून आले; आणि स्वतः राजाहि गादीवर बसण्यापूर्वी असाच हात बांधून बाहेर जात असे. चिनी लोकांमध्यें मूल जन्मास आल्यावर तिसऱ्या दिवशीं त्याचीं मनगटें बांधण्याचा विधि करीत असत; आणि तीं बंधनें त्या मुलाच्या हातांत चवदाव्या दिवसापर्यंत ठेवितात, आणि कधीं कित्येक महिने व कधीं कधीं वर्षभरहि राखितात. असें केल्यानें पुढें तें मूल बहुधा त्रासदायक होत नाहीं असें ते समजतात.

ह्यावरून सहजच असें अनुमान निघतें कीं प्रारंभीं वन्दन करतांना पूर्ण अंकितत्व दर्शविण्यासाठीं हात जोडून जे वर करीत ते ते बांधा असें सांगण्याच्या मतलबानें करीत असत. सयामीलोकांबद्दल **लालूबर** असें म्हणतो

कीं, सयामी माणसाच्या हातांत हात घालण्यास तुम्हीं पुढें केल्यास तो तुमच्या हातांत आपले दोन्ही हात घालितो, जणूं काय त्याचा मतलब आपण तुमच्या अगदीं स्वाधीन झालों आहों असें दर्शविण्याचा असतो. उनिएम्बिमध्यें दोन माणसें भेटलीं म्हणजे त्यांच्यांतील कमी पदवीचा माणूस आपले हात जोडितो, व दुसरा माणूस ते हळूच आपल्या हातांनीं दाबितो. सुमात्रामध्यें वन्दन करावयाचें म्हणजे अंग वांकवावयाचें, आणि कनिष्ठानें वरिष्ठाच्या हातांत आपले जोडलेले हात घालावयाचे, आणि नंतर ते आपल्या कपाळास लावावयाचे. यूरोपामध्येंहि एका काळीं अंकितत्व दाखविण्यासाठीं अशाच प्रकारची क्रिया करीत असत. उदाहरणार्थ, कनिष्ठ जमीनदार श्रेष्ठ जमीनदारास निष्ठाप्रदर्शन करतांना गुडघे टेंकून त्याच्या हातांत आपले जोडलेले हात देत असे.

पूर्वींच्या उदाहरणांप्रमाणें ह्या उदाहरणांतहि पराभव आणि म्हणून राजकीय अंकितत्व दर्शविणारी जी ही बैठक तीस धार्मिकनिष्ठादर्शक बैठकीचें स्वरूप येतें. डोक्यावर हात जोडून जिवंत शास्त्याप्रत जो मान इतर लोक देतात तोच मुसलमानलोक देवास देतात. ग्रीकलोकांमध्यें आलिम्पियन देवांची प्रार्थना उभें राहून डोक्यावर हात जोडलेले धरून, करीत असत; सामुद्रिक देवांची प्रार्थना हात ताठ धरून करीत असत, आणि टार्टारसच्या देवांची प्रार्थना हात खालीं धरून करीत असत. आणि यूरोपामध्येंहि पूर्वीं श्रेष्ठ माणसापुढें कनिष्ठ माणूस आज्ञाधारकपणा दर्शविण्यासाठीं जसे हात जो-

डीत असे, तसेच प्रार्थना करतांना जोडावे म्हणून अद्यापहि मुलांस शिकवितात.

अशाच प्रकारचा हातांचा उपयोग सामाजिक व्यवहारामध्येंहि सुरू होतो, आणि त्याचा अर्थ स्पष्टपणें तोच असतो. उदाहरणार्थ, सयामीलोक जेव्हां एकमेकांस वन्दन कारितात तेव्हां ते हात जोडून तोंडापुढें किंवा कपाळापुढें धरितात. चीनदेशांत वन्दनाचे जे आठ प्रकार आहेत त्यांपैकीं सर्वांत कमी सन्मानदर्शक प्रकार हा आहे कीं हात जोडून छातीवर धरावयाचे. इंग्रजलोकांमध्येंदेखील ह्या कृतीचा कांहीं अवशेष दृष्टीस पडतो. एकादा विशेष आर्जवी दुकानदार किंवा लुडबुड्या खाणावळवाला हात एकमेकांवर धरून व थोडेसे उचलून हळूच हालवितांना दृष्टीस पडतो; आणि त्यावरून ती हालचाल मूळच्या ह्या अंकितत्वदर्शक हालचालीवरून उत्पन्न झाली असावी असें दिसतें.

४७. आतां ह्यांशीं संबद्ध परंतु ह्यांपासून भिन्न उगम असलेल्या अशा एका वन्दनसमुच्चयाचा विचार करूं. आतांपर्यंत निरूपिलेल्या वन्दनांचा अंकितमाणसाच्या पोषाकाशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं. पण पोषाकाच्या भिन्न भिन्न प्रकारांवरून, स्थितीवरून किंवा ठेवणीवरून अनेक वन्दनविधिप्रकार उत्पन्न होत असतात.

जित माणूस जेत्यापुढें जमिनीवर आडवा पडून आणि स्वतःच त्याच्या मालकीचा बनून, आपल्या सर्व वस्तूंचीहि मालकी त्याबरोबरच अर्थात् गमावितो; आणि म्हणून आपलीं शस्त्रें जेत्याच्या हवालीं करून त्यानें मागितल्यास आपल्या वस्त्रांपैकींहि मोलवान् असतील तीं

त्यास देतो. म्हणून कैदी केलेल्या माणसाचा पूर्ण किंवा अपूर्ण नम्रपणा हा त्याच्या जितत्वाचा आणखी एक पुरावा बनतो. पूर्वीं तो असा मानीत असत ह्याबद्दल स्पष्ट पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, आसिरियनलोक आपल्या बंदीवानास अगदीं वस्त्रहीन करीत असत हें त्यांच्या खोदिवकामावरून व्यक्त होतें. अफगाणिस्थानाशीं इंग्रजांची जी पन्नास वर्षांपूर्वीं लढाई झाली तिच्यांत आफ्रिडीलोकांनीं पकडलेल्या शत्रूंस अगदीं नगे केल्याचें प्रसिद्ध झालें होतें. एवंच अंगावरचीं वस्त्रें काढून दुसऱ्याच्या स्वाधीन करणें ही राजकीय अंकितपणाची खूण बनते, आणि कांहीं ठिकाणीं सन्मानदर्शक विधिहि बनतो. उदाहरणार्थ, फीजीमध्यें खंडणी देण्याच्या समयीं सोमोसोमोचे नाईक अंगावरील वस्त्रें काढून टाकितात. शिवाय आपण असें वाचितों कीं, कूक जेव्हां ताहिती येथें गेला, तेव्हां दोन श्रेष्ठ पदवीचे लोक त्याच्या जहाजावर आले, आणि प्रत्येकानें आपापला मित्र निवडिला, म्हणजे आपल्या अंगावरचीं बरींचशीं वस्त्रें काढून त्याच्या अंगावर घातलीं. आतां सामोआबेटामध्यें हा विधि ह्याच्याहूनहि संक्षिप्त झालेला आढळून येतो; म्हणजे ते कमरेचा पट्टा तेवढा काढून नजर करितात.

ह्या उदाहरणांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, शरीर कमज्यास्त प्रमाणावर उघडें करून जीं वन्दनें करीत असतात, त्यांची उत्पत्ति ह्या वस्त्रदानापासून होते. उदाहरणार्थ, सौडानमधील मेलीच्या सुलतानाबद्दल इबनबांटू असें सांगतो कीं, त्याच्यापुढें बायकांस उघडें यावें लागतें; आणि हा नियम सुलतानाच्या खुद्द मुलींस-

हि लागू आहे. शिवाय, युगांडाच्या दरबाराबद्दल स्पेक असें सांगतो कीं, तेथील नोकरबाया अगदीं नग्न असतात. आफ्रिकेंत इतरत्र यापेक्षां कमी पूर्ण वस्त्रहीनता हें वन्दनचिन्ह समजतात. उदाहरणार्थ, आबिसीनियामध्यें कनिष्ठ लोक वरिष्ठापुढें वरून कमरेपर्यंतचा भाग उघडा करून जातात; पण सारख्या दर्जाच्या माणसासमक्ष अंगावरील वस्त्राचें एक टोंकच नुसतें जरासें एकीकडे करितात. पालिनीशियामध्यें असेंच आहे. उदाहरणार्थ, ताहितियनलोक राजापुढें जातांना कमरेपर्यंतचा कपडा काढून जातात. सोसैटीनामक बेटांतील लोक असेंच करितात. हा वन्दनप्रकार आणखी संक्षिप्त कसा बनतो, आणि तो शास्त्यांखेरीज इतर माणसांस कसा लागू करूं लागतात, हें गोल्डकोस्टमधील लोकांच्या उदाहरणावरून व्यक्त होतें. ते लोक यूरोपियन लोकांना वन्दन करतांना देखील उजव्या हातानें डाव्या खांद्यावरील झगा अंमळसा एकीकडे करितात. जेव्हां एकाद्यास मोठाच मान द्यावयाचा असेल तेव्हां खांद्यावरील झगा सगळाच एकीकडे करितात. आणि बर्टन असें म्हणतो कीं, योरूबा आणि गोल्डकोस्ट ह्या प्रदेशांत खांदे उघडे करणें हें टोपी काढण्यासारखेंच आहे.

आतां टोपी काढणें किंवा डोकें उघडें करणें ह्याचा मूळचा अर्थ तोच आहे हें उघडच आहे. ह्या दोन गोष्टींमधील हा संबंध यूरोपांतील कांहीं प्रचारांत दृष्टीस पडतो; उदाहरणार्थ, फोर्ड असें म्हणतो कीं, स्पेनदेशांत डगला काढणें ह्याचा अर्थ इंग्लंदांतील टोपी काढण्यासारखा आहे. डेहामीमध्यें तर ह्या दोन्ही चालींचा

संगम झालेला दृष्टीस पडतो; कारण बर्टन म्हणतो कीं, माझें स्वागत करतांना तेथील लोकांनीं आपले खांदे उघडे केले, आणि टोप्या काढिल्या. ताहितीमध्येंहि कमरेपर्यंत वरचा भाग राजापुढें उघडा करितात, एवढेंच नाहीं, तर डोकेंहि उघडें करितात. ह्यावरून असें दिसतें कीं, यूरोपियन लोकांत टोपी काढण्याचा व त्याचाहि संक्षेप करून टोपीस नुसता हात लावण्याचा जो प्रकार आहे, तो प्रारंभीं कैदी केलेला माणूस आपल्याजवळ होतें नव्हतें तें सर्व देण्यासाठीं जें आपणास वस्त्रहीन करून घेत असे त्याचा अवशेष आहे.

आतां पाय उघडे करणें ह्याचा उगम तोच आहे हें ह्या गोल्डकोस्टमधील लोकांच्याच उदाहरणावरून चांगलें दिसतें. कारण ते जसे शरीराचा वरचा भाग थोडासा उघडा करितात, तसेच जोडेहि सन्मानार्थ पायांतून काढितात; म्हणजे काय, तर, ते आपलें शरीर दोन्ही टोंकांस आच्छादनहीन करितात. प्राचीन अमेरिकेंत पाय उघडे करण्याचा अर्थ सर्वत्र हाच असे. उदाहरणार्थ, पेरूमध्यें सरदार केवढाहि मोठा असला तरी राजापुढें त्यास गरिबीचा पोषाक आणि उघडे पाय यांसहित जावें लागत असे; आणि मेक्सिकोमध्येंहि सरदारांस व संस्थानिकांस तसेंच करावें लागत असे. एशियाखंडामध्यें असेंच आहे हें सांगावयास नकोच. उदाहरणार्थ, ब्रह्मदेशांत भररस्त्यावर देखील राजाची गांठ पडल्यास यूरोपियनास आपले बूट काढावे लागत असत; आणि इराणामध्येंहि राजापुढें उघड्या पायांनीं जावें लागतें.

ज्या समाजांमध्यें अंकितपणा फारच नम्र रीतीनें

व्यक्त करणें भाग असतें त्या समाजांत दुसऱ्या कांहीं चाली दृष्टीस पडतात त्यांचाहि अर्थ व उगम असाच आहे, हें उघडच दिसतें. त्या चाली शास्त्यांसमोर खरबरीत वस्त्रें घालून जाणें ह्यासंबंधाच्या होत. उदाहरणार्थ, मेक्सिको व पेरू या देशांत राजापुढें सरदारांस देखील गरिबीचा पोषाक करून जावें लागत असे. डेहामीमध्येंहि असलीच चाल आहे. तेथें सर्वांत उच्च लोकांस घोड्यावर बसण्याची, पालखींतून जाण्याची, रेशमी वस्त्रें घालण्याची, पुष्कळ अनुयायी ठेवण्याची, छत्रें, पताका, वाद्यें, वगैरे इतमाम करण्याची परवानगी आहे; पण राजवाड्याच्या दरवाजांत शिरतांना हा सर्व इतमाम बाजूस ठेवावा लागतो. मध्यकालीन यूरोपामध्यें देखील पोषाकाचे जे भाग दास्यत्व प्रदर्शित करण्याच्या विरुद्ध असतील ते अंकितभाव दर्शवितांना काढून घेत असत. उदाहरणार्थ, १४६७ सालीं फ्रान्सांत एका शहरचे पुढारी लोक विजयी ड्यूकास शरण जाऊन त्यास उघड्या पायांनीं व डोक्यांनीं व अंगांत केवळ सदरे घालून शहरच्या किल्ल्या अर्पण करिते झाले, असें आपण वाचितों. आणि जमीन धारण करण्याबद्दल निष्ठा दर्शवितांना कुळांस असेंच करावें लागत असे. उदाहरणार्थ, सेंट सायमन असें सांगतो कीं. दुय्यम जमीनदार श्रेष्ठ जमीनदारास आपला पट्टा, तलवार, हातमोजे, आणि टोपी हीं निष्ठाप्रदर्शनाचे वेळीं अर्पण करीत असे. एवंच चांगलीं वस्त्रें काढून टाकणें आणि जाडींभरडीं लेणें, ह्या दोहोंचाहि अर्थ एकच दिसतो.

इतर विधींप्रमाणें हाहि विधि दृश्य अशा भीतिप्रद

शास्त्याप्रत प्रथम योजीत असून मागून अदृश्य अशा तसल्याच शास्त्याप्रत, म्हणजे भूत व देव यांप्रत, योजूं लागतात. उदाहरणार्थ, हीब्रूलोक भुतास संतुष्ट करण्याकरितां गोणपाट वापरतात, भस्म फांसतात, केंस कापतात, रक्त काढितात, आणि अंगावर खुणा करून घेतात. एका पौर्वात्य देशांत मृतनायकाच्या आप्तस्त्रिया अंगास राख फांसून आणि फाटकींतुटकीं रकटें नेसून सर्व मुख्य मुख्य रस्त्यांतून धांवत सुटतात. अशा रीतीनें भूतसंतर्पणाचे हे विधी पुढें देवसंतर्पणाचेहि विधी बनतात. उदाहरणार्थ, हीब्रूलोकांत, जोडे काढणें हा एक देवपूजेचा प्रकार असे. पेरू देशांत, राजा स्वैरीजकरून इतर सर्व लोक सूर्याच्या देवळाकडे जातांना दोनशें कदमांवर आपले जोडे काढून ठेवीत; आणि राजा देवळाच्या दरवाजापाशीं काढून ठेवी. डोक्यावरील आच्छादन काढण्याच्यासंबंधानें असेंच आहे. उदाहरणार्थ, एकाद्या थडग्यापाशीं किंवा देवळापाशीं टोपी काढणें ही ख्रिस्ती लोकांत सामान्य चाल आहे; आणि वाटेंत प्रेत जातांना दृष्टीस पडलें तरी ते तसेंच करितात.

बरें, दुसऱ्या पक्षीं ह्याप्रकारचीं वन्दनें प्रथम श्रेष्ठ माणसांस आणि नंतर त्यांच्याहून खालच्या दर्जाच्या माणसांस करीत असून मागून तीं सामान्य माणसांसहि करूं लागतात. वर, जातां जातां, हें सांगितलेंच आहे कीं आफ्रिकेंत खांदा जरासा उघडा करणें हा एक साधारण पदवीच्या लोकांमध्यें वंदनप्रकार आहे. डमारालोक परक्याच्या घरांत शिरण्यापूर्वीं जोडे बाहेर काढून ठेवितात. जपानी माणूस दुकानांत शिरतांनादेखील जोडे

बाहेर काढून ठेवितो. टर्किशलोकांमध्यें घरांत शिरतांना असेंच करितात. आणि यूरोपांत देखील एकाद्या शेतकऱ्याच्या झोंपडींत शिरतांना टोपी उचलून हातांत घेण्याची चाल सामान्य झालेली आहे.

४८. आतां ज्या वंदनांचा मूळ उद्देश जेत्याच्या स्वाधीन झाल्याचें दर्शविण्याचा असतो तीं वंदनें हळू हळू एकाच पदवीचे लोक एकमेकांस कशीं करूं लागतात ह्याबद्दल आणखी कांहीं विवेचन करणें जरूर दिसतें.

उड्या मारणें, टाळ्या वाजविणें, आणि कोंपरांनीं कुशी बडवून घेणें, इत्यादि ज्या स्वाभाविकरीत्या आनंददर्शक शरीराच्या तालबद्ध हालचाली आहेत त्यांचा उपयोग राजांस खुष करण्याकरितां आनंदाचिन्हें दर्शविण्याकडे होऊं लागतो, ह्याबद्दलचा पुरावा अगोदरच दिलेला आहे. हीं आनंददर्शक चिन्हें सारख्या पदवीच्या लोकांमध्यें शिष्टाचाराचीं दर्शक बनतात. उदाहरणार्थ, **ग्रांट** असें म्हणतो कीं, तुर्की छावणींत कोणी जन्मास आलें म्हणजे बायका बाळंतिणीच्या दरवाज्यापाशीं जमत असत, आणि टाळ्या वाजवून, नाचून, व ओरडून आनंद दर्शवीत असत. आफ्रिकेंत स्लेव्हकोस्ट नामक प्रदेशांत सारख्या पदवीच्या दोन असामींची गांठ पडली म्हणजे ते दोघेहि एकदम गुडघे टेंकितात, टाळ्या वाजवितात, आणि एकमेकांस वंदन करितात. चीन देशांत लग्नाचे वेळीं लग्नास आलेले लोक नवरीच्या पायांपाशीं साष्टांगप्रणिपात करून तिचें अभीष्टचिंतन करितात, आणि तीहि गुडघे टेंकून व डोकें जमिनीवर आपटून त्यांचे आभार मानिते. आणि **ब्यांक्रॉफ्ट** म्ह-

णतो कीं मॉस्किटोलोकांमध्यें एकाद्याला कोणी भेटल्यास तो त्याच्या पायां पडतो, व तो दुसरा गृहस्थ त्याला वर उचलून त्यास आलिंगितो, आणि स्वतः त्याच्या पायां पडून त्यानें आपणास उचलावें व कवटाळावें अशी अपेक्षा करितो. ह्या उदाहरणांवरून, एकमेकांपुढें डोकीं लवविणें, गुडघे लवविणें आणि टोप्या काढणें इत्यादि जे वंदनप्रकार आधुनिक लोकांत दृष्टीस पडतात ते लढाईतील कैद्याचे मूळचे साष्टांगप्रणिपात आणि वस्त्राहरणें ह्यांपासून उत्पन्न झालेले आहेत, असें स्पष्ट दिसतें.

परंतु हीं उदाहरणें देण्यांत आमचा मुख्य उद्देश आणखी एका ज्यास्त प्रचारांतील विधीची उपपत्ति लावण्याचा आहे. सभ्य आरबलोकांत कनिष्ठ माणूस वरिष्ठाच्या हाताचें चुंबन घेऊं लागला म्हणजे वरिष्ठ माणूस दुसऱ्यास तसदी देणारा नसेल तर त्यास तो तसें करूं देत नाहीं, आणि नंतर तो कनिष्ठ माणूस आपल्याच हाताचें चुंबन घेतो. ह्याबद्दल मालकम आणखी पुरावा देतो. तो म्हणतो कीं, कोणत्याहि आरबाला त्याचा मित्र भेटला म्हणजे तो त्याचा उजवा हात हालवितो, आणि तो आपल्या छातीपाशीं नेतो; आणि नीभर असें सांगतो कीं, रानांत दोन आरबांची गांठ पडली असतां दहापेक्षां अधिक वेळ ते हातांत हात घालून हालवितात; आणि आपापल्या हातांचें चुंबन घेऊन कुशलवृत्त पुशितात. येमेनमध्यें दोन गृहस्थ भेटले असतां दोघे प्रत्येकाचा हात हातांत घेण्याची इच्छा दर्शवावी असें करितात आणि आपापले हात तो मान आपल्यास मिळूं नये म्हणून मागें घेतात; शेवटीं त्यांच्यापैकीं वयानें वडील

असेल तो धाकट्यास आपल्या हाताच्या बोटांचें चुंबन घेऊं देतो. तर मग हातांत हात घालून हालविण्याची जी चाल आहे तिचें मूळ हेंच नव्हे काय? दोन माणसांना एकमेकांच्या हातांचें चुंबन घेऊन वंदन करण्याची जर इच्छा झाली, आणि ते दोघेहि जर आपापले मागें घेऊं लागले, तर हातांत हात घालून ते तोंडाकडे नेण्याची व पुनः खालीं घेण्याचीच चाल उत्पन्न झाली पाहिजे; आणि पुढें तिचा संक्षेप होऊन केवळ हातांत हात घालून दाबण्याची चाल उत्पन्न झाली पाहिजे.

आरबलोकांच्या चालीवरून हातांत हात घालण्याच्या चालीची जी ही उपपत्ति लागते ती लागली नसती तरी, ती कशी तरी असल्याच रीतीनें उत्पन्न झाली असली पाहिजे असें मानणें भाग आहे. कारण एकमेकांस वंदन करण्याकरितां ही हातांची हालचाल लोकांनीं मुद्दाम ठरविली असें कांहीं आपणास म्हणतां येत नाहीं. आणि म्हणून इतर विधींप्रमाणें ह्याहि विधीची उत्पत्ति जर अंकितभावदर्शक अशा कांहीं कृतीपासून झालेली असेल, तर ती हस्तचुंबनक्रियेपासूनच होण्याचा संभव विशेष दिसतो.

४९. एवंच, वंदन कोणत्याहि प्रकारचें असो; त्याचें मूळ आणि विजयचिन्ह व अंगकर्तन ह्यांचें मूळ हीं एकच आहेत. जितशत्रू जेत्याच्या अगदीं स्वाधीन झालेला असल्यामुळें, तो, त्यानें त्याच्या शरीराचा कोणता तरी भाग विजयचिन्ह म्हणून कापून घेऊन त्यास ठार करावें, किंवा एकादा लहानसा भाग घेऊन त्यास आपला अंकित बनवावें, एवढ्यासाठीं त्याच्यापुढें प-

डतो; त्यावेळीं तो कधीं उताणा पडतो, किंवा कधीं आपली मान जेत्याच्या पायाखालीं देतो; त्याचें शरीर धुळीनें भरलेलें असतें, हातांत शस्त्र नसतें, आणि कपडे फाटलेले असतात किंवा जेत्यानें मोलवान् म्हणून हिरावून घेतलेले असतात. एवंच साष्टांगप्रणिपात, धूल्याच्छादन आणि वस्त्राहरण हीं पराजयापासून उत्पन्न होत असल्यामुळें, अंगकर्तनांप्रमाणें तींहि पराजयाचे पुरावे बनून जातात. ह्यावरून, प्रथम, गुलामांनीं धन्याप्रत आणि प्रजाजनांनीं शास्त्याप्रत जबरीनें अंकितभावप्रदर्शनें करण्याच्या चाली उत्पन्न होतात; नंतर, श्रेष्ठांपुढें आपखुषीनेंच नम्रतेच्या बैठकी धारण करण्याच्या चाली उत्पन्न होतात; आणि अखेरीस, सारख्याच दर्जाच्या लोकांनीं एकमेकांप्रत आपण कनिष्ठ आहों असें दर्शविण्याच्या सभ्यतेच्या हालचाली उत्पन्न होतात.

आतां सर्वप्रकारच्या वन्दनांची उत्पत्ति युद्धशीलतेच्या साम्राज्यांत होते हा जो सिद्धान्त आहे तो समाजाच्या युद्धशील नमुन्याच्या वाढीबरोबर त्यांचीहि वाढ होत जाते ह्या गोष्टीशीं सुसंगतच आहे. अंकितभावदर्शक बैठकी व हालचाली मुख्यविहीन टोळ्यांत, किंवा अस्थिर नायकीच्या टोळ्यांत दृष्टीस पडत नाहींत; उदाहरणार्थ, फ्यूजियन, आन्दामानी, आस्ट्रेलियन, टास्मेनियन, व एस्कीमो, वगैरे लोकांत त्या नाहींत. कामस्चाडेललोकांचा जेव्हां प्रथम शोध लागला तेव्हां त्यांना शास्ते कोणी नव्हते; त्यावेळचें त्यांचें वर्णन असें आढळतें कीं, त्यांच्या चाली अगदीं दांडगेपणाच्या आहेत; ते कोणत्याहि सभ्यतादर्शक शब्दाचा किंवा वन्द-

नांचा उपयोग करीत नाहींत; म्हणजे, एकमेकांस पाहून ते टोप्या उचलीत नाहींत किंवा डोकें लववीत नाहींत. उलटपक्षीं, जे समाज युद्धशीलतेमुळें संयुक्त व घनीभूत झालेले आहेत, आणि ज्यांस युद्धशील घटना प्राप्त झालेली आहे, त्यांमध्यें राजकीय व सामाजिक बाबतींत वन्दनें अत्यन्त नम्रतादर्शक असतात उदाहरणार्थ, लढवय्या व नरमांसभक्षक अशा फीजियनलोकांत असलीं वन्दनें दृष्टीस पडतात, जेथें शास्त्यांचा आपल्या प्रजाजनावरील अधिकार अमर्याद आहे; तशींच तीं युगांडामध्येंहि दृष्टीस पडतात, जेथें लढाई नेहमींचीच आहे, जेथें सरकारी उत्पन्न लूट करून मिळवीत असतात, आणि जेथील राजाबद्दल आपण असें वाचितों कीं, " तो पारधीस गेला असतां ज्याअर्थीं त्यास कांहीं शिकार सांपडली नाहीं त्याअर्थीं त्यानें आपल्या बऱ्याच लोकांवर गोळ्या घातल्या ". तद्वतच, तीं आपणास रक्तलोलुप डेहामीमध्यें आढळून येतात, जेथें राजाचा वाडा शृंगारण्यासाठीं ज्यास्त डोकीं मिळावीं म्हणून शेजारच्या समाजांवर हल्ले करीत असतात. आतां ह्याहून ज्यास्त सुधारलेल्या राष्ट्रांकडे पाहतां तीं सयाम, जपान, व चीन या देशांमध्यें दृष्टीस पडतात; आणि ह्या सर्व ठिकाणीं स्वेच्छाचारी राजसत्ता आहे. वन्दन म्हणून पायांचें चुंबन घेण्याचा जो प्रकार आहे त्याची गोष्ट अशीच आहे. उदाहरणार्थ, ही चाल प्राचीन पेरूदेशांत असे; जेथें सर्व राष्ट्राला लष्करी कैद असे. ती मादागास्कारमध्यें दृष्टीस पडते, जेथें युद्धशील घटना व चळवळ हीं स्पष्ट दिसतात. कांहीं पौर्वात्य देशांत रा-

जाची स्वेच्छाचारी सत्ता पूर्वीप्रमाणेंच हल्लींहि अनियंत्रित असून तेथें ही चाल आहेच. अर्धवट किंवा सगळा पोषाक उतरण्याच्या चालींचें असेंच आहे. ह्याचीं आत्यन्तिक रूपें फीजी व युगांडा येथें दृष्टीस पडतात हें आपण वर पाहिलेंच आहे; बरें, कमरेपर्यंतच अंग उघडें करण्याचा जो त्याहून मृदुतर प्रकार तो आबिसीनिया व ताहिती येथें दृष्टीस पडतो, जेथें राजाची सत्ता जरी मोठी आहे तरी तिचा अंमल तितक्या बेफिकीररीतीनें करीत नाहींत. पाय उघडे करण्याच्यासंबंधानेंहि असेंच आहे. हा वन्दनप्रकार हल्लीं जसा इराणांत दृष्टीस पडतो, तसाच प्राचीन पेरू व मेक्सिको ह्यांमध्यें दृष्टीस पडत असे; आणि ह्या सर्व देशांत युद्धशीलतेमुळें उत्पन्न झालेलीं स्वेच्छाचारी सरकारें आहेत. तद्वतच, डोक्यावर धूळ उडवून घेणें, हलकीं वस्त्रें धारण करणें, ओझें नेण्यासाठीं डोक्यावर घेणें, हात बांधून घेणें, इत्यादि जीं दुसरीं नीच वन्दनें आहेत त्यांचीहि गोष्ट अशीच आहे.

यूरोपियन लोकांत प्राचीनकाळीं जेव्हां लढाई हेंच लोकांचें मुख्य काम असे तेव्हांच्या त्यांच्या चाली आणि हल्लींच्या त्यांच्या चाली ह्यांची तुलना करतां हेंच सत्य दिसून येतें. उदाहरणार्थ, लष्करी जमीनदारीच्या अमदानींत अंकितभाव दर्शवावयाचा तो पायांचें चुंबन घेऊन, गुडघे टेंकून, हात जोडून, आणि पोषाकाचे कांहीं भाग उतरून, दाखवीत असत; पण हल्लीं ह्या वन्दनांपैकीं विशेष नम्रतेचीं वन्दनें, कांहीं पुरतीं व कांहीं कांहीं अंशीं, नष्ट झालीं आहेत; आणि त्यांच्याऐवजीं डोकें लवविणें, गुडघा लवविणें, आणि टोपी उचलणें, हे प्रकार प्रचारांत

आले आहेत. शिवाय, यूरोपांतील विशेष युद्धशील राष्ट्रें आणि कमी युद्धशील राष्ट्रें ह्यांच्यामध्येंहि असलेच भेद दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, जर्मनी वगैरे देशांत हीं वन्दनें इंग्लंदापेक्षां ज्यास्त पूर्ण व ज्यास्त लक्षपूर्वक केलेलीं अशीं आढळून येतात. इतकेंच नाहीं, तर, इंग्लंदांतील निरनिराळ्या वर्गांमध्येंहि असलाच भेद आढळून येतो; म्हणजे, वरिष्ठ वर्गांतील लोक युद्धशीलतेपासून उत्पन्न झालेल्या नियामक घटनेपैकीं असल्यामुळें राजदरबारांत व खासगी वाड्यांतून ह्या विधींकडे जितकें लक्ष देतात, तितकें उद्यमशील वर्गांतील लोक देत नाहींत. तद्वतच, फौज आणि आरमार हे जे समाजाचे विशेष स्पष्टरीत्या युद्धशील भाग त्यांमध्यें वन्दनप्रकार केवळ ज्यास्त कडकरीतीनें पाळतात इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं एका भागांत रानटी समाजांतील प्रचारांसारखा एक प्रचार आढळतो. तो हा कीं, एकाद्या ब्रिटिश लढाऊ गलबतावर गेलें कीं टोपी उचलावी लागते.

आतां भूत किंवा देव ह्यांना जीं वन्दनें करितात त्यांच्यामध्येंहि असलेच भेद दिसून येतात. हल्लीं चीनदेशांत व प्राचीनकाळीं हीब्रूलोकांत भुतास संतुष्ट करण्याकरितां गोणपाटी कापड अंगावर घेण्याचा प्रकार, प्रेतविधीच्या समयीं शरीर अर्धवट उघडें करणें आणि डोक्यावर धूळ घालून घेणें इत्यादि कांहीं प्राच्यदेशांत दिसणारे प्रकार, ह्या गोष्टी उद्यमशीलतेनें विशेष विशिष्ट अशा सुधारलेल्या समाजांतून आढळत नाहींत. थडग्यापाशीं टोपी काढणें ह्या वन्दनविधिव्यतिरिक्त इतर सर्व मृतांप्रत केलेलीं वन्दनें इंग्लिश लोकांत नष्ट झालेलीं

आहेत, कारण त्यांच्यांत उद्यमशीलता सर्वांत ज्यास्त वाढलेली आहे. देवपूजेच्या समयीं योजिलेल्या वंदनांचीहि गोष्ट अशीच आहे. प्राचीन पेरूत देवळानजीक जातांना पायांतील जोडे काढीत, आणि हल्लींहि आपल्याइकडे काढितात; पण यूरोपांत पश्चात्तापाच्या वेळेशिवाय केव्हांहि बूट काढीत नाहींत. तद्वतच चिनी लोकांचे देवपूजेच्या वेळचे साष्टांगप्रणिपात आणि जमिनीवरचीं डोकीं आपटणीं, किंवा मुसलमानांच्याहि प्रार्थनेच्या वेळच्या तसल्याच बैठकी, जेथें उद्यमशीलता बरीच स्थापन होऊन समाजसंस्था बऱ्याच स्वतंत्र झालेल्या आहेत, तेथें दृष्टीस पडत नाहींत. धार्मिक अंकितत्व व्यक्त करण्यासाठीं गुडघे टेंकण्याची चाल देखील इंग्लिश लोकांत बरीच बंद पडलेली आहे; आणि त्यांच्यांतील अगदीं अयुद्धशील असा जो क्वेकरपंथ त्यांतील लोक कोणत्याच प्रकारचें धार्मिक वंदन करीत नाहींत.

लष्करी हालचाली स्वाभाविकरीत्याच जबरीच्या असल्यामुळें त्यांच्यासंबंधानें हुकूम करणें आणि ते पाळणें ह्या गोष्टी आवश्यकच असतात ही गोष्ट ध्यानांत आणतां, आतांपर्यंत सांगितलेले हे संबंध स्वाभाविकच आहेत ही गोष्ट ध्यानांत येते; आणि म्हणून ह्या हालचाली जेथें जोरांत असतील तेथें अंकितपणा व्यक्त केलाच पाहिजे म्हणून सहजच जबरी होत असते. उलटपक्षीं, जेथें उद्यमविषयक हालचाली जोरांत असतील तेथें तद्विषयक सर्व व्यवहार कराराप्रमाणें होत असल्यामुळें ते स्वाभाविकरीत्याच आपखुषीचे असतात; आणि म्हणून तेथें अंकितपणा व्यक्त करण्याची जबरी तितकी असत नाहीं.

झ्या भक्ष्या, तुझ्यावर सर्व प्रकारचीं संकटें येवोत "; आणि जितशत्रु जेत्यास म्हणतो कीं, " मी, तुझें भक्ष्य, आलों जाहें "; म्हणजे काय, तर, माझा जीव तुझ्या स्वाधीन केला आहे. कधीं कधीं मी आपला जीव तुझ्या स्वाधीन केला आहे असें म्हणण्याच्या ऐवजीं माणूस आपल्या खऱ्या किंवा मानीव श्रेष्ठास असें म्हणतो कीं, " मी तुझी मालमत्ता आहे ", किंवा " माझी मालमत्ता तुझी आहे ", किंवा दोन्ही म्हणतो. ह्याचीं उदाहरणें आफ्रिका, एशिया, पालिनिशिया व यूरोप ह्या सर्व ठिकाणीं सांपडतात. उदाहरणार्थ, सेराकोलेट जातीच्या नीग्रोच्या घरीं कोणी परका माणूस गेला म्हणजे तो त्यास असें म्हणतो कीं, " गोऱ्या माणसा, माझें घर, माझी बायको, माझीं मुलें, तुमचीं आहेत ". दिल्लीच्या आसपास एकाद्या कनिष्ठ दर्जाच्या माणसास, " तो घोडा कोणाचा आहे ? " असें विचारिल्यास तो उत्तर करितो कीं, " गुलामाचा " म्हणजे, आपला आहे; किंवा म्हणतो कीं, " रावसाहेब आपला आहे ", म्हणजे काय, तर, आपल्या स्वाधीन आहे. सांडविच बेटांत एकाद्या नायकास हें घर किंवा जहाज कोणाचें म्हणून विचारिल्यास, " तें तुमचें व माझें आहे " असें तो उत्तर करितो. फ्रान्सांत पंधराव्या शतकांत राणी एकदां एका मठांत गेली असतां तेथील अधिपति म्हणाला, " हा मठ, त्यांतील सर्व पदार्थ, आमचे देह, आणि आमची मालमत्ता, हीं सर्व आह्मी तुमच्या स्वाधीन करितों ". आणि हल्लीं स्पेन देशांत अशी चाल आहे कीं परक्या गृहस्थानें कोणती-

हि वस्तु चांगली म्हटली कीं ती त्यास देण्यास तयार व्हावयाचें; आणि कोणास पत्र लिहावयाचें तर तें " ह्या **माझ्या** घरांतून " मी लिहितों असें न म्हणतां, " ह्या **तुमच्या** घरांतून " असें म्हणावयाचें.

पण स्त्र्या किंवा मानीव श्रेष्ठास संबोधण्याचे हे जे प्रकार आहेत त्यांमध्यें देह व मालमत्ता हीं स्वाधीन केल्याचें विधान अप्रत्यक्ष असल्यामुळें, गुलामगिरी व दास्य ह्यांचें प्रत्यक्ष विधान ज्यांत केलेलें आहे अशा प्रकारांपेक्षां कमी महत्त्वाचे आहेत; ते प्रकार रानटी काळांत सुरू होऊन अद्यापि कायम राहिलेले आहेत; त्यांचें आतां विवेचन करूं.

५२. एकादा कनिष्ठ माणूस श्रेष्ठ माणसास किंवा प्रजाजन आपल्या शास्त्यास बोलत असतां आपल्यास नोकर हा शब्द लावितो हें हीब्रूलोकांच्या कथांवरून व्यक्त होतें. आतां हल्लीं नोकर हा शब्द केवळ चाकर ह्या अर्थींच लावीत असल्यामुळें प्राचीन बखरींतून त्या शब्दाचा उपयोग गुलाम या अर्थीं केलेला आहे हें एका-एकीं ध्यानांत येत नाहीं; पण तसा तो आहे ह्यांत संशय नाहीं. म्हणून बैबलांत " तुझा नोकर " किंवा " तुझे नोकर " हे शब्द जेव्हां राजापुढें उच्चारिलेले आढळतात तेव्हां त्यांचा अर्थ दास किंवा अंकित हाच असतो. आतां हा शब्द केवळ चाकरलोकच आपल्यास लावून घेतात असें नाहीं, तर जित लोक व एकंदर प्रजाजन हेहि लावून घेतात उदाहरणार्थ, अपरिचित डेव्हिड **सॉल** यास बोलत असतां आपणास व आपल्या बापास **सॉल**चे नोकर असें म्हणतो. आणि शास्त्यांच्या-

संबंधानें ह्या शब्दाचे असलेच उपयोग अद्यापिहि प्रचारांत आहेत.

पण हा जो दास्यभाव प्रथम मुख्य शास्त्यापुढेंच व्यक्त करीत असतात तो पुढें लवकरच गौणशास्त्यांपुढेंहि करूं लागतात. उदाहरणार्थ, जोसेफच्या भाईबंदांस जेव्हां त्याच्यापुढें ईजिप्तदेशीं आणिलें तेव्हां त्याला भिऊन ते आपणास त्याचे नोकर किंवा गुलाम म्हणून म्हणूं लागले, आणि आपल्या बापासहि तेंच विशेषण त्यांनीं लाविलें. शिवाय, फायदा करून घ्यावयाचा असेल तेथें सारख्या दर्जाच्या लोकांच्या व्यवहारांतहि ह्या शब्दाचा उपयोग केलेला आढळून येतो. शिवाय, संबोधिलेल्या माणसाचे आपण गुलाम आहों असें म्हणून आपला सभ्यपणा कित्येक लोक व्यक्त करीत असतात हें गतकलमांत आपल्या नजरेस आलेंच आहे. यूरोपामध्यें फ्रान्सांत सोळाव्या शतकामध्यें सरदारलोक एकमेकांस "मी तुमचा नोकर आहें, आणि तुमच्या घराण्याचा कायमचा गुलाम आहें", असें म्हणत असत; आणि इंग्लिशलोकांत "तुमच्या हुकुमांतला", "तुमच्या कह्यांतला", इत्यादि गुलामगिरीचीं अप्रत्यक्ष वचनें योजीत असत. हल्लीं "तुमचा आज्ञाधारक सेवक", "तुमचा नम्रसेवक" इत्यादि लेखी वचनांचा मात्र उपयोग करितात; तोंडी बहुधा करीत नाहींत.

आतां धर्मविषयक बाबतींत ह्याच संतर्पक शब्दांचा उपयोग करितात ही गोष्ट प्रसिद्धच आहे. हीब्रू इतिहासांत माणसें हीं राजाचे नोकर आहेत असें जसें वर्णन आढळतें, तशींच तीं देवाचीं नोकर आहेत असेंहि

आढळतें. गुलाम जसे आपल्या धन्यांची नोकरी करितात तसे शेजारचे लोक आपापल्या देवतांची नोकरी करितात असेंहि त्यांत म्हटलेलें आढळतें.

दुसरी एक गोष्ट ह्या ठिकाणीं अशी सांगावयाची कीं, शास्ता, किंवा श्रेष्ठ किंवा दुसरा कोणीहि माणूस यांस अनुलक्षून " तुझा मुलगा " असे शब्द योजितात त्यांचा मूळअर्थ " तुझा नोकर " असा आहे. रानटी समाजांत मुलें आईबाप राहूं देतील तरच जिवंत राहूं शकतात, आणि पितृशासित समाजांतहि मुलाचा जीव घेण्याचाहि अधिकार बापास असतो, ह्या गोष्टी ध्यानांत घेतां, दुसऱ्याचे आपण पुत्र आहों असें एकाद्यानें म्हणणें म्हणजे त्याचे नोकर किंवा गुलाम आहों असें म्हणण्यासारखेंच असे हें ध्यानांत येतें. याचीं उदाहरणें मध्यकालीन यूरोपांत दृष्टीस पडतात; कारण तेव्हां लहान शास्ते मोठ्या शास्त्यांचे दत्तकपुत्र बनत असत; म्हणजे काय, तर, ते बापाची गुलामगिरी पत्करीत असत; उदाहरणार्थ, पहिला थिओडिबर्ट व पहिला चाइल्डिबर्ट हे अनुक्रमें जस्टिनियन बादशाह व मॉरिस बादशाह ह्यांचे दत्तकपुत्र बनले होते. बरें, इतर अंकितत्वदर्शक शब्दांप्रमाणें हाहि शब्द पसरत जाऊन सामान्य सभ्यतादर्शक बनतो ह्याबद्दलहि पुरावा सांपडतोच. उदाहरणार्थ, जो माणूस आपल्यास तुमचा गुलाम म्हणून म्हणतो, तोच आपल्या मुलास पुढें आणून हा " रावसाहेबांचा मुलगा " आहे असें म्हणतो. आणि सामोआबेटांत एकाद्यानें संबोधिलेल्या माणसाचा आपण मुलगा

आहों असें म्हणणें म्हणजे त्यास अतिशय मोठा मान देणें असें समजतात.

५३. आतां आपल्याकडे नीचपणा लावून घेण्याचे जे हे शब्द त्यांचा विचार सोडून दुसऱ्यास मोठेपणा देण्याचे जे शब्द त्यांचा विचार करूं. ह्या दोन प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारच्या शब्दांचा उपयोग केला तरी आपण संबोधिलेल्या माणसाच्या मानानें कमी दर्जाचें आहों हें बोलणारा व्यक्त करीतच असतो, आणि ह्या दोन्ही प्रकारच्या शब्दांचा उपयोग केल्यास ही गोष्ट ज्यास्तच जोरानें व्यक्त केल्यासारखी होते.

जिताचें जेत्याशीं जें वर्तन होतें त्यापासूनच इतर प्रकारच्या संतर्पणांप्रमाणें प्रशंसारूपी संतर्पणाचीहि उत्पत्ति होते हें प्रथमदर्शनीं संभवनीय दिसत नाहीं; पण तशी ती होते ह्याबद्दल आपल्यास कांहीं ठिकाणीं तरी पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, दुसऱ्या रामसेसनें जिंकलेले शत्रू त्यानें आपल्यावर दया करावी म्हणून त्याची प्रार्थना करतांना असें म्हणतातः—अरे स्वसैन्यसंरक्षका, अरे शूरा, मोठ्या प्रबलराजा, सत्यवादिन्, इत्यादि, इत्यादि. आतां जितशत्रूनें केलेली ही प्रशंसा आणि पुढें प्रजाजनानें केलेली प्रशंसा हीं दोन्ही एकच असतात हें सांगावयास नकोच. उदाहरणार्थ, सयामांत लोक राजास अशा शब्दांनीं संबोधितातः–हे प्रबल व महान् राजा, हे दयानिधे, हे पृथ्वीपते, इ० इ०. चीनच्या बादशाहास अशा शब्दांनीं संबोधितातः–हे देवसुता, हे दशसहस्र संवत्सरेशा, इ०इ०. ह्या प्रत्यक्ष स्तुतीशिवाय कधीं कधीं अप्रत्यक्ष स्तुति करीत असतात. उदाहरणार्थ, दिल्लीचा

बादशाह कांहींहि बोलला तरी त्याचे दरबारीलोक, काय आश्चर्य ! काय आश्चर्य ! म्हणून ओरडत असत; आणि भरदोनप्रहरीं ही रात्र आहे असें त्यानें म्हटल्यास, " हा पहा चंद्र, हे पहा तारे ", असें ओरडत.

ह्या प्रशंसापर शब्दांचा उपयोग प्रथम मुख्य शास्त्यांच्यासंबंधानें करीत असून मागाहून कमी कमी अधिकाराच्या माणसांच्यासंबंधानें करूं लागतात. उदाहरणार्थ, सोळाव्या शतकांत कार्डिनलनामक धर्माधिकाऱ्यास " फार कुलीन व फार पवित्र " अशी पदवी लावीत असत; मार्किस नामक सरदारास " माझे फार अभिजात व फार सन्मानित सरदार " अशी पदवी लावीत; आणि डॉक्टरास " सद्गुणी व उत्कृष्ट " अशी पदवी लावीत. इंग्लंदांत सरदार व जमीनदार ह्यांस " अगदीं पूज्य ", आणि सद्गृहस्थांस " अगदीं उदास " आणि " सन्मानित मनस्क " अशीं विशेषणें लावीत. कांहीं ठिकाणीं ही स्तुति अप्रत्यक्ष असते; उदाहरणार्थ, चीनदेशांत निमंत्रणपात्रिकेवर असे शब्द असतातः— " तुम्ही भोजनास आल्यास आह्मास किती तरी भपक्याच्या उच्चस्थानीं चढण्याच्या कामीं मदत होईल !" दिल्लीकडे सामान्य अधिकाऱ्यास देखील असें म्हणतातः— " महाराज, माझ्यासाठीं कांहीं तरी करूं शकतील असे दोनच असामी आहेत; पहिला देव व दुसरे तुम्ही "; किंवा " वर देव आणि खालीं आपली स्वारी "; " तुम्ही काय वाटेल तें करूं शकाल "; " तुम्ही आमचे राजे व देव आहां "; " तुम्ही देवाच्याच ठिकाणीं आहां "; इ० इ०.

" ईश्वरी इच्छा " असें जसें सामान्यतः म्हणतात तसें इराणांत " राजाची इच्छा " असें म्हणतात असें टाव्हर्नियर सांगतो; ह्यावरून देवास व राजास एकच प्रकारचीं स्तुतिपर विशेषणें कशीं लावितात ह्याची आठवण होते. ज्या ठिकाणीं युद्धशील नमुना फारच पक्क झालेला असून राजास देव समजत असतात, त्या ठिकाणीं ह्या दृश्य व अदृश्यशास्त्यांच्या स्तुती सारख्याच व्हाव्या हें साहजिकच आहे. कारण राजाची जिवंतपणींच अतिशय स्तुति करीत असल्यामुळें तो मरून देव बनला तरी त्याची ज्यास्त स्तुति करणें शक्यच नसतें. आणि अशी स्तुति एकदां सुरू झाली म्हणजे सहजच ती पुढें ती तशीच सुरू राहते.

५४. पूर्ण वन्दन म्हटलें म्हणजे त्यांत दोन गोष्टी येतात; एक अंकितपणा व्यक्त करणें, आणि दुसरें प्रीति व्यक्त करणें; ही गोष्ट पूर्वीं आपल्या नजरेस आलीच आहे; म्हणून त्याप्रमाणेंच पूर्ण संबोधनांत दोन असल्याच गोष्टी अंतर्भूत होत असतात. म्हणजे संतर्पणार्थ स्वतःस कमीपणा आणणाऱ्या किंवा दुसऱ्यास मोठेपणा देणाऱ्या शब्दांबरोबर, प्रेमव्यंजक शब्दांचा, म्हणजे दीर्घायू, आरोग्य आणि सुख हीं चिंतणाऱ्या शब्दांचा, उपयोग करीत असतात.

आतां दुसऱ्याचे हिताबद्दल व कल्याणाबद्दल काळजी दर्शविणाऱ्या शब्दांचा उपयोग, अंकितत्वदर्शक शब्दांच्या उपयोगाच्या अगोदर होऊं लागतो हें खरेंच आहे. ज्यांच्यामध्यें सरकार मुळींच नाहीं किंवा फारच अल्प आहे, व वन्दनेंहि नाहींत, असे रानटी लोक संतर्पणार्थ

म्हणून आवडदर्शक कवटाळण्यांचा आणि चुंबनांचा जसा उपयोग करितात, तद्वतच अंकितत्वदर्शक संभाषणांच्या अगोदर स्नेहदर्शक शब्दांचा उपयोग करूं लागतात. उदाहरणार्थ, स्नेकइंदियनलोक परकी गृहस्थास अशा रीनें संबोधिताण:–" मी बहुत संतुष्ट झालों आहें, मला बहुत आनंद वाटतो "; आणि ऑराकेनियनलोकांमध्यें समाजघटना वरच्यापेक्षां ज्यास्त पक्क असली तरी युद्धशीलतेनें तीस जबरीचें स्वरूप आलेलें नसून, दोघे गृहस्थ भेटले म्हणजे त्यांची एकमेकांबद्दलची व एकमेकांच्या आप्तांबद्दलची विचारपूस बारीकरीतीनें दहा किंवा पंधरा मिनिटेंपावेतों चालते.

आतां अंकितत्वप्रदर्शक कृती व शब्द ह्यांची वाढ होत असतां वन्दनाचें हें जें अंग तें चालूच असतें. अगदीं नम्रतापूर्वक वन्दनाबरोबर नीग्रोलोक अभिनन्दनपर शब्द उच्चारीत असतात हें आपल्या नजरेस आलेंच आहे; आणि फुल्लाव आबिसीनियनलोक असेंच करितात. पण ही गोष्ट जी अगदीं कळसास गेलेली दृष्टीस पडते ती एशियांतच होय. उदाहरणार्थ, आरबलोक एकमेकांस भेटले म्हणजे, " देवाचे उपकार झाले, तुमचें कसें काय आहे ? " असें कांहीं मिनिटेंपर्यंत सारखें घोकीत राहतात; आणि तेच जर चांगले सभ्य असले तर पुढें भाषण चाललें असतां मध्येंच पुनः असला प्रश्न करीत असतात. आतां यूरोपस्थ समाजांतून सरकार कमी जुलमी असून आवड व काळजी हीं दर्शविणारे शब्द कमी अतिशयोक्तिवाचक आहेत; आणि स्वातंत्र्य वाढलें आहे तसे ते कमी कमी होत चालले

आहेत. प्राचीन फ्रान्सांत राजवाड्यांत भोजनप्रसंगीं "राजा मद्यपान करीत आहे" असें राजसेवक जेव्हां जेव्हां पुकारील तेव्हां तेव्हां "राजा दीर्घायू होवो" असें पंक्तीचे सर्व लोक ओरडत असत. "रावसाहेब दीर्घायू होवोत" हे शब्द अद्यापि ऐकूं येतात; पण ते जेथें लष्करी जमीनदारीची पद्धति विशेष जारीची होती तेथेंच विशेष ऐकूं येतात; आणि इतरत्र "आपलें कसें काय चाललें आहे?" "देव आपल्या सान्निध असो" इत्यादि शब्दच आढळतात; आणि ते ज्या रीतीनें उच्चारितात त्यावरून पाहतां ते फारसे अंतःकरणपूर्वक उच्चारिले असतीलसें दिसत नाहीं.

वन्दितमाणसाचें कल्याण चिंतणाऱ्या आणि त्याचें आरोग्य चिंतणाऱ्या शब्दांबरोबर कांहीं शब्द सभोंवातलच्या स्थितीवरून उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, जेथें लढाई नेहमींची असेल तेथें "तुम्हांस शांततेचा उपभोग मिळो" असे शब्द उच्चारितात. जेथें चिलटें फार असतील तेथें सकाळीं "चिलटांनीं कसा काय त्रास दिला?" असा प्रश्न करितात; उदाहरणार्थ, हम्बोल्ट सांगतो, ओरिनोकोमध्यें.

५५. आतां व्याकरणविषयक किंवा इतर ज्या भाषणप्रकारांवरून संबोधित माणसास मोठेपणा दिल्यासारखा किंवा बोलणारानें आपणाकडे कमीपणा घेतल्यासारखा होतो तेवढ्यांचा विचार करावयाचा राहिला. विधिविषयक अन्यप्रकारांशीं ह्यांचें कांहीं बाबतींत साम्य आहे. हें आपल्या नजरेस आलेंच आहे कीं जेथें अंकितपणा अत्यन्त असेल तेथें शास्ता एक अदृश्य असतो

किंवा दृश्य असल्यास त्याजकडे कोणी पाहतां कामा नये असें असतें. ह्यावरून कांहीं देशांत असा प्रघात सुरू होतो कीं श्रेष्ठ माणूस दृष्टीस पडला कीं त्याजकडे पाठ फिरवावयाची. तद्वतच, सन्मानित माणसासमक्ष जमिनीचें किंवा त्याच्या दुसऱ्या एकाद्या वस्तूचें चुंबन करण्याच्या चालीवरून असें व्यक्त होत असतें कीं चुंबन करणारा माणूस त्या सन्मानित माणसाहून इतका हलका आहे कीं त्याची त्याच्या पायाचें किंवा पोषाकाचें देखील चुंबन घेण्याची योग्यता नाहीं. ह्याच विचारानें मोठ्या माणसाच्या संबंधानें मानपुरःसर बोलतांना जे भाषणप्रकार योजितात ते असे असतात कीं तेणेंकरून बोलणाराचा संबोधितमाणसाशीं प्रत्यक्षसंबंध येऊं नये.

हे प्रकार सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्यापहिल्याच पायऱ्यांवर प्रथम दृष्टोत्पत्तीस येतात. उदाहरणार्थ, आबिपोनलोकांमध्यें श्रेष्ठवर्गातील पुरुषांच्या नांवांच्या शेवटीं ‘ इन ’ प्रत्यय असतो, आणि बायकांच्या नांवांच्या शेवटीं ‘ एन ’ प्रत्यय असतो. त्यांच्याशीं बोलतांना हे प्रत्यय नामांना व क्रियापदांनाहि लावावे लागतात. तद्वत्च, सामोअनलोकांच्या भाषेंत श्रेष्ठांना बोलतांना योजावयाचे शब्द अगदीं निराळे आहेत. जाव्हामध्यें कोणालाहि आपल्या श्रेष्ठास सामान्य किंवा प्राकृत भाषेंत बोलण्याची परवानगी नाहीं. प्राचीन मेक्सिकन भाषेंतहि अगदीं असेंच असे असें ग्यालंटिन सांगतो.

संबोधनप्रकारांमध्यें जे हे अप्रत्यक्षभाव उत्पन्न होतात त्यांतील बहुतेकांस कारण रानटी लोकांची विशेष-

नामांबद्दल जी देवभोळी समजूत तें होय. माणसाचें नांव हें त्याच्या व्यक्तित्वाचाच भाग असतें, आणि तें ज्यास माहीत असेल त्यास त्याच्यावर अधिकार चालवतां येतो, असें समजून रानटी लोक बहुधा सर्वत्र आपलें नांव सांगण्यास नाखुष असतात. ह्या कारणामुळें व दुसऱ्याचें नांव घेणें म्हणजे त्याचा कांहीं अपराध करणें होय असें समजलें जात असल्यामुळें रानटी लोकांत नांवांस एकप्रकारची पवित्रता आलेली असते, आणि एकाद्याचें नांव विनाकारण घेणें हें निषिद्ध समजलें जातें; आणि विशेषतः कनिष्ठांनीं श्रेष्ठाचें नांव घेणें निषिद्ध धरिलेलें असतें. ह्याचा एक विलक्षण परिणाम होतो. प्रारंभीं माणसांचीं नांवें वस्तूंच्या नांवांवरून बनलेलीं असल्यामुळें त्यांच्याबद्दल निराळ्या नांवांचा उपयोग करणें भाग पडूं लागतें. उदाहरणार्थ, काफिरलोकांत बायको नवऱ्याचें किंवा त्याच्या भावाचें पाळण्यांतलें नांव प्रसिद्धपणें घेत नाहीं; आणि तें ज्या वस्तूचें सामान्य नांव असेल त्यालाहि तें लावीत नाहीं. म्हणून नायकाचें जें पाळण्यांतलें नांव असेल तो शब्दच त्यांच्या भाषेंतून जणूं काय निघून जातो, तद्वतच सामोआमधील पांगोपांगोच्या नायकाचें पिढीजादें नांव "मौंगा" (पर्वत) हें असल्यामुळें त्याच्या देखत तो शब्द डोंगरास कधीं कोणी लावीत नाहीं, तर दुसराच एक दरबारी शब्द लावितात. बरें, जेथें ह्याच्याहूनहि उच्च जातीचीं विशेषनांवें बनलेलीं असतील तेथें देखील त्यांचा सामान्य उपयोग अशाच रीतीनें निषिद्ध केलेला असतो. उदाहरणार्थ, सयामामध्यें राजाचें नांव प्रजेनें

घेतां कामा नये. म्हणून ते त्याला अनुलक्षून आडव्या-तिडव्या रीतीनें बोलतात; उदाहरणार्थ, ते त्याला "जीविताचा मालक" "देशाचा धनी" "मुख्य नाईक" इत्यादि नांवें देतात. तद्वतच चीन देशांत कोणी कोणाकडे भेटावयास गेला म्हणजे तो घरच्या यजमानाच्या बापास "घरांतील वृद्ध माणूस", "उत्कृष्ट सन्मानित गृहस्थ", "पूज्य राजघराण्यांतील पुरुष" इत्यादि नांवांनीं उल्लेखितो.

त्याचप्रमाणें पुरुषवाचक सर्वनामेंहि वर्जीत असतात; कारण संबोधित पुरुषाला तसलें सर्वनाम लावणें म्हणजे त्याच्याशीं इतका निकट संबंध स्थापन करणें होय कीं जेथें त्याच्यापासून दूर रहावयाचें असेल तेथें त्याचा उपयोग करणें प्रशस्त समजत नाहींत. म्हणून सयाममध्यें राजाचा हुकूम घेतांना होईल तितकी सर्वनामांची टाळाटाळ करितात; आणि असें सांगतात कीं सामान्य भाषणांतहि ते सर्वनामांचा उपयोग. तीं त्यांच्या भाषेंत असूनहि फारच क्वचित् करितात. चीन देशांतहि असेंच आहे. त्यांच्यांत परस्पर निकट स्नेही नसल्यास ते 'मी' व 'तूं' ह्या सर्वनामांचा उपयोग सहसा करीत नाहींत. "तुम्हीं मजवर उपकार केले ते मी चांगले जाणून आहें" असें म्हणण्याच्या ऐवजीं "महाराजांनीं किंवा गुरुजींनीं आपल्या क्षुद्रतम प्रजाजनावर किंवा शिष्यावर केलेले उपकार तो फार जाणून आहे" असें ते म्हणतात.

आतां श्रेष्ठांस ज्यास्त मान देण्यासाठीं आणि कनिष्ठांस ज्यास्त नीच करण्यासाठीं सर्वनामांत जे फेरबदल करितात त्यांचा विचार करूं. उदाहरणार्थ, सयामी भा-

र्यंत " मी " व " मला " हीं दर्शविण्यास कित्येक निरनिराळे शब्द आहेतः–(१) धनी व गुलाम यांजमधील; (२) गुलाम व धनी यांजमधील; (३) सामान्य माणूस व सरदारलोक यांजमधील; (४) सारख्या दर्जाच्या लोकांमधील; आणि (५) उपाध्येवर्गानेंच उपयोगांत आणावयाचे. जपानीलोकांमध्यें ह्या पद्धतीस ह्याहूनहि ज्यास्त पक्क स्वरूप आलेलें आहे. त्या देशांत प्रत्येक वर्गाचें स्वतःचेंच म्हणून " मी " आहें; त्याचा दुसऱ्या कोणत्याहि वर्गानें उपयोग करतां नये; आणि खुद्द मिकाडोचें एकट्याचेंच एक " मी " आहें, आणि एक स्त्रियांचें आहे. तद्वतच, नोकर, शिष्य आणि मुलें यांना लागू अशीं द्वितीयपुरुषवाचक आठ सर्वनामें आहेत. यूरोपांतहि असले कांहीं प्रकार कमी प्रमाणावर दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, जर्मनलोक प्राचीनकाळीं कनिष्ठांशीं बोलतांना नेहमीं तृतीयपुरुषाच्या एकवचनाचा उपयोग करीत असत; म्हणजे बोलणारापुढें ते जणूं काय हजरच नाहींत अशा रीतीनें त्यांच्याशीं बोलत असत. याचा उद्देश बोलणाराचा कनिष्ठाशीं जेवढा संबंध तोडवेल तेवढा तोडण्याचा असे. उलटपक्षीं, कनिष्ठलोक वरिष्ठांशीं बोलतांना तृतीयपुरुषाच्या बहुवचनाचा उपगोग करीत असत; याचा उद्देश त्यांस ज्यास्त मान देणें व त्यांच्या आपल्यामधील अंतर ज्यास्त वाढवणें हा असे. हाहि प्रकार प्रथम अधिकाऱ्यांच्यासंबंधानें सुरू होऊन तो पुढें सर्व लोकांत पसरलेला आहे. इंग्रजीमध्येंहि " तूं " बद्दल " तुम्ही " चा उपयोग प्रथम श्रेष्ठांच्यासंबंधानें सुरू होऊन आतां

त्याचा सामान्यतः उपयोग करूं लागले आहेत. अजूनहि राजेलोक " मी " च्याऐवजीं " आह्मी " चा उपयोग करीत असतात; आणि सामोआमध्यें नायकास बोलतांना " तुम्ही " च्याऐवजीं " तुम्ही दोघे " असें म्हणतात.

५६. वन्दनें जी गोष्ट कृतींनीं व्यक्त करितात तीच संबोधनप्रकार शब्दांनीं व्यक्त करीत असल्यामुळें त्यांचे समाजनमुन्यांशीं तसलेच सामान्यसंबंध दृष्टीस पडतात. त्यांचें आतां परीक्षण करूं.

ज्यांच्यामध्यें राजकीय घटना मुळींच नाहीं अशा डाकोटालोकांबद्दल बर्टन असें म्हणतो कीं, आपण ज्यांस विधि व रीतभात म्हणून म्हणतों तीं त्यांच्यांत मुळींच नाहींत. वेड्डालोकांबद्दल बेली असें सांगतो कीं, ते कोणाशींहि बोलतांना ' तूं ' या सर्वनामाचाच उपयोग करितात; आणि सिंघालीलोकांप्रमाणें सन्मानार्थ शब्दांचा उपयोग मुळींच करीत नाहींत. ह्या उदाहरणांवरून हें स्पष्ट दिसतें कीं, जेथें अंकितभाव मुळींच नसेल तेथें संबोधिताला चढविणारीं आणि बोलणाराला उतरविणारीं भाषणें उत्पन्न होत नाहींत. उलटपक्षीं, जेथें नायकाचा अधिकार पूर्ण स्वेच्छाचारी असेल तेथें असले भाषणप्रकार फारच माजतात. उदाहरणार्थ, सयामीलोकांत सर्वजण राजाचे गुलाम असून कनिष्ठ माणूस आपल्यास वरिष्ठाच्या पायाखालची धूळ म्हणून म्हणतो, आणि सारख्या दर्जाचे लोक देखील एकमेकांशीं बोलतांना एकमेकांचीं नांवें घेत नाहींत. चीनदेशांत बादशाहाच्या सत्तेस मर्यादा मुळींच नसून तेथें परप्र-

शंसा व आत्मखंडना हीं इतकीं कळसास गेलेलीं आहेत कीं, दुसऱ्याचें नांव विचारावयाचें असल्यास त्यास " आपलें अभिजात उपनांव काय व आपलें उत्तम नांव काय हें विचारण्याचें धाष्टर्य म्यां करावें काय?" असा प्रश्न कारितात. बरें, संबोधित माणूस " माझ्या गरीब कुळाचें नांव अमुक आहे आणि माझें हलकट नांव अमुक आहे " म्हणून उत्तर कारितो. सर्वनामांचे अत्यंत मोठे दुरुपयोग कोठें कारितात असा प्रश्न केल्यास, स्पेन्सरसाहेब म्हणतात, ते जपानांत आढळतात; कारण तेथें लढायांमुळें फार प्राचीनकाळीं जी स्वैच्छिक सत्ता स्थापन झाली तीस दैविक स्वरूप आलेलें आहे.

तद्वतच गतकालचें यूरोप व आधुनिक यूरोप यांच्यातील भेद पाहतां असें दिसतें कीं, पूर्वींच्या समाजरचना नेहमीं लढाया करण्यानें उत्पन्न झालेल्या असून तशा लढाया करण्यास योग्य अशाच बनलेल्या असत; पण हल्लीं जरी लढाया मोठ्या प्रमाणावर होतात तरी त्या नेहमीं होत नाहींत; त्याप्रमाणें अभिनन्दनपर वचनें पूर्वींपेक्षां हल्लीं कमी वेळां योजीत असून त्यांच्यांत अतिशयोक्तीचा भागहि पूर्वींपेक्षां कमी आहे. बरें, यूरोपांतील इतर राष्ट्रें इंग्लंदापेक्षां लढाईकरितां ज्यास्त सज्ज असल्यामुळें त्यांच्यांत इंग्लंदापेक्षां संबोधनप्रकार ज्यास्त दिसतात; आणि इंग्लंदांतल्या इंग्लंदांतहि लष्करी भाग व धंदेवाले भाग ह्यांच्यामध्यें असलाच भेद दृष्टीस पडतो.

पूर्वींच्या संबंधाप्रमाणें हेहि संबंध आवश्यकच आहेत. लष्करी घटना असली म्हणजे जो आज्ञाधारकपणा जबरीनें लादीत असतात त्यावेळीं अंकितपणा दाखवि-

णारे संबोधनप्रकार उत्पन्न होत नाहींत, आणि पैशाबद्दल मालाची आणि पगाराबद्दल नोकरीची, अदलाबदल आपखुषीनें सुरू झाली म्हणजे परप्रशंसा व आत्मनिंदा हीं दर्शविणारे संबोधनप्रकार सुरू होतात, असें कोणीं म्हटलें तर त्या म्हणण्याचा अयुक्तपणा तेव्हांच लक्षांत येणार आहे. आणि ह्या विधानाच्या अयुक्तपणावरून उलट विधानाची सत्यता स्पष्टपणें लक्षांत येते.

प्रकरण आठवें

पदव्या

५७. प्राथमिक माणूस आपल्या वाडवडिलांनीं शिकविलें असेल त्यास अगदीं चिकटून राहत असल्यामुळें तो ज्या नव्या गोष्टी स्वीकारितो त्या न जाणतां फेरबदल होऊन ज्या उत्पन्न होतील त्याच स्वीकारितो. भाषा ह्या कोणी मुद्दाम बनवीत नाहींत, तर त्या उत्क्रान्त होतात, हें प्रत्येकास हल्लीं ठाऊकच आहे; आणि तीच गोष्ट रूढींसहि लागू आहे. ह्या सत्याबद्दल जे पुष्कळ पुरावे सांपडतात त्यांत गतप्रकरणांतून आणखी पुराव्यांची भर पडलेली आहे.

पदव्यांनाहि वरील तत्त्व लागू आहेच. हल्लींच्या त्यांच्या स्वरूपाकडे पाहतां त्या कृत्रिम दिसतात: म्हणजे, पूर्वीं एकाकाळीं त्या मुद्दाम कोणीं ठरविल्या अशी कल्पना मनांत येते. पण आपले प्रचलित शब्द पूर्वीं एकाकाळीं कोणीं मुद्दाम ठरविले हें जसें खरें नाहीं, तशीच हीहि गोष्ट खरी नाहीं. पदार्थ, गुण आणि क्रिया, ह्यांचीं नांवें प्रथम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या वर्णनात्मक होतीं; आणि ज्या नामांस आपण पदव्या म्हणून म्हणतों तींहि तशींच होतीं. एकाद्या मुक्या माणसाच्या मनांत ज्या माणसाबद्दल बोलावयाचें असेल त्याची कांहीं तरी विशेष गोष्ट करून दाखवून तो त्याची ओळख आपल्यास पटवून देतो, पण तसें करण्यांत कांहीं चिन्हाच्या रूपानें ती पटवण्याचें त्याच्या मनांत मुळींच नसतें; तद्वतच, एकादा रानटी माणूस एकाद्या स्थळाचा निर्देश

करावयाचा असतां, जेथें कांगारू मारिलें होतें ती, किंवा जेथें खडकाचा कळपा पडला होता ती, असें जेव्हां म्हणतो तेव्हां त्याच्याहि मनांत एकाद्या चिन्हाचा उपयोग करण्याचें मुळींच नसतें; तद्वतच, एकाद्या माणसाचा निर्देश करतांना तो जेव्हां त्याच्या कांहीं स्वरूपविशेषाला किंवा त्याच्या कांहीं विशेष कृतीला उल्लेख करितो, तेव्हांहि नसतें; आणि म्हणून ज्यांपासून पुढें पदव्यांची उत्पत्ति होते तीं शब्दशः वर्णनात्मक किंवा आलंकारिकरीत्या वर्णनात्मक नांवें जेव्हां तो देतो, तेव्हांहि त्याच्या मनांत कृत्रिम चिन्हांचा उपयोग करण्याचें मुळींच नसतें.

विशेषनामांची खुद्द कल्पना देखील न जाणतां उत्पन्न झाली. रानटीलोकांत मुलगा "गर्जना करणारा", "नवा चंद्र", "बाप घरीं आलेला" अशा नांवांनीं प्रसिद्ध असतो; आणि ह्याचें कारण, त्याच्या जन्माच्या वेळीं जी एकादी गोष्ट घडलेली असेल तिला उल्लेख करून त्याच्याबद्दलचा विचार दुसऱ्याच्या मनांत उत्पन्न करण्याची संवय, हें असतें. आणि पुढें जर "भोंपळे डोक्या" "मळीण खोगऱ्या" (डाकोटा लोकांमधील नांवें), किंवा "महाबारगीर", "डोंगरावर पळत जाणारा" (ब्लॅकफूटलोकांमधील नांवें), अशीं नांवें त्यास प्राप्त झालीं, तर तीं आपोआप दुसरीं नांवें योजिल्यानें, किंवा ओळख पहिल्याहून चांगली पटेल अशीं नांवें योजिल्यानें, उत्पन्न होतात. तेव्हां ह्याच्यापेक्षां कमी आवश्यक अशीं जीं पदव्यांसारखीं नांवें त्यांचीहि उत्पत्ति अशीच झालेली आहे हें उघडच आहे. नेहमीं-

चीं विशेषनांवें आणि हीं नांवें ह्यांच्यांत भेद इतकाच आहे कीं, हीं नांवें एकाद्याच्या कांहीं विशेष गुणावरून, किंवा कृतीवरून, किंवा त्याच्या सन्मानार्थ केलेल्या विधीवरून, उत्पन्न झालेलीं असतात.

५८. एकाद्या माणसानें एकादा मोठा पराक्रम केला म्हणजे त्यास त्याच्या पूर्वींच्या नांवाशिवाय किंवा बदल नवें कीर्तिदर्शक नांव देण्याची कित्येक रानटी लोकांत चाल आहे. ह्याचें तुपीलोकांत चांगलें उदाहरण सांपडतें. कारण त्यांच्यांत अशी चाल आहे कीं, प्रत्येक शत्रु मारिल्याबद्दल एक नवें नांव द्यावयाचें; आणि ज्याचीं अशीं सर्वांत ज्यास्त नांवें असतील त्यास ते सर्वांत ज्यास्त उमदा समजतात. उत्तरअमेरिकेंत देखील क्रीकइंदियनलोकांत जो तरुण शत्रूची शेंडी प्रथम आणील त्यास माणूस व योद्धा अशीं नांवें मिळतात, आणि एक युद्धविषयक नांवहि प्राप्त होतें. प्राचीन निकाराग्वामध्यें जो लढाईंत शत्रूस ठार करील त्यास " तापालिक " ही सामान्य पदवी मिळत असे, आणि पनामाच्या संयोगीभूमीवरील इंदियन लोकांत " काब्रा " ही पदवी मिळत असे.

प्रारंभींच्या युद्धशील काळांत सन्मानदर्शक व वर्णनात्मक अशीं जीं हीं नांवें प्राप्त होतात तींच कांहीं ठिकाणीं सरकारी नांवें बनतात, ह्याचा पुरावा दोन नरभक्षक व संग्रामप्रिय समाजांमध्यें आढळून येतो. उदाहरणार्थ, फीजबेटांत वरिष्ठ दर्जाच्या लढवय्यांस प्रांताचा " विभाजक " किनाऱ्याचा " विध्वंसक ", बेटाचा " संहारक " इत्यादि मोठ्या मानाच्या पदव्या मि-

ळतात. प्राचीन मेक्सिकोमध्यें, " माणसांना कापून काढणारा " व " रक्ताचा स्राव करणारा " असे दोन हुद्दे असून त्यांवर राजाचे भाऊ किंवा दुसरे जवळचे आप्त यांची नेमणूक होत असे.

फीजियनलोकांप्रमाणें ज्यांच्यांत माणसें व देव यांच्यामध्यें मानलेला भेद अस्पष्ट असेल, आणि नायकांस देवांचें स्वरूप येऊन नवे देव बनत असतील, तेथें क्रूर लढवय्यांस जिवंतपणीं लाविलेल्या नांवांसारखीं नांवें देवांस दिलेलीं आढळून येतात. म्हणून पूर्वजपूजक नरभक्षकलोकांमध्यें जीं वर्णनात्मक नांवें देत असतात त्यांवरून " स्त्रीचोर " " मेंदूभक्षक " " खुन्या " " कत्तल करून नुक्ताच आलेला " असल्या देवांच्या पदव्या सहजच उत्पन्न होतात. कांहीं वरिष्ठ जाती ज्या देवांना पूजितात त्यांच्या कांहीं पदव्या अशाच रीतीनें उत्पन्न झाल्या आहेत हें त्यांनीं विजय केलेले आहेत असें म्हणतात ह्यावरून दिसतें. उदाहरणार्थ, इजिप्शन, ग्रीक, व बाबिलोनियन देवतांना त्यांचें सामर्थ्य लढाईनें त्यांस प्राप्त झालें होतें असें वर्णन आढळतें; आणि त्या वर्णनांमध्यें असलीं वर्णनात्मक नावें त्यांस दिलेलीं आढळतात; उदाहरणार्थ, " मार्स " या ग्रीकलोकांच्या संग्रामदेवास " रक्तानें डागळणारा " असें नांव दिलेलें आढळतें, व हीब्रू देवास " जबर " हें आढळतें.

५९. बहुधा प्राथमिक माणसांमध्यें शब्दशः वर्णनात्मक असें सन्मानपर नांव देण्याच्या ऐवजीं आलंकारिकरीत्या वर्णनात्मक असें नांव देत असतात. उदाहरणार्थ, तुपीलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, ते

आपलीं नांवें दृश्यपदार्थांवरून किंवा प्राण्यांवरून बनवीत असतात. प्रथम हीं नांवें एकाद्या वीराचें एकादें शौर्याचें कृत्य पाहून त्याचे स्नेही देत असतात, आणि मागून तीं शास्त्यांस लागतात, असें ग्वाटिमालामधील लोकांच्या इतिहासावरून दिसतें. उदाहरणार्थ, त्यांच्यांत "हंसरा वाघ" "रानवाघ" "जुलमी गरुड" "गरुडशीर्ष" "प्रबल सर्प" इत्यादि नांवें आढळतात. आफ्रिकेमध्येंहि सर्वत्र असेंच झालेलें आढळतें. उदाहरणार्थ, आशान्टीमधील राजाच्या प्रतिष्ठापर नांवांपैकीं "सिंह" व "सर्प" हीं आहेत. डेहामीमध्यें असल्या पदव्यांस परमावधिवाचक स्वरूप येतें; उदाहरणार्थ, तेथील राजास "सिंहोत्तम" असें म्हणतात. त्याच धर्तीवर उसांबाराच्या राजास "दिव्य सिंह" असें म्हणतात; म्हणून त्या राजास देवस्वरूप आल्यास त्याच्याबद्दलच्या पौराणिक कथा सहजच उत्पन्न होऊं शकतील. झुलूलोकांमध्यें "उमदा हत्ती" "अमर" "स्वर्गाइतका उंच" "कृष्णवर्ण" "डोंगराइतका उंच" इत्यादि नांवें आढळतात; उदाहरणार्थ, तेथें राजास अशा रीतीनें संबोधितात:—"अरे पर्वता, अरे सिंहा, अरे व्याघ्रा, अरे कृष्णा, तुझ्यासम दुसरा कोणीच नाहीं." पुढें ह्या पदव्या विशिष्ट माणसासच न लावतां विशिष्ट दर्जास लावूं लागतात असेंहि दिसतें; उदाहरणार्थ, काफिरलोकांच्या नायकाच्या सामान्य बायकोस "हत्तीण" असें म्हणतात, व मोठ्या बायकोस "सिंहीण" असें म्हणतात.

ह्यावरून "वृषभ", "पुंगव", इत्यादि नांवें जीं

देवांला लाविलेलीं आढळतात तीं अशाच रीतीनें राजांच्या नांवांवरून उत्पन्न झालेलीं आहेत ह्याबद्दल संशय वाटत नाहीं.

भव्य अशा निर्जीव वस्तूंवरून उत्पन्न झालेल्या पदव्यांचीहि गोष्ट अशीच आहे. " तूं डोंगराएवढा उंच आहेस " ह्या अतिशयोक्तिरूप स्तुतीस " तूं डोंगर आहेस " असें रूपकाचें स्वरूप कसें येतें हें झुलूलोकांच्या उदाहरणावरून आपल्या अगोदर नजरेस आलेलेंच आहे. असल्या ह्या आलंकारिक नांवास पुढें विशेषनांवाचें स्वरूप येतें ह्याबद्दलचा पुरावा सामोआमध्यें सांपडतो; कारण तेथें पांगोपांगोच्या नायकास " मौंगा " किंवा पर्वत असें म्हणतात. पूर्वजपूजा करणाऱ्या कांहीं लोकांत देवांच्या पदव्यांची उत्पत्ति अशा रीतीनेंच झालेली आहे ह्याबद्दलचाहि पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, उत्तरअमेरिकेंतील चिनूक, नाव्हाजो व मेक्सिकनलोक, आणि दक्षिणअमेरिकेंतील पेरूव्हियनलोक, कांहीं पर्वतांस देव म्हणून समजतात; आणि ह्या देवांना दुसरीं नांवें असल्यामुळें गर्भितार्थ असा निघतो कीं, एकाद्या देवभूतमाणसास सामान्यतः " पर्वत " हें नांव, किंवा विशेष पर्वताचें नांव, सन्मानार्थ प्रथम प्राप्त झालें असावें. सन्मानार्थ सूर्याशीं तुलना केल्यानें माणसाचीं व देवांचींच सन्मानार्थक नांवें उत्पन्न झालेलीं आहेत असें नाहीं, तर सरकारी पदव्याहि उत्पन्न झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, मेक्सिकनलोक स्पेनच्या राजास " सूर्यात्मज " असें म्हणत असत, चिब्चालोक सगळ्याच स्प्यानिश लोकांस " सूर्याचीं मुलें " म्हणून नांव देत,

आणि पेरूमध्यें कोणी माणूस विशेष हुशार असला म्हणजे त्यास " सूर्यात्मज " असें म्हणत; ह्या गोष्टींचा विचार करतां इजिप्शन राजांस " सूर्यसूनु " ही पदवी कशी लावूं लागले हें लक्षांत येतें. ब्रह्मदेशच्या राजासहि अशाच अनेक पदव्या असत.

ह्यावरून आलंकारिक वर्णनात्मक नांवापासून ह्या सन्मानार्थक प्राथमिक पदव्या कशा उत्पन्न होतात, आणि त्या प्रथम व्यक्तिविषयक असून मागाहून हुद्देविषयक कशा बनतात, हें स्पष्ट दिसतें.

६०. अनेक भाषांतून " देव " या अर्थी जे शब्द आहेत ते प्रारंभीं वर्णनात्मक होते, व त्यांचा अर्थ श्रेष्ठत्वदर्शक होता, असें त्या शब्दांचा विचार करतां दिसून येतें. उदाहरणार्थ, फीजियनलोकांत देवार्थक शब्द कोणतीहि वस्तु मोठी किंवा अद्भुत असेल तर तीस लावितात; मालागासिलोकांत जें कांहीं नवें, उपयुक्त, किंवा विलक्षण असेल त्यास लावितात; टोडालोकांत प्रत्येक गूढ वस्तूस लावितात; एवंच, सजीव व निर्जीव वस्तूंस कांहीं असामान्य गुण दर्शविण्याकरितां तो लावीत असल्यामुळें तो त्याच अर्थी जिवंत व मृतमाणसांसहि लाविला जाऊं लागतो; पण मृतमाणसांच्या अंगीं बरेंवाईट करण्याची कांहीं गूढशक्ति असते अशी समजूत असल्यामुळें तो शब्द त्यांसच विशेषतः लावूं लागतात. देव व पिशाच ह्या दोन शब्दांचे अर्थ आपल्यांत जरी फार भिन्न आहेत, तरी प्रारंभीं त्यांचा अर्थ एकच असतो, किंवा निसर्गोत्तर सत्त्वास प्रारंभीं एकच शब्द असतो. आणि प्रारंभीं लोकांच्या समजुतीनें मृतमाण-

साचा दुय्यम जिवंतमाणसांसारखाच दृश्य व स्पृश्य असल्यामुळें, आणि म्हणून त्यास पुनः ठार करतां, बुडवतां, किंवा दुसऱ्या रीतीनें मारतां येण्यासारखा असल्यामुळें, " देव " हें नांव नेहमीं जरी अदृश्य अशा प्रबल सत्त्वास लावीत असले, तरी कधीं कधीं दृश्य अशा प्रबल सत्त्वास कसा लावूं लागतात, हें लक्षांत येतें. ह्या कल्पनेवरूनच प्राथमिक माणसाच्या मनांत दुसरी एक कल्पना सहजच अशी उत्पन्न होते कीं, जीं माणसें सभोंवतालच्या इतर माणसांहून विशेष सामर्थ्यवान् असतील तीं परत आलेलीं पिशाचें किंवा देव आहेत. ह्याच समजुतीवर आस्ट्रेलियन, न्यूक्यालिडोनियन, क्रूमेन, कालाबार, पांग्वे, इत्यादि लोक यूरोपियनांस भूतें म्हणून समजतात. म्हणूनच, बुशमेन, बेचुआना, पूर्वआफ्रिकन, पुल्ला, खोंड, फिजियन, डायाक, प्राचीन मेक्सिकन, चिब्चा इत्यादि लोक त्यांस देव हें दुसरें नांव देतात. आणि म्हणूनच कांहीं असुधारलेल्या लोकांमधील श्रेष्ठ माणसें स्वतःस देव हें नांव लावून घेतात.

अशा रीतीनें " देव " शब्दाचा मूळ अर्थ ध्यानांत घेतला म्हणजे ती सन्मानार्थक पदवी कशी बनते ह्याबद्दल गूढ वाटणार नाहीं. उदाहरणार्थ, लोआंगोचे लोक आपल्या राजास देव म्हणतात, आणि सांबाराचेहि लोक म्हणतात. हल्लीं देखील देव हें नांव भटकणाऱ्या आरबलोकांत अतिशय प्रबल अशा विद्यमान राजास सामान्यतः लावीत असतात. त्याप्रमाणेंच तार्तारलोक मोठ्या लामाला " देवरूपी बाप " असें म्हणत असतात. मादागास्कारमधील बायका आपल्या राजास " अरे,

आमच्या देवा," अशा नांवानें संबोधून त्याचीं स्तुतिपर गाणीं गाऊं लागतात. डाहोमन राजास " पिशाच " हा दुसरा शब्द लावितात.

हा शब्द सामान्य माणसांना लावण्याचा प्रघात जरी सामान्य नाहीं, तरी मुळींच नाहीं असेंहि नाहीं. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकनलोक तो मृतमाणसांस लावीत असत. कर्नल यूल सांगतो कीं, कासिपालोकांत कोणाची गांठ पडली कीं, " रे देवा " म्हणून ते त्यास संबोधितात.

६१. " देव " ही पदवी आणि " बाप " ही पदवी ह्यांमधील संबंध, हे शब्द प्रारंभीं एकाच अर्थानें योजीत असतात ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे, स्पष्ट होणार आहे. निर्माण करणें, उत्पन्न करणें, इत्यादि अर्थीं प्राथमिक भाषांतून एकच शब्द असल्यामुळें, आणि ह्या कल्पनांमधील भेदहि त्यांच्या लक्षांत येत नसल्यामुळें, बाप हा नव्या प्राण्यांचा उत्पन्नकर्ता असल्यामुळें आणि मरणसमयीं अदृश्य होणारा असल्यामुळें, तो आणि एकंदर अदृश्य उत्पन्नकर्ते हे एकच होत असें प्राथमिक माणसास वाटूं लागतें. चीन व जपान या देशांत बादशाहा आपणास आपल्या प्रजेचे पितृशास्ते व बाप समजतात इतकेंच नाहीं, तर देववंशोत्पन्नहि समजतात.

झुलूलोकांमध्यें देव व बाप ह्यांचा हा संयोग फार स्पष्टपणें दृष्टीस पडतो. त्यांची दंतकथा अशी आहे कीं, अंकुलुंकुलू हा पहिला माणूस असून त्याच्यापासून सर्व माणसें आणि सूर्य, चंद्र इत्यादि सर्व उत्पन्न झाले; आणि त्याचे सर्व वंशज कृष्णवर्ण असल्यामुळें त्यासहि कृ-

ष्णवर्ण समजतात. ते मूळच्या अंकुलंकुलास पूजीत नाहींत, कारण तो कायमचा मेला म्हणून समजतात; तर त्यांच्या निरनिराळ्या टोळ्यांचे जे अंकुलंकूलू त्यांस ते पूजितात, व व्यक्तिशः " बाप " ही पदवी देतात. एवंच ह्या ठिकाणीं जनक आणि निर्माता ह्या दोन कल्पना प्रत्यक्षरीत्या परस्परसंबद्ध झालेल्या दृष्टीस पडतात. निकाराग्वनलोकांच्या समजुतीवरून हीच गोष्ट स्पष्ट दिसते. एवंच अगदीं प्राचीन असा जो पूर्वज तो मुख्य देव बनतो; आणि म्हणून ते देवास बाप हा जो शब्द लावितात, तो आलंकारिकरीत्या नसून शब्दशःच होय.

देवाला बाप ही दुसरी पदवी सर्व लोकांमध्यें आढळते, त्याचें कारण हें होय; आणि पेरूदेशांतील राजे आपला बाप सूर्य ह्याची पूजा कां करीत, झीअस देवास देव व माणसें ह्यांचा बाप असें कां म्हणत, वगैरे गोष्टींचा ह्यावरून चांगला उलगडा होतो.

आतां दैविक व मानवी ह्यांच्यामध्यें इतका अल्प भेद ज्यांमध्यें ओळखला जातो असे जे प्रारंभींचे समज त्यांचा विचार करतां, किंवा चीन, जपान वगैरे देशांतील राजे अत्यन्त प्राचीन अशा बापांपासून किंवा देवांपासून आपण उत्पन्न झालों आहों असें म्हणतात ह्याचा विचार करतां, बाप हें नांव त्या शब्दाच्या उच्चतर अर्थीं जिवंत शास्त्यास कसें लावितात हें लक्षांत येतें. ह्याचें एक कारण हें कीं त्या शास्त्याच्या पूर्वजांस बाप किंवा पिता ही पदवीच तिच्या मागें किंवा पुढें कांहीं प्रत्यय जोडून (उदाहरणार्थ, संस्कृतांत पितामह प्रपितामह, इत्यादि शब्दांनीं) लावीत असतात; आणि

दुसरें कारण हें कीं कुटुंबांतील बापाचा किंवा मुख्य पुरुषाचा अधिकार मोठा असल्यामुळें बाप ही पदवी सन्मानार्थक बनून जाते. शिवाय जेथें समाज संयुक्तकुटुंबांचा बनलेला असेल तेथें मुख्य अधिकार सर्वांत वडील कुटुंबांतील सर्वांतल्या वडील पुरुषाकडे वंशपरंपरेनें पितृशासनपद्धतीखालीं चालत असल्यामुळें, विद्यमान पितृशास्त्याचें इतरांशीं जें नातें तें अगदीं प्राचीन अश देवभूत पूर्वजाचें जें नातें त्याच्याशींच समान असतें; आणि म्हणून त्याच्या ठिकाणीं कांहीं अंशीं दैविक स्वरूप, कांहीं अंशीं राजस्वरूप, आणि कांहीं अंशीं पितृस्वरूप, संयुक्त झालेलें असतें.

हा शब्द राजाची पदवी म्हणून जो प्रचारांत येतो त्याचें कारण हेंच होय. उदाहरणार्थ, सुधारलेल्या लोकांच्या शास्त्यांना संबोधितांना अमेरिकन इंदियन आणि न्यूझीलंदरलोक त्याचा सारखाच उपयोग करितात. आफ्रिकेमध्येंहि तो आपल्यास आढळून येतो. उदाहरणार्थ, झुलूलोकांत राजाला जीं नांवें आहेत त्यांत बाप हें नांव पहिलें आहे; आणि डेहामीमध्यें राजा जेव्हां वाड्यांतून निघून सिंहासनावर बसावयास जातो तेव्हां रस्त्यांत जरा कोठें उंच-सखल असेल तें चुटकी वाजवून त्याचे लोक त्यास सारखें दाखवीत असतात, आणि "दादा! दादा!" (आजोबा! आजोबा!) व "दे! दे!" (हळू! हळू!) म्हणून सारखे ओरडत असतात. रशियामध्यें हल्लीं देखील झारास बाप ही पदवी लावितात; आणि प्राचीन फ्रान्समध्यें जमीनदार व राजे यांस तीच पदवी लावीत असत.

ही पदवी जी इतर पदव्यांपेक्षां ज्यास्त लवकर खालच्या खालच्या लोकांत पसरत गेली त्यास कारण हे त्या शब्दाचे दोन अर्थ हेंच कदाचित् असावें. सर्वत्र तें नांव सर्व प्रकारच्या वरिष्ठांस लाविलेलें अढळून येतें. उदाहरणार्थ, झुलूलोकांत ‘ बाबा ’ ही पदवी राजासच लावितात असें नाहीं, तर सर्व दर्जांचे कनिष्ठलोक आपल्या वरिष्ठांस लावितात. डेहामीमध्यें गुलाम हें नांव आपल्या धन्यास लावितो, आणि धनी राजास लावितो. लिव्हिंग्स्टन सांगतो कीं, त्याचे नोकर त्यास ‘ आपला बाप ’ असें म्हणत, आणि बाचासिनलोक बर्शेलला तसेंच म्हणत. जपानमध्यें शिष्या आपल्या यजमानास ‘ बाबा ’ म्हणून हाक मारितो. सयामामध्यें सरदारांच्या मुलांस त्यांचे नोकर ‘ माबाप ’ म्हणून म्हणतात. चीनमध्यें मजूरलोक अधिकाऱ्यांसमोर साष्टांगप्रणिपात घालून ‘ आमच्या माबापाचें कल्याण होवो ’ म्हणून म्हणतात. नंतर हा शब्द सामान्यतः सर्वांसच कसा लावूं लागतात ह्याचीं उदाहरणेंहि सर्वत्र सांपडतातच. कारण प्राचीन रोममध्यें तो शब्द म्याजिस्ट्रेटाला लावीत असून शिवाय सर्वच वडील माणसांस लावीत असत. हल्लीं रशियांत तो झार, उपाध्या आणि वृद्ध माणूस यांस लावितात. पुढें तो वयानें लहान असेल त्यासहि लावूं लागतात; उदाहरणार्थ, इंग्रजींतील ‘ सर ’ (महाराज !) हा शब्द ‘ सायर ’ (बाप) या शब्दापासूनच निघालेला असून तो आतां सर्वांसच लावितात, आणि मराठींत “ बाबा ” हा शब्द मुलासहि लावितात.

ह्यापासूनच एक विलक्षण चाल उत्पन्न होते; तिला

एथें उल्लेख करणें जरूर आहे. एकाद्यास मुलगा होणें किंवा तो बाप बनणें ह्यामध्यें जो मोठेपणा आहे तो एकाद्यास लावून त्यास खुष करण्याची जी इच्छा तेणेंकरून कांहीं ठिकाणीं एकाद्यास त्याच्या विशेषनांवाच्या ऐवजीं " अमक्याचा बाप " अशा नांवानें संबोधण्याची चाल उत्पन्न झालेली आहे. उदाहरणार्थ, माले व डायाक लोकांत माणसाच्या पहिल्या मुलाच्या नांवावरून त्यास संबोधितात; म्हणजे त्याच्या वडील मुलाचें नांव ' सिपी ' असल्यास त्यास " पासिपी " (सिपीचा बाबा) म्हणून म्हणतात. ह्राच प्रघात सुमात्रा व मादागास्कार एथें दृष्टीस पडतो. या देशांतील कांहीं डोंगरी लोकांतहि ती दृष्टीस पडते; उदाहरणार्थ, काश्यालोक एकमेकांस आपल्या मुलांच्या नांवानें (जसें " पाबोबान !–" बोबानच्या बापा—) संबोधितात. आफ्रिकेमध्येंहि याचीं उदाहरणें सांपडतात; उदाहरणार्थ, बेचुआनालोक मोफाट साहेबास " मेरीचा बाप " म्हणून म्हणत; आणि उत्तरअमेरिकेंतील कांहीं लोकांस असलें नांव धारण करण्याची इतकी हांव असते कीं आपल्यास मूल होईपर्यंत ते आपल्या कुत्र्याच्या नांवावरून आपणास " अमक्याचा बाप " असें नांव घेत असतात.

६२. बापास देवाच्या खालोखाल समजून त्यास मोठा मान देण्याची, आणि पुढें सर्वच वडील माणसांस मोठा मान देण्याची जी चाल उत्पन्न होते, तिजपासून असल्याच पण जराशा भिन्न पदव्या उत्पन्न होतात. म्हणजे, वयास मान देऊं लागल्यामुळें, वडीलपणादर्शक शब्द पदव्यांचीं नांवें बनतात.

ही गोष्ट असुधारलेल्या लोकांत प्रथम सुरू होते. त्यांचीं कौन्सिलें वृद्ध माणसांचीं बनलेलीं असल्यामुळें वृद्ध माणसास त्यांच्यांत जें नांव असेल त्याचें अधिकाराचा आणि म्हणून मानाचा जो हुद्दा असेल त्याच्याशीं मनामध्यें साहचर्य बनून जातें. उदाहरणार्थ, रोमनलोकांत सीनेट व सीनेटर हीं जीं कायदेमंडळ व त्याचे सभासद यांस नांवें होतीं तीं " सीनेक्स " या " वृद्ध " या अर्थाच्या शब्दावरून बनलेलीं होतीं. सीनियर, सेनॉर, सिनोर, इत्यादि शब्द याच धातूपासून निघालेले असून ते प्रथम मुख्य माणसें, शास्ते किंवा अधिपती यांस लावीत असून शेवटीं ते हलक्या पदवीच्या माणसांसहि लावूं लागले आहेत. वडील किंवा ज्येष्ठ या अर्थाचा जो " एल्डर " किंवा " आल्डर " शब्द त्याचीहि स्थिति अशीच आहे; कारण त्याचपासून " अर्ल " व " आल्डरमन " हे जे सरदार व शहरपिता या अर्थाचे शब्द ते उत्पन्न झालेले आहेत.

जर्मन भाषेंतील ग्राफ ही पदवी तसलीच दिसते; कारण त्या शब्दाचा मूळ अर्थ " करडा " म्हणजे केंस करडे झालेला किंवा वृद्ध असाच आहे असें म्याक्सम्यूलर म्हणतो.

६३. बाकीच्या पदव्यांचा आपण आतां संक्षेपतः विचार करूं; कारण त्यांच्यावरूनहि एथें निरूपिलेलें सामान्य सत्य उदाहृत होतें.

इंग्रजीमध्यें राजा या अर्थाची जी " किंग " ही पदवी आहे ती मुळांत कशी उत्पन्न झाली याबद्दल मतभेद आहेत. तथापि ती बाप या अर्थाचा संस्कृत शब्द जनक

याच्यापासून झालेली असावी असें बहुमत दिसतें. आणि जनक शब्दाचा मूळ अर्थ उत्पन्नकर्ता, बाप, हा असून नंतर राजा असा बनलेला आहे. आतां वरील बहुमत जर बरोबर असेल तर कुटुंबसमूह, पितृशासितसमूह, आणि असल्या समूहांचे बनलेले समूह ह्यांचा जो मुख्य त्याचीच ही एक दुसरी पदवी होय असें मानतां येईल. बरें, पुढें याच्याचपासून राजाधिराज या अर्थाची पदवी कशी उत्पन्न होते हें स्पष्ट दिसतें.

६४. विधिविषयक प्रकारांचा उपयोग प्रथम अत्यन्त प्रबलांनाच तेवढें संतुष्ट करण्याकडे होत असून मागून तो सर्वांनाच संतुष्ट करण्याकडे कसा होऊं लागतो हें पदव्यांच्या संबंधानें कदाचित् ज्यास्तच चांगलें दिसून येतें.

ह्याचीं उदाहरणें असुधारलेले व अर्धवट सुधारलेले लोक आणि गतकालीन व वर्तमान सुधारलेले लोक ह्यां सर्वांमध्यें सांपडतात. उदाहरणार्थ, सामोअनलोकांत सामान्य संभाषणांत सर्व लोक व मुलें देखील एकमेकांस नाईक म्हणून म्हणतात. सयामामध्यें एकाद्या माणसाचीं त्याच्या कनिष्ठ स्त्रियांस झालेलीं मुलें त्यास " अहो आमचे धनी, राजेसाहेब " म्हणून संबोधितात; आणि सामान्यतः तेहि एकमेकांस नाईक म्हणून हांक मारितात. चीन देशांतहि मुलगे बापास " कुटुंबाचाराजा " म्हणून म्हणतात; आणि लोक सामान्यतः एकमेकांस सन्मानार्थ " गुरु " म्हणून संबोधितात. प्राचीन रोममध्यें ह्याचीं उदाहरणें सांपडतच असत. कारण तेथें प्रथम जो मोठी लढाई मारील त्याचें सार्वजनिकरीत्या स्वागत होत असून, मागाहून तें सर्वांचेंच होऊं लागलें, आणि धनी व राजा ह्या अर्थाचे श-

ब्द प्रथम मोठ्या माणसांस लावीत व मागून सर्वांस लावूं लागले. बरें, अर्वाचीन यूरोपियन राष्ट्रांतून ही गोष्ट दिसून येत नाहीं असेंहि नाहीं. उदाहरणार्थ, क्यापटिन स्पेन्सर असें म्हणतो कीं, " मेक्लिनबर्गमध्यें अर्धे लोक सरदारवर्गांत मोडतात. एका खाणावळींत खाणावळीचा मालक मला सरदार म्हणून आढळला, खाणावळीण बाई सरदारीण म्हणून आढळली, आणि आचाऱ्यांना, बूट साफ करणारांना, नोकरांना व घोडेवाल्यांनाहि तीच पदवी होती. मला समजलें कीं एका खेड्यांत चार असामी काय ते सरदारवर्गापैकीं नव्हते; बाकी सर्व सरदार ! "

ह्या पदव्या खालच्या खालच्या वर्गांतून कशा पसरत जातात ह्याचें इतर देशांपेक्षां कदाचित् फ्रान्सांतच ज्यास्त स्पष्टपणें दिग्ददर्शन होत असेल. उदाहरणार्थ, प्रारंभीं " मॅडम " ही पदवी सरदाराच्या बायकोस लावीत असून " मॅडिमॉइसिल " ही पदवी वकील किंवा वैद्य ह्यांच्या बायकांस लावीत असत. पुढें सोळाव्या शतकांत जेव्हां पहिली पदवी ह्या बायकांस लावूं लागले तेव्हां दुसरी पदवी अविवाहित स्त्रियांस लावूं लागले. " सायर ", " सीनियर ", " स्यूर " आणि " मॉनस्यूर " ह्या पदव्यांचेंहि असेंच झालेलें आहे. त्या प्रथम राजांस व वरिष्ठ सरदारांस लावीत असून मागाहून कमी कमी दर्जाच्या लोकांस लावूं लागले.

पण ह्या सरणीनें अत्युच्च पदव्या देखील अतिनीच लोकांमध्यें कशा पसरतात हें स्पॅनिश लोकांमध्यें विशेषच विलक्षण रीतीनें आढळून येतें; कारण तेथें भि-

क्षेकरीदेखील एकमेकांस " राजा व सरदार " म्हणून हाक मारितात.

६५. पूर्वीच्या प्रकरणांतून जी गोष्ट ध्यानांत आली तीच येथेंहि लागू आहे हें सांगण्याची विशेष जरूर आहे असें नाहीं. एकाद्या पशुरूपी किंवा मनुष्यरूपी शत्रूवर जय मिळविला असतां तो मिळविणारास पदवी देण्याची जी चाल दिसून येते ती निःसंशय युद्धशील स्थितींत उत्पन्न होते. पिता, राजा, ज्येष्ठ, इत्यादि सामान्य नांवें आणि त्यांवरून मागून उत्पन्न होणारीं दुसरीं नांवें ह्यांचा अर्थ प्रत्यक्षरीत्या जरी युद्धशीलतादर्शक नाहीं, तरी अप्रत्यक्षरीत्या आहे. कारण तीं शास्त्यांचीं नांवें असून युद्धशील चळवळीपासून उत्क्रान्त झालेलीं आहेत. उदाहरणार्थ, एस्कायर व मिस्तर ह्या पदव्यांपैकीं पहिली सरदाराचा नोकर किंवा ढालदार ह्या अर्थाच्या नांवापासून उत्पन्न झालेली आहे, आणि दुसरी शास्ता किंवा नाईक या अर्थाच्या शब्दापासून उत्पन्न झालेली आहे.

इतर विधिप्रकारांप्रमाणें ह्या प्रकाराच्यासंबंधानेंहि निरनिराळ्या नमुन्यांच्या समाजांची तुलना करतां हा संबंध अन्यरीतीनें दृग्गोचार होतो. उदाहरणार्थ, डेहामीमध्यें कारभार जुलमी असून रक्तस्राव वरचेवर होत असल्यामुळें, तेथें ज्याचें त्याचें स्वतःचें नांव म्हणून बहुतेक दिसतच नाहीं, असें सांगून बर्टन असें म्हणतो कीं, तेथें पदव्या असंख्य दृष्टीस पडतात; गुलामांचा वर्ग खेरीजकरून इतर सर्वांना ह्या पदव्या असतात, व बहुतेक आनुवंशिक असतात. ब्रह्मीलोकांतहि असेंच असे. तेथें एकाद्याला एकादी पदवी किंवा हुद्दा मिळाला म्ह-

णजे त्याचें स्वतःचें नांव नाहींसें होतें, आणि मग तें कधीं कानावर येत नाहीं; आणि चीनदेशांत राजवंशांतील लोकांनाच द्यावयाच्या बारा सरदारी पदव्या असून शिवाय प्राचीन पांच सरदारी पदव्या आहेत. यूरोपामध्येंहि ह्याजबद्दल पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, रशियामध्यें पोलीस-कारकुनाची पदवी अठरावी असून त्यास " मेहेरबान " (your honour) म्हणून म्हणावें लागतें. जर्मनीमध्येंहि असेंच आहे. उलट, इंग्लंदांत युद्धशीलता ह्या दोन देशांपेक्षां कमी असल्यामुळें पदव्यांबद्दलची हांव त्या लोकांत इतकी दिसत नाहीं; आणि तेथें उद्यमशीलता जशी वाढत चालली आहे, आणि त्याबरोबरच सामाजिक घटना बदलत गेली आहे, तसा सामाजिक व्यवहारांत पदव्यांचा उपयोग कमी होत गेला आहे.

पदव्या व युद्धशीलता ह्यांमधील हा संबंध प्रत्येक समाजांतल्या समाजांतहि तितक्याच स्पष्टपणें दिसून येतो. उदाहरणार्थ, इंग्रजी सैन्यांत तेरा पदव्या असून आरमारांत चवदा आहेत. तद्वतच, सर्वांत मोठाल्या पदव्या शास्त्यावर्गातल्या लोकांसच बहुधा मिळतात, आणि हे वर्ग म्हणजे पूर्वीचे युद्धशीलवर्गच होत; आणि धर्माच्या व कायद्याच्या ज्या पदव्या आहेत त्या देखील युद्धशीलतेवरून उत्पन्न झालेल्या ज्या नियामकसंस्था त्यांसच मिळतात. इकडे समाजांतील उत्पादक व विभाजक जे वर्ग आहेत, ते सर्व औद्योगिक चळवळी चालवीत आहेत, त्यांना सामान्य पदव्यांहून ज्यास्तच दर्जाच्या पदव्या क्वचितच मिळतात.

ह्यावरून असें निर्विवाद ठरतें कीं पदव्या ह्या प्रथम

रानटद्यांनीं आपल्या शत्रूवर मिळविलेले जय नेहमीं ध्यानांत ठेवण्याच्या उपयोगीं पडत असून, लहान लहान समाजांच्या संकलीभवनानें आणि पुनःसंकलीभवनानें ते जसे मोठाले होत गेले आहेत तशा त्या पदव्या पसरत, वाढत आणि विभिन्नीभूत होत गेल्या आहेत; आणि नेहमींच्या युद्धशीलतेवरून उत्पन्न झालेला जो समाज-नमुना त्यावरून त्या उत्पन्न होत असल्यामुळें, उद्यम-शीलतेस योग्य असा समाजनमुना बनत जाईल तसे त्यांचे उपयोग व मोल हीं दोन्ही कमी होत गेलीं आहेत.

प्रकरण नववें

पट्टे व पोषाक

९६. ह्यांचीहि उपपत्ति लावावयास लागलों म्हणजे पुनः आपणास माणसें व जनावरें ह्यांवर मिळविलेल्या जयांकडे पुनः परत जावें लागतें. विजयचिन्हांपासूनच पट्ट्यांची उत्पत्ति होते; आणि प्रारंभीं ती दोन्ही एकच असतात. उदाहरणार्थ, शोशोनलोकांत जो आस्वलास मारील त्यास त्याचे पाय व नखें लेण्याची परवानगी देतात, व तेंच त्याच्या कीर्तीचें सर्वांत मोठें चिन्ह समजतात. मण्डनलोकांत नाईक आपल्या डोक्याला रेड्याचीं शिंगें जीं बांधितो तीं तो प्रथम पारधींत मिळविलेली लूट म्हणूनच बांधूं लागला असला पाहिजे.

एवंच एकाद्याच्या स्वतःच्या शौर्यावरून त्यास एकादा स्वतःपुरता मानदर्शक म्हणून एकादा पट्टा मिळून, त्या शौर्यामुळेंच त्यास श्रेष्ठत्व प्राप्त झाल्यास, त्यापासूनच तो त्याच्या कुटुंबाचा पट्टा बनून जातो, आणि त्याच्या वंशजाच्या हातीं त्याची सत्ता राहिल्यास तो त्याच्या हुद्याचें चिन्ह बनून जातो. म्हणून डाकिमीमध्यें एकादा सिंह मारिला म्हणजे त्याचें चामडें सुलतानानें वापरण्यासाठीं तयार करितात, कारण दुसऱ्या कोणाची तें वापरण्याची प्राज्ञा नसते. झुलूलोकांमध्यें चित्त्याच्या कातडीचा झगा पदवीचें चिन्ह म्हणून समजतात, आणि युगांडामध्यें चित्त्या-मांजराचें कातडें राजवंशांतील पुरुष आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळितात.

मारिलेल्या जनावरांचीं कातडीं किंवा दुसरे कांहीं

भाग ह्यांचे जसे कुळपट्टे बनतात, तसे मारिलेल्या माणसांचे भागहि बनतात. उदाहरणार्थ, चिचिमेकलोक जितशत्रूंचीं डोकीं सोलितात, आणि केंसांसहित ती कातडी आपल्या डोक्यावर घालितात, आणि ती कुजून पडून जाईतोंपावेतों शौर्याचें चिन्ह म्हणून तशीच डोक्यावर ठेवितात. एवंच, ह्याठिकाणीं डोक्यावरील कातडी ही विजयचिन्ह बनून सन्मानचिन्हहि बनते. आतां जबड्याचीं हाडें पट्टे बनतात ह्याबद्दल जरी स्पष्ट पुरावा सांपडत नाहीं तरी त्यांचे कृत्रिम नमुने तसे बनतात ह्याबद्दल सांपडतो. उदाहरणार्थ, आशान्टीमध्यें त्या हाडांचे सोन्याचे लहान लहान नमुने लोक अंगावर वापरितात.

६७. लढाईमध्यें जितलोकांचे जसे हातपाय जातात व जेते ते विजयचिन्हें म्हणून नेतात, तद्वतच त्यांचीं शस्त्रेंहि जातात, व तींहि विजयचिन्हें बनतातच. आणि माणसाच्या शरीराचे भाग अंगावर ल्याले म्हणजे ते जसे पट्टे किंवा निशाण्या बनतात, तद्वतच जितशत्रूंचीं शस्त्रें जेत्यांनीं हातांत घेतलीं म्हणजे तींहि निशाण्या किंवा पट्टे बनतात.

तरवारींना विजयचिन्हांचें स्वरूप जाऊन पट्ट्यांचें स्वरूप येतें ह्याबद्दल प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, जपानमध्यें तरवारी कमरेंत लटकावणें हें पदवीचें नेहमींचें चिन्ह समजलें जातें. वरच्या पदवीचे लोक दोन तरवारी लटकावितात, व खालच्या पदवीचे एक लटकावितात. हलक्या वर्गांतील लोकांस तरवार वापरण्याची सक्त मनाई आहे. आतां उगीच एक तरवार ज्यास्त लटकावण्याचा गैरसोईचा

प्रघात ज्याअर्थीं विनाकारण अमलांत येण्याचा संभव नाहीं, त्याअर्थीं असें अनुमान करण्यास हरकत नाहीं कीं, दोन तरवारी वापरणारा जो माणूस तो प्रारंभीं त्यांपैकीं एक तरवार शत्रूपासून घेतलेली वापरीत असला पाहिजे; म्हणजे, हल्लीं जी निशाणी म्हणून वापरितात ती प्रारंभीं विजयचिन्ह म्हणून वापरीत असत. जेथें विजेता दोन्ही तरवारी वापरणार नाहीं तेथें देखील जितमाणसाची तरवार काढून घेतलेली असल्यामुळें, तरवार लटकावलेला जेता तरवारविहीन जितापेक्षां श्रेष्ठ म्हणून सहज ओळखिला जातो. म्हणूनच अनेक देशांत तरवार हें सत्तेचें चिन्ह समजलें जातें. म्हणूनच पुष्कळ ठिकाणीं राजपुत्रास अभिषेक करावयाचा म्हणजे त्याच्या कमरेस तरवार लटकावीत असत. न्यायाधिशीच्या अधिकाराचें चिन्ह म्हणून तरवारीचा उपयोग जो करितात त्याचेंहि बीज हेंच आहे. असो. तरवार ही अशा रीतीनें सत्ता आणि पदवी ह्यांची दर्शक असल्यामुळें तीही खालच्या खालच्या वर्गांतून पसरत गेलेली आहे; उदाहरणार्थ, परवांपर्यंत जपानांत तरवार वापरण्याचा हक्क नसलेले लोक ती वापरण्याचा हक्क लांच वगैरे देऊन मिळविण्याची खटपट करीत असत; आणि फ्रान्सांत दोन शतकांपूर्वीं परवान्याविना कोणीं तरवार वापरल्यास त्यास शिक्षा करीत.

विजयाचिन्हापासून निशाणीची किंवा पट्ट्याची उत्पत्ति कशी होते हें तरवारीपेक्षां भाल्याचे ठिकाणीं ज्यास्तच चांगलें दिसून येतें; कारण तरवार निशाणी बनली तरी तिचा आकार जसा बदलत नाहीं, तसें भा-

ल्याचें होत नाहीं; त्याचा आकार कांहींसा बदलतो. कित्येक अर्धवट सुधारलेले लोक भाला हा अधिकारदर्शक म्हणून जशाच्या तसाच वापरितात. उदाहरणार्थ, एलिस सांगतो कीं, मादागास्कारमध्यें प्रवास करीत असतां तेथील नाईक बहुधा एकादा भाला किंवा दण्ड किंवा दोन्ही धारण केलेला आपल्या दृष्टीस पडे. स्पेक म्हणतो कीं राजवाड्यांत राजाखेरीज कोणासहि शस्त्र धारण करण्याचा अधिकार नाहीं; तो मात्र दोन भाले धारण करितो. जपानमध्यें सरदारलोक सरकारी कामासाठीं बाहेर गेले म्हणजे त्यांच्यापुढें एक भालदार चालत असतो. हीब्रूलोकांत बरची ही अधिकारदर्शक म्हणून समजत असा इवाल्ड साहेबाचा तर्क आहे. वेट्झ म्हणतो कीं फ्रॅन्कलोकांत भाला हें राजकीय अधिकाराचें चिन्ह असे. आतां राजाचा जो वेत्रदण्ड आहे तो भाल्याच्या टोंकांस सोन्याचें किंवा रुप्याचें जाड व रुंद बटन लावूनच बनलेला आहे हें त्याच्या आकारावरून स्पष्ट दिसतें. आतां राजाच्या खालच्या दर्जाचे जे अधिकारी आहेत त्यांचेहि दण्ड अशाच रीतीनें बनलेले आहेत असें अनुमान सहजच निघतें.

दुसऱ्या अनेक गोष्टींवरून असें दिसतें कीं अधिकारदर्शक असलीं सर्व चिन्हें युद्धशील माणसानें वापरलेल्या शस्त्रांपासून किंवा इतर वस्तूंपासून उत्पन्न झालेलीं आहेत. उदाहरणार्थ, ऑराकेनियन लोकांत मुख्य नायकाची निशाणी एकप्रकारची कुऱ्हाड असते, व ती संगमरवरी दगडाची केलेली असते. युगांडामधील एका गव्हर्नर जनरलाचें वर्णन करतांना स्पेक साहेब म्हणतो

कीं त्याचा राजदण्ड एक लोखंडी कुऱ्हाड असते, व तीस हस्तिदंती मूठ असते. फ्रान्सामध्यें जें चिलखत सरदारलोक प्रथम शरीरसंरक्षणासाठीं वापरीत असत तें मागाहून मोठेपणाचें चिन्ह म्हणून वापरूं लागले, आणि ज्या टांचा प्रथम लढाऊ सरदारांच्या निशाण्या असत त्या पुढें मानचिन्हें म्हणून प्रथम बिशपलोक व नंतर सामान्य धर्माधिकारीहि वापरूं लागले.

६८. निशाण किंवा पटका हें जें अधिकाराचें दुसरें चिन्ह तेंहि असल्याच रीतीनें उत्पन्न झालेलें दृष्टीस पडतें. कारण तेंहि भाल्याच्या स्वरूपामध्यें फेरबदल होऊन उत्पन्न झालेलें असावें असें दिसतें.

ही गोष्ट पेरूव्हियन लोकांमधील कांहीं रूढींवरून दिसून येते. गार्सिलासो म्हणतो कीं त्यांच्या भाल्यास पुष्कळ पिसें लावून भूषित केलेलें असे; आणि ह्याचाच लढाईच्या कामीं निशाण म्हणून उपयोग करीत असत. ह्यावरून असें दिसतें कीं भाल्याचीं हीं भूषणें प्रथम भपक्यासाठीं उपयोगांत आणीत असून, तें सहजगत्या लढाईत सेनापति कोठें आहे हें समजण्याचें साधन म्हणून उपयोगांत आणूं लागले. ह्यासंबंधानें मार्कहॅम् असें सांगतो कीं जमिनींत भाला रोंवून त्यास निशाण बांधणें ही राजा तेथें आहे हें दर्शविण्याची खूण असे. ह्यावरून भाल्याच्या भूषकभागावरून पटक्याची उत्पत्ति कशी झाली असेल हें लक्षांत येतें.

लहान समाजांचें संयोगीकरण होऊन जसे मोठे समाज बनत जातील व त्यांत युद्धशील घटना वृद्धिंगत होत जाईल, तशी प्रत्येक टोळीचा नाईक त्याच्या अ-

नुयायांपासून भिन्न म्हणून ओळखण्याची जरूरी उत्पन्न होते इतकेंच नाहीं, तर निरनिराळ्या टोळ्याहि परस्पर-भिन्न म्हणून ओळखण्याची जरूरी उत्पन्न होते, ही गोष्ट कांहीं सुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या समाजां-मध्यें दिसून येते. उदाहरणार्थ, सांडविच बेटांमध्यें ल-ढायांच्या वेळीं निरनिराळ्या दर्जांच्या नायकांच्या पि-सारी झग्यांचे आकार व रंग निरनिराळे असत. फीजि-यनलोकांत प्रत्येक टोळी आपापलें निशाण घेऊन ल-ढते, आणि त्यांचीं निशाणें भिन्न भिन्न असतात. चिब्-चालोकांनीं जेव्हां सैन्यें बनविलीं तेव्हां प्रत्येक टोळी निरनिराळ्या खुणा असलेले तंबू घेऊन आली; आणि मेक्सिकनलोकहि लढाईत निरनिराळे माणसांस निरनि-राळे पट्टे देत असत. शिवाय आपण असें वाचितों कीं, मेक्सिकन राष्ट्राच्या निशाणावर वाघावर हल्ला करण्यास निघालेल्या गरुडाचें चित्र असे. आणि मोठ्या माण-सांस पराक्रमी जनावरांचीं नांवें देत ही गोष्ट ध्यानांत आणतां, निशाणांवर जनावरें दाखविण्यांत राजांचीं नांवें घालण्याचाच उद्देश असे हें लक्षांत येतें.

निशाणें व त्यांच्या काठ्या यांजवर मांसभक्षक पशु व पक्षी हीं अद्यापि पुष्कळ राष्ट्रांमध्यें झळकतात, ह्या-वरूनहि पूर्वी ही गोष्ट सामान्य असली पाहिजे हें स्पष्ट दिसतें.

६९. आतां सरदारांच्या वगैरे पोषाकांवरील निशा-ण्या ह्या टोळ्यांच्या निशाण्यांवरूनच उत्पन्न झालेल्या आहेत ही गोष्ट उघडच आहे. तद्वतच, टोळ्यांच्या नां-बांवरून कधीं कधीं टोळ्यांच्या निशाण्या उत्पन्न होता-

त ह्याबद्दल आपल्यास प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, थ्लिकीटलोकांबद्दल बॅन्क्रॉफ्ट असें सांगतो कीं, त्यांच्या " लांडगा " व " कावळा " अशा नांवाच्या दोन टोळ्या आहेत; आणि ते आपलीं घरें, होड्या, झगे, ढाली, वगैरे वस्तूंवर त्या त्या प्राण्यांचें चित्र काढीत असतात.

ह्यावरून, प्रारंभीं सुधारलेल्या लोकांत दिसणाऱ्या कुळनिशाण्या अशाच रीतीनें उत्पन्न झाल्या असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, चीन देशांत पंडित सरदारांच्या पोषाकांवर सोनेरी सुतानें विणलेले पक्षी असतात; लढवय्या सरदारांच्या पोषाकांवर सिंह, वाघ, इत्यादि जनावरें असतात; आणि सन्मानदर्शक चिन्हांवरून नऊ दर्जांचे हपीसर ओळखले जात असतात. यूरोपांतहि पुरातन काळीं सरदारांच्या पोषाकांवरून वगैरे असल्याच निशाण्या काढिलेल्या असत. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां, इंग्लिशलोकांत गाड्यांच्या तावदानांवरून, सोन्यारुप्यांच्या ताटबशांवरून, आणि सिलांवरून ज्या निशाण्या सरदारलोकांत झळकत असतात त्यांची उत्पत्ति अशीच झाली आहे ही गोष्ट निःसंशय होते.

७०. सुधारलेल्या लोकांच्या रूढींकडे पाहतां, प्रारंभीं माणसें जीं वस्त्रें धारण करूं लागलीं तीं उबेसाठीं नव्हे आणि लज्जारक्षणासाठींहि नव्हे, ही गोष्ट लक्षांत येत नाहीं. पण स्पेक आपल्यास असें सांगतो कीं, आपले आफ्रिकन नोकर जेव्हां हवा स्वच्छ असेल तेव्हां बकऱ्याच्या कातडीचे कोट अंगावर चढवीत, आणि पा-

ऊस पडूं लागला म्हणजे तो काढून घेत, व उघडेच कुडकुडत चालत; तद्वतच ह्युलिन असें सांगतो कीं, शिलुकलोकांमध्यें माणसें अगदीं नागवीं असतात; आणि त्यांचे सुलतान व वजीर हे देखील सणाच्या दिवशीं आणि दरबारामध्यें तेवढे चित्रविचित्र रंगाचे सदरे घालीत असतात. ह्या उदाहरणांवरून असें व्यक्त होतें कीं, पट्टयाप्रमाणें पोषाकहि प्रथम लोकांनीं आपली वाखाणणी करावी ह्या इच्छेनें माणसें वापरूं लागतात.

अमेरिकन इंदियनलोक स्वतः मारिलेल्या भयंकर जनावरांचीं कातडीं मोठेपणाची खूण म्हणून वापरितात ह्याबद्दलचा कांहीं पुरावा अगोदर दिलाच आहे. त्यावरून असें दिसतें कीं, पट्टे व पोषाक ह्यांचें मूळ एकच असावें, आणि कांहीं ठिकाणीं तरी पोषाक हा पट्टयाबरोबरच उत्पन्न झाला असावा. प्रारंभींच्या यूरोपियन जातींतून असेंच झालेलें आहे असा पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, गूल व कोनेर हे " ग्रीक व रोमनलोकांची रहाणी " ह्या पुस्तकांत असें म्हणतात कीं, हे लोक आपलें शीर व छाती ह्यांचे हवा व शत्रूचीं शस्त्रें ह्यांपासून संरक्षण करण्यासाठीं, रानटी पशूंच्या कातड्यांनीं आच्छादित असत. अशा रीतीनें पारध्यांचें जें विजयचिन्ह तें योद्धयाचें चिलखत बनलें. जर्मनलोकांमध्यें अशीच चाल असे.

ह्यावरून असें दिसतें कीं, पट्टे व पोषाक ह्यांची सन्मान्यता विजयचिन्हाच्या सन्मान्यतेपासून एकदमच उत्पन्न झाली असावी. आतां कातड्याचा पोषाक घालणें हा एक वर्गभेद बनतो अशाबद्दल प्रत्यक्ष पुरावा सां-

पडत नाहीं. तथापि भयंकर श्वापदांचीं कातडीं ज्याअर्थी नायकांचीं विशेषक बनलेलीं पुष्कळ ठिकाणीं आढळून येतात त्याअर्थी जेथें दासवर्ग असेल तेथें कातडीं हीं श्रेष्ठवर्गाचीं विशेषक बनत असतील. आणि असें होणें हें साहजिकच आहे; कारण रानटी समाजांत दास किंवा गुलाम हे घरगुती कामांत गुंतलेले असल्यामुळें त्यांस जनावरांचीं कातडीं मिळण्याचा संभवच नसतो. मध्ययुगीन यूरोपांत कनिष्ठवर्गाला लोंकरीचीं कातडीं वापरण्याची जी मनाई असे त्याचें बीज हेंच असावें.

आतां लढाईत कैद केलेल्या माणसाचीं वस्त्रें काढून घेऊन नागवेपणा ही ज्याअर्थी कैद्याची, व मागून गुलामाची, खूण म्हणून बनवीत असतात, त्याअर्थी वस्त्रें धारण करणें हें वर्गविशेषक असेल असें अनुमान निघतें. अशा रीतीनें दास व धनी ह्यांमधील ह्या विशेषास अतिशयोक्तीचें स्वरूप येतें; म्हणजे, जेथें कनिष्ठ माणूस वस्त्र धारण करीत असेल तेथें श्रेष्ठ माणूस त्याच्याहून ज्यास्त वस्त्रें धारण करितात. उदाहरणार्थ, सांडविच बेटवाल्यांबद्दल कूक असें म्हणतो कीं, त्यांच्यांत वस्त्रसंचयावरून दर्जा लेखीत असतात, आणि टॉंगनलोकांतहि असेंच आहे. ताहितियनलोकांतहि वरिष्ठवर्गातील लोक ओझें झालें तरी ज्यास्त कपडे वापरितात. आफ्रिकेमध्यें असेंच आहे. उदाहरणार्थ, लेअर्ड सांगतो कीं, प्रत्येक महोत्सवप्रसंगीं फंडाचा राजा व त्याचे नोकर कापसानें भरलेलीं वस्त्रें घालून आपलें शरीर हास्यकारक रीतीनें फुगवितात. आरबलोकांतहि असलाच प्रकार आ-

ढळून येतो. उदाहरणार्थ, कासीममध्यें एकावर एक तीन सदरे चढवीत असतात.

आतां ह्याबरोबरच शास्ते व शासित ह्यांनीं वापरावयाच्या पोषाकांच्या आकारांमध्यें आणि जातींमध्यें फरक पडत जातात हें सांगावयास नकोच. कारण गुलामाचा अर्धेंमुर्धें शरीर झांकणारा पोषाक धन्याच्या पूर्ण अंग झांकणाऱ्या पोषाकापासून आकार व संचय या बाबतींत भिन्न असलाच पाहिजे; आणि तो धन्याच्या पोषाकाच्या मानानें ज्यास्त खरबरीतहि असलाच पाहिजे. आतां पदवीभेददर्शक असले भेद प्रथम उत्पन्न झाले म्हणजे मागाहून तसलेच आणखी भेद उत्पन्न झाले पाहिजेत. लहान लहान समाजांमधील लढायांमध्यें जसे कांहीं समाज, दुसऱ्या समाजांकडून जित होत जातील तसा जेत्यासमाजांतील शास्त्यावर्गाचा पोषाक जितसमाजांतील तसल्या वर्गाच्या पोषाकाहून भिन्न असल्यास तो नव्या व उच्चतर अशा शास्त्यावर्गाचा विशेषक बनतो. रोमनलोकांच्या राज्याचा विस्तार होत असतां असले विशेष उत्पन्न झाले ह्याबद्दल पुरावा आहे. फ्रान्सदेशांतील जे रहिवासी रोमन साम्राज्यांतील नागरिक म्हणून बनविले जात ते रोमनतऱ्हेचा पोषाक घालीत, आणि त्यांचा निराळाच वर्ग असून त्यांस विशेष हक्क मिळत. बाकीचे रोमन साम्राज्यांतील फ्रेंचलोक संख्येनें ज्यास्त असून निराळ्या तऱ्हेचा पोषाक करीत; शिवाय, गुलाम नसलेल्यांचा गुलामांहून भिन्न झगा असे, आणि गुलामांचा वसाहतवाल्यांहून भिन्न असे.

पोषाकाची जात, आकार, व संचय, यांच्या प्रमाणें-

च त्याच्या रंगाच्या योगानेंहि पदवीभेद सहजच ओळखले जाऊं लागतात. दासवर्गाचे पोषाक जाडे-भरडे असल्यामुळें त्यांचे रंगहि अर्थात् कच्च्या मालाचे जे मजीत रंग तेच असतात. उदाहरणार्थ, गरीबलोक, गुलाम आणि मुक्त गुलाम, लोंकरीचा जो तपकिरी किंवा काळा स्वाभाविक रंग त्या रंगाचेच कपडे वापरीत असत. ह्यामुळें सहजच शास्त्यावर्गाच्या पोषाकाचे रंग चकचकीत असत, कारण त्यांच्यापाशीं असल्या रंगांना खर्च करण्यास पैसे असत. ह्याचीं उदाहरणें पुष्कळ देशांत सांपडतात. उदाहरणार्थ, मादागास्कारमध्यें अगदीं शेंदऱ्या रंगाचा पोषाक घालण्याचा विशेष हक्क राजासच तेवढा आहे. सयाममध्यें राजा व त्याचे सर्व शिपाई आणि शिकारी यांचे पोषाक तांबडे असतात. तिबेटांतील लामांचा पोषाक पिंवळा असतो. चीन देशामध्यें देखील पिंवळा हा बादशाही रंग असून बादशाह व त्याची टोळी एवढ्यांनींच तो वापरावयाचा असतो; त्याच्या खालच्या दर्जाचे शास्ते किरमिजी, हिरवा, इत्यादि दुसरे रंग वापरतात; आणि पदवीभेद दाखविण्यासाठीं निरनिराळ्या चकचकीत रंगाच्या टोप्या व शेले वापरतात. तद्वतच रोमच्या साम्राज्याच्या अखेरीस अखेरीस विशेष धनवान् लोक जांभळ्या, गुलाबी, व शेंदऱ्या रंगाचे पोषाक घालीत; आणि बादशाहाचा पोषाक एका विशिष्ट प्रकारच्या जांभळ्या रंगाचा असे. मध्ययुगीन फ्रान्सांत शेंदरी रंग विशेष महाग असल्यामुळें राजपुत्र, लढवय्ये सरदार, आणि उच्च पदवीच्या स्त्रिया तेवढ्याच तो वापरीत; आणि

सरदार लोकांशिवाय इतरांस जांभळा रंग वापरण्याची कायद्यानें मनाई असे.

आतां, उघडच, राजकीय घटना ज्यास्त ज्यास्त विस्तृत होत जात असतां त्याबरोबर विधिविषयक नियंत्रण जसें वाढत जाईल तसे पोषाकाचे संचय, जात, आकार आणि रंग हे सर्व निरनिराळ्या वर्गांचे निरनिराळे बनूं लागतात. ही गोष्ट जेथें सरकार ज्यास्तच जुलमी असेल तेथें ज्यास्तच स्पष्टपणें दिसून येते. उदाहरणार्थ, चीन देशांत सर्वांत उच्च प्रधान आणि सर्वांत लहान कान्स्टेबल यांच्यामध्यें नऊ वर्ग असून, त्यांपैकीं प्रत्येकाचा पोषाक अगदीं स्वतंत्र आहे. जपानामध्येंहि बादशाहाच्या नोकरांचे पोषाक त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणें अगदीं भिन्न आहेत, व त्यावरून ते अमक्या दर्जाचे व अमुक काम करणारे म्हणून सहज ओळखतां येतात. यूरोपांत राजाची सत्ता अगदीं अनियंत्रित होती तेव्हां असेंच असे.

७१. ज्या कारणांनीं पट्टे आणि पोषाक उत्पन्न, वृद्धिंगत आणि विशिष्टीकृत झालेले आहेत, त्याच कारणांनीं दागिनेहि उत्पन्न, वृद्धिंगत, आणि विशिष्टीकृत झालेले आहेत; कारण दोहोंचेहि मूळ उगम एकच आहेत.

प्रथम विजयचिन्हें व मागून पट्टे असलेले पदार्थ शेवटीं दागिने म्हणून कसे बनलेले आहेत हें लक्षांत ये-
ण्याण ... प्रकरणाच्या आरंभीं सांगितलेल्या गोष्टींत
ण्यास या ... कांहीं गोष्टींची भर घातली पाहिजे.
तसल्याच आण...लामध्यें अगोदरच्या काळच्या वि-
उदाहरणार्थ, ...याकरितां जेव्हां लढाईतील नाच
जयांचा उत्सव ...

करीत तेव्हां ते प्राण्यांचीं कातडीं अंगावर घालीत, आणि त्यांचीं शिरें आपल्या शिरांवर ठेवीत; आणि चिब्चालोकांमध्यें पदवीवाले लोक क्रूर श्वापदांच्या कातड्यांचीं केलेलीं शिरस्त्राणें बहुधा वापरीत. आशान्टीलोक जित माणसांच्या दाढा विजयचिन्हें म्हणून काढून घेत असून त्या व त्यांचे सोनेरी नमुने ह्यांचा उपयोग निरनिराळ्या भूषणकामीं करीत असतात; उदाहरणार्थ, ते आपल्या वाद्यांस खऱ्या दाढा लावितात, आणि आपल्या अंगावर सोनेरी नमुने घालतात. मालागासीलोक मगरांच्या दांतांचे सोनेरी नमुने अंगावर घालितात असें जेव्हां आपण वाचितों तेव्हां त्यावरून असें अनुमान सहजच निघतें कीं, प्रारंभीं जे खरेखुरे दांत विजयचिन्हें म्हणून वापरीत त्याबद्दल हे रुपेरी दांत आलेले आहेत.

जितमाणसें व जनावरें ह्यांचे जे हे टिकाऊ व लहान शरीरभाग त्यांचे अंगावर घालण्याचे दागिने जगांतील किती लोकांमध्यें करितात हें ध्यानांत आणतां वरील उपपत्ति बरोबर आहे याबद्दल संशय रहात नाहीं. उदाहरणार्थ, क्यारिब, तुपी, मोक्सो, व आशांटीलोक माणसाच्या दांतांचीं हातांतील कांकणें, पायांतील वाळे, व गळ्यांतील माळा करितात; व कांहीं दुसरे लोक भयंकर श्वापदांच्या दांतांचीं असलींच भूषणें करितात. उदाहरणार्थ, डायाकलोकांच्या गळ्यांतील माळांत वाघरीमांजराचे दांत असतात; न्यूगिनीमधील लोक आपले गळे, बाहू, आणि कमरा डुकराच्या दांतांनीं भूषवितात; आणि सांडविचबेटवाले आपलीं हातांतील कांकणें डुकराचे दांत घांसून त्यांचीं करितात, आणि कुत्र्यांच्या

दांतांचे पायांतील वाळे करितात. कांहीं डाकोटालोक पांढऱ्या आस्वलाच्या नखांचीं माळ गळ्यांत घालितात. कुकीलोकांत डुकराच्या दोन अर्धवर्तुल दांतांचें कांकण करून हातांत घालितात. न्यूझीलंदरलोकांत मुली मगराचे दांत कानांत अडकवितात. रंगानें व आकारानें चित्ताकर्षक वस्तूंचीं भूषणें करणें रानटयास जरी सहजच आवडतें, तरी आपल्या शौर्याच्या दर्शक वस्तू दाखविण्याचा त्यास सहजच अभिमान वाटत असल्यामुळें असल्या विजयचिन्हांचा भूषणें म्हणून उपयोग करणें त्यास ज्यास्त पसंत पडतें. म्हणून मण्डणलोक रेडयाच्या कातडयांच्या झग्यास डोक्यावरच्या केसांच्या झुपक्यांचे कांठ लावितात; म्हणून नागलोकांचा नाईक मारिलेल्या शत्रूच्या केसांच्या झुपक्यांनीं आपला गळपट्टा भूषवीत असतो; आणि म्हणूनच हॉटेंटाटलोक आपल्या डोक्यांना मारलेल्या श्वापदांच्या पोटांतील पिशव्यांनीं शोभा आणितात. ह्यावरून शक्य असेल तेथें विजयाचिन्हांस विभूषणांचें रूप कसें येतें हें स्पष्ट दिसतें. ह्याबद्दल स्नेकइंदियनलोकांत प्रत्यक्ष पुरावाच सांपडतो. कारण ते लोक तपकिरी आस्वलाच्या पंजांचा गळपट्टा, सर्वांत ज्यास्त सन्माननीय म्हणून, अत्यन्त पसंत करितात. त्या लोकांत शत्रूस मारणें जितकें पराक्रमाचें कृत्य समजलें जातें तितकेंच असलें आस्वल मारणें हें समजलें जातें. म्हणून त्यांच्या पंजांना कांचेचे मणी लावून, ते ते मोठ्या प्रौढीनें आपल्या गळ्यांत घालितात.

आतां ज्या उदाहरणांत प्रत्यक्ष विजयचिन्हें किंवा त्यांच्या प्रतिमा ह्या विभूषणें म्हणून न वापरतां, विभू-

षणें हीं विजयचिन्हांच्या ऐवजींच म्हणून वापरलेलीं दिसतात अशा उदाहरणांकडे वळूं. उदाहरणार्थ, चिब्चालोकांत जे अत्यन्त प्रबल व शूर असतील ते आपल्या ओंठांस, कानांस व नाकांस भोंकें पाडून त्यांत सोन्याच्या पिसांच्या माळा घालितात; आणि ह्या पिसांची संख्या त्यांनीं मारिलेल्या शत्रूंच्या संख्येबरोबर असते. ह्या ठिकाणीं असें झालें असावेंसें वाटतें कीं हीं सुवर्णभूषणें प्रारंभीं प्रत्यक्ष विजयचिन्हांच्या प्रतिमा असून मागून त्यांचें त्यांच्याशीं असलेलें सादृश्य नाहींसें झालें. अशा प्रकारच्या विभूषणांची उत्पत्ति अशा रीतीनें झालेली असल्यामुळें तीं लढवय्यावर्गाचीं विशेषक बनतात; आणि नंतर मग खालच्या वर्गातील लोकांनीं तीं वापरूं नयेत असे हुकूम सुटतात. उदाहरणार्थ, चिब्चालोकांत रंगीत चित्रें, वस्त्रांवर काढिलेलीं विभूषणें व रत्नें, आणि दागिने, ह्यांची सामान्य लोकांस मनाई असे. तद्वतच पेरूमध्यें सामान्य लोकांस विशेष परवानगीविन सोनेंरुपें वापरतां येत नसे. फ्रान्सामध्येंहि मध्ययुगांत सोन्यारुप्याचे दागिने व भांडीं एका विशिष्ट दर्जाच्या खालच्या दर्जाच्या लोकांस वापरण्याची परवानगी नसे.

आतां विभूषणांस प्रत्यक्ष विजयचिन्हें म्हणून सुरवात होऊन, नंतर त्यांस मोलवान् धातूंच्या केलेल्या विजयचिन्हांच्या प्रतिमांचें स्वरूप येऊन, पुढें तीं शूर योद्ध्यांस सन्मानचिन्हें म्हणून त्यांचे शास्ते द्यावयास लागल्यामुळें, सहजच त्यांचें समस्वरूप जाऊन त्यांस विविधस्वरूप येतें. म्हणून समाज जसा संमिश्र होत जाईल तसे विभूषणांचे पदकें, तारे, सूर्य, चंद्र, इत्यादि

अनेक प्रकार बनतात. ह्यांपैकीं सर्वांचा नाहीं तरी बहुतेकांचा उगम लष्करी आहे हें उघडच आहे. आणि जेथें युद्धशीलघटना जून झालेली असल्यामुळें जीवित शांतिशील झाल्यानंतर देखील कायम राहते, तेथें असल्या भूषणांना दुसऱ्या प्रकारच्या पदव्यांच्या दर्शकांचें स्वरूप येतें; उदाहरणार्थ, चीन देशांत निरनिराळ्या दर्जाच्या दिवाणी अधिकाऱ्यांचीं निरनिराळ्या रंगाचीं बटनें आहेत.

तथापि सर्व विभूषणांची उत्पत्ति अशा रीतीनें झालेली आहे असें मात्र समजावयाचें नाहीं. रानटयांमध्यें देखील सौंदर्याभिरुचीचें बीज असतेंच; म्हणून त्यास जसें शरीर रंगवावेसें वाटतें, तसे चित्ताकर्षक पदार्थांचे दागिने बनवावेसे वाटतात. शिवाय विभूषणांचे आणखी दोन उद्गम आहेत. कूक आपल्यास असें सांगतो कीं न्यूझीलंदरलोक आपल्या मृत आप्तांचे दांत व नखें कानांत घालितात; आणि दुसऱ्या कांहीं जातींमध्यें विधवा वगैरे ह्याच्याहून ज्यास्त मोठे असें मृतांचे अवशेष धारण करीत असतात. शिवाय, गुलामगिरीच्या निशाण्यांचेंहि असलेंच रूपान्तर बनून येतें. आसीरियन लोकांनीं खोदिलेल्या चित्रांवरून लढाईत पकडलेल्या शत्रूंना धरून नेण्यासाठीं त्यांच्या नाकांत कडचा घालीत असत असें दिसतें. अमेरिकेंत देवास वाहिलेले कांहीं उपाध्ये तसें करीत; आणि आस्ट्राखानमध्यें देवास स्वतःला अर्पण करून घेतल्याची, म्हणजे वशतेची, ती अद्यापिहि खूण आहे; पण इतरत्र हा त्या कडीचा अर्थ निघून गेलेला आहे, आणि ती फक्त भूषण म्हणून

वापरितात. सारांश, अंगावर गोंदून घेण्याच्या संबंधानें जसें झालेलें आहे तसेंच ह्या नाकांतील कडीच्या संबंधानें झालेलें आहे.

७२. नजराणे, नमनें, सन्मानदर्शक संबोधनें, आणि पदव्या ह्यांचा खालच्या खालच्या वर्गांत प्रसार होण्यास कारण इतरांस प्रसन्न करण्याची इच्छा जशी झाली आहे, तशी ती पट्टे, पोशाक, आणि विभूषणें, ह्यांच्या प्रसारास कारण झालेली असेल असें म्हणतां येत नाहीं. ह्या ठिकाणीं, उलट, खालच्या वर्गांतील लोकांनीं वरच्या वर्गांचीं विशेषक चिन्हें धारण करून त्या वर्गांत जाण्याची खटपट केली आहे, किंवा जेथें वरचे वर्ग खालच्या वर्गांना भीत असतील तेथें त्यांस तसें करूं देऊन वरच्या वर्गांनीं त्यांस संतुष्ट केलें आहे, असें दिसतें.

तरवारी, टांचा, वगैरे पदवीदर्शक निशाण्या खालच्या वर्गांनीं वापरूं नये अशी मनाई असतां त्या वर्गांतून त्या कशा पसरल्या आहेत हें अगोदर आपल्या नजरेस आलेलेंच आहे. म्हणून पोषाक व विभूषणें कशीं पसरलीं आहेत ह्याबद्दलचा पुरावा आतां देऊं. उदाहरणार्थ, रोममध्यें असें झालें होतें. तेथें प्रारंभीं परराष्ट्रीं पाठविलेल्या वकिलांस तेवढी सोन्याच्या आंगठ्या घालण्याची परवानगी असे; पुढें सेनेटचे सभासद, व त्यांच्या दर्जाचे म्याजिस्ट्रेट यांस ती परवानगी मिळाली; आणि नंतर लढवय्या सरदारांस मिळाली. त्यानंतर तेथें बादशाही स्थापन झाल्यावर, सामान्यलोकहि त्या वापरूं लागले.

पोषाकाच्या संबंधानेंहि असेंच झालेलें आहे. उदाहरणार्थ, प्रारंभीं फ्रान्सांत रेशमी व मखमालीचे कपडे

विशिष्टवर्गाच्या खालीं कोणीं वापरूं नये अशी मनाई असे, आणि सोळाव्या शतकापर्यंत श्रेष्ठवर्गांतील लोकांसारखे झगे घातल्याबद्दल बायकांस तुरुंगांत पाठवीत असत. इंग्लदामध्येंहि असेंच झालेलें आहे.

७३. या प्रकरणाचा गोषवारा देण्याच्या पूर्वीं हें सांगणें इष्ट दिसतें कीं विधिविषयक ह्या अंगांच्या संबंधानें पारलौकिकशासन आणि ऐहिकशासन ह्यांमध्यें जरी फारशीं सादृश्यें नाहींत, तरी थोडीशीं आहेत. उदाहरणार्थ, वेत्रदण्ड हा प्रारंभीं भाला ह्या शस्त्रापासून उत्पन्न झालेला असून तो दोहोंनाहि सामान्य आहे हें उघडच आहे. शिवाय, पालिनिशिया व इटाली अशा अगदीं दूरवरच्या देशांत देखील दैविक राजा व ऐहिक राजा ह्यांच्या पोषाकांत इतकें साम्य दिसतें कीं पूर्वजपूजेवरून देवतांची उत्पत्ति झालेली असल्यामुळें तें अगदीं साहजिक दिसतें. एलिस सांगतो कीं राजास अभिषेक करितेवेळीं ताहितियनलोक मोठा उत्साव करीत. त्यावेळीं त्याच्या कमरेसभोंवतीं तांबड्या पिसांचा पवित्र कमरपट्टा घालीत असत, व तेणेंकरून तो देववर्गापैकीं आहे असें दर्शवीत. प्राचीन रोममध्यें राजाचा पोषाक देवाच्या पोषाकासारखाच आहे; व त्याचा रथ, हस्तिदंती वेत्रदंड, मुकुट, वगैरे सर्व देवांच्या सारखीं असत.

विधिरूपी नियंत्रणाची उत्पत्ति व वाढ हीं युद्धशीलतेबरोबर कशीं होतात हें पूर्वींच्या उदाहरणांप्रमाणें पट्टे व पोषाक ह्यांच्या उत्पत्तीच्या उदाहरणावरूनहि स्पष्ट होतें. ज्या पट्ट्यांचा उगम मारिलेले पशू व माणूस ह्यांच्या शरीरापासून घेतलेल्या विजयचिन्हांमध्यें

सांपडतो त्यांच्याकडे पाहतां ही गोष्ट अगदीं स्पष्टरीत्या दिसून येते; आणि जे पट्टे किंवा अधिकारचिन्हें प्रारंभीं जितांपासून घेतलेलीं शस्त्रें असत त्यांच्यावरूनहि तीच गोष्ट तितक्याच स्पष्ट रीतीनें दिसून येते. तद्वतच, प्रारंभीं जो पोषाक रानटी पशूच्या कातडीचा बनलेला असतो त्याचाहि अर्थ तोच असून तोहि तसाच सन्मानदर्शक असतो ही गोष्ट ध्यानांत आणतां; आणि जितापासून लूट म्हणून जबरीनें घेतलेला पोषाक ज्याच्यापाशीं असेल तो जेता व नसेल तो जित असा त्यांच्यामधील भेददर्शक तो बनतो ही गोष्ट ध्यानांत आणतां; आणि शिवाय, पुढच्या पुढच्या पायऱ्यांवर जे आणखी पोषाकभेद उत्पन्न होतात ते जेत्यासमाजांचे घटक जितसमाजांतील श्रेष्ठ व कनिष्ठ वर्गाहून भिन्नतऱ्हेचे पोषाक घालूं लागल्यामुळें उत्पन्न होतात ही गोष्ट ध्यानांत आणतां; असें दिसून येतें कीं, प्रारंभापासून श्रेष्ठत्वाचीं व कनिष्ठत्वाचीं हीं चिन्हें लढाईपासून उत्पन्न झालेलीं आहेत. आणि लढाईपासून पोषाक व पट्टे ह्यांची सहजगत्या उत्पत्ति झाली ही गोष्ट ध्यानांत आणतां लढाईत मिळालेल्या जयाशीं त्यांचा संबंध असून त्यामुळें तीं सन्मानदर्शक होत असें मुद्दाम समजूं लागले ह्याचा उमज पडतो. ह्या प्रत्यक्षसंबंधाचीं उदाहरणें प्राचीन अमेरिकेंतील युद्धशील समाजांमध्यें दिसून येतात. उदाहरणार्थ, मेक्सिकोमध्यें लढाईत एकाद्यास कैद केल्याखेरीज राजास पूर्ण पोषाक करण्याची परवानगी नसे. पेरूमध्यें जे सरदार इंदियनलोकांस जिंकण्याच्या कामीं सर्वांत ज्यास्त मेहनत करितील त्यांस इन्काच्या पट्ट्यांसारखे

पट्टे वापरण्याची परवानगी सर्वांत ज्यास्त असे.

अशा प्रकारचा जो हा प्रत्यक्ष पुरावा त्यास दुजोरा देण्यास, निरनिराळ्या प्रकारचे समाज, आणि एकाच समाजाच्या निरनिराळ्या पायऱ्या ह्यांची तुलना करतां अप्रत्यक्ष पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, चीन व जपान ह्या देशांत प्राचीनकाळीं लढाईनें उत्क्रान्त झालेली राजकीय घटना जून होऊन आजपर्यंत जशीच्या तशीच राहिलेली असल्यामुळें तेथें हे वर्ग पट्टे व पोषाक बऱ्याच अंशीं जशाच्या तसेच कायम राहिलेले आढळून येतात. आणि यूरोपियन राष्ट्रांमध्यें ज्यांचे नमुने अद्यापि प्राधान्येंकरून युद्धशील राहिलेले आहेत त्यांच्यामध्यें ज्यांचे नमुने त्या मानानें उद्यमशील बनलेले आहेत त्यांच्यापेक्षां विशेष पोषाक व विभूषणें ज्यास्त प्रमाणावर दिसतात. रशियामध्यें पोषाकावरून माणसाची पदवी ओळखली गेली नाहीं, आणि केवळ त्याच्या आंगच्या गुणावरून त्यास किंमत आली, असें क्वचितच होतें. रशियांतील एका भोजनसमारंभाचें वर्णन करतांना डा० **मॉरिट्झ् वॅग्नर** असें म्हणतो:–" मला आढळून आलें कीं तेथें हजर असलेल्या पस्तीस लष्करी अंमलदारांच्या छात्यांवर दोनशेंहून अधिक पदकें चमकत होतीं. जनरलांच्या कोटांवरून बटनांपेक्षां पदकेंच ज्यास्त होतीं." ह्या जर्मन गृहस्थास रशियनलोकांत जी ही गोष्ट चमत्कारिक म्हणून भासली तीच जर्मनलोकांत इंग्रजमाणसास चमत्कारिक वाटते. उदाहरणार्थ, **क्यापटिन स्पेन्सर** म्हणतो कीं, " जर्मनलोकांपेक्षां, आणि विशेषतः आस्ट्रियनलोकांपेक्षां पदव्या व पदकें ह्यांची ज्यास्त आ-

वड दुसऱ्या कोणास असेल असें मला वाटत नाहीं."
इंग्लंद आणि यूरोपांतील इतर देश ह्यांमध्यें रस्त्यांतून फिरतांना असेच भेद दृष्टीस पडतात; म्हणजे, इतर देशांत जितके लष्करी व दिवाणी अंमलदार आपल्या हुद्याचा पोषाक घातलेले रस्त्यांतून आढळतात, तितके इंग्लंदांत आढळत नाहींत.

तथापि प्रत्येक समाजांतील नियामक भाग आणि नियमित भाग ह्यांच्याकडे पाहतां हा भेद ज्यास्तच स्पष्टरीत्या दिसून येतो. कारण पहिल्या भागामध्यें पदवीदर्शक चिन्हें जितकीं स्पष्ट दिसतात तितकीं दुसऱ्यांत दिसत नाहींत; आणि पहिल्या भागांपैकींहि जो लष्करी पोटभाग आहे त्याच्यामध्यें पट्टे व पोषाक जितके ढळढळीत, जितके विविध, आणि जितके निश्चित दृष्टीस पडतात तितके इतर पोटभागांमध्यें दिसत नाहींत. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतां श्रेष्ठत्व व गौणत्वदर्शक हीं सर्व चिन्हें युद्धशीलतेपासून उत्पन्न झालेलीं आहेत ही गोष्ट निःसंशय रीतीनें सिद्ध होते.

प्रकरण दहावें

आणखी वर्गभेद

७४. गतप्रकरणांतून आपणास असें दिसून आलें आहे कीं, विधिविषयक प्राथमिक रूढींपासून अशा कांहीं अन्य रूढी उत्पन्न झाल्या आहेत कीं त्यांचा उगम काय आहे हें स्पष्टपणें लक्षांत येत नाहीं, प्रस्तुत प्रकरणांत मूळ रूढींपासून वरच्याहूनहि ज्यास्त भिन्न बनलेल्या कांहीं रूढींचा उल्लेख करणें आहे.

लढाईमध्यें गुरुत्वाकर्षणाची शक्ति आपल्या बाजूनें लढावयास लावणें महत्त्वाचें असतें; आणि म्हणून जो तो शत्रूहून ज्यास्त उंच जागा व्यापण्यास पाहत असतो. उलटपक्षीं, जो योद्धा खालीं पडतो त्यानें शत्रूस विरोध करण्याचें मनांत आणिल्यास आपल्या शरीराचें वजन आणि शत्रूचें बळ ह्या दोहोंविरुद्ध त्यास तसें करावें लागतें. म्हणून खालीं असणें आणि पराजित होणें ह्याचें इतकें नेहमींचें साहचर्य असतें कीं, श्रेष्ठ व कनिष्ठ, किंवा वरचा आणि खालचा, हा संबंध कायम राखणें हें एक विधिविषयक महत्त्वाचें अंग बनलेलें आढळून येतें. इंग्रजी भाषेंत श्रेष्ठ व कनिष्ठ ह्या कल्पना दाखविणारे जे शब्द आहेत त्या सर्वांत वरचा व खालचा ह्या कल्पना अंतर्भूत झालेल्या आढळतात. दरबारामध्यें किंवा सभेमध्यें राजा व सरदार वगैरे पदवीचे लोक उच्चस्थानीं बसवून सामान्यजनाला नीचस्थानीं बसवितात. त्याचें बीज हेंच आहे. ह्यामुळें कांहीं देशांत कांहीं विलक्षण चाली उत्पन्न झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, लॉम्बॉक-

च्या राजाबद्दल वॉलेस असें सांगतो कीं त्यानें एक इंग्रजी धर्तीची गाडी मागविली असतां, तिच्यांत हांकणाराची बैठक बसणाराच्या बैठकीपेक्षां उंच आहे असें पाहून तो तिच्यांत बसेना; आणि मग ती त्याच्या गाडीखान्यांत केवळ शोभेसाठीं नेऊन ठेविली. ब्रह्मदेशांतीलहि राजे ह्याच कारणामुळें त्यांस वेळोवेळीं इंग्रजांनीं नजर म्हणून पाठविलेल्या गाड्यांचा क्वचितच उपयोग करीत; आणि त्या लोकांत आपण राहतों त्याच्या वरच्या मजल्यावर कोणीं राहणें म्हणजे मोठें अपमानाचें समजतात. सयामदेशामध्येंहि असेंच आहे. तेथील लोकांच्या संबंधानें बॉवरिंग असें म्हणतो कीं, तेथें खालच्या दर्जाचा माणूस आपलें डोकें वरच्या दर्जाच्या माणसाइतकें उंच कधीं करावयाचा नाहीं; उच्च दर्जाचा एकादा माणूस पुलाच्या खालून जात असल्यास खालच्या दर्जाचा माणूस पुलाच्या वरून कधीं जावयाचा नाहीं. आणि श्रेष्ठत्व दर्शविण्यास उच्चस्थान असणें जरूर आहे ह्या कल्पनेवरून असलेच आणखी नियम उत्पन्न झालेले आपल्या दृष्टीस पडतात.

आणखी कांहीं वर्गभेद संपत्तिभेदावरून उत्पन्न होत असतात; आणि हे संपत्तिभेद प्रारंभीं सत्ताभेदांवरून उत्पन्न होतात. ज्या अगदीं प्रारंभींच्या पायरीवर धनी व गुलाम हे खरोखरच धरणारा व धरलेला असे असतात, तेव्हांपासून धनीपणाबरोबर साधनवैपुल्य आणि गुलामगिरीबरोबर दारिद्र्य सहजगत्या आलेलें आहे. म्हणून जेथें समाजघटना प्राधान्येंकरून युद्धशील नमुन्याची असेल, तेथें श्रीमंत असणें ह्याचा अप्रत्यक्ष अर्थ विजयी

असणें, किंवा विजयानें मिळविलेलें राजकीय श्रेष्ठत्व बाळगून असणें, असा असतो. आतां कांहीं मूळसमाजांत ह्याला कांहीं अपवाद दृष्टीस पडतात हें खरें आहे. उदाहरणार्थ, डाकोटालोकांमध्यें दिवाणी व लष्करी नाईक बाकीच्यांपासून त्यांच्या गरिबीवरून भिन्न म्हणून समजले जातात; त्यांचा पोषाक इतरांहून गरिबीचा असतो. आबिपोनलोकांमध्येंहि असेंच आहे; व तें तसें कां आहे हें त्यांच्या रूढींवरून समजतें. त्याचें कारण हें कीं त्यानें जर नवा व सुंदरसा पोषाक घातला, तर त्याला प्रथम जो माणूस भेटेल तो मोठ्यानें त्याला असें म्हणेल कीं, "तो पोषाक मला दे"; आणि त्यानें तो त्यास एकदम न दिल्यास लोक त्यास लोभी व चिक्कू म्हणून सारखे टोमणे मारीत राहतात. पण असे थोडेसे अपवाद एकीकडे ठेवल्यास, इतरत्र, रानटी लोकांत देखील, संपत्तीचीं चिन्हें हीं सन्मानाचीं चिन्हें समजलीं जातात. उदाहरणार्थ, मिश्मीलोकांत मांसासाठीं मारलेल्या प्रत्येक प्राण्याचें डोकें मारणाराच्या दिवाणखान्यांत खुणेकरितां टांगून ठेवितात, आणि तो गेला म्हणजे त्याची श्रीमंती व योग्यता ह्यांचें स्मारक म्हणून तीं सर्व डोकीं त्याच्या थडग्यावर वाळवून रचतात. आफ्रिकेमध्येंहि असलीच एक चाल आहे. उदाहरणार्थ, केली असें म्हणतो कीं बाम्बारनलोक खाल्लेल्या सर्व प्राण्यांचीं डोकीं आपल्या झोंपड्यांच्या बाहेर टांगून ठेवितात; आणि त्यांच्यांत हें मोठें वैभवाचें चिन्ह समजतात. आणि गोल्डकोस्ट नामक किनाऱ्यावर सर्वांत श्रीमान् मनुष्यास सर्वांत ज्यास्त मान मिळतो; मग तो कोण-

त्याहि घराण्यांतील असो. अशा रीतीनें ह्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर संपत्तीस मान देण्याची चाल पडली म्हणजे ती पुढच्या पायऱ्यांवर चालू राहते; आणि अशा रीतीनें संपत्तीचीं चिन्हें हीं वर्गविशेषक बनतात; आणि त्यापासून विधिविषयक अनेक नियंत्रणें उत्पन्न होतात.

ह्या दोन मुख्य कल्पना ध्यानांत ठेविल्यास कित्येक विलक्षण विधींचा उगम सहज लक्षांत येतो.

७५. उष्णकटिबंधांतील देशांत चिलटें, माशा, इत्यादिकांनीं दिलेला त्रास ही एक संसारांतील मुख्य वेदना असते; आणि त्यामुळें हा त्रास कमी करण्याकरितां आपल्यास घाणेरड्या म्हणून भासणाऱ्या कांहीं चाली तेथें उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, कांहीं नीच मानवजाती आपल्या अंगांना ह्या कीटकांचा त्रास होऊं नये म्हणून धूळ फांशितात. रानटी लोकांत अंगें रंगविण्याची जी चाल दृष्टीस पडते त्याचें एक कारण हेंच होय. उदाहरणार्थ, जुवारॉस असें म्हणतो कीं, ग्वाटिमालामधील रानटी लोक चिलटांपासून संरक्षण व्हावें एतदर्थ आपलीं अंगें रंगवून काळीं करितात. शिवाय आपल्या दृष्टीस असें पडतें कीं, जेथें अंगास लावण्याचा रंग शोभिवंत व किंमतीचा असल्यामुळें संपत्तिदर्शक असतो तेथें तो पुष्कळ लावणें सन्माननीय समजतात. उदाहरणार्थ, टानामध्यें कांहीं नाईकलोक आपली उच्च पदवी दर्शविण्यासाठीं तांबड्या मातीचा आपल्या तोंडावर इतर लोकांपेक्षां एक जादा थर देतात. अशा रीतीनें गरीब रयतेपासून श्रीमान् नाईक ओळखण्यासाठीं ह्याचा उपयोग होऊं लागला म्हणजे मग तो एक श्रेष्ठत्वदर्शक

विधि बनून जातो. म्हणून मेक्सिकनलोकांत देवाच्या मूर्तीप्रमाणेंच राजाच्या अंगालाहि राज्याभिषेकाच्या समयीं शिलाजिताचा थर देत असत.

माती, शिलाजित, रंग, इत्यादि पदार्थांच्याऐवजीं कांहीं लोक आपल्या त्वचेच्या संरक्षणार्थ तेलें आणि चरब्या यांचा उपयोग करितात. ह्या पदार्थांचाहि उपयोग श्रीमंती व अतएव पदवी दर्शविण्यासाठीं करितात ह्याबद्दल पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, हॉटेंटाटलोकांबद्दल कॉल्बेन असें म्हणतो कीं, त्यांच्यांत माणूस आपल्या व आपल्या माणसांच्या अंगास जितकें ज्यास्त लोणी व चरबी फांशील तितका तो ज्यास्त श्रीमान् समजला जातो. त्यांच्यांत श्रीमान् व गरीब ह्यांच्यामध्यें हा मोठा भेद समजतात. ज्यूलोकांत व इजिप्शनलोकांत राजा किंवा उपाध्याय याला अधिकारापन्न करतेवेळीं तेलानें माखीत असत. ते देवांच्या मूर्तींनाहि माखीत, आणि कोणी पाव्हणा आला म्हणजे त्यालाहि माखीत असत. हा विधि मृतालाहि करीत असत.

ह्या सर्व उदाहरणांचा विचार करितां, हा विधि प्रारंभीं श्रीमंती व तिच्यांत गर्भित होणारी सत्ता हीं दर्शविण्यासाठीं करीत असत, ही गोष्ट व्यक्त होते.

७६. जितकी ज्यास्त उंची तितकी ज्यास्त श्रीमंती ह्या कल्पनेवरून वर्गभेददर्शक कांहीं घरें बांधण्याचे कायदे उत्पन्न झालेले दृष्टीस पडतात. राहण्याचें ठिकाण उंच असणें ह्यावरून जशी श्रीमंती व्यक्त होते, तशीच दुसऱ्यांहून ज्यास्त उच्च स्थान धारण केलेलें व्यक्त होतें. म्हणून, कित्येक ठिकाणीं, अमुक दर्जाच्या मा-

णसानें अमुक उंचीच्या पलीकडील उंचीचें घर बांधतां कामा नये असे कायदे दृष्टीस पडतात. प्राचीन मेक्सिकोमध्यें **मांटिझूमानें** असा कायदा केला होता कीं, मोठाले सरदार व शूर सेनापती ह्यांखेरीज मजल्याचें घर कोणीं बांधतां कामा नये, बांधल्यास त्यास देहांतशिक्षा होईल. डेहामीमध्यें हल्लीं असलाच एक कायदा आहे; तेथें कोणाला विशेष मान द्यावयाचा असेल तर राजा त्यास दुमजली घर बांधण्याची परवानगी देतो. राजाचा वाडा व शहरचे दरवाजे ह्यांना पांच पायऱ्या असून, नायकांना चार पायऱ्यांची व इतर सर्वांस तीन पायऱ्यांची परवानगी असते. जपानमध्येंहि असल्याच प्रकारचीं नियंत्रणें आहेत. तेथें रस्त्याकडे घराची उंची किती असावी, आणि खिडक्या किती असाव्या हें सर्व कायद्यानें ठरविलेलें आहे. ब्रह्मदेशांतहि असेंच असे. तेथें घराचा, व विशेषतः कौलाराचा आकार, प्रत्येक पदवीच्या माणसाचा कसा असावा, हें कायद्यानें ठरविलेलें असे, व तो कायदा कोणीं मोडिल्यास त्यास देहांतशिक्षा असे. घरास पांढरा रंग देण्याची परवानगी राजकुलांतील माणसांस तेवढीच असे. तद्वतच राजवाडे व देवळें ह्यांखेरीज इतर इमारती विटांच्या बांधण्याची मनाई असे.

७७. वरील कायद्यांबरोबरच दुसरे असे कांहीं कायदे दृष्टीस पडतात कीं, त्यांचा उद्देश गमनसाधनें कोणीं कोणकोणतीं वापरावीं हें ठरविण्याचा असतो.

उदाहरणार्थ, प्राचीन चिब्चालोकांमध्यें राजा व तो ज्यांस विशेष परवानगी देईल ते, ह्यांखेरीज इतरांस पालखींतून जाण्याची कायद्यानें मनाई असे. सन १८२१

सालापूर्वी मादागास्कारमध्यें राजकुलांतील लोक, न्यायाधीश, आणि सरकारी श्रेष्ठ कामदार यांखेरीज इतरांस पालखींत बसण्याची अशीच मनाई असे. रोमनलोकांत सेनेटचे सभासद व बायका यांनाच तेवढी पालखीची परवानगी असे; आणि फ्रान्सांत प्राचीनकालीं सेडान नामक वहनाच्या संबंधानें असेंच असे. जपानामध्यें पालखीस दोन, चार, आठ, किंवा अधिक भोई लावावयाचे, हें माणसाच्या दर्जावर अवलंबून असतें असें कीम्फर म्हणतो, आणि चीनदेशांत असेंच आहे. टर्कीमध्यें कोणत्या कामदाराची केवढी नाव असावी, आणि सयाममध्यें नावेंतील निजावयाची खोली कोणत्या माणसाची किती उंचीची व किती शृंगारलेली असावी, हें कायद्यानें ठरलेलें आहे.

पालखीचे भोई प्रारंभीं गुलाम असल्यामुळें युद्धशीलसमाजांत ते एकाद्यापाशीं असणें म्हणजे तो श्रीमान् व पदवीवाला व सत्ताधीश आहे असें जसें व्यक्त होत असतें, तद्वतच छत्री वगैरे नेणारे नोकर एकाद्याच्या बरोबर असणें ह्यावरूनहि तेंच व्यक्त होत असतें. म्हणून हलक्या दर्जाच्या लोकांनीं असले नोकर ठेवतां कामा नये अशी मनाई पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडते; ही मनाई बहुधा प्रारंभींच्या पायऱ्यांवर आढळून येते. उदाहरणार्थ, फीजीमध्यें राजे आणि दोघे मुख्य उपाध्ये एवढ्यांनाच छत्री वापरण्याची मोकळीक आहे. कांगोमध्यें राजकुलांतील लोकांस तेवढीच छत्री वापरण्याची किंवा चटईवर बसून जाण्याची परवानगी आहे. नष्ट झालेल्या जातींच्या खोदींव चित्रांकडे पाहतां तीच गोष्ट

व्यक्त होते. पुष्कळ ठिकाणीं छत्री किंवा छत्र हें राजचिन्ह समजलें जातें. सयाममध्यें राजास अभिषेक करण्याचेवेळीं एक सरदार पुढें येऊन त्यास सातमजली छत्री नजर करितो. आणि चीनचा बादशाह राजवाड्यांतून बाहेर पडला म्हणजे त्याच्याबरोबर वीस छत्रीवाले व वीस पंखेवाले बाहेर पडतात. जाव्हामध्यें सहा पदव्यांच्या लोकांनीं वापरावयाच्या सहा रंगांच्या छत्र्या आहेत. कांहीं ठिकाणीं मंडपी किंवा अंबारी हिचाहि उपयोग ती छत्रीसारखीच असल्यामुळें, वर्गभेद दर्शविण्याच्या कामीं करितात. प्राचीन अमेरिकेंत ह्याचें चांगलें उदाहरण दृष्टीस पडे. उदाहरणार्थ, उट्लाट्लनमध्यें राजा चार मंडप्यांच्या खालीं बसत असे, त्याचे निवडक सरदार तीन मंडप्यांखालीं बसत, मुख्य सेनापत्ति दोन मंडप्यांखालीं, आणि त्याचा दुय्यम एका मंडपीखालीं बसत असे. राजे व देव ह्यांच्या रथांना ह्या अंबाऱ्या जशा आपल्याकडे दृष्टीस पडतात तशा यूरोपांतहि दृष्टीस पडतात, ही गोष्ट ह्यासंबंधानें ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

विशेष किंमतीचीं साधनें उच्चतर दर्जाच्या लोकांनींच तेवढीं वापरावीं असे जसे हे नियम कांहीं ठिकाणीं दृष्टीस पडतात, तसेच दुसरीकडे कमी किंमतीचीहि सुखसाधनें हलक्या दर्जाच्या लोकांनीं वापरूं नयेत असे कायदे दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, फीजीमध्यें उत्तम प्रकारच्या चटईवर सामान्य लोकांनीं निजूं नये असा कायदा आहे. डेहामीमध्यें निजावयाच्या झोळ्या राजांस व गोऱ्यांसच वापरण्याची परवानगी आहे. सयाममध्यें भपके-

दार उशा सामान्य लोकांनीं वापरतां कामा नये; आणि जोलॉफलोकांमध्यें राजाखेरीज कोणास मच्छरदाणी लावतां येत नाहीं.

७८. असल्या कायद्यांपैकीं खाण्याच्या पदार्थांच्या उपयोगाचे जे कायदे आहेत ते सगळ्यांत प्रारंभींचे आहेत; त्यावेळीं रूढींना कायद्यांचें स्वरूप आलेलें नसतें. हे कायदे वृद्धांना तरुणांनीं नमून रहावयाच्या व स्त्रियांनीं पुरुषांस नमून रहावयाच्या चालीबरोबर उत्पन्न होतात. उदाहरणार्थ, तास्मेनियनलोकांत वृद्ध माणसांस सर्वांत उत्तम खाद्य देतात. आस्ट्रेलियनलोकांत उत्तम पक्ष्याचें मांस म्हाताऱ्यास खावयास घालितात, व तरुणानें तें खाणें हा अपराध समजतात. म्याकफर्सन म्हणतो कीं खोंडलोकांत स्त्रियांस डुकराचें मांस खाण्याची परवानगी नसते; कां ती न कळे. ताहितीमध्येंहि डुकर, कोंबडीं, मासे, नारळ, आणि केळीं हीं खाण्याची पुरुषांस परवानगी असून स्त्रियांनीं तसें केल्यास त्यांस जिवें मारितात. फीजियनलोकांमध्यें स्त्रियांस देवळांत जाण्याची किंवा नरमांस खाण्याची परवानगी नसे. चिब्चालोकांत हरिणाचें मांस नायकाच्या परवानगीशिवाय कोणास खातां येत नाहीं.

असलेच खाण्यापिण्याच्या निर्बंधाचे कायदे प्राचीन काळीं सर्व यूरोपभर असत.

७९. विशेष संपत्तिमत्ता दर्शवून विशेष पदवी व्यक्त करणाऱ्या अनेक वर्गभेदांपैकीं अत्यंत चमत्कारिक वर्गभेद सांगावयाचेच राहिले आहेत. त्यांचा आतां उल्लेख करूं.

इंग्लिशलोकांमध्यें नाजूक हात असणें ह्याचा बाय-

कांस मोठा अभिमान वाटतो; कारण त्यावरून त्या स्त्रियांस काम करावें लागत नाहीं असें व्यक्त होतें. हाच प्रकार कांहीं रानटी समाजांत विशेष प्रमाणावर दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, सोसैटी-आयलंडस् नामक बेटांमध्यें सगळ्या किंवा कांहीं बोटांचीं नखें लांब राखणें ह्याचा नायकांस मोठा अभिमान वाटतो. ह्याचा उद्देश काम करावें लागत नसल्यामुळें नखें झिजत नाहींत असें दाखविण्याचा असतो. ज्याकसन म्हणतो कीं, फीजियन राजे व उपाध्ये नखें लांब वाढवितात; आणि सुमात्रा बेटांतहि आंगठा व मधलें बोट यांचीं नखें वाढविण्याची उच्च पदवीचे लोक खबरदारी घेतात. चीनदेशांत बायका आपले पाय सपाट करितात ह्याचा उद्देश तोच आहे; म्हणजे, आपण श्रीमान आहों, आपल्यास श्रम करण्याची जरूरी नाहीं, असें दाखविण्याचा आहे. कांहीं ठिकाणीं आपण लठ्ठ असणें किंवा आपलीं मुलेंमाणसें लठ्ठ असणें हेंच श्रीमंतीचें व मोठेपणाचें लक्षण समजतात. उदाहरणार्थ, इंदियनलोकांत अशी समजूत आहे कीं ज्याचीं बायका व मुलें लठ्ठ दिसतील तो माणूस सन्मान्य समजावा; कारण त्यावरून तो पारधीच्या कामांत शूर आहे, व पुष्कळ जनावरें मारितो असें व्यक्त होतें. ह्या समजुतीवरून पुढें कांहीं ठिकाणीं अशी समजूत उत्पन्न झालेली दिसते कीं एकादा माणूस विशेष लठ्ठ असेल तरच तो सन्मान्य व श्रीमान् समजावा. उदाहरणार्थ, चीन देशांत सुभेदार लठ्ठ असणें हें त्यास मोठें भूषणास्पद समजतात. एलिस सांगतो कीं ताहितियनलोकांच्या बायकांस विशेष लठ्ठपणा हें मोठ्या

पदवीचें लक्षण आहे. सर्व आफ्रिकाभर लठ्ठ स्त्रियांची फार वाखाणणी होते. उदाहरणार्थ, काराग्वेमध्यें राजाच्या बायका फार लठ्ठ असतात; तेथें स्पेक म्हणतो, राजाची मेव्हणी इतकी लठ्ठ होती कीं तिला सरळ उभें राहतां येत नसे, म्हणून ती रांगत चाले; आणि तेथें लठ्ठ होण्यासाठीं स्त्रियांस मार देखील खावा लागतो. पुष्कळ खाऊन रोग होणें हें देखील कोठें कोठें मोठें सन्मानाचें लक्षण समजतात, कारण तेणेंकरून श्रीमंती व्यक्त होते. उदाहरणार्थ, पुष्कळ मद्यपानानें होणारा संधिवात इंग्रजलोकांत सरदारीचें एक लक्षण समजत असत. ताहितियनलोकांमध्यें आव्हा नामक मादक वनस्पतीचें सेवन करून आंगावरून एकप्रकारचा पांढरा भुसा निघून जाऊं लागणें हें सरदारीचें लक्षण समजत. फार तर काय, पण पुष्कळ स्त्रियांचें सेवन करून उपदंशादि रोग होणें हेंच ग्वाटिमालाच्या लोकांत सरदारीचें लक्षण समजलें जातें; आणि म्हणून त्यावरून बनवलेलें नांव देवाला देखील ते लोक लावीत असत.

८०. ह्या प्रकरणांत एथवर सांगितलेले हे आणखी वर्गभेद पूर्वींच्या प्रकरणांत दाखविलेल्या वर्गभेदांप्रमाणें युद्धशीलतेपासून जरी प्रत्यक्षरीत्या उत्पन्न झालेले दिसत नाहींत, तरी ते तिजपासून अप्रत्यक्षरीत्या उत्पन्न झालेले दिसतात; आणि उद्यमशीलता वाढत जाईल तसे ते कसे अस्पष्ट होत जातात हें सविस्तररीत्या दाखविण्याची जरूरी नाहीं.

आतांपर्यंत दिलेल्या उदाहरणांवरून असें स्पष्ट होतें कीं नेहमीं लढाया झाल्यामुळें जी घटना उत्पन्न होते ती

घटना ज्या समाजांची असेल तेथें हे वर्गभेद स्पष्टरीतीनें दृष्टीस पडतात; आणि हल्लीं विशेष सुधारलेल्या अशा समाजांमध्येंहि प्राचीन काळीं युद्धशीलता विशेष असल्यामुळें ते विशेषरीत्या दृष्टीस पडत असत. उलटपक्षीं, त्या उदाहरणांवरून असेंहि दिसतें कीं उद्यमशीलतेमुळें बिनपदवीवाले लोक जसे संपत्तिमान् होत जातील आणि ते जसे चैनीनें राहूं लागतील, तसे हे वर्गभेद कमी कमी होऊं लागतात. वरिष्ठाच्या रूढी आणि सुखसाधनें ह्यांचा कनिष्ठांनीं उपभोग घेतां कामा नये अशा प्रकारचे जे हे जादा नियम ते जबरीच्या सहक्रियेचें जें सामाजिक साम्राज्य त्याच्यापैकीं असतात, मग त्या नियमांचें विशिष्टस्वरूप कांहींहि असो; आणि नियामकवर्गाच्या खर्चिक चालीरीती स्वीकारण्याची पूर्ण मुभा नियमित वर्गास जी मिळते ती स्वैच्छिक सहक्रियेच्या साम्राज्यांत होय.

प्रकरण अकरावें
श्रीमंतीच्या तऱ्हा

८१. विधिसंस्था या सदराखालीं श्रीमंतीच्या तऱ्हांस मुळींच उल्लेख न करणें म्हणजे तो विषय अपुरा ठेवणें होय; पण त्या विषयाचें नीट रीतीनें निरूपण करणें हें काम कठीण आहे. आतांपर्यंत सामाजिक नियंत्रणाच्या ज्या अनेक स्वरूपांचा आपण विचार केला त्यांमध्यें असे कांहीं व्यापक विशेष दृष्टीस पडतात कीं त्यांचे सर्वांचे उगम एकच आहेत असें दाखवितां येतें. पण श्रीमंतीच्या तऱ्हा ह्या सदराखालीं जे संकीर्ण व वरचेवर बदलणारे वर्तननियम येतात त्यांची उपपत्ति अशा रीतीनें लावतां येत नाहीं; आणि त्या सर्वांचा एकच उगम आहे असेंहि दाखवितां येत नाहीं.

अंगकर्तनें, नजराणे, भेटी, वन्दनें, संबोधनप्रकार, पदव्या, पट्टे व पोषाक, इत्यादिकांच्या संबंधानें कनिष्ठांच्या व वरिष्ठांच्या क्रिया सदृश असल्या पाहिजेत असा कटाक्ष नसतो, तर त्या विसदृश असाव्या असा कटाक्ष असतो. म्हणजे, शास्ता जें करील तें शासितानें करतां कामा नये, व शास्ता जें करावयाचें टाळील तें शासितानें केलेंच पाहिजे, असे ह्या गोष्टींच्या संबंधानें निर्बंध असतात. पण वर्तन, पोषाक, जीवितक्रम इत्यादिकांच्या ज्या विशेषांचा अंतर्भाव " श्रीमंतीच्या तऱ्हा " या सदराखालीं होतो, त्यांच्या संबंधानें वैसदृश्याच्या ऐवजीं सादृश्याकडेच कटाक्ष असतो; म्हणजे, वरिष्ठाचा जो मान राखावयाचा तो ह्या बाबतींत

त्याच्यासारखें वागून दाखवावयाचा असतो, त्याच्यापासून भिन्नपणानें वागून नव्हे. असा हा फरक कसा उत्पन्न होतो ?

ह्याचें कारण हें दिसतें. श्रीमंतीच्या तऱ्हा करणें हें स्वभावतःच अनुकरणरूप आहे. आतां अनुकरणाचे हेतू परस्परभिन्न असे दोन असूं शकतात. एक हेतु ज्याचें अनुकरण करावयाचें त्याच्याबद्दल पूज्यबुद्धि हा होय, आणि दुसरें कारण त्याच्या तोडीचे आपण आहों असें दाखविण्याची इच्छा हें होय. ह्या दोन विसदृश हेतूंनीं जे अनुकरणप्रकार उत्पन्न होतात त्यांच्यामध्यें स्पष्ट भेद कांहींच करतां येत नाहीं; आणि ह्यामुळें अंकितपणा फार असेल तेव्हां जीं पूज्यबुद्धिप्रेरित अनुकरणें उत्पन्न होतात त्यांचें, स्वातंत्र्य बरेंच असेल तेव्हां चढाओढीमुळें उत्पन्न होणाऱ्या अनुकरणांमध्यें संक्रमण होण्याचा संभव उत्पन्न होतो.

तेव्हां ही गोष्ट ध्यानांत धरून, पूज्यबुद्धिप्रेरित अनुकरणें प्रथम कशीं सुरू होतात, आणि त्यांचें संक्रमण चढाओढीच्या संक्रमणांत कसें होतें, हें आतां आपण लक्षांत आणूं या.

८२. आतां ज्या समाजांत अंकितपणा फार आहे असा एकादा समाज घेऊन आपण असा प्रश्न करूं कीं कोणत्या बाबतींत श्रेष्ठाचें कनिष्ठानें अनुकरण केल्यानें श्रेष्ठ संतुष्ट होणार आहे ? त्याच्या आपण तोडीचे आहों असें कोणत्या बाबतींत कनिष्ठानें दाखविल्यास श्रेष्ठास आपला सन्मान केल्यासारखा वाटणार आहे बरें ? अर्थात् त्याचीं जीं वैगुण्यें असतील त्या बाबतींत.

जुलमी रीतीनें विधिपूर्वक वागणारे जे रानटी फीजियन त्यांच्या रूढींपैकीं एक उदाहरण दिलें असतां ह्या गोष्टीचा खुलासा चांगला होणार आहे. " एक नाईक एक दिवस एका डोंगराळ रस्त्यांतून पुष्कळ अनुयायांसह जात असतां त्याचा पाय अडखळून तो पडला. त्याबरोबर त्याच्या त्या अनुयायांपैकीं एक खेरीजकरून बाकीचे तसेंच करते झाले; आणि त्या माणसास मार देऊन त्यास असें विचारते झाले, तुला तूं आपल्या नायकापेक्षां चांगला असें वाटतें कीं काय ?" आफ्रिकेमध्यें डार्फूरलोकांत असेंच आहे. त्यांचा सुलतान घोड्यावर बसून चालला असतां पडल्यास त्याच्याबरोबरच्या सर्व स्वारांस तसेंच पडावें लागतें, आणि कोणी न पडल्यास त्यास खालीं घालून चांगला मार देतात.

यूरोपांतील लोकांतहि असलीं उदाहरणें आढळतात. सन १४६१ सालीं बर्गंडीचा ड्यूक फिलिप यानें आजारी असतां आपले केंस कापिले आणि असा हुकूम सोडिला कीं आपल्या सर्व सरदारांनीं आपआपले केंस काढून टाकावे. तेव्हां पांचशेंहून ज्यास्त लोकांनीं हजामती करून घेतल्या. १६६५ सालीं चवदाव्या लुईला भगेंद्र झाल्यामुळें जेव्हां त्याजवर शस्त्रप्रयोग केला, तेव्हां तो करून घेण्याचेंच वेड त्याच्या मानकऱ्यांमध्यें सुरू झालें. त्यांच्यापैकीं पूर्वीं जे आपला हा रोग छपवून ठेवीत होते त्यांस आतां तो जगजाहीर करण्याची लाज वाटत नाहींशीं झाली. कांहींजणांना तर ती क्रिया राजवाडा होता त्या गांवींच करून घेण्याची हांव सुटली; कारण तेणेंकरून राजाच्या कानावर ती गोष्ट सहजग-

त्या जात असे. तीसजण ती क्रिया करून घेण्यास तयार झाले, आणि त्यांपैकीं कांहींजणांस ती करण्याची जरूरी नाहीं असें जेव्हां सांगितलें तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें.

आतां अशी कल्पना करा कीं एकाद्या राजास गंडमाळा झालेली असल्यामुळें तो आपल्या गळ्याभोंवतीं रुंद गळपट्टा गुंडाळूं लागला तर त्याचे मानकरी तसें करूं लागतील, आणि मग इतर लोक त्याचें अनुकरण करूं लागतील. अशा रीतीनें अनुकरणेच्छेवरून पोषाकाच्या नव्या तऱ्हा कशा रूढ होतात, आणि त्या मोठ्या माणसास पसंत पडल्या म्हणजे हळूहळू तो इतर अनुकरणांकडे कानाडोळा कसा करूं लागतो, हें लक्षांत येतें.

८३. आतां असें मात्र समजावयाचें नाहीं कीं हा परिणाम ह्या एकट्या कारणाचाच आहे. तर ह्या कारणानें एकदां कार्य करण्यास सुरवात केली म्हणजे दुसरें एक कारण त्याच्या मदतीस येतें. तें कारण चढाओढीमुळें उत्पन्न झालेलें अनुकरण हें होय.

ह्या अनुकरणास बहुतेक पहिल्या अनुकरणाबरोबरच सुरवात होते. लोकांनीं शाबासकी द्यावी ह्या इच्छेनें प्रेरित होत्साते रानटी लोक कधीं कधीं सुधारलेल्या लोकांपेक्षां ज्यास्त उधळेपणानें खर्च करण्यास प्रवृत्त झालेले दिसून येतात. कांहीं रानटी लोकांत मुलीच्या लग्नाच्या वेळीं जेवणावळींवर वगैरे खर्च इतका करावा लागतो कीं, त्यामुळें ते भिकेस लागतात. म्हणून तो टाळण्यासाठीं मुलींस जन्मास आल्याबरोबर मारण्याचा प्रघात त्यांच्यांत सुरू होतो. टॉमसन व आंगस असें वर्णन

कारितात कीं न्यूझीलंदरलोकांना कधीं कधीं एवढाल्या जेवणावळी घालाव्या लागतात कीं तेणेंकरून वरचेवर दुष्काळ पडतो; आणि ह्या जेवणावळींसाठीं ते वर्ष वर्ष अगोदर तयारी करीत असतात. अशा रीतीनें वरिष्ठ-लोक उधळपट्टींत एकमेकांशीं प्रतिस्पर्धा करूं लागले म्हणजे खालचे लोकहि त्या बाबतींत त्यांच्याशीं चढाओढ करूं लागतात. सर्वकाळीं आणि सर्व ठिकाणीं कनिष्ठाची मी कोणी तरी आहें असें दाखविण्याची जी प्रवृत्ति तिचा त्याच्यावर लादलेलीं जीं नियंत्रणें त्यांच्याशीं झगडा चाललेला असतो; आणि ही प्रवृत्ति दाखविण्याचा मुख्य मार्ग म्हटला म्हणजे आपल्या वरच्या पायरीवरील लोकांच्या पोषाकांचें, सुखसाधनांचें आणि चालीरीतींचें अनुकरण करावयाचें हा आहे. बहुतकरून अशा लोकांपैकीं कांहीं थोड्यांस वरिष्ठांचें अनुकरण करण्याची परवानगी मिळते; आणि मग हें अनुकरण करण्याची चाल ज्यास्त ज्यास्त व खालच्या खालच्या लोकांत पसरत जाते.

पदवी आणि संपत्ति हीं एकाच ठिकाणीं असावयाचीं, हें साहचर्य जसजसें कमी होत जाईल, म्हणजे, उद्यमशीलतेमुळें वरच्या पदवीच्या लोकांप्रमाणें ऐटीनें राहण्यास समर्थ असे खालच्या दर्जाचे लोक जसजसे उत्पन्न होत जातील, तसतशी ही गोष्ट ज्यास्त विशेषतः होऊन जाते. कारण तेणेंकरून असल्या लोकांच्या हातीं ज्यास्त सामर्थ्य असल्यामुळें, आणि पैसे वगैरे उसने देऊन शास्त्यावर्गास ते सार्वजनिक व खासगी कामांत मदत करूं लागल्यामुळें ज्या चालीरीती पूर्वीं उच्च कुलांतील लोकांच्या तेवढ्याच असतील त्यांचें इतरांनीं

अनुकरण करण्यास असलेला जो विरोध तो कमी होऊं लागतो. आणि मग अगदीं खालच्या लोकांनीं अगदीं वरच्या लोकांचें अनुकरण केल्यास त्यांची थट्टा करावयाची ह्यापलीकडे त्यांस ज्यास्त विरोध कोणी करीत नाहींसा होतो.

८४. एवंच विधिप्रकार आणि शिष्टाचारांचें अनुकरण हीं जरी एकमेकांत गोंधळलेलीं व अडकलेलीं अशीं दिसतात, तरी त्यांचे उगम आणि अर्थ हे दोन्ही भिन्न भिन्न आहेत. कारण विधी जबरीच्या सहक्रियेला योग्य असे आहेत, आणि शिष्टसांप्रदायाचें अनुकरण हें स्वैच्छिक-सहक्रियेला योग्य असें आहे. सारांश, मोठ्या माणसाला नमून वागण्यापासून उत्पन्न होणारें वर्तन आणि त्याचें अनुकरण करण्यापासून उत्पन्न होणारें वर्तन ह्या दोहोंमध्यें अगदीं मुळांत भेद आहे, आणि स्वभावांत विरोध आहे.

म्हणून विधिप्राबल्य जसें युद्धशील समाजांत दिसून येतें तसें शिष्टानुकरणप्राबल्य उद्यमशील समाजांत दिसून येतें. उदाहरणार्थ, एकादा उदमी जसा श्रीमंत होत जाईल तसा तो रुप्याचे चमचे व कांटे वापरावयास लागून जमीनदाराचें अनुकरण करूं लागतो, आणि सणाच्या दिवशीं घरांतील नोकरीण अगदीं नव्या तऱ्हेची टोपी घालून आपल्या यजमानणीचें अनुकरण करिते. सारांश, युद्धशील चळवळींबद्दल जशा उद्यमशील चळवळी उत्पन्न होत जातील तसें शिष्टानुकरण वाढत जातें.

हल्लीं अस्तित्वांत असलेल्या शिष्टानुकरणाकडे पाहतां, राजकीय नियमनांत जसें पद्धतशीर सरकार तसें तें

सामाजिकनियमनांत दिसतें; कारण सरकारचा जुलूम आणि व्यक्तीचें स्वातंत्र्य ह्यांमधील तो एक तडजोडीचा प्रकार दिसतो. सार्वजनिक कामांत जबरीच्या सहक्रियेपासून स्वेच्छेच्या सहक्रियेकडे संक्रमण होत असतां प्रतिनिधिपद्धति जशी वाढत चालली आहे, तशी ही श्रीमान् व सुशिक्षित ह्यांची आचारपद्धति एकंदर समाजामध्यें हळू हळू पसरत चालली आहे. आणि दोन्ही ठिकाणीं नियंत्रण आणि स्वातंत्र्य ह्यांमधील जी ही तडजोड तिचा कल स्वातंत्र्यवृद्धीकडे आहे. कारण सरकारचें लोकवर्तनावरील नियंत्रण जसें कमी होत चाललें आहे, तसा शिष्टसंप्रदायानुकरणाचा कडकडीतपणाहि कमी होत चालला आहे.

एवंच शिष्टानुकरणास श्रेष्ठाच्या वैगुण्यांच्या अनुकरणापासून सुरवात होऊन, आणि हळू हळू इतर विशेषांच्या अनुकरणाकडे त्याची प्रवृत्ति होऊन, त्याचा एकंदर कल सर्वांना सारखें करण्याकडे असतो. त्याचा कल वर्गभेद प्रथम कमी करून मागून नाहींसे करण्याकडे असल्यामुळें त्याचेयोगानें व्यक्तिस्वातंत्र्य वाढत चाललें आहे; आणि अशा रीतीनें अंकितपणादर्शक जें विधिनियंत्रण तें कमी होत चाललेलें आहे.

प्रकरण बारावें

विधिविषयक भूत व भावि स्थिति

८५. तात्पर्य, आपल्यास असें दिसून येतें कीं, वर्तनानियम जे आहेत ते, लोक गृहीत करितात त्याप्रमाणें, केव्हां तरी मुद्दाम ठरविलेले आहेत असें नाहीं. उलटपक्षीं, ते सामाजिक जीवितापासून साहजिकरीत्या उत्पन्न झालेले असून हळूहळू उत्क्रान्त झालेले आहेत. ह्याबद्दल जे विशेष पुरावे सांपडतात त्यांखेरीज, ते सामान्य उत्क्रान्तिनियमाला अनुसरून आहेत, असा त्यांबद्दल सामान्य पुरावा सांपडतो.

प्राथमिक नायकविहीन मनुष्यसमूहांमध्यें वर्तननियमन करणाऱ्या ज्या रूढी असतात त्या थोड्याच असतात. परकी गृहस्थ भेटला म्हणजे सहजगत्या सुचतील अशा कांहीं कृती करावयाच्या; कांहीं प्रसंगीं अंगकर्तनें करावयाचीं; प्रौढ माणसें खात असतील असे कांहीं पदार्थ इतरांनीं खाऊं नये असे कांहीं प्रतिबंध असावयाचे; अशा प्रकारचे थोडेसे वर्तनानियम त्यांच्यांत असतात. पण निरनिराळ्या मनुष्यसमूहांचें संकलन होऊन जसे संयुक्त, दुबारसंयुक्त व तिबारसंयुक्त समाज बनत जातील, तशी जीवितक्रियानियामक विधिप्रकारांची संख्या वाढत जाते; म्हणजे काय, तर, विधींचा एकंदर गोळा मोठा होत जातो.

हे विधी प्रथम सरल असून हळूहळू ते संमिश्र बनत जातात. एकाच उगमापासून अनेक प्रकारचीं वन्दनें उत्पन्न होत जातात. प्रारंभींचीं जीं वर्णनात्मक नांवें

त्यांना अनेक वरवरच्या पदव्यांचें स्वरूप येत जातें. मूळच्या वन्दनांपासून, हळूहळू, निरनिराळ्या माणसांना निरनिराळ्या प्रसंगांना योग्य असे सन्मानदर्शक संबोधनप्रकार उत्पन्न होतात. लढाईंत घेतलेल्या शस्त्रांपासून अधिकारचिन्हांची उत्पत्ति होते, आणि हळूहळू त्यांना अनेकप्रकारचे आकार प्राप्त होतात. इकडे कांहीं विजयचिन्हांस पट्टे, पोषाक आणि भूषणें अशीं निरनिराळीं स्वरूपें येऊन, त्यांतील प्रत्येकांत पुनः आणखी निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात; ते इतके कीं त्यांच्यांत व त्यांच्या मूळ उगमांत कांहीं साम्य दिसत नाहींसें होतें. आणि अशा रीतीनें प्रत्येक समाजांतील विधिप्रकारांत जसें वैविध्य उत्पन्न होत जातें, तसें अनेक समाजांतील विधिप्रकारांमधील वैजात्य वाढत जातें.

याबरोबरच विधींचा निश्चितपणाहि वाढत असतो; तो इतका कीं कांहीं देशांत कांहीं विधी अगदीं जसेच्या तसे व्हावे लागत असतात; त्यांत अणूरेणूइतका फरक चालत नाहीं. आणि कांहीं ठिकाणीं अशा रीतीनें बनलेले जे संमिश्र व ठराविक विधी त्यांस व्यवस्थित अशा विधिबाडांचें स्वरूप येतें, व त्यांच्या निरूपणाचे मोठाले ग्रंथ बनतात.

एवंच, संकलीभवन, विविधजातीयत्व, निश्चितत्व, आणि सुसंबद्धता, ह्या बाबतींत विधींची प्रगति कशी होत जाते, ह्याचीं स्पष्ट उदाहरणें सांपडतात.

८६. प्राथमिक लोकसमूहामध्यें विधींचें जें समस्वरूप दृष्टीस पडतें, आणि पुढें सुधारलेल्या समाजांतून राजकीय, धार्मिक व सामाजिक अशा रूपांनीं विधींना

विविधजातीयत्व प्राप्त होतें, त्यांचा विचार करतां, उत्क्रमणव्यापारामुळें वस्तूंना जें रूपान्तर प्राप्त होत असतें त्याचें आणखी एक अंग नजरेस येतें.

एकंदर गतप्रकरणांचा विचार करितां मृताला मान देण्याकरितां केलेले विधी आणि जिवंतास मान देण्याकरितां केलेले विधी ह्यांजमध्यें विलक्षण साम्य दृष्टीस पडतें. तेथें आपल्या नजरेस असें आलें कीं विजयाचिन्हें मिळविल्यानंतर विजयी सरदार जिताच्या शरीराचे कांहीं भाग शास्त्यांना अर्पण करितात, कांहीं थडग्यांपुढें ठेवितात, कांहीं देवळांत नेऊन ठेवितात, आणि प्रसंगवशात् कांहीं आपल्या बरोबरच्यांसहि नजर करितात; आणि आपल्या असेंहि नजरेस आलें कीं, ह्यापासून जीं अंगकर्तनें उत्पन्न होतात, तींहि राजे, देवता, मृत आप्त, आणि कधीं कधीं जिवंत मित्र, ह्यांच्याप्रत अंकितपणा दर्शविण्याच्या त्या खुणा बनतात. रानटी लोक श्रेष्ठाची मर्जी संपादण्याकरितां बहुधा अन्नाचे जे नजराणे करितात तेथून नजराण्यांस सुरवात होत असून पुढें नायकांना तसलेच नजराणे ते करितात असें दृष्टीस पडतें; आणि त्याचप्रमाणें मुख्यत्वेंकरून अन्नाचे बळी भूतें आणि देव यांस दिलेले आढळून येतात; उदाहरणार्थ, चीनदेशांत पुष्कळप्रकारचीं पक्कान्नें तयार करून तीं पूर्वजाच्या नांवानें कोरलेले दगड, देवभूत माणसें, आणि मोठाल्या देवता ह्यांना अर्पण करितात. त्याचप्रमाणें मृतांच्या आत्म्यांस मान देण्यास त्यांच्या थडग्यांस जाऊन भेटतात, देवळांत हजर आहेत म्हणून कल्पिलेल्या देवतांच्या पूजनार्थ देवळांतून जातात,

शास्त्याच्या दरबारांत राजनिष्ठा प्रदर्शित करण्याकरितां जातात, आणि अनधिकृत लोकांकडे सन्मानार्थ जातात. प्रारंभीं ज्यांचा अर्थ आपण जिंकले गेलों असें दर्शविण्याचा असे अशीं वन्दनें राजे व श्रेष्ठ यांना करितात, देवतांनाहि करितात; कांहीं मृताच्या सन्मानार्थ करितात, आणि शेवटीं बरोबरीचे लोक तीं एकमेकांस करूं लागतात. संबोधनप्रकारांचा उद्देश कधीं बोलणाराची नम्रता दर्शविण्याचा, व कधीं संबोधिताचा मोठेपणा दर्शविण्याचा असून, ते पुढें दृश्य व अदृश्य दोन्ही प्रकारच्या शास्त्यांस लावूं लागतात; आणि पुढें कमी अधिकाराच्या पुरुषांस लावावयास लागून शेवटीं सामान्य पुरुषांसहि लावूं लागतात. तद्वतच जनकत्व व श्रेष्ठत्व यांचा आरोप करणाऱ्या पदव्या राजे, देव आणि मृत पुरुष यांस प्रथम लावीत असून, शेवटीं त्या सन्मानार्थ सामान्य माणसांसहि लावूं लागतात. राजेलोक जसलीं अधिकारचिन्हें धारण करितात, तसलींच देवताहि धारण करितात; कांहीं ठिकाणीं वरच्या व खालच्या राजांचे पोषाक वगैरे सारखे असतात, आणि पुढें ते पोषाक उत्सवाच्या वेळीं खालच्या दर्जाचे लोक घालूं लागतात. एतद्विषयक आणखीहि विलक्षण साम्यें दृष्टीस पडतात. एक, अभ्यंगस्नानाच्या संबंधाचें होय; ईजिप्तदेशांत प्रथम राजे व देवांच्या मूर्ती ह्यांना तें घालीत असून, मागून मृत व पाव्हणे ह्यांसहि घालूं लागले. तेथेंच जननदिनविधि सामाजिक, राजकीय व धार्मिकदृष्टिच्याहि करीत असत. म्हणजे राजे व अनधिकृत लोक ह्यांचे वाढदिवस करीत असून दे-

वांचेहि जन्मोत्सव करीत. नांवाच्या पवित्रपणाचाहि येथें उल्लेख केलाच पाहिजे. पुष्कळ देशांत देवाचें नांव घेण्याची मनाई असे किंवा आहे; कांहीं ठिकाणीं राजाचें नांव घेण्याची मनाई आहे; इतरत्र मृत माणसाचें नांव घेणें हा अपराध समजतात; आणि कांहीं रानटी लोक जिवंताचें नांवहि वृथा घेत नाहींत. पूजा करण्यास व मान देण्यास योग्य असतील अशांच्या देखत कोणावर हात टाकणें बरोबर नाहीं हा जो मनोविकार त्याच्यापासून असेच कांहीं प्रतिबंध उत्पन्न होतात. देवळांत कोणावर जबरी करूं नये एवढेंच समजतात असें नाहीं, तर कांहीं ठिकाणीं नायकाच्या थडग्याजवळहि तसें करूं नये असें समजतात; आणि कांहीं ठिकाणीं राजाच्या समक्षहि तसें करीत नाहींत. उदाहरणार्थ, आबिसीनियामध्यें राजापुढें कोणास मारल्यास किंवा हात उगरावल्यास देहान्त शिक्षा होते. युरोपियन लोकांमध्येंहि एखाद्या बाईच्या देखत एकाद्याशीं मारामारी करणें गैर समजतात; ह्यावरून हे विधिनिषेध कसे पसरत जातात हें स्पष्ट दिसतें. धूप जाळण्याच्या संबंधानेंहि असेंच आहे. इजिप्शन व हीब्रूलोकांत तो देव व राजे ह्या दोघांपुढेंहि जाळीत असत. मेक्सिकोमध्यें देवापुढेंच धूप जाळीत असें नाहीं, तर सरदार व परराष्ट्रीय वकील ह्यांच्यापुढेंहि जाळीत. मध्ययुगामध्यें यूरोपांत सरदारांपुढें तो लावीत; ते देवळांत शिरले म्हणजे अमुक वेळां आपल्यापुढें धूपारती ओंवाळली पाहिजे अशी ते अपेक्षा करीत.

एवंच, हल्लीं जे विधी राजकीय, धार्मिक आणि सामाजिक म्हणून भिन्न भिन्न झालेले आहेत त्यांचा उगम

एकच आहे हें अनेक साम्यांवरून दृष्टीस पडतें; आणि विधिविषयक सरकार इतर सर्व सरकारांच्या अगोदर उत्पन्न होतें, ही जी क्लृप्ति तिचाहि ताळा पडतो; आणि, शिवाय, उत्क्रमणाच्या सामान्य नियमांबरहुकूम त्या सरकाराला तीन विभिन्नरूपें प्राप्त होऊन तीं प्रत्येकीं ज्यास्त ज्यास्त विविधस्वरूप कशीं होत जातात, हेंहि लक्षांत येतें.

८७. विधिविषयक प्रकारांची जेते व जित ह्या संबंधापासून सहजगत्या उत्पत्ति होते हें सत्य, आणि समाजाचा युद्धशील नमुना वृद्धिंगत होत जाईल तसे ते वृद्धिंगत होत जातात हें त्यावरून निष्पन्न होणारें दुसरें सत्य, हीं धन्यानें मारिलें असतां जमिनीवर उताणें पडून धन्याचा हात चाटूं लागणाऱ्या कुत्र्याच्या उदाहरणापासून तीं सारखीं दृष्टीस पडत जातात. ह्या दुसऱ्या सत्याचें ज्याअर्थीं एथें पुनः कथन केलें आहे, त्याअर्थीं त्याचें एथें एका अन्यस्वरूपीं निरूपण करूं. म्हणजे, विधिप्रकार आणि युद्धशीलता ह्यांजमधील संबंध, त्यांचा कडकपणा, निश्चितपणा, विस्तार आणि वाढ, ह्या सर्व बाबतींत कसा दृष्टीस पडतो, हें लक्षांत आणूं या.

फीजीबेटांत एकाद्या नायकास त्याचा एकादा माणूस त्याच्यासमक्ष पुरता लवलेला न दिसल्यास तो लागलाच त्याचा शिरच्छेद करितो; आणि कोणीं अपमानास्पद किंवा अडाणीपणाचें वर्तन केल्यास त्याच्या हाताचीं कांहीं बोटें तोडितात; म्हणून पुष्कळ पुरुषबायकांच्या ठिकाणीं हें व्यंग दृष्टीस पडतें. स्वेच्छाचारी सत्ता जितकी अधिक कडक तितके विधीहि ज्यास्त क-

डक हा संबंध आफ्रिकेमध्येंहि दिसून येतो. उदाहरणार्थ, युगांडामध्यें स्पीकनें राजाला नजर केलेली बंदूक चालवून पाहण्यास एका नोकरास हुकूम केला असतां त्यानें ती दरवाज्यांत जाऊन दूरसा जो पहिला माणूस दृष्टीस पडला त्याजवर बेलाशक झाडिली; तद्वतच तेथें जो हपीसर योग्यरीतीनें सलाम करणार नाहीं त्यास फांशीं देतात. एशियामध्येंहि ह्याचीं उदाहरणें आहेतच. उदाहरणार्थ, सयाममध्यें सर्व तरुणांस शिपाईगिरी करणें भाग असून, राजवाडयावरून जातांना योग्य सन्मानचिन्हें कोणीं न दर्शविल्यास त्यास कडक शिक्षा होते; आणि सामान्य व्यवहारामध्यें देखील जो कोणी एकाद्यास योग्य वंदन करणार नाहीं त्यास त्यानें बेलाशक ठोकावें अशी वहिवाट आहे.

विधिविषयक नियंत्रण ह्याप्रमाणें जेथें फार कडक असेल तेथें ते फार निश्चितहि असतें. उदाहरणार्थ, फीजीबेटांत वंदनाचे अनेक प्रकार असून तें वंदन करणारांच्या दर्जाप्रमाणें ठरलेले आहेत; आणि वंदनें ठराविकरीतीनें झालींच पाहिजेत ह्याबद्दल फार खबरदारी घेतात; आणि तसें न झाल्यास शिक्षा कडक होत असल्यामुळें सहजच ठराविक तऱ्हा कोणी सहसा मोडीत नाहीं. आफ्रिकेमध्यें जुलमी सत्ता असलेल्या राज्यांमध्यें हीच गोष्ट दृष्टीस पडते; उदाहरणार्थ, लोआंगोमध्यें राजाला त्याच्या मुलानें मद्यपान करतांना पाहिलें म्हणून त्यास राजानें फांसावर चढवून त्याचे चार तुकडे करविले. एशियाखंडांतहि असेंच आहे. उदाहरणार्थ, सयाममध्यें राजाच्या भेटीस कोणी

गेला म्हणजे त्यानें (राजानें) किती शब्द बोलावयाचे ते अगदीं मोजून ठेविलेले आहेत. चीनदेशांतहि बादशहाच्या दरबार भरविण्याच्या दिवाणखान्यांत दगडावर पितळेचे लहान लहान पत्रे बसविलेले असून कोठें कोणत्या दर्जाच्या माणसानें बसावयाचें किंवा वांकावयाचें हें त्या पत्र्यांवर चिनीभाषेंत लिहिलेलें आहे, जपानमध्यें जरा मान खालीं करण्यापासून तों साष्टांगप्रणिपात करण्यापर्यंतचे वंदनप्रकार अगदीं क्रमवार ठरलेले आहेत. यूरोपांतील अत्यन्त स्वेच्छाचारी राज्यकारभार असलेला जो रशिया तेथेंहि ह्या गोष्टीचें उदाहरण सांपडतेंच. कारण कस्टिन असें म्हणतो कीं १८३९ सालीं एका राजघराण्यांतील विवाहसमारंभाचे समयीं निकोलस बादशहा आपल्या मुलांच्या किंवा धर्माधिकाऱ्यांच्या उठण्याबसण्यांत ज्या चुका होतील त्या सुधारण्यासाठीं इकडून तिकडे सारखा हिंडत होता, आणि सर्व बड्या अधिकाऱ्यांचें वर्तन त्याच्या हुकुमांप्रमाणें तंतोतंत होत होतें.

आतां विधिनियंत्रणाचा आवांका आणि विस्तार ह्यांच्या संबंधानेंहि पाहतां, पौर्वात्य स्वेच्छाचारी राज्यांतून त्याचीं ठळक उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, लुबीर म्हणतो कीं कांहीं सयामी लोक एकत्र बसले असतां जर एकादा नवा सयामी तेथें आला तर त्या सर्वांच्या बैठकी एकदम बदलतात. कोणापुढें किती वांकावयाचें, किंवा उभें रहावयाचें, किंवा बसावयाचें; तद्वतच हात जोडावयाचे किंवा नाहीं, आणि ते उंच धरावयाचे किंवा सखल धरावयाचे; आणि बसलें असतां एक पाय पुढें

करावयाचा किंवा दोन करावयाचे, किंवा दोन्ही मागेंच ठेवावयाचे, हें त्यांस पूर्ण माहीत असतें. राजाला देखील असलींच बंधनें पाळावीं लागतात. त्यानें केव्हां उठावें, केव्हां स्नान करावें, दानें कशीं करावीं व कशाचीं करावीं, सरदार व राजपुत्र यांच्या भेटी केव्हां घ्याव्या, राज्यकारभार कितीवेळ करावा व अभ्यास कितीवेळ करावा, मधले फराळ कितीवेळ करावे, व राणीच्या आणि राजवाड्यांतील इतर स्त्रियांच्या भेटी केव्हां घ्याव्या, हें सर्व त्यांच्या धर्मग्रंथांत लिहिलेलें आढळतें. आणि ब्रह्मीलोकांबद्दल साइम असें म्हणतो कीं, त्यांच्यांत पदवीक्रम मोठ्या कडकरीतीनें कायम राखितात; तो इतका कीं त्यांचीं घरें, घरांतील सामान, घोड्याचें सामान, ह्या सर्वांच्या आकारावरून आणि किमतीवरून, मालक कोणत्या दर्जाचा आहे हें नक्की समजतें. चीनदेशांत देखील "लिकी" किंवा विधिग्रंथ याजमध्यें, सर्व जीवितव्यवहाराच्या संबंधानें नियम घालून दिलेले आहेत. जपानांतहि प्राचीनकाळीं फांशीं कसें द्यावें एथपर्यंत सर्व गोष्टींबद्दल अगदीं बारीकरीतीनें नियम घालून दिलेले असत.

हे संबंध आवश्यक आहेत ह्या गोष्टीची समजूत पडण्यास आपण हें ध्यानांत आणावें कीं युद्धशीलतेमुळें सामाजिकसमूहांचें जसें संयोगीकरण व पुनःसंयोगीकरण होत जाईल तसें अंकितपणा व्यक्त करणाऱ्या विधींचें उत्क्रमण होत गेलेंच पाहिजे; ते विधी नियंत्रण बरोबर व्हावें एतदर्थ कडक झालेच पाहिजेत, पदव्यांमध्यें क्रम व वैविध्य उत्पन्न झाल्यामुळें अनेक झाले

पाहिजेत, आणि शिक्षेच्या भीतीनें ते सारखे पाळीत राहिल्यामुळें निश्चितस्वरूपहि झाले पाहिजेत.

८८. उद्यमशीलता प्रबल होत जाईल तसे विधी दुर्बल कसे होत जातात हें लक्षांत आणीत असतांच, विधिनियंत्रणाची वृद्धि आणि क्षय ह्यांबरोबर जे नैतिक विशेष उत्पन्न होत असतात ते सांगणें सोईवार दिसतें. म्हणून त्या उद्योगास आतां लागूं.

हें आपल्या नजरेस आलेंच आहे कीं विधीची उत्पत्ति भीतीपासून होतेः म्हणजे, एका बाजूस जेत्याचें किंवा धन्याचें वर्चस्व असतें, आणि दुसऱ्या बाजूस जिताला किंवा गुलामाला जीव जाण्याची किंवा इतर शिक्षेची भीति असते. आणि अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या जबरीच्या सहक्रियेच्या राज्यांत भीतीमुळें संतर्पणाचे सर्व प्रकार वृद्धिंगत होतात, व कायम राहतात. पण स्वेच्छेच्या सहक्रियेच्या आधारावर रचलेला समाजनमुना जसा उत्पन्न होत जाईल तशी भीति कमी होत जाते; कारण अशा समयीं गौण शास्ता किंवा अधिकारी याचें जीवित त्याच्या वरिष्ठाच्या पूर्णपणेंच कह्यांत असत नाहीं. व्यापाऱ्याला पूर्वीप्रमाणें सरदार मला लुटील किंवा पिडील ही भीति नसल्यामुळें, त्यानें त्याचे पैसे न दिल्यास तो त्याजवर फिर्याद करूं शकतो; रोजमुरा घेऊन काम करणाऱ्या मजुरास गुलामाप्रमाणें ठोकतां येत नाहीं. म्हणून, पूर्वीं ठराव करून एकमेकांचीं कामें करण्याची पद्धति जशी पसरत जाते आणि जबरीनें कामें करण्याची पद्धति जशी आकुंचित होत जाते, तशीं माणसें एकमेकांस पूर्वींइतकीं भीत नाहींशीं होतात; आणि

म्हणून संतर्पकविधी पूर्वींच्या इतके काळजीपूर्वक पाळीत नाहींसे होतात.

लढाईमुळें अवश्यच लुच्चेगिरीस उत्तेजन मिळतें; छपून बसणें, छापा घालणें, भलतीच हूल दाखविणें, ह्या सर्व कृतिरूप लबाड्याच होत; आणि ह्या गोष्टी चतुराईनें करणें हा एक लढवय्याच्या विलक्षण बुद्धिमत्तेचा विशेष समजला जातो. लढाईत विजय झाला म्हणजे ज्या गुलामागिरीची स्थापना होते तिच्यांत रोजच्या दुटप्पी वर्तनाचा किंवा फसवणुकीचा अंतर्भाव होत असतो. आपला क्रूर धनी आपल्यावर रागावूं नये एतदर्थ त्याला पक्कें ठकविणें हेंच गुलामाचें मुख्य शस्त्र असतें. जुलमी राजे पिळून पैसे काढणारे असले म्हणजे त्यांस हुशारीनें ठकविणें हेंच त्याच्या जुलमांतून बचावण्याचें साधन आणि अभिमानाचें कारण असतें. आणि जबरीच्या सहक्रियेच्या अमदानींत जे जे विधी होत असतात ते सर्व अप्रामाणिकपणानें भरलेले असतात: म्हणजे, अशावेळीं ज्या भरपूर प्रशंसा करीत असतात त्यांजवर त्या करणाराचा भरंवसा मुळींच नसतो; तो आपल्या वरिष्ठाबद्दल जें प्रेम दाखवीत असतो तें त्यास मनांतून मुळींच वाटत नसतें; आणि तो म्हणतो तशी त्याच्या कल्याणाबद्दल त्यास मुळींच काळजी नसते. पण जबरीच्या सहक्रियेबद्दल स्वेच्छेची सहक्रिया येत जाते, तसे शिक्षा चुकविण्याच्या हेतूनें खोटें बोलण्याचे मोह कमी बळकट व कमी वारंवार होत जातात; आणि त्याबरोबरच सत्यवादित्वाला उत्तेजन मिळत जातें; कारण परस्परांवरील विश्वास वाढत जाईल तशीच सहक्रिया वाढत

जाऊं शकते. उद्यमशीलतेच्या सर्व चळवळींमध्यें जरी अद्यापि युद्धशीलतेच्या वेळचें बरेंच असत्यवादित्व कायम असते; तथापि ह्या चळवळी चालू राहण्यास केलेले ठराव दररोज पाळावे लागतात ही गोष्ट ध्यानांत ठेवतां, करूं म्हटलेले लोक बहुधा करीत असतात असें उघड होतें. आणि अशा रीतीनें सत्यवादित्व पसरत चाललें असतां, संतर्पक विधींमध्यें अंतर्भूत झालेलें जें असत्यवादित्व त्याच्याबद्दल लोकांच्या मनांत द्वेष उत्पन्न होऊं लागतो. म्हणजे, शब्द किंवा कृति ह्यांमध्यें खऱ्या मनोवृत्तींपेक्षां बाणा केलेल्या मनोवृत्ती पूर्वींइतक्या फार ज्यास्त दिसत नाहींत.

आतां सामाजिक सहक्रिया जशी कमी जबरीची व अधिक स्वेच्छेची होत जाते, तसें स्वातंत्र्य वाढतें हें सांगण्याची जरूरी नाहीं; कारण हीं दोन्ही विधानें एकाच विधानाचीं भिन्नरूपें आहेत. जबरीची नोकरी म्हटली म्हणजे तिच्यांत परावलंब आलाच; आणि करार करून नोकरी करणें म्हटलें म्हणजे त्याच्यांत स्वतंत्रता अंतर्भूत होते. सहजच, ह्या दोहोंमध्यें अंतर्भूत होणारे जे भिन्न भिन्न नैतिक मनोभाव त्यांच्यायोगानें जसे कमजास्त जुलमी व कमजास्त स्वैच्छिक असे भिन्न भिन्न समाजनमुने उत्पन्न होतात, तसेंच भिन्न भिन्न विधिनियंत्रणहि त्यांपासून उत्पन्न होतें. एका स्थितींत अंकितपणाच्या निशाण्या सन्मान्य वाटतात, आणि अंकितपणादर्शक क्रिया करण्यांत आनंद वाटतो; दुसऱ्या स्थितींत ह्या निशाण्यांबद्दल तिटकारा येऊं लागतो, आणि अगदीं नम्रतेचे असले पूज्यतादर्शक विधिप्रकार करण्याचा कं-

टाळा उत्पन्न होतो. म्हणजे, स्वातंत्र्यप्रीति आणि सत्यप्रीति ह्यांच्यामुळें, जेथें अंकितपणा मनापासून वाटत नसेल, तेथें तो वंदनें आणि प्रशंसा ह्यांच्या रूपानें प्रकट करण्याचा तिटकारा उत्पन्न होतो.

लढाईचें शिक्षण म्हणजे दुसऱ्याचा जीव घेण्याच्या कामाचें शिक्षण असल्यामुळें तें मनाचा घट्टपणा उत्पन्न करितें. त्याच्यायोगानें मनांत ज्या सहानुभूती असतील त्या जळून जातात, आणि ज्या वाढण्यासारख्या असतील त्या खुरटतात. लढाईमुळें ही जी असहानुभूतिरूप मनःस्थिति उत्पन्न होते ती त्यापासून उत्पन्न होणाऱ्या जुलमी सामाजिक सहक्रियेमुळें कायम राहते. गुलामाचा धन्याशीं जो अंकितपणा असतो तो त्याच्यावर काम करण्याबद्दल जरूर त्या जबरीचा उपयोग करून कायम राखिला जात असल्यामुळें, तशी जबरी करण्यास सहानुभूति दाबून टाकावी लागत असते. अंकितपणादर्शक विधी केलेच पाहिजेत असें म्हणतांनाहि ती दाबावीच लागत असते. अगदीं नम्रपणाचीं वंदनें करून घेण्यामध्यें आनंद पावणें म्हणजे दुसऱ्याच्या मानापमानाबद्दल सहानुभूति न वाटणें असेंच होय; म्हणून समाजनमुना जसा अधिक स्वतंत्र होत जाईल, आणि त्याबरोबर सहानुभूति वाढत जाईल, तसा कनिष्ठांनीं अत्यंत दीनवाण्या रीतीनें आपला अंकितपणा व्यक्त करावा ही गोष्ट श्रेष्ठांस आवडत नाहींशी होते. ह्यामलेट ऑसरिकला टोपी काढतांना पाहून म्हणतो, तिचा योग्य उपयोग कर; ह्यावरून शेक्सपियरच्या वेळीं दुसऱ्यानें आपल्यापुढें फाजील लीनता दाखवावी हें कोणास आ-

वडत नाहींसें झालें होतें असें दिसतें. आणि उद्यमशील नमुना वृद्धिंगत होत जाईल तसा हा मनोभाव वाढत जाऊन, तेणेंकरून ठळकरीतीनें अंकितपणा दर्शविणारे एकंदर विधी नकोसे वाटूं लागतात.

एवंच, अनेक तऱ्हांनीं, युद्धशील नमुन्यास अनुरूप असा जो नैतिकस्वभाव तो विधींना उत्तेजक असतो; आणि उद्यमशील नमुन्यास स्वाभाविक असा जो नैतिकस्वभाव तो त्यांना प्रतिकूल असतो.

८९. आतां पुढें विधींचें काय होणार आहे ह्यासंबंधाचे आमचे विचार निखालसपणें सांगण्यापूर्वीं एथें आणखी एक गोष्ट सांगणें जरूर दिसतें; ती ही कीं, विधिनियंत्रणें युद्धशीलता प्रबल असेल तेव्हांच्या समाजनमुन्यांनाच योग्य असतात असें नाहीं, तर तेणेंकरून माणसें त्याच्याहून उच्च अशा सामाजिक जीवितास योग्य होत असतात.

नेहमीं लढाई होत असतां माणसांमध्यें शत्रुत्वरूपी व समाजविरुद्ध असे मनोविकार सहजच प्रबल असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं शत्रुत्व उत्पन्न करणारे व समाजसुस्थितता मोडूं पाहणारे असे शब्द व कृति ह्यांचा उपयोग करण्याकडे जोराची मनःप्रवृत्ति वरचेवर उत्पन्न होत असते. म्हणून त्यांनीं अमुक रीतीनें वागावें असे नियम असणें जरूरीचें असतें; कारण ते नियम पाळिल्यानें तंटयाचा संभव कमी होतो. म्हणून ज्या मानानें मनुष्यस्वभाव आपस्वार्थी आणि तापट असेल त्या मानानें विधिनियंत्रण ज्यास्त कडक असावें लागतें.

ही गोष्ट केवळ विचारावरूनच सिद्ध होते असें

नाहीं, तर अनुभवावरून देखील खरी ठरते. उदाहरणार्थ, आज पुष्कळ शतकेंपावेतों कडक जुलमी राज्यपद्धति, कडक जातिनिर्बंध, क्रूर कायदे, आणि कडक व विस्तृत असें विधिनियंत्रण ह्यांखालीं वाढलेले जे जपानी लोक त्यांचा स्वभाव रंडेल साहेबाच्या म्हणण्याप्रमाणें जरी गर्विष्ठ, सूड उगविणारा, व दुर्वर्तनाकडे प्रवृत्त असा आहे, तरी ते लोक इतरांशीं फारच गोड रीतीनें वागतात. उदाहरणार्थ, कॉर्नवॉलिस असें म्हणतो कीं, गोडा व कधीं प्रक्षुब्ध न होणारा स्वभाव जपानी स्त्रियांत सर्वत्र दृष्टीस पडतो; आणि ड्रमंड साहेब असें म्हणतो कीं, त्यांच्यामध्यें अवर्णनीय असें एकप्रकारचें स्वाभाविक वर्तनसौष्टव असतें. जुलमी राज्यपद्धति आणि विधिनियंत्रण दोन्ही मोठ्या प्रमाणावर असलेला जो रशिया देश तेथेंहि ह्याचें उदाहरण सांपडतेंच. कस्टिन म्हणतो–" भीतीच्या योगानें माणसें जशीं गंभीर होतात तशींच तीं अत्यंत सभ्यहि होतात. एथें (रशियामध्यें) सर्व वर्गांचे लोक एकमेकांस जितक्या मानानें वागवितात तितक्या मानानें इतरत्र कोठेंच वागवितांना माझ्या दृष्टीस पडले नाहींत." इतालियनलोकदेखील पुष्कळ दिवस जुलमी राज्यपद्धतीखालीं असल्यामुळें, आणि दुसऱ्याच्या सूड घेण्याच्या मनोवृत्ती चिथविल्यास त्यांस स्वतःचा जीव जाण्याची भीति असल्यामुळें, ते नेहमीं दुसऱ्याची तब्यत जाणार नाहीं अशा रीतीनें वागत असतात. स्पेनमध्येंहि सरकारी सत्ता अनियंत्रित असून, स्त्रियांस निर्दयपणें वागवीत असून, आणि मजूरलोक सशस्त्र असून, लोक अत्यंत सभ्य

आहेत. उलटपक्षीं, इंग्लिशलोक आज पुष्कळ दिवस बऱ्याच स्वतंत्रसंस्थांखालीं रहात असल्यामुळें त्यांच्यांत गोड्या वर्तनाची वाण दिसते, आणि बारीकसारीक गोष्टींत सभ्यता दाखविण्याकडे ते बरेंच दुर्लक्ष करितात.

एवंच अनुमान व अनुभव ह्या दोन्हींवरून असें दिसतें कीं, ज्यांचे स्वभाव बऱ्याच अंशीं असामाजिक असतील त्यांच्यांत सामाजिक सहक्रियेस उत्तेजन देण्याचें विधिनियंत्रण हें एक साधन आहे.

९०. आणि ह्यावरून आपण ह्या सामान्य सत्याप्रत येऊन पोहोंचतों कीं, विधिविषयक आणि त्यांपासूनच उत्पन्न होणारीं जीं राजकीय व धार्मिक पुरुषकृत नियमनें त्यांमधील प्रत्येकामध्यें एक विशेषप्रकारचें अपौरुष नियमन उत्पन्न होतें, आणि अखेरीस तें स्वतंत्र बनतें.

राजकीय सरकाराचा मूळ उद्देश अंकितपणा उत्पन्न करणें हा असतो, आणि तें दुसऱ्यांस इजा करणारांस जें शिक्षा करितें तें त्या करणारांचीं कृत्यें स्वरूपतःच वाईट आहेत म्हणून करीत नाहीं, तर ते आपल्या कृतींनीं राजाची आज्ञा मोडितात म्हणून होय. पण असें होतां होतां लोकांमध्यें अशी ज्ञानवत्ता उत्पन्न होते कीं हे जे सरकारी हुकूम त्यांना राजाची खुषी एवढाच आधार नसून त्यांची वास्तविक उपयुक्तता हाहि दुसरा एक आधार आहे. अशा एकवेळचे स्वैच्छिक, लहरी, आणि बहुधा मूर्खपणाचे असे जे राजाचे हुकूम त्यांस ठराविक अशा कायदेकानूंचें स्वरूप येतें, आणि त्या कायद्यांत एकमेकांच्या हक्कांपासून माणसांच्या कृतींस उत्पन्न झालेल्या ज्या मर्यादा त्या गोंवून दिलेल्या असतात. आणि

ह्या मर्यादा लोक अधिक अधिक ओळखूं लागून पाळूं-हि लागतात, आणि तसें करतांना राजाच्या हुकुमांचा विचार मनांत आणीत नाहींत इतकेंच नाहीं, तर पार्लमेंतानें केलेल्या कायद्यांमध्यें निरूपिलेल्या हुकुमांचाहि विचार ते मनांत आणीत नाहींत. त्याबरोबरच, ज्या कर्तव्यांस आपण धार्मिक असें म्हणतों तीं एकाद्या मूळ पुरुषाच्या भुताच्या काल्पनिक इच्छांवरून उत्पन्न होत असतात; कारण त्या इच्छांस कधीं कधीं मोठ्या माणसाच्या मोठ्या भुताच्या फार दिवसांपासून चालत आलेल्या हुकुमांचें स्वरूप येऊन त्या दैविक आज्ञा बनत असतात. ह्या आज्ञा प्रथम बहुतेक सर्वांशीं स्वर्गस्थ राजाप्रत अंकितपणादर्शक कृत्यांबद्दलच्या असून मागाहून त्यांजपासून आपण ज्यांस नैतिक नियम असें म्हणतों ते उत्पन्न होतात. समाज जसा वृद्धिंगत होत जातो तसें ह्या नैतिक नियमांस अशा प्रकारचें स्वरूप येतें कीं त्यांमध्यें स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि समाजाच्या कल्याणार्थ जरूर असें जें वर्तन तद्विषयक नियम गोंवून दिले जातात. हे नैतिक नियम पुष्कळ काळपावेतों तत्वतः राजकीय अशा नियमांपासून पूर्ण रीतीनें भिन्न होत नसून, अखेरपर्यंत त्या नियमांप्रत आपला दुजोरा देत असतात; आणि प्रारंभीं दैविक म्हणून कल्पिले गेल्यामुळेंच पवित्र असे मानिले जात असून, अखेरीस लेखी कायदा मनुष्यवर्तनाच्या ज्या भागांचें नियंत्रण करूं शकत नाहीं त्यांचें नियमन करण्याच्या कामीं ते उपयोगी पडतात ह्या मुद्यावर ते पवित्र गणिले जाऊं लागतात. इकडे, विधिनियंत्रणाच्या ज्या भागापासून

सामाजिक दळणवळणाचे नियम उत्क्रान्त झाले आहेत त्यांतून तिसऱ्या प्रकारचीं निबंधनें उत्पन्न होतात; आणि तींहि अखेरीस अशाच रीतीनें स्वतंत्र बनतात. जे विधी, मूलस्वरूपीं, कांहीं अंशीं वरिष्ठाप्रत अंकितपणा, आणि कांहीं अंशीं ममता, प्रदर्शित करीत असतात, आणि जे खालच्या खालच्या वर्गांच्यासंबंधानें पाळले जाऊं लागल्यामुळें वर्तनाचे सामान्यप्रकार बनतात, त्यांपासून सरतेशेवटीं इतरांचा योग्य मान ठेवण्याचे आणि त्यांच्या कल्याणाबद्दल खरी सहानुभूति दाखविण्याचे विधी उत्पन्न होतात. ज्या विधींचा मूळ उद्देश एकाद्या प्रबल माणसास प्रसन्न ठेवण्याचाच केवळ असतो, त्यांपैकीं कांहींस सभ्यतेच्या नियमांचें स्वरूप येतें. आणि त्यांस प्रारंभींच्या आधाराहून भिन्न असा आधार उत्पन्न होतो. चिनीलोकांचा "विधिस्मारक" म्हणून जो ग्रंथ आहे तो याचें उत्तम उदाहरण होय; कारण त्यामध्यें व्यवहारांतील सर्व कृत्यांबद्दल नियम दिलेले आहेत. त्यामध्यें समाजांत एकमेकांबद्दल सहनशीलता व सहानुभूति कशी दाखवावी यासंबंधानें जागजागीं खरोखरच उत्कृष्ट दिग्दर्शन केलेलें आहे. सामाजिक उत्क्रमण जितकें जितकें ज्यास्त उच्च होत जाईल तितकें विधिनियमनाचें हें आंतील अंग ज्यास्त वाढत जातें, आणि बाहेरचें औपचारिक अंग क्षीण होत जातें. सहानुभूतिजन्य स्वाभाविक सभ्यतेचीं तत्त्वें, विधिविषयक बाडापासून जशीं भिन्न होत जातात, तसा त्यांला त्या बाडापेक्षां उच्चतर आधार सांपडूं लागतो, आणि तीं बाडांती-

ल अनावश्यक भाग टाकून देऊं लागतात, आणि आवश्यक भाग आणखी वाढवूं लागतात.

एवंच, कायदा जसा व्यक्तिकृत आज्ञांपासून भिन्नस्वरूप होत जातो, आणि नीति धर्मविषयक आज्ञांपासून भिन्न होत जाते, तसा सभ्याचार हा विधिपालनापासून भिन्न होतो. आणि तद्वतच, सयुक्तिक प्रचार हा केवळ शिष्टानुकरणापासून भिन्न होत जातो.

९१. विधिसंस्थांची आतांपर्यंतची हकीकत अशा प्रकारची असल्यामुळें त्यांच्या भावि स्थितीबद्दल संशय रहात नाहीं. स्वैच्छिक-सहाक्रियेच्या तत्त्वावर सामाजिक नमुन्याची जशी आणखी वाढ होत जाईल, तशीं वन्दनें, अभिनन्दनपर संबोधनप्रकार, पदव्या, पट्टे, इत्यादि हल्लींपेक्षांहि कमी होत जातील. सारांश, अंकितपणादर्शक कृती त्या करणारांस व करवून घेणारांस दोघांसहि ज्यास्त ज्यास्त नकोशा होत जातील.

आतां हा फेरबदल हळूहळूच होत जाईल व तसाच तो झालाहि पाहिजे हें उघडच आहे. माणसें ज्या प्रमाणानें स्वनियंत्रित होत जातील त्याहून ज्यास्त प्रमाणानें राजकीय स्वातंत्र्य त्यांस प्राप्त झाल्यास जशी सामाजिक अव्यवस्थितता उत्पन्न होते,—ज्याप्रमाणें नैतिक निंबधनें बळकट होण्यापूर्वीं धार्मिक निंबधनें काढून टाकिल्यास, दुर्वर्तनाची वृद्धि होते; तद्वतच, खरा सभ्यपणा उत्पन्न करणारे मनोविकार वृद्धिंगत होण्यापूर्वीं सामाजिक व्यवहाराचें नियमन करणारे विधी सैलावल्यास कमजास्त असभ्यपणा उत्पन्न होऊन तेणेंकरून भांडणें होण्याचा संभव उत्पन्न होतो. साहेब म्हणतात, आमच्यांती-

ल खाणींतून कोळसा काढणारे, विटा बनवणारे, वगैरे लोक आपल्या धन्यांशीं वगैरे सरासरी बेपर्वाईनें कसे वागतात हें पाहिलें म्हणजे, विधिविषयक नियंत्रण अवेळीं क्षीण झाल्यास कुपरिणाम कसे होतात हें लक्षांत येतें.

ज्या उच्चतम स्थितींत माणसांच्या एकमेकांसंबंधाच्या मोठ्या कृतींप्रमाणें लहानहि कृती, बाह्यनियंत्रण अनावश्यक होईल इतक्या अंतर्नियंत्रणानें निबद्ध होतील, अशा स्थितीप्रत प्रगति होण्यास दोन गोष्टी ज्यास्त ज्यास्त प्रमाणावर उत्पन्न होत गेल्या पाहिजेत. म्हणजे, मनोभाव उच्चतर झाले पाहिजेत, आणि बुद्धिहि उच्चतर झाली पाहिजे. इतरांबद्दल ज्यास्त सहानुभूति सर्वत्र उत्पन्न झाली पाहिजे, आणि आपले एकंदर शब्द व कृती इतरांच्या मनःस्थितीवर काय परिणाम उत्पन्न करितील हें ताबडतोब लक्षांत येईल इतकी अकलेची वाढ झाली पाहिजे; म्हणजे, दुसऱ्याच्या तोंडावरील प्रत्येक मुद्रा आणि बोलण्याचा सूर ह्यांवरून त्याच्या मनामध्यें सध्यां कोणता मनोविकार जागृत झाला आहे, आणि आपल्या आतांच्याच कृतींनें त्यांत कोणता फेरबदल उत्पन्न झाला आहे, हें चटकन् समजण्याइतकी माणसाची अक्कल वाढली पाहिजे.

धर्मविषयक संस्था

प्रकरण पहिलें

धर्मविषयक कल्पना

१. कोणत्याहि रचनेच्या व्यापाराच्या संबंधानें खरी भावना झाल्याविना त्या रचनेची खरी भावना होणें नाहीं. एकादी घटना कशी उत्पन्न झाली व वृद्धिंगत झाली हें समजण्यास तिच्या योगानें प्रारंभीं व मागाहून कोणती गरज भागूं लागली हें लक्षांत आलें पाहिजे. म्हणून धर्मविषयक संस्थांचें उत्क्रमण बरोबर रीतीनें उमगून काढण्यास, त्या संस्थांमध्यें निविष्ट झालेल्या कल्पना व मनोभाव कोठून आले हें आपणास समजलें पाहिजे. म्हणजे, ह्या कल्पना व भावना स्वयंभू आहेत, किंवा कशापासून तरी उत्पन्न झालेल्या आहेत, हें आपल्यास समजलें पाहिजे.

मनुष्य हा स्वभावघटनेनेंच धार्मिक प्राणी आहे असें केवळ एकंदर धर्मवाद्यांचेंच मत आहे असें नाहीं, तर कांहीं युक्तिवाद्यांचेंहि आहे. उदाहरणार्थ, मोक्षमूलरच्या एतद्विषयक विचारांत ही गृहीत गोष्ट ओतप्रोत भरून गेलेली आहे; आणि म्याकेसाहेबाच्या " बुद्धिविषयक प्रगति " वगैरेसारख्या ग्रंथांतून असें प्रतिपादिलेलें आहे कीं, मनुष्य हा स्वभावतःच एकेश्वरवादी आहे.

पण हें मत पूर्वी एकाकालीं जरी बहुतेक सर्वसंमत असें होतें, तरी आत्मशास्त्रज्ञ आणि मानवशास्त्रज्ञ यांनीं ज्या गोष्टी उजेडांत आणिल्या आहेत तेणेंकरून तें अगदीं डळमळून गेलें आहे.

ज्यांच्या मनांना बाळपणापासून इंद्रियवैगुण्यामुळें मोठ्या माणसांच्या मनांशीं दळणवळण घडलेलें नाहीं ते लोक धर्मविषयक कल्पनाविहीन असतात अशाबद्दल स्पष्ट पुरावा सांपडतो. बहिरा डाक्टर किटो आपल्या "नष्ट ज्ञानेंद्रियें" ह्या ग्रंथांत एका अमेरिकन बाईच्यासंबंधानें असें सांगतो कीं, ती मुकी व बहिरी असून मोठ्या वयामध्यें तिला लिहिणें वाचणें शिकविलें. तेव्हां ती असें सांगत असे कीं, जगाचा कोणी निर्माता असला पाहिजे ही कल्पना आपल्या डोक्यांत कधींच आली नव्हती, किंवा आपल्या वयाच्या दुसऱ्या कोणत्याहि इतर हुशार विद्यार्थ्यांच्या डोक्यांत आली नव्हती. तद्वतच, असल्या लोकांशीं ज्याचा अठ्ठावीस वर्षें बहुधा रोजचा संबंध येत असे, तो रेव्हरंड सॅम्युएल स्मिथ बहिऱ्यामुक्यांच्या संबंधानें असें म्हणतो कीं, त्यांला आपण (आपला आत्मा) अमर आहों किंवा जगाचा कोणी कर्ता आहे ही कल्पना शिक्षणाखेरीज मुळींच प्राप्त होत नाहीं.

ह्यावरून गर्भित अर्थ असा निघतो कीं सुधारलेल्या माणसांमध्यें धर्मविषयक कल्पना बनविण्याच्या संबंधाचा स्वाभाविक कल मुळींच नसतो; आणि अनेक ठिकाणच्या रानटी लोकांमध्यें धर्मविषयक कल्पना मुळींच नसतात ह्या गोष्टीवरून ह्या गर्भितार्थास दुजोरा सांप-

डतो. सर जॉन लबक ह्यानें आपल्या " पुराणयुग " आणि " सुधारणेचा उद्गम " या ग्रंथांत ह्या सत्याबद्दल अनेक पुरावे दिले आहेत. उदाहरणांर्थ, तुरुंगांत असतांना शिक्षण मिळालेल्या वेड्डा जातीच्या एका माणसाबद्दल हार्टशोर्न असें म्हणतो कीं, त्याला आत्मा, किंवा परमेश्वर, किंवा परलोक ह्यांबद्दल कांहींएक कल्पना नव्हती. डारे नामक एका आफ्रिकन जातीबद्दल ह्युग्लिन असें म्हणतो कीं, वास्तविक धर्मविषयक कल्पना त्यांना मुळींच नाहीं, पण ते भुतांवर मात्र विश्वास ठेवितात. स्विनफर्थ आपणास असें सांगतो कीं बांगोलोकांना अमरत्वाची मुळींच कल्पना नाहीं; धर्म ह्या शब्दानें आपल्या मनाला जो काय बोध होतो, त्याअर्थी धर्म हा त्यांस अगदींच अपरिचित आहे. आतां हें खरें आहे कीं अशा ठिकाणीं, मृतांमध्यें कांहीं तरी स्वभावोत्तर असतें अशी स्पष्ट किंवा अस्पष्ट कल्पना असते. रानटी लोक कधीं कधीं मृत्यूनें पूर्ण नष्टता येते असें म्हणत असून, कधीं कधीं जेथें मृत असतील त्या ठिकाणांबद्दल फार भीति दर्शवितात. ह्यावरून, निजलेल्या माणसाप्रमाणें मृत एकदम उठेल अशी अर्धवट कल्पना किंवा दुय्यमाबद्दलची कांहीं अंधुक कल्पना त्यांच्यामध्यें उत्पन्न झालेली असते असें दिसतें. पण ही तरी कल्पना सर्वत्रच असते असें नाहीं. नाईल नदीवरील लाटूकी नामक टोळीच्या कोमोरो नामक एका माणसाशीं सर सॅम्युएल बेकर याचा जो संवाद झाला त्यावरून हें स्पष्ट दिसतें. त्यावरून त्यास मरणानंतर अस्तित्व असतें ही गोष्ट कबूल नव्हती, व त्याचा वाईट किंवा

चांगल्या भुतांवर विश्वास नव्हता, असें दिसतें. तो माणसास झाडाची उपमा देऊन म्हणतोः—" बीं पेरिलें म्हणजे तें कांहीं वर येत नाहीं, तें मृत माणसाप्रमाणें कुजतें, व त्याची कारकीर्द संपते. वर जें फळ येतें तें जें बी आपण पेरिलें तें नसतें, तर त्यापासून उत्पन्न झालेलें असतें. तशीच माणसाची गोष्ट आहे. मी मरतों, आणि कुजतों, आणि माझी कारकीर्द संपते; पण बीजापासून उत्पन्न होणाऱ्या फलाप्रमाणें माझीं मुलें मोठीं होतात. कांहीं माणसांस मुलें नसतात, आणि कांहीं बीजांस फळें न येतां तीं मरतात; नंतर सर्वांची कारकीर्द संपते."

ह्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं धार्मिक कल्पनांचा उगम निसर्गोत्तर असतो असें जें म्हणतात तें बरोबर नाहीं; आणि त्यावरून गर्भितार्थ असा निघतो कीं, त्यांचा उगम नैसर्गिकच आहे. तर मग त्या कशा उत्पन्न होतात?

२. ह्या शास्त्राच्या पहिल्या भागांत प्राथमिक माणसाच्या एकंदर कल्पना, आणि विशेषतः निसर्गोत्तर किंवा दैविक भूतांचे स्वभाव व कृती ह्यांजबद्दलच्या त्याच्या कल्पना, ह्यांचा विचार सरासरी वीस प्रकरणांमध्यें केला आहे. त्यांमध्यें प्रतिपादिलेलें मत एथें पुनः थोडक्यांत सांगणें इष्ट दिसतें.

तसें करण्याच्या अगोदर आस्ट्रेलियनलोकांबद्दल ब्रौस्मिथ नामक ग्रंथकार काय म्हणतो तें पाहूं. जेव्हां पारधी किंवा मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध असलेला एकादा आस्ट्रेलियन माणूस पुरितात, तेव्हां त्याच्या थडग्या-

च्या बाजूस बसून किंवा उभा राहून त्यांच्यांतील वैदू मृताची स्तुति करितो, व तो काय जबाब देतो त्याची वाट पाहून असें म्हणतोः—“ मृतमाणसानें असें वचन दिलें होतें कीं त्याच्या खुनाबद्दल योग्य सूड उगविल्यास त्याचें पिशाच टोळीचा पिच्छा पुरविणार नाहीं, किंवा तिजमध्यें आजार उत्पन्न करणार नाहीं, किंवा रात्रीचा मोठा गोंगाट करणार नाहीं.” एकाद्या धर्मसमजुतीचीं मुख्य अंगें काय असतात तीं ह्या ठिकाणीं आपल्यास चांगल्या रीतीनें दिसून येतात. तीं हींः—ज्यास आपण निसर्गोत्तर भूत किंवा सत्त्व म्हणतों त्याचे ठिकाणीं विश्वास; त्या सत्त्वाची प्रशंसा, व ती तें ऐकितें अशी कल्पना; त्याचे हुकूम मानिल्यास तें आपल्या दैविक सामर्थ्याचा त्रासदायक उपयोग करणार नाहीं असें वचन देतें.

असल्या प्रकारच्या बीजांपासून पक्क अशा धर्माचें उत्क्रमण होऊं शकेल असें उघड उघड दिसत नाहीं काय ? जपानीलोक असें म्हणतात कीं, मृतांचे आत्मे अदृश्यलोकीं अस्तित्वांत राहतात, तो लोक आपल्या सभोंवतीं सर्वत्र पसरलेला आहे, आणि ते आत्मे निरनिराळ्या दर्जाचे व सामर्थ्याचे देव बनतात. शिवाय ते असें म्हणतात कीं, जे देव पीडा करणारे आहेत त्यांचें सांत्वन करावें लागतें, असें कीं त्यांना ज्यांनीं क्रुद्ध केलें असेल त्यांस त्यांनीं शिक्षा करूं नये; आणि सर्व देवांची पूजा करावी लागते, असें कीं त्यांनीं आपल्यावर ज्यास्त ज्यास्त मेहरबानगी करावी. ह्या जपानी लोकांच्या समजावरून असें दिसतें कीं, हे सुखकर व पीडा-

कर देव मृतांच्या निरनिराळ्या दर्जांच्या आत्म्यांपासूनच उत्पन्न झाले असावे. ग्रीकलोकांतहि देव, उपदेव आणि वीर असे तीन निसर्गोत्तर सत्त्वांचे वर्ग असून त्यांची पूजा केली पाहिजे असा समज प्लेटोच्या ग्रंथावरून व्यक्त होतो. या निरनिराळ्या ठिकाणच्या व निरनिराळ्या काळच्या लोकांच्या सदृशसमजुतींवरून पिशाचसंतर्पण हेंच सर्वधर्मांचें मूळ आहे असें अनुमान करण्यास बराच आधार सांपडतो.

ह्या अनुमानास पाहिजे तिकडे पुरावा सांपडतो. परवांपर्यंत ऐतिहासिक कालाच्या पूर्वी मनुष्य अस्तित्वांत असल्याबद्दलचा कांहीं पुरावा सांपडत नाहीं असें समजत असत, तथापि हल्लीं त्या गोष्टीकडे लक्ष गेल्यामुळें त्या काळच्या माणसाचीं हत्यारें व आऊतें सर्वत्र सांपडूं लागलीं आहेत. तद्वतच, एकंदर धर्म पिशाचपूजेपासून उत्पन्न झालेले आहेत ह्या क्लृप्तीस आधारभूत पुरावे सर्व जातींत व सर्व देशांत हल्लीं सांपडतात. प्रवासवर्णनात्मक प्रत्येक नव्या ग्रंथामध्यें ह्याबद्दल ताजा पुरावा आढळतो; आणि जुन्या लोकांचे इतिहास बारीकरीतीनें धुंडाळून पाहतांहि पुष्कळ पुरावे सांपडतात.

म्हणून धर्मविषयक समजुतींच्या उत्पत्तीचीं जीं मुख्य मुख्य कारणें व पायऱ्या आहेत त्याबद्दलचीं उदाहरणें एथें देण्याचा विचार केला आहे; व तीं पहिल्या भागांत दिलेल्या उदाहरणांच्या नंतर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतून घेतलेलीं आहेत.

२. पहिल्या कलमांत ज्या लाटुकी टोळींतील माणसाच्या धर्मविषयक समजुतींस उल्लेख केला आहे तो

कॉमोरो नामक माणूस, झोंपेंत माणसास आपण भटकतोंसें वाटतें तें कसें, असें त्यास विचारतां म्हणाला कीं तें मला समजत नाहीं. पण जे रानटी लोक ह्या माणसापेक्षां इतरांनीं लावलेल्या उपपत्त्या मान्य करण्यास ज्यास्त तत्पर असतात, ते असें समजतात कीं झोंपेंतील भटकणें काल्पनिक नसून वास्तविकच असतें. ह्याचें उदाहरण झुलूलोक होत. त्यांच्यापैकीं एकजण बिशप कॅलॅवे यास असें म्हणाला कीं, "एकादा मृतमाणूस जेव्हां स्वप्नांत येतो तेव्हां तो सर्प किंवा छाया यांच्या स्वरूपानें येत नाहीं; तर तो स्वतःच्याच शरीरानें येतो, (जणूकाय तो मेलेलाच नाहीं), आणि आपल्या टोळींतील माणसांशीं बोलतो; आणि तो जागा होऊन पाहीतोंपर्यंत तो मृतमाणूस आहे हें त्याच्या लक्षांत येत नाहीं; मग तो असें म्हणतो, अरे! अमुक अमुक गृहस्थ अद्यापि जिवंतच आहे असें मला वाटलें! पण त्याची छायाच आतां मजकडे आली होती!" त्याप्रमाणेंच आण्डामानीलोक माणसाची पडछाया हा एक त्याचा आत्माच आहे असें मानीत असून, त्यांचा समज असा आहे कीं स्वप्नांमध्यें आत्मा नाकपुड्यांतून बाहेर पडून झोंपीं गेलेल्या माणसास दृग्गोचर होतो, किंवा त्यास भासणाऱ्या दुसऱ्या गोष्टी करितो.

मूर्च्छेचीं जीं विलक्षण स्वरूपें आहेत तीं भटकणारा दुय्यम ह्याहून ज्यास्त वेळ कुडीपासून पृथक् राहिल्यामुळें उत्पन्न होतात असें लोक समजतात; मग ही मूर्च्छा स्वाभाविकरीत्या उत्पन्न झालेली असो, किंवा कृत्रिमरीत्या उत्पन्न झालेली असो. उदाहरणार्थ, मान्टेन

असें म्हणतो कीं माणसांचे आत्मे जेव्हां निद्रा किंवा कांहीं दैविक अत्यानंदाची स्थिति, यांच्या योगानें शरीरापासून स्वतंत्र होतात, तेव्हां शरीरांत असतांना ज्या गोष्टी त्यांस दिसत नसतात त्या दिसूं लागतात, आणि मग ते पुढील भविष्यें सांगतात. हल्लीं देखील ग्वायनामधील वॉरा नामक इंदियन लोक जादूटोणा करण्याचें सामर्थ्य आपल्यास यावें म्हणून तंबाकूचा अर्क पितात; आणि मरणासारखी जी त्यांची त्यामुळें अवस्था होते त्या अवस्थेंत त्यांचे आत्मे त्यांचें शरीर सोडून बाहेर पडतात, आणि मग त्यांस दिव्यशक्ति प्राप्त होते, असें ते समजतात.

झोंपेमध्यें दुय्यमाचें सामान्य प्रकारचें बाहेर जाणें, आणि मूर्च्छा, भोंवळ, इत्यादिकांमध्यें विलक्षण प्रकारचें बाहेर जाणें, ह्याच्या पुढची पायरी मृत्यु येतो तेव्हां अमर्यादकालपर्यंत बाहेर जाणें ही होय; त्यावेळीं कांहीं-वेळ वाट पाहून तो परत येईल ही आशा लोक सोडून देतात. तथापि, त्यांचा समज असा असतो कीं त्या माणसाचा दुय्यम जरी परत येण्याबद्दलच्या विनंत्या ऐकत नाहीं, तरी तो केव्हां केव्हां परत येत असतो, किंवा शेवटीं परत येईल. सामान्यतःलोकांची समजूत अशी असते कीं आत्मा शरीराच्या आसपास रेंगाळत असतो, किंवा त्यांत पुनः शिरतो; उदाहरणार्थ, झोक्कॉइस लोक किंवा चिनूक लोक. ते असें म्हणत असतात कीं मृतमाणसें रात्रीचीं जागीं असून खाद्यासाठीं फिरत असतात.

माणसाचा आत्मा किंवा दुय्यम द्रव्यमय असतो ह्या समजुतीचा एक परिणाम असा होतो कीं तो माणूस

जिवंत असतां त्याच्या ज्या वासना असत त्या त्याच्या मरणोत्तर तृप्त करण्याची इच्छा त्याच्या आप्तांत उत्पन्न होते. म्हणून आण्डामानीलोकांत मृतमुलाची आई त्याच्या थडग्यानजीक एका शिंपेंत आपलें थोडेंसें दूध पिळून ठेविते; चिपिवाज् वगैरे लोक मृतास खाद्य व बळी समर्पितात ते ह्याचमुळें; चिनूक वगैरे लोक मृताच्या प्रेतानजीक सर्व जरूरीचीं हत्यारें नेऊन ठेवितात त्याचें बीज हेंच होय; वॅरालोक थडग्यापाशीं पुष्कळ आठवडे-पावेतों विस्तव ठेवितात तो ह्याचसाठीं; मध्यआफ्रिकेंत अद्यापि उरुआ वगैरे ठिकाणीं नायकाबरोबर त्याच्या बायका व गुलाम यांस जाळितात तें ह्याच मुद्यावर. सारांश, जिवंत माणसाप्रमाणेंच मृताला मनोविकार व संवेदना होत असतात अशा समजुतीवर असुधारलेले व अर्धवट सुधारलेले लोक जे प्रेतविधी करतांना सर्वत्र दृष्टीस पडतात त्यांचें कारण हेंच होय. प्रारंभीं हा समज अगदीं अक्षरशः पूर्ण असतो; उदाहरणार्थ, झुलू-लोक असें म्हणतात कीं आमच्या वडिलांचे आत्मे येऊन आह्मीं ठेविलेलं अन्न खाऊन टाकितात. पण दुसरे कांहीं लोक पिशाच हें वरच्या इतकें द्रव्यमय मानीत नसल्यामुळें असें समजतात कीं, भुतें हीं पदार्थांच्या केवळ सत्त्वानें तृप्त होतात. म्हणून निकाराग्वामधील लोक मृतास जाळण्यापूर्वी त्याच्या अंगास अन्न बांधीत असत, आणि हाटलोक मृतास पाताळलोकीं जातांना थंडी लागूं नये म्हणून त्याच्याबरोबर कांबळीं जाळीत असत.

मृताच्या दुय्यमास हे बळी बहुधा प्रेतविधीचे समयीं देत असून, कांहीं ठिकाणीं विशेष प्रसंगीं, आणि कांहीं

ठिकाणीं नियमितकाळानें, पुनः पुनः देत असतात; कारण मृताची योग्य काळजी न घेतल्यास अनर्थ ओढवण्याचा संभव असतो. अनेक जातींचे लोक मृतांकडे वरचेवर खाद्य, पेय, इत्यादि घेऊन जात असतात; उदाहरणार्थ, गोंडलोक सन्मान्य माणसाच्या थडग्यांशीं तो मेल्यावर खाद्य वगैरे कित्येक वर्षेंपर्यंत वर्षांतून एकदां नेऊन ठेवितात. क्यालिफोर्नियांतील, उाकिया, सानेळ वगैरे लोक मृताच्या आवडत्या ठिकाणीं अन्न पेरितात. झुलू वगैरे लोकांत अशी समजूत आहे कीं, भुतांसाठीं जेथें खाद्य तयार होत असेल तेथें तीं येतात.

मृतांच्या ह्या दुय्यमांच्या वसतिस्थानांबद्दल अनेक लोकांमध्यें अनेक कल्पना दृष्टीस पडतात. पांढऱ्या नाईलवरील शिलॉक वगैरे लोक असें समजतात कीं, मृत हे जिवंत लोकांमध्येंच रेंगाळत राहतात, व त्यांच्या तैनातींत असतात. सांताळ वगैरे लोक असें समजतात कीं, आपल्या पूर्वजांचीं भुतें शेजारच्या रानांत वास करितात. उत्तरअमेरिकेंतील सोनारा व मोहावे लोकांमध्यें भुतें डोंगर व खडक ह्यांवर राहतात असें समजतात. दुय्यम व त्याचें वसतिस्थान हीं दोन्ही द्रव्यमय असल्या-बद्दलच्या ज्या ह्या कल्पना त्यांबरोबरच त्याच्या कृतीहि एथल्यासारख्याच मूर्त असतात असें समजतात. उदाहरणार्थ, चिब्चा लोक असें समजत कीं, परलोकीं प्रत्येक राष्ट्राचें विशेष वसतिस्थान आहे, व तेथें ते लोक आपली जमीन नांगरून राहतात. एवंच इहलोकींचें जी-

वित व परलोकींचें जीवित हीं बहुतेकांशीं सारखींच आहेत अशी समजूत सर्वत्र दृष्टीस पडते.

थडग्यावरील दगडांच्या ज्या राशींवर मृतासाठीं अन्न ठेवीत असतात त्यांस हळूहळू ह्या अन्नदानानेंच वेद्यांचें स्वरूप येतें. ह्या वेद्यांवर कांहीं लोक आच्छादन करितात. उदाहरणार्थ, मॅस्किटोलोक थडग्यावर एक ओबडधोबड झोंपडी उभारून तींत खाद्य, पेय, वगैरे नेऊन ठेवितात. आफ्रिकेंतील वाकाहुटूलोक असेंच करितात. बोर्निओमध्येंहि असेंच आहे, व ग्रीकलोकांतहि ही गोष्ट दिसून येई. मुसलमानलोक एकेश्वरवादी असूनहि त्यांच्यातहि असेंच आहे. उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें साधूचें थडगें म्हणजे पवित्रस्थान समजतात, व रस्त्यानें जाणारे लोक तेथें प्रार्थना करण्यासाठीं थांबतात.

पिशाचपूजेच्या वृद्धीच्या निरनिराळ्या अंगांचीं निरनिराळीं उदाहरणें आतांपर्यंत दिलीं; आतां त्या सर्व अंगांचीं एकत्र उदाहरणें द्यावयास डफ म्याकडोनाल्ड नामक पाद्र्याच्या " आफ्रिकाना " नामक ग्रंथांतून पुढील उतारे घेऊं. " मृतमाणसास त्याच्या घरांतहि पुरितात....अशा रीतीनें त्याचें घर हें एक देऊळच बनतें....मृतमाणूस आतां पिशाचलोकीं जातो व त्याची अर्चा होऊं लागून त्यास बळी मिळूं लागतात....आतां तो देव बनून त्यास त्यांचें रक्षण करण्याचें, त्यांस साहाय्य करण्याचें, व त्यांचें बरें--वाईट करण्याचें सामर्थ्य येतें... त्यांचा देव त्यांस स्वप्नांत दिसूं लागतो तो त्यांस जिवंतपणीं होता तसाच दिसतो....त्या लोकांचे देव त्यांच्यांतील मेलेल्या माणसांइतकेच पुष्कळ असतात...

प्रत्येक माणूस सहजच आपल्या मृत आप्तांची पूजा करूं लागतो....नाईक आपल्या पूर्वीच्या नायकासच हवि देतो, व म्हणतो, बापा, तुझे सर्व आप्त मला माहीत नाहींत; तुला माहीत आहेत; त्या सर्वांस आपल्याबरोबर जेवावयास बलाव...गतनायकाच्या ताब्यांत त्याला राहण्यासाठीं सगळा डोंगर असला तरी तो ढगांनीं झांकलेल्या उंच शिखरावर राहतो...जो नाईक मोठाल्या लढायांमध्यें विजयी झालेला असेल तो लवकर स्मृतींतून जात नाहीं. तो कदाचित् एकाद्या डोंगराचा किंवा सरोवराचा देव बनतो, आणि त्याचे वंशजांस त्या ठिकाणांहून हांकून लाविल्यानंतरहि तो तेथला स्थानिक देव म्हणून कधीं कधीं कायम राहतो. पावसासाठीं जेव्हां प्रार्थना करावयाची असेल तेव्हां शेजारचे लोक आपल्या पूर्वजांची न करितां डोंगरांतल्या देवाचीच करितात. ”

पिशाचकल्पनेचे जे ह्याहून ज्यास्त अपरोक्ष परिणाम त्यांजकडे आपण आतां दृष्टि फेंकूं. वास्तविक व त्यासारखें दिसणारें ह्यांमधील भेद रानट्यास स्पष्टपणें होत नसल्यामुळें त्यास असें वाटतें कीं एकाद्या वस्तूचे गुणधर्म तिच्या प्रतिमेमध्येंहि येत असतात. म्हणून मृतमाणसाची मूर्ति तयार करून थडग्यावर ठेविल्यास तिजमध्यें त्याचें पिशाच राहूं लागतें असें त्यास वाटतें; आणि नंतर हा समज इतरत्र ठेविलेल्या प्रतिमांच्या संबंधानेंहि उत्पन्न होऊं लागतो. उदाहरणार्थ, सेंट जॉन म्हणतो कीं, डायाकलोक शेताच्या रस्त्यावर एका नग्न स्त्रीपुरुषाची ओबडधोबड आकृति ठेवून तिच्यांत भूत वास करितें असें समजतात.

आणि ह्या समजुतीवरून पुष्कळ ठिकाणीं ह्या मूर्तींचें संतर्पण करितात. उदाहरणार्थ, न्यासा सरोवराच्या पश्चिम तीरावर राहणाऱ्या लोकांच्यासंबंधानें लिव्हिंग्स्टन असें म्हणतो कीं, ते ह्या मूर्तींपुढें अन्न, तंबाकू, भांग, वगैरे ठेवून शिवाय तंबाकू वगैरे ओढण्यासाठीं विस्तवहि नेऊन ठेवितात. त्या मूर्ती त्यांच्या मृत आईबापांच्या असतात, आणि त्यांस वरील पदार्थ अर्पिल्यानें ते (आईबाप) संतुष्ट होतात, असें ते समजतात..... ह्या मूर्तींस कधीं कधीं मृतनायकांचीं नांवें देतात. बास्टिअन असें सांगतो कीं, सेसलोनमधील एका नीग्रोबाईच्या घरीं चार मूर्ती होत्या, त्यांचीं तोंडें ती दररोज मका व खोबरेल तेल ह्यांनीं मढवीत असे; त्यांपैकीं एक मूर्ति तिची होती, एक तिच्या मृतनवऱ्याची होती, व दुसऱ्या दोन तिच्या दोन मुलांच्या होत्या. ह्या मूर्ति कधीं कधीं अगदींच ओबडधोबड असतात. उदाहरणार्थ, डमारालोकांच्या मूर्ति लांकडाच्या दोन तुकड्यांच्या बनविलेल्या असतात, व त्या घरच्या देवाच्या, किंवा देवभूत पितरांच्या म्हणून समजतात, आणि विशिष्ट प्रसंगीं त्या बाहेर काढितात. भिललोकांतील मूर्ति एका ओबडधोबड दगडाची बनविलेली असून तिच्या अंगाला ते तेल व शेंदूर फांशितात, आणि तीस ते प्रार्थनापूर्वक एकादें जनावर व कांहीं दारू अर्पण करितात.

मानवी आकाराशीं अल्पसादृश्य असलेल्या किंवा मुळींच सादृश्य नसलेल्या वस्तूंची पूजा करण्याचा “ वस्तुपूजा ” नामक जो धर्मप्रकार त्याप्रत माणसाचें संक्रमण कसें होतें तें ह्या ठिकाणीं आपल्या दृष्टीस पडतें.

पिशाचपूजेची वाढ आणि वस्तुपूजेची वाढ ह्यांमधील संबंध आफ्रिकेमधील एका टोळीच्या इतिहासावरून चांगला लक्षांत येतो. ते लोक वाहिवी हे होत. त्यांच्यासंबंधानें टाम्सन असें म्हणतो कीं, त्यांच्यामध्यें इतर सर्वत्र दिसणारी वस्तुपूजा मुळींच दिसत नाहीं; पण त्यांना आपल्या मृतआप्तांबद्दलहि कांहीं आदर वाटत नाहीं; कारण ते त्यांचीं प्रेतें जंगलांत फेंकून देतात, व तेथें त्यांस वन्यश्वापदें खाऊन टाकितात. मसाईलोकांमध्येंहि असेंच आहे, असें त्यानें नुक्तयाच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या वर्णनावरून व्यक्त होतें.

आपले पूर्वज मानवेतर प्राणी होते ही समजूत, व त्यावरून त्यांस मान देण्याची व त्यांची पूजा करण्याची पद्धति, हीं अनेक रीतींनीं उत्पन्न होतात. जे प्राणी स्मशानभूमीवर किंवा पिशाचानें घेतलेल्या म्हणून समजल्या जाणाऱ्या प्रदेशावर वरचेवर संचार करीत असतील ते प्राणी, व रात्रीचे उडणारे प्राणी, ह्यांचे आकार मृतमाणसांनीं धारण केले आहेत अशी समजूत उत्पन्न होण्याचा संभव फार असतो. उदाहरणार्थ, बांगोलोक वाघळें व घुबडें ह्यांस पिशाचें समजतात.

त्याचप्रमाणें भुतें वरचेवर आपल्या पाहिल्या घरीं येत असतात ह्या समजुतीवरून असा समज उत्पन्न होतो कीं, घरांतून आढळणारे सर्प हीं भुतेंच आहेत. ब्लांटायरच्या आसपासचे नीग्रोलोक असें समजतात कीं, एकाद्या मृतमाणसास आपल्या बायकोस भिवडावयाचें असल्यास तो सर्पाचें रूप घेऊन येतो; आणि एकाद्या पिशाचाचा सर्प जेव्हां एकादा माणूस मारितो तेव्हां तो

अशा रीतीनें क्रुद्ध झालेल्या देवाकडे जाऊन म्हणतो, देवा, माफ कर, माफ कर, तो सर्प तुझा होता हें मला माहीत नव्हतें. तद्वतच पुष्कळ इंडो यूरोपियनलोक सर्पांना गृहदेवता म्हणून समजत असत; आणि पोलंदच्या कांहीं भागांत एकप्रकारच्या काळ्या सर्पास दूध व अंडीं देत असत, आणि त्यास जरासा देखील धक्का लागल्यास अगदीं घाबरून जात. उत्तरअमेरिकेंत अन्यकारणांनीं उत्पन्न झालेले असलेच समज दृग्गोचर होतात. उदाहरणार्थ, अपाची लोक असें समजतात कीं, दुष्ट लोकांस मरणानंतर खुळखुळ्या हाडांच्या सापाचें स्वरूप येतें. नायारिट येथील लोक असें समजत कीं, दिवसां भुतें माशांच्या रूपानें खाद्य मिळविण्यासाठीं माणसांत येऊन मिसळतात.

भुतें मानवेतर प्राण्यांचे आकार धारण करितात हा समज अन्य ठिकाणीं नांवाचा भलताच अर्थ होऊन उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, जपानांतील ऐनोलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, एकाद्या माणसास आस्वलाची उपमा देणें म्हणजे त्याची अत्यन्त मोठी स्तुति करणें म्हणून ते समजतात. पुढें ह्या उपमेची रूपकामध्यें संक्रांति होते; म्हणजे एकाद्यास, "तूं आस्वलासारखा आहेस" असें म्हणण्याच्या ऐवजीं "तूं आस्वल आहेस" असें म्हणूं लागतात, आणि अशा रीतीनें प्राणिविषयक मनुष्य-नांवांची उत्पत्ति होते. शिवाय, आपल्यास असें आढळून येतें कीं, हे ऐनोलोक जरी आस्वलास मारितात, तरी ते त्याची पूजा करितात व म्हणतात कीं, हे आस्वला, लवकरच एकाद्या ऐनोमध्यें प्रवेश करून परत

ये." ह्यावरून एकाद्या प्राण्यास आपला पूर्वज समजून त्याचें संतर्पण करण्याची चाल रानटीलोकांत कशी उत्पन्न होते हें समजतें. प्राचीन कालच्या इंग्लंदांतदेखील ह्याचें उदाहरण सांपडतें. उदाहरणार्थ, तेथें त्या कालीं अशी एक दंतकथा होती कीं, नार्थम्ब्रियाचा जो अर्ल **सी**वार्ड त्याचा एक आजा नॉर्वेच्या अरण्यांत राहणारा आस्वल होता. आतां **सी**वार्ड हा उंच, धिप्पाड व शूर माणूस होता, आणि त्यामुळें त्यास आस्वलाची उपमा मिळून पुढें ही दंतकथा उत्पन्न झाली असावी. कांहीं ठिकाणीं मृतमाणसांनीं कांहीं प्राण्यांमध्यें प्रवेश केला आहे ह्या कल्पनेवर ते प्राणी पवित्र समजले जातात. उदाहरणार्थ, कांहीं डायाकलोक आपले मृतपूर्वज हरिण बनतात ह्या समजुतीवर हरणाचें मांस खात नाहींत. आणि एस्कीमो लोकांमध्यें मृताच्या आत्म्यानें कोणत्या प्राण्यामध्यें प्रवेश केला आहे हें उपाध्या त्याच्या आप्तांस स्मशानविधीचे वेळीं ओरडून सांगतो. एवंच प्राण्यांबद्दलची सन्मानबुद्धि व त्यांची पूजापद्धति अनेक रीतींनीं उत्पन्न होते; व त्या सर्वांचा गर्भितार्थ ते व माणसें एकच होत हा असतो.

एडिंबरो एथील बहिऱ्यामुक्याच्या शाळेंतील एका विद्यार्थ्याची शाळेंत येण्यापूर्वीं अशी समजूत असे कीं, तारे हे आकाशांत पेटविलेल्या चुलींसारखे आहेत. कांहीं उत्तरअमेरिकन लोक असें समजतात कीं, तारे हे मृतांनीं परलोकीं जात असतां वाटेंत पेटविलेले विस्तव आहेत, त्याची ह्यावरून आठवण होते; आणि तारे हीं माणसेंच आहेत अशी समजूत सहजगत्या क-

शी उत्पन्न होऊं शकेल हें त्यावरून ध्यानांत येतें. कारण एकाद्याचा शब्द ऐकून आपण जसें "तो अमुक अमुक आहे" असें म्हणतों, व त्याचा अर्थ तो अमक्या अमक्याचा शब्द आहे असा असतो, तद्वतच एकादा रानटी माणूस एकादा तारा अमक्या पूर्वजानें पेटविलेला विस्तव आहे असें समजून "तो तेथें आहे" असें आपल्या मुलांस त्या ताऱ्याकडे बोट दाखवून म्हणण्याचा संभव आहे; आणि तें त्याचें वाक्य ऐकून तो तारा पेटविलेला विस्तव आहे असें न समजतां तो तो पूर्वजच आहे अशी त्या मुलांची समजूत होण्याचा संभव आहे. म्हणून क्यालिफोर्नियनलोक असें समजतात कीं, जेथें पृथ्वी व आकाश हीं मिळतात तेथें तारे बनण्याकरितां भुतें जातात, आणि जे नाईक असतात ते फारच चकचकीत तारे बनतात. म्हणूनच मंगायनलोक विशिष्ट दोन ताऱ्यांबद्दल असें म्हणतात कीं, ते एका रागीट आईचे मुलगे होते, ती त्यांना नेहमीं शिव्या देत असे; म्हणून ते एका डोंगराच्या उंच टोंकावर गेले, आणि त्यांनीं आकाशांत उडी मारिली; तेथें त्यांचे आईबाप त्यांच्या मागून गेले, पण ते त्यांस अद्यापि सांपडले नाहींत. तारे व तारासमूह यांस माणसें व प्राणी ह्यांचीं नांवें अशाच रीतीनें प्राप्त झालेलीं आहेत.

रूपक व वास्तविक गोष्ट ह्यांचा घोंटाळा केल्यानें सवितृपूजेची उत्पत्ति झालेली आहे ह्याबद्दल पुरावा सांपडतो. एकाद्यास मोठेपणा देण्यासाठीं त्यास सूर्य म्हणण्याची चाल सर्वत्र आहे; आणि जेथें ही पदवी एकाद्या बलिष्ठ माणसास दिलेली असेल तेथें ती आनुवं-

शिक बनते. उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें असा एक शिलालेख सांपडतोः—" हे ईजिप्तच्या राजा, हे इतर लोकांच्या सूर्या, तुझें स्वागत असो." अशा ठिकाणीं पूर्वजाची पूजा ही सहजच सवितृपूजा बनते. आकाशांतील इतर देखाव्यांच्या संबंधानें असेंच झालेलें आहे. उदाहरणार्थ, जेसूप म्हणतो, बेरूटमधील शाळेंत " प्रातःसंध्या" (सकाळ), " गुलाबाची कळी", इत्यादि मुलींचीं नांवें मला आढळलीं. अशा रीतीनें सृष्टींतील चमत्कारांस पौरुष स्वरूप येतें. उदाहरणार्थ, बुशमेन लोकांत अशी दंतकथा आहे कीं वारा हा प्रथम पुरुष होता; नंतर तो पक्षी बनला, व चालण्याच्या ऐवजीं उडूं लागला, आणि डोंगरामधील विवरांत राहूं लागला. ह्यावरून केवळ पूर्वजच नव्हत, तर सृष्टिदेवता देखील विवरांतून उत्पन्न झाल्याबद्दलच्या ज्या कांहीं लोकांमधील दंतकथा त्यांची आठवण होते. उदाहरणार्थ, सूर्य व चंद्र अशा विवरांतून आल्याबद्दल मेक्सिकन लोकांत दंतकथा आहे. आणि वारा गुहेंत रहातो ही बुशमेनची कल्पना ग्रीकलोकांत होतीच. अशा प्रकारच्या गोष्टी गुहेंत वास करणाऱ्या लोकांच्या दंतकथांपासून उत्पन्न झालेल्या ह्या दृष्टीनें पाहिल्या म्हणजे स्वाभाविक दिसतात; एरवीं त्या अगदीं अडाणी लोकांत देखील कां उत्पन्न व्हाव्या हें लक्षांत येत नाहीं. एवंच सृष्टिपूजा हें पिशाचपूजेचेंच एक चुकीवरून उत्पन्न झालेलें स्वरूप आहे.

सर्व प्रकारचे देव माणसास देवाचें स्वरूप येऊन उत्पन्न होतात. प्रारंभीं देव हा श्रेष्ठ असा जिवंत माणू-

स असून त्याला दैविकशक्ति आहे असें समजत असतात. ह्याबद्दलचे हल्लींचे असुधारलेले लोक आणि पूर्वींचे सुधारलेले लोक ह्या दोघांमध्येंहि पुरावा सांपडतो. उदाहरणार्थ, सेलस म्हणतो कीं आमान्डेविलीलोक आपला नाईक जो ' सिद्वंगीसा ' त्यास मोठा प्रबल " उमलिमो " किंवा देव समजतात. ग्रीकलोकांत आकिलीस व लैकर्गस ह्यांस देव समजत हें प्रसिद्धच आहे. रोमनलोकांमध्येंहि बादशाहाची पूजा करूं लागले होते. त्यांच्या पुतळ्यांना त्यांच्या प्रतिमा समजून त्यांस ते धूप दाखवीत, नैवेद्य अर्पण करीत, आणि त्यांची प्रार्थना करीत. त्यावेळच्या इतर यूरोपियन राष्ट्रांमध्येंहि असल्याच कल्पना होत्या, व इंग्रजांचे पूर्वज जे नॉर्समेन त्यांजमध्येंहि होत्या.

एवंच प्राथमिक लोकांना श्रेष्ठ व देव एकच असें वाटत असल्यामुळें, आणि प्रारंभीं देव हा प्रबल असा जिवंत माणूस, किंवा पिशाचरूपानें दैविकशक्ति प्राप्त करून घेतलेला मृत माणूस असल्यामुळें, अर्धवट दैविक अशा सत्त्वांची उत्पत्ति दोन तऱ्हांनीं होते; जेती देवजात आणि जित मनुष्यजात ह्यांचा संयोग होणें ही एक तऱ्हा; आणि जिवंत माणसें व भुतें ह्यांच्यामध्यें दळणवळण आहे असें समजणें ही दुसरी तऱ्हा. स्वप्नांतील जीवित आणि जागेपणचें जीवित ह्यांमध्यें प्रथम भेद करीत नाहींत हें आपल्या नजरेस अगोदरच आलेलें आहे. ह्यावरून हामोआ बेटामध्यें अशी समजूत उत्पन्न झालेली आहे कीं, भुतें कधीं कधीं रात्रीं बायकांस त्रास देतात, आणि त्यामुळें त्या गर्भधारण करितात. डायाकलोकांमध्यें अशीच स-

मजूत आहे. बाबिलोयिन लोक पुरुषभुतें व स्त्रीभुतें मानीत असून त्यांची संतति पुरुष व स्त्री होते असें समजत.

एवंच धर्मविषयक समजुतीचें प्रत्येक मुख्य अंग पिशाच कल्पनेपासूनच सर्वत्र उत्पन्न झालेलें दिसतें. तें इतक्या भिन्न भिन्न नमुन्यांच्या जातींमध्यें दिसतें कीं तें जसें आर्तिकमहासागरांतील बेटांत आढळतें, तसेंच विषुववृत्तावरील प्रदेशांतहि आढळतें; उत्तरअमेरिकेंतील अरण्यांत जसें तें सांपडतें, तसेंच आरबस्थानच्या वाळूच्या मैदानांतहि सांपडतें; तें जसें हिमालयाच्या दऱ्यांतून आढळतें, तद्वतच आफ्रिकेच्या जंगलांतून आढळतें; तें जसें आण्डीस पर्वतावर सांपडतें, तसेंच पालिनिशियाच्या बेटांतहि सांपडतें. तें जसें सुधारलेल्या लोकांत दिसून येतें, तसेंच असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्येंहि दिसून येतें. एवंच धर्माची उत्पत्ति स्वाभाविकरीत्या झालेली आहे ह्याबद्दल आपल्यास विपुल पुरावा सांपडतो.

४. धर्मकल्पनेचें प्रत्येक मुख्य अंग सर्व धर्मांतून सारखेंच असल्याबद्दल मागें दिलेल्या पुराव्यास दुजोरा देण्यासाठीं हा जसा एथें आणखी पुरावा दिला, तसाच आतां ह्या पुराव्यास दुजोरा देण्यासाठीं एका विशिष्ट लोकांचा धर्म घेऊन त्यामध्यें हीं सर्व अंगें कशीं दिसतात तें पाहूं. ते लोक इजिप्शन होत.

स्वप्नांतील देखावे व मनुष्य खरे असतात असें जसें हे लोक समजत, तद्वतच छाया ह्या वस्तुच आहेत असेंहि सामान्यतः प्राथमिक लोकांप्रमाणें ते समजत असत. माणसाची छाया ही त्याच्या जीवाचा एक

महत्त्वाचा भाग ते मानीत असत, आणि " मृताच्या पुस्तकांत" छाया ही द्रव्यमय वस्तु आहे असें प्रतिपादिलेलें आहे.शिवाय माणसाच्या दुय्यमास त्यांच्यांत "का" असें नांव असून तो जिवंत असेल तोंपावेतों तो त्याच्यासमेवत जात असे; आणि क्यारेन लोक जसें आपल्या दुय्यमाचें सध्यां संतर्पण करितात, तसें इजिप्शन राजा आपल्या दुय्यमाचें करीत असलेला खोदिव चित्रांतून दिसून येतो. शरीराव्यतिरिक्त असलेल्या जीवास द्रव्यमय आकार व सत्त्व असे. आत्म्याचें स्वतंत्र शरीर असून त्यास खातां पितां येत असे. मरणानंतर आत्मा जरी शरीरास बद्ध केलेला असला तरी थडग्याबाहेर पडण्यास, आणि दिवस असेल तोंपावेतों वाटेल त्या आकारानें शरीराप्रत परत येण्यास, तो स्वतंत्र असे. " का " किंवा दुय्यम हा वासनायुक्त असल्यामुळें त्या त्याच्या वासना पूर्ण कराव्या लागत. सारांश, मरणोत्तर जीवित हें सरासरी मरणपूर्व जीवितासारखेंच ते समजत.

म्हणून ह्या दुय्यमांच्या क्षुधा-तृषा वगैरेची जशी तरतूद करीत तशी इतर वासनांचीहि करीत. उदाहरणार्थ, मिसिरिनस राजाच्या मुलीच्या थडग्यांत नेहमी धूप जळत असे. आणि रात्रीचा दिवा लावून ठेवीत. बहुधा मृताच्या प्रसिद्धपणें स्तुति करीत असत; आणि एका चांगल्या माणसानें ईजिप्त देशीं परत यावें एतदर्थ तो त्यास अशी लालूच दाखवितांना आढळतो कीं, " तुझ्या थडग्यापाशीं गरीब लोक येऊन रडतील; ते तुझी प्रार्थना करितील." अशा प्रकारचे बळी, स्तुति, व प्रार्थना, पिढ्यानुपिढ्या चालू राहिल्यामुळें त्या कायमच्या

पूजापद्धति बनून गेल्या; व त्या करणारे पुजारीहि उत्पन्न होऊन पिढीजाद बनले. हे पुजारी केवळ राजकुळांतील मृतमाणसांचीच पूजा करीत असें नाहीं, तर इतर मृतांचीहि करीत. आपल्या पुतळ्यांना नैवेद्य खात्रीनें मिळावे एतदर्थ मोठाले जमीनदार आपल्या गांवांतील पुजाऱ्याशीं कोणतें खाद्य व पेय अर्पण करावयाचें हें अगोदर ठरवून ठेवीत. अशा रीतीनें मृतपूजेपासून पुतळेपूजा, म्हणजे मूर्तिपूजा, उत्पन्न झाली.

प्राणिपूजाहि ह्याप्रमाणेंच मृतपूजेपासूनच उत्पन्न झाल्याबद्दलहि ईजिप्तमध्यें पुरावे सांपडतात. उदाहरणार्थ, तिसरा थोथ्मीस यास " आमनरा " हा देव, प्रथम, " तूं तरुण व पाणीदार वृषभासारखा आहेस " म्हणून म्हणतो, व मागाहून, ' वृषभ ' म्हणूनच संबोधितो. ह्याचा परिणाम अर्थातच मनुष्य व बैल एकच असें मानण्याकडे प्रवृत्ति हा होतो, आणि त्यामुळें प्राणिपूजेची उत्पत्ति होते. ह्यावरून दुसरी हीहि गोष्ट ध्यानांत येते कीं, इतर प्राण्यांशीं एकाद्या पराक्रमी माणसाची तुलना केल्यानें, एकच माणूस अनेक प्राण्यांचीं स्वरूपें धारण करूं शकतो अशी समजूत उत्पन्न होण्याचा संभव आहे.

अशाच रीतीनें रूपकांचा अर्थ शब्दशः घेतल्यानें आकाशस्थ ताऱ्यांची पूजा उत्पन्न होते. उदाहरणार्थ, सूर्य हा एक पुरुष आहे असें समजून त्याची पूजा सुरू झाली आहे. ईजिप्तच्या एका राजास सूर्यदेव म्हटलेलें आढळतें, आणि त्यावरून प्रत्यक्ष सूर्यच ईजिप्तचा शास्ता आहे असा समज उत्पन्न झालेला दिसतो.

पितृपूजेवरून हे सर्व समज उत्पन्न झालेले आहेत

असें जें वरच्या पुराव्यावरून स्पष्टपणें दिसून येतें तें ह्या गोष्टीवरून ज्यास्तच स्पष्ट होतें कीं एकापक्षीं देव ही पदवी जशी श्रेष्ठमाणसास लावलेली आढळते, तसे माणसाचे सर्व गुण देवांला लाविलेले आढळतात. उदाहरणार्थ, ईजिप्तच्या चित्रांकित लिपीमध्यें एकच चित्र संदर्भास अनुसरून देव, पूर्वज, किंवा मोठा माणूस ह्यांचें दर्शक बनतें.

"जगाच्या एका अर्ध्या भागांत काय चाललें आहे तें दुसऱ्या अर्ध्या भागास माहीत नसतें", अशी एक म्हण आहे; त्यप्रमाणेंच दुसरी एक अशी म्हण बनवतां येईल कीं, अर्ध्या जगाचे काय विचार आहेत, किंवा आपले स्वतःचेच एकाकाळीं काय होते, ते दुसऱ्या अर्ध्यास माहीत नसतात. पूर्वींच्या मानसिक स्थितींत जें परिचित असेल त्याचें नंतरच्या मानसिक स्थितींत विस्मरण पडतें. मोठ्या वयांत लहानपणचे आपले विचार व मनोविकार मनांत इतके अस्पष्ट होऊन जातात कीं, त्यांची कल्पना देखील करण्याची पंचाईत पडते. तद्वतच सुशिक्षित समाजांतील लोकांस अशिक्षित समाजांतील लोकांच्या कांहीं कल्पना अगदीं अविश्वसनीय वाटतात. मुलाचे जे मूर्खपणाचे समज पाहून आईबापें हंसूं लागतात ते जसे एका काळीं त्यांचेच स्वतःचे होते, तद्वतच, ज्या सुधारलेल्या लोकांस रानट्यांचे समज मूर्खपणाचे वाटतात, त्यांनाच असले समज असलेले पूर्वज एकाकाळीं खात्रीनें होते. जिच्यामध्यें स्वप्नांच्या मानीव वास्तविकत्वापासून भुतांची आणि सर्व प्रकारच्या निसर्गोत्तर सत्त्वांची मानीव वास्तविकता उत्पन्न झाली, अशी जी

मूळची विश्वविषयक कल्पना तिच्यांतच हळूहळू फेरबदल होऊन हल्लींची विश्वविषयक कल्पना उत्पन्न झालेली आहे.

५. **साहेब** म्हणतात, ह्या सामान्य नियमास एकादा अपवाद आहे कीं काय? निरनिराळ्या स्वरूपांचे व संकीर्णतेचे जे अनेक धर्म ह्या सामान्य उगमापासून निघालेले आहेत त्यांमध्यें निराळ्याच उगमापासून उत्पन्न झालेला एकच धर्म आहे असें आपण अनुमान काढावयाचें कीं काय? आपण असें म्हणावयाचें कीं काय कीं बाकीचे सर्व धर्म नैसर्गिक असून ज्या हीब्रूलोकांच्या धर्मांत फेरबदल होऊन ख्रिस्ती धर्म उत्पन्न झाला तो तेवढाच निसर्गोत्तर आहे?

ह्या प्रश्नाचें उत्तर काय द्यावें ह्याचा विचार करतांना ह्या मानलेल्या अपवादरूप धर्माची इतर धर्मांशीं तुलना केल्यास त्याचा उगम निराळा असेल इतका तो त्यांच्याहून निराळा दिसत नाहीं. उलटपक्षीं, त्याच्यांत व त्यांच्यांत विलक्षण सादृश्यें दृष्टीस पडतात. त्यांचा आतां विचार करूं.

पहिली गोष्ट ही कीं, ज्या भोळ्या समजुतींपासून हीब्रू धर्माची उत्क्रान्ति झाली त्या समजुती इतरत्र आढळून येणाऱ्या समजुतींसारख्याच स्वरूपतः होत्या. प्रारंभीं ते लोक भटकण्याच्या स्थितींत होते तेव्हां जरी आत्मा नित्यस्थायि आहे हा समज त्यांच्या ठिकाणीं पक्व झालेला नव्हता, तरी स्वप्नें व त्यांत दिसणारे प्राणी ह्यांच्या वास्तविकत्वाबद्दलचा समज त्यांच्यांत होता. पुढें त्यांच्यामध्यें मृतमाणसें ऐकतात व कधीं कधीं उत्तरें देतात असा समज उत्पन्न झालेला आढळू-

न येतो; ते मृतांचें संतर्पण शरीरावर घाव घेऊन आणि केंस काढून टाकून करीत असत; मृतांस अन्नदान करीत; मृतांचे आत्मे श्मशानांतून संचार करीत राहतात असें समजत; आणि भुतें माणसांत प्रवेश करून त्यांस आजारी करितात व त्यांच्याकरवीं पापें वडवितात असेंहि समजत. हल्लींच्या रानटी लोकांप्रमाणें हीब्रू लोकहि ताईत, दोरे, मंत्र, इत्यादिकांचे मोठे भोक्ते असून त्यांच्यामध्येंहि वैदूलोकांसारखें चेट्रक वगैरे करणारे लोक होते, त्यांस प्रारंभीं द्रष्टे हें नांव असून मागाहून भविष्यवादी असें नांव प्राप्त झालें; आणि त्यांस चुकलेलीं गाढवें कोठें सांपडतील हें सांगण्यासाठीं देखील पैसे देत असत. आणि **साम्युएल** जेव्हां पाऊस व विजांचा गडगडाट हीं येवोत म्हणून म्हणाला, तेव्हां जो हवेचा वैदू हल्लीं जगाच्या अनेक भागांत आढळून येतो, त्याच्याचसारखें तें त्याचें वर्तन होतें.

त्यांच्यामधील कांहीं दंतकथा इतर लोकांच्या दंतकथांसारख्याच होत्या. जलप्रलयाची त्यांची कथा आकॅलियनलोकांच्या तद्विषयक कथेसारखी असून हिंदूच्याहि कथेसारखीच होती. **मोझेसच्या** जन्माबद्दलची गोष्ट आसिरियनलोकांतील एका गोष्टीसारखीच आहे. पंचांगाच्या संबंधानेंहि ह्या दोन लोकांत सादृश्य दृष्टीस पडतें. हीब्रूलोकांप्रमाणेंच आसीरियनलोकांचे महिने चांद्र असत, आणि महिन्याचा सातवा, चवदावा, एकविसावा, व अठ्ठाविसावा दिवस हे प्रार्थनेचे दिवस असत. ह्या दिवशीं प्रार्थनेव्यतिरिक्त दुसरें कोणतेंहि काम करण्याची त्यांस मनाई असे; ती इतकी कीं, त्या दिव-

शीं कोणाला दयापूर्वक मदत करण्याचीहि त्यांस परवानगी नसे. म्हणजे, हे कायदे ज्यूलोकांच्या कायद्यांसारखेच असत.

त्यांच्या देवविषयक कल्पना अशाच परस्परसदृश होत्या. उदाहरणार्थ, ज्यूलोकांत " इलोहिम " या सदराखालीं प्रसिद्ध जिवंत पुरुष, सामान्यभुतें आणि श्रेष्ठभुतें किंवा देव येत असत. सारांश, इजिप्शन व इतर पुष्कळ लोकांप्रमाणें देव म्हणजे दृश्य किंवा अदृश्य एक शक्तिमान् सत्त्व इतकाच हीब्रू लोकांचा समज असे. ईजिप्शनलोकांच्या " नूटर " ह्या देववाचक शब्दाचा शक्ति दाखविण्याच्या अर्थानें जसा अनेक तऱ्हांनीं उपयोग केलेला आढळतो, तसा हीब्रूलोकांचा " एल " किंवा " इल " हा शब्द वीर, व ज्यूव्यतिरिक्त इतर लोकांचे देव यांना लावीत असत. ह्या कल्पनांपासून अनेक निसर्गोत्तर सत्त्वांचें संतर्पण व पूजा हीं उत्पन्न झालीं, म्हणजे, अनेकदेवरूपी धर्म उत्पन्न झाला. आब्राहाम हा गौण देव असून त्याची प्रार्थना करीत असत. जाहवेव्यतिरिक्त देवांवरील त्यांचा विश्वास पुष्कळ काळपर्यंत कायम होता हें सालोमन त्यास बळी देई ह्यावरून दिसतें. शिवाय जाहवे हा मोठा देव म्हणून मान्य झाल्यावर देखील त्यांची धर्मविषयक सामान्य कल्पना अनेकदेवरूपीच होती. कारण देव आणि देवी आपल्या भक्तांसाठीं हातांत तरवार व भाला घेऊन लढावयास जातात असें जसें इलियडांत सांगितलेलें आहे, तद्वतच हीब्रूधर्मांतील अनेक देवदूत, त्यांचे भक्त पृथ्वीवर लढावयास लागले म्हणजे, स्वर्गांत

लढतात असें ते समजत; आणि ह्या कल्पना हल्लींच्याहि कांहीं रानटी धर्मांतून आढळतात.

एवंच जाहवे हा प्रारंभीं अनेक देवांपैकीं एक होता, व पुढें तो श्रेष्ठ बनला, असें दिसतें. असो, आतां त्याचें स्वरूप कसें होतें हें पाहूं. एडेनच्या बागेंत देव माणसासारखा फिरत असे व बोलत असे असें सांगितलेलें आढळत असून शिवाय तो जेकबशीं कुस्ती लढला असेंहि सांगितलेलें आढळतें. शिवाय, बेडुईनलोकांमध्यें साधूंस बळी अर्पण्याच्या जागा जशा उंच असत तशा जाहवेला बळी अर्पण्याचीं स्थानें उंच असत. म्हणजे, प्रारंभीं तो एक श्रेष्ठ माणूसच होता. शिवाय, तो सर्वांचा देव नसून कांहीं विशिष्ट लोकांचा होता; कारण त्यास इस्रायललोकांचा देव म्हणून म्हटलेलें आहे. "माझ्याशिवाय तूं इतर देवांची पूजा करतां कामा नये", अशी जी त्याची आज्ञा आहे तिजवरूनहि तो अनेक देवांपैकींच एक होता असें ध्वनित होतें. शिवाय हीब्रूलोक त्याला "आमचा" देव म्हणून म्हणत त्याचाहि अर्थ तोच होतो. आणि त्याचा अंमल सर्वत्र आहे असें जरी म्हटलेलें आढळतें, तरी त्याबरोबरच ईजिप्शनलोकांच्या देवांबद्दल देखील तसेंच म्हटलेलें आढळतें; इतकेंच नव्हे तर त्या लोकांच्या एका राजाबद्दल देखील तसेंच म्हटलेलें आढळतें. शिवाय, जाहवे सर्वशक्तिमान् आहे असेंहि म्हटलेलें आढळत नाहीं; कारण मोझेसला स्वतः मारण्याचा त्याचा यत्न फुकट गेला म्हणून सांगितलेलें आहे. तद्वतच त्याचा नैतिक व बौद्धिक स्वभाव माणसासारखाच वर्णिलेला आ-

ढळतो. उदाहरणार्थ, त्यास कांहीं बातमी लागते; ती खरी आहे किंवा नाहीं हें पाहण्यास तो जातो; त्याला आपल्या कृत्याचा पस्तावा होतो. सारांश, ह्यावरून तो सर्वज्ञ होता असें कांहीं दिसत नाहीं. ईजिप्शन व आसीरियन राजाप्रमाणें तो सारखी आत्मप्रशंसा करितो; आणि मी आपली कीर्ति दुसऱ्यास देणार नाहीं असें म्हणून शिवाय आपण मत्सरी, सूड घेणारे, शत्रूंचे निर्घृण विध्वंसक आहों असेंही म्हणतो. झीअस जसा अघामेम्नानला फसविण्यासाठीं खोटें बोलणारें भूत पाठवितो, तसा तो एका राजाकडे त्यास फसविण्यास पाठवितो. माणसांना त्यास क्रूर कृत्यांबद्दल शिक्षा करतां यावी म्हणून तो त्यांचीं अंतःकरणें घट्ट करितो. सारांश, तो ग्रीकदेवांसारखेंच वर्तन करितो; कारण तेहि वाईट बुद्धि देत असून मागून सूड घेत असें सांगितलेलें आढळतें.

आतां पूजाप्रकारांकडे पाहतां असलींच सादृश्यें आढळून येतात. देवाला जे नैवेद्य दाखवीत त्यांस " देवाची भाकर " असें नांव असून ईजिप्शनलोकांच्या नैवेद्यांप्रमाणें त्यांत भाकर, मांस, चरबी, तेल, रक्त, पेय, फळें, इत्यादिकांचा समावेश होत असे. शिवाय, इतर पुष्कळ लोकांप्रमाणें ते देवळांत विस्तव नेहमीं जिवंत ठेवून धूपहि जाळीत असत. मूर्तींत राहणाऱ्या नीग्रोलोकांच्या देवांप्रमाणें जाहवेस जळणाऱ्या हवींचा सुवास फार आवडतो अशी कल्पना असे; मेक्सिकन व मध्यअमेरिकन देवांस जसें माणसांचे व जनावरांचें रक्त अर्पण करीत तसें जाहवेसहि करीत; मग त्यानें

त्यास कधीं स्नान घालीत, आणि कधीं तें दरवाज्यावर ओतीत. ईजिप्शन व ग्रीकलोकांप्रमाणें ते देवास अनेक (कधीं कधीं हजारों) बैलांचे बळी देत. उत्तम प्रकारचीं जनावेरं देवांस बळी द्यावीं अशी जशी ग्रीकलोकांना आज्ञा असे, तशीच हीब्रूलोकांनाहि डाग किंवा व्यंग नाहीं अशीं जनवारें अर्पण करण्याची आज्ञा असे. तद्वतच मारलेल्या जनावरांचे विशिष्ट भाग देवांस अर्पावे व इतर उपाध्यांनीं घ्यावे अशा आज्ञा हीब्रू व ईजिप्शन दोन्ही धर्मांत सांपडतात. ग्रीकलोकांचा पाऊस पाडणारा देव **जोव्ह** जसा आलिंपसच्या शिखरावर राही, तसा हीब्रूलोकांचा देव सीनाई पर्वताच्या शिखरावर ढगांतून उतरे व त्यावेळीं कधीं कधीं विजांचा गडगडाट होत असे. तद्वतच, **जाहवेच्या** दहा आज्ञा घेऊन **मोझेस** जसा त्या पर्वतावरून उतरला तसा ऱ्हाडामांथस हा **झीअस** देवाच्या आज्ञा घेऊन क्रीटबेटांतील इडा पर्वतावरून खालीं उतरला.

दुसरीं अनेक साम्यें हीब्रूलोकांच्या व इतर लोकांच्या धर्मांत दृष्टीस पडतात त्यांस आतां उल्लेख करूं. रोमनलोकांत गृहदेवतेचें नांव घेणें जसें धर्मविरुद्ध समजत, तद्वत् हीब्रूलोक प्रारंभीं आपल्या देवाचें नांव घेत नसत. ग्रीकलोकांत व इरोक्वाइस वगैरे रानटी लोकांत नाच करणें हा जसा देवपूजेचा एक प्रकार असे, तसा हीब्रूलोकांतहि असे. हीब्रूलोकांत जसे उपास वगैरे असत तसे हल्लीं पुष्कळ लोकांत आहेत व पूर्वीं होते; उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिको, मध्य अमेरिका, पेरू वगैरे देशांत ते फारच क-

डक असत. भविष्यें खरीं होतात हा समज हीब्रू-लोकांप्रमाणें ग्रीकलोकांतहि असे; व त्यांच्याप्रमाणें तेहि लोक यावरून आपला धर्म खरा ठरतो असें समजत. सांडविचबेटवाल्यांबद्दलहि आपण असेंच ऐकतों; कारण क्यापटिन कूक जेव्हां मेला तेव्हां तो मरणार हें भविष्य अगोदरच आपल्या उपाध्यांनीं केलें होतें असें ते म्हणाले. चमत्कार करून दाखविणें हा हीब्रू धर्माचाच विशेष आहे असें नाहीं, तर इतर पुष्कळ धर्मांचाहि आहे. इलीजा स्वर्गास जिवंत गेल्याच्या कथेप्रमाणें कथा इतर धर्मांतूनहि आहेतच; उदाहरणार्थ, आरावाक लोकांत. बरें, पूर्वीं देव मनुष्याचें रूप धारण करून लोकांच्या दृष्टीस पडे तसा मागाहून पडत नाहींसा झाला हाहि समज हीब्रूलोकाप्रमाणें ग्रीकलोक व मध्य अमेरिकेंतील लोक यांच्यामध्यें असे.

आतां हीब्रू धर्माचा ज्यास्त पक्क असा प्रकार जो ख्रिस्ती धर्म त्याच्यामध्येंहि असलीं सादृश्यें दिसत नाहींत असें नाहीं. ख्रिस्तीलोक देवापासून उत्पन्न झालेला पुरुष आपल्यामध्येंच आहे असें समजतात हा चमत्कार आहे; कारण असले पुरुष ग्रीकलोकांतहि होते; उदाहरणार्थ, एस्कुलेपियस, पैथागोरास, आणि प्लेटो. तद्वतच आसीरियन राजा नेबुशाड नेझार आपण देवपुत्र आहों असें म्हणत असे. प्राचीन पेरूमध्यें सूर्याच्या मुरळ्यांपैकीं एकादी गर्भार झाली म्हणजे सूर्यापासून आपणास गर्भधारण झालें असें ती म्हणत असे, आणि विरुद्ध पुराव्याच्या अभावीं लोक तें खरेंहि मानीत. बरें, देवाचा पुत्र देव व माणसें ह्यांजमध्यें मध्यस्थी क-

रता झाला ही कथाहि ख्रिस्ती धर्मांतच आहे असें नाहीं. उदाहरणार्थ, फीजियनलोकांत त्यांच्या देवाचे दोन पुत्र माणसांच्या प्रार्थना आपल्या बापाकडे घेऊन जाऊन त्यांच्या वतीनें त्याच्याशीं मध्यस्थी करितात अशी कथा आहे.

शिवाय ख्रिस्ती लोकांच्या प्रभुभोजनासारखे विधी इतर लोकांतहि आहेतच. माणसांचे गुणधर्म त्यांच्या शरीराच्या सर्व भागांत वसत असल्यामुळें, त्यांच्याशीं जें एकरूप होईल त्यामध्येंहि ते वसतात, आणि म्हणून जे एकच अन्न खातील त्यांच्यामध्यें एकप्रकारचें बंधन उत्पन्न होतें, अशी जी प्राथमिक लोकांची समजूत तिच्यावरून असला विधि उत्पन्न होतो. म्हणून पदम् लोकांत एका पंक्तीस जेवतांना केलेला करार मोडीत नाहींत. मृतांचीं भुतें त्यांना अर्पिलेलें अन्न किंवा त्याचें सत्त्व खाऊन आपली क्षुधा शांत करितात असें समजून भुतांनाहि वरील कल्पना लावतात; म्हणजे भुताला अर्पिलेल्या अन्नाचा अंश आपण सेविल्यानें त्याचे गुणधर्म आपल्यांत येतात, आणि तो आपला धनी व आपण त्याचे नोकर हा संबंध ताजा होतो असें समजतात. आणि हें जें भुतासमवेत किंवा देवासमवेत खाणें, त्यास देवासच खाण्याचें मेक्सिकन लोकांनीं स्वरूप दिलेलें असून जी भाकर माणसाच्या रक्तांत भिजवून ते खात तिच्यांत देव येतो असें ते समजत. आणखी कांहीं सादृश्यें आहेत तीं आतां थोडक्यांत सांगतों. ख्रिस्ती लोकांनीं येशू ख्रिस्ताच्या थडग्याची जागा आपल्या ताब्यांत घेण्याकरितां जशीं धर्मयुद्धें केलीं, तशीं डेल्फाई या पवित्र ठिकाणाचा ताबा मिळण्यासाठीं ग्रीक-

लोकांनीं केलीं. हीब्रू देव, भविष्यवादी आणि राजे यांच्या कृत्यांचा पाठा वाचणें हा जसा ख्रिस्ती लोकांत पूजेचा एक भाग समजतात, तसा ग्रीकलोकांत होमरनें वर्णिलेल्या देवांचे व वीरांचे पराक्रम गाणें हा एक पूजेचा भाग समजत. ख्रिस्ती लोकांचीं देवळें श्रीमंत व धर्मिष्ठ गृहस्थांनीं देवाची प्रसन्नता करून घेण्यासाठीं दिलेल्या देणग्यांनीं जशीं संपन्न झालेलीं आहेत तशींच ग्रीकलोकांचीं झालेलीं होतीं; आणि रोममधील सेंटपिटरचें देऊळ जसें लोकांच्या वर्गण्यांनीं बांधलेलें होतें, तसेंच ग्रीकलोकांचें डेल्फाई येथील देऊळ बांधलेलें होतें. आणि ख्रिस्ती धर्मांत जसे बाप्तिस्मा, पापाची कबुली, संतदीक्षा, ब्रह्मचर्य इत्यादि विधी आहेत, तसेच इतर पुष्कळ धर्मांतहि आहेत.

६. ह्या सर्व पुराव्यांवरून काय दिसतें ? एकंदर धर्मांमध्यें हें जें स्वरूपैक्य दृष्टीस पडतें त्याबद्दल काय म्हणावयाचें ? आणि शिवाय, स्पेन्सर साहेब म्हणतात, ख्रिस्ती लोकांचा धर्म आणि इतर धर्म ह्यांमध्यें जें हें कौटुंबिक सादृश्य आहे त्यावरून काय समजावयाचें ? ह्याचें उत्तर देण्याकरितां एकंदर वस्तुस्थितीचा विचार करूं.

सुधारलेल्या लोकांतील जीं माणसें इंद्रियवैगुण्यामुळें शिक्षणाला मुकतात त्यांजमध्यें आणि कित्येक प्राथमिक लोकांमध्यें धर्मविषयक कल्पना दिसत नाहींत. बरें, ज्या लोकांत ह्या कल्पना बीजरूपानें दिसतात, त्यांच्यांत त्या मृतांच्या दुय्यमांचें अस्तित्व मानणें आणि त्यांस हवी अर्पण करणें ह्या रूपानें दृष्टीस पडतात. पिशाचकल्पना आणि तिच्यावरून उत्पन्न झालेलें पिशाचसंतर्पण हीं

त्यांच्याहून ज्यास्त प्रबल सत्त्वांवर विश्वास उत्पन्न होऊन त्यांचें संतर्पण सुरू झालें तरी कायम राहतात. हीं सत्त्वें प्रारंभीं भूतें म्हणूनच प्रसिद्ध असून त्या दोघांमध्यें हळूहळूच भेद उत्पन्न होत जातो. आणि अत्यन्त उच्च अशा निसर्गोत्तर सत्त्वापर्यंतच्या सत्त्वांच्या ज्या पूजा त्या सर्वांचें स्वरूप एकच असून त्यांच्यांत भेद कायतो कमज्यास्त संकीर्णता व विस्तृतता ह्यांच्यासंबंधानें आहे. ह्या सर्व आनुरूप्यांवरून काय व्यक्त होतें ? त्यांवरून असें व्यक्त होत नाहीं काय कीं समाज करून राहणाऱ्या मानवी प्राण्यांमध्यें दिसणाऱ्या इतर चमत्कारांप्रमाणें हे धर्मरूपी चमत्कारहि स्वाभाविकरीत्याच उत्पन्न झालेले आहेत ?

साहेब म्हणतात, आमच्यामध्यें जो धर्म प्रचलित आहे तो मात्र या सामान्यनियमास अपवाद समजावयाचा कीं काय ? त्याचीं इतर धर्मांशीं दिसणारीं जीं सादृश्यें त्यांच्या बुडीं निसर्गातीत असें एक वैसदृश्य आहे असें जर आपण म्हटलें, तर त्यावरून गर्भित होणाऱ्या अनेक गोष्टी आपणास कबूल कराव्या लागतील. एक गोष्ट ही कीं, ज्या आदिकारणास आपल्याला काल किंवा आकाश ह्यांसंबंधानें कांहींच मर्यादा घालतां येत नाहींत, आणि ज्यानें उत्पन्न केलेल्या एकंदर वस्तूंपैकीं आपली एकंदर सूर्यमाला ही एक अत्यन्त अत्यन्त लहान वस्तु आहे, त्यानें सीरियामधील एका धनगरी नायकाशीं करार करण्याकरितां मनुष्यरूप धारण केलें. दुसरी गोष्ट ही कीं, भूत भविष्य वर्तमान ह्या तिन्ही कालीं सर्वत्र सारखी उद्भूत होणारी ही जी महाशक्ति तिनें हें मानवीस्वरूप

धारण केल्यावर जाहवेच्या ठिकाणीं दिसणारें मर्यादित ज्ञान आणि मर्यादित सामर्थ्य आपल्या अंगीं लावून घेतलें इतकेंच नाहीं, तर हल्लीं माणसांच्या अंगीं जे गुणधर्म असणें आपण लज्जास्पद समजूं, असे गुणधर्महि लावून घेतले. आणि तिसरी गोष्ट ही कीं आपल्या नैतिक बुद्धीला वरच्याहूनहि ज्यास्त किळस आणणारा एक हेतु आपणास ह्या शक्तीच्या ठायीं कल्पावा लागतो. तो हा कीं, खिस्ती धर्म आणि इतर धर्म ह्यांमध्यें दिसणारीं जीं हीं अनेक सादृश्यें त्यांवरून जर त्यांची उत्पत्ति आणि वृद्धि ह्यांमधील सादृश्य सिद्ध होत नसेल, तर असें समजलें पाहिजे कीं, नैसर्गिक आणि निसर्गोत्तर ह्यांमधील जें हें पूर्ण साम्य तें जे आपल्यास जें शिकविलें जाईल त्याचा सूक्ष्मरीत्या विचार करितील त्यांस फसविण्याकरितां त्या शक्तीनें मुद्दाम उत्पन्न केलेलें आहे; जे मनःपूर्वक सत्याचा शोध करीत असतील त्यांस त्याबद्दल निरंतरची शिक्षा व्हावी, एतदर्थ चकविण्याकरितां त्या शक्तीनें हीं दिखाऊ सादृश्यें मुद्दाम उत्पन्न केलेलीं आहेत.

साहेब म्हणतात, ह्या गोष्टी, आणि विशेषतः ही शेवटची गोष्ट, ज्यांस मान्य असेल त्यांच्याशीं वाद करून कांहींच निष्पन्न व्हावयाचें नाहीं; म्हणून येथें त्यांची आह्मी शेवटची रजा घेतों, आणि सर्व धर्म स्वभावजन्य आहेत ही कल्पना स्वीकारितों; ती स्वीकारिल्यानें आपल्यास असें दिसून येईल कीं, तेणेंकरून धर्मविषयकसंस्थांची उत्पत्ति आणि वृद्धि कशी झाली हें स्पष्टपणें ध्यानांत येऊं लागतें.

प्रकरण दुसरें
वैदूलोक आणि उपाध्ये

७. वैदू आणि उपाध्ये ह्यांच्यामध्यें समाधानकारक भेद दाखविणें कठीण आहे. दोघांचाहि संबंध निसर्गोत्तर भूतांशीं असून हीं भूतें प्रारंभीं पिशाचरूपी असतात; आणि ह्या निसर्गोत्तर भूतांशीं व्यवहार करण्याचे ह्या दोघांचे मार्ग इतके संकीर्ण आहेत कीं प्रारंभीं त्यांच्यांत स्पष्ट असें वर्गीकरण करतां येत नाहीं.

पाटागोनियनलोकांत एकच माणसें उपाध्ये, जादूगार आणि वैद्य ह्या तिघांचीं कामें करितात; आणि उत्तर अमेरिकेंतील इंदियनलोकांमध्यें जादूगार, भविष्यवादी, वैद्य, भुतें काढणारा, उपाध्या आणि पाऊस पाडणारा, ह्या सर्वांचीं कामें एकाच माणसांचे ठिकाणीं संयुक्त झालेलीं आढळतात. ग्वायनामधील पीइमेनलोक जादूगार, भविष्यवादी, वैद्य, न्यायाधीश आणि उपाध्ये यांचीं कामें करितात. एलिस म्हणतो, सांडविच बेटामध्येंहि वैद्यलोकच बहुधा उपाध्ये व मांत्रिक असतात. इतरत्र ह्यांच्यामध्यें विभिन्नीकरणास सुरवात झालेली दृष्टीस पडते; उदाहरणार्थ, न्यूझीलंदरलोकांत उपाध्यांखेरीज प्रत्येक टोळींत एकजण तरी मांत्रिक म्हणून प्रसिद्ध असे. आणि सामाजिक संघटना सुधारत जाईल तसें हें विभिन्नीकरण कायमचें बनून जातें.

कालाच्या दृष्टीनें पाहतां वैद्य अगोदर येतो. नीचतेस पावलेले जे फ्यूजियनलोक त्यांचें वर्णन करणारे चेटक्यांस उल्लेख करितात; आणि त्यांच्याहून पुढें गे-

लेले जे मापुशी लोक त्यांच्याबद्दल आपण असें वाचितें कीं त्यांच्यांत जरी भविष्य सांगणारे व जादूगार आहेत, तरी उपाध्ये नाहींत. आस्ट्रेलियन टोळ्यांमध्यें निसर्गोत्तराशीं व्यवहार करणारे लोक म्हटले म्हणजे कायते " बोयाला " लोक किंवा वैद्य आहेत; आणि तास्मेनियनलोकांच्या संबंधानें बॉनविक असेंच म्हणतो. शिवाय, दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं, रानटी लोक ज्यांस उपाध्ये म्हणून म्हणतात ते कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या जादूव्यतिरिक्त बहुतेक कांहींच करीत नाहींत. उदाहरणार्थ, मंदुरूकसलोकांमध्यें " पाजे " किंवा उपाध्या शत्रूवर हल्ला करण्यास अत्यन्त शुभकाल कोणता हें ठरवितो, भुतें अंगांतून काढून टाकितो, आणि आजाऱ्यास बरें करण्याचा बाणा मिरवितो; उवापीलोकांत असेंच आहे. क्लालम, चिपिवायन, क्रीज, इत्यादि उत्तर अमेरिकेंतील अनेक टोळ्यांमध्यें उपाध्याचीं कृत्यें म्हणजे केवळ जादूगाराचींच असतात.

ह्या दोन कृतींचा जो हा घोंटाळा दृष्टीस पडतो, आणि मागाहून गौण बनणाऱ्या जादूटोण्याचें प्रारंभीं जें हें प्राबल्य दृष्टीस पडतें, त्याची उपपत्ति कशी लावावयाची?

८. प्राथमिक लोकांच्या मतें परलोक हा ह्या लोकाशीं इतका सदृश असतो कीं त्यांतील पिशाचरूपी रहिवासी एथील लोकांसारखेच राहतात, त्यांचे एकमेकांशीं सामाजिक संबंध एथल्यासारखेच असतात, आणि त्यांना कामक्रोधहि एथल्यासारखेच असतात. ह्या गोष्टी जर ध्यानांत ठेविल्या तर वैदूलोक आणि उपाध्ये भुतांशीं व्यवहार करावयाचा तो माणसांशीं करण्याच्याच मा-

र्गानें कां करितात, आणि परिस्थितीस अनुसरून त्याच्यांत फेरबदल कां करितात, हें लक्षांत येतें.

रानटी टोळींतील एका माणसाचे इतर रानट्यांशीं काय संबंध असतात तें पहा. शेजारच्या टोळींतील जे लोक असतात ते नेहमीं त्याच्याशीं वैर करणारे असून त्याला व त्याच्या शेजाऱ्यांना पीडा देण्याची वाट नेहमीं पाहत असतात. त्याच्या स्वतःच्या टोळीमध्यें त्याचे आईबाप व इतर आप्त असतात, आणि त्यांजपासून तो फायद्याची व मदतीची अपेक्षा करीत असतो; आणि त्यांच्याशीं त्याचें वर्तन कधीं कधीं द्वेषाचें असलें तरी बहुतकरून स्नेहाचें असतें. बाकीच्यापैकीं कांहीं त्याच्याहून हलक्या दर्जाचे असून तो त्यांच्यावर नेहमीं अंमल चालवीत असतो; कांहीं त्याच्याहून प्रबल व ज्यास्त लुच्चे असतात, म्हणून तो त्यांना भीत असतो व त्यांस संतुष्ट करण्याची खटपट करीत असतो; आणि कांहींजण असे असतात कीं ते त्याच्याहून श्रेष्ठ आहेत किंवा कनिष्ठ आहेत हें ठरलेलें नसतें, आणि म्हणून त्यांच्याशीं वेळ पाहून कधीं उद्दामपणानें आणि कधीं नम्रपणानें तो वागत असतो. एवंच तो त्याच्या सभोंबतालच्या लोकांशीं अनेकप्रकारचें वर्तन ठेवीत असतो,—कधीं संतुष्ट करण्याचें, कधीं विरोध करण्याचें आणि कधीं इजा करण्याचें.

प्रथम माणसांचीं भुतें सर्व बाबतींत अगदीं माणसांसारखींच समजत असल्यामुळें, त्यांचे आपल्याशीं असणारे संबंध जिवंत माणसांच्या सारखेच असतात असें रानटी माणूस समजत असतो. झुलूलोकांबद्दल बिशप

क्यालेवे जी एक हकीकत सांगतो तिजवरून हें स्पष्ट दिसतें. त्यांच्यांतील एकजण आपल्या मृत भावास असें म्हणतोः–" तूं मला मारण्यासाठीं येत असतोस. तूं जिवंतपणीं वाईट माणूस होतास हें उघडच आहे; आणि जमिनींत पुरला गेलास तरी तसाच आहेस काय? " एवंच भुतें आणि तज्जन्य देव ह्यांचे स्वभाव व वर्तनक्रम जिवंत माणसांच्यासारखेच समजले गेल्यामुळें, रानट्याचे त्यांच्याशीं वागण्याचे मार्गहि तसेच असतात, म्हणजे, कधीं संतुष्ट करण्याचे, कधीं फसविण्याचे आणि कधीं जबरदस्तीचे. नागलोकांबद्दल स्टुअर्ट असें सांगतो कीं, त्यांचा एक देव आंधळा आहे, त्यास ते लहान नैवेद्य अर्पून मोठा आहे म्हणून सांगतात, आणि अशा रीतीनें फसवितात. बौरियाट लोकांमध्यें आजार उत्पन्न करणारा एक दुष्ट देव आहे म्हणून समजतात, आणि म्हणून त्यास फसविण्यासाठीं आजारी माणसाची एक प्रतिमा तयार करितात; तिलाच तो आजारी म्हणून समजून तिचा नाश करितो, आणि तेणेंकरून आपण आजाऱ्यास मारिलें असें त्यास वाटतें. किबोक्केमध्यें क्यामरोननें एक लटकें भूत पाहिलें; तें तयार करण्याचा उद्देश तेथील खरीं भुतें भिऊन पळून जावीं हा होता. कमश्चाटकनलोक सर्वत्र भुतें आहेत असें समजून त्यांनीं आपल्या इच्छा तृप्त केल्यास त्यांस ते पुजीत, आणि न केल्यास त्यांस शिव्या देत. न्यूझीलंदमध्यें एकादा माणूस आजारी पडला म्हणजे त्याच्यावर क्रुद्ध झालेल्या देवास संतुष्ट करण्याकरितां किंवा हांकलून देण्याकरितां मंत्र म्हणत असत; आणि

त्यास हांकलण्यासाठीं, "तुला जाळूं, किंवा मारून खाऊन टाकूं" अशी भीति घालीत असत. वारलीलोक वाघ्यास पुजीत असून, "तुम्ही त्यास कधीं शिव्या देतां काय?" असें विचारिलें असतां "होय" म्हणून सांगतात. ते म्हणतात, आम्ही वाघ्यास म्हणतों, "कायरे, तुला आम्हीं कोंबडें दिलें, बकरें दिलें, तरी तूं आम्हांस मारितोस ? तुला आणखी काय पाहिजे?" आतां कांहीं ठिकाणीं भुतें व तज्जन्य देव ह्यांच्याशीं अशा रीतीनें विरुद्ध किंवा अर्धवट विरुद्ध वर्तन करण्याच्या ऐवजीं त्यांस संतुष्ट करण्याचें वर्तन करितात; म्हणजे, त्यांस नजराणे अर्पण करितात, स्तवितात, किंवा स्वतःचा अंकितभाव व्यक्त करितात; आणि ते रागावलेसें वाटलें म्हणजे ज्यास्तच करितात; आणि असलींच उदाहरणें वरच्याहून ज्यास्त आढळून येतात.

एवंच जे लोक निसर्गोत्तर सत्त्वांशीं वैरभावानें वागतात, आणि जे मित्रभावानें वागतात, त्यांच्या कृतींत व स्वभावांत सामान्य वैषम्य उत्पन्न होतें. म्हणून वैदू व उपाध्ये यांजमध्यें भेद उत्पन्न होतो, आणि म्हणूनच प्रारंभीं वैदूलोकांचे विशेष प्रस्थ असतें.

९. कारण प्राथमिक समाजामध्यें टोळीच्या टोळींत आणि टोळीच्या बाहेर स्नेहसंबंधापेक्षां वैरसंबंध ज्यास्त सामान्य असतात; आणि म्हणूनच मृतांच्या दुय्यमांस मित्र मानण्यापेक्षां शत्रूच म्हणून ज्यास्त वेळा समजत असतात.

प्रस्तुत शास्त्राच्या पहिल्या भागांत सांगितलेंच आहे कीं पिशाचकल्पनेपासून रानटी लोक पहिला सिद्धान्त असा बांधितात कीं, भुतें हीं अनर्थांस कारण असतात. अ-

नेक मतांचें दुय्यम सभोंवती घिरट्या घालीत असतात असें समजून ते टोळीच्या शत्रूंचे असतात असें ते लोक समजत असतात. बाकीच्या भुतांपैकीं बरींच भुतें आपल्या विरोध्यांचीं किंवा मत्सऱ्यांचीं आहेत असें ते मानितात. स्नेह्यां चीं आणि आप्तांचीं भुतें देखील रागावून सूड घेतील असा संभव त्यांस वाटतो. म्हणून आकस्मिक जखमा, अनर्थापात, रोग, मृत्यू इत्यादि उत्पन्न करणारीं हीं दुष्ट भुतें आहेत, आणि त्यांच्याशीं लढणें जरूर आहे, असें रानट्यास वाटूं लागतें. करितां तो त्यांस हांकलून देण्याच्या युक्त्या शोधून काढतो; आणि ह्या युक्त्या करण्यांत ज्यास यश येतें म्हणून प्रसिद्धि होईल तो महत्त्वाचा माणूस बनतो. भुतांच्या संवेदना, मनोविकार आणि कल्पना माणसांसारख्याच असतात. ही जी प्राथमिक कल्पना तिनें प्रेरित होत्साता तो भुतांस धमकावण्या घालून, तोंडें वेडीं वांकडीं करून, आणि भयंकर ओरड करून भिवविण्याचा यत्न करितो; किंवा दुर्गंध उत्पन्न करून, अथवा ज्या गोष्टी त्यांस नको असतील त्या उत्पन्न करून तो त्यांस किळस आणण्याचा यत्न करितो; आणि कोणास आजार आला असतां त्याच्या शरीरांत ताप उत्पन्न करून, किंवा त्यास मार देऊन तें (शरीर) त्या भुतास राहण्यास अयोग्य करितो. आणि अशा रीतीनें आपण भुतें काढिलीं आहेत असा लटका समज तो आपल्या व इतरांच्या मनांत उत्पन्न करीत असल्यामुळें, त्यास भुतें ताब्यांत आणण्याचें सामर्थ्य आहे, व त्यास निसर्गोत्तर भुतांची मदत आहे, असा समज रानट्यामध्यें उत्पन्न होतो. उदाहरणार्थ,

उवापीलोकांमध्यें शत्रूंस मारणें, पाऊस पाडणें किंवा न पाडणें, कुत्रे व पारध नष्ट करणें, माशांस नदींतून काढून लावणें, आणि नानाप्रकारचे रोगांनीं एकाद्यास पीडणें, इतकीं सामर्थ्यें वैदूंत असतात असें समजतात.

उपाध्यापासून भिन्न असा जो वैदू त्याचें प्रारंभीं प्राबल्य असण्यास आणखी एक कारण असतें. प्रारंभीं आप्तांचीं, आणि विशेषतः आईबापांचींच तेवढीं भुतें, मित्र म्हणून समजलीं जात असतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं संतर्पकविधी बहुधा मृताचे वंशज तेवढे करीत असल्यामुळें ते बहुशः खासगीच असतात. पण वैदूच्या कृती कांहीं विशिष्ट भुतापुरत्याच किंवा कुटुंबापुरत्याच नसतात. दुष्ट भुतें हांकलण्यासाठीं त्यास कधीं हें कुटुंब आणि कधीं तें बोलावून नेत असतें; अशा रीतीनें तो सार्वजनिक कामगार बनून त्याला सर्व टोळींत काम करावें लागतें. संतर्पकविधी करून कधीं कधीं त्यास जें उपाध्याचें स्वरूप येतें, तेणेंकरून त्याचें मूळचें स्वरूप फारसें बदलत नाहीं. म्हणजे, वस्तुतः तो भुत्या किंवा भुतें काढणाराच राहतो.

कधीं कधीं वैदूस ह्याच्याहूनहि ज्यास्त महत्त्व येत असतें; म्हणजे, त्याच्या हातीं कधीं कधीं राजकीय सत्ता जात असते; ह्याचीं उदाहरणें या शास्त्राच्या पांचव्या भागांत दिलेलींच आहेत. दुसरें उदाहरण ग्यांबिआचा राजा माम्रो हा मोठा भुत्या होता हें होय. पहिल्या भागांत कधीं कधीं वैदूचा देव कसा बनतो ह्याचींहि उदाहरणें दिलींच आहेत.

१०. समाजाच्या पुढील पायऱ्यांवर मुख्य शास्त्या-

पासून खालवर सामाजिक पदव्या उत्पन्न झाल्या, आणि निसर्गोत्तर भुतांच्याहि पायऱ्या लागतील इतकी धर्मवृद्धि झाली, आणि त्याबरोबर ज्या श्रेष्ठ निसर्गोत्तर भुतांस धमकावतां येत नसल्यामुळें संतर्पावेंच लागतें, त्यांची पूजा करणारे उपाध्येवर्ग उत्पन्न झाले, म्हणजे उपाध्ये व वैदू यांच्यामध्यें आणखी एक संकीर्णता उत्पन्न होते. कारण ह्यावेळीं दुष्ट भुतें मांत्रिकाच्याच प्रत्यक्ष सामार्थ्यानें हांकललीं जाण्याच्या ऐवजीं, एकाद्या श्रेष्ठतर भुताच्या मदतीनें हांकललीं जाऊं लगतात. म्हणजे, उपाध्या ज्या निसर्गोत्तर भूतांशीं स्नेहानें वागत असेल त्यांला जें त्याच्याहून कमी प्रतीचें भूत त्रास देत असेल त्यास हांकलण्यास सांगून मांत्रिकांचें काम करूं लागतो.

वैदूचीं कांहीं कामें अशा रीतीनें उपाध्यानें उचललेलीं जशीं अगदीं प्रारंभींच्या सुधारणांमध्यें दृष्टीस पडतांत तशींच नंतरच्या सुधारणांमध्येंहि दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ, ईजिप्शनलोक देव आपल्याकरितां सारखी मध्यस्थी करीत असतात असें समजत, आणि त्यांच्या जादूविषयक ग्रंथांकडे पाहतां एका देवास त्याच्याहून प्रबल देवाची भीति घालावयाची, अशा प्रकारची पद्धति त्यांच्यांत दिसून येते. हें एका टोंकावरील उदाहरण झालें; आतां दुसऱ्या टोंकाकडे पाहतां, साहेब म्हणतात, आमच्या सामान्य प्रार्थनेच्या पुस्तकांत अपवित्र भुतांस पिता, पुत्र व पवित्र आत्मा ह्यांच्या नांवानें निघून जाण्यास आव्हान केलेलें आढळून येतें. शिवाय प्राचीन लेखांमध्यें असाहि पुरावा आढळतो

कीं ज्या श्रेष्ठ भुतांची कनिष्ठ भुतें हांकलण्यासाठीं प्रार्थना केली जाते, तीं स्वतः एका काळीं वैदू माणसें होतीं. उदाहरणार्थ, स्मिथ म्हणतो, एका शिलालेखांत असा मजकूर सांपडतो कीं, एका माणसास शाप झाला होता; तेव्हां मेरोडाक नांवाचा एक देव त्यास पाहून आपला बाप देव “ हीआ ” ह्याजकडे गेला आणि म्हणाला, ह्यास शापमुक्त करण्याचा उपाय सांगावा. तेव्हा तो शहाणपणाचा दाता देव ‘ हीआ ’ त्यास काय विधी करावयाचे व कोणते मंत्र म्हणावयाचे ते सांगता झाला; आणि ते त्या शिलेवर भावी भक्तांच्या उपयोगाकरितां लिहून ठेविलेले आहेत.

११. एवंच, प्राथमिक माणसाच्या समजुतीप्रमाणें मृतांचे दुय्यम सर्व बाबतींत जिवंत माणसांसारखेच असल्यामुळें, जिवंताप्रमाणें त्यांच्याशीं वागतां येतें, आणि म्हणून त्यांस लांच देऊन, त्यांची स्तुति करून, माफी मागून, किंवा त्यांस फसवून, धमकावून, भिववून अथवा त्यांजवर जबरदस्ती करून, त्यांच्याकडून आपलें कार्य करून घेतां येतें, किंवा त्रास देण्यापासून निवृत्त करतां येतें, असें त्यास वाटतें; ही गोष्ट ध्यानांत आणिली म्हणजे, भुतांशीं वागण्याच्या, प्रेमाची व द्वेषाची अशा दोन पद्धती कशा उत्पन्न होतात, आणि त्यामुळें उपाध्ये व वैदू असा वर्गभेद कसा अस्तित्वांत येतो, ह्या गोष्टीचा उलगडा होतो.

वैदूपासून जे फारसे महत्त्वाचे नाहींत असे कांहीं सामाजिक परिणाम उत्पन्न होतात त्यांचें एथें विवेचन करण्याची जरूर दिसत नाहीं. तो कधीं कधीं राजकीय

दृष्टचा सत्ताधीश होतो, आणि कधीं कधीं मरणोत्तर देव बनतो, हें आधीं सांगितलेंच आहे. तेव्हां आतां त्याच्याबद्दल इतकेंच सांगणें बस्स दिसतें कीं सुधारणेची प्रगति चालली असतां त्याचे कमी कमी महत्त्वाचे असे अनेक वंशज दृष्टीस पडतात, आणि ते कांहीं तरी युक्ति करीत असल्यामुळें, त्यांस निसर्गोत्तर सामर्थ्य किंवा ज्ञान आहे असें लोक समजत असतात. जाणत्या (मांत्रिक) बाया वगैरे त्यांचे कांहीं नमुने, साहेब म्हणतात, आमच्या खेड्यापाड्यांतून अद्यापि दृष्टीस पडतात.

पण निसर्गोत्तर भूतांशीं व्यवहार करणारा दुसरा वर्ग प्रसिद्ध व प्रबल बनत जाऊं लागल्यामुळें, आणि समाजप्रगति होत जाईल तशी त्याची घटना बहुधा फार संकीर्ण होत असल्यामुळें, आणि कधीं कधीं तर तो वर्ग सर्वांत श्रेष्ठ बनत असल्यामुळें, त्याचें सविस्तर वर्णन करणें अवश्य दिसतें.

प्रकरण तिसरें
वंशजांचीं उपाध्यायिक कर्तव्यें

१२. या शास्त्राच्या पहिल्या भागांत (कलम८७) आपल्या दृष्टीस पडलेंच आहे कीं कांहीं ठिकाणीं प्रेतांत पुनः जीव येऊन त्यांनीं त्रास देऊं नये एतदर्थ तीं नाहींशीं करून टाकण्याची चाल आहे; आणि इतरत्र असली चाल नसून आप्त व इतर सर्व मृतलोक रोग व संकटें आणीत असतात असें समजतात...हा समज रानटी लोकांत असल्याचीं उदाहरणें पहिल्या भागाच्या सोळाव्या व सतराव्या प्रकरणांत दिलेलीं आहेत. न्यूब्रिटनमध्येंहि त्याचें उदाहरण सांपडतें. उदाहरणार्थ, मटुकनपुटमधील लोक मृत ज्या झोंपड्यांत रहात असेल तेथेंच त्यास पुरितात, आणि त्याचे आप्त बरेच दिवसपर्यंत तें झोंपडें सोडून दूरवर रहावयास जातात. कारण ते म्हणतात, मृताचें भूत कांहीं दिवस तेथें राहतें, आणि त्रास देण्यास तेथें कोणी नाहीं असें पाहून कायमचें निघून जातें. नंतर ते आप्त तेथें परत येऊन राहतात. ज्या ठिकाणीं भुतें आपल्या वंजशांवर प्रेम करीत असतात असें मानितात तेथें देखील तीं कधीं कधीं रागावतात, व म्हणून त्यांचें संतर्पण करणें जरूर पडतें, असें समजतात. उदाहरणार्थ, सांताळलोक असें समजतात कीं आपल्या वडलांच्या भुतांस योग्य रीतीनें संतुष्ट न केल्यास तीं आपल्यामध्यें वांकडे पाय, आंकडी, कुष्ठ, इत्यादि रोग उत्पन्न करितात.

एवंच भुतें सामान्यतः कमजास्त प्रमाणानें दुष्ट अ-

सतात असें जरी समजतात, तरी एकंदरींत आप्तांचीं भुतें दुष्टपणापेक्षां सुष्टपणाच ज्यास्त दाखवितात अशी-च समजूत रानटी लोकांत आढळून येते. कांहीं कांहीं जातीतर भुतें हीं केवळ उपकार करणारींच असतात असें समजतात. उदाहरणार्थ, क्यारेनलोक असें समजतात कीं त्यांचे पुण्यवान् पूर्वज आपल्या मुलांच्या कल्याणा-कडे सारखी नजर पोंचवीत असतात.

जरी अनेक लोकांत सुष्ट भुतें त्रास देणार नाहींत असें समजून मुख्यत्वेंकरून दुष्ट भुतांचें संतर्पण करीत असतात, तरी जेथें जेथें पितृपूजेचें मूळस्वरूप कायम राहिलेलें असेल तेथें मुख्यत्वेंकरून आप्तांच्या भुतांचेंच संतर्पण करीत असतात. प्रथम जीं थडग्यांवर हविर्दानें करीत असता-त तीं मृताबद्दल प्रेम वाटतें म्हणून करीत असल्यामुळें, आणि त्यांची जी स्तुति करितात ती ते मेल्याबद्दल वा-ईट वाटतें म्हणून करीत असल्यामुळें, सहजच हीं सं-तर्पणें इतरांपेक्षां आप्तच ज्यास्त करीत असतात.

१३. म्हणून प्रारंभीं प्राथमिक धर्माचे विधी करणारीं सर्वत्र मृताचीं मुलें किंवा कुटुंबांतील इतर माणसें असतात. म्हणून, सामोआमध्यें,आईबाप, किंवा भाऊ, किंवा मुख्य, याच्या थडग्याशीं प्रार्थना सर्वत्र करीत असत. त्यांपैकीं कांहींजण आरोग्याकरितां या प्रार्थना करीत, आणि कधीं बरे होत असत, किंवा नसत. म्हणूनच ब्यांक्स् बेटां-तील लोक जलप्रवास करण्यास निघाले म्हणजे बाप, चुलता, यांच्या भुतांस पुष्कळ डुकरें, पैसे, खाद्य, पेय, वगैरे देऊं करून बोटीवर बलावीत, व आमचा प्रवास सुखरूपपणें पार पाड म्हणून म्हणत. म्हणूनच ब्लांटा-

यरमधील नीग्रोलोक पारध चांगली साधावी म्हणून प्रार्थना करून पारधीस निघाल्यावर ती चांगली साधल्यास ती आपल्या मृत आप्तानेंच साधून दिली असें समजून त्याचे आभार मानून त्यास कांहीं देतात; न साधल्यास तो रागावला आहे असें समजून त्यास कांहीं अर्पण करीत नाहींत.

ह्या व मागें दिलेल्या उदाहरणांवरून कुटुंबधर्माची उत्पत्ति कशी होते हें स्पष्ट दिसतें. कारण एका निसर्गोत्तर सत्त्वाची भीति हें जें प्रत्येक धर्माचें मुख्य तत्त्व तें ह्याठिकाणीं दिसत असून, शिवाय हविर्दान आणि प्रार्थना, कृतज्ञता आणि आशा, आणि संतर्पणानुरूप फायदा होईल अशी अटकळ, ह्या सर्व गोष्टी ह्याठिकाणीं दिसून येतात.

१४. धर्मोपाध्यायविषयक व्यापार अपक्व समाजांतून बहुधा पुष्कळजणांमध्यें पसरलेले जे दिसतात त्याचें कारण काय तें अशा रीतीनें आपल्या नजरेस येतें.

हल्लीं ही स्थिति आपल्यास असुधारलेल्या लोकांत आढळून येते; उदाहरणार्थ, न्यूक्यालिडोनियामध्यें प्रत्येक कुटुंबाचा एक उपाध्या असतो; मादागास्कारमध्यें घरांतील देवांच्या पूजेव्यतिरिक्त अनेकप्रकारच्या पूजा आज पुष्कळ दिवसांपासून उत्पन्न झालेल्या आहेत. प्रथम सुधारलेल्या ईजिप्शनलोकांमध्येंहि असेंच होतें. त्यांच्यांतील प्रत्येक कुटुंब आपल्या मृतांस बळी अर्पीत असे; आणि त्याच्याहून मोठाल्या देवांची अर्धवट खासगी अशी पूजा असे, आणि त्या देवांचे खरेखुरे किंवा नांवाचे वंशज ती करीत असत. ग्रीक व रोमनलोकांचें असेंच असे.

त्या लोकांत उपाध्ये सार्वजनिक देवांस बळी देत असून शिवाय लोक खासगीरितीनें आपल्या कौटुंबिक देवांस, म्हणजे मृत आप्तांस, बळी देत असत. आणि हल्लीं चीनदेशांत तसेंच आहे; म्हणजे उपाध्ये सार्वजानिक पूजा करीत असून शिवाय जो तो आपल्या मृत आप्तांची खाजगी पूजा करीतच असतो.

एवंच अगदीं प्रारंभींच्या पायरीवर, हवी, प्रार्थना, इत्यादिकांनीं मृतमाणसाच्या दुय्यमाचें संतर्पण त्याच्या कुटुंबांतील माणसें करीत असतात ही गोष्ट अशा रीतीनें लक्षांत येते. आतां आपल्या असें लक्षांत येईल कीं, ह्या कुटुंबधर्माच्या संबंधाचीं कामें कुटुंबांतील एका विवक्षित माणसावर पडून त्या धर्मास ज्यास्त निश्चित स्वरूप येत असतें.

प्रकरण चवथें

सर्वांत वडील मुलांचें उपाध्यायपण

१५. जरी अगदीं प्रारंभींच्या पायऱ्यांवर मृतमाणसाच्या भुतास त्याचे एकंदर वंशज हवी देत असतात, तरी "समस्वरूपाची अस्थिरता" या नियमास अनुसरून लवकरच या बाबतींत एकप्रकारची विषमता उत्पन्न होते; म्हणजे, संतर्पण करण्याचें काम कुटुंबांतील कोणत्या तरी एका माणसाकडे येतें. उदाहरणार्थ, सामोअनलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं कुटुंबांतील जो बाप तो त्याचा मुख्य उपाध्या असे. ताहितियनलोकांमध्यें असेंच असे; तेथेंहि कुटुंबाचा उपाध्या बापच असे. मादागास्कारबद्दल ड्री असें लिहितो कीं, एथें प्रत्येक माणूस आपल्याकरितां व कुटुंबाकरितां उपाध्याचें काम करितो. एशियामध्येंहि असेंच असे. ऑस्टियाकलोकांमध्यें कुटुंबाचा बाप त्याचा एकटाच उपाध्याय, जादूगार, आणि देवपूजा करणारा असे; आणि गोंडलोकांमध्यें धर्मविधी बहुधा कोणी तरी वृद्ध आप्त करीत असतो. ह्याच्याहून उच्चतर जातींमध्यें असेंच असे किंवा आहे. हिंदूलोकांमध्यें पूर्वजांना रोजचा बळी कुटुंबाचा मुख्य देत असतो. प्रत्येक चांगला चिनी आपल्या मृतबापाच्या थडग्यापुढें धूप दररोज जाळीत असून विशेषप्रसंगीं वडील भाऊ तो विधी करीत असतो. ग्रीक व रोमनलोकांतहि असेंच असे. आणि ज्यूलोकांना मृतांचें संतर्पण करण्याची मनाई असूनहि त्यापासून उत्पन्न झालेली रूढी कायमच राहिली होती;

कारण डेव्हिडच्या कारकीर्दीपर्यंत राजे व टोळ्यांचे आणि कुटुंबांचे मुख्य हवी देत असत.

सर्वप्रकारच्या उत्क्रमणामध्यें विभिन्नीकरणांचा कल नेहमीं ज्यास्त निश्चित व कायम होण्याकडे असतो; आणि वरील विभिन्नीकरण ह्या नियमास अपवाद नाहीं. म्हणून सरतेशेवटीं ही रूढी इतकी दृढ होऊन जाते कीं पूर्वजांस हवी देण्याचे विधी करण्याचें काम विशिष्ट वंशजांकडेच येतें. प्राचीन आर्यलोकांबद्दल बोलतांना सर हेन्री मेन असें म्हणतो कीं, ज्या पूर्वजाची पूजा करावयाची तोच केवळ पुरुष असला पाहिजे असें नाहीं, तर ती पूजा करणाराहि पुरुष असला पाहिजे, मग तो मृताचा मुलगा असो, किंवा दुसरा कोणी वंशज असो.

१६. म्हणून ह्यापासून शेवटीं ज्या संस्था स्थापन होतात त्या बरोबर समजण्यासाठीं मध्यंतरीं त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुसऱ्या कांहीं गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत. प्राचीन ईजिप्तमध्यें माणूस मरण्यापूर्वी त्याच्या दुय्यमाचे विधी स्वतः करण्यासाठीं आणि इतरांकडून करवून घेण्यासाठीं त्याच्या ठिकाणीं कोणाची तरी स्थापना करणें फार महत्त्वाचें समजलें जात असे. प्राचीन आर्यलोकांमध्यें ही गोष्ट ह्याच्याहूनहि ज्यास्त महत्त्वाची समजली जाई हें सांगावयास नकोच. कारण एकाद्यास पुत्र होण्यापूर्वी तो मेल्यास त्याच्या बायकोला दिरापासून संतति करून घेण्याची परवानगी असे. ज्यूलोकांमध्येंहि मृतांस खाद्याचे हवी अर्पण करण्याची मनाई असूनहि, हविर्विषयक प्रार्थना करण्याकरितां पुत्राची अपेक्षा ते करीतच असत; कारण अशी प्रार्थना

केल्यानें मृतांचे आत्मे नरकांतून मुक्त होतात असें समजत. चीनदेशांतहि असेंच आहे. तेथें मरणानंतर योग्य बळी मिळतील अशी तजवीज करून ठेवणें हेंच माणूस आपलें एक प्रधानकर्तव्य समजत असतो. म्हणून पहिल्या बायकोस मुलगा न झाल्यास तेवढ्यावरून दुसरी बायको करणें ते लोक योग्य समजतात. कोरियामध्येंहि असेंच आहे; तेथें स्मशानविधि फार संकीर्ण असून कोणी मेल्याबरोबर त्याच्या क्रिया करणाराची नेमणूक करावी लागते; ती मृताच्या वडील मुलाची करितात, आणि तो नसल्यास त्याच्या भावाची न करतां नातू असेल तर त्याची करितात. या क्रिया करणाराचें कर्तव्य मृताच्या तोंडांत अन्न घालणें हें असतें; आणि त्याबरोबरच तो आपला डावा खांदा उघडा करून त्यास सन्मानपूर्वक वन्दनें करीत असतो.

१७. हे विधी करण्यासाठीं स्वतःचा मुलगा नसल्यास कोठें कोठें दत्तक घेण्याची चाल पडलेली आहे. ही आपल्या प्राच्य देशांत सर्वत्र असून, पश्चिमेकडे ग्रीक व रोमनलोकांतहि तसलीच चाल होती, व तिचा हेतुहि असलाच असे.

शिवाय प्राच्यलोकांमध्यें मृताचा वारस होणें ह्याचा हेतु त्याचे मरणोत्तर विधी यथायोग्य करणें हा मुख्यत्वेंकरून असून, त्याच्या संपत्तीचा मालक बनणें हा गौण हेतु असे; तद्वत् पाश्चात्यदेशांतहि असे. आणि ख्रिस्ती लोकांतहि ही गोष्ट जरा भिन्न स्वरूपानें आलेली होती. कारण मध्ययुगीन ख्रिस्तीलोकांस मृताची जी जंगम मालमत्ता असेल ती मुख्यत्वेंकरून त्याच्या आत्म्याची घोर

यातनांतून मुक्तता व्हावी एतदर्थ प्रार्थना करण्यास माण-सें लावण्याच्या कामीं खर्च करण्यासाठीं म्हणून त्याच्या वारसास मिळत असे.

वारसाचीं हीं कर्तव्यें मुख्यत्वेंकरून धर्मविषयक असत हें ह्यावरून दिसतें कीं तीं करण्याची जेथें चाल आहे तेथें इतर कोणतेंहि कर्तव्य न केलें तरी चालेल, पण मृताची क्रिया वगैरे न करणें म्हणजे मोठें पाप करणें समजतात.

१८. मृत माणसाच्या दुय्यमाचे त्याच्या मालमत्ते-वर व वारसावर जे हक्क असतास म्हणून समजतात ते बरोबर लक्षांत यावे एतदर्थ प्राचीनकाळीं औरस किंवा दत्तक पुत्र आपल्या मृतबापाला उद्देशून किंवा त्याच्या संबंधानें काय बोलत असे ह्याचीं थोडींशीं उदाहरणें देऊं.

ईजिप्तमध्यें बेनीहसन एथें एक शिलालेख असा आहे:—" मीं आपल्या बापाचें नांव प्रसिद्धीस आणिलें, मीं त्याच्या आत्म्यासाठीं देवळें बांधिलीं. मीं आपले पु-तळे पवित्र स्थानीं नेवविले, आणि त्यांस शुद्ध बळी अ-र्पण केले. मीं तेथें एका उपाध्यायाची योजना केली, आणि त्यास जमिनी व शेतकरी दिले." तद्वतच, अबा-यडॉस ह्या ठिकाणीं दुसरा राम्सिस आपला बाप पहिला सेटि याच्या संबंधानें म्हणतोः—" मीं तुला तुझ्या देव-ळाच्या तैनातीकरितां दक्षिणेंतील जमिनी दिल्या; मीं तुझ्याकरितां किती शेतें द्यावयाचीं तें ठरविलें; आणि तीं मोजिलीं तर पुष्कळ एकर भरतात. आणि तुझ्या उत्पन्नाकरितां शेतकऱ्याची व जमीन मोजणरांची योजना केली." ह्या दोन्ही उताऱ्यांवरून मृताचा वारस म्हणजे

त्याच्या वतीनें त्याच्या मालमत्तेची व्यवस्था करणारा मुनीमच बनलेला दिसतो.

आसिरियाच्या राज्यांत असेंच असे. तेथील पहिल्या शास्त्यांना पटेसी किंवा असुरांचे प्रतिनिधी हें नांव असून, एका शिलालेखांत असें म्हटलेलें आढळतें:— माझ्या राज्याचे संरक्षक असुर व देव, ज्यांनीं माझ्या राज्याला सरकार व कायदे लावून दिले, त्यांनीं आपले शूर नोकर व योद्धे माझ्या स्वाधीन केल्यामुळें मीं जे राजे असुराचे शत्रू होते त्यांस, त्यांच्या देशांस व लोकांस जिंकून टाकिलें आहे.

आतां ही जर गोष्ट आपण ध्यानांत आणिली कीं प्रारंभीं ईजिप्तमध्यें अशी समजूत असे कीं माणसाचा दुय्यम पुनः त्याच्या शरीरांत पुष्कळ काळानें प्रवेश करून पुनः आपली कारकीर्द सुरू करील; तद्वतच जर आपण हें लक्षांत आणलें कीं पेरूव्हियनलोकहि मृताच्या कल्याणाबद्दल फार काळजी घेत असून त्यांचीहि समजूत तशीच असे; एवंच, मरण येणें म्हणजे कांहीं दिवस शरीरांतून जीव निघून जाणें ही जी प्राथमिक समजूत ती जर लक्षांत घेतली, तर आपणास सहजच असें कळून येईल कीं, प्रारंभीं अशी समजूत असली पाहिजे कीं मृतमाणूस अशा रीतीनें पुनः जिवंत झाला म्हणजे पूर्वींची आपली सर्व मालमत्ता परत मागेल; म्हणून त्याच्या गैरहजिरींत जो ती मालमत्ता वापरील ती त्यानें त्याचें कूळ म्हणून आणि त्याच्या फायद्यासाठींच वापरावयाची.

१९. वरील कल्पना बरोबर असो वा नसो, वर जीं

उदाहरणें दिलीं आहेत त्यांवरून कुटुंबधर्माच्या संबंधानें ज्या व्यवस्था एकाकालीं सर्व लोकांत अस्तित्वांत होत्या किंवा अद्यापि आहेत त्या कशा उत्पन्न झाल्या हें लक्षांत येतें.

जेथें वारसा स्त्रियांकडे जातो तेथें काय होतें तें कळत नाहीं. अशा समाजांत मृताच्या दुय्यमाच्या गरजा पुरविण्याचें काम त्याच्या एकाद्या विशिष्ट मुलीवर येऊन पडल्याबद्दल कोठें विधानें आढळत नाहींत. पण वरच्या उदाहरणांवरून जेथें वारसा मुलग्याकडे जातो, तेथें ज्याच्याकडे वारसा त्याच्याकडेच उपाध्येपण जातें हें स्पष्ट दिसतें; आणि त्या गोष्टीबद्दल ह्याच्याहूनहि ज्यास्त प्रत्यक्ष पुरावा सांपडतो.

उदाहरणार्थ, चीनदेशांत हा संबंध चांगला दृष्टीस पडतो; कारण तेथें मृताच्या प्रेतापुढें धूप जाळण्यास कोणीतरी असणें अत्यन्त आवश्यक दिसून येतें; मग तो त्याचा वडील मुलगा असो, किंवा त्याचा कोणी औरस किंवा दत्तक वारस असो; आणि तेथें वडील मुलास इतरांहून ज्यास्त मालमत्ता मिळत असून प्रेतविधींचे खर्च करावे लागतात. कोरियामध्येंहि असेंच आहे. तेथें प्रेत पुरिलें म्हणजे प्रेतविधि करणारा वडील मुलगा किंवा नातू त्याच्यापुढें व इतर थडग्यांपुढेंहि बळी नेऊन ठेवितो, व तो तेथें आल्याबद्दल त्यांत पुरलेल्यास कळवितो.

ह्या व मागील उदाहरणांवरून असें दिसून येतें कीं ज्याच्याकडे हविर्दानाचें काम जाईल त्याच्याकडे मालमत्ता जाण्याचें कारण हें कीं त्या हवींचा खर्च त्या मालमत्तेंतून करावयाचा असतो. म्हणून जेथें पितृशासित

कुटुंबघटना होती त्या समाजांत मुलगाच वारसदार होण्यास शकत असून, मृताचें संतर्पण करण्याचें साधन त्याच्यापाशींच असल्यामुळें, तोच उपाध्याय बनत असे. म्हणूनच आपल्यास मुलगा असणें हें ज्यास त्यास आपल्या समाजांत आवश्यक वाटे.

याबरोबरच हेंहि दिसून येतें कीं समाजनमुना पितृशासित असेल तेव्हां राजकीय,कौटुंबिक व धार्मिक ह्यांच्यामध्यें भेद नसतो. कुटुंबसमूहाच्या मृतमुख्यास दिलेले हे बळी प्रथमतः कौटुंबिक असतात. पुढें ह्या समूहाची वाढ होऊन त्यास जसें संयुक्तसमूहाचें स्वरूप येतें, तसा त्याच्या अधिपतिस्थानीं असलेला जो पितृशास्ता त्यास कांहींसें राजकीय स्वरूप येतें; आणि मरणोत्तर त्यास दिलेले हे बळी खंडणीच्या स्वरूपाचे बनतात; आणि तो परत आल्यावर शिक्षा करील ह्या भीतीनें त्यानें केलेले हुकूम पाळणें हें राजकीय अंकितत्व व्यक्त करण्यासारखें असतें. आणि त्याबरोबरच एका निसर्गोत्तर सत्त्वाचें संतर्पण करावयाचें ह्या दृष्टीनें जितकें हें जितक्या ह्या क्रिया केल्या जातील तितकें त्या करणारास उपाध्यायाचें स्वरूप येतें.

प्रकरण पांचवें
शास्त्याचें उपाध्यायिक स्वरूप

२०. ह्या शास्त्राच्या पहिल्या भागाच्या चवदाव्या व पंधराव्या प्रकरणांत आपल्या नजरेस असें आलें कीं प्राथमिक माणसाच्या वस्तुविषयक कल्पनाप्रमाणें पाहतां हा लोक आणि हें जीवित परलोक आणि तेथील जीवित ह्यांच्याशीं निकट रीतीनें संबद्ध असतें. गतप्रकरणाच्या शेवटीं दर्शविल्याप्रमाणें सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्या पायऱ्यांवर लौकिक आणि धार्मिक ह्यांच्यांत फारसा भेद नसतो.

धर्म व राजकारण ह्यासंबंधानें बोलतांना हक असें म्हणतो कीं एशियाच्या पूर्वप्रांतांमध्यें, तेथील दंतकथांवरून पाहतां, तीं दोन्हीं एकच असत. तेथें राष्ट्रास स्वर्ग हें नांव असून राजास देव हें नांव असे. प्राचीन इथिओपियनलोकांमधील एका शिलालेखावरून असें दिसतें कीं ते आपल्यावर राज्य करण्यास देव आपला मुलगा पाठवितो असें समजत. तद्वतच प्राचीन पेरूव्हियनलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं एकाद्या लढाईचा खर्च भागण्यास पुरेसें राजाचें इस्टेट नसल्यास, सूर्याच्या इष्टेटांतून तो कांहीं रक्कम घेत असे; कारण आपण त्याचा पुत्र समजून राजा तें आपलेंच म्हणून समजत असे.

आतां मृतमाणसाचा दुय्यम लवकरच परत येईल व पुनः पूर्ववत् व्यवहार करूं लागेल ह्या प्राथमिकलोकांच्या समजावरून, जर अशी कल्पना उत्पन्न झाली कीं जो मुलगा त्याची मत्ता धारण करितो, व तिच्या

उत्पन्नांतून त्याचें संतर्पण करितो, तो केवळ त्याचा प्रतिनिधी असतो, तर त्यापासून ऐहिक व लौकिक ह्यांचा संयोग होणें हें साहजिकच आहे. न्यूक्यालिडोनियनलोकां बद्दल आपण असें वाचितों कीं, टोकेलॉमध्यें, त्यांचा राजा टुइटोकेलॉ हा त्यांचा महोपाध्यायहि आहे, आणि त्यांच्या मोठ्या देवासहि टुइटोकेलॉ किंवा राजा टोकेलॉ असें म्हणत असतात. तेव्हां ह्या काल्पनिक प्रतिनिधित्वावरून जो संयोग उत्पन्न होतो त्याचें हें मोठें नमुनेदार उदाहरण समजलें पाहिजे.

२१. एका कुटुंबाचा अनेककुटुंबसमूह बनून त्या समूहांची जशी गांववस्ती बनत जाईल, तसे पितृशास्त्याचें कौटुंबिक, राजकीय आणि धार्मिक मुख्य, हें जें तीन प्रकारचें स्वरूप तें जाऊन, शास्ता व उपाध्या असें दोन प्रकारचेंच स्वरूप वर दाखविल्याप्रमाणें कायम राहतें. सामाजिक उत्क्रमणाच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर ह्या दोन हुद्यांचा संबंध आपल्यास सर्वत्र आढळून येतो; आणि नंतरच्या पायऱ्यांवरहि तो चालू राहिलेला दिसून येतो.

टन्नामध्यें नाईक हा मुख्य उपाध्यायाचें काम करितो; आणि शेजारच्या बेटांतूनहि तसेंच आहे. मंगायाचे राजे रोंगोचे (त्यांच्या देवाचे) उपाध्ये असत. न्यूझीलंदर लोकांमध्यें नाईक व उपाध्या यांचीं कामें बहुधा संयुक्त असून वंशपरंपरागत असत. मादागास्करचा राजा राज्यांतील मुख्य उपाध्या आहे. सांडविच बेटांत राजा देव्हाऱ्यांत बसून भविष्यकथन करीत असे. हंप्रीज बेटांमध्यें राजाच मुख्य उपाध्या असे. अमेरिकेंतील रानटी लोकांचें असेंच आहे. प्यूब्लोलोकांचे नाईक त्यांचे

उपाध्येहि असतात असें ब्यॉक्रॉफ्ट म्हणतो; चिनूक लोकांबद्दल रॉस आणि बोलिव्हियनलोकांबद्दल हचिसन असेंच सांगतो. गत व प्रस्तुत अनेक अर्धसुधारलेल्या लोकांबद्दल अशींच वर्णनें आपल्या नजरेस पडतात. प्राचीन पेरूदेशांत इन्का हा मुख्य उपाध्या असे; सूर्याचा प्रतिनिधि म्हणून अत्यन्त महत्त्वाच्या धार्मिक उत्सवांत तो अध्यक्षस्थानीं असे. सयामबद्दल टॉम्सन असें लिहितो कीं तेथें राजाच मुख्य उपाध्याय आहे. क्राफर्ड सांगतो कीं जाव्हा बेटांत राजा धर्माचा मुख्य उपाध्याय आसतो. चिनदेशांतील कायद्याप्रमाणें बादशहा मुख्य उपाध्या असून मुख्य देवाची पूजा करण्याचा हक्क त्यासच आहे, व त्यास बळी देण्याची इतरांस मनाई आहे. जपानमध्यें मिकाडो हाच राष्ट्रीय धर्माचा मुख्य उपाध्या आहे. ईजिप्तचा राजा तेथील मुख्य उपाध्याय असून तो एकाद्या देवास हवी देत आहे अशीं त्याचीं चित्रें कोरलेलीं आढळतात. आसीरियन राजाचीहि अशींच चित्रें आढळतात; आणि शिलालेखावरून असें दिसतें कीं टिग्लाथ पिलेसर हा बाबिलोनचा मुख्य उपाध्याय असे. हीब्रूलोकांच्या इतिहासांतहि डेव्हिड महोपाध्यायाचें काम करितो असें आपण वाचितों. प्राचीन काळीं आर्यलोकांत असेंच असे. होमरनें वर्णिलेल्या ग्रीक लोकांत सर्व नाईक उपाध्याच्या मदतीविना यज्ञ करतांना आढळतात. स्पार्टन राजे झीअस देवाचे उपाध्ये असत; आणि त्यांना उपाध्याचें उत्पन्नहि मिळे. आथेन्समध्येंहि राजाच महोपाध्याय असे. रोमनलोकांतहि तसेंच असे हें यावरून दिसतें कीं तेथें राजाची सत्ता

काढून लोकसत्ता स्थापिल्यावर "यज्ञ करणारा राजा" अशा एका हुद्देदाराची नेमणूक झाली. प्राथमिक स्कांडिनेव्हियनलोकांमध्यें मुख्य माणूस म्याजिस्ट्रेट व उपाध्याहि असे; प्रारंभीं प्रत्येक नाईक जेथें वस्ती करीत तेथें तो देऊळ बांधित असे, आणि स्वताच पुजाऱ्याचें काम करूं लागे.

मध्यकालीन यूरोपामध्यें हा संयोग थोडचाशा निराळ्या स्वरूपानें कायम राहिला होता. गॉन्ट्रम राजा महोपाध्या असे; शार्लमेनमध्यें महोपाध्यायाचें कांहीं स्वरूप असे; कारण धार्मिक प्रसंगीं तो पवित्र वस्तू खांद्यावर घालून नेत असे, व त्यांच्यापुढें नाचतहि असे. हल्लींहि तो संबंध अगदींच तुटलेला आहे असें नाहीं.

२२. शास्ता व उपाध्या यांच्या ह्या प्राथमिक ऐक्याचीं उदाहरणें देतांना, आणि त्यांमध्यें पुष्कळ काळपर्यंत संबंध कसा कायम राहिला हें पाहतांना, प्रारंभीं हा दुबार व्यापार कसा दृष्टीस पडतो हें पाहण्याचें सहजच राहून गेलें. एतदर्थ उपाध्या म्हणून ज्यास म्हणतात त्याची उत्पत्ति कशी झाली हें पूर्णपणें लक्षांत येण्यास आपल्यास पुनः क्षणभर प्रारंभींच्या पायऱ्यांकडे नजर फेंकिली पाहिजे.

प्रारंभीं नायकाचे उपाध्यायिक व्यापार इतर कुटुंबांच्या मुख्यांच्या तसल्या व्यापारांहून कोणत्याहि बाबतींत भिन्न नसतात. ते जसे आपल्या मृतपूर्वजांस बळी देत असतात तसे तोहि देत असतो. तर मग त्याचें उपाध्यायिक स्वरूप त्यांच्या तसल्या स्वरूपाहून ज्यास्त ठळक कसें बनतें ?

मृतनायकाचें भूत इतर भुतांहून ज्यास्त प्रबल समजून प्राथमिक समाजांतील लोक त्याचें संतर्पण करणें शहाणपणाचें समजत असतील असें अन्यत्र सुचविलें होतें; त्याबद्दलचा पुरावा डफ म्याकडोनाल्ड यांच्या 'आफ्रिका' नामक ग्रंथांत चांगला सांपडतो. त्या पुस्तकापैकीं पुढील उताऱ्यावरून ब्लांटायरमधील नीग्रोलोकांत खासगी उपाध्यायिक व्यापारांचें तसल्याच सार्वजनिक व्यापारांत संक्रमण कसें होतें हें स्पष्ट दिसतें. "ग्रामदेवांच्या संबंधानें त्यांच्यांत मतभेद दिसतो. कांहींजण असें म्हणतात कीं गांवांतील सर्व लोकांनीं, मग ते नायकाचे आप्त असोत वा नसोत, त्याच्या मृतपूर्वजांची पूजा केली पाहिजे. दुसरे असें म्हणतात कीं, नायकाचा आप्त नसलेल्या माणसानें आपल्या पूर्वजांची पूजा केली पाहिजे; नाहीं तर ते त्यास त्रास देतील. पण वास्तविक गोष्ट अशी आहे कीं गांवांतील बहुतेकजण नायकाचे आप्त असतात; आणि नसतात ते तसे समजले जातात. म्हणून सार्वजनिक प्रसंगीं सर्वजण ग्रामदेवाची पूजा करितात. खासगी प्रार्थनेच्या वेळीं ते आपापल्या पूर्वजांच्या पूजा करितात." "गावांतील नायकास उपाध्या बनण्यास आणखी एक आधार असतो. त्याचे आप्तच ग्रामदेव असतात." "स्वप्नें व दुसऱ्या थोडक्याशा खासगी गोष्टी वजा करतां बाकी प्रसंगीं गांवचा नाईक खेरीजकरून इतर कोणी गांवदेवाकडे जात नाहीं. तोच सर्वमान्य महोपाध्याय असून सर्व गांवकऱ्यांच्या तर्फे देवांची पूजा-अर्चा करितो व त्यास नैवेद्य अर्पितो."

नायकाचा उपाध्या बनण्याचा जो व्यापार त्याची

पहिली पायरी एथें आपल्यास स्पष्ट दिसते. कारण तो निसर्गोत्तर सत्त्वाशीं केवळ आपल्याच किंवा आपल्या कुटुंबाच्याच संबंधानें नव्हे, तर आपले आप्त नसलेल्या लोकांच्या वतीनें देखील मध्यस्थी करीत असतो. ह्या पायरीवर हें विभिन्नीकरण पूर्ण झालेलें नव्हतें हें लोकांच्या मतभेदावरूनच स्पष्ट दिसतें. आफ्रिकेच्या दुसऱ्या भागांत तें पूर्णपणें स्थापन झालेलें दृष्टीस पडतें. नैजर नदीवर ऑनिस्था एथें लोक राजास आपल्या व देवांमधील मध्यस्थ म्हणून सन्मानितात, आणि श्रेष्ठ सत्त्व असें म्हणून त्याला वन्दन करितात, दूरच्या व परस्परांशीं असंबद्ध अशा लोकांत अशीच स्थिति आढळून येते. सामोआमध्यें नाईक उपाध्ये असून प्रत्येक गांवचा एक देव असे, आणि त्या गांवांत जन्मलेला प्रत्येकजण त्या देवाची मालमत्ता म्हणून समजला जात असे. आणि ह्याहून ज्यास्त सुधारलेल्या प्राचीन पेरूव्हियन लोकांमध्यें असलीच प्राथमिक व्यवस्था दिसत असे.

ह्या उदाहरणावरून धार्मिक व्यापार राजकीय व्यापारापासून भिन्न होण्याचें बीज जसें नजरेस येतें, तशीच हीहि गोष्ट दिसून येते कीं प्रारंभीं धार्मिक बंधन आणि राजकीम बंधन हीं दोन्ही निष्ठेचीं बंधनें असतात; एक जिवंत नायकावर निष्ठा, आणि दुसरी मृतनायकाच्या भुतावर निष्ठा.

गैरसमज होऊं नये एतदर्थ जातां जातां आणखी एक गोष्ट एथें सांगितली पाहिजे. नायकानें आपल्या पूर्वजांची करावयाची सार्वजनिक पूजा आणि इतरांनीं आपापल्या पूर्वजांची करावयाची खासगी पूजा ह्यांमधील

जो हा भेद वाढत जाऊन नायकाचें उपाध्यायिक स्वरूप ज्यास्त ठळक करितो, तो परिस्थितीस अनुसरून बदलण्याचा संभव असतो. ज्या ठिकाणीं मृतनायकावरील किंवा पितृशास्त्यावरील निष्ठा पिढ्यानुपिढ्या इतकी पूर्ण स्थापन झालेली असेल कीं त्यास देवाचें स्वरूप आलेलें असतें; आणि ज्या ठिकाणीं लढाई व देशान्तर ह्यामुळें, वाढीस लागलालेला समाज इतका फाटून गेलेला असेल कीं त्याचे निरानिराळे अवयव त्यांचा नाईक व उपाध्या ह्याजपासून वियुक्त झाले असतील; त्या ठिकाणीं सहजच असें घडून येतें कीं, ते जरी आपल्या आप्तांच्या दुय्यमांस बळी देतच राहतात, तरी ते स्वतः होऊनच आपल्या वंशपरंपरागत देवास बळी देण्यास सुरवात करितात. प्राचीन स्कांडिनेव्हियन लोकांमध्यें प्रत्येक कुटुंबांतील मुख्य पुरुष आपल्या घरांतील उपाध्या असे, व तेथें तो ओडिन देवाला नैवेद्य अर्पण करी. होमरनें वर्णिलेल्या ग्रीकलोकांत असेंच असे. त्याचे नाईक देवांस सार्वजनिक बळी देत असून, इतर लोक आपापल्या पूर्वजांस बळी अर्पून ह्या देवांसहि अर्पित व स्तवीत. रोमनलोकांमध्येंहि तीच स्थिति होती. आणि हीब्रूलोकांस पूर्वजपूजेची जरी मनाई असे, तरी तेथें जाहवे देवाचे सार्वजानिक संतर्पक असून प्रत्येक इस्रलाइटलाहि खासगी रीतीनें संतर्पण करण्याची मनाई नसे; कारण ते लोक फिरते असल्यामुळें पुष्कळांचा मिळून एकच उपाध्या करितां येत नसे.

पण ह्या गोष्टी अर्थात् समाजाची ज्यास्त प्रगति झाल्याबर दृष्टीस पडतात; आणि ज्या पहिल्या पायरी-

वर देव व उपाध्या ह्यांची एकदम उत्पत्ति होत असते त्या पायरीवर दृष्टीस पडत नाहींत.

२३. एवंच ज्या पिशाचक्लृप्तीवरून धर्मविषयक अनेक गोष्टींचें स्पष्टीकरण होतें त्याच क्लृप्तीवरून उपाध्यायिक व्यापाराच्या उत्पत्तीचें, आणि त्या व्यापाराच्या राजकीय व्यापाराशीं प्रारंभीं असलेल्या संयोगाचें स्पष्टीकरण होतें.

मृतमाणसांच्या दुय्यमांचीं संतर्पणें प्रथम त्यांचे सर्व आप्त आणि नंतर कुटुंबांचे मुख्य करीत असून, जेव्हां तीं अत्यन्त प्रबल कुटुंबाचा मुख्य करूं लागतो, तेव्हां तीं इतर संतपर्णांहून कांहींशीं भिन्न म्हणून समजूं लागतात. पुढें ह्या प्रबल कुटुंबाचें प्राबल्य जसें वाढत जाईल, आणि त्याच्या मृतमुख्याचें भूत इतर भूतांहून श्रेष्ठ मानिलें जाऊं लागेल, तशी प्रथम कांहींच्या, नंतर अधिकांच्या, आणि शेवटीं सर्वांच्या मनांत त्याचें संतर्पण करण्याची इच्छा उत्पन्न होते. आणि ह्या इच्छेवरून शेवटीं त्यास त्याच्या शास्त्या वंशजाच्या द्वारा हवी व प्रार्थना अर्पण करण्याची चाल उत्पन्न होते, आणि अशा रीतीनें त्या वंशजाचें उपाध्यायिक स्वरूप ठळक बनतें.

आतां, सामाजिक उत्क्रमण वाढत जाईल, तसा उपाध्यायिक व्यापार जरी राजकीय मुख्याच्या हातांत पुष्कळ काळपावेतों राहिला, आणि कधीं कधीं तो तो करीत असला, तरी तो बदलीच्या द्वारा कसा होऊं लागतो, हें आपणास पाहणें आहे.

प्रकरण सहावें

उपाध्येवर्गाचा उदय

२४. प्रस्तुत शास्त्राच्या पांचव्या भागांत असें दाखविलेलें आहे कीं नायकाचा मुलूख वाढत जाईल तसें त्याचें काम वाढत गेल्यामुळें त्याला मदतनीस लावावे लागतात. म्हणून तो प्रथम वरचेवर आणि मागाहून निरंतर, सेनापति, न्यायाधीश, इत्यादि दृष्टीनें करावयाचे व्यापार इतरांकडे सोंपवूं लागतो. ह्याबरोबरच तो आपलें उपाध्येपणाचें काम कमजास्त प्रसंगीं इतरांकडे देऊं लागतो.

दिवाणी किंवा लष्करी कामाचा फार बोजा पडला म्हणजे असले प्रतिनिधी नेमूं लागतात ह्याचें उदाहरण रोमनलोकांत दिसून येतें. तेथील राजांना लढाया करावयाच्या असल्यामुळें यज्ञ करण्यास त्यांस वेळ मिळत नसे,आणि म्हणून तें काम ते उपाध्यांकडे संपवीत असत. म्याकडोनाल्ड म्हणतो, ब्लान्टायरमधील नीग्रोलोकांत नाईक घरीं नसल्यास त्याची बायको उपाध्याचें काम करिते, आणि दोघेंहि नसल्यास त्याचा धाकटा भाऊ तें काम करितो. ह्यावरून उपाध्येवर्गाची सहजगत्या कशी उत्पत्ति होते हें चांगलें दिसतें.

ही धाकट्या भावाची उपाध्येगिरी वरील उदाहरणांत तत्पुरती असून इतरत्र कायमची उत्पन्न झालेली दृष्टीस पडते. न्यूझीलंदर लोकांमध्यें कांहीं ठिकाणीं नाईक उपाध्ये असून इतरत्र नायकाचे भाऊ उपाध्ये असतात. मेक्सिकोच्या साम्राज्यांत राजाचा दुसरा मुलगा नेहमीं

महोपाध्या असे असें कांहीं इतिहासकार म्हणतात. तद्वतच प्राचीन पेरूमध्यें महोपाध्यायाचें काम राजाचा भाऊ किंवा चुलता किंवा राजकुलांतील दुसरा कोणी पुरुष करीत असे. खोंडलोकांमध्येंहि असेंच असे. ताहितीमध्यें राजा हा वरचेवर देवाचें स्वरूप धारण करून लोकांनीं अर्पिलेल्या हवींचें व प्रार्थनांचें ग्रहण करीत असे, आणि राजकुलांतील कोणीतरी पुरुष महोपाध्यायाचें काम करीत असे. डुपुई आपल्यास सांगतो कीं आशान्टीमध्यें एक उपाध्या राजकुलांतील असे. अमेरिकेच्या मया राष्ट्रांमध्यें असेंच असे. ईजिप्तमध्यें राजा महोपाध्याय असून त्याचे कांहीं आप्त इतर उपाध्यांचें काम करीत.

कांहीं ठिकाणीं मुख्याचें उपाध्यायिक काम त्याच्या कुलांतील एकादी बाई करिते. डमारालोकांत नायकाची मुलगी उपाध्यीण असते; आणि हवी देण्याच्या कामाखेरीज अग्नि जिवंत ठेवण्याचें काम तिचें असतें. डाहोमनलोकांत कांहीं ठरीव प्रसंगीं हवी थडग्यापाशीं आणिले म्हणजे राजकुलांतील उपाध्यीण भुताची प्रार्थना करिते. प्राचीन पेरूमध्यें मुख्य उपाध्यीण सूर्याची मुख्य बायको समजली जात असून ती राजाची बहीण किंवा मुलगी असे. चिब्चालोकांत नायकांप्रमाणें उपाध्येलोकांतहि बहिणीच्या मुलाकडे मृताचा वारसा जाई असें आपण वाचितों; ह्यावरून असें दिसतें कीं बायकांकडे उपाध्येपण जाण्याचें कारण त्यांच्या द्वारा वारसदारी जात असें हें असावें. डमारालोकांत वारसदारीचा हा कायदा अद्यापि अमलांत आहे. पेरूव्हियनलोकांत

तसा कायदा एका कालीं होता; आणि डाहोमनलोकां-मध्यें राजकीय बाबतींत बायकांचें महत्त्व फार आहे ह्याचा विचार करतां त्यांच्यांतहि तसाच कायदा एका कालीं असावा असें दिसतें. हें कारण खरें म्हणून समजण्यास आणखी एक कारण असें दिसतें कीं डेहामी व पेरूमध्यें उपाध्येवर्गांत बायकाच पुष्कळ असत; आणि मादागास्कारमध्यें वारसा बायकांच्या वंशांत जात असून तेथें उपाध्ये बायकाच आहेत. आतां ही वारसदारीची चाल स्त्रीवंशांतून पुरुषवंशाकडे गेल्यानें, आणि ह्या निरानिराळ्या वारसदारीच्या पद्धती असलेल्या लोकांचें मिश्रण झाल्यानें उपाध्येपण बायकापुरुषांत वांटलेलें दिसण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, क्यारेनलोकांमध्यें ग्रामोपाध्ये पुरुष असून कौटुंबिक पूर्वजपूजा कुटुंबांतील सर्वांत वडील बायको करीत असते.

शास्त्या कुटुंबांतील माणसांकडे उपाध्येपण करण्याचें काम देण्याची ही चाल प्राथमिक पायऱ्यांवर सामान्य असून तिला योग्य विभिन्नीकरण म्हणतां येईल. कारण, हवी घेणारा देव, देव झालेला पूर्वज असून त्याला दिले जाणारे हवी वंशजांकडूनच दिले जात राहतात. जेथें हवी देणाराचें देवांपासून वंशजत्व वास्तविक नसेल, किंवा लोकांस खरें वाटत नसेल, तेथें तसें ढोंग करितात; उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें राजा आपण देवाचे आप्त आहों असें नेहमीं प्रपादीत असल्यामुळें त्याच्या कुटुंबांतील माणसें देववंशोत्पन्न आहेत असें घेऊन चालत असत.

२५. पण हा जरी उपाध्येवर्गाचा नेहमींचा उगम असें म्हणतां येईल तरी आणखी कांहीं उगम आहेतच.

पूर्वींच्या एका प्रकरणांत आपल्या असें लक्षांत आलेंच आहे कीं प्रारंभीं वैदू आणि उपाध्या ह्यांजमध्यें स्पष्ट भेद नसतो. वैदू हा जरी भुतांचा संतर्पक नसून त्यांना हांकलून देणाराच असतो, आणि उपाध्या हा जरी त्यांस शत्रूप्रमाणें न समजतां मित्राप्रमाणें समजत असतो, तरी दोघेही कधीं कधीं एकमेकांप्रमाणें वागत असतात. ह्याचीं उदाहरणें दुसऱ्या कलमांत दिलींच आहेत. तद्वतच ऑस्टियॉकलोकांमध्यें शामनलोक वैदू असून ते लोकांच्या वतीनें त्यांच्या देवांशीं मध्यस्थीहि करीत असतात. गोंडलोकांतील वैदूचें काम भुतें मंत्रांनीं काढणें, देवास कौल लावणें, पाऊस पाडणें, इत्यादि प्रकारचें असतें. आणि कुकीलोकांमध्यें ज्या माणसांचें काम क्रुद्ध देवास थंड करण्याचें असतें ते कधीं कधीं देवाजवळ असलेल्या आपल्या वजनाचा दुरुपयोग करितात अशी कल्पना आहे. एवंच ह्या ठिकाणीं उपाध्येवर्गाचा आणखी एक उगम आपल्या दृष्टीस पडतो.

निसर्गोत्तरसत्वांच्या द्वारा वैदू हवेंत फरक करूं शकतो, व अशा रीतीनें टोळीचा फायदा करितो, असा जेथें समज असेल तेथें त्यास उपाध्याचें स्वरूप विशेषतःच येतें. उदाहरणार्थ, ओबोलोकांत नाईक पाऊस पाडणाराहि असतो; आणि बेचुआनाचा राजा सेकेली हा पावसाची जादू करीत असतो. म्हणजे, लोकांचा फायदा करण्याकरितां ह्या गोष्टी तो करितो ह्या दृष्टीनें तो उपाध्याचेंच काम करितो असें म्हटलें पाहिजे.

कांहीं ठिकाणीं, टोळीमध्यें अशा देवभूतसत्त्वांची पूजा उत्पन्न होते कीं ते देवभूत नायकाचे आप्त नसून, कांहीं

तरी विलक्षण कृतीवरून भीति उत्पन्न करील अशा कीर्ती-प्रत पावलेले असतात. उदाहरणार्थ, हिस्लॉप एका गोंड माणसाबद्दल असें सांगतों कीं, तो आपल्या अंगीं अद्भुत शक्ति आहे असें म्हणतो; त्यानें आपल्या बापाच्या थडग्यावर एक पवित्र ढीग उभारला आहे, कारण त्याच्याहि अंगीं अद्भुतशक्ति असे, आणि ह्या ढोंगावर तो पुष्कळ पैसे राणीकडून काढितो; त्यांतून कांहीं तो आपल्या बापास बळी अर्पण्याच्या कामीं खर्च करितो, आणि बाकीचे स्वतः खर्च करितो.

ह्यावरून असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं कीं प्रारंभींच्या पायऱ्यांवर नायकाच्या पूर्वजापासून उत्पन्न न झालेल्या अशा कांहीं माणसांस कधीं कधीं उपाध्याचें स्वरूप येतें; आणि ते कधीं कधीं नेहमींच्या रीतीनें उत्पन्न झालेल्या उपाध्यांपेक्षांहि वरचढ होतात. जेथें देशान्तर किंवा लढाई ह्यांजमुळें समाजाचे असे कांहीं तुकडे होतील कीं ज्यांत मानीव देवाचे वंशज मुळींच नाहींत, तेथें असले उपाध्ये उत्पन्न होण्याचा संभव विशेषच असतो.

२६. जोंपर्यंत एकादा समाज अविभक्त राहील तोंपावेतों उपाध्येवर्गाच्या वाढीची ह्याच्या पुढची पायरी उत्पन्न होऊं शकत नाहीं; पण जेव्हां त्यांतील लोकसंख्या वाढल्यामुळें त्यांस विभक्त होणें भाग पडतें तेव्हां आणखी विभिन्नीकरण उत्पन्न होतें. डमारालोकांबद्दल अण्डर्सन जें म्हणतो त्यावरून हें कसें होतें हें लक्षांत येतें. तो म्हणतोः—नायकाच्या गांवांतून एकादें कुटुंब दूर जाऊन रहावयास निघालें म्हणजे नाईक त्यांतील मुख्यास पवित्र अग्नीपैकीं कांहीं देतो, आणि नंतर उ-

पाध्याचें काम त्या मुख्याच्या मुलीकडे जातें. आतां हें उघडच आहे कीं, जेथें टोळीचा मृतशास्ता किंवा दुसरा कोणी विलक्षण माणूस देव बनला असून त्याची पूजा करणें आवश्यक बनलेलें असेल, तेथें त्या टोळींच्या एकाद्या भागानें देशान्तर केल्यास त्यांच्या वतीनें ती करण्यास कोणीतरी असलाच पाहिजे. आतां अशा भागांत टोळीच्या मुख्याचे आप्त कोणी तरी असण्याचा संभव आहेच; म्हणून त्यांपैकीं वयानें जो सर्वांत वडील असेल, किंवा मुख्याचा जो सर्वांत ज्यास्त निकट आप्त असेल, त्याकडे तें काम सहजच येईल. बरें, पुढें त्याच्या पश्चात् तें काम त्याचा जो वारस असेल त्याकडेसच जाईल. अशा रीतीनें उपाध्येवर्गाची उत्पत्ति प्रथम कशी होते हें लक्षांत येतें. उदाहरणार्थ, हिस्लॉप असें म्हणतो कीं गोंडलोकांत जरी उपाध्ये नाहींत तरी त्यांच्यांतील कांहींजण, त्यांच्या अंगीं कांहीं विशेष सामर्थ्य आहे किंवा कांहीं पवित्रस्थानांशीं त्यांचा संबंध आहे, ह्या मुद्यावर पूजा करण्यास पुढें होतात. कांहीं ठिकाणीं हा बदल कसा होत जातो हें सांताळलोकांच्या उदाहरणावरून दिसून येतें. हंटर म्हणतोः—त्यांच्यांतील दोन टोळ्यांनीं धर्माकडे विशेष लक्ष दिलेलें आहे, आणि त्यांच्यांतून बऱ्याच भटांचा पुरवठा होतो. त्यांपैकीं एक टोळी सरकारी धर्माची गुमास्ती आहे; हा धर्म कौटुंबिक पायावर रचलेला आहे, आणि प्रारंभींचा कुटुंबगुरु जो पांचवा पुत्र त्याचे वंशज त्या धर्माचें उपाध्येपण करितात. कांहीं ठिकाणीं दुसऱ्या पुत्राचे वंशज हें काम ज्यास्त चांगलें करितात असें समजतात.

एकादी टोळी विजेती असून तिच्यांतील लोक जिंकलेल्या मुलुखावर राज्य करावयास गेले म्हणजे त्याच्या योगानेंहि उपाध्येवर्ग मोठा होण्यास मदत होते. कारण ह्या राज्य करणाऱ्याबरोबर उपाध्येहि तिकडे पाठवावे लागतात. पेरूव्हियनलोकांमध्यें अगदीं असें झालेलें होतें. म्हणजे, तेथें जिंकलेल्या मुलुखांतून इन्काचे आप्त उपाध्ये म्हणून पसरलेले होते.

२७. आतां ज्या ठिकाणीं टोळी शांततेनें राहणारी असल्यामुळें देवभूत झालेले नाईक ग्रामदेव बनलेले नसतील तेथें भिन्न असा उपाध्येवर्ग स्पष्ट बनत नाहीं. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाल लोकांत उपाध्येगिरी वंशपरंपरागत नाहीं, तर त्यांचें काम त्यांच्यातील वडील माणसें करीत असतात.

परंतु उपाध्येवर्गाची वाढ आणखी कशी होत जाते ह्याचा विचार करणें शक्यहि नाहीं व जरूरहि नाहीं. सर्वत्र अन्य कांहीं कारणें उत्पन्न होऊन पहिला जो वाढीचा क्रम असतो त्यांत घोंटाळा उत्पन्न होतो. प्रथम मृतनायकाच्या आत्म्याची पूजा त्याचा वारस करीत असून, वारसाच्या अभावीं तें काम त्याच्या धाकट्या भावाकडे जात असतें; पुढें जेथें नायकास काम फार पडूं लागेल तेथें त्याच्या भावाकडे किंवा त्याच्या कुटुंबांतील दुसऱ्या कोणाकडे तें काम कायमचें जाऊं लागतें. नंतर एकाद्या टोळीचे कांहीं भाग जेव्हां देशान्तरीं रहावयास जातात तेव्हां त्यांच्या ग्रामदेवाचे सख्खे किंवा चुलत कोणी तरी वंशज त्यांच्याबरोबर असतात; ते आपला धर्म बरोबर घेऊन जातात आणि त्याचे विधी करितात. तद्वतच

एकादी टोळी जेव्हां शेजारचा मुलूख जिंकते तेव्हां शास्त्या कुटुंबांतील कांहींजण तेथें उपाध्येपणाचें काम करावयास जातात. ह्या सर्व गोष्टी जरी आपल्या दृष्टीस पडतात तरी ह्या सरणीमध्यें घोंटाळा उत्पन्न करणारींहि कांहीं कारणें आपल्यास आढळून येतात. प्रबल अशा निसर्गोत्तर सत्वांशीं नाईक किंवा त्याचा उपाध्या आप्त ह्यांचें वजन असतें असें जसें समजतात तसें मांत्रिक किंवा पाऊसपाड्या ह्यांचेंही असतें म्हणून समजतात. कधीं कधीं एकादा तिऱ्हाइतहि तेथें रहावयास येऊन तो आपल्या श्रेष्ठज्ञानानें किंवा हिकमतीनें लोकांत भीति व पूज्यबुद्धि उत्पन्न करितो, आणि त्याच्या उपदेशावरून किंवा तोच देव बनल्यामुळें आणखी एक पंथ तेथें उत्पन्न होतो. शिवाय, कधीं कधीं असें होतें कीं, ह्या देशान्तरीं गेलेल्या लोकांचा एकादा अग्रणी विशेष प्रसिद्धीस आल्यास तो मेल्यावर कदाचित् त्याचीहि पूजा सुरू होते, आणि कदाचित् त्याचा एक उपाध्येवर्ग उत्पन्न होऊं लागतो. एवंच, पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर देखील, परिस्थितींत फेरबदल झाल्यामुळें धर्मविषयक घटनेंत भिन्नभिन्न प्रकार उत्पन्न होऊं लागतात.

पण आणखी कांहीं कारणांनीं ह्याच्याहून ज्यास्त संकीर्ण भेद उत्पन्न होत असतात; त्यांजकडे आपण आतां लक्ष देऊं.

प्रकरण सातवें

अनेकेश्वरी व एकेश्वरी उपाध्येवर्ग

२८. अनेकेश्वरी उपाध्येवर्गाचें प्रारंभींचें कोंवळें स्वरूप गतप्रकरणांतून अगोदरच व्यक्त झालेलें आहे. कारण जेथें जेथें टोळीच्या देवभूत मूळपुरुषाची पूजा होत असून टोळींतील लोक आपापल्या मृतपूर्वजांच्या पूजा करीत असतील, तेथें तेथें बीजभूत अनेकेश्वरी धर्म, व त्यास योग्य असा उपाध्येवर्ग आहेच असें म्हटलें पाहिजे. असल्या लोकांच्या मतें अप्रसिद्ध भुतें आणि प्रसिद्ध भुतें ह्यांच्यामध्यें जातिभेद नसतो, तर केवळ सामर्थ्यभेद असतो. म्हणजे, नंतरच्या पायऱ्यांप्रमाणें प्रारंभींच्या पायऱ्यांवरहि छोट्या निसर्गोत्तर सत्त्वामध्यें एक मोठें निसर्गोत्तर सत्त्व असतें; आणि त्यांचें सर्वांचें संतर्पण सारख्याच विधींनीं होत असतें.

ज्यास अनेकेश्वरी धर्म म्हणून सामान्यतः म्हणत असतात त्याची उत्पत्ति अनेक प्रकारीं होत असते; त्यांपैकीं दोन विशेष महत्त्वाचे असल्यामुळें त्यांचा उल्लेख करूं.

ज्या टोळ्या मोठ्या झाल्यामुळें त्यांस स्वस्थानीं पोटास मिळत नाहींसें होतें त्यांचे भाग पडून त्या पसरल्यामुळें त्यांतील पहिला प्रकार उत्पन्न होत असतो. प्रत्येक विभक्त झालेल्या पोटटोळींमध्यें शेवटीं कोणीतरी प्रसिद्ध नाईक किंवा वैदू उत्पन्न होतो; आणि त्याच्या भुताची पूजा त्याचे केवळ वंशजच नव्हत तर टोळींतील इतर लोकहि करूं लागल्यामुळें तो एक नवा

स्थानिक देव बनतो. आणि जेथें त्या पोटटोळीनें आपल्याबरोबर आणिलेला पंथ कायम राहिला असेल तेथें त्या प्राचीन देवाच्या पूजेबरोबर त्या पोटटोळींत ह्या नवीन देवाची पूजा सुरू होते. ह्या रीतीनें नवे पंथ उत्पन्न झाल्याचीं उदाहरणें आपल्या नजरेस पुष्कळ ठिकाणीं येतात. मालागासीलोकांमध्यें निरनिराळ्या टोळ्यांचे निरनिराळे देव आहेत; व ते त्यांचें रक्षण विशेषतः करीत असतात असें समजतात; ह्यांपैकीं चार इतरांहून श्रेष्ठ समजले जातात, म्हणजे, ते सार्वजनिक किंवा राष्ट्रीय देव आहेत. आणि एलिस असें म्हणतो कीं एका प्रांतांतल्या देवांस इतर प्रांतांतील लोक फारसे लेखीत नाहींत. प्राचीन ईजिप्शनलोकांत प्रत्येक प्रांताच्या सुभेदाराचें राहावयाचें एक मुख्य ठिकाण असून त्याचा रक्षणकर्ता एक विशेष देव असे, व त्याची त्या प्रांतांतील लोक मुख्यत्वेंकरून पूजा करीत. अन्य प्राचीन लोकांमध्यें अशीच स्थिति असे हें सविस्तर सांगण्याचें प्रयोजन नाहीं. आतां असें असलें म्हणजे स्थानिक देवांचे उपाध्ये व सार्वजनिक देवांचे उपाध्ये असे निरानिराळे उपाध्येवर्ग उत्पन्न होऊन त्यांच्यांत लहान-मोठे असे पदवीभेदहि उत्पन्न होतातच. उदाहरणार्थ ईजिप्त देशांत अशी स्थिति असे, अशीं वर्णनें आढळतात.

एका टोळीनें किंवा राष्ट्रानें दुसऱ्यावर विजय मिळविला म्हणजे विजेते आपला धर्म विजितांवर लादितात, किंवा निदान स्वतःपुरता तरी विजित देशांत सुरू करितात. हें अनेकेश्वरी धर्म आणि उपाध्येवर्ग स्थापन होण्याचें दुसरें कारण होय. ह्याचीं उदाहरणें ग्रीक व

रोमन ह्या दोन्ही लोकांत सांपडतात. रोमनलोकांनीं पुष्कळ लोकांस जिंकल्यामुळें ते नेहमीं नवे नवे धर्म आपल्यांत ओढून घेत असत. एकाद्या शहरास वेढा घातला म्हणजे ते लोक त्यांतील देवतांना गंभीरपणें आव्हान करीत असत. मेक्सिको व पेरू या देशांच्या इतिहासांवरून असेंच दिसतें; म्हणजे,त्यांनीं जिंकलेल्या देशांतून तेथले धर्म व उपाध्येवर्ग असून शिवाय ह्यांचे-हि स्थापन होत असत.

धर्मामध्यें संकीर्णता उत्पन्न होण्यास जीं लहानसहान कारणें होत असतात त्यांतील तीन एथें सांगण्यासारखीं दिसतात. एक कारण स्थानिक देवांची कीर्ति वाढल्यामुळें त्यांचीं अन्यस्थानीं देवळें बांधितात हें होय. ह्याचें उदाहरण एस्क्युलेपियसची पूजा कशी वाढत गेली हें होय. त्याची पूजा स्थानिक पूर्वज आणि वैद्य म्हणून पर्ग्यामनमध्यें सुरू झाली; पण त्याला जसें देवस्वरूप आलें तशी ती पूर्व व पश्चिम ह्या दोन्ही दिशांनीं पसरत गेली; आणि सरतेशेवटीं रोममध्यें स्थापन झाली. दुसरें कारण म्हटलें म्हणजे प्रबल पुरुषांस देवांचें स्वरूप येऊन त्यांनीं आपल्या पिशाचांचें संतर्पण करण्याकरितां उपाध्येवर्ग स्थापणें; ह्याचीं उदाहरणें ईजिप्त देशांत सांपडतात. आणि तिसरें कारण जीं माणसें कांहीं विशिष्ट कारणांवरून लोकांस विलक्षणशीं वाटतील त्यांना कधीं कधीं देवस्वरूप येणें. ह्याचीं उदाहरणें ह्या देशांतहि दृष्टीस पडतात.

२९. नव्या देवांच्या पूजा वरचेवर उत्पन्न होणें, आणि पुष्कळ काळपावेतों अनेक देवांच्या पूजा एकाच

ठिकाणीं चालू राहणें, ह्या गोष्टी वरील दृष्टीनें पाहतां जरी आपल्यास स्वाभाविक दिसतात, तरी पुष्कळांस त्या विलक्षण वाटतात. प्राचीन रूढींची उपपत्ति अर्वाचीन कल्पनांच्या आधारें करावयास लागून हे लोक रोमनलोकांनीं जिंकलेल्या लोकांच्या धर्मांत हात घातला नाहीं ह्याबद्दल आश्चर्य करितात. पण ह्या गोष्टीकडे आमच्या दृष्टीनें न पाहतां त्यांच्या दृष्टीनें पाहिल्यास त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. कारण त्यांस आपल्या पूर्वजांपासून उत्पन्न झालेल्या आपल्या देवांइतकेच त्यांच्या पूर्वजांपासून उत्पन्न झालेले त्यांचे देव खरे म्हणून सहजच वाटत असत.

ह्यावरून दुसऱ्याहि कित्येक गोष्टींची उपपत्ति लागते. प्राचीनकाळीं पुष्कळ वेळां जेते व वस्ती करावयास गेलेले लोक स्थानिकदेवांना संतुष्ट करतांना दृष्टीस पडत. ह्याचें कारण हें कीं, ते देव त्याठिकाणीं प्रबल असल्यामुळें त्यांना संतुष्ट न ठेविल्यास ते आपल्यास त्रास देतील अशी त्यांस भीति वाटे हें होय. ह्याचीं उदाहरणें ईजिप्शन व पेरूव्हियन ह्या दोन्ही लोकांत सांपडतात.

कांहीं लोकांमध्यें निरनिराळे धर्म एकत्र वास करतांना दृष्टीस पडतात. ह्याचें कारण हें कीं, ते समजतात कीं, प्रत्येकानें आपापल्या देवाची पूजा करणें जसें जरूर आहे, तशी दुसऱ्यांच्या देवांची पूजा करणें जरूरीचें नाहीं, किंवा निषिद्ध आहे. ह्याचें उदाहरण प्राचीन ग्रीकलोकांत दृष्टीस पडतें.

ह्या सर्व उदाहरणांवरून असें स्पष्ट होतें कीं, अनेकेश्वरी पंथ उत्पन्न होऊन ते व त्यांचे उपाध्येवर्ग पुष्कळ

काळपावेतों कायम राहतात ह्याचें कारण मूळची पूर्वजपूजा हें होय.

३०. परंतु अनेक देवांच्या धर्मांच्या पहिल्या पायऱ्यांवर एका धर्मानें दुसऱ्याचा पाडाव करण्यासाठीं स्पष्ट यत्न केलेले जरी दृष्टीस पडत नाहींत, तथापि त्यांच्यामध्यें बहुधा प्रतिस्पर्धा उत्पन्न होते, आणि पाडाव करण्याच्या कामीं अर्थात् ही पहिली पायरी असते.

मुलगे ज्या मनोभावानें प्रेरित होत्साते कधीं कधीं आपल्या बापांच्या शक्तीविषयीं बढाई मारतांना दृष्टीस पडतात, त्याच मनोभावानें प्रेरित होऊन माणूस प्रारंभींच्या पायऱ्यांवर आपल्या पूर्वजांचीं सामर्थ्यें इतरांच्या पूर्वजांच्या सामर्थ्यांहून जास्त आहेत अशी बढाई मारीत असतात. आणि असें झालें म्हणजे त्यांजमध्यें त्यांच्या त्यांच्या टोळ्यांच्या मूळ जनकांबद्दल तंटे उत्पन्न व्हावयाचेच. फीजीमध्यें ह्याचें उदाहरण पाद्र्यांच्या नजरेस आलें; कारण तेथें प्रत्येक प्रांतांतील लोक आपापल्या देवांच्या श्रेष्ठत्वाबद्दल भांडत असत. हीब्रूलोकांमध्यें देखील सभोंवतालच्या लोकांच्या संबंधानें आमचा देव तुमच्याहून श्रेष्ठ आहे असा समज दिसून येई. ग्रीसमध्यें देखील निरनिराळ्या शहरांमध्यें धर्मविषयक स्पर्धा असून, कोणाच्या देवास जास्त लोक बळी देतात अशी अहमहमिका त्यांजमध्यें दिसे, आणि तिचा कल धर्मविषयक वैषम्य उत्पन्न करण्याकडे असे. ह्याचा परिणाम कांहीं देव व त्यांचे उपाध्ये ह्यांस इतरांहून जास्त दर्जाचे समजणें हा होत असे. धर्माचें मूळस्वरूप निष्ठाप्रदर्शन हें असल्यामुळें आणि ती निष्ठा प्रथम जिवंत पितृशास्ता किंवा

विजेता ह्याप्रत दर्शवीत असून मागाहून त्याच्या पिशाचाप्रत दर्शवीत असल्यामुळें, ज्या कारणामुळें मुख्याप्रत दर्शविण्याची निष्ठा कमजास्त होत जाईल त्याच कारणांनीं त्याच्या मरणानंतर त्याच्या पिशाचाप्रत दर्शविण्याची निष्ठा कमज्यास्त होत जाते. ह्या दोन निष्ठांमधील संबंध किती निकट असतो हें सांताळलोकांच्या उदाहरणावरून व्यक्त होतें. कारण त्यांच्यांत लग्नाचेवेळीं वधूस आपली टोळी व तिचे देव हे टाकून देऊन नवऱ्याचे स्वीकारावे लागतात.

ह्यावरून एका शास्त्यास लोक कंटाळले म्हणजे जसे दुसऱ्या शास्त्याप्रत जातात तद्वत् कांहीं कारणांवरून अनेकेश्वरी लोकांमध्यें एका देवाचे भक्त कमी होऊन दुसऱ्याचे कसे वाढत असतील हें लक्षांत येतें. रानटी लोक देवांस बळी दिले असूनहि ते प्रसन्न न झाल्यास जसे त्यांस मारितात, तद्वत् त्यांच्याहून पुढें गेलेले लोक अशा प्रसंगीं आपल्या देवांस सोडून दुसऱ्या देवांकडे धांव घेतात. अशा रीतीनें कांहीं देवांचें माहात्म्य वाढतें आणि कांहींचें कमी होतें. राजकीय कारणांवरून देखील कधीं कधीं कांहीं धर्म इतरांहून उच्चतर बनतात. उदाहरणार्थ, ग्रीसमध्यें जुलमी राजे सरदारांचें माहात्म्य कमी करण्याकरितां त्यांच्या देवांपेक्षां शेतकऱ्यांच्या देवांना जास्त महत्त्व देत असत.

पण जेथें पुष्कळ देव असतील तेथें त्यांच्या मानीव सामर्थ्यांमध्यें जो कमजास्तपणा उत्पन्न होतो तो विजयांमुळें होतो. लष्करी चळवळीमुळें जशा जिवंतांमध्यें निरनिराळ्या पदव्या उत्पन्न होतात, तशा पूजित-

मृतांमध्येंहि होतात. पुराणांतून वरचेवर देवांनीं मिळविलेल्या जयांचीं वर्णनें आढळतात; देवांदेवांमध्यें झालेल्या लढायांचींहि आढळतात, आणि त्यांत श्रेष्ठ देवास कनिष्ठांवर जय मिळाला म्हणून वर्णन असतें. विजेत्या परकीलोकांस देवस्वरूप येऊन जें देवमंडळ बनतें त्याच्या ठिकाणीं असलेच विशेष दिसले पाहिजेत. आणि एका राष्ट्रास दुसऱ्या राष्ट्रानें जिंकिलें म्हणजे एक देवमंडळ दुसऱ्याहून जें श्रेष्ठ बनतें, त्यामुळेंच लहान देव व मोठे देव यांच्या सामर्थ्यांमध्यें आणि त्यांच्या उपाध्येवर्गांमध्यें मुख्यत्वेंकरून भेद उत्पन्न होत असतात.

२१. सरतेशेवटीं अनुकूल परिस्थितीमध्यें एकेश्वरीकडे धर्माचा कल जाऊं लागतो. आतां हें खरें आहे कीं, पुष्कळ काळपावेतों अनेकेश्वरी लोकांच्या मनांत निरनिराळ्या देवांच्या सामर्थ्यांसंबंधानें झगडा चाललेला असतो. उदाहरणार्थ, वेदामध्यें व ईजिप्शन धर्मग्रंथांमध्यें निरनिराळे देव सर्वांहून जास्त समर्थ अशीं वर्णनें आढळतात. निरनिराळ्या देवांचे भक्त आपापल्या देवाबद्दल इतकी अतिशयोक्ति करितात कीं, केवळ इतर सर्व वस्तूंनाच नव्हे, तर इतर सर्व देवांनाहि त्या देवापासून अस्तित्व प्राप्त झालें आहे असें ते म्हणतात.

पण सरतेशेवटीं देव व माणसें ह्यांच्या ह्या जनकाचें पद भक्तांच्या मनांत कायमचें ठरून जातें; आणि पुढें तें दुसऱ्या एकाद्या देवानें बळकाविल्यास तेणेंकरून एकेश्वरीकडील लोकांचा कल कमी न होतां ज्यास्त होतो; कारण तेणेंकरून नवा देव जुन्यापेक्षांहि अधिक प्रबल आहे असा विश्वास त्यांच्या मनांत उत्पन्न होतो. विजेते

लोक व त्यांचे देव श्रेष्ठ आहेत असा समज उत्पन्न झाल्यानें जितलोकांस स्वतःचे देव कमी योग्यतेचे कसे वाटूं लागतात हें प्राचीन पेरूव्हियनलोकांच्या उदाहरणावरून स्पष्ट होतें. त्या लोकांनीं स्प्यानिश लोकांस जेव्हां पुलाच्या कमानींला प्रथम आधार देऊन बांधतांना आणि मागाहून ते आधार काढून घेतांना पाहिलें, तेव्हां त्यांस वाटलें कीं, हे खरोखरच सूर्याचे पुत्र असले पाहिजेत. पुढें ते जे ख्रिस्ती बनले त्यास उघडच ही त्यांच्या मनाची स्थिति कारण झाली असली पाहिजे. आणि समाजोत्क्रमण चाललें असतां वरचेवर मनावर असे परिणाम होत गेले म्हणजे लहान लहान देव मोठमोठ्या देवांतून हळू हळू मिसळून जाऊं लागतात.

जेथें एकाद्या राजास जिवंतपणीं दुसरे देश जिंकण्याची हांव फार असून त्याचे विजयाचे सर्व बेत पुरे झाल्याशिवाय तो मरतो व त्याच्या भुताचें संतर्पण त्याचा मुलूख वाढवून करीत असतात, तेथें हें धाकट्या देवांचें मोठ्या देवांत जिरून जाणें विशेष प्रमाणावर होत असतें. ईजिप्शनदेव असूर आणि हीब्रूदेव जाहवे ह्यांचें असें झालेलें होतें. प्रारंभापासून एकंदर निसर्गोत्तरसत्त्वें मत्सरी असतात अशी समजूत असते असें दिसतें. भुतांना योग्य बळी न दिल्यास तीं रागावतात व जिवंतांवर सूड उगवितात असें प्राथमिक लोक समजतात. तद्वतच एकाद्या देवाच्या देवळांत लोक जात नाहींसे झाल्यास, किंवा नैवेद्य आणीत नाहींसे झाल्यास ते रागावतात, आणि संकटें उत्पन्न करितात, असें समजतात. आणि ह्या देवांपैकीं एकादा देव ज्याची अधिकारतृष्णा

कधीं तृप्त होणारी नाहीं अशा शास्त्यापासून उत्पन्न झालेला असेल, आणि त्याचें मूत मत्सरी असून इतर देवांची पूजा त्यास सहन होत नसेल, तर त्याचे भक्त प्रबल बनल्यास तो इतर देवांची पूजा नाहींशी करूं शकतो.

आतां हें उघडच आहे कीं, एकेश्वरीकडे अशी प्रगति व्हावयास लागली, म्हणजे उपाध्येवर्गाचें एकीकरण होण्याकडेहि प्रगति व्हावयास लागते. लहानलहान देवांचे संतर्पक कमी होऊन अजीबाद नाहींसे होऊं लागतात, आणि अत्यंत प्रबल किंवा सर्वशक्तिमान् मानिलेल्या देवाचे संतर्पक सर्वत्र स्थापिले जाऊं लागतात.

३२. अनेकेश्वरीपासून एकेश्वरी उत्क्रान्त होण्यास ही जी कारणें होतात, त्यांत आणखी एका कारणाची भर पडत असते; तें कारण लोकांचें वाढत जाणारें शिक्षण आणि त्यामुळें त्यांचें वाढत जाणारें विचारसामर्थ्य, हें होय. उदाहरणार्थ, इन्का उपान्की ह्याच्याबद्दल घोलीना असें म्हणतो कीं, तो इतका बुद्धिमान् होता कीं सूर्य हा विश्वाचा निर्माता नसून दुसरा कोणी तरी त्याच्याकडून हें काम करविणारा असला पाहिजे असें अनुमान त्यानें बांधिलें होतें, आणि म्हणून त्याची पूजा करण्याकरितां देवळें बांधण्याचा हुकूम त्यानें दिला होता. तद्वतच मेक्सिकोमध्यें टेझकूकोचा राजा नेझाव्हाटल ह्यानें स्थापित मूर्तींना केलेल्या प्रार्थना फुकट गेल्या असें पाहून असें अनुमान केलें कीं सर्व विश्वाचा निर्माता कोणी तरी दुसरा अदृश्य व अज्ञात देव असला पाहिजे; आणि म्हणून ह्या “ अज्ञात देवाला ”, “ सर्व कारणांच्या कारणाला ” एक नऊ मजली देऊळ त्यानें

बांधिलें. सारांश, ग्रीकलोकांमध्यें जी गोष्ट घडून आलेली दिसते तीच ह्या त्यांच्याहून अगदीं भिन्न लोकांमध्यें दिसते. प्लेटोच्या संभाषणांत अशिक्षित लोकांच्या अडाणी कल्पनांचें निरसन केलेलें असून, एकेश्वरीकडे ज्याचा कल आहे असें निरूपण त्यांमध्यें केलेलें आढळतें. तद्वतच प्राथमिक हीब्रू व हीब्रू भविष्यवादी ह्यांच्या कल्पनांची तुलना करतां त्यांचा एकेश्वरीकडे कल होण्यास त्यांची मानसिक प्रगतिच कांहीं अंशीं कारण झाली असें स्पष्ट दिसतें.

शिवाय हेंही ध्यानांत आणण्यासारखें आहे कीं एकेश्वरीकडे एकदां प्रगति सुरू झाली म्हणजे अत्यन्त बुद्धिमान् लोकांमध्यें ती वाढत्या प्रमाणानें होत जाते. एका निसर्गोत्तर सत्त्वाचें श्रेष्ठत्व एकदां स्थापन झालें म्हणजे मग असा विचार मनांत उत्पन्न होतो कीं बाकीचीं निसर्गोत्तर सत्त्वें जो कांहीं अधिकार चालवितात तो त्याच्या परवानगीनें चालवितात. पुढें लवकरच अशी कल्पना उत्पन्न होते कीं ते त्याचे गुमास्ते असून त्याचाच अधिकार चालवितात; आणि हें " कारणांचें कारण " माणसाच्या मनामध्यें जसें प्रबळ होत जाईल, तशीं दुय्यमकारणें त्याच्या मनांतून निघून जाऊं लागतात.

३३. एकेश्वरी धर्म व त्याच्या सहगामी संस्था यांच्या उत्क्रमणाची योग्य कल्पना मनांत येण्यास, तिच्यांत कमजास्तपणा उत्पन्न करण्यास जीं कित्येक कारणें होतात त्यांचा विचार केला पाहिजे.

एक श्रेष्ठ देवता उत्पन्न होण्याचे जे प्रथम प्रथम दिसणारे कल ते कधीं कधीं तेथल्या तेथेंच मरतात

सामाजिक उत्क्रमणाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर प्रबळ नायकी जशी तत्पुरतीच असते, आणि विजेत्या नायकानें मिळविलेली सत्ता त्याचा वारस जशी पुष्कळ-वेळां गमावितो, तद्वतच देवांमधील मानीव नायकी सामान्यतः टिकणारी नसते ह्याला अनेक कारणें होतात. मृतमाणसाचा दुय्यम प्रथम कांहीं काळपावेतों अस्तित्वांत राहणारा म्हणून समजला जात असून जेथें त्याचें स्मरण राहण्यास अनुकूल स्थिति असेल, तेथेंच तो कायमचा अस्तित्वांत राहणारा म्हणून समजला जाऊं लागतो; आणि त्याचप्रमाणें भुतें व देव ह्यांमध्यें श्रेष्ठत्व कायम राहण्यास त्याच्याबद्दलच्या दंतकथा कायम राहाव्या लागतात, आणि व्यवस्थित विधी चालण्यास योग्य अशी सामाजिक स्थिति असावी लागते. पुष्कळ ठिकाणीं ह्या गोष्टी असाव्या तशा नसतात. कोमांची लोकांमध्यें दंतकथा कशा नष्ट होत जातात ह्याजबद्दल बोलतांना स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्यांच्यामध्यें चवथ्या पिढीच्या बायकांचीं नांवें त्यांना आठवत असतील किंवा नाहीं ह्याबद्दल मला शंका वाटते; आणि १७७० मध्यें १२८ वर्षांपूर्वीं न्यूझीलंदमध्यें तासमन ज्या ठिकाणीं उतरला होता त्या नजीक पंधरा मैलांच्या आंत जेव्हां कूक उतरला तेव्हां त्यास त्याच्याबद्दलची कांहीं एक दंतकथा ऐकूं आली नाहीं. एवंच, सर्वत्र जरी अत्यन्त प्राचीन जो पूर्वज त्याला मुख्य देव मानण्याची प्रवृत्ति दृष्टीस पडते, तरी झुलूलोकांच्या अंकुलंकुलूच्या संबंधानें दिसते त्याप्रमाणें निसर्गोत्तर सत्त्वांची ही नायकी

स्मरणांतून जाण्याचा आणि अलीकडील नायक्या तेवढ्या लक्षांत राहण्याचा संभव असतो.

कायमचें देवमंडळ राहण्याविरुद्ध आणखी एक कारण असें होतें कीं, जबरीनें किंवा जय मिळवून जे राजे बनतात त्यांच्याबद्दलचा ठसा लोकांच्या मनांवर खोल उठल्यामुळें पूर्वीच्या देवभूत माणसांबद्दलचा ठसा क्षीण होतो. ग्रीसमध्यें क्रोनॉसनें यूरेनसवर, आणि झीअसनें क्रोनॉसवर जें श्रेष्ठत्व स्थापन केलें त्यावरून ही गोष्ट व्यक्त होते. पृथ्वीवरील नायक्या आणि स्वर्गांतील नायक्या ह्यांच्यामध्यें होणाऱ्या फेरबदलांत आणखी एक प्रकारचें साम्य दृष्टीस पडतें. राजकीय संस्थांचा विचार करतांना ही गोष्ट आपल्या लक्षांत आलीच आहे कीं, कधीं कधीं राजाच्या हातांतून प्रधानाच्या हातांत सत्ता जाण्याचा संभव असतो; कारण त्याच्या द्वारा सर्व बातमी येत असून सर्व हुकूम सुटत असतात. तद्वतच, मुख्य निसर्गोत्तर सत्त्वाशीं मध्यस्थी करणारें जें दुय्यम निसर्गोत्तर सत्त्व त्याची पूजक नेहमीं प्रार्थना करीत असल्यामुळें तेंच कधीं कधीं प्रबल बनतें. उदाहरणार्थ, रोमनक्याथलिकलोकांमध्यें कुमारी मेरी हिची प्रार्थना नेहमीं होत असल्यामुळें आणि "देवमाता" म्हणून तिला नेहमीं म्हणत असल्यामुळें तीच सर्वांत श्रेष्ठ म्हणून अंधुकशी कल्पना मनांत उत्पन्न होते. आणि रोममध्यें पोपाच्या मठांत काढिलेल्या चित्रपटामध्यें तिची मूर्ति पिता, पुत्र व पवित्र आत्मा ह्या त्रयीच्या अमळ वर काढिलेली दृष्टीस पडते.

अनेकेश्वरी पंथांपासून एकेश्वरी पंथांचें जें उत्क्रमण

सामाजिक वं
प्रबळ नाअ
नायकांनुर

प्रकरण आठवें

धर्माधिकारी मंडळें

वेळांधरि· प्रत्येक समाजाच्या घटकसंस्थांमध्यें रचना-षांचीं बहुधा साम्यें आढळून येत असतात. जेथें राजकीय घटनेची वाढ फारशी झालेली नसेल तेथें धार्मिक घटनेचीहि वाढ अल्पच झालेली असते; आणि जेथें राजकीय सत्ता एकाच्या हातीं असून जुलमी असते तेथें धार्मिक सत्ताहि तशीच असते. आतां क्रांत्यांमुळें राजकीय सत्तेंत आणि अन्यधर्मस्थापनेमुळें धार्मिकसत्तेंत जरी फेरबदल झाले तरी पुनः समतोल उत्पन्न झाला म्हणजे त्यांच्यांतील हा साम्यसंबंध पुनःदिसूं लागतो.

म्हणून धर्माधिकारी मंडळांचा तेवढाच विचार करण्यापूर्वीं प्रारंभीं एकस्वरूपच असणाऱ्या ह्या दोन घटना पुष्कळकाळपर्यंत आपलें उद्गमैक्यामुळें उत्पन्न झालेलें स्वरूपैक्य कसें कायम राखितात हें जरा सविस्तररीतीनें पाहूं.

३९. हा संबंध वर दर्शविल्याप्रमाणें मुख्यत्वेंकरून जेथें राजकीय व धार्मिक संस्था अस्थाईक असतील तेथें दिसून येतो. उदाहरणार्थ, नागलोकांबद्दल स्टुअर्ट व बटलर असें सांगतात कीं, त्यांच्यांत राजकीय सरकार अगदीं बेताचें असून त्यांच्याकडे उपाध्येवर्गहि दिसत नाहीं. कोमांचीलोकांबद्दल स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्यांच्या नायकांची सत्ता बहुतेक नांवाचीच असते, आणखी असेंहि म्हणतो कीं त्यांच्यांत मला उपाध्येवर्ग दिसला नाहीं; त्यांच्यामध्यें जर कांहीं धार्मिक सत्ता असेल तर ती नायकाच्या ठिकाणींच वसत असली

पाहिजे. आतां राजकीय नायकी स्थापित नसल्यास उघडच मृतनायकास कोणी ओळखणार नाहीं, आणि म्हणून नेमलेला संतर्पकहि असूं शकणार नाहीं.

पितृशासित नमुन्याची घटना उत्पन्न झाली म्हणजे ह्या दोन्ही सरकारांस त्यांचें मूलस्वरूप प्राप्त होतें. प्रारंभींच्या पायऱ्यांवर कुटुंबाचा बाप त्याचा गृहशास्ता असून तो आपल्या पूर्वजाच्या भुताला बळी देत असतो. तद्वतच टोळीचा मुख्य किंवा गांवाचा नाईक राजकीय अधिकार चालवीत असून मृतनायकाच्या पिशाचाची आपल्या व इतरांच्या वतीनें पूजा करीत असतो. असें जर आहे तर धार्मिक व राजकीय संस्थांस एकस्वरूपानेंच सुरवात होते हें उघडच आहे; कारण अशा वेळीं असणारा वैदू हा वास्तविक उपाध्या असतो. उदाहरणार्थ, पूर्वेकडील स्लाव्हलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत कुटुंबाचा किंवा टोळीचा जो मुख्य असेल तो सर्वांच्या वतीनें एका पवित्र वृक्षाखालीं बळी देत असे. ह्यावरून प्रारंभीं राजकीय व धार्मिक क्रिया व त्यांचे कर्ते ह्यांमध्यें भेद झालेला नसतो हें स्पष्ट होतें. जेथें उपाध्यांसारखे कोणी उत्पन्न झाले असतील, तेथें देखील राजकीय शासन पक्क झालेलें नसल्यास, ते इतरांहून भिन्न म्हणून ओळखले जात नसतात, आणि त्यांस स्वतंत्र अधिकार नसतात. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाललोकांत गांवनायकाचा अधिकार जबरीचा नसून लोकांनीं स्वेच्छेनें दिलेला असतो, आणि घरांतील वडील माणसेंच उपाध्याचें काम करितात. लोक भटकणाऱ्या स्थितींत असल्यामुळें राजकीय संघटनेस जसा व्यत्यय

सामाजिक बंधानें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्या-
प्रबळ नाआहे; ती अशी कीं, ते पंथ पूर्ण होत नाहींत
नायकानेंशुद्ध रहात नाहींत. उदाहरणार्थ, हीब्रूधर्म जरी
वेळांश्वरी आहे तरी त्याच्यांत अनेकेश्वरी धर्मांची भेसळ
पुष्कळच आहे, हें अगोदर सांगितलेंच आहे. आणि
त्या धर्मापासून उत्पन्न झालेल्या धर्मांपैकीं पिता, पुत्र,
पवित्र आत्मा ह्या त्रयीचा जो धर्म तो तर तितक्या-
पुरता तरी अनेकेश्वरीच आहे. सैतानाच्या अस्तित्वावर
विश्वास ठेवणें हें तरी अनेकेश्वरीचेंच लक्षण आहे. तेव्हां
ख्रिस्त्यांपैकीं जे युनिटेरियन नामक पंथाचे आहेत तेव-
ढेच कायते शुद्ध एकेश्वरी आहेत.

शिवाय ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं,
ज्या ठिकाणीं कमजास्त पूर्ण अशा एकेश्वरीनें मूळची
अनेकेश्वरी दाबून टाकली असेल तेथें ती दुसऱ्या रूपानें
बहुधा डोकें वर काढिते. उदाहरणार्थ, महमदीय धर्माच्या
अनुयायांनीं सर्वत्र एकेश्वरी स्थापण्याकरितां आपलें व
इतरांचें इतकें रक्त सांडलेलें आहे, तरी त्यांच्यामध्यें
अनेकेश्वरी पुनः उत्पन्न झालेली आहे. बेडुइनलोक सा-
धूंच्या थडग्यांपाशीं बळी देतात; इतकेंच नाहीं, तर
त्यांच्याहून जास्त सुधारलेल्या मुसलमानांमध्यें मृतसं-
तांचीं त्यांना देवळें बांधून पूजा करीत असतात. तद्व-
तच मध्ययुगीन ख्रिस्तीलोकांमध्यें संत बनलेले उपाध्ये
आणि मठवाले ह्यांचे लहान लहान नवे देव बनत असत.
हल्लीं फीजीमध्यें प्रत्येक नायकाचा जसा अत्यंत विश्वा-
साचा असा एक विशेष देव असतो, तसा कांहीं शत-

कांपूर्वी प्रत्येक सरदाराचा एक मदतनीस नसल्यास प्रसंगीं तो त्याचा धांवा करी. ीं, आणि

अशा प्रकारच्या कारणांवरून धर्मसंस्थांम. बदल होतात हें यावरून दिसतें कीं, ख्रिस्त म्हणजे देवळांना संतांचीं नांवें देत असतात, किंवा तीं ...र्- अर्पण करीत असतात. तात्पर्य, एकेश्वरी आणि तत्संबंधी घटना ह्या त्या लोकांत पूर्णत्वास पावलेल्या नाहींत.

सामाजिक सं
प्रबळ नाअ
नायकांतुड
वेळांश्वरी

प्रकरण आठवें
धर्माधिकारी मंडळें

प्रत्येक समाजाच्या घटकसंस्थांमध्यें रचना-यांचीं बहुधा साम्यें आढळून येत असतात. जेथें राजकीय घटनेची वाढ फारशी झालेली नसेल तेथें धार्मिक घटनेचीहि वाढ अल्पच झालेली असते; आणि जेथें राजकीय सत्ता एकाच्या हातीं असून जुलमी असते तेथें धार्मिक सत्ताहि तशीच असते. आतां क्रांत्यांमुळें राजकीय सत्तेंत आणि अन्यधर्मस्थापनेमुळें धार्मिक-सत्तेंत जरी फेरबदल झाले तरी पुनः समतोल उत्पन्न झाला म्हणजे त्यांच्यांतील हा साम्यसंबंध पुनःदिसूं लागतो.

म्हणून धर्माधिकारी मंडळांचा तेवढाच विचार करण्यापूर्वीं प्रारंभीं एकस्वरूपच असणाऱ्या ह्या दोन घटना पुष्कळकाळपर्यंत आपलें उद्गमैक्यामुळें उत्पन्न झालेलें स्वरूपैक्य कसें कायम राखितात हें जरा सविस्तररीतीनें पाहूं.

३९. हा संबंध वर दर्शविल्याप्रमाणें मुख्यत्वेंकरून जेथें राजकीय व धार्मिक संस्था अस्थाईक असतील तेथें दिसून येतो. उदाहरणार्थ, नागलोकांबद्दल स्टुअर्ट व बटलर असें सांगतात कीं, त्यांच्यांत राजकीय सरकार अगदीं बेताचें असून त्यांच्याकडे उपाध्येवर्गहि दिसत नाहीं. कोमांचीलोकांबद्दल स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्यांच्या नायकांची सत्ता बहुतेक नांवाचीच असते, आणखी असेंहि म्हणतो कीं त्यांच्यांत मला उपाध्येवर्ग दिसला नाहीं; त्यांच्यामध्यें जर कांहीं धार्मिक सत्ता असेल तर ती नायकाच्या ठिकाणींच वसत असलीं

पाहिजे. आतां राजकीय नायकी स्थापित नसल्यास उघडच मृतनायकास कोणी ओळखणार नाहीं, आणि म्हणून नेमलेला संतर्पकहि असूं शकणार नाहीं.

पितृशासित नमुन्याची घटना उत्पन्न झाली म्हणजे ह्या दोन्ही सरकारांस त्यांचें मूलस्वरूप प्राप्त होतें. प्रारंभींच्या पायऱ्यांवर कुटुंबाचा बाप त्याचा गृहशास्ता असून तो आपल्या पूर्वजाच्या भुताला बळी देत असतो. तद्वतच टोळीचा मुख्य किंवा गांवाचा नाईक राजकीय अधिकार चालवीत असून मृतनायकाच्या पिशाचाची आपल्या व इतरांच्या वतीनें पूजा करीत असतो. असें जर आहे तर धार्मिक व राजकीय संस्थांस एकस्वरूपानेंच सुरवात होते हें उघडच आहे; कारण अशा वेळीं असणारा वैदू हा वास्तविक उपाध्या असतो. उदाहरणार्थ, पूर्वेकडील स्लाव्हलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत कुटुंबाचा किंवा टोळीचा जो मुख्य असेल तो सर्वांच्या वतीनें एका पवित्र वृक्षाखालीं बळी देत असे. ह्यावरून प्रारंभीं राजकीय व धार्मिक क्रिया व त्यांचे कर्ते ह्यांमध्यें भेद झालेला नसतो हें स्पष्ट होतें. जेथें उपाध्यांसारखे कोणी उत्पन्न झाले असतील, तेथें देखील राजकीय शासन पक्क झालेलें नसल्यास, ते इतरांहून भिन्न म्हणून ओळखले जात नसतात, आणि त्यांस स्वतंत्र अधिकार नसतात. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाललोकांत गांवनायकाचा अधिकार जबरीचा नसून लोकांनीं स्वेच्छेनें दिलेला असतो, आणि घरांतील वडील माणसेंच उपाध्याचें काम करितात. लोक भटकणाऱ्या स्थितींत असल्यामुळें राजकीय संघटनेस जसा व्यत्यय

येतो तसाच धार्मिक घटनेसहि येतो. उदाहरणार्थ, प्राथमिक आरबलोकांबद्दल टील असें म्हणतो कीं, निरनिराळ्या भुतांचे व देवांचे जरी आनुवंशिक उपाध्ये होते, तरी तेथें भटांचा स्वतंत्र वर्ग म्हणून नव्हता. तद्वतच जेथें देश डोंगराळ वगैरे असल्यामुळें लहान जमावांचे मोठे जमाव बनण्यास अडथळा होत असेल तेथें राजकीय घटनेप्रमाणें धार्मिक घटनाहि साधी असते. उदाहरणार्थ, ग्लाडस्टन म्हणतो कीं, ग्रीकलोकांत निरनिराळ्या शहरच्या उपाध्यांमध्यें घटनासंबंध कांहीं एक नव्हता; म्हणजे तेथें जरी उपाध्ये होते, तरी उपाध्येवर्ग नव्हता.

उलटपक्षीं, सामाजिक संकलनाबरोबर जसें राजकीय सरकार प्रौढ होत जातें तसें धार्मिक सरकारही बहुधा वाढीस लागतें. उदाहरणार्थ, ताहितीमध्यें राजा, सरदार, जमीनदार, आणि सामान्य लोक अशा निरनिराळ्या पदव्या असून उपाध्यांमध्येंहि तसेच पदवीभेद असत, व ते आपापल्या पदवीच्या लोकांमध्यें तेवढें उपाध्येपण करीत; आणि सार्वजनिक देवळाच्या पुजाऱ्यांचा एक निराळाच वर्ग असे. डेहामी व आशान्टी ह्यांमध्यें जबरीचें शासन आणि अनेक दर्जांचे दिवाणी अधिकारी असून भट व भटणी ह्यांचेहि अनेक वर्ग आहेत. प्राचीन अमेरिकन राष्ट्रांमध्यें असलाच संबंध दृष्टीस पडे. त्यांच्या राजकीय संस्था जशा संकीर्ण व निरनिराळ्या दर्जांच्या अधिकाऱ्यांच्या बनलेल्या असत, तशाच धार्मिकहि असत. आणि त्यांच्याहूनहि जास्त सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें तसेंच आहे ही गोष्ट सविस्तर सांगण्याची जरूर नाहीं.

आतां कोणाचा गैरसमज होऊं नये म्हणून असें सांगणें इष्ट दिसतें कीं राजकीय संघटनेपासून भिन्न अशी धार्मिक संघटना उत्पन्न होण्यास ह्या लोकचे व्यवहार आणि परलोकचे व्यवहार परस्पर भिन्न आहेत हा विचार लोकांच्या मनांत स्पष्टपणें यावयास पाहिजे. ज्या ठिकाणीं हे दोन लोक एकमेकांस लागलेले किंवा एकमेकांशीं निकटसंबद्ध आहेत अशी कल्पना असेल तेथें त्यांच्या संबंधाच्या घटना एकच असतात, किंवा अस्पष्टपणें भिन्न झालेल्या असतात. उदाहरणार्थ, प्राचीन ईजिप्तमध्यें जिवंत व मृत ह्यांमधील संबंध फार निकट असून राजा दिवाणी व धार्मिक दोन्ही प्रकारचीं कामें करीत असे; आणि प्रत्येक शहरांत एक मुख्य उपाध्या व मोठा उपाध्येवर्ग असून तो शहरचा कारभार करी. जपानी लोकांमध्येंहि अशीच स्थिति होती. जपान हा भुतांचा देश आहे आणि भुतांना वरच्या दर्जाचीं बनविण्याचें सामर्थ्य मिकाडोला आहे असा समज तेथें असून तेथील दरबारांत उपाध्यांच्या एकाखालीं एक सहा पदव्या होत्या, आणि ऐहिक व पारमार्थिक दोन्ही प्रकारचे कारभार ते पहात असत. तात्पर्य, जपानांत धर्म व सरकार हीं एकच असत. चीनमध्येंहि असेंच आहे. तेथें उपाध्ये व सरकारी कारभारी एकच आहेत. तेथील बादशहाच तेथील मुख्य उपाध्याय आहे असें नाहीं, तर तेथील चार मुख्य प्रधान ऐहिक व धार्मिक सरदार आहेत. सारांश, टील म्हणतो त्याप्रमाणें, चीनदेशांत निराळा उपाध्येवर्ग दिसत नाहीं ह्याचें का-

रण धार्मिक व ऐहिक दोन्ही शासनें एकाच माणसाच्या हातीं तेथें असतात हें होय.

३६. जेथें राजकीय व धार्मिक संघटना पृथक् झालेल्या आहेत तेथें जें त्यांच्यांत साम्य दिसतें तें त्या दोहोंची उत्पत्ति पूज्यबुद्धीच्या मनोभावापासून झालेली आहे ह्यामुळें दिसतें. ऐहिक शास्त्याच्या आज्ञा जेथें तत्परतेनें पाळिल्या जातात तेथें मानीव पारलौकिक शास्त्याच्याही तशाच पाळिल्या जातात; आणि जो स्वभाव एका प्रकारची आज्ञाधारकता अमलांत आणणारें कारभारीमंडळ वृद्धिंगत करण्यास अनुकूळ असेल, तोच दुसऱ्या प्रकारची आज्ञाधारकता अमलांत आणणारें कारभारी मंडळ वृद्धिंगत करण्यास अनुकूळ असतो.

प्राचीन अमेरिकन समाजांमध्यें हा संबंध चांगला दृष्टीस पडे. उदारणार्थ, मेक्सिकोमध्यें प्रत्येक वीस कुटुंबांना एक शास्ता इतकी राजकीय संघटना वृद्धिंगत झालेली असून उपाध्येवर्गहि तसाच वृद्धिंगत झालेला होता, आणि लोक दोघांसहि अगदीं नमून असत. तेथें चाळीस हजार देवळें असल्याचा टार्किमेडोनें केलेला अंदाज क्लाव्हिगारो ह्यास फार कमी वाटतो, आणि तो म्हणतो कीं तेथें निदान दहा हजार भट असतील; आणि तेथें प्रत्येक मोठ्या माणसाचा एक उपाध्या किंवा भट असे असें हेरारा म्हणतो त्यावरून हा अंदाज बरोबर दिसतो. पेरूमध्येंहि तसेंच असे. तेथें इन्काचा अधिकार अनियंत्रित असून दहाजणांपैकीं एकजण अधिकारी असे, आणि उपाध्येहि तितकेच विपुल असत. ह्याचें कारण ह्या दोन लोकांचा स्वभाव हेंच असलें पा-

हिजे. जे लोक (मेक्सिकनलोक) इतके अंकित होते कीं त्यांच्यांत मान्टिझूमानाला (तेथील राजाला) सरदार आपल्या खांद्यावरून नेहमीं नेत असत, आणि जेथें सामान्य माणसानें त्याच्या तोंडाकडे पाहिल्यास त्यास देहान्तशिक्षा होई, त्या लोकांनीं देवांस दरवर्षी पाहिजे तितके आपले बळी देण्यास तयार व्हावें, आणि त्यांस संतुष्ट करण्यासाठीं नेहमीं आपलें रक्त अर्पित असावें ह्यांत नवल नाहीं. आबिसीनियामध्येंहि असेंच आहे. ब्रूस म्हणतो, तेथील राजे कायद्यांस मुळींच जुमानीत नाहींत; आणि तो असेंहि म्हणतो कीं तेथल्या इतकीं देवळें इतरत्र कोठेंच नसतील.

ह्याच्या उलट स्थिति असेल तेथें उलट संबंध दृष्टीस पडतो ह्याबद्दलचा फारसा पुरावा द्यावयास नको. ग्रीक लोकांचे समाज आणि त्या काळचेच इतर समाज ह्यांच्यांतील फरकाकडे लक्ष दिल्यानें सहज असें लक्षांत येईल कीं, जो सामाजिक स्वभाव राजकीय संघटना फारशी वाढण्यास प्रतिकूल असतो तो धार्मिक संघटनेच्या वाढीसहि प्रतिकूल असतो.

३७. उपाध्येवर्गाचा आकार जसा वाढत जातो तसे त्याच्यामध्यें त्यास मंडलाचें स्वरूप देणारे विशेष उत्पन्न होत जातात. म्हणजे, संकलीभवनाबरोबर विभिन्नीकरणहि वाढत जातें.

राजकीय व धार्मिक घटना बरोबर वृद्धिंगत होत जातात हें ह्या गोष्टीवरून व्यक्त होतें कीं प्रारंभीं धार्मिक घटना राजकीय घटनेहून नंरतच्यापेक्षां कमी भिन्न असतां, त्यांतील निरनिराळ्या रचनाहि परस्परांपासून स्प-

ष्टपणें भिन्न झालेल्या नसतात. टील म्हणतो कीं चिनी धर्माप्रमाणें इजिप्शन धर्महि प्रारंभीं पिशाचपूजाच असे हें त्यांच्या धर्मसंस्थांवरून व्यक्त होतें. ह्या लोकांमध्येंहि भटांची म्हणून पृथक् ज्ञाति नव्हती. वंशज पूर्वजांना बळी अर्पीत, सरकारी अधिकारी विशिष्ट स्थानिक देवतांना अर्पीत, आणि राजा सर्व राष्ट्राच्या देवतांना अर्पी. नियमित असा उपाध्येवर्ग पुढेंच उत्पन्न झाला, पण ते वंशपरंपरा नसत. बरें, प्राचीन रोमनलोकांमध्यें उपाध्ये हे इतर नागरिकांहून भिन्न वर्गाचे म्हणून नसत. हल्लीं सार्वजनिक नोकऱ्यांच्या संबंधानें जसले नियम दृष्टीस पडतात तसले त्यांच्यांत नसत. त्यांच्यांत एकच माणूस शहरांतील पोलिसावर अधिकार चालवी, राष्ट्राचा कारभार पाही, कायद्यांचे मसुदे करी, न्यायाधिशाचें किंवा उपाध्याचें काम करी, आणि सेनाधिपतीचें काम करी. आणि नव्या स्वीकारिलेल्या धर्माच्या संबंधानें जरी परिस्थिति निराळी असते तरी कारभारीमंडळाच्या वाढीच्या संबंधानें हेंच मूळ तत्त्व दृष्टोत्पत्तीस येतें. उदाहरणार्थ, गीझो असें म्हणतो कीं, अगदीं प्रारंभींच्या काळीं ख्रिस्ती समाज म्हणजे सामान्य पंथ आणि सामान्य मनोभाव ह्यांमुळें बनलेला साधा समुच्चय असे. त्यांच्यांत ठराविक धर्ममतें, नियम, शिक्षा, म्याजिस्ट्रेट इत्यादि कांहीं दिसत नसे. परंतु त्या समाजाची जशी वाड होत गेली, तशा ह्या सर्व गोष्टी त्यांच्यांत दिसूं लागल्या. एका प्रकारच्या म्याजिस्ट्रेटांना प्राचीन हें नांव असून ते उपाध्ये बनले; दुसऱ्यांना तपासनीस किंवा देखरेख्ये असें नांव असून ते विशप बनले; तिसऱ्यांस

डीकन किंवा धर्माध्यक्ष हें नांव असून ते गरीबांची काळजी करीत आणि त्यांस धर्म करीत. अधिकाऱ्यांची निवड करणें, शासनाचे नियम ठरविणें, आणि धर्ममत निश्चित करणें, ह्या सर्व बाबतींत एकंदर ख्रिस्ती समूहाचा अधिकार चाले. म्हणजे, धर्मविषयक सरकार आणि ख्रिस्तीजन ह्यांच्यांत अद्यापि विभाग उत्पन्न झालेला नव्हता.

राजकीय मंडळाप्रमाणेंच धार्मिक मंडळामध्येंहि क्रमिक अधिकाऱ्यांची स्थापना करण्यास अनेक कारणें पृथक्पणें किंवा संयुक्तरीत्या स्वव्यापार करीत असतात. नात्याच्या बंधनानेंच बद्ध झालेल्या लहान लहान समाजांत संघामध्यें उपाध्ये असल्यास त्यांच्या लोकांवरील वजनांत कमज्यास्तपणा उत्पन्न होऊं लागतो; आणि त्याचा परिणाम त्यांना सहक्रिया करावयाची असेल तर तेव्हां त्यांच्यांत कांहींसा उच्चनीचभाव उत्पन्न व्हावा हा होतो. उदाहरणार्थ, बोडो व ढिमाल लोकांतील उपाध्यांच्या संबंधानें आपण असें वाचितों कीं कांहीं गांवांवर मिळून एक धामी (मुख्य उपाध्या) असतो, आणि तेवढ्या त्या गांवांमधील देवर्षींवर (छोट्या उपाध्यांवर) त्याचा कांहींसा आनिश्चित पण सर्वमान्य असा अधिकार चालतो. पुढें जेव्हां लढाईमुळें लहान लहान समाज एकत्र होऊन मोठाले समाज बनतात तेव्हां जेत्या समाजाच्या राजकीय नायकाचें श्रेष्ठत्व जसें सगळ्या समाजावर स्थापन होतें तसें धार्मिक मुख्याचेंहि होतें. संयुक्त झालेल्या समाजांचे धर्मपंथ जेथें पृथक् पृथक् राहतात तेथेंहि ही प्रवृत्ति दिसून येते. उदाहरणार्थ,

पेरूमध्यें जितलोकांचे जरी पृथक् पृथक् उपाध्ये असत तरी त्या सर्वांवर पेरूमधील उपाध्यांचे निरनिराळे वर्ग अधिकार चालवीत.

ह्या अंकितपणाव्यतिरिक्त प्रत्येक धर्मपंथामध्यें उच्चनीच भाव असतातच. उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें उपाध्यांच्या अशा निरनिराळ्या पदव्या असून त्यांचीं निरनिराळीं कामें असत. आर्केडियनलोकांमध्येंहि असेंच असे. रोममध्येंहि फार संकीर्ण व फार श्रीमान् असें धर्मसंस्थान असे. आणि मेक्सिकन लोकांतहि असेंच असे. उदाहरणार्थ, त्यांच्यापैकीं कांहीं यज्ञ करणारे किंवा होते असत, कांहीं भविष्यवादी असत; कांहीं स्तोत्रें रचणारे असत, व कांहीं तीं म्हणणारे असत. कांहीं उपाध्यांचें काम देऊळ स्वच्छ ठेवण्याचें असे, आणि कांहीं देवाचे दागिने जपून ठेवीत; आणि कांहींचीं कामें मुलांस शिकविणें, पंचांगाचें शोधन करणें, उत्साह ठरविणें, आणि पौराणिक चित्रें जपून ठेवणें, इ० असत.

जेथें दुसऱ्या धर्मांचें क्षेत्र व्यापूं लागलेला धर्म एकेश्वरी असल्यामुळें दुसरे धर्म त्यास कबूल नसतील. किंवा सह्य होत नसतील, तेथें देखील असलीच केंद्रीभूत आणि विशिष्टीभूत धर्मसंघटना उत्पन्न होते. उदाहरणार्थ, ख्रिस्ती धर्माच्या संस्थेची वाढ कशी होत गेली हें सांगतांना **गीझो** म्हणतो:—प्रारंभीं बिशप हा प्रत्येक शहरचा तपासनीस व तेथील धर्ममंडलाचा मुख्य असे. पुढें जेव्हां ख्रिस्तीधर्माचा प्रसार खेडगांवांतून झाला तेव्हां हे शहरबिशप पुरेनासे झाले. म्हणून प्रांतबिशपांची उत्पत्ति झाली. पुढें प्रत्येक लहान लहान ग्राम-

समूहाचा एकेक उपाध्या उत्पन्न झाला. पुढें ह्या लहान लहान उपाध्यांवर मोठमोठ्या उपाध्यांचा अधिकार चालूं लागला, आणि अशा रीतीनें हल्लीं दिसते तशा प्रकारची संघटना उत्पन्न झाली.

धार्मिक संघटनेची ही वाढ पूर्णपणें लक्षांत येण्यास ती कोणत्या तऱ्हेनें होत गेली हें पाहिलें पाहिजे. म्हणजे, वाढत जाणाऱ्या संकलनाबरोबर विभिन्नीकरणहि कसें वाढत गेलें हें लक्षांत येईल. " दुसऱ्या शतकाच्या पहिल्या बऱ्याच काळांत ख्रिस्ती देवसंस्थानें एकमेकांपासून स्वतंत्र असत; पण कालान्तरानें एकएका प्रांतांतील सर्व देवळांचें मिळून एकेक धर्ममंडळ बनत गेलें; आणि त्यांतील निरनिराळ्या देवळांचे अधिकारी सर्वसामान्य हितांचा विचार करण्याकरितां एकत्र जमूं लागले. ह्या सभांमुळें धर्मसंस्थेचें एकंदर स्वरूप बदलून गेलें, आणि तीस नवें स्वरूप आलें; कारण त्यांनी लोकांचे हक्क बरेच मर्यादित केले, आणि बिशपांचा अधिकार व सामर्थ्य हीं बरींच वाढलीं. आतां त्या लोकांनीं आपल्या लीनतेमुळें व शहाणपणामुळें, त्यांना पुढें जे अधिकार आले ते त्यांनीं एकदम आपल्याकडे घेतले नाहींत; पण त्यांनीं लवकरच आपली लीनता टाकून दिली, आणि ते आपआपल्या अधिकाराची मर्यादा वाढवूं लागले; ते आपल्या सामर्थ्यास राजाधिकाराचें स्वरूप देऊं लागले, आणि आपल्या उपदेशास कायद्यांचें स्वरूप देऊं लागले. ह्या सभांचा दुसरा परिणाम असा झाला कीं पूर्वीं सर्व बिशप जे सारख्या दर्जाचे असत तो सारखेपणा नाहींसा झाला. कारण सभेचें काम नीटपणें चालण्यास

त्यांच्यापैकीं कोणी तरी इतरांहून अंमळ श्रेष्ठ समजणें जरूरच पडूं लागलें, आणि अशा रीतीनें आर्चबिशपांची उत्पत्ति झाली. अशा रीतीनें एकीकडे वरचे अधिकार केंद्रीभूत होत असतां दुसरीकडे खालच्या अधिकारांचें विभिन्नीकरण चाललेलें होतें. उदाहरणार्थ, लिंगार्ड म्हणतो कीं, ख्रिस्ती धर्म स्वीकारणारांची संख्या जशी वाढत चालली, तसतशी खालच्या खालच्या धर्माधिकाऱ्यांची संख्या वाढवावी लागूं लागली; आणि म्हणून बिशप, प्रीस्ट, डीकन, इ० धर्माधिकाऱ्यांशिवाय सब्डीकन, लेक्टर, इ० छोट्या धर्माधिकाऱ्यांची उत्पत्ति झाली.

३८. धर्मसंस्थांची वाढ होत जाईल तशीं त्यांस जीं विशेषस्वरूपें येतात त्यांमध्येंच मठाधिपतींची उत्पत्ति व स्थापना ह्यांची गणना केली पाहिजे.

शरीरास त्रास देण्याचे किंवा तापसी आयुष्यक्रमाचे प्रघात कसे उत्पन्न होतात हें पाहण्याकरितां आपणास पिशाचकल्पनेकडे आणि तिजपासून रानटी लोकांमध्यें उत्पन्न होणाऱ्या कांहीं कल्पनांकडे व कृतींकडे गेलें पाहिजे. उदाहरणार्थ, कांहीं ठिकाणीं प्रेतक्रियेच्यावेळीं अंगकर्तनें व रक्तसिंचनें होत असतात; प्राणी व अन्न ह्यांचे थडग्यापाशीं बळी दिल्यामुळें कांहींकांस उपास काढावे लागत असतात; आणि कांहीं ठिकाणीं मृतांना उत्तम उत्तम पोषाक अर्पण केल्यामुळें वस्त्रांची उणीव उत्पन्न होत असते. म्हणून मृतास खुष करणें ही कल्पना आणि जिवंतांनीं त्रास सोसणें ही कल्पना ह्या दोहोंची रानट्यांच्या मनांत सांगड उत्पन्न झालेली असते. ज्या ठिकाणीं संतुष्ट करावयाचें भूत एकाद्या लोभी

व रक्तपात करण्याची हौस असलेल्या शास्त्याचें असेल तेथें हें कल्पनासाहचर्य विशेषच ठळक बनतें. असला शास्ता माणूस विजयांनीं अधिकार संपादित असल्यामुळें आणि मेल्यावर ज्यास लोक फार भितात असला देव तो बनल्यामुळें त्यास संतुष्ट करण्याकरितां लोक जे विधी करितात तेणेंकरून लोकांस फार त्रास होतो. म्हणून प्राचीन मेक्सिकोप्रमाणें ज्या ठिकाणीं पुष्कळ मनुष्यबळी घेणाऱ्या नरमांसभक्षक देवता आपल्या दृष्टीस पडतात, त्या ठिकाणीं उपाध्ये व इतर लोक मोठालीं अंगकर्तनें करून घेत असत, वरचेवर अंगांतून रक्त वहावीत, अंगावर चाबूक मारून घेत, पुष्कळ दिवस उपास करीत, इ०इ०.अशा रीतीनें देवांस व भूतांस संतुष्ट करितांना शरीरास त्रास द्यावा लागत असल्यामुळें, शरीरास पीडा करून घेणें हेंच त्यांस संतुष्ट करण्याचें मुख्य साधन होय अशी समजूत हळूहळू उत्पन्न झाली, आणि अशा रीतीनें तपश्चरणांची किंवा उपासव्रतांची चाल सुरू झाली.

तथापि ह्या प्रघातांचें हेंच एकटें कारण आहे असें नाहीं. तर ज्या मनाच्या स्थितींत भुतें अंगांत येतात किंवा भूतांशीं संभाषण करतां येतें म्हणून समजतात ती स्थिति उत्पन्न करण्यासाठीं देखील ह्या शरीरपीडा करून घेण्याच्या चाली लोकांनीं स्वीकारिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, स्वप्नें पडावीं, आणि स्वप्नांत देवांनीं आपणास येऊन भेटावें, म्हणून रानटी लोक उपास करितात. आणि वैदूलोकांत, व वैदूची दीक्षा घेणाऱ्या लोकांत हे उपास-नेम वगैरे फार दिसतात; कारण तेणें-

करून त्यांच्या मनाचा जो उत्क्षोभ होतो तो देव अंगांत आल्यामुळें होतो असे ते व त्यांच्या सभोंवतालचे लोक ह्या दोघांसही वाटत असतें; आणि म्हणून असे व्रतनेम जो करील तो पवित्र माणूस किंवा साधु म्हणून समजला जाऊं शकतो.

आपण होऊन इजा सोसून घेतल्यास देव संतुष्ट होतो, आणि शरीर सुकविल्यानें दैवी प्रेरणा होते, अशा समजावर हा तापसपंथ उत्पन्न झाला असल्यामुळें थोडेसेंहि पक्क स्वरूप आलेल्या प्रत्येक धर्मात तो दिसून येतो. प्राचीन अमेरिकन समाजांमध्यें कायमचे वैराग्यांना जरी फारसा उल्लेख सांपडत नाहीं, तरी धर्मासाठीं लोक कधीं कधीं कांहीं वेळ संसारत्याग करीत असें आपण वाचितों. उदाहरणार्थ, ग्वाटिमालामध्यें मुख्य उपाध्या कधीं कधीं राजा असून तो चार किंवा आठ महिनेहि एकांतवासांत जाऊन उपास करीत असे. पेरूमध्येंहि इन्का राजे कधीं कधीं एकान्तवासांत राहून उपास काढीत. बुद्ध धर्म, ख्रिस्ती धर्म, यहुदी धर्म, आणि महमदी धर्म या सर्व धर्मांतून याचीं अनेक उदाहरणें सांपडतात. बायबलांतील इतिहासावरून असें दिसतें कीं भविष्यवादी व धर्मासाठीं जीव देणारे गिरिकंदरांतून भटकत असत, आणि गुहांतून वसत असत. पुढें ख्रिस्ती मठवाले असेंच करूं लागले.

प्रारंभीं हे मठवाले उपाध्यांपेक्षां जरी ज्यास्त पवित्र मानीत, तरी त्यांच्याकडे धार्मिक कृत्यें कांहींहि नसत. पण पांचव्या व सहाव्या शतकांत कांहीं धर्मकृत्यें त्यांजकडे आलीं, आणि म्हणून ते बिशपांचे अंकित बनले.

मग त्यांच्यात्यांच्यामध्यें अनुक्रमें आपलें स्वातंत्र्य कायम राखण्याबद्दल व अधिकार चालविण्याबद्दल झगडा सुरू झाला, आणि त्याचा परिणाम ते धर्मसंस्थेंत गोंवून जाणें हा झाला.

अशा रीतीनें धार्मिक अधिकारीमंडलामध्यें आणखी संकीर्णता उत्पन्न झाली, पण तिचें ज्यास्त विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं.

३९. प्रस्तुत प्रकरणांत धर्माधिकारीमंडळांचा आणखी इतिहास देण्याची जरूरी नाहीं. त्यांच्या उत्क्रमणाच्या सामान्यस्वरूपांचा एथें आपणास विचार कर्तव्य होता.

तो केल्यावरून धार्मिक व राजकीय सरकारें ह्यांजमध्यें वाढीच्या पायरीच्या संबंधानें एकप्रकारचा संबंध दिसून येतो. जेथें राजकीय सरकार अल्प असेल तेथें धार्मिक सरकारहि अल्पच असतें; आणि ज्या समाजांत बरेंचसें जुलमी राजकीय शासन उत्पन्न झालेलें असेल, तेथें बरेंचसें जुलमी धार्मिक शासनहि उत्पन्न होतें.

ह्या दोन्ही घटनांचें सूळ एकच असून प्रारंभींच्या समाजांतून त्यांजमध्यें विभिन्नीकरणहि अल्पच असल्यामुळें पुष्कळकाळपर्यंत त्यांजमध्यें फारच अपूर्णरीत्या भेद करतां येत असतो.

ह्या दोन शासनस्वरूपांमध्यें साधनें व विस्तार ह्या दोन्ही बाबतींत जो हा निकटसंबंध दृष्टीस पडतो त्याला एक नैतिक कारण आहे. स्वभाव अत्यंत लीन असला म्हणजे तेणेंकरून राजकीय व धार्मिक दोन्ही नियंत्रणांची अत्यन्त वृद्धि होण्यास जागा सांपडते. उलटपक्षीं, स्वातंत्र्यबुद्धीमुळें असलीं शासनें चालविणाऱ्या

संस्थांच्या वाढीस धक्का बसतो; कारण ती बुद्धि जशी जिवंत शास्त्याच्या जुलमास प्रतिरोध करिते तशीच देवतांच्या संतर्पणार्थ आपल्यास अगदीं नीच करून घेण्याच्या प्रवृत्तीच्या ती विरुद्ध असते.

एकपंथाचे विधी कायम ठेवणारें मंडळ एकीकडे आकारानें वाढत असतां दुसरीकडे रचनेनेंहि वाढत असतें; आणि तो पंथ मूळचा असो, किंवा बाहेरून दंडेली करून आलेला असो, त्याच्या संबंधानें जें धर्माधिकारीमंडळ उत्पन्न होतें त्याची घटना सामान्यतः राजकीय अधिकारीमंडळाच्या सारखीच उच्चनीचपणाच्या बाबतींत असते. म्हणजे, प्रथम अधिकाराची वांटणी सामान्यतः सारखी असून मागून अशी स्थिति उत्पन्न होते कीं सामान्यजनसमूह अगदीं अंकित बनतो, आणि अधिकारी मंडळामधीलहि पुष्कळजण थोडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे, व एका मुख्याचे अंकित बनतात.

प्रकरण नववें

धर्मसंस्थेचा सामाजिक बंधन ह्या दृष्टीनें विचार

४०. सामाजिक वाढीमध्यें धार्मिकसंस्थांचें अंग किती असतें ही गोष्ट स्पष्ट होण्याकरितां धार्मिककल्पना व धार्मिकमनोभाव ह्यांच्या मूळस्वरूपांकडे पुनः एकवार दृष्टि फेंकली पाहिजे.

साहेब म्हणतात, आमच्यामध्यें जरी पितृपूजा नष्ट झालेली आहे तरी तिला योग्य अशा कांहीं कल्पना व मनोवृत्ती, व त्यांपासून उत्पन्न होणाऱ्या कांहीं क्रिया अद्याप जिवंत राहिलेल्या आहेत; त्यांजवरून त्या पूजेचे व तिजपासून उत्पन्न झालेल्या धर्मपंथाचे प्रारंभीं परिणाम काय झाले, हें आपल्यास कळून येतें. आईबाप किंवा आजा-आजी मेलीं म्हणजे त्या प्रसंगीं त्यांचे वंशज काय करितात तें विशेषतः पहावें; म्हणजे तीन अर्थप्रचुर गोष्टी आपल्या नजरेस पडतात.

जेव्हां श्मशानविधि करावयाचा असेल तेव्हां स्वाभाविक प्रेम किंवा रूढी ह्यांनीं प्रोत्साहित होऊन मृताच्या कुटुंबांतील किंवा ज्ञातींतील लोक तेथें जमतात; त्यांत मुलें प्रमुख असतात, इतर आप्त बरेच असतात, आणि कांहीं मित्र असतात. सर्वजणांचें ह्या रीतीनें ह्या विधींत अंग असून ते मृताबद्दल जो सन्मान दर्शवितात, तोच प्रारंभीं पितृपूजा म्हणून असे, व अजूनहि त्या पूजेचेंच तो एकप्रकारचें स्वरूप आहे. एवंच एखाद्या वडील माणसाच्या श्मशानविधीच्या प्रसंगींच, इतर प्रसंगांपेक्षां, आप्तपणास योग्य अशा विचारांचें व

(मनो) विकारांचें ज्यास्त पुनरुज्जीवन होत असतें, आणि आप्तांमधील बंध बळकट होत असतात.

ह्याचा वरचेवर आणखी एक आनुषंगिक परिणाम घडत असतो, व तो वरच्यापेक्षां ज्यास्त अर्थप्रचुर आहे. तो हा कीं, मृताच्या कुटुंबांतील निरनिराळ्या माणसांमध्यें वांकडीं असल्यास तीं असल्या प्रसंगीं दिसत नाहींत. मृताबद्दल त्या सगळ्यांचा मनोभाव एकच असल्यामुळें, आणि तितक्यापुरती एकमेकांबद्दल सहानुभूति असल्यामुळें तीं वांकडीं कांहीं अंशीं कमी होतात, आणि कधीं कधीं अगदीं नाहींशींहि होतात. एवंच अशा प्रसंगीं कुटुंबांतील माणसें एकत्र जमून जसा कुटुंबसमूह बळकट होतो, तसा वांकडीं नष्ट होऊनहि होतो.

आणखी एक कारण ह्याच गोष्टीस साहाय्यकारक होतें. तें हें कीं मृताच्या आज्ञा त्यावेळीं प्रसिद्ध कारितात; आणि त्या ह्या वैरांच्या संबंधानें असल्यास, त्या मानल्यानें समेटास उत्तेजन येतें. आतां हें खरें आहे कीं त्याच्या मालमत्तेची वांटणी कशी करावयाची ह्याबद्दल जें त्यानें सांगून ठेविलें असेल त्यामुळें पुष्कळ वेळां नवीं भांडणें उत्पन्न होतात; तरी जुनीं भांडणें संपवून टाकावीं अशी त्यानें इच्छा प्रदर्शित केली असल्यास तिच्या योगानें तडजोड होण्यास मदत होत असते; आणि माझ्या मरणानंतर तुम्हीं अमुक अमुक रीतीनें वागावें असें त्यानें तोंडीहि सांगितलें असल्यास तें त्याचें म्हणणें त्याचे वंशज बहुधा कायद्याप्रमाणें मानितात, आणि त्यामुळें त्यांजमध्यें क्रियैक्य उत्पन्न होण्यास मदत होते.

हल्लीं देखील ह्या कारणांचें कार्य जर बरेंच झालेलें दिसून येतें, तर ज्या काळीं मृतांच्या इच्छेकडे दुर्लक्ष केल्यास त्यांचीं भुतें क्रुद्ध होतील, व आपल्यास शिक्षा करतील अशी ठळक कल्पना लोकांत जागृत असे, त्या काळीं त्यांचा परिणाम विशेषच होत असला पाहिजे. सारांश, हें उघडच आहे कीं त्याकाळीं कुटुंबधर्मामुळें कुटुंबबंध बराच बळकट होत असला पाहिजे; कारण त्यामुळें बळी देण्यासाठीं कुटुंबाचे घटक ठराविक कालीं एकत्र जमत असले पाहिजेत, त्यांचे तंटे कमी होत असले पाहिजेत, आणि एकच प्रकारचे (मृताचे) हुकूम ते ऐकत असले पाहिजेत.

सामान्य कुटुंबपित्याकडून अनेक कुटुंबपित्याकडे किंवा पितृशास्त्याकडे, आणि त्याजकडून अनेक ज्ञातींच्या नायकाकडे जसें जावें, तसें मूळची पितृपूजा मूळच्या कुटुंबावर जें कार्य करीत असते तेंच कार्य, त्या पितृपूजेपासून उत्पन्न झालेले जे धर्मपंथ ते करितात असें आपल्यास आढळून येईल असा अंदाज करण्यास हरकत नाहीं; आणि प्रत्यक्ष पुराव्याकडे पाहतां तो अंदाज खराहि ठरतो. ऑस्टियाकलोकांसारख्या रानटी लोकांबद्दल देखील आपण असें वाचितों कीं, त्यांच्यांत एकच पवित्र स्थळाचा उपयोग करणें किंवा एकच उपाध्या असणें हें देखील एक ऐक्यबंधन होत असतें. आणि उच्चतर जातींकडे पाहतां ह्याबद्दल ज्यास्तच पुरावा सांपडतो. म्हणून त्याचें वर दाखविलेल्या मथळ्यांखालीं विवेचन करूं

४१. ईजिप्शनलोकांतील मूळच्या टोळ्या निरनिराळ्या प्रांतांत रहात असून त्यांच्यांतील घटक विशि-

ष्टपंथामुळें एकत्र रहात असत. प्रत्येक टोळीचें मध्यस्थान एक देऊळ असे, आणि त्याच्या सभोंवतीं एक शहर वसत असे. आणि ज्याअर्थीं एका प्रदेशांत जे प्राणी पवित्र मानीत ते दुसऱ्यांत अपवित्र समजले जात, त्याअर्थीं प्रत्येक ठिकाणच्या लोकांस एकत्र ठेवणारा बंध एका पूर्वजरूपी देवाची पूजा हा असावा असें अनुमान करणें वाजवी दिसतें. कारण निरनिराळ्या प्राण्यांवरून निरनिराळ्या टोळ्यांच्या मुख्य पुरुषांचीं नांवें पडत, आणि म्हणून एका टोळीनें वंद्य मानिलेले प्राणी दुसऱ्या टोळ्या निंद्य मानीत, ही गोष्ट अगोदरच आपल्या लक्षांत आलेली आहे.

प्राचीन ग्रीकलोकांमध्यें हीच गोष्ट दिसून येते. उदाहरणार्थ, **ग्रोट** असें म्हणतो कीं, दोन टोळ्या किंवा गांव ह्यांच्यामध्यें बंधुत्व उत्पन्न झालें असें दाखविण्याकरितां ते एकमेकांच्या उत्सवप्रसंगीं बळी देण्यासाठीं कांहीं निवडक उपाध्ये पाठवीत असत. कधीं कधीं कांहीं शहरें मिळून स्वतंत्र धर्मसंमेलन बनवीत असत, आणि सर्वांचें मिळून जें एकादें देऊळ असेल त्यांतील देवाला बळी देत असत. ॲम्फिक्टिओनिक कौन्सिल ह्या धर्मसंस्थेची उत्पत्ति त्या लोकांत अशाच रीतीनें झाली.

इटालीमध्येंहि असेंच झालें. उदाहरणार्थ, इट्रूस्कनलोकांबद्दल **मॉम्सेन** असें सांगतो कीं, त्या लोकांच्या प्रत्येक संघांत बारा ज्ञाती असत, त्या सर्वांचें एक मुख्य शहर असे, व तें मुख्यत्वेंकरून धर्मासाठीं असून तेथें एक सगळ्यांचा मुख्य किंवा महोपाध्याय असे. ल्याटिनलोकांचेंहि असेंच असे. त्यांच्या संघाचें मुख्य

शहर आल्बा हें असे; आणि तेथें त्यांच्या सर्व टोळ्या धर्मोत्सवांसाठीं जमत असत. प्राचीन रोमनलोकांतहि असेंच असे म्हणून म्हणतात. उदाहरणार्थ, सीली असें म्हणतो कीं, रोमची अगदीं पहिली घटना सर्वांशीं धार्मिक दिसते. केवळ उपयुक्ततेवरून उत्पन्न होणाऱ्या संस्था मागून येतात; आणि त्या उत्पन्न झाल्या तरी पूर्वीच्या संस्था नाहींशा न करतां त्या कायम ठेवितात.

अशा ठिकाणीं संयोगाचें मुख्य कारण बाह्यशत्रूंपासून सगळ्यांचें संरक्षण करणें हें जरी बहुधा असतें, तरी जो संयोग घडतो तो ज्या एकाच खुंटापासून उत्पन्न झालेल्या अनेक टोळ्या धर्मकृत्यासाठीं कधीं कधीं एकत्र जमत असतील व त्यामुळें ज्यांच्यामध्यें आपण मूळचे एक आहों ही कल्पना व तिला योग्य असा मनोभाव जागृत असेल त्यांच्याचमध्यें घडतो.

ख्रिस्ती धर्म हा यूरोपस्थांनीं बाहेरून आणून स्वीकारिलेला धर्म असल्यामुळें जातीच्या एकाद्या मूळ पुरुषाच्या किंवा दंतकथागत देवाच्या पूजेमुळें जसें बंधन उत्पन्न होतें तसें जरी त्या धर्मानें त्या लोकांत उत्पन्न झालेलें दिसत नाहीं, तरी त्याच्या योगानें ख्रिस्ती समाजांचें कांहीं तरी घनीभवन झालें ही गोष्ट निर्विवाद आहे. ख्रिस्ती लोकांमध्यें ख्रिस्तीबंधुभाव जरी फारसा दिसून येत नाहीं तरी थोडासा तरी दिसून येतोच. सारखे विचार आणि सहानुभूतिपर मनोभाव ह्यांनीं भेदभाव कमी केल्यामुळें सख्य वाढण्यास मदत झाली पाहिजे हें ज्या अर्थीं उघड आहे, त्या अर्थीं धर्मैक्यामुळें संयोगास उत्तेजन मिळालेंच पाहिजे.

४२. प्रेतविधीच्या समयीं कुटुंबवैमनस्यांचें बंद होणें, आणि धार्मिक उत्सवांच्यावेळीं टोळ्यांमधील लढाई बंद होणें ह्या दोहोंमध्यें वरच्याहूनहि ज्यास्त स्पष्ट सादृश्य दिसून येतें.

पहिल्या भागांत हें दाखविलेलेंच आहे कीं कांहीं असुधारलेल्या लोकांमध्यें नायकांच्या श्मशानभूमी इतक्या पवित्र मानितात कीं त्यांजमध्यें लढणें निषिद्ध समजलें जातें. ह्याचा एक परिणाम जेथें कोणास कैद वगैरे करतां येत नाहीं अशा पवित्रस्थानांची उत्पत्ति हा होतो. आतां पवित्रस्थानीं तंटा न करणें ह्याचा परिणाम जे तेथें बळी द्यावयास जातील त्यांनीं एकमेकांत तंटा करूं नये असा होतो. उदाहरणार्थ, ताहितियनलोक त्यांच्या देवास बळी द्यावयास कोणी शत्रु आल्यास त्यास ते पीडा करीत नसत; आणि चिब्चालोकांमध्यें त्यांच्या इराक्का येथील देवाची यात्रा करण्यास जे येतील त्यांचें लढाईच्या वेळीं देखील ते संरक्षण करीत. रोमनलोकांमध्यें ज्युपिटर देवाच्या उत्सवप्रसंगीं सगळ्या देशांत लढाई बंद असे. ग्रीकलोकांमध्यें ॲम्फिक्टिओनिक कौन्सिलाच्या वेळीं शत्रूंच्या देशांतून देखील बळी वगैरे नेतांना त्रास होत नसे. ह्याचे आणखी परिणाम काय झाले त्यांचें वर्णन **मॉम्सेन** ह्याप्रमाणें करितो.

" अशाप्रकारें ज्या देवांचे उत्साह सगळे मिळून करीत असत ते राष्ट्रीय उत्साह असत. त्यावरूनच पुढें राष्ट्रीय पंचांगाची उत्पत्ति झाली. ज्या देवळांतून हे उत्साह करीत त्यांच्या दागदुजीकरितां आणि बळीकरितां पैशाची जरूर असल्यामुळें सगळ्यांचें एकच नाणें असणें

जरूर पडलें. देवळांचे पैसे व खजिने ह्यांच्या रक्षणासाठीं कारभारी नेमणें भाग पडलें, आणि त्यांच्या निवडीसाठीं एकत्र जमणें भाग पडूं लागलें. बरें, त्या कारभाऱ्यांवर देखरेख ठेवण्यासाठीं सगळ्या जातींचे प्रतिनिधि नेमण्याची जरूरी उत्पन्न झाली, आणि ह्या प्रतिनिधींमध्यें मतभेद झाल्यास तो तोडण्यास न्यायाधीशांची जरूर पडूं लागली. अशा रीतीनें सामान्य वार्षिक महोत्सवांसारख्या साध्या गोष्टीपासून सगळें राष्ट्रजीवित बदलून गेलें; सर्वांनीं नेहमीं शस्त्रें धारण करण्याचें बंद झालें, दळणवळण सुरक्षित झालें, आणि देवळें व स्थंडिलें ह्या ठिकाणीं कोणास कैद वगैरे करावयाचें नाहीं असें ठरून गेलें. पण सर्वांत अत्यन्त महत्त्वाचा परिणाम झाला तो हा कीं, धर्ममंडलाचे घटक आपणास एक संयुक्तमंडळ म्हणून मानूं लागले; अनेक ठोळ्यांचें मिळून एक राष्ट्र बनलें, आणि तें व त्याची राजकीय व धार्मिक सरणी ह्यांस विशिष्ट नांवें उत्पन्न झालीं.”
आतां एकधर्मामुळें यूरोपस्थ राष्ट्रांचेंहि कांहीं अंशीं संकलीभवन झालें हें ह्यावरून दिसतें कीं आठवड्यांतून एकदां (रविवारीं) सरदार लढाया बंद ठेवूं लागले, आणि पुढें धर्मयुद्धासाठीं सगळे मिळून पालेस्ताईनला जाऊं लागले, आणि त्यावेळीं अर्थात् अपसांतील लढाया बंद ठेवूं लागले; उदाहरणार्थ, फ्रान्सचा फिलिप व इंग्लंदचा रिचर्ड.

धर्मापासून संकलनाला ही जी अप्रत्यक्ष मदत होते त्याखेरीज देव उपाध्याच्या द्वारा काय करावयाचें हें सांगतो असें जें समजतात त्यापासून प्रत्यक्ष मदत होते.

कारण निरनिराळ्या टोळ्यांमध्यें तंटा पडला म्हणजे काय करावयाचें हें ते देवास विचारितात, आणि तो कौल देईल त्याप्रमाणें वागतात, आणि अशा रीतीनें लढाईस आळाबंदा पडतो. पोपानें ह्याप्रमाणें निरनिराळ्या ख्रिस्तीराजांचे तंटे मिटविल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत.

४३. त्याप्रमाणेंच मृतजनकाच्या इच्छा पुऱ्या करण्याचें कर्तव्य आणि देवानें केलेल्या आज्ञा मानण्याचें कर्तव्य ह्यांमध्येंहि अशा प्रकारचें साम्य स्पष्टपणें दिसून येतें.

साहेब म्हणतात, एका सहामाहींत माझ्या मर्यादित मित्रमंडलामध्यें मृतमाणसाच्या कल्पित इच्छेप्रमाणें वागणूक ठेवल्याचीं दोन उदाहरणें माझ्या नजरेस आलेलीं आहेत. माझ्या एका मित्रानें बरेच दिवसपर्यंत कांकूं करून शेवटीं आपल्या बापाच्या मानीव इच्छेनुरूप आपल्या घराच्या रचनेंत फेरबदल करण्याचें ठरविलें. दुसऱ्या एका माझ्या मित्रानें, रविवारीं खेळण्यास त्यास स्वःताचा प्रत्यवाय नसतां, आपल्या मृतबायकोस तें आवडलें नसतें ह्या मुद्यावर खेळण्याचें नाकारिलें. आतां मृताच्या मानीव इच्छांचा वर्तनावर जर इतका परिणाम घडतो, तर त्यानें मुद्दाम केलेल्या आज्ञांचा ज्यास्त परिणाम झालाच पाहिजे. आणि ज्याअर्थीं मृताच्या आज्ञा कुटुंबसंघ एकत्र रहावा, किंवा टोळी एकत्र रहावी, अशा प्रकारच्याच असण्याचा संभव आहे त्याअर्थीं त्यांचा कल सामाजिक संयुक्तता,

आणि सर्वसामान्य कर्तव्याची कल्पना, ह्यांना उत्तेजन देण्याकडेच असणार.

पांचव्या भागांत हें दाखविलेलेंच आहे कीं कायद्याच्या ऐवजीं ज्या रूढी असतात त्यांमध्यें गतपिढ्यांच्या मनोवृत्ती व कल्पना प्रतिबिंबित झालेल्या असतात. त्या प्राथमिक लोक कडक रीतीनें पाळीत असल्यामुळें मृतांचें जिवंतावर शासन कसें चालतें हें त्यावरून व्यक्त होतें. वेड्डा, स्कान्डिनेव्हिअन आणि हीब्रू ह्या लोकांमधील पुराव्यावरून तेथें असें अनुमान काढिलें होतें कीं कांहीं विशेष प्रसंगीं काय करावयाचें हें भुतास विचारीत असतात; आणि ईजिप्शन, पेरूव्हिअन, ताहितियन, टोंगन, सामोअन, हीब्रू, आणि कांहीं आर्यन, ह्या लोकांचे पुराव्यावरून असें दाखविलें होतें कीं बहुधा अशा प्रसंगीं देवभूत माणसांचा किंवा देवांचा सल्ला घेत असतात. शिवाय असें दाखविलें होतें कीं विशेष प्रसंगीं केलेल्या ह्या विशेष आज्ञांखेरीज नेहमीं पाळावयाच्या अशा कांहीं सामान्य आज्ञा असतात, आणि त्यांपासून सामान्य वर्तननियमांची किंवा कायद्यांची उत्पत्ति होते; आणि ते कायदे धार्मिक, ऐहिक, सार्वजनिक, घरगुती, व व्यक्तिविषयक, असे निरनिराळ्या प्रकारचे असतात. आतां एथें आणखी एक पुरावा देऊं. “ आपल्या अनुयायांनीं शेतीचा धंदा करावा अशी झोरोआस्टरची आज्ञा असे; आणि अहर्मस्द ह्याची जे पूजा करितात त्यांनीं एके ठिकाणीं स्थाईक राहिलें पाहिजे असें त्यांस शिकविलेलें असे. ह्यामुळें असल्या स्थाईक टोळ्यांमध्यें संयोग उत्पन्न झाले, आणि त्यांपासून प्रा

चीन काळच्या मोठाल्या साम्राज्यांची उत्पत्ति झाली. ह्यावरून हें उघडच दिसतें कीं अशा रीतीनें उत्पन्न झालेले जे दैविक कायदे त्यांचा कल व्यक्तींची जीं एकमेकांच्या संबंधानें समाजविरुद्ध कृत्यें त्यांस आळा घालण्याकडे, आणि इतर समाजांशीं विशिष्टसमाजाचे जे व्यवहार ते संयुक्तरीत्या करण्यास लावण्याकडे, असतो.

४४. धार्मिक संस्थांचा सामान्य कल आहे तें संरक्षण करण्याकडे दोन अर्थी असतो. त्या अनेक रीतींनीं सामाजिक बंधनें कायम ठेवीत असतात व बळकट करीत असतात. आणि अशा रीतीनें सामाजिक समूहाचें अस्तित्व कायम ठेवितात. आणि हे त्या समाजाच्या पाहिल्या पहिल्या पायऱ्यांवर उत्पन्न झालेले जे समज, प्रघात व मनोभाव समाजास कायम ठेवून त्याच्या गरजा भागविण्यास योग्य म्हणून ठरले असतील ते कायम ठेवून बऱ्याच अंशीं करितात. हें त्या कसें करितात ह्याचीं थोडींशीं उदाहरणें देऊं.

प्राचीन मेक्सिकन यज्ञांच्या वेळीं गारांच्या सुऱ्यांचा उपयोग करीत असत. सान्‌साल्व्हेडारमध्यें यज्ञकर्त्याच्या हातांत गारेची सुरी असून तिनें तो बळी देण्याच्या प्राण्याची छाती फोडीत असे. चिब्‌चालोकांत जेव्हां एकाद्या मुलास बळी देत तेव्हां ते त्यास बोरूच्या सुरीनें मारीत असत; आणि हल्लीं क्यारेनलोकांमध्यें देवभूत पूर्वजांना जो डुकर बळी देतात तो सुरीनें किंवा भाल्यानें न मारतां, बांबूचें एक टोंक बारीक करून तें भोंसकून मारितात. दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं धार्मिक कामासाठीं ज्या उपकरणांचा उपयोग करितात तीं अगदीं

जुन्या किंवा बऱ्याच जुन्या नमुन्याचीं असतात. उदाहरणार्थ, रोममध्यें उपाध्याच्या नांगरास किंवा सुरीस तांब्याचाच उपयोग करावा लागे, आणि धार्मिक विधि करतांना एक प्राचीन पोषाक घालावा लागे. नागलोकांत बळी देण्याचा प्राणी होरपळण्याकरितां जो विस्तव पेटवावयाचा तो दोन लांकडें एकमेकांवर घांसून पेटवितात. टोडालोकांमध्यें देखील अशा प्रसंगीं दुसरा विस्तव तयार असला तरी तो न घेतां दोन काटक्या एकमेकींवर घांसूनच तो तयार करावा लागतो. डमारालोक पवित्र अग्नि नेहमीं जिवंत ठेवितात, आणि तो प्रसंगवशात् विझाल्यास अशाच रीतीनें पुनः जिवंत करितात. यूरोपामध्यें देखील अशाच कल्पना व रूढी पुष्कळकाळपर्यंत चालू होत्या. उदाहरणार्थ, स्काटलंदच्या पश्चिमबेटांत सतराव्या शतकाच्या शेवटीं, प्लेगसारखे रोग झाले असतां, बळी देतांना घर्षणानेंच विस्तव तयार करीत. भाषेच्या संबंधानेंहि असेंच आहे. ज्यू व रोमनक्याथलिकलोक धर्मकृत्याच्या किंवा विधीच्या संबंधानें मृतभाषेचा जसा उपयोग करितात तसाच ईजिप्शन व काप्टलोकहि करीत. क्रीकलोकांबद्दल स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्यांची प्राचीन भाषा जी सेमिनोल ती त्यांच्या बायका आपल्या मुलांस धर्मभाषा म्हणून शिकवितात. जपानमध्यें बुद्धधर्माचे ग्रंथ जरी संस्कृत भाषेंत लिहिलेले नाहींत, तरी ग्रंथांची लिपी संस्कृत किंवा देवनगरी आहे. हीब्रूलोकांत हीच प्रवृत्ति अनेक तऱ्हांनीं उदाहृत झालेली दिसते. उदाहरणार्थ, स्थंडिलासाठीं न कापलेल्या दगडाची योजना

त्यांस करावी लागे, आणि हवनार्थ आंब न घातलेल्या पीठाची भाकरी करावी लागे. ग्रीसमध्येंहि असेंच दृष्टीस पडे. उदाहरणार्थ, **ग्रोट** असें म्हणतो कीं, त्यांच्यांत राजकीय फेरबदल जरी पुष्कळ झाले तरी धर्मसंस्था जशाच्या तशाच राहिल्या.

धार्मिक अधिकाऱ्यांनीं धर्मविषयक रूढीमध्यें फेरबदल होण्यास जसा विरोध केलेला आहे तसाच किंवा त्याहून ज्यास्त विरोध त्यांनीं तद्विषयक मतें बदलण्यास केलेला आहे. कारण जे समज वंशपरंपरा आलेले असतील त्यांत कांहीं क्रान्ति झाल्यास, पूर्वजाच्या सांगणीचा जो सामान्य अधिकार तो कमी झाल्यामुळें सर्वच धर्मसमज डळमळीत होऊं लागतात. धर्मविषयक पुराणस्थिति कायम ठेवण्याची जी ही सामान्य प्रवृत्ति तिचीं उदाहरणें देण्याची जरूरी नाहीं.

४५. एवंच ह्या प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टींचीहि उपपत्ति पिशाचकल्पनेवरूनच लागते. पूर्वीं ज्याप्रमाणें सर्व धर्मविधी प्रेतविधींपासून उत्पन्न होतात असें आपल्या नजरेस आलें, तसेंच ह्या ठिकाणींहि दिसून येतें. मृत आईला किंवा बापाला पुरावयाचें असलें म्हणजे त्या प्रसंगीं कुटुंबांतील सर्व माणसें एकत्र जमतात, आणि आपल्या नात्याची त्यांस पुनः आठवण होऊन तिनें ते बद्ध होतात; त्यावेळीं त्यांच्यामध्यें कांहीं वांकडें असल्यास तें कांहीं वेळ किंवा कायमचें विझून जातें; आणि ह्या प्रसंगीं ते सर्व मृताच्या इच्छांच्या आधीन झाल्यामुळें व तेवढ्यापुरतें एकविचारानें वागल्यामुळें त्यांची आणखी एकी होते. अशा रीतीनें दृश्य होणारा

पितृविषयक पूज्यबुद्धीचा जो हा मनोभाव त्याचा, मृत जेव्हां पितृशास्ता असेल, किंवा टोळीचा स्थापक असेल, किंवा ज्ञातींतील वीरपुरुष असेल, तेव्हां कार्यप्रदेश वृद्धिंगत होतो; पण तो कोणीहि असला तरी त्याच्या संतर्पणापासून पुढील तीन कार्यें नेहमींच घडून येतात; एक कुटुंबांतील किंवा ज्ञातींतील माणसांची संयुक्तता बळकट होणें, त्यांच्यांत वैरें असल्यास तीं बंद पडणें, आणि वंशपरंपरागत आज्ञा अंमलांत येणें. आणि ह्या तीन कार्यांमुळें कुटुंबघटकांचें किंवा समाजघटकांचें संकलीभवन अनेक रीतींनीं वृद्धिंगत होतें.

एवंच धर्माकडे सामान्यतः पाहतां तो समाजस्थिति कायम ठेपण्यास अनुकूल असतो असें म्हणतां येईल. समाजसंबद्धता वाढवण्यास तोच इतर सर्व संस्थांहून ज्यास्त कारणीभूत होतो; व ही संबद्धता तो समाजाच्या निरनिराळ्या भागांमध्येंच उत्पन्न करितो असें नाहीं, तर समाजाची वर्तमान पिढी व गत पिढ्या ह्यांच्यामध्येंहि उत्पन्न करितो. ह्या दोन्ही रीतींनीं तो समाजाचें व्यक्तित्व कायम ठेवण्यास मदत करितो. किंवा, अंमळ निराळ्या दृष्टीनें पाहतां, आपल्यास असें म्हणतां येईल कीं, धर्म म्हणजे प्रारंभीं मृताचें जिवंतावरील शासन असून, आणि त्याच्या नंतरच्या स्वरूपीं तो गतकालाचा प्रस्तुत कालावरील अधिकार पवित्र करीत असून, अगोदरच्या अनुभवानें स्थापित झालेल्या गोष्टींवर नंतरच्या अनुभवानें स्थापित झालेल्या गोष्टींचा पगडा बसूं न देतां, त्या जशाच्या तशा ठेवीत असतो. आतां गत अनुभवानें स्थापिलेल्या गोष्टी हा जो अधिकार चा-

लवितात तो गैर आहे असें नाहीं. कारण समाजाचें जीवित आजपर्यंत त्या गोष्टींनींच कायम राखिलेलें असतें; आणि म्हणून समाज त्या बदलण्यास नेहमीं प्रतिकूल असतो. ज्या नायकाच्या किंवा शास्त्याच्या भुताच्या संतर्पणावरून स्थानिक धर्माची उत्पत्ति होते त्याला त्याचा अधिकार कोणत्या तरी यशस्वीपणामुळें बहुधा आप्त झालेला असतो ही गोष्ट जर आपण ध्यानांत घेतली, तर आपण असें अनुमान केलेंच पाहिजे कीं, परिस्थिति कायम असेल तोंपावेतों त्यानें दिलेल्या आज्ञा मानणें, आणि त्यानें स्थापिलेल्या रूढी पाळणें, हें सामान्यतः समाजाच्या भरभराटीस अनुकूल असलेंच पाहिजे; आणि म्हणून धर्मसंस्थांची ही जी अत्यन्त प्रस्तुतप्रियता ती गैर आहे असें म्हणतां येत नाहीं.

या शिवायहि, पूर्वापार चालत आलेले समज खरे धरून चालणें, आणि तज्जन्य रूढी व कायदे पाळणें, हें आवश्यकच म्हटलें नाहीं, तरी त्यामध्यें एकंदरीत फायद्याच आहे. कारण कोणताहि मनुष्यसमूह व्यवस्थितरीतीनें स्थापन होण्याच्या अगोदर त्यांस एकत्र ठेवणारें, आणि ज्या परिस्थितीस त्यांना योग्य बनणें अवश्य असेल त्या परिस्थितींत ठेवणारें, कांहीं तरी असलेंच पाहिजे; आणि ते तसे राहण्यास त्यांच्या वंशपरंपरागत समाजांचा त्यांच्यावरील प्रभाव जबर असला पाहिजे. समाजप्रगतीस अत्यन्त आवश्यक जी समाजसंबद्धता तिला रानटयाचे समाजविरुद्ध स्वभावविशेष इतका मोठा अडथळा आणीत असतात कीं, त्याला जर योग्य अशा बंधनामध्यें ठेवावयाचा असेल तर राजकी-

य शासन व धार्मिक शासन यांस पूर्णपणें अंकित होण्यास प्रोत्साहन देणारा मनोभावच त्याच्यामध्यें असला पाहिजे. आणि म्हणून, पूर्वीं दाखविल्याप्रमाणें जेथें जेथें समाजोत्क्रमण झालेलें आहे—मग तें ईजिप्त, आसीरीया, पेरू, मेक्सिको, किंवा चीन, कोठेंहि असो—तेथें तेथें त्याच्या प्रारंभीच्या पायऱ्यांवर लोक जिवंत राजास अगदीं नमून असत इतकेंच नाहीं, तर मृतराजांचे बनलेले जे देव त्यांच्या मोठ्या संकीर्णपूजा करीत असत.

प्रकरण दहावें

उपाध्याचीं लष्करी कर्तव्यें

४६. प्राथमिक संस्थांची उपपत्ति लावण्यासाठीं प्रगल्भ कल्पना व मनोभाव यांचा उपयोग केल्यापासून ज्या अनेक चुका होतात त्यांमध्यें, उपाध्याचीं कृत्यें नेहमीं उच्च तऱ्हेचींच असतात, आणि रानटी किंवा क्रूर असत नाहींत, असें समजणें ही सर्वांत मोठी चूक होय. साहेब म्हणतात, लोक आपल्या मनांत खिळलेल्या पूर्वसंकल्पामुळें जर डोळे घट्ट मिटून धरणार नाहींत, तर त्यांना ह्याबद्दलचा पुरावा बैबलांत देखील सांपडेल; आणि इतर धर्मग्रंथ वाचल्यास त्यांस असें दिसून येईल कीं, जिकडे तिकडे उपाध्यांनीं उच्चतर मनोविकार दर्शविलेले व मळलेले न दिसतां नीचतर मनोविकारांचें प्रदर्शन केलेलें व वळण लावून घेतलेलें दृष्टीस पडतें.

बहुतेक लोकांची देवविषयक कल्पना ते सर्वगुणसंपन्न आहेत अशी असण्याच्या ऐवजीं ते फार क्रूर आहेत अशी आहे ही गोष्ट ध्यानांत घेतली म्हणजे वरील गोष्टींचा उलगडा होतो. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकनलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांचे देव कांहीं तरी खावयास मागत म्हणून त्यांचे राजे एकमेकांस लढाईस आव्हान करीत; आणि त्यांस खाऊं घालण्याकरितां शत्रूकडील माणसांस लढाईत न मारतां कैद करण्याची खटपट करीत. ज्याकसन असें म्हणतो कीं फीजीयनलोकांचे उपाध्ये रक्तस्राव व लढाई हीं देवांस फार आवडतात असा सभोंवतालच्या लोकांस उपदेश करीत.

ग्रीकलोकांचे देव नरभक्षक असत हें म्हणणें पिंडार यास जरी कबूल नाहीं, तरी पॉझानियासच्या इतिहासावरून असें दिसतें कीं, त्याच्या काळीं देखील झीअस देवास कधीं कधीं माणसें बळी देत असत; आणि ईलियड ग्रंथांत माणसांपेक्षां देवांचे स्वभाव नीचतर वर्णिलेले आहेत; कारण खोटें बोलणें, विश्वासघात, रक्तस्रावाची हौस, व्यभिचार, इत्यादि दुर्गुण त्यांच्या अंगीं ढळढळीत लाविलेले दिसतात. ते निरनिराळ्या लोकांचे पक्ष घेऊन त्यांच्या वतीनें प्रत्यक्ष लढाई करण्यास त्यांच्याबरोबर समरांगणांत तयार असत. आसीरियन व हीब्रूलोकांच्या धर्मकथांमध्येंहि अशाच गोष्टी आढळतात. आतां ह्याचें कारण लक्षांत आणावयाचें असल्यास ही गोष्ट ध्यानांत घ्यावी कीं, ह्या ज्या देवांच्या एकमेकांशीं श्रेष्ठत्वाकरितां झालेल्या लढाया निरनिराळ्या धर्मांच्या पुराणांतून वर्णिलेल्या आढळतात, त्या प्राथमिक शास्त्रांच्या श्रेष्ठत्वाकरितां चाललेल्या ज्या लढाया त्यांचींच रूपान्तरें आहेत.

लष्करी कृती आणि धर्मविषयक कर्तव्यें ह्यांजमधील संबंध पूर्णपणें लक्षांत घेण्यासाठीं आपण हें ध्यानांत आणावें कीं, जेथें देव त्यांनीं आज्ञापिलेल्या किंवा उत्तेजिलेल्या लढायांमध्यें खुद्द हजर असतात अशी कल्पना नसते, तेथें ते त्यांच्या मूर्तींच्या किंवा इतर कांहीं रूपानें हजर असतात असें समजतात. सांडविचबेटवाले आपल्या लढवय्या देवांना आपल्याबरोबर लढाईस नेतात असें जें कूक सांगतो तशा प्रकारची स्थिति सर्वत्र आढळते. उदाहरणार्थ, प्राचीन मेक्सिकनलोकांमध्यें शत्रूवर जातेसमयीं त्यांचे उपाध्ये देवांच्या मूर्ती घेऊन अ-

ग्रस्थानीं चालत. यूकाटानीजलोकांमध्यें कांहीं मूर्तींची संग्रामदेवता म्हणून पूजा करीत असत; ते जेव्हां चिनामिटालोकांबरोबर व इतर शत्रूंबरोबर लढावयास जात तेव्हां त्या मूर्ती बरोबर नेत. चिब्चालोकांबद्दल हेरेरा असें म्हणतो कीं, त्यांची त्यांच्या मूर्तींवर इतकी भक्ति असे कीं, ते कोठेंहि गेले तरी बरोबर मूर्ती घेऊनच जात, आणि ती एका हातांत ठेवून दुसऱ्या हातानें लढत. फिलिस्टाईनलोक लढाईचे वेळीं मूर्ती बरोबर घेत; आणि हीब्रूलोकहि जाहवेचें वसतिस्थान जें आर्क किंवा तारूं तें लढाईस घेऊन जात. शिवाय, असुधारलेले व अर्धवट सुधारलेले लोक लढाईच्या अगोदर, समयीं, किंवा मागून जे यज्ञ बहुधा करीत त्यांवरून शत्रूंस मारणें आणि देवास संतोषविणें ह्यांमध्यें किती निकटसंबंध ते समजत हें स्पष्ट दिसतें.

आतां उपाध्ये हे देवतांचे नेमलेले संतर्पक असल्यामुळें, त्यांचें ह्या कामीं किती अंग असे हें स्पष्ट दिसतें. स्वजातीयांशीं लढण्यापासून जरी ते आपल्या लोकांना बहुतकरून पराङ्मुख करीत असतात तरी इतर धर्मांचे व जातींचे जे लोक त्यांच्याशीं लढण्यास उत्तेजन देतात. उदाहरणार्थ, मेक्सिकनलोकांच्या उपाध्यांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांना योग्य वाटेल तेव्हां ते राजांकडे जात आणि त्यांस सांगत कीं, देवांच्या मूर्ती भुकेनें मरत आहेत हें ध्यानांत ठेवा. आसीरियन उपाध्यांना लढाईस उत्तेजन देण्यास आणखी एक कारण असे. तें हें कीं ते देवळांच्या उत्पन्नावर रहात, आणि लढाईच्या लुटींतील कांहीं भाग देवळांकडे जाई. हीब्रू-

लोकांमध्यें देखील राजा व लोक जरी कधीं कधीं शत्रू-वर दया करण्यास अनुकूल असत तरी त्यांचे उपाध्ये नसत; ते म्हणत कीं सगळ्यांना निर्दयपणें ठार केलेंच पाहिजे.

ह्या प्रास्ताविक संक्षिप्त हकीकतीवरून, सामाजिक उत्क्रमणाच्या प्रारंभींच्या पायऱ्यांवर धार्मिक कर्तव्यें व लष्करी कर्तव्यें एकाच माणसांच्या हातीं असतात, असें आढळून येण्याबद्दल आपल्या मनाची तयारी होईल. म्हणून आतां त्याच्या निरनिराळ्या रूपांकडे पाहूं.

४७. नेहमींच्या स्थितींत नाईक हा प्रारंभीं सर्वांत मोठा योद्धा असून उपाध्याहि असतो ह्यावरूनच लष्करी व धार्मिक व्यापार प्रथम एका व्यक्तीमध्यें जुळलेले असतात ही गोष्ट व्यक्त होते. प्रथम मुख्य लढवय्या तोच मुख्य संतर्पक असतो. ईजिप्त व असीरिया येथील कोरींव काम व शिलालेख यांवरून राजा हा लढाईतील अग्रणी व पुजाऱ्यांतील अग्रणी म्हणून दिसून येतो; व त्यावरून हा संबंध स्पष्ट होतो.

हा संबंध प्रारंभीं दिसतो त्याहूनहि ज्यास्त निकट असतो. राजे देवांना जे बळी देतात त्यांतील अत्यन्त महत्त्वाचे बळी लढाईच्या अगोदर देवाची मर्जी संपादन करण्याकरितां देत असतात, किंवा जय मिळविल्यानंतर आभारप्रदर्शनार्थ देत असतात. म्हणजे याचा अर्थ असा कीं, राजा ज्यावेळीं आपली लष्करी नायकी अत्यन्त ठळकपणें चालवितो, त्याचवेळीं धार्मिक संतर्पक ह्या नात्यानें आपला व्यापार अत्यन्त ठळकपणें करितो.

जेथें लढाईतील अग्रणीत्व शास्ता माणूस किंवा मंडळ न करतां नेमलेला सेनापति करीत असतो, तेथें हा व्यापारसंबंध कधीं कधीं थोड्या फरकानें दृष्टीस पडतो; कारण अशा ठिकाणीं सेनापति उपाध्याचीं कामें करितात. ह्याचें उदाहरण मेक्सिकनलोकांत दृष्टीस पडे; कारण त्यांचा जो महोपाध्याय असेल तोच मुख्य सेनापतीचें काम करी. यूरोपांतील प्राचीन सुधारलेल्या लोकांत असेंच असे. रोममध्यें स्वारीवर जाण्यापूर्वी सैन्य जमलें म्हणजे सेनापति प्रार्थना करी व बळी देई. अशीच चाल आथेन्स व स्पार्टा येथें असे. रोमनलोकांत तर सैन्य म्हणजे लहानसें शहरच असे, व धर्माच्या गोष्टीहि तेथें सर्व होत. कारण फौजेंत पवित्र अग्नि नेहमीं प्रज्वलित ठेवीत, भविष्यवादी व शकुन पाहणारे हजर असत, आणि राजा किंवा सेनापति लढाईच्यापूर्वी व मागून बळी देई. एकंदरींत रोमन सेनापतीचें उपाध्यायिक कृत्य इतकें महत्त्वाचें असे कीं कांहीं वेळां तो लढण्यापेक्षां बळी देण्याच्या कामींच ज्यास्त लक्ष देई.

कांहीं ठिकाणीं रानटीलोकांत उपाध्ये प्रत्यक्ष लढतांनाहि आढळून येतात. उदाहरणार्थ, ताहितियनलोकांबद्दल एलिस असें म्हणतो कीं त्यांच्यांत उपाध्यांना शस्त्रें घेऊन इतर शिपायांप्रमाणें लढावें लागे. असलींच उदाहरणें जेथें आपल्या दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं असल्या ठिकाणचींहि लवकरच आपल्या लक्षांत येतील.

४८. प्रारंभीं प्रत्यक्ष धार्मिक नायकी आणि प्रत्यक्ष लष्करी नायकी हीं एकाच ठिकाणीं जुळलेलीं असतात आणि पुढच्या पायऱ्यांवर ह्या दोन नायक्या राष्ट्रनाय-

कीशीं नांवाच्या जुळलेल्या असतात, ह्या दोन गोष्टी लक्षांत घेतल्यावर आपण आतां असें लक्षांत ध्यावें कीं, लवकरच उपाध्ये लढाईत प्रत्यक्ष अंग घालण्याचे बंद होतात, आणि अप्रत्यक्ष तेवढेंच घालितात.

ज्या कालीं दैविक सत्त्वांवर वजन आहे असें समजलें जाणाऱ्या माणसाचे ठिकाणीं वैदू व उपाध्या ह्यांचेहि धर्मविशेष अर्धवटरीतीनें जुळलेले असतात, त्याकालीं उपाध्यांचीं लढाईचेवेळीं सल्ला देण्याचीं व कारभार पाहण्याचीं जीं कामें त्यांची पूर्व छाया दृष्टीस पडते. उदाहरणार्थ, डाकोटालोकांमध्यें उपाध्याची ही क्रिया अत्यन्त ओबडधोबड स्वरूपीं आढळून येते. उदाहरणार्थ, त्यांच्यामध्यें नाईक पुष्कळवेळां कांहीं उपाध्यांना किंवा जादूगारांना आपल्यासाठीं लढाई करण्यास लावितात. खरोखरच त्यांच्यांत पाहिजे ते जादूगार वाटेल तेव्हां लढवय्ये बनतात. आबिपोनलोकांमध्यें रानटी श्वापदें किंवा शत्रू ह्यांवर हल्ला कोठें, केव्हां, व कशा रीतीनें करावा हें त्यांस भटलोक शिकवितात. लढाईचा समय जवळ आला म्हणजे उपाध्या फौजेच्या रांगांसभोंवती घोडा फिरवितो, ताडाची फांदी हातांत घेऊन हवेवर फटके लगावितो, आणि डोळे वटारून व वेडींवांकडीं तोंडें करून शत्रूंचा सत्यानास होवो म्हणून ओरडतो. खोंडलोकांमध्यें उपाध्या शस्त्रें केव्हांच धारण करीत नसून, बळी दिल्यावर, कुऱ्हाड हवेंत गिरगिरावून लढाईस सुरवात करण्यास हुकूम देत असे, व ओरडून शत्रूंस लढाईस येण्यास आव्हान करीत असे. स्पार्टनलोकांतहि उपाध्याचें काम देवांच्या मदतीची आज्ञा

दाखवून सैन्यास लढण्यास उत्तेजन देण्याचें असे. " त्यांच्यांत प्रत्येक स्वारीच्या प्रारंभीं बळी देत असत. अग्निवाहक नांवाचा एक उपाध्या राजानें यज्ञ केला असेल तेथील एक जळकें लांकूड हातांत घेऊन फौजेच्या अग्रभागीं चालत असे, व तें नेहमीं जळतें ठेवीत असे. हीब्रूलोकांमध्येंहि उपाध्याचें काम लढवय्यांस देवाचें सहाय्य मिळेल असें सांगून उत्तेजन देण्याचें असे ".

कांहीं ठिकाणीं उपाध्ये सैन्याबरोबर जातात म्हणून सांगितलेलें आढळतें, पण ते काय करितात हें सांगितलेलें आढळत नाहीं. उदाहरणार्थ, गोल्डकोस्ट नामक आफ्रिकेंतील किनाऱ्यावर लढाई सुरू करतांना राजे देवांची पूजा करीत नसून उपाध्ये सैन्याबरोबर समरांगणांत जातात. यूकाटानीजलोकांच्या सैन्याबद्दलहि हेरेरा असेंच वर्णन करितो. पण कांहीं ठिकाणीं उपाध्याचीं लष्करी कर्तव्यें कांहींशीं भिन्न दिसतात. उदाहरणार्थ, प्राथमिक जर्मनलोकांमध्यें, कौन्सिलाप्रमाणेंच समरांगणावरहि व्यवस्था ठेवण्याचें काम भटांचें असे. ते शकून पाहत, आणि लढाईस सुरुवात करण्याची खूण करीत; आणि जो न ऐकेल त्यास शिक्षा करण्याचें काम त्यांचेंच असे. कांहीं ठिकाणीं उपाध्यांचीं समरांगणांतील कामें धार्मिकच तेवढीं दिसतात. उदाहरणार्थ, सामोअनलोकांत उपाध्याचें काम आपल्या लोकांच्या वतीनें देवाची प्रार्थना करण्याचें व शत्रूस शाप देण्याचें असे. न्यूक्यालिडोनियामध्यें उपाध्ये लढाईस जातात, पण दूर राहून उपास करितात व जय मिळावा एतदर्थ प्रार्थना करितात. कोमांचीलोकांत लढाईस जाण्यापूर्वीं भट दे-

वांची प्रार्थना करीत. **साहेब** म्हणतात, ख्रिस्ती उपाध्यांची एतद्विषयक कल्पना अशीच दिसते. कारण १८८४ मध्यें ईजिप्त देशांत इंग्रजांनीं जी लढाई केली त्यावेळीं पुढील आशयाची प्रार्थना करण्याबद्दल क्यांटर्बरीच्या आर्चबिशपानें हुकूम केला होताः—" अरे परमेश्वरा, आमचे जे शिपाई व खलाशी लढाईस गेले आहेत त्यांचें संरक्षण कर; असें कीं तेणेंकरून ते तुझ्या नांवाचा डंका करण्यास जिवंत राहतील." पण रानटयाचा उपाध्या व ख्रिस्त्याचा उपाध्या यांच्यांत हा भेद दिसतो कीं, देवास विशिष्ट लढाई पसंत आहे किंवा नाहीं ह्याबद्दल पहिला कौल लावून पहातो, व दुसरा ती तशी आहे असें गृहीत धरून चालतो; मग ज्यांच्यावर हल्ला करावयाचा ते लोक आपल्यावर होणाऱ्या असह्य जुलमाचें निवारण करण्यासाठीं लढत असले तरी हरकत नाहीं.

कांहीं ठिकाणीं उपाध्यांचें काम लष्करी व्यवस्था ठेवणें, किंवा प्रसंगीं सल्ला देणें, हें असतें. उदाहरणार्थ, आफ्रिकेंत एगारालोकांमध्यें उपाध्या लढाईचा प्रधान असतो. प्राचीन मेक्सिकनलोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांचे राजे सर्व महत्त्वाच्या राजकीय कामांमध्यें महोपाध्यायांचा सल्ला घेत असत, आणि त्यांच्या सल्लयाखेरीज लढाई करीत नसत. पेरूदेशांतील उपाध्ये लढाईबद्दल सल्ला देत असें **प्रेस्कॉट** म्हणतो; आणि **टार्किमाडा** म्हणतो कीं ग्वाटिमालामध्यें लढाईच्या कामीं उपाध्ये म्हणतील तसें होत असे. सानसाल्व्हेडारमध्यें देखील महोपाध्याय व त्याचे मदतनीस देवाचा कौल

घेतल्यावर सेनापतीस व राजास बोलावीत, शत्रू लढाईस येत आहे म्हणून कळवीत, आणि त्याला लढाई द्यावी किंवा नाहीं हें सांगत. हीब्रूलोकांमध्येंहि असेंच असे. त्यांचे राजे लढाई करणें योग्य आहे किंवा नाहीं हें भविष्यवाद्यांस विचारीत.

४९. माणसें ज्या धर्माचीं असतात तदनुरूप वागतात असें समजण्या इतका कोणी भोळा असल्यास तो असा तर्क करील कीं, ज्या राष्ट्रांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला आहे तीं स्वधर्मानुरूप लढाईपासून पराङ्मुख न बनलीं तर आपल्या उपाध्यास धार्मिक गोष्टी तेवढ्याच, निदान युद्धविषयक विरहित गोष्टी तरी करावयास लावीत असतील. पण असा तर्क त्यानें केल्यास त्याची अगदीं चूक होईल.

कारण ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे कीं ख्रिस्ती यूरोपांत पुष्कळ शतकेंपर्यंत उपाध्यांचें लढाईत प्रत्यक्ष अंग असे. उदाहरणार्थ, फ्रान्सांत सातव्या शतकांत उपाध्ये लढाईस जात; आणि ७५० च्या सुमारास उपाध्यांचा लष्करी पेशा पूर्णपणें स्थापन झाला. चार्लस मार्टेलच्या कारकीर्दींत बिशप व इतर उपाध्ये सशस्त्र झालेले सर्वत्र दिसत असत. या वेळच्या धर्मसंस्थेच्या स्थितीसंबंधानें गीझो असें म्हणतो कीं, बिशपलोक यावेळीं स्वतः लढत असत, इतकेंच नव्हे, तर लुटालूट करण्याकरितां स्वतः देखील सैन्यें घेऊन शेजाऱ्यांवर चाल करीत. पुढच्या शतकांतून धार्मिक व लष्करी अग्रणीत्वाची ही सांगड जर्मनी व फ्रान्स या दोन्ही देशांत दिसत होती. जर्मनीमध्यें महोपाध्याय लष्करी पद्धतीवर जमीन धा-

रण करणारा सरदार असे. त्याच्या वृत्तीच्या मुलखांतील फौजेचा तो अधिपति म्हणून समजला जाई. आरडेरिक फ्रान्सचा इतिहास लिहीत असतां १०९४ व ११०८ या सालीं उपाध्यांनीं आपल्या वृत्तीच्या मुलखांतील लोकांना व मठाधिपतींना आपल्या कुळांना लढाईस नेल्याचें वर्णन करितो; आणि १११९ सालीं बिशपांनीं आपल्या हाताखालच्या भटांस आपापल्या वृत्तींतील गृहस्थांस घेऊन लढाईस निमंत्रण केलेलें दिसून येतें. १४५० सालानंतर देखील बाल्वेच्या मुख्य धर्माधिकाऱ्यानें पारीस शहरीं आपलें सैन्य जमा केलें; आणि त्यावेळीं बिशप, विश्वविद्यालयाधिपती, मठाधिपती वगैरे भट आपापले लोक घेऊन आले. १६९० च्या नंतरच उपाध्यांनीं स्वतः लढाईस न आलें तरी चालेल अशा अर्थाचे हुकूम सुटले. हल्लीं देखील मनुष्याचा वध व आत्म्यांचें तारण ह्या दोन गोष्टींच्या सांगडीचीं उदाहरणें सांपडत नाहींत असें नाहीं. असें म्हणतात कीं, सगळ्या यूरोपांत मान्टिनीग्रोमधीलच लोकांवरच कायतें लष्करी बिशपाचें हल्लीं राज्य आहे; आणि डेन्टनसाहेब म्हणतो कीं, तेथील उपाध्ये शस्त्रें धारण करीत असून ते लढाई करण्याच्या कामीं पटाईत असत.

प्राचीनकाळीं उपाध्ये प्रत्यक्ष लढाई करून शिवाय,लढाऊ सैन्यांचा कारभारहि पहात असत. उदाहरणार्थ, फ्रान्सांत कार्डिनल रिशलू हा सैन्याचा व आरमाराचा मुख्य प्रधान होता. त्यानें लढाईस मोठें पद्धतशीर स्वरूप दिलें, व सैन्यास मोठी शिस्त घालून दिली.

हल्लीं लोकांच्या दृष्टीस हे संयोग पडत नाहींत,

आणि त्यामुळें ते पूर्वी होते हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. साहेब म्हणातात, आमच्यामध्यें लढाईचे पटके मंत्र म्हणून पवित्र करणें, सूड उगविण्यासाठीं जे लढाईस जात असतील त्यांस क्षमा करण्यासाठीं देवाची प्रार्थना करणें, आणि सकारण किंवा अकारण केलेल्या हल्ल्यांत यश येण्याबद्दल कधीं कधीं त्यास विनविणें, इतकींच लष्करी कर्तव्यें हल्लीं आमच्या भटांकडे राहिलेलीं आहेत.

५०. एवंच, प्राचीनकाळच्या सर्व ठिकाणच्या पुराव्यावरून त्यावेळची भटविषयक कल्पना हल्लींच्या उलट होती हें स्पष्ट होतें. रानटी व अर्धवट सुधारलेल्या लोकांचे देव प्रारंभीं क्रूर नाईक व राजे असून त्यांच्या भुतांचें संतर्पण त्यांनीं सूड घेण्याकरितां किंवा मुलूख जिंकण्याकारितां सुरू केलेल्या लढाया चालू ठेवून करीत असत हें सत्य ध्यानांत घेतां, त्यांचे नेमलेले संतर्पक उच्चतर-गुणविशिष्ट नसून नीचतर-गुणविशिष्टच कसे असले पाहिजेत ही गोष्ट लक्षांत येते. म्हणून प्रारंभीं ते युद्धशील जे आढळून येतात तें साहजिकच आहे.

उपाध्यायिक व लष्करी पेशांचा हा संयोग ज्यास्त प्रत्यक्ष स्वरूपीं पहावयाचा असल्यास तो ह्या गोष्टीवरून दिसतो कीं, सामाजिक उत्क्रमणाच्या रीतसर क्रमामध्यें जो राजकीय मुख्य तोच लढाईतील अग्रणी आणि पूजा करण्यांत अग्रणी असतो. ह्यावरून सहजच असें व्यक्त होतें कीं हे दोन व्यापार अशा रीतीनें प्रारंभीं एकाच माणसाच्या ठिकाणीं संयुक्त असल्यामुळें ते भिन्न-भिन्न माणसांकडे जे जावयाचे ते हळूहळूच जाणार; आणि पुष्कळकाळपर्यंत ह्या भिन्न माणसांचे ठिकाणीं

कांहीं तरी गुणसाम्य कायम राहणारच. राष्ट्राचा मुख्य, धर्मसंस्था व सेना यांचें वास्तविक अधिपातित्व त्याच्याकडून गेल्यावर, नांवाचें अधिपतित्व धारण करूनच असतो, ह्यावरून ही गोष्ट दिसून येते.

आतां मुख्य उपाध्या जर मुख्य लढवय्या असेल तर बाकीचे उपाध्येहि लढवय्ये असावे ही गोष्ट साहजिकच आहे. म्हणून अनेक रानटी समाजांतून लढाईंत उपाध्यांचें कधीं प्रत्यक्ष लढवय्ये ह्या नात्यानें, कधीं लढणारांस स्फूर्ति आणणारे ह्या नात्यानें, कधीं देवाचा कौल घेऊन सल्ला देणारे ह्या नात्यानें, आणि कधीं लढाईचे कारभारी या नात्यानें अंग आढळलें तर त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

शिवाय, हा मूळसंबंध सहजगत्या नष्ट होत नाहीं. मध्ययुगीन यूरोपच्या इतिहासावरून असें निःसंशय दिसतें कीं ज्या कारणांनीं युद्धशीलतेचें जोरानें पुनर्जीवन होतें, तीं कारणें शिपाई व उपाध्या यांचा जो प्रारंभींचा संयोग तो पुनः स्थापन करितात; मग त्यांचा धर्मपंथ रक्तस्राव करण्याच्या अगदीं विरुद्ध असेना; तरी देखील जणूं काय तो रक्तस्राव करण्यास उत्तेजन देणाराच आहे अशा रीतीनें तो तीं पुनः जिवंत करितात. लढाई जशी कमी वारंवार होत जाईल आणि शांततेच्या वेळीं उत्पन्न होणारे सुधारणेचे प्रभाव जोरावर येतील, तसें उपाध्यायाचें अर्धवट लढवय्यें स्वरूप नष्ट होत जातें.

शेवटीं, आपण ही गोष्ट लक्षांत आणिली पाहिजे कीं, शत्रूंशीं लढणें आणि देवांना संतर्पिणें हे जे दोन व्यापार प्रारंभीं राजकीय नायकीशीं संयुक्त असतात

त्यांचें विभिन्नीकरण जेथें धार्मिक संघटना राजकीय संघटनेपासून स्वतंत्र झालेल्या आहेत तेथें सर्वांत ज्यास्त होतें. कारण तेथें उपाध्ये ज्या कुटुंबांतून लष्करी व आरमारी अधिकारी नेमतात त्यांतून (इंग्लंदांतील बिशपांप्रमाणें) नेमीत नसून, ते उद्यमशीलवर्गांतून निवडलेले असतात, आणि त्यामुळें ते अत्यन्त कमी युद्धशील असे सहज बनतात.

प्रकरण अकरावें

उपाध्याचीं दिवाणी कर्तव्यें

५१. ज्या ठिकाणीं राष्ट्राचा मुख्य, देवकुलोत्पन्न म्हणून समजला जात असून, आपल्या वंशांतील देवांचें संतर्पण करण्याच्या कामीं उपाध्या म्हणून वागत असेल, आणि त्याचा अधिकार अमर्यादित असेल, त्या ठिकाणीं दिवाणी व्यापार व उपाध्यायिक व्यापार ह्यांचा संयोग पूर्ण असतो, हें उघडच आहे. सामाजिक वाढीच्या प्रथमप्रथमच्या पायऱ्यांवरील एतद्विषयक* चांगलें उदाहरण पालिनिशियनलोकांत सांपडतें. त्यांचा राजा राजकीय कारभाराचा मुख्य असून देवांचाहि प्रतिनिधि असे. त्याला गादीवर बसवितेवेळीं माणसें बळी देत असत, आणि एकाद्याचें नुकसान वगैरे होऊन त्या भरांत जर तो त्याच्या विरुद्ध किंवा त्याच्या कारभाराविरुद्ध बोलला, तर त्याचा जीव धोक्यांत येई इतकेंच नाहीं, तर त्या भूमीला त्यामुळें भ्रष्टता प्राप्त झाली असें समजून ती काढून टाकण्याकरितां मानवी बळी द्यावे लागत. अनेक नष्ट समाजांतून दिवाणी व धार्मिक व्यापारांचें संमेलन झालेलें असे. आसीरियामध्यें राजाच्या अंगीं देवाचे गुण आहेत, किंवा तो एकप्रकारचा मुख्य देवच आहे, असें समजत असून, त्याच्या लढाईच्या वेळच्या व शांततेच्या वेळच्या सर्व कृती राष्ट्रीय धर्माशीं संबद्ध असत, व देवाची त्याच्यावर विशेष नजर आहे असें समजत; म्हणून कोरींव चित्रांतून तो राज्याचा दिवाणी मुख्य आणि देवांचा मुख्य बळी दे-

णारा म्हणून दाखविलेला आढळतो. प्राचीन ईजिप्त, प्राचीन मेक्सिको, प्राचीन पेरू वगैरे देशांतून असाच संबंध दृष्टीस पडे; आणि जपानमध्येंहि परवांपर्यंत जरी तो वास्तविक नसला तरी नांवाचा तरी दिसत असे.

समाजाच्या ज्या प्राथमिक रचनेंत सामान्य पितृपूजेबरोबर जेत्या टोळीच्या स्थापकाची विशेष पूजा उत्पन्न झालेली असून त्याचा मुख्य वंशज त्याचा संतर्पक, आणि त्याच्या दिवाणी व लष्करी नायकीचा वंशपरंपरेनें उपभोक्ता असतो, ती रचना ज्या समाजांनीं संभाळून धरिली असेल, त्या समाजांत हा संबंध सहजगत्या दृष्टीस पडतो हें उघडच आहे.

५२. हा संयोग जेथें राजाचें देवपण किंवा देववंशजत्व धर्माचें एक तत्त्वच बनलेलें असेल तेथें अत्यन्त ठळक असून, जेथें त्यास केवळ देवसंमतिच आहे म्हणून समजत असतील तेथेंहि चालू राहतो. कारण अशा ठिकाणीं तो बहुधा धार्मिक संघटनेचा नांवाचा किंवा वास्तविक मुख्य असतो; आणि सामान्यतः जरी तो दिवाणी कामांत गुंतलेला असतो तरी मोठ्या प्रसंगीं उपाध्यायिक कामेंहि तो करीत असतो.

जेथें धर्म मूळचाच असेल तेथें हा संबंध असणें साहजिकच आहे. पण जेथें मूळचा धर्म मोडून नवा धर्म स्थापन झाला असेल, तेथेंहि हा संबंध पुनः स्थापन होण्याचा संभव असतो. यूरोपांत धर्मसंघटना जी सर्वत्र वृद्धिंगत होत गेली त्यावरून हें स्पष्ट दिसतें. ही घटना प्रथम स्थानिक व प्रसृत असून पुढें तीस धार्मिक व दिवाणी अधिकार एकाचे ठिकाणीं घनीभूत झालेल्या

घटनेचें स्वरूप येऊं लागलें. बेडालियर म्हणतो कीं फ्रान्सांत चवथ्या व पांचव्या शतकांत सेनेटचे सभासद, प्रांतांचे सुभेदार, वगैरे अंमलदार बिशप असत; आणि गीझो म्हणतो कीं, पांचव्या शतकांत बिशप व उपाध्ये हे शहरचेच मुख्य म्याजिस्ट्रेट असत. थिओडोसियस व जस्टिनियन यांनीं केलेल्या कायदेबाडांत म्युनिसिपालिटीचीं कामें बिशप व इतर भट यांजकडे सोंपविण्याबद्दल अनेक नियम आहेत. जर्मनीमध्यें बिशपांचा अधिकार प्रथम त्यांच्या प्रांतांतील भटांवर तेवढाच चालत असून मागून हळूहळू तो धर्मसंबंधाच्या बाबतींत तेथील गृहस्थांवरहि ते चालवूं लागले. आणि त्यांच्या हुकमांची बजावणी करण्याचें काम स्थानिक कोर्टांकडे येऊं लागलें. पुढें जेव्हां दहाव्या शतकांत लष्करी जमिनदारीच्या पद्धतीच्या वाढीनें बिशप लोक स्वतःच जमीन धारण करणारे सरदार बनले, आणि गृहस्थांप्रमाणेंच लष्करांत नोकरी करण्याची जबाबदारी त्यांजवर आली, तेव्हां इतर सरदारांप्रमाणें त्यांच्याकडेहि न्यायाधीशाचें काम येऊं लागलें; मात्र त्यांना फांशीची शिक्षा देण्याचा किंवा ती अमलांत आणण्याचा तेवढा अधिकार नसे. बाराव्या शतकांत इंग्लंदांत अशीच स्थिति दृष्टीस पडे; म्हणजे बिशपी सरदार इतर सरदारांचे सर्व हक्क चालवीत व सर्व जबाबदाऱ्या संभाळीत.

आतां एथें आणखी एक गोष्ट अशी सांगावयाची कीं, ह्याप्रमाणें स्थानिक उपाध्यांना जसे स्थानिक दिवाणी अधिकार प्राप्त झाले तसे मुख्य उपाध्यास मुख्य दिवाणी अधिकार प्राप्त झाले. म्हणजे, राजांच्या सार्वज-

निक व खासगी कृत्यांवर पोप नजर ठेवूं लागला; एवं-च तेराव्या शतकांत राष्ट्रांना धार्मिक जमिनदाऱ्यांचें रूप आलें.

५३. आतां मुख्य किंवा स्थानिक शास्ता या नात्यानें उपाध्याचीं जीं दिवाणी कर्तव्यें त्यांपासून त्याचीं जीं राजकीय मुख्यापासून स्वतंत्र न्यायाधीश म्हणूनच दिवाणी कर्तव्यें त्यांजकडे जाण्यास मध्यें एकच पायरी लागते, व ती बहुतकरून नांवाचीच असते.

समाजोत्क्रमणाच्या पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर न्यायाधीशाचें काम बहुतकरून उपाध्याकडे येतें तें या कल्पनेवरून येतें कीं जो मृतशास्ता देव बनला असेल त्याचा अंकित होणें हें जिवंत शास्त्याचा अंकित होण्यापेक्षां ज्यास्त महत्त्वाचें कर्तव्य आहे, आणि उपाध्ये हे मृतशास्त्याशीं बोलतचालत असल्यामुळें त्याच्या इच्छा त्यास चांगल्या समजत असल्या पाहिजेत, आणि म्हणून न्यायाधीश होण्यास तेच योग्य आहेत. असुधारलेल्या व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें ह्याचीं अनेक उदाहरणें सांपडतात. उदाहरणार्थ, किनाऱ्यावरील नीग्रोंबद्दल आपण असें वाचितों कीं त्यांच्यांत उपाध्ये तेवढेच न्यायाधीशाचें काम करितात. प्राचीन यूकाटनमध्यें देवांच्या पुजाऱ्यांना इतका मान असे कीं त्यांजकडे शिक्षा करण्याचें व बक्षिसें देण्याचें काम दिलेलें असे. गॉलवस्कांडिनेव्हियनलोकांमध्यें उपाध्ये न्यायाधीश असत हें पांचव्या भागांत सांगितलेंच आहे. ईजिप्शनलोकांतहि असेंच असे. ते राजाचे न्यायाधीश, मंत्री, व कायदे करणारे असत; कारण ज्यू, मुसलमान,

वगैरे लोकांप्रमाणें कायदे हे त्यांच्या धर्मग्रंथाचाच एक भाग असे.

सर्व ख्रिस्तीराष्ट्रांतून उपाध्या व शास्ता यांमधील संबंध प्रारंभीं जरी भिन्न असे, तरी मूळधर्माच्या भटां-प्रमाणें त्या धर्माचेहि भट देवप्रेरित आहेत अशी जेव्हां समजूत उत्पन्न झाली, तेव्हां त्याचा न्यायाधीश या ना-त्यानें अधिकार मानण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली. इंग्लं-दांत प्राचीनकाळीं माणसांमाणसांमधील तंटे तोडणें, खोटें बोलणारास प्रतिबंध करणें, आणि दिव्यें करतील त्यांज-वर नजर ठेवणें, हें बिशपाचें काम असे. पुढें हा अधि-कार ते हळू हळू वाढवीत चालले. त्यांच्या कोर्टाकडे वरिष्ठ धर्माधिकाऱ्यांचे हुकूम कनिष्ठ अधिकाऱ्यांस माना-वयास लावणें एवढेंच काम प्रथम असे; पुढें ज्या धर्म-विषयक खटल्यांत भट व गृहस्थ या दोघांचेंहि अंग असेल त्या खटल्यांचा निकाल करण्याचा अधिकार त्यांनीं बळकाविला; आणि पुढें असल्या खटल्यांत केवळ गृहस्थांवर ते आपला अधिकार चालवूं लागले. प्रथम हा अधिकार केवळ धर्मविषयकच असून पुढें मृत्युपत्रें व विवाह, सावकार व ज्यू, शपथेवरील सर्व करार, धर्म-विषयक युद्धांसंबंधीं सर्व प्रकरणें, इस्पितळें व धर्मार्थ संस्था, आणि शपथेवर खोटें बोलणें, अतिरिक्त मद्यपान वगैरे करणें, वगैरे सर्व गोष्टींबद्दलची चवकशी हीं कोर्टें करूं लागलीं. त्याबरोबरच, पोपानें केलेल्या ठरावांवर हु-कूम धर्मविषयक कायदेबाड उत्पन्न झालें. दिवाणी को-र्टांच्या अधिकाराचें धार्मिक कोर्टांनीं जें हें अतिक्रमण केलें, त्यामुळें वरचढपणाबद्दल त्यांजमध्यें तंटा सुरू

झाला, आणि शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं तेराव्या शतकांत धार्मिक कोर्टांचा अधिकार कमी होऊं लागला, आणि हल्लीं तो बराच कमी झाला आहे.

५४. ज्या स्थळीं किंवा ज्या काळीं उपाध्ये दैविक शहाणपणानें प्रेरित झालेले किंवा दैविक हुकूम प्रसिद्ध करणारे म्हणून समजले जातात, त्या स्थळीं वा त्या काळीं त्यांच्याकडे न्यायविषयक जसा बराच अधिकार असतो, तसा मंत्री किंवा प्रधान या नात्यानें कारभार पाहण्याचाहि बराच अधिकार असतो.

कांहीं ठिकाणीं राजकीयशास्ता त्यांची जी मदत घेतो ती त्यांच्या अंगीं दैविक शहाणपण आहे असें त्यास वाटतें म्हणून नव्हे, तर लोकांस कह्यांत ठेवण्याच्या कामीं ते उपयोगीं पडतात म्हणून होय. उदाहरणार्थ, क्रूकशांक म्हणतो कीं, गोल्डकोस्ट नामक आफ्रिकन किनाऱ्यावरील लोकांत उपाध्यावर शहाण्या लोकांचा जरी विश्वास नसतो, तरी ते दिवाणी कारभारांत फार उपयोगीं पडतात असें ते समजतात. फीजियनलोकांतील बायकांचा त्यांच्या उपाध्यांच्या सामर्थ्यावर जरी फारसा विश्वास नसतो, तरी ते लोकांवर कारभार चालविण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करितात. आबिसीनियामध्यें-हि असेंच आहे.

तथापि पुष्कळ ठिकाणीं राजकीय मंत्री म्हणून उपाध्याकडे जो अधिकार देतात तो त्याच्या अंगीं दैविक सामर्थ्य असतें ह्या समजुतीवर देतात. उदाहरणार्थ, मरुत्सेलोकांबद्दल होलब असें म्हणतो कीं, सेपोपो राजाच्या दरबारांत दोन जादूगार किंवा वैदू असून त्यां-

च्याकडे राजकीय कामांत बहुतेक सर्वांत श्रेष्ठ अधिकार असतो. त्याचप्रमाणें डायाकलोकांबद्दल बॉइल असें सांगतो कीं, त्यांच्यांत नायकाच्या शेजारच्या घरांत वैदू रहात असतो. आपण हें पाहिलेंच आहे कीं, मेक्सिकोमध्यें राजे सर्व महत्त्वाच्या राजकीय कामांत महोपाध्यायांस शकुन विचारीत असत. प्राचीन ईजिप्तमध्यें असेंच असे. त्यांच्यांत उपाध्याचा दर्जा राजाच्या खालोखाल असे, आणि त्याचे विश्वासू व जबाबदार मंत्री त्यांच्याचपैकीं तो निवडीत असे. ब्रह्मदेशांतहि असेंच असे. संगरमानो म्हणतो कीं, तेथें सर्व ब्राह्मणांच्या स्वाधीन असे; तें इतकें कीं, त्यांच्या सल्ल्याशिवाय राजासहि कांहीं करितां येत नसे.

आतां ज्या समाजांतील धर्मांची उत्पत्ति मृतशास्त्यांच्या पूजेपासून झाली असेल त्या समाजांत धार्मिक व्यापार आणि दिवाणी कामांत सल्ला देण्याचा व्यापार, ह्या दोहोंचा संयोग व्हावा ही गोष्ट साहजिकच आहे, पण आपल्या असें दृष्टीस पडत कीं जेत्या धर्मांचे उपाध्ये देखील मूळ धर्मांच्या उपाध्यांसारखेच अधिकार, ह्या व इतर बाबतींत, वस्तुतः मिरवूं शकतात. उदाहरणार्थ, मध्ययुगीन यूरोपाच्या इतिहासावरून उपाध्ये दिवाणी शास्त्याचे प्रधान, परराष्ट्रीय वकील, आणि मंत्रिमंडळाचे सभासद, इत्यादि नात्यांनीं मुनीम बनतात, हें स्पष्ट दिसतें.

५५. पण उपाध्यांच्या लष्करी व्यापारांच्या संबंधानें जें होतें तेंच त्यांच्या दिवाणी व्यापारांच्या संबंधानेंहि होतें. तें हें कीं, समाजप्रगतीबरोबर व्यापारवि-

शिष्टीकरण वाढत गेल्यामुळें, ते व्यापार ज्यास्त ज्यास्त आकुंचित होत जातात.

एका टोंकास, प्राथमिक राजाचे ठिकाणीं ह्या दोन प्रकारच्या व्यापारांचें पूर्ण संमेलन दिसून येतें, आणि दुसऱ्या टोंकास, सुधारलेल्या समाजांच्या सरकारांमध्यें, उपाध्ये दिवाणी कामांत प्रमुख असण्याच्या ऐवजीं, बहुतेक त्यांचें मुळींच अंग नसतें. इंग्लंदामध्यें कोठें कोठें उपाध्ये म्याजिस्ट्रेट दिसतात तेवढी गोष्ट वजा करतां, पूर्वीं जे मुख्य मुख्य उपाध्यांकडे न्यायविषयक व कारभारसंबंधीं बरेच अधिकार असत, ते त्यांच्या हातांतून निघाले आहेत; आणि बिशपाच्या हातीं लार्डांच्या सभेचे सभासद ह्या नात्यानें कायदे करण्याचा जो कांहीं अधिकार आहे, तो फार दिवस त्यांचे हातीं राहीलसें वाटत नाहीं. इकडे हें अधिकारविभिन्नीकरण लोकांच्या मनांत इतकें बिंबून गेलें आहे कीं, भटलोकांनीं राजकीय कामांत प्रमुखत्व पत्करणें हें सामान्यतः गैर समजतात.

हा जो फेरबदल झाला आहे तो किंवा निदान त्याची पूर्णता उद्यमशील नमुन्याच्या वाढीबरोबर झालेली आहे असें मानण्यास सबळ कारण दिसतें. प्रत्येक नागरिकास आपले हक्क प्रतिपादण्याची व दुसऱ्याच्या हक्कांना मान देण्याची संवय लावून, व्यक्तिस्वातंत्र्य व व्यक्तिमत ह्यांच्या ज्या वाढत जाणाऱ्या प्रतिपादनास उद्यमशील जीवित उत्तेजन देत असतें, त्यामुळें इतर बेजबाबदार शासनाप्रमाणें उपाध्यांच्याहि बेजबाबदार शासनास प्रतिरोध होऊं लागतो असें दिसतें. परंतु पुढच्या प्रकरणांत ही गोष्ट ह्याच्याहूनहि ज्यास्त स्पष्ट होणार आहे.

प्रकरण बारावें
धर्मसंस्थान व सरकार

५६. प्रारंभीं धर्मसंस्थान व सरकार ह्यांच्यांत भेद नसतो हें अनेक तऱ्हांनीं आतांपर्यंत दाखविलें आहे. उदाहरणार्थ, चीन व जपान ह्या देशांत इहलोक व परलोक ह्यांच्या कल्पना इतक्या मिश्रित आहेत कीं, दोन्ही लोकांचा एकच जिवंत शास्ता असतो असें ते समजतात. तद्वतच, प्राथमिक शास्ता, आपल्या मृतपूर्वजाचा प्रतिनिधी असून त्यास तो उपाध्या या नात्यानें बळी देऊन व त्याच्या आज्ञा अमलांत आणून संतुष्ट करीत असल्यामुळें, त्याच्या ठिकाणीं मृतांचें शासन व जिवंतांचें शासन हीं संयुक्त होत असतात. शिवाय, जेथें योग्य क्रम कायम राहिला असेल, तेथें ऐहिक शासन व पारलौकिक शासन ह्यांच्या संघटना वस्तुतः मिश्रित राहतात, कारण पहिलें शासन दुसऱ्याचें बऱ्याच अंशानें साधन असतें. हा संबंध मंगायामध्यें आपल्या दृष्टीस साध्या स्वरूपीं पडतो; तेथें राजे रॉंगो देवाचे उपाध्ये असत. हा देव सर्वसंरक्षक व सर्व अधिकाराचा उद्गम असल्यामुळें, त्यांच्या हातीं विलक्षण अधिकार असे; आणि रॉंगो क्रुद्ध होईल ह्या भीतीनें इतरांप्रमाणें राजेहि त्यांच्या आज्ञा मानीत असत. सरकारचें हें दैविक स्वरूप पुष्कळ ठिकाणीं पूर्णपणें पक्क झालेलें दृष्टीस पडतें. हीब्रूलोकांपेक्षां ईजिप्शनलोकांमध्यें तें ज्यास्तच स्पष्टरीत्या दिसून येई. तिबेट व जपान एथील सरकारांप्रमाणें भूतानचेंहि सरकार पूर्णपणें दैविक आहे,

कारण तेथें धार्मिक नाईक सर्वांत श्रेष्ठ समजला जातो; व तो स्वामी असल्यामुळें, त्याचें राज्यकारभार पाहण्याचें काम त्याचा एक प्रतिनिधी करितो. पण असल्या कांहीं ठिकाणीं धार्मिक मुख्याचें श्रेष्ठत्व वास्तविकपणें राजकीय मुख्याच्या हातीं गेलेलें दृष्टीस पडतें. ह्याचें उदाहरण पॉलिनिशियामध्यें आढळतें.

ज्या ठिकाणीं राजकीय शास्ता धार्मिक शास्त्याचा केवळ प्रतिनिधी बनावा इतकें धर्म व सरकार ह्यांचें पूर्ण संमिश्रण झालेलें नसेल, त्या ठिकाणीं देखील त्यांचें थोडेंसें संमिश्रण दृष्टीस पडतें. उदाहरणार्थ, ईजिप्तमध्यें उपाध्येवर्गाचें सर्व गोष्टींत प्रमुख अंग असे. त्यांच्या अधिकाराबाहेर कोणतीच गोष्ट नसे. राजा देखील त्यांनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें वागत असे, व रहात असे. प्राचीन अमेरिकनलोकांमध्यें धर्मविश्वास ईजिप्तसारखेच जोरदार असून त्यांच्यांतहि धर्म व सरकार यांचा असाच संयोग दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, पेरूव्हियनलोकांमध्यें धार्मिक व राजकीय सरकार हीं दोन्ही अगदीं एक असत; यूकाटनमध्यें उपाध्यांचा अधिकार राजाहून अधिक असे; आणि मेक्सिकनलोकांतहि अशीच स्थिति असे.

जेथें धर्म मूळचा नसून बाहेरून आलेला असेल तेथेंहि धर्मविश्वास जोंपावेतों परीक्षण न करितां लोक स्वीकारीत असतात तोंपावेतों अशीच स्थिति राहते हें मध्ययुगीन यूरोपाच्या इतिहासावरून दिसून येतें.

पण सर्वत्र धर्म व सरकार ह्यांमध्यें विभिन्नीकरण व वियुक्तीकरण वाढत जाण्यास अनेक कारणें एकत्र हो-

तात. प्रथम त्या दोघांचीं हिताहितें बऱ्याच अंशीं एकच असल्यामुळें जरी ते एकमेकांशीं सहकार्य करीत असतात तरी अखेरीस धर्माधिकारी व सरकाराधिकारी श्रेष्ठत्वासाठीं परस्परांशीं स्पर्धा करूं लागतात; आणि त्यामुळें व त्यांच्या रचना व व्यापार भिन्न भिन्न होत गेल्यामुळें अखेरीस ह्या दोन संघटना परस्परांपासून पृथक् होतात.

५७. धर्म व सरकार ह्यांजमध्यें श्रेष्ठत्वाकरितां जो कलह अखेरीस सुरू होतो, व जेणेंकरून राजकीय रचना धार्मिक रचनेपासून ज्यास्त ज्यास्त भिन्न होत जाते, तो आपल्या लक्षांत आणण्याकरितां धर्माधिकाऱ्यांच्या अधिकाराच्या उद्गमांकडे आपण नजर फेंकिली पाहिजे.

दिवाणी शास्त्याच्या अधिकारास मंजुरी देण्याचा देवाचा प्रतिनिधी म्हणून उपाध्या आपला हक्क सांगतो. हा हक्क झुलूलोकांप्रमाणें असुधारलेल्या लोकांत हल्लीं कबूल केलेला आढळून येतो. कारण त्यांच्यांतील नाईक गादीवर बसतेवेळीं प्रसिद्ध प्रसिद्ध शकुन्यांस बलावीत असतो, अशासाठीं कीं त्याची सत्ता वास्तविक व्हावी. प्राचीन ईजिप्तमध्यें राजा धर्माधिकाऱ्यांच्या हातीं पूर्णपणें असून त्यांच्यापैकीं तो एक बनेल तेव्हांच त्यास अभिषेक होत असे. हीब्रूलोकांमध्यें सॉलला साम्यूएलनें देवाच्या नांवानें अभिषिक्त केलेलें आढळून येतें. यूरोपांत पोपांना इतका अधिकार प्राप्त झाला होता कीं, यूरोपचे राजे आपले मुकूट त्यांचे हातून घेऊन तुमची आज्ञा पाळूं म्हणून शपथ घेत असत. ह्यावरून राजांस राज्याभिषेक करण्याचा जो अधिकार हल्लीं उपाध्यांकडे

नांवाचा आहे तो जेव्हां त्यांजकडे वास्तविक होता, तेव्हां त्यांच्या सत्तेचें तें एक अंग होतें हें स्पष्ट होतें.

शिवाय उपाध्यांचें दैविक सत्त्वांशीं वजन असतें असें समजतात. जेथें धर्मनिष्ठा पूर्ण असेल तेथें तो देवाची प्रार्थना करून आपल्यावर संकट आणील ही भीति, किंवा विनवणी करून सुख देईल ही आशा, ह्यांच्या योगानें त्यास फारच अधिकार प्राप्त होत असतो. जेथें प्रत्येक मनुष्यास बळी देण्याचा अधिकार असे तेथें देखील उपाध्यास त्या कामीं विशेष ज्ञान आहे असें समजत असल्यामुळें त्याचें महत्त्व असे. उदाहरणार्थ, रोममध्यें उपाध्यांची सत्ता याच करणानें वाढली होती. आतां जेथें देवाचें संतपर्ण करण्याचा अधिकार केवळ उपाध्यासच असे तेथें, चिब्चालोकांतल्याप्रमाणें, त्या वर्गाचें महत्त्व ज्यास्तच वाढे हें उघडच आहे.

ह्याशिवाय, दुसरीं अनेक महत्त्वाचीं साधनें उपाध्येवर्गापाशीं असतात; एक पापाबद्दल क्षमा करण्याचें किंवा न करण्याचें त्यांच्या हातीं असतें असें समजतात हें होय. दुसरें, परलोकीं जाण्यास जो परवाना लागतो तो तेच देऊं शकतात असें समजतात हें होय; उदाहरणार्थ, मेक्सिको, जपान व रशिया या देशांमध्यें. तिसरें साधन, ते वाळींत टाकूं शकतात हें होय.

उपाध्येवर्गाचें प्रस्थ माजण्यास आणखी कारणें होत असतात; प्रारंभींप्रारंभींच्या समाजांमध्यें तेच सुशिक्षित असतात. रानटी लोकांच्या वैदूच्या ठिकाणीं देखील इतरांपाशीं नाहीं अशी कांहीं माहिती असते; आणि ईजिप्शन, खाल्डियन, वगैरे लोकांतील उपाध्ये-

वर्गाकडे पाहतां, ग्रहणादि सृष्टिचमत्कारांचें ज्ञान त्यांचे ठिकाणीं असल्यामुळें अशिक्षित लोकांना त्यांचा मोठा बाऊ कसा वाटत असतो हें लक्षांत येतें. शिवाय, लेखनकलाहि त्यांसच माहीत असल्यामुळें त्यांचें वजन आणखी वाढतें. कारण तेणेंकरून अज्ञानास ढलपा बोलतो कसा ह्याचा चमत्कार वाटून शिवाय उपाध्येवर्गास लिहून वाचून दळणवळण ठेवतां आल्यामुळें आपला अधिकार संभाळून धरतां येतो. तद्वतच, लिहिण्यावाचण्याचें ज्ञान त्यांसच असल्यामुळें पुष्कळ दिवाणी कामें त्यांच्याकडून कशीं करून घ्यावीं लागतात, हें मध्ययुगीन यूरोपच्या इतिहासावरून दिसतें. तद्वतच, दिवाणी शास्त्र्यांचे शिक्षक म्हणून त्यांचें प्रस्थ वाढत असतें हें आपण विसरतां कामा नये. मध्ययुगीन यूरोपांत अशी स्थिति असून ब्रह्मदेशांतहि होती.

शिवाय धर्मसंस्थांच्या हातीं मालमत्ता जमल्यानें त्यांच्या हातीं सत्ता येत असते. रानटी लोकांत भूतकाढचे व शकुन्ये यांस त्याबद्दल कांहीं देत असून, पुढें बळी देणाऱ्या उपाध्यास बळी देण्याचे जिन्नसच मेहनतीबद्दल देऊं लागतात; आणि पुढें देवळें व पुजारी यांस देणग्या द्यावयास लागल्यामुळें धर्मसंस्थांची संपत्ति वाढत जाते. प्राचीन मेक्सिकोबद्दल बोलतांना झुरिटा असें म्हणतो कीं, तेथें पुष्कळ शहरांव्यतिरिक्त सार्वजनिक अर्चेकरितां पुष्कळ उत्कृष्ट जमिनी तोडून दिलेल्या होत्या. पेरूव्हियनलोकांमध्यें धर्मकृत्यासाठीं सार्वजनिक उत्पन्नाचा तिसरा ते चवथा हिस्सा लावून दिलेला असे. प्राचीन ईजिप्तमध्यें उपाध्ये चैनींत व श्रीमंतींत रहात

असत. त्यांच्याकडे लावून दिलेल्या जमिनी सर्वांत ज्यास्त असून, एका काळीं त्यांस कर मुळींच द्यावा लागत नसे. रोममध्येंहि, हल्लीं रोमनक्याथलिक धर्माच्या देशांमध्यें धर्मसंस्थांच्या उत्पन्नांसंबंधी जशी स्थिति दृष्टीस पडते, तशीच असे. मध्ययुगामध्यें यूरोपांत उत्पन्नाचा दशांश वगैरे देणग्या धर्मसंस्थांस दिलेल्या असून शिवाय एका वेळीं तृतीयांश जमिनी त्यांच्याकडे गेलेल्या होत्या.

५८. धर्मसंस्थांच्या हातीं अशी अनेक प्रकारची स्वाभाविक व दैविक मोठी सत्ता असल्यामुळें त्यांस विरोध करतां येत नाहीं, व कित्येक ठिकाणीं विरोध चालतहि नाहीं. सामाजिक उत्क्रमणाबरोबर होणाऱ्या कमज्यास्त व्यापारविशिष्टीभवनाबरोबर धर्मसंस्था व सरकार यांमध्यें थोडा-फार भेद जेथें उत्पन्न झाला असेल, तेथें त्या दोघांमध्यें उद्देशभेद उत्पन्न होणें साहजिकच आहे; आणि त्यावरून सहजच अशा ठिकाणीं असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, जिवंत शास्ता आणि त्याचे दिवाणी व लष्करी नोकर यांनीं जे आपणास मृतशास्त्यांचे प्रतिनिधी म्हणून म्हणवितात व त्यांच्या आज्ञा पाळण्याचें मिष करितात, त्यांच्या संघटनेस हार जावयाचें किंवा नाहीं ? आणि समाजांत जर धर्मविश्वास पूर्ण असेल, आणि दैविक सत्त्वांची भीति अत्यन्त असेल, तर ऐहिक सत्ता पारलौकिक सत्तेस हार जाते.

हा कलह अगदीं प्रारंभापासून दिसून येतो. उदाहरणार्थ, झुलूलोकांमधील पाऊसपाड्या वैदूंची नायकांच्या मानानें लोक किती किंमत मानितात ह्यासंबंधानें आपण असें वाचितों कीं, ते आपल्या नायकाच्या सा-

मध्यीनें आपल्यास खावयास धान्य मिळेल असें म्हणत नाहींत, तर तें अमक्या अमक्याच्या मुलाच्या (पाऊस पाडण्याच्या) द्वारा मिळेल असें म्हणतात. ह्यासंबंधानें आपण आणखी असें वाचितों कीं, झुलूलोकांचा नाईक वैदूचा बहुधा द्वेष करीत असून कधीं कधीं त्यास ठारहि करीत असतो. ह्या कलहाचें दुसऱ्या एकप्रकारचें उदाहरण सामोआमध्यें दिसून येतें. तेथील लोकांचें कौन्सिल टाँगनलोकांवर सूड उगविण्याकरितां काय करावयाचें हें ठरविण्याकरितां जेव्हां भरलें तेव्हां तेथील महोपाध्यायाचें असें मत पडलें कीं टाँगन कैद्यांना एकदम ठार करावें. राजाचें मत ह्याच्याविरुद्ध पडलें, आणि त्यामुळें त्या दोघांमध्यें तंटा होऊन यादवी सुरू झाली, त्यांत राजाचा पराभव होऊन त्यास हुसकून लाविलें, व उपाध्या त्याची गादी बळकावून बसला. राजकीय मुख्य, व देवाचा मुनीम म्हणून समजलेला माणूस ह्यांमधील जो हा कलह तो डेव्हिड व सॉल ह्यांच्या उदाहरणांत हीब्रूलोकांमध्यें दिसूत येतो. ग्रीकलोकांमध्येंहि ह्याचें उदाहरण दिसून येतें. उदाहरणार्थ, इलियड लिहिलें गेलें तेव्हांच्या काळास अनुसरून कर्र्यस म्हणतो कीं, तेथील उपाध्ये व विशेषतः भविष्यवादी राजाच्या अधिकारास विरोध करीत असत. रोमनलोकांमध्येंहि उपाध्यांनीं दिवाणी अधिकारास विरोध केल्याचीं उदाहरणें सांपडतात. कारण ते मोठ्या अडचणीच्या वेळीं देखील कर देण्यास कांकूं करीत असत, आणि त्यांच्याशीं अगदीं मारामारीवर यावें तेव्हां ते ते देत. हा विरोध अनेक लोकांत अनेक तऱ्हांनीं

दृष्टीस पडतो. सोळाव्या शतकांतील जपानी भटांबद्दल डिक्सन असें म्हणतो कीं, ते आपल्या संपत्तीनें आपल्या कुळांतून, व स्वतः नोकरी करून बरेंचसें सैन्य तयार ठेवीत असत. प्राचीन अमेरिकेंतील नाहुअन-लोकांमध्यें उपाध्यांच्या हातीं ऐहिक व पारलौकिक बरीच सत्ता असे. योपा हें जें त्यांचें एक मोठें शहर त्यावर एका महोपाध्यायाचा पूर्ण अधिकार असे, व तो तेथील राजांशीं चांगलीच स्पर्धा करीत असे. आणि यूरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रांतूनहि राजे व धर्माधिकारी यांजमध्यें श्रेष्ठ अधिकाराच्यासंबंधानें कित्येक दिवस कलह माजून राहिलेला होता हें सुप्रसिद्धच आहे.

५९. असें मानण्यास जागा आहे कीं, ऐहिक सत्तेवरील पारलौकिक सत्तेचें प्राबल्य जें कमी होत जातें त्यासहि कारण, समाजसुधारणेच्या बाबतींत इतरत्र दिसलें त्याप्रमाणें, उद्यमशीलतेची वृद्धि हेंच होतें.

३६व्या कलमांत ही गोष्ट अगोदरच आपल्या नजरेस आलेली आहे कीं, प्राचीन अमेरिकेंतील लोक स्वभावानें अत्यन्त लीन असल्यामुळें समाजाच्या लष्करी नमुन्यास योग्य अशा अत्यन्त स्वेच्छाचारी राजकीय शासनास जसे विरोध न करितां वश झाले होते, तसेच ते त्यांच्या रक्ताभिलाषी देवतांचे जे अत्यन्त वाढलेले उपाध्येवर्ग त्यांसहि वश झालेले होते; आणि इतरत्रहि असलीं ह्या दोन बाबतींत स्वभावसाम्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात हेंहि आपल्या लक्षांत आलेलें आहे. ह्याच्या उलट उदाहरण प्राचीन लोकांत ग्रीक-लोकांचें असे; त्यांना अनुकूल परिस्थिति असल्यामुळें

त्यांनीं जसे स्वेच्छाचारी राजे आपल्यांत होऊं दिले नाहींत, तसे त्यांनीं उपाध्येवर्गहि उत्पन्न होऊं दिले नाहींत; आणि त्यांजमध्यें व विशेषतः आथेन्स येथें उद्यमशीलतेची वृद्धि झालेली होती; आणि हीच स्थिति यूरोपच्या सर्व इतिहासांतून दिसून येते.

हे जे फेरबदल एकसमयावच्छेदेंकरून होत असतात त्याचें सामान्य कारण, जबरीच्या सहक्रियेच्या ऐवजीं स्वेच्छेची सहक्रिया उद्यमशीलतेमुळें लोकांत उत्पन्न होते, म्हणजे, ज्या सामाजिक स्थितींत अधिकाऱ्यांची आज्ञा शिरसा वंद्य मानणें हा मोठा सद्गुण समजतात त्या स्थितीच्या ऐवजीं ज्या स्थितींत अधिकारी ठरीव मर्यादेचें उल्लंघन करूं लागल्यास त्यांस प्रतिरोध करण्याची लोकांत प्रवृत्ति उत्पन्न होते ती स्थिति प्राप्त होते, हें होय. कराराची पद्धति सुरू झाली म्हणजे दुसऱ्याच्या हक्कांस धक्का न लावणें आणि स्वतःचे हक्कांसहि इतरांस धक्का लावूं न देणें ह्या दोन गोष्टींची जी रोज संवय लागते त्या योगानें हा स्वभावबदल होत असतो. ह्या संस्कारामुळें मनाची जी स्थिति उत्पन्न होते ती राजकीय मुख्य व त्याचे कायदे किंवा धार्मिक मुख्य आणि त्याचीं धर्ममतें, ह्यांना आंधळ्याप्रमाणें मान्य करण्याच्या विरुद्ध असते. म्हणून तिची प्रवृत्ति जशी दिवाणी शास्त्याच्या जुलमी शासनास आळाबंदा घालण्याकडे असते तशी अमुक अमुक बाबतींत उपाध्याचा अधिकार काय म्हणून असें म्हणण्याकडे असते; आणि अशा रीतीनें प्रश्न करण्याची संवय एकदां लागली म्हणजे उपाध्यांना धर्मविषयक प्रेरणा ईश्वर करितो हा जो

समज त्याजबद्दल शंका उत्पन्न होऊं लागते, आणि त्या समजामुळें उत्पन्न झालेली जी उपाध्येवर्गाची सत्ता ती कमी होऊं लागते.

ह्या नैतिक बदलाबरोबर एक बौद्धिक बदलहि होत असतो, आणि त्याचेंहि अप्रत्यक्ष कारण उद्यमविषयक वृद्धि हें होय. स्वाभाविक कार्यकारणभावाचें जें ज्ञान दैविक कार्यकारणभावावरील विश्वास कमी करण्यास कारणीभूत होत असतें, तेंहि उद्यमविषयक कलांच्या वृद्धीवर अवलंबून असतें. कारण तेणेंकरून सृष्टचमत्कार एकदां झाले तसेच तशा परिस्थितींत पुनः होत असतात ह्याबद्दलचें ज्ञान वाढूं लागतें; आणि त्यामुळें शास्त्राची प्रगति होणें शक्य होतें. आतां हें खरें आहे कीं, प्रारंभीं, उपाध्यांच्या शिकवणीच्याविरुद्ध असें जें सृष्टिज्ञान, तें सर्वांशीं उपाध्येच मिळवीत असतात; पण प्रारंभीं सृष्टीचा क्रम व दैविक कर्ते ह्यांजमध्यें विरोध आहे असें समजत नसतात; आणि शिवाय उपाध्येवर्ग सृष्टिविषयक आपलें ज्ञान धर्मविषयक जो आपला अधिकार तो कमी करण्याच्या कामीं उपयोगांत आणितील असा संभव दिसत नाहीं. म्हणून सृष्टिक्रमाचें ज्ञान जसें सामान्यजनांत पसरत जाईल तसा धर्माधिकाऱ्यांचा अधिकार व सत्ता हीं कमी होत जातात; आणि अशा ज्ञानाचा प्रसार व्हावयाचा तो उद्यमशीलतेच्याच वृद्धीबरोबर होतो हें आपल्या नजरेस अगोदरच आलेलें आहे.

प्रकरण तेरावें
स्थापित धर्मविरोध

६०. ज्यास आपण स्थापित धर्मविरोध किंवा सुधारकी मत म्हणून म्हणतों, तसला कांहीं प्रकार साध्याप्रकारच्या समाजांमध्यें दिसत नाहीं. ज्या ज्ञानामुळें व मनःप्रवृत्तींमुळें कोणत्याहि वस्तूचे गुणदोष पहावे, किंवा दुसरा काय सांगेल त्याजबद्दल कारण दिसल्यास शंका घ्यावी, असें माणसास वाटतें, त्या ज्ञानाचा व मनःप्रवृत्तीचा रानट्यामध्यें अभाव असल्यामुळें तो त्याचे वडीलधारे जें सांगतील तें मुकाट्यानें खरें मानितो. स्थापित समज व स्थापित रूढी ह्या त्यास पवित्र वाटत असतात; त्यांच्याविरुद्ध जाणें हें कोणाच्या स्वप्नींहि नसतें. म्हणून समाजोत्क्रमणाच्या पहिल्या उंच उंच पायऱ्यांवर वंशपरंपरागत धर्मास लोक चिकटून राहत असतात. आतां हें खरें आहे कीं ह्या पायऱ्यांवर अनेक धर्मपंथ एकाच काळीं व स्थळीं अस्तित्वांत असूं शकतात; परंतु त्या सर्वांची उत्पत्ति रूढ अशा पूर्वजपूजेपासून झालेली असल्यामुळें, हल्लीं जसें स्थापित धर्मविरुद्ध मत म्हणून दृष्टीस पडतें, तसें त्यावेळीं नसतें; कारण निरनिराळ्या पंथांचे लोक एकमेकांचे देव खोटे असें म्हणत नाहींत, किंवा तद्विषयक जे त्या त्या पंथाच्या लोकांचे समज त्यांजबद्दल जोरानें संशय प्रदर्शित करीत नाहींत. **साक्रेटिसच्या** सारख्या उदाहरणांत मात्र ज्यास आपण वास्तविकरीत्या स्थापित धर्मविरुद्ध मत म्हणून म्हणतों तें उत्पन्न होतें; कारण असले लोक देव-

विषयक रूढकल्पनेपासून फारच भिन्न अशी कल्पना लोकांपुढें मांडीत असतात.

म्हणून प्रस्तुत प्रकरणांतील प्रतिपाद्य गोष्ट जी दिसून येते ती मुख्यत्वेंकरून जे समाज वस्तुतः एकेश्वरी असून जेथें सर्वांचा पंथ साधारणपणें एकच असेल, आणि धर्माधिकाऱ्यांचें एक व्यवस्थित मंडळ बनलेलें असेल, तेथें दिसून येते.

अशा रीतीनें प्रतिपाद्य विषयाचें क्षेत्र आकुंचित केलें तरी त्यांत पुष्कळ भिन्न भिन्न प्रकारच्या गोष्टी येतात. जरी पुष्कळ उदाहरणांत स्थापित धर्मविरुद्ध पंथ स्थापित मताचें अनाधिकृत असें कांहीं तरी स्वरूप स्वीकारीत असतो, तरी कोणाचा तरी धर्माधिकार तो कबूल करितो. कोणत्याहि धर्माधिकाऱ्यांचा अधिकार कबूल न करणें अशी जी मनाची स्थिति उत्पन्न होते ती उशीरांच उत्पन्न होते.

म्हणून स्थापित धर्मविरुद्ध मताच्या वाढीच्या निरनिराळ्या पायऱ्यांची तुलना केल्यानेंच वरील गोष्ट कशी होते हें आपल्या लक्षांत येणार आहे.

६१. प्राचीन पाखंडी मतांकडे पाहतां तीं बहुधा अर्वाचीन मताबद्दल प्राचीनाचा अधिकार मानणें ह्या स्वरूपाचीं दिसतात; आणि दंतकथेनें ज्यास्त रानटी युगांतील ज्यास्त रानटी संतर्पणप्रकारांचीं वर्णनें प्राप्त होत असल्यामुळें हीं मतें म्हणजे रूढ धर्माचे जे मार्ग त्यांहून ज्यास्त खडतर जीवितमार्ग सुरू करणें ह्या स्वरूपाचीं असतात. खुद्द ख्रिस्ती धर्मामध्यें जीं पाखंडी मतें उत्पन्न होत गेलीं त्यांची स्थिति अशीच होती.

ज्याकाळीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार नुक्ताच होऊं लागून त्या संस्थेस व्यवस्थित स्वरूप यावयास लागलें होतें त्यावेळचीं पाखंडी मतें वरील मतांहून आणि आधुनिक मतांहून भिन्न होतीं. कारण धर्मसरकारानें आपली स्थापना करून पवित्रपणा संपादन करण्यापूर्वीं त्यानें बळकाविलेल्या प्रत्येक नव्या अधिकारास जो लोक विरोध करीत तेणेंकरून सहजच मतभेद उत्पन्न होत. प्रथम जेव्हां देवळांत जमणाऱ्या सर्व लोकांकडे त्याची व्यवस्था ठेवण्याचा अधिकार असे तेव्हांपासून पोपाकडे सर्व अधिकार आला तोंपावेतों, एकामागून एक अशा रीतीनें धर्माधिकाऱ्यांनीं अधिकारबळकावण्या केल्या; आणि प्रत्येक बळकावणीच्या वेळीं लोकांनीं त्यांस विरोध केला. म्हणून तीन ते सात शतकांपर्यंत यूरोपांत अनेक निरनिराळे पंथ उत्पन्न झाले.

आतां ज्या काळीं धर्माधिकाऱ्यांची सत्ता कळसास पोहोंचत होती त्या काळाकडे नजर न देतां पुढें गेल्यास बाराव्या शतकांत वरच्याहून पुढें गेलेले पाखंडी आपल्या नजरेस येतात; त्यांनीं धर्ममत निराळें धारण करून वा न करून धर्माधिकाऱ्यांचा जो तेव्हांचा अधिकार तद्विरुद्ध बंड केलें. त्यामुळें फ्रान्स, इटाली, जर्मनी वगैरे देशांत निरानिराळे धर्मपंथ उत्पन्न झाले; आणि त्यांपैकीं कित्येकांनीं आपल्यास विचारस्वातंत्र्य व कृतिस्वातंत्र्य असलेंच पाहिजे असें प्रतिपादन केलें. चवदाव्या व पंधराव्या शतकांत हे पंथ ज्यास्तच वाढले; व त्या सर्वांनीं धर्माधिकाऱ्यांचें शासन झुगारून दिलें; उदाहरणार्थ, इंग्लंडांत लोलर्द लोकांनीं, पुढें धर्मसुधारणेची

रेफर्मेशन नामक जी चळवळ इंग्लंद, जर्मनी, फ्रान्स, वगैरे देशांत सुरू झाली तिनें कित्येक स्थापित मतें, विधी, आणि रूढी ह्यांचा निषेध केला इतकेंच नाहीं, तर धर्माधिकाऱ्यांचा जो एकंदर अधिकार त्याचाहि विरोध केला; आणि प्रेसबिटेरियन, इंडिपेन्डन्ट, व क्केकर ह्या पंथांकडे पाहतां हळूहळू धर्माधिकाऱ्यांचा अधिकार झुगारून देणें आणि स्वतःच्या बुद्धीप्रमाणें वागणें ह्या गोष्टी कशा वाढत गेल्या आहेत हें स्पष्ट दिसतें.

आतां हें खरें आहे कीं ह्या अनेक पाखंडी पंथांकडे पाहतां त्यांनीं जें जुलमी शासन झुगारिलें तसलेंच स्वतःच स्थापिलें आहे असें दिसून येतें. राजकीय व धार्मिक दोन्ही प्रकारच्या क्रान्त्यांकडे पाहतां असें दिसतें कीं त्यांच्यामागून बहुधा पूर्वींच्याहून कांहीं अंशींच बरीं अशीं नवीं शासनें उत्पन्न होत असतात. उदाहरणार्थ, आपल्या हातून चूक व्हावयाचीच नाहीं असें मानण्यांत आणि आपल्या मताप्रमाणें लोकांस वागवावयास लावण्यांत काल्व्हिनचें वर्तन अगदीं पोपाप्रमाणेंच होतें. तद्वतच स्कॉटिश प्रेसबिटेरियनलोकांचें शासन क्याथलिकांच्या शासनाप्रमाणेंच जुलमी, कडक व क्षमाविहीन असे. अमेरिकेंतील प्यूरिटनलोक यूरोपांतून जी धर्मसंस्था सोडून गेले तिच्या अधिकाऱ्यांइतकेंच आपलीं धर्ममतें खात्रीनें खरीं असें म्हणण्यांत, आणि त्यांच्याविरुद्ध जाईल त्यास छळण्यांत ते कडक असत. वेस्लियनसारख्या कांहीं पंथांकडे पाहतां त्यांचीं धर्माधिकारीमंडळें त्यांनीं जो पंथ सोडिला त्यांच्या इतकींच मोठालीं, व कांहीं बाबतींत ज्यास्त जुलमी आढळून ये-

तात. केकरलोकांमध्यें व्यक्तीस धर्माच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य द्यावयाचें अशी कल्पना असूनहि, धर्ममत व नियामक मंडळ ह्यांची उत्पत्ति झाली आहे.

६२. धर्माधिकारी विरोधाचा मुख्य विशेष इंग्लंदांतील आधुनिक पाखंडी पंथांत वरच्याहून ज्यास्त ठळकपणें दृष्टीस पडतो. तो जसा एका मुख्य गोष्टींत आढळतो तसा अनेक लहानसहान गोष्टींतहि दिसून येतो.

पहिली गोष्ट ही कीं, तेथें भिन्न भिन्न पंथ फारच झालेले आहेत; ह्याबद्दल इतर लोक इंग्लिशांस दोष देतात, पण तात्त्विकदृष्ट्या पाहतां हा त्यांचा विशेष गुणच म्हटला पाहिजे. कारण प्रत्येक नवा नवा पंथ स्थापन करणें म्हणजे स्वतःच्या बुद्धीप्रमाणें वागण्याचा हक्क पुनः एकदां प्रतिपादणें होय, आणि ज्या त्यांच्या स्वभावविशेषामुळें त्यांच्यांत स्वतंत्र राजसंस्था स्थापन झाल्या आहेत त्याचेंच तें एक अप्रत्यक्ष फल होय.

शिवाय हे अनेक पंथ होण्यास काय कारणें झालीं आहेत तीं पाहिल्यास हे पंथ बहुलीभवन ज्यास्तच अर्थप्रचुर दिसतें. त्या सगळ्यांचें सामान्य कारण गृहस्थलोकांस धर्मसंस्थेच्या कारभारांत ज्यास्त ज्यास्त घ्यावें हें दिसतें. उदाहरणार्थ, वेस्कियन पंथाच्या लोकांमध्यें १७९७, १८१०, १८३४, आणि १८४९ ह्या सालीं ह्याच हेतूनें नवे नवे फांटे फुटलेले आढळून येतात.

आतां हें उघडच आहे कीं ज्या पंथांचें शासन वेस्कियन पंथाच्या शासनाहून कमी जबरीचें आहे त्यांस उपाध्यांच्या नियंत्रणावरून बंड करण्यास वरच्यापेक्षां कमी प्रसंग आलेले आहेत; तरी आपल्या विचारशक्ती-

प्रमाणें वागण्याचा हक्क चालविण्याकरितां त्यांच्यापैकीं स्वतंत्र व लहान असें जें युनिटेरियन किंवा एकेश्वरी लोकांचें मंडळ त्याच्यांतहि पोटविभाग झाल्याचीं उदाहरणें आढळतात. शिवाय, पोटविभाग नच झाला तरी लहानसहान बाबतींत एकाच पंथाच्या अनुयायांमध्यें मतभेद दृष्टीस पडतोच. ह्याचें अत्यन्त चमत्कारिक उदाहरण, इंग्लंदच्या स्थापित धर्मानुयायांमध्येंच दृष्टीस पडतें. त्यांच्यांत जहाल, मवाळ, व उदारबुद्धि असे विभाग झालेले असून, शिवाय विध्यभिमानी म्हणून जे लोक आहेत ते उपाध्यांच्या अधिकाराचें मंडन करीत असूनहि स्वतः त्या अधिकाराविरुद्ध बंड करीत आहेत; म्हणजे, धर्माधिकाऱ्यांचें श्रेष्ठत्व कायम राखण्याचा जो त्यांचा निश्चय त्यानें प्रेरित होत्साते तेंच श्रेष्ठत्व ते झुगारून देत आहेत !

परंतु धर्मविषयक स्वातंत्र्याचा अशा अनेक रीतींनीं जो हा हक्क दाखविला जात आहे तो इंग्लंदांतील स्थापित धर्मसंस्थाच उपटून काढण्यासाठीं जी चळवळ चाललेली आहे तिजवरून ज्यास्तच दिसत आहे. ही चळवळ अर्थात् एकंदर धर्माधिकाऱ्यांच्या अधिकाराचा निषेध करीत असून, शिवाय मताधिक्यानें निवडलेले जें अधिकारीमंडळ त्यालाहि धर्मविषयक आचार व विचार घालून देण्याचा हक्क नाहीं असें उघड म्हणत आहे; आणि हें प्राटेस्टंटपंथाच्या क्लृप्तीस अनुसरूनच आहे. सारांश, ज्या विचारस्वातंत्र्याचें प्रतिपादन आज इतके दिवस होत आहे, व ज्यास्तज्यास्त प्रत्यक्ष व्यवहारांत दिसत आहे, तें आतां इतकें वृद्धिंगत होण्याचा

रंग दिसत आहे कीं, कोणास दुसऱ्याच्या धर्मसंधारणेस मदत करणें भाग पडूं नये.

ह्यावरून असें उघडच दिसत आहे कीं, प्राथमिक नायकानें आपलें उपाध्यायिक काम जेव्हां दुसऱ्याच्या हातीं दिलें तेव्हां जें सामाजिक विभिन्नीकरण सुरू झालें तें ह्या चळवळीनें पुरें होत आहे.

६३. एवंच, वर दर्शविलेले फेरबदल गतप्रकरणांत दर्शविलेल्या फेरबदलांचे सहचारी आहेत. म्हणजे, धर्म-संस्थान व सरकार ह्यांचें विभिन्नीकरण चाललें असतां होणारा, आणि अखेरीस धर्मसंस्थेस सरकारची दुय्यम करणारा जो पुष्कळ दिवस चाललेला त्या दोहोंमधील मुख्य झगडा त्याच्याबरोबर धर्मसंस्थान आणि त्याच्यां-तील पाखंडीलोक ह्यांमध्यें लहान सहान झगडे चाललेले असतात, व त्यांचा शेवट त्यांनीं विभक्त होणें हा होतो.

धर्मसंस्था सरकाराला वश होणें हा जसा वाढत्या उद्यमशीलतेचा एक अप्रत्यक्ष परिणाम आहे, तसा पाखं-डीपणाचा प्रसार हाहि आहे. लोकांनीं लादिलेल्या स्थि-तीच्या ऐवजीं करारी स्थितीच्या आधारावर रचलेली जी समाजघटना तीस योग्य असा जो नैतिक स्वभाव--जब-रीच्या सहकार्याच्या ऐवजीं स्वैच्छिक सहकार्याखालीं चालणाऱ्या मनुष्यव्यवहारानें पोषिलेला जो नैतिक स्व-भाव–तो जसा राजकीय स्वातंत्र्य उत्पन्न करितो तसा धर्मस्वातंत्र्यहि उत्पन्न करीत असतो. आणि हा सिद्धान्त जसा अनुमानरीत्या उघड दिसतो तसा अनुभवानेंहि खरा ठरतो. उदाहरणार्थ, अमेरिका व इंग्लंद हे दोन देश अत्यन्त उद्यमशील असल्यामुळें तेथेंच पाखंडीम-

ताचा प्रसार सर्वांत जास्त झालेला आहे. आणि खुद्द इंग्लंदामध्यें देखील शहरवस्ती व खेडेवस्ती ह्यांच्याकडे पाहतां, आणि त्या देशाच्या निरनिराळ्या भागांतील लोकांकडे पाहतां, असें दिसतें कीं जेथें जीवित व घटना विशेषतः उद्यमशील आहे तेथें पाखंडीमत विशेष जोरांत आहे.

प्रकरण चवदावें

उपाध्येवर्गाचे नैतिक प्रभाव

६४. "उपाध्यांचे लष्करी व्यापार" या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें पुष्कळ लोकांचा असा समज झालेला दिसतो कीं धर्माधिकारी जे असतात, ते नीतीचेंहि वळण लावितात. आतां धर्माधिकारी जें वर्तन लोकांस जबरीनें करावयास लावितात तें जरी बहुधा समाजसंरक्षणास योग्य असें असतें, तरी ज्या वर्तनास आपण हल्लीं नैतिक म्हणतों त्याहून इतक्या भिन्न वर्तनानें समाजसंरक्षणास पुष्कळवेळां मदत होत असते कीं, उपाध्यांच्या वजनाचा उपयोग समाजास उच्च करण्यापेक्षां नीच करण्याच्या कामींच होत असतो.

ताहितियन लोकांचा देव ओरो याच्याबद्दल आपण असें वाचितों कीं लढाई जेव्हां अत्यन्त क्रूरपणानें चाललेली असेल तेव्हां त्यास अत्यन्त समाधान होत असे; मेक्सिकोचा राजा मँटिझूमा ह्याच्याबद्दल आपण असें वाचितों कीं शेजारच्या लास्कालनलोकांपैकीं पाहिजे तेव्हां देवास बळी देतां यावे म्हणून त्यांस तो जिंकण्याचें टाळीत असे; तद्वतच चिब्चालोकांबद्दल आपण असें वाचितों कीं, त्यांस वाटे कीं आपल्या देवांस मनुष्यबळी सर्वांत ज्यास्त आवडतात; आतां अशा देवांचें सतर्पण करणारे भट वर्तनाच्या उच्च रूपाला उत्तेजन देऊं शकतील अशी अशाच करणें नलगे. खून व चोरी हीं पवित्र कृत्यें आहेत अशी आजपर्यंत पुष्कळ ठिकाणीं समजूत होती, व अजूनहि कांहीं ठिकाणीं आहे.

उदाहरणार्थ, बलूचीलोकांबद्दल **बर्टन** असें म्हणतो कीं, हे पवित्र चोर अल्लाचें नांव घेतल्याशिवाय कधीं चोरी करीत नाहींत. चिब्चालोकांपैकीं एका चोर टोळीबद्दल **पिद्राहित** असें लिहितो कीं, त्यांस आपण चोरी करून आणलेल्या द्रव्यापैकीं देवास बळी दिल्यास तो त्यांस फार आवडतो असें वाटतें. डोमरा लोक चोरींत यश आलें म्हणजे आपला मुख्य देव जो **गंडक** त्यास लागलाच बळी देतात. पण, एवंच, लोकांस लुटण्यास व ठार करण्यास उत्तेजन देऊनच उपाध्ये त्यांस दुर्वृत्त करितात असें नव्हे तर इतर रीतींनींहि करितात. उदाहरणार्थ, फ्रेंड्ली आयलंद नामक बेटांत मुख्य उपाध्या लग्न करीत नसे, पण त्यास पाहिजे तितक्या वेश्या ठेवण्याची परवानगी असे; क्यारिबलोकांत नववधूला पहिली रात्र उपाध्याचे घरीं घालवावी लागत असे; नाहीं तर तिचें लग्न कायदेशीर समजलें जात नसे. ब्राझीलमधील कांहीं टोळ्यांत असेंच असे. ह्यावरून उपाध्यांचें उदाहरण आणि सुवर्तन ह्यांमध्यें किती अल्प संबंध आहे हें स्पष्ट दिसतें.

ह्या गोष्टी ध्यानांत धरून धर्मविषयक संस्थांचे मानवी स्वभावावर काय परिणाम झाले आहेत ह्याचा आपण विचार करूं. तो करतां त्यांनीं कांहीं अत्यन्त महत्वाचे परिणाम घडवून आणिले आहेत असें दिसून येईल.

६५. सामाजिक बंधन ह्या दृष्टीनें धर्मसंस्थेचा विचार करतांना असें दाखविलें होतें कीं, अनेक लोकसमूह एकाच देवाची पूजा करीत असल्यास तेणेंकरून ते एक होण्यास मदत होते, कारण अशा देवाचे उपा-

ध्ये बहुधा त्या समूहांचे तंटे मोडण्यास झटत असतात. अशा रीतीनें ते सामाजिक सहक्रिया व वाढ ह्यांस सहाय्यभूत होतात.

पण देव आणि राजा ह्यांप्रत लोकांचा अंकितपणा कायम ठेवणें हें जें त्यांचें मुख्य कर्तव्य त्यापासून वरील गोष्ट सहजगत्या उत्पन्न होत असते. कारण लोकांस आज्ञाधारक बनवणे हेंच उपाध्यांचें प्रारंभापासून आतांपर्यंत सर्वत्र मुख्यकर्तव्य बनलेलें आहे ही गोष्ट जितक्या जोरानें सांगावी तितकी थोडीच. प्राथमिक माणसें सामाजिकजीवितास योग्य बनविण्यास त्यांस एकत्र राखिले पाहिजे; आणि ते एकत्र राहण्यास त्यांस अधिकाऱ्यांच्या आधीन केले पाहिजेत. अनियमित व केव्हां धडकेल ह्याचा नेम नाहीं असा जो रानटी माणूस त्यास आपल्या देशबांधवांबरोबर जर कायमची सहक्रिया करावयास लावावयाचें असेल तर त्याच्यावर फारच जबर नियंत्रण केलें पाहिजे; आणि हें नियंत्रण देवाचा किंवा मृत शास्त्याचा वंशज जो जिवंत शास्ता त्याच्या आज्ञा न ऐकल्यास तो सूड घेईल ह्या भीतीच्या रूपानें फारच जोरदार रीतीनें होत असतें. राजकीय संस्थांना दुजोरा देण्याच्या कामीं धर्मसंस्थांचें अशा रीतीनें महत्त्व किती आहे हें पालिनिशियामध्यें ख्रिस्तीपाद्र्यांनीं स्थानिकधर्म बुडविल्यानें कोणते वाईट परिणाम झाले हें एलिसनें दिलेल्या पुढील वर्णनावरून स्पष्ट दिसतें. " माणसांना देवांच्या मूर्तींप्रत बळी देणें हें सरकारच्या हातांत लोकांमध्यें आज्ञाधरकत्त्व कायम राखण्याचें फार मोठें साधन असे. देवांना बळी पाहिजे असले म्हणजे

उपाध्ये राजाला कळवीत, आणि राजा दूत पाठवून कोणास बळी द्यावयाचें तें ठरवी. हे बळी बहुधा ज्यांनीं राजद्रोह किंवा राजाज्ञाभंग केला असेल अशांपैकीं निवडील. लोकांस हें ठाऊक असे, आणि म्हणून ते राजाच्या व नायकांच्या अध्यां वचनांत रहात. पण तेथील मूर्तिपूजा बंद झाल्यापासून हें सर्व बिनसलें आहे, आणि पुष्कळ लोक बेगुमान राहूं लागले आहेत." ह्यामुळें, एलिस म्हणतो, सामाजिक व्यवस्था बरीच बिघडली आहे.

धर्मसंस्थांनीं उत्पन्न केलेलें जें हें आज्ञाधारकत्व त्यापासून दुसरींहि कांहीं अत्यन्त महत्त्वाचीं वळणें लोकांस लागलीं आहेत. सारखे श्रम करण्याची योग्यता नसल्यास पक्क असें सामाजिक जीवित शक्यच झालें नसतें; आणि पुष्कळ दिवसपर्यंत कडक नियंत्रणाविना आळशी व अविचारी अशा रानट्यांतून उद्यमशील नागरिक उत्क्रान्त झाला नसता. कडक वर्गभेद आणि त्याबरोबरच येणारी गुलामगिरी यांना प्रारंभीच्या समाजांतून धर्माधिकाऱ्यांनीं दिलेली जी परवानगी तिजमुळें सुधारणेस अनुकूल असा स्वभावबदल झाला असला पाहिजे.

धर्मसंस्थांनीं आणखी जें वळण लोकांस लाविलेलें आहे तें शरीरास कष्ट देण्याचें होय. दुष्ट भुतें व देवता ह्यांना प्रसन्न करण्याच्या इच्छेपासून त्याची उत्पत्ति झालेली आहे हें अगोदरच दाखविलेलें आहे; आणि हल्लीं देखील तें वळण जें दृष्टीस पडतें तें शरीरास सुख दिल्यास देव रागावतो, आणि कष्ट दिल्यास खुष होतो, ह्या समजामुळेंच उत्पन्न झालेलें असावें. परंतु ह्या शरीर

किंवा मन ह्यांस त्रास देण्याच्या वळणाचा विचार पूर्ण-नीतीच्या दृष्टीनें करण्याच्या ऐवजीं, हंगामी नीतीच्या दृष्टीनें केल्यास, त्यापासून शिक्षण-दृष्टीनें फार फायदा झाला आहे असें दिसून येईल. पुढील मोठें दुःख टाळण्याकरितां सध्यां थोडेसें दुःख सोसण्यास तयार होणें, किंवा पुढें मोठें सुख मिळावें म्हणून सध्यांचें थोडेसें सुख सोडून देणें हा असल्या सर्व कृतींचा सामान्य विशेष आहे. तात्पर्य दूरच्यासाठीं जवळचें टाकून देणें ही गोष्ट ह्या दोन्ही उदाहरणांत दिसून येते. हा त्याग असुधारलेल्या माणसास करतां येत नाहीं; सुधारलेल्यांपैकीं कनिष्ठप्रतीचे थोडासाच करूं शकतात; आणि त्यांच्यापैकीं वरिष्ठ तेवढेच योग्य तो त्याग करूं शकतात. म्हणून आपल्यास असें अनुमान करतां येईल कीं, जें शिक्षण अन्न, वस्त्र इत्यादि पदार्थ पूर्वजाच्या भुतास अर्पण करून सुरू होतें, आणि देवांस प्रसन्न करण्याकरितां भूक, तहान, थंडी, उष्ण, दुःख इत्यादि गोष्टी खुषीनें सोसण्याचें ज्यास पुढें स्वरूप येतें, त्याची भविष्यासाठीं वर्तमान एकीकडे ठेवण्याचें सामर्थ्य येण्याच्या कामीं बरीच मदत झालेली आहे. कदाचित् दैविकाच्या भीतीसारख्या जबर भीतीमुळेंच योग्य प्रमाणानें आत्मसंयमनाची संवय उत्पन्न झाली; आणि हें आत्मसंयमन आपल्या फायद्यासाठीं योग्य वर्तन करण्याच्या कामीं जसें अत्यन्त महत्त्वाचें आहे तसेंच इतरांच्यासंबंधानें योग्य वर्तन करण्याच्या कामींहि आहे.

एवंच धर्मसंस्थांनीं मानवी स्वभावास समाजस्थितीस योग्य असें वळण देण्याच्या कामीं महत्त्वाची काम-

देण्याच्या कायद्याचा आपल्यामध्यें जो परिणाम होतो तोच त्यांजमध्यें ह्या समजुतीचा होतो. पण एकाद्या मरणोन्मुख माणसाचा आपल्या मुलास जर त्यास इजा करणारावर सूड घेण्याचा हुकूम असेल तर त्याच्या भुताबद्दलची जी त्याच्या (मुलाच्या) मनांतील भीति ती नीति ह्या शब्दाच्या हल्लींच्या अर्थीं ती वाढविण्यास कारण न होतां बिघडविण्यास कारण होते. उदाहरणार्थ, मंगायालोकांच्या देवांबद्दल आपण असें वाचितों कीं, दोन बंधूंचा वध करणारा क्रूर केरेटेकी आणि त्याचा भाऊ उटाहिआ यांची पुढच्या पिढींत देव म्हणून पूजा करूं लागले. ह्यावरून, देवाचा उपदेश नसला तरी उदाहरण तरी अपराधप्रेरक कसें होतें हें लक्षांत येतें. पण एकंदरींत ह्याच्या उलट परिणाम सामान्यतः होत असेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. देवभूत झालेल्या नायकास ज्या अर्थीं आपल्या टोळीचा प्रसार व्हावा अशी इच्छा असण्याचा संभव फार आहे त्याअर्थीं त्याच्या कांहींतरी आज्ञा व्यवस्थितपणास अनुकूल अशा असल्याच पाहिजेत. म्हणून दंतकथापरंपरेनें त्याच्याकडून आलेले जे नियम ते देशांत देशांतल्या कोणीं कोणाचें अतिक्रमण करूं नये अशा अर्थाचेच असले पाहिजेत. उदाहरणार्थ, मेक्सिकनलोक व त्यांचे धार्मिक विधी जरी क्रूर होते, तरी त्यांचें नीतिनियमबाड ख्रिस्ती लोकांच्या बाडाहून कमी योग्यतेचें नव्हतें; व दोन्हीहि देवदत्त म्हणून समजलीं जात असत. पेरूव्हियनलोकांमध्यें ज्यांच्यापुढें अपराध कबूल करावयाचे असे उपाध्ये असून त्यांच्याबद्दल असें सांगतात कीं

शांततेच्या वेळीं कोणास ठार करणें किंवा लुटणें, किंवा कोणाची बायको चोरून नेणें हीं त्यांस मोठीं पापें वाटत; पण देवाच्या किंवा राजाच्या नोकरीस चुकणें हें ते अत्यन्त मोठें पाप समजत. सारांश, इतर पुष्कळ उदाहरणांप्रमाणें ह्या उदाहरणांतहि असें दिसून येतें कीं, देवाचे हुकूम तोडणें हें जें अत्यन्त मोठें पाप त्याच्या खालोखाल पापें म्हटलीं म्हणजे सामाजिक नियमनास आवश्यक असे जे कायदे ते मोडण्याचीं पापें होत.

आतां हें उघडच आहे कीं व्यक्तीच्या व समाजोत्क्रमणाच्या पुष्कळ पायऱ्यांवर असले कायदे दैविक असतात ही समजूत फायदेशीर असते. कारण ते मोडल्याबद्दल ज्या ऐहिक शिक्षा होत असतात त्यांव्यतिरिक्त दैविकहि शिक्षा होतील ही भीति माणसास असते; आणि ह्यामुळें नीतिबाडांना एरव्हीं जोर यावयाचा त्याहून ज्यास्त येतो.

६८. तथापि धर्म व धर्मसंस्था यांचें संरक्षण करणें ही गोष्ट नीतिसंरक्षणाहूनहि ज्यास्त महत्त्वाची समजली जात असल्यामुळें वरील गोष्टीस कांहीं अपवाद दृष्टीस पडतात. म्हणून मानीव जी देवाची इच्छा तीस अनुसरून वागणें, मग ती इच्छा कांहींहि असो, हें सर्व नीतीहून श्रेष्ठ मानिलें जातें. त्याच्या खालोखाल देवाची इच्छा समजणारे जे धर्माधिकारी त्यांचा अधिकार संभाळून धरणें हें समजलें जातें. आणि म्हणूनच धर्माधिकाऱ्यांच्या श्रेष्ठत्वास प्रतिकूल अशा कांहीं नीतीच्या आज्ञा असल्यास त्यांस कोणी जुमानीत नाहीं.

ह्यावरून पोपांनीं व रोमनक्याथोलिकलोकांच्या " इन्क्विझिशन " नामक कोर्टांनीं केलेले जे मोठाले अ-

पराध व लोकछल त्यांची वाचकांस आठवण होईल. पण त्याच्याहून अधिक विलक्षण उदाहरणें नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, ख्रिस्तीलोकांतील स्थापित धर्मसंस्थांनीं जें अत्यन्त मोठें वैर केलेलें आहे तें जे पाखंडी-पंथ ख्रिस्तीधर्माच्या आज्ञा सर्वतोपरी पाळण्यासाठीं स्थापन झालेले आहेत त्यांचेंच केलेलें आहे. ह्याचें प्रसिद्ध उदाहरण ख्रिस्तीलोकांचें होय. त्यांची इच्छा ख्रिस्तीधर्माच्या आज्ञा कांहीं बाबतींतच नव्हे तर सर्व बाबतींत पाळण्याची असूनहि त्यांनीं बिशपांचा अधिकार न मानिल्यामुळें त्यांचा त्यांनीं इतका छळ केला कीं दुसऱ्या जेम्साच्या कारकीर्दीच्या पूर्वींच त्यांच्या अल्पसंख्यपैकीं १५००जण कैदेंत पडले. सारांश, धर्माधिकाऱ्यांचा अधिकार कोणी कबूल करीत नसेल तर ते त्या धर्मांतील नीतिनियमांची परवा करीत नाहींत.

इतकेंच नाहीं, तर ज्या बाबतींत नीतिनियम त्यांच्या अधिकारास प्रतिकूल नसतील त्या बाबतींतहि ते नियम पाळण्याविषयीं ते लोकांस आग्रह करीत नाहींत. उदाहरणार्थ, आज इतकीं शतकें ख्रिस्ती उपदेशकांनीं क्षमा हा सद्गुण लोकांच्या मनावर इतका अल्प ठसविला आहे कीं, लढाया व द्वंद्वयुद्धें यांमध्यें सूड घेणें हेंच ख्रिस्ती-लोक आपलें आवश्यक कर्तव्य समजतात. इंग्लंदांत गुलामगिरीचा, किंवा जमीनदारांना भरपूर सारा मिळावा म्हणून धान्यावर बसविलेल्या जकातीचा, जो निषेध केला तो धर्मोपदेशकांनीं नव्हे. **स्पेन्सर** साहेब म्हणतात, दुर्बल राष्ट्रांवर आह्मी जे वारंवार अन्यायानें हल्ले करितां त्याबद्दल आमचे धर्मोपदेशक आमचा निषेध क-

रीत नाहींत. ज्या संस्थांची व्यवस्था केवळ त्यांच्याचकडे आहे अशा ठिकाणींहि न्याय व दया हीं ज्यास्त प्रमाणावर न दिसतां कमी प्रमाणावर दिसतात. उदाहरणार्थ, ज्या सार्वजनिक शाळा उपाध्यांच्या देखरेखीखालीं आहेत त्यांत जशीं क्रूर कृत्यें झालेलीं आहेत तशीं इतरत्र कोठेंच झालेलीं नसतील.

६९. एवंच धर्मसंस्थांचा सामान्यतः विचार करतां असें दिसतें कीं त्या समाजांच्या वाढीस आवश्यक आहेत असें जें विचारांनीं सिद्ध होतें, तशा त्या बऱ्याच पुढें गेलेल्या प्राचीन व अर्वाचीन समाजांत प्रत्यक्ष दृष्टीस पडतात;आणि ज्या लोकसमूहांत त्या उत्पन्न झाल्या नाहींत ते समूह वाढीस लागले नाहींत असेंहि दिसतें.

मृतशास्त्याच्या भुतांचें संतर्पण सर्वांस करावयास लावून उपाध्येवर्गांनीं सामाजिक वाढ व पक्कता यांस मदत केलेली आहे. अन्य रीतींनींहि त्यांनीं ह्या गोष्टीस उत्तेजन दिलेलें आहे. उदाहरणार्थ, जी पुराणप्रियता समाजरचना जशाच्या तशा ठेवण्यास मदत करिते तीस त्यांनीं उत्तेजन दिलेलें आहे; राजकीय नियंत्रणपद्धतीस आपल्या नियंत्रणपद्धतीनें मदत केलेली आहे; प्रथम देवांच्या आणि तदनंतर राजाच्या आज्ञा पाळल्याच पाहिजेत असा त्यांनीं आग्रह धरिलेला आहे; ज्या जबरीमुळें सारखा उद्योग करण्याची माणसास सवय लागली तीस उत्तेजन दिलेलें आहे; आणि आत्मसंयमनाची संवय दृढ केलेली आहे.

ह्या शिक्षणामुळें झालेले जे स्वभावबदल त्यांबरोबरच त्यांच्याहून उच्च असे स्वभावबदल होणें किंवा न होणें

हें कांहीं पूजित देवांच्या दंतकथेनें आलेल्या वर्णनांवर अवलंबून असतें, आणि कांहीं अंशीं समाजस्थितीवर अवलंबून असतें. धर्माज्ञा पाळणें हें प्राथमिक कर्तव्य असतें; आणि त्यामुळें पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर पुष्कळ वेळां क्रूरपणासच उत्तेजन मिळतें. युद्धशील स्थिति जाऊन उद्यमशील स्थिति जसजशी येत जाईल, तसतसें सुधारलेलें नैतिक मत उत्पन्न होऊं लागतें, व उद्यमशीलता कायम राहिल्यास त्याचा प्रभाव वाढत जातो, व पुनः युद्धशीलता आल्यास तो कमी होतो. तथापि स्थिति अनुकूल झाल्यास तें मत पुनः प्रतिपादण्यास कायम ठेवणें फायद्याचें असतें.

पण उपाध्येलोक तें मत जें प्रतिपादितात तें काळवेळ पाहूनच प्रतिपादितात. पहिल्याप्रमाणेंच शेवटपर्यंत धार्मिक व ऐहिक अंकितपणा दाखविलाच पाहिजे असा ते आग्रह करीत असतात; तात्पर्य, देवास भिऊन वागा, राजास भिऊन वागा, असा त्यांचा नेहमीं उपदेश असतो; आणि लोकांनीं ही अंकितता बरीचशी दाखविल्यास त्यांच्या नैतिक अपराधांबद्दल ते त्यांस क्षमा करितात.

प्रकरण पंधरावें

धर्मसंस्थाविषयक भूत व भावि स्थिति

७०. सामाजिक चमत्कारांपैकीं धर्मसंस्थांमध्यें जे चमत्कार दिसून येतात त्यांवरून उत्क्रान्तीचा सामान्य नियम फारच स्पष्ट रीतीनें उदाहृत होतो.

कुटुंबांतील मुख्याप्रत तो जिवंत असतां जो अंकित-भाव कुटुंबांतील माणसें दाखवीत असतात, तो तो मेल्यावर त्यास आवडत असतील त्या वस्तू त्याच्या दुख्यमास अर्पून, आणि त्याच्या इच्छित गोष्टी करून ते दाखवीत राहतात; आणि जेव्हां कुटुंबवृद्धि होऊन टोळी बनते, तेव्हां नायकास जिवंतपणीं जे नजराणे, अर्ज, व अभिनंदनें करीत असतात तीं तो मेल्यावर बळी, स्तुत्या, आणि प्रार्थना ह्या रूपानें चालू ठेवितात. म्हणजे, कौटुंबिक, ऐहिक आणि धार्मिक अंकितपणाचें मूळ एकच आहे; आणि प्रथम ह्या सर्व गोष्टी एकच लोक सारख्याच रीतींनीं करीत असतात.

पण लवकरच विभिन्नीकरण सुरू होतें. प्रथम कांहीं भेद प्रत्येक कुटुंबाचा खासगी धर्म, आणि नायकाच्या कुटुंबाचा सार्वजनिक धर्म ह्यांमध्यें उत्पन्न होतो; आणि नाईक आपल्या स्वतःच्या वतीनें व टोळीच्या वतीनें आपल्या मृतपूर्वजाचा संतर्पक बनल्यामुळें त्याच्या ठिकाणीं दिवाणी मुख्य आणि धार्मिक मुख्य ह्यांचीं कर्तव्यें संयुक्त होतात. टोळी वाढत जाईल तशीं राजकीय व लष्करी कर्तव्यें वाढल्यामुळें, नायकास आपलीं धार्मिक कर्तव्यें कोणावर तरी व बहुतकरून एकाद्या

आप्तावर, संपविणें ज्यास्त ज्यास्त भाग पडूं लागतें; आणि अशा रीतीनें कांहीं कालानें धार्मिककृत्यें करणारें स्वतंत्र मंडळ बनतें.

विजयामुळें बनलेल्या समाजसंकलनानें एकाच समाजांत अनेक धर्म एकसमयावच्छेदेंकरून एकत्र वास करूं लागतात; आणि त्यांचे उपाध्ये निरनिराळ्या ठिकाणीं स्वधर्मप्रसारार्थ जाऊं लागतात. अशा रीतीनें अनेकेश्वरी उपाध्येवर्गांची उत्पत्ति होते; आणि त्यांजपैकीं कांहींची इतरांहून ज्यास्त वाढ झाल्यामुळें त्यांच्यांत विजातीयत्व उत्पन्न होतें. आणि कांहीं ठिकाणीं सरतेशेवटीं त्यांच्यापैकीं एकादा वर्ग इतका मोठा होतो कीं, तो इतरांस सर्वस्वीं किंवा बहुतेकांशीं हांकलून लावितो.

सरलसमाजांचे संयोग होऊन संयुक्तसमाज, व संयुक्तसमाज एकत्र होऊन दुवार संयुक्तसमाज बनत असतां, उपाध्येवर्गांचीहि वाढ होत जाते, आणि त्यांच्यांपैकीं प्रत्येक वर्ग इतरांपासून विसदृश होत असतां, आपल्यांतहि विविधस्वरूप होत असतो. म्हणजे, त्याचें एक व्यवस्थित मंडल बनून तें एक मुख्य उपाध्याचें अंकित बनतें, व बाकीच्या उपाध्यांचे निरनिराळे खालोखालचे वर्ग बनून त्यांचीं कामेंहि निरनिराळीं बनतात.

धर्ममंडळ एकीकडे ज्यास्त ज्यास्त संकलीभूत आणि स्पष्टपणें विविधस्वरूप होत असतां, दुसरीकडे समाजदेहाच्या इतर भागाशीं रचना व व्यापार यांच्या संबंधानें जें त्याचें स्वरूपसाम्य असतें तें हळूहळू निघून जात असतें. उपाध्या निराळा बनल्यावरहि पुष्कळ काळपर्यंत लढाईंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या अंग घालीत

असतो; पण समाजाची वाढ मोठी झाली म्हणजे त्याचें लढवय्याचें स्वरूप सर्वांशीं किंवा बहुतेकांशीं निघून जातें. त्याच्या दिवाणी व्यापारांचेंहि असेंच होतें. प्रारंभींच्या पायऱ्यांवर जरी तो शास्ता, प्रधान, मंत्री, न्यायाधीश इत्यादि स्वरूपांनीं अधिकार चालवीत असतो, तरी हळूहळू तो त्याचा अधिकार निघून जाऊं लागतो; शेवटीं त्या अधिकाराचे केवळ कांहीं मागमोस तेवढे शिल्लक राहातात.

धर्मसंस्थांची ही जी वाढ तिच्यायोगानें एकीकडे समाज ज्यास्त स्पष्टपणें विविधस्वरूप होत असतां, व धर्मसंस्थाघटनाहि ज्यास्त ज्यास्त मिश्रस्वरूप होत असतां, निरनिराळे पंथ उत्पन्न होऊन ती आणखीच मिश्रस्वरूप होत जाते. हे पंथ वाढत जाऊन व्यवस्थित स्वरूपाप्रत पावत गेल्यानें धर्मविषयक व्यापार करणाऱ्या व नियंत्रण चालविणाऱ्या मंडळ्या ज्यास्त ज्यास्त विविधस्वरूप होत जातात.

आतां हें उघडच आहे कीं समाजांमध्यें सतत चाललेल्या तंट्यांवरून कधीं कधीं संयोग व कधीं कधीं फाटाफुटी होत असल्यामुळें, आणि कोठें जुन्या संस्था मोडाव्या व कोठें नव्या जोडाव्या असेंहि होत असल्यामुळें, धर्मसंस्थांची प्रगति अनियमितरीतीनें झालेली आहे. पण असें आहे तरी वर दाखविल्यासारखा त्या प्रगतीचा क्रम सर्वत्र दाखवितां येण्यासारखा आहे.

७१. ह्या रचनाभेदांबरोबर फार महत्त्वाचा एक व्यापारभेद उत्पन्न होत असतो तो आतां सांगितला पाहिजे. दोन धार्मिककर्तव्यें प्रथम एकाचेच भाग असून

गिरी बजाविलेली आहे; मग निरनिराळ्या धर्मांचे विशेष समज कांहींहि असोत.

६६. धर्मसंस्थांनीं ह्या सामान्य नैतिकपारिणामाखेरीज जे कांहीं विशेष नैतिकपरिणाम घडवून आणिले आहेत त्यांपैकीं एक वरच्यासारखाच सहजगत्या घडून आलेला आहे. तो वित्तविषयक हक्कांबद्दलचा आदर हा होय; तो आदर संतर्पणाच्या कांहीं विलक्षण प्रकारांमुळें उत्पन्न झालेला आहे. उदाहरणार्थ, पॉलिनिशियामध्यें कांहीं वस्तू देवाच्या म्हणूनच समजल्या जातात; आणि त्यांचें जो ग्रहण करील त्यानें देवाचा अपराध केला असें समजून त्यास ठार करितात. न्यूझीलंदमध्यें असें करतील त्यांस देवांकडून व माणसांकडून शिक्षा होत असे; देव त्यांना आजारी करीत व मरण आणीत, आणि माणसें त्यांस मरण, वित्तहानि, बहिष्कार, इत्यादि शिक्षा देत. पण ह्यांपैकीं माणसांच्या शिक्षेपेक्षां देवाच्या शिक्षेचाच लोकांच्या मनावर ज्यास्त दाब असे, आणि म्हणून ते अशा वस्तूंचें बिलकूल ग्रहण करीत नसत.

अशा रीतीनें ज्या वस्तू पवित्र किंवा माणसानें उपयोग करण्यास निषिद्ध बनतील त्यांजवर त्या तशा आहेत हें दाखविण्याकरितां कांहीं खूण करून ठेवितात; आणि मग एकाद्यास एकाद्या वस्तूचा कोणी उपयोग करूं नये असें वाटल्यास तो त्याजवर तशी खूण करून ठेवितो. मग असल्या वस्तूची कोणीं चोरी केल्यास त्याच्यावर देव क्रुद्ध होईल असें समजूं लागतात; उदाहरणार्थ, फीजी, टोंगा, सामोआ, इत्यादि बेटांत अशी समजूत आहे. इंग्लिशलोक आपल्या बागेंत

कोणीं येऊं नये म्हणून जसे चोरखोडे, चापाच्या बंदुका, किंवा आगांतुकास डसावयास जाणारे कुतरे बागेंत ठेवितात, तशीं टैमोरमध्यें बागेच्या बाहेर कांहीं ताडाचीं पानें खोंचून ठेवितात. बॅस्टियन सांगतो कीं चोरांपासून आपल्या घरांचें संरक्षण करण्याकरितां कॉंगोमधील लोक घराबाहेर लांकडाचा देव उभा करून ठेवितात; आणि गाबून नदीवरील नीग्रोलोक तसेंच करितात म्हणून सांगतो. बॅलोंडालोकांत अशीच चाल आहे म्हणून लिव्हिंग्स्टन सांगतो; आणि मालागासी व सांताळलोकांत असलाच प्रघात असल्याबद्दल पुरावा सांपडतो.

प्रारंभीं देवास हें एकाद्या वस्तूचें अर्पण उपाध्या किंवा उपाध्या या नात्यानें नाईक करीत असल्यामुळें, ह्या चालीस धार्मिक संस्थेच्या वर्गांत घातलें पाहिजे; आणि तिच्यामुळें वित्तविषयक हक्कांबद्दल जो आदर उत्पन्न होतो तो या संस्थांपासून लागणाऱ्या फायदेशीर वळणांमध्यें गणिला पाहिजे.

६७. सुवर्तन आणि मानीव देवाज्ञा ह्यांमधील जो संबंध त्याजबद्दल एकादा सामान्य सिद्धान्त बसवणें कठीण आहे. पूर्वप्रकरणांतून दिलेल्या पुष्कळ गोष्टींवरून असें दिसतें कीं ज्या दैविक सत्त्वाचें संतर्पण करावयाचें असेल त्याच्या मानीव स्वभावविशेषावर सर्व अवलंबून असतें. डाकोटालोकांबद्दल स्कूलक्राफ्ट असें म्हणतो कीं, त्यांस मृतांच्या आत्म्यांची फारच भीति वाटते, कारण त्यांस असें वाटत असतें कीं त्यांच्या अंगीं आपल्यास पाहिजे ती इजा करण्याचें सामर्थ्य आहे. ह्या समजुतीचा कांहीं फायदेशीर परिणाम घडतो. फांशी

देण्याच्या कायद्याचा आपल्यामध्यें जो परिणाम होतो तोच त्यांजमध्यें ह्या समजुतीचा होतो. पण एकाद्या मरणोन्मुख माणसाचा आपल्या मुलास जर त्यास इजा करणारावर सूड घेण्याचा हुकूम असेल तर त्याच्या भुताबद्दलची जी त्याच्या (मुलाच्या) मनांतील भीति ती नीति ह्या शब्दाच्या हल्लींच्या अर्थीं ती वाढविण्यास कारण न होतां बिघडविण्यास कारण होते. उदाहरणार्थ, मंगायालोकांच्या देवांबद्दल आपण असें वाचितों कीं, दोन बंधूंचा वध करणारा क्रूर केरेटेकी आणि त्याचा भाऊ उटाहिआ यांची पुढच्या पिढींत देव म्हणून पूजा करूं लागले. ह्यावरून, देवाचा उपदेश नसला तरी उदाहरण तरी अपराधप्रेरक कसें होतें हें लक्षांत येतें. पण एकंदरींत ह्याच्या उलट परिणाम सामान्यतः होत असेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. देवभूत झालेल्या नायकास ज्या अर्थीं आपल्या टोळीचा प्रसार व्हावा अशी इच्छा असण्याचा संभव फार आहे त्याअर्थीं त्याच्या कांहींतरी आज्ञा व्यवस्थितपणास अनुकूल अशा असल्याच पाहिजेत. म्हणून दंतकथापरंपरेनें त्याच्याकडन आलेले जे नियम ते देशांत देशांतल्या कोणीं कोणाचें अतिक्रमण करूं नये अशा अर्थाचेच असले पाहिजेत. उदाहरणार्थ, मेक्सिकनलोक व त्यांचे धार्मिक विधी जरी क्रूर होते, तरी त्यांचें नीतिनियमबाड ख्रिस्ती लोकांच्या बाडाहून कमी योग्यतेचें नव्हतें; व दोन्हीहि देवदत्त म्हणून समजलीं जात असत. पेरूव्हियनलोकांमध्यें ज्यांच्यापुढें अपराध कबूल करावयाचे असे उपाध्ये असून त्यांच्याबद्दल असें सांगतात कीं

शांततेच्या वेळीं कोणास ठार करणें किंवा लुटणें, किंवा कोणाची बायको चोरून नेणें हीं त्यांस मोठीं पापें वाटत; पण देवाच्या किंवा राजाच्या नोकरीस चुकणें हें ते अत्यन्त मोठें पाप समजत. सारांश, इतर पुष्कळ उदाहरणांप्रमाणें ह्या उदाहरणांतहि असें दिसून येतें कीं, देवाचे हुकूम तोडणें हें जें अत्यन्त मोठें पाप त्याच्या खालोखाल पापें म्हटलीं म्हणजे सामाजिक नियमनास आवश्यक असे जे कायदे ते मोडण्याचीं पापें होत.

आतां हें उघडच आहे कीं व्यक्तीच्या व समाजोत्क्रमणाच्या पुष्कळ पायऱ्यांवर असले कायदे दैविक असतात ही समजूत फायदेशीर असते. कारण ते मोडल्याबद्दल ज्या ऐहिक शिक्षा होत असतात त्यांव्यतिरिक्त दैविकहि शिक्षा होतील ही भीति माणसास असते; आणि ह्यामुळें नीतिबाडांना एरव्हीं जोर यावयाचा त्याहून ज्यास्त येतो.

६८. तथापि धर्म व धर्मसंस्था यांचें संरक्षण करणें ही गोष्ट नीतिसंरक्षणाहूनहि ज्यास्त महत्त्वाची समजली जात असल्यामुळें वरील गोष्टीस कांहीं अपवाद दृष्टीस पडतात. म्हणून मानीव जी देवाची इच्छा तीस अनुसरून वागणें, मग ती इच्छा कांहींहि असो, हें सर्व नीतीहून श्रेष्ठ मानिलें जातें. त्याच्या खालोखाल देवाची इच्छा समजणारे जे धर्माधिकारी त्यांचा अधिकार संभाळून धरणें हें समजलें जातें. आणि म्हणूनच धर्माधिकाऱ्यांच्या श्रेष्ठत्वास प्रतिकूल अशा कांहीं नीतीच्या आज्ञा असल्यास त्यांस कोणी जुमानीत नाहीं.

ह्यावरून पोपांनीं व रोमनक्याथोलिकलोकांच्या " इन्क्विझिशन " नामक कोर्टांनीं केलेले जे मोठाले अ-

पराध व लोकछल त्यांची वाचकांस आठवण होईल. पण त्याच्याहून अधिक विलक्षण उदाहरणें नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, ख्रिस्तीलोकांतील स्थापित धर्मसंस्थांनीं जें अत्यन्त मोठें वैर केलेलें आहे तें जे पाखंडीपंथ ख्रिस्तीधर्माच्या आज्ञा सर्वतोपरी पाळण्यासाठीं स्थापन झालेले आहेत त्यांचेंच केलेलें आहे. ह्याचें प्रसिद्ध उदाहरण ख्रिस्तीलोकांचें होय. त्यांची इच्छा ख्रिस्तीधर्माच्या आज्ञा कांहीं बाबतींतच नव्हे तर सर्व बाबतींत पाळण्याची असूनहि त्यांनीं बिशपांचा अधिकार न मानिल्यामुळें त्यांचा त्यांनीं इतका छळ केला कीं दुसऱ्या जेम्साच्या कारकीर्दीच्या पूर्वींच त्यांच्या अल्पसंख्येपैकीं १५००जण कैदेंत पडले. सारांश, धर्माधिकाऱ्यांचा अधिकार कोणी कबूल करीत नसेल तर ते त्या धर्मांतील नीतिनियमांची परवा करीत नाहींत.

इतकेंच नाहीं, तर ज्या बाबतींत नीतिनियम त्यांच्या अधिकारास प्रतिकूल नसतील त्या बाबतींतहि ते नियम पाळण्याविषयीं ते लोकांस आग्रह करीत नाहींत. उदाहरणार्थ, आज इतकीं शतकें ख्रिस्ती उपदेशकांनीं क्षमा हा सद्गुण लोकांच्या मनावर इतका अल्प ठसविला आहे कीं, लढाया व द्वंद्वयुद्धें यांमध्यें सूड घेणें हेंच ख्रिस्तीलोक आपलें आवश्यक कर्तव्य समजतात. इंग्लंदांत गुलामगिरीचा, किंवा जमीनदारांना भरपूर सारा मिळावा म्हणून धान्यावर बसविलेल्या जकातीचा, जो निषेध केला तो धर्मोपदेशकांनीं नव्हे. **स्पेन्सर** साहेब म्हणतात, दुर्बल राष्ट्रांवर आह्मी जे वारंवार अन्यायानें हल्ले करितां त्याबद्दल आमचे धर्मोपदेशक आमचा निषेध क-

रीत नाहींत. ज्या संस्थांची व्यवस्था केवळ त्यांच्याचकडे आहे अशा ठिकाणींहि न्याय व दया हीं ज्यास्त प्रमाणावर न दिसतां कमी प्रमाणावर दिसतात. उदाहरणार्थ, ज्या सार्वजनिक शाळा उपाध्यांच्या देखरेखीखालीं आहेत त्यांत जशीं क्रूर कृत्यें झालेलीं आहेत तशीं इतरत्र कोठेंच झालेलीं नसतील.

६९. एवंच धर्मसंस्थांचा सामान्यतः विचार करतां असें दिसतें कीं त्या समाजांच्या वाढीस आवश्यक आहेत असें जें विचारांनीं सिद्ध होतें, तशा त्या बऱ्याच पुढें गेलेल्या प्राचीन व अर्वाचीन समाजांत प्रत्यक्ष दृष्टीस पडतात; आणि ज्या लोकसमूहांत त्या उत्पन्न झाल्या नाहींत ते समूह वाढीस लागले नाहींत असेंहि दिसतें.

मृतशास्त्याच्या भुतांचें संतर्पण सर्वांस करावयास लावून उपाध्येवर्गांनीं सामाजिक वाढ व पक्कता यांस मदत केलेली आहे. अन्य रीतींनींहि त्यांनीं ह्या गोष्टीस उत्तेजन दिलेलें आहे. उदाहरणार्थ, जी पुराणप्रियता समाजरचना जशाच्या तशा ठेवण्यास मदत करिते तीस त्यांनीं उत्तेजन दिलेलें आहे; राजकीय नियंत्रणपद्धतीस आपल्या नियंत्रणपद्धतीनें मदत केलेली आहे; प्रथम देवांच्या आणि तदनंतर राजाच्या आज्ञा पाळल्याच पाहिजेत असा त्यांनीं आग्रह धरिलेला आहे; ज्या जबरीमुळें सारखा उद्योग करण्याची माणसास सवय लागली तीस उत्तेजन दिलेलें आहे; आणि आत्मसंयमनाची संवय दृढ केलेली आहे.

ह्या शिक्षणामुळें झालेले जे स्वभावबदल त्यांबरोबरच त्यांच्याहून उच्च असे स्वभावबदल होणें किंवा न होणें

हें कांहीं पूजित देवांच्या दंतकथेनें आलेल्या वर्णनांवर अवलंबून असतें, आणि कांहीं अंशीं समाजस्थितीवर अवलंबून असतें. धर्माज्ञा पाळणें हें प्राथमिक कर्तव्य असतें; आणि त्यामुळें पहिल्या पहिल्या पायऱ्यांवर पुष्कळ वेळां क्रूरपणासच उत्तेजन मिळतें. युद्धशील स्थिति जाऊन उद्यमशील स्थिति जसजशी येत जाईल, तसतसें सुधारलेलें नैतिक मत उत्पन्न होऊं लागतें, व उद्यमशीलता कायम राहिल्यास त्याचा प्रभाव वाढत जातो, व पुनः युद्धशीलता आल्यास तो कमी होतो. तथापि स्थिति अनुकूल झाल्यास तें मत पुनः प्रतिपादण्यास कायम ठेवणें फायद्याचें असतें.

पण उपाध्येलोक तें मत जें प्रतिपादितात तें काळवेळ पाहूनच प्रतिपादितात. पहिल्याप्रमाणेंच शेवटपर्यंत धार्मिक व ऐहिक अंकितपणा दाखविलाच पाहिजे असा ते आग्रह करीत असतात; तात्पर्य, देवास भिऊन वागा, राजास भिऊन वागा, असा त्यांचा नेहमीं उपदेश असतो; आणि लोकांनीं ही अंकितता बरीचशी दाखविल्यास त्यांच्या नैतिक अपराधांबद्दल ते त्यांस क्षमा करितात.

प्रकरण पंधरावें

धर्मसंस्थाविषयक भूत व भावि स्थिति

७०. सामाजिक चमत्कारांपैकीं धर्मसंस्थांमध्यें जे चमत्कार दिसून येतात त्यांवरून उत्क्रान्तीचा सामान्य नियम फारच स्पष्ट रीतीनें उदाहृत होतो.

कुटुंबांतील मुख्याप्रत तो जिवंत असतां जो अंकित-भाव कुटुंबांतील माणसें दाखवीत असतात, तो तो मेल्यावर त्यास आवडत असतील त्या वस्तू त्याच्या दुय्यमास अर्पून, आणि त्याच्या इच्छित गोष्टी करून ते दाखवीत राहतात; आणि जेव्हां कुटुंबवृद्धि होऊन टोळी बनते, तेव्हां नायकास जिवंतपणीं जे नजराणे, अर्ज, व अभिनंदनें करीत असतात तीं तो मेल्यावर बळी, स्तुत्या, आणि प्रार्थना ह्या रूपानें चालू ठेवितात. म्हणजे, कौटुंबिक, ऐहिक आणि धार्मिक अंकितपणाचें मूळ एकच आहे; आणि प्रथम ह्या सर्व गोष्टी एकच लोक सारख्याच रीतींनीं करीत असतात.

पण लवकरच विभिन्नीकरण सुरू होतें. प्रथम कांहीं भेद प्रत्येक कुटुंबाचा खासगी धर्म, आणि नायकाच्या कुटुंबाचा सार्वजनिक धर्म ह्यांमध्यें उत्पन्न होतो; आणि नाईक आपल्या स्वतःच्या वतीनें व टोळीच्या वतीनें आपल्या मृतपूर्वजाचा संतर्पक बनल्यामुळें त्याच्या ठिकाणीं दिवाणी मुख्य आणि धार्मिक मुख्य ह्यांचीं कर्तव्यें संयुक्त होतात. टोळी वाढत जाईल तशीं राजकीय व लष्करी कर्तव्यें वाढल्यामुळें, नायकास आपलीं धार्मिक कर्तव्यें कोणावर तरी व बहुतकरून एकाद्या

आप्तावर, संपविणें ज्यास्त ज्यास्त भाग पडूं लागतें; आणि अशा रीतीनें कांहीं कालानें धार्मिककृत्यें करणारें स्वतंत्र मंडळ बनतें.

विजयामुळें बनलेल्या समाजसंकलनानें एकाच समाजांत अनेक धर्म एकसमयावच्छेदेंकरून एकत्र वास करूं लागतात; आणि त्यांचे उपाध्ये निरनिराळ्या ठिकाणीं स्वधर्मप्रसारार्थ जाऊं लागतात. अशा रीतीनें अनेकेश्वरी उपाध्येवर्गांची उत्पत्ति होते; आणि त्यांजपैकीं कांहींची इतरांहून ज्यास्त वाढ झाल्यामुळें त्यांच्यांत विजातीयत्व उत्पन्न होतें. आणि कांहीं ठिकाणीं सरतेशेवटीं त्यांच्यापैकीं एकादा वर्ग इतका मोठा होतो कीं, तो इतरांस सर्वस्वीं किंवा बहुतेकांशीं हांकलून लावितो.

सरलसमाजांचे संयोग होऊन संयुक्तसमाज, व संयुक्तसमाज एकत्र होऊन दुबार संयुक्तसमाज बनत असतां, उपाध्येवर्गांचीहि वाढ होत जाते, आणि त्यांच्यांपैकीं प्रत्येक वर्ग इतरांपासून विसदृश होत असतां, आपल्यांतहि विविधस्वरूप होत असतो. म्हणजे, त्याचें एक व्यवस्थित मंडल बनून तें एक मुख्य उपाध्याचें अंकित बनतें, व बाकीच्या उपाध्यांचे निरनिराळे खालोखालचे वर्ग बनून त्यांचीं कामेंहि निरनिराळीं बनतात.

धर्ममंडळ एकीकडे ज्यास्त ज्यास्त संकलीभूत आणि स्पष्टपणें विविधस्वरूप होत असतां, दुसरीकडे समाजदेहाच्या इतर भागाशीं रचना व व्यापार यांच्या संबंधानें जें त्याचें स्वरूपसाम्य असतें तें हळूहळू निघून जात असतें. उपाध्या निराळा बनल्यावरहि पुष्कळ काळपर्यंत लढाईंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या अंग घालीत

असतो; पण समाजाची वाढ मोठी झाली म्हणजे त्याचें लढवय्याचें स्वरूप सर्वांशीं किंवा बहुतेकांशीं निघून जातें. त्याच्या दिवाणी व्यापारांचेंहि असेंच होतें. प्रारंभींच्या पायऱ्यांवर जरी तो शास्ता, प्रधान, मंत्री, न्यायाधीश इत्यादि स्वरूपांनीं अधिकार चालवीत असतो, तरी हळूहळू तो त्याचा अधिकार निघून जाऊं लागतो; शेवटीं त्या अधिकाराचे केवळ कांहीं मागमोस तेवढे शिल्लक राहातात.

धर्मसंस्थांची ही जी वाढ तिच्यायोगानें एकीकडे समाज ज्यास्त स्पष्टपणें विविधस्वरूप होत असतां, व धर्मसंस्थाघटनाहि ज्यास्त ज्यास्त मिश्रस्वरूप होत असतां, निरनिराळे पंथ उत्पन्न होऊन ती आणखीच मिश्रस्वरूप होत जाते. हे पंथ वाढत जाऊन व्यवस्थित स्वरूपाप्रत पावत गेल्यानें धर्मविषयक व्यापार करणाऱ्या व नियंत्रण चालविणाऱ्या मंडळ्या ज्यास्त ज्यास्त विविधस्वरूप होत जातात.

आतां हें उघडच आहे कीं समाजांमध्यें सतत चाललेल्या तंट्यांवरून कधीं कधीं संयोग व कधीं कधीं फाटाफुटी होत असल्यामुळें, आणि कोठें जुन्या संस्था मोडाव्या व कोठें नव्या जोडाव्या असेंहि होत असल्यामुळें, धर्मसंस्थांची प्रगति अनियमितरीतीनें झालेली आहे. पण असें आहे तरी वर दाखविल्यासारखा त्या प्रगतीचा क्रम सर्वत्र दाखवितां येण्यासारखा आहे.

७१. ह्या रचनाभेदांबरोबर फार महत्त्वाचा एक व्यापारभेद उत्पन्न होत असतो तो आतां सांगितला पाहिजे. दोन धार्मिककर्तव्यें प्रथम एकाचेच भाग असून

हळूहळू भिन्न होत गेलीं आहेत; आणि त्यांपैकीं एक जें प्रथम क्षुल्लक असून हल्लीं महत्त्वाचें बनलेलें आहे तें बरेंच स्वतंत्र झालेलें आहे. उपाध्यांचें मूलकर्तव्य देवाची पूजा करणें हें असतें; नवें कर्तव्य वर्तननियमांप्रमाणें लोकांस वागावयास लावणें हें झालेलें आहे.

ह्या एकंदर गोष्टींस मृतबाप किंवा नाईक याच्या संतर्पणानें सुरवात होत असल्यामुळें, आणि त्याच्या भुताच्या वासनांवर (ज्या तो माणूस जिवंत असतांना जशा त्याच्या असतात तशाच मेल्यावरहि असतात म्हणून समजतात) ह्या संतर्पणक्रिया अवलंबून असल्यामुळें, आणि पुष्कळ माणसें प्रारंभीं क्रूर असल्यामुळें, पूजा ही प्रारंभीं बहुधा क्रूर बिधींची बनलेली असते. प्रारंभीं तिच्यांत नैतिक बीज कांहींच नसतें; आणि म्हणूनच धार्मिकविधींकडे अत्यन्त लक्ष दिलेलें जें आढळून येतें तें श्रेष्ठ दर्जाच्या माणसांमध्यें किंवा समाजांमध्यें नसून कनिष्ठ दर्जाच्या समाजांमध्यें व माणसांमध्यें आढळून येतें. रेनॉफ म्हणतो कीं प्राचीन राष्ट्रांमध्यें ईजिप्शन राष्ट्र सर्वांत ज्यास्त धार्मिक होतें. त्याच्या आयुःक्रमाच्या प्रत्येक संबंधांत कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपीं धर्म प्रबल असे. पेरूव्हियनलोकांमध्यें पूर्वज व तज्जन्य देव ह्यांना द्यावयाचे बळी इतके मोठे असत कीं, त्यांच्यांत जिवंतलोक मृतांचे गुलाम असत असें म्हणण्यास कांहींएक हरकत नाहीं. तद्वतच मेक्सिकनलोक बऱ्याच अंशानें नरभक्षक असून ते आपला धर्म सर्वांत अत्यन्त कडकरीतीनें पाळीत. आर्यलोकांमध्यें हाच विशेष आढळून येतो. रोमनलोकांत

सार्वजनिक उत्सव असून त्यांचे खासगी जीवितावर बळी, प्रार्थना, व भविष्यें ह्यांचें तसलेंच जूं असे. अर्वाचीन यूरोपियन व मध्ययुगीन यूरोपियन ह्यांच्याकडे पाहतां तीच गोष्ट दिसून येते; म्हणजे समाजप्रगति होत जाईल, तशा उपवास, नेम, व्रतें इत्यादि संतर्पक गोष्टी कमी होत जातात, आणि धर्माचें नैतिक अंग वाढतें.

धर्माच्या इतर अंगांप्रमाणें ह्या नैतिक अंगाचेंहि मूळ व स्वरूप संतर्पणरूपीच आहे. मृतआईबापाच्या, मृतनायकाच्या किंवा दंतकथेनें आलेल्या देवाच्या इच्छा किंवा आज्ञा मानण्यापासून त्यास सुरुवात होते. ह्या नैतिक अंगांत प्रथम आज्ञापालनाव्यतिरिक्त दुसरें कर्तव्य समाविष्ट होत नसतें. इतर धर्मविषयक कृतींप्रमाणें ह्या कृतींतहि अंकितताप्रदर्शन ही मुख्य गोष्ट असते, आणि पाळलेल्या विशिष्ट आज्ञांचीं स्वरूपें ही दुय्यम गोष्ट असते; म्हणजे, त्या आज्ञा स्वरूपतःच योग्य म्हणून मानावयाच्या अशी समजूत नसून त्या मृतनायकाच्या, आईबापाच्या किंवा देवाच्या म्हणून मानावयाच्या अशी तेव्हांची समजूत असते. पण हळू हळू अनुभवावरून अशा नैतिक कल्पना उत्पन्न होऊं लागतात कीं त्यांच्याभोंवतीं खासगी मनोभाव आणि सार्वजनिक मताचें वेष्टन पडून त्यांस वरच्याहून कांहीं स्वतंत्र आधार उत्पन्न होतो. विशेषतः जेव्हां एकादा समाज लढाईत कमी गुंतूं लागतो, आणि पदार्थांचें उत्पन्न व विभजन ह्यांमध्यें ज्यास्त गुंतूं लागतो तेव्हां औद्योगिक सहक्रिया नीट रीतीनें चालण्यास जे वर्तननियम पाळणें अवश्य असतें ते लोकांच्या मनांत स्पष्टपणें येऊं लागतात.

शेवटीं ईश्वरप्रेरित माणसाला त्या समजल्या असें म्हणून त्यांस दैविक आधार मिळवितात; आणि पुष्कळ-काळपर्यंत त्या देवाच्या आज्ञा आहेत ह्या मुद्यावर त्या पाळल्याच पाहिजेत म्हणून म्हणतात. तथापि धार्मिक-विधींचा ह्या नैतिक आज्ञांवर विशेष जोर देणें हाच आतां मोठा भाग बनूं लागतो. हवी, स्तुत्या आणि प्रार्थना हे धर्माचे प्रत्यक्ष संतर्पक भाग बनून, त्यांबरोबर धर्मविषयक संभाषणें आणि उपदेश हे उत्पन्न होऊन ते त्याचे अप्रत्यक्ष संतर्पक भाग बनतात; त्यांमध्यें पुष्कळ अंशीं नैतिक आज्ञा व उपदेश असतात. आणि पुष्कळ दिवसांच्या सामाजिकशिक्षणानें मनुष्यस्वभावांत बदल होऊन त्यामुळें धर्मापासून स्वतंत्रनीतिशास्त्राची कल्पना लोकांच्या मनांत उत्पन्न होते. नंतर हळू हळू ही नीतिकल्पना इतकी प्रबळ होते कीं धर्मविषयक मतांची परीक्षा लोकनीतीच्या दृष्टीनें करूं लागतात, आणि त्या दृष्टीनें तीं नापसंत ठरल्यास तीं टाकून देऊं लागतात. देव व त्यांचीं कृत्यें ह्या संबंधांचे लोकमान्य समज नीतिभावना उच्च झाल्यामुळें अमान्य कसे होऊं लागतात हें ग्रीकलोकांमध्यें साक्रेटिसाच्या उदाहरणावरून व्यक्त होतें. हल्लींहि धर्मविषयक मतें सदसद्विवेकबुद्धीच्या कोर्टापुढें आणून, जो देव आपली पूजा करा म्हणून म्हणतो त्याच्या अंगीं पूजनीयांच्या उलट गुण लाविलेले पाहून ते खोटे म्हणून त्यागिलेले आपल्या नजरेस येतात. व्यवहारिक वर्तनहि धर्माज्ञा काय आहेत हें न पाहतां, खरोखर चांगलें आहे किंवा नाहीं हें पाहून तें स्तुत्य किंवा निषेध्य हें ठरवितात; आणि हल्लीं

धर्मोपदेशहि नैतिकस्वरूपाचेच झालेले आपल्या दृष्टीस पडतात. तात्पर्य, पुण्यवानास स्वर्ग आणि पाप्यास नरक ह्या ज्या धर्माच्या भीत्या व लालची त्यांचें न्याय, प्रामाणिकपणा, दया, मनःपूर्वकता, इत्यादि सद्गुण आचरा ह्या उपदेशाशीं प्रमाण कमी होत चाललें आहे.

७२. अशा रीतीनें धर्मसंस्थांच्या भूतस्थितीचा विचार केल्यावर, उत्क्रमण अशाच सामान्य पद्धतीवर चालू राहील असें सहजच गृहीत करून, आपण आतां असा प्रश्न करूं कीं त्यांची भावि स्थिति काय होण्याचा संभव आहे ? धर्मसंस्थांचें महत्त्व नीचतर समाजांपेक्षां उच्चतर समाजांत जरी कमी आहे, तरी त्या ह्यापुढें अगदीं नष्ट होतील असें अनुमान करितां कामा नये. त्या संस्थांचे जे हल्लींचे व्यापार त्यांच्यासारखे कांहीं व्यापार जर भविष्यत्काळीं करावयाचे असले तर त्या कोणत्या तरी रूपीं टिकाव धरून राहतील असाच आपण अंदाज केला पाहिजे. तेव्हां पहिला प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, कोणत्या स्वरूपीं त्या कायम राहतील ?

धर्मसंस्था व राजसंस्था ह्यांच्या विभक्तपणास सरलसमाजांतच सुरवात होत असल्यामुळें, आणि समाज पक्क होत जातील तसा हा विभक्तपणा वाढत जातो असें प्रत्ययास येत असल्यामुळें, हा विभक्तपणा भविष्यत्काळीं पूर्ण होईल असा अंदाज दिसतो.

मनोवृत्ति व बुद्धि-विषयक ज्या फेरबदलांनीं सरकारी धर्मसंस्थांची सत्ता कमी होऊन स्वतंत्र धर्मांची वाढ झालेली आहे, ते फेरबदल ह्यापुढें तसलेंच कार्य करीत राहतील असें दिसतें. म्हणून धर्मविषयक विचार व

आचार ह्यांनीं भिन्न अशीं लोकमंडळें वाढत जातील असा अंदाज दिसतो. बुद्धिविषयक प्रगति जसजशी होत जाईल तसतसें ह्या अनेक पंथांपैकीं बऱ्याच पंथांचें धर्ममतांच्या तत्त्वाच्या बाबतींत जरी ऐकमत्य होण्याचा संभव आहे, तथापि बारीकसारीक भेद कमी न होतां उलट ज्यास्त होतील असें सादृश्य प्रमाणावरून दिसतें.

ह्याबरोबरच धर्मसंस्थानाच्या शासनामध्येंहि आजपर्यंत झालेल्याच दिशेनें आणखी फेरबदल होत जातील. समाजाच्या उद्यमशील नमुन्याच्या वाढीबरोबर व्यक्तित्वाला जी पुष्टि मिळत जाते तिच्या योगानें धर्मसंघटनांचें स्थानिक स्वातंत्र्य वाढत गेलें पाहिजे. आणि प्रत्येक धर्ममंडल जसें पूर्णपणें स्वतंत्र होत जाईल, तसें उपाध्यांचें उपाध्येपण अगदींच नष्ट होण्याचा संभव आहे. म्हणजे, पाखंडी लोकांत उपाध्यांचा जो अधिकार पुष्कळच कमी झालेला हल्लीं दिसत आहे तो पुढें अगदींच निघून जाईल.

हे अंदाज अर्थात् समाजांची उद्यमशीलता हल्लींप्रमाणें पुढेंहि वाढत जाईल असें गृहीत धरून केलेले आहेत. पण नजीकच्याच भविष्यत्काळीं ती कदाचित् वाढावयाची कमी किंवा अगदीं बंद होईल असा संभव बराच, कदाचित् फारच दिसतो. तसें झाल्यास, म्हणजे युद्धशीलतेस जोर आल्यास किंवा स्वतंत्र उद्यमशीलतेच्या ऐवजीं सरकारानें नियंत्रित उद्यमशीलता उत्पन्न केल्यास, तिला योग्य अशा कल्पना, मनोभाव व संस्था पुनः जीव धरतील, किंवा नव्या उत्पन्न होतील; आणि

मग वर सांगितल्याच्या उलट फेरबदल बहुधा होऊं लागतील.

७३. आतां धर्मसंस्थांच्या रचनांवरून दृष्टी काढून ती त्यांच्या व्यापारांवर लाविल्यास, असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, उत्क्रमण चाललें आहे तसेंच चालू राहिल्यास, आणि त्याची पीछेहाट न झाल्यास, त्यांजपैकीं कोणते व्यापार शिल्लक राहण्याचा संभव आहे? ह्या प्रश्नाचें उत्तर असें दिसतें कीं, वर वर्णिलेल्या दोन व्यापारांपैकीं प्रत्येक व्यापार बदललेल्या स्वरूपीं बहुधा चालू राहील.

विशिष्ट धर्ममतयुक्त एकेश्वरी पंथाकडून अज्ञेय पंथाकडे संक्रमण होत असतां, संतर्पणव्यंजक सर्व विधी जरी नष्ट होण्याचा संभव आहे, तरी **अज्ञात आदिकारणाशीं** जो आपला संबंध आहे त्याची ज्ञानवत्ता जिवंत ठेवण्यास योग्य, आणि त्या ज्ञानवत्तेबरोबर येणारे मनोभाव व्यक्त करून दाखविणारे, असे सर्व विधी नष्ट होतील असें दिसत नाहीं. रोजच्या कामांत गुंग झाल्यानें जीवितास जें अगदीं नीरस आणि जड स्वरूप येण्याचा संभव आहे त्यांत थोडासा फेरबदल करण्याची जरूरी कायम राहणार आहे; आणि म्हणून विश्वाचें मूळ आणि अर्थ हीं किती गूढ आहेत हें श्रोत्यांच्या मनावर योग्यरीतीनें ठसविण्यास जे समर्थ असतील अशांना ती गोष्ट करण्यास नेहमींच क्षेत्र सांपडणार आहे. दुसरा असाहि अंदाज करण्यास हरकत नाहीं कीं, वरील विचाराबरोबर येणाऱ्या मनोभावास व्यक्त करून दाखविणारें जें गानवादन तें कायम राहील इतकेंच नाहीं, तर त्यास आणखीहि पक्कदशा प्राप्त होईल; म्ह-

णजे, तें ज्यास्त ज्यास्त अपौरुषेय बनत जाईल. कारण व्यक्ति आणि जाति ह्यांचें जीवित किती क्षणभंगुर आहे हा विचार मनांत आला म्हणजे जे मनोभाव उत्पन्न होतात त्यांस व्यक्त करून दाखविण्यास असलें हें अपौरुषगान फार योग्य दिसतें.

याबरोबरच, " कर्तव्य करा " ह्या उपदेशास धर्मोपदेशांमध्यें जें ज्यास्त ज्यास्त महत्त्व येत चाललें आहे, ते या पुढें आणखीहि वाढेल असें दिसतें. म्हणजे, धर्मसंकीर्तनांतून जीवित कसें घालवावें ह्याबद्दल जे हल्लीं कांहीं कांहीं बाबतींत उल्लेख येत आहेत ते पुढें सर्वच बाबतींत येऊं लागतील. बरोबर आणि चुकीचें ह्या कल्पना हल्लीं ज्या कांहीं प्रकारच्या कृतींना लागू आहेत म्हणून समजतात त्या सर्वच प्रकारच्या कृतींना लागू आहेत म्हणून ह्यापुढें समजूं लागतील. व्यक्तिकल्याण आणि समाजकल्याण ह्या संबंधांच्या सर्व गोष्टींचा विचार ह्यापुढें धर्मोपदेशकांच्या व्याख्यानांतून होऊं लागेल; आणि ते जे उपदेश लोकांस संमत आहेत त्यांच्यावरच आपल्या व्याख्यानांतून जोर देण्याच्या ऐवजीं, समाजजीवित सारखें ज्यास्त ज्यास्त संमिश्र होत असल्यामुळें वर्तनविषयक जे ज्यास्त कठीण प्रश्न उत्पन्न होतात तत्संबंधी माणसांचे विचार व मनोविकार योग्य करणें ह्या गोष्टीवर ते ज्यास्त जोर देऊं लागतील.

सारांश, आपल्यास असें म्हणतां येईल कीं, आपणास आपले अदृष्टाशीं (अज्ञाताशीं) आणखी एकमेकांशीं असलेले संबंध ज्याअर्थीं नेहमीं चालू ठेविले पाहिजेत त्याअर्थीं ही गोष्ट संभवनीय दिसते कीं, ह्या

दोन प्रकारच्या संबंधांच्या संबंधाचे जे विधी व उपदेश त्यांमध्यें जे आजपर्यंत गुंतलेले होते त्यांचे कांहीं प्रतिनिधी ह्यापुढें शिल्लकच राहतील; मग "धर्माधिकारी" या स्वरूपानें ते आपल्या पूर्वगांपासून कितीहि भिन्न होवोत.

प्रकरण सोळावें

धर्मविषयक भूत व भावि स्थिति

७४. धर्मविषयक संस्थांचा उगम आणि वाढ ह्यांचें वर्णन करण्यापूर्वीं धर्माची उत्पत्ति व वाढ ह्यांचें वर्णन करणें जसें जरूर पडलें, तद्वतच धर्माची भविष्यत्कालीं काय स्थिति होण्याचा संभव आहे हें सांगितल्याविना धर्मविषयक संस्थांच्या भाविस्थितीचा अंदाज करणें शक्य नव्हतें. म्हणून प्रस्तुत प्रकरणांत जें कांहीं सांगावयाचें आहे त्याचा कांहीं भाग गत प्रकरणाच्या शेवटीं सहजच आलेला आहे, म्हणून ह्याठिकाणीं धर्मविषयक उत्क्रान्तीच्या मुख्य मुख्य विशेषांचा संक्षिप्तरीत्या गोषवारा देऊन, धर्मास शेवटचें स्वरूप कोणतें येण्याचा संभव आहे ह्याबद्दल तेथें जीं अनुमानें केलीं आहेत त्यांचीं कारणें सांगण्याचें योजिलें आहे.

सामान्य ज्ञानवत्ता आणि धर्मविषयक ज्ञानवत्ता ह्यांजमध्यें असा भेद आहे कीं दुसरीचा संबंध इंद्रियग्राह्य ज्ञानाच्या टापूच्या बाहेर असणाऱ्यांशीं आहे. ज्या वस्तू स्पृश्य, दृश्य, श्राव्य, आस्वाद्य, वगैरे असतील तेवढ्यांचाच विचार जनावर करूं शकतें; आणि हीच गोष्ट लहान मूल, अशिक्षित, मुका, बहिरा, आणि अगदीं नीच प्रतीचा रानटी माणूस ह्यांस लागू आहे. पण प्रगतीस लागलेला माणूस जीं अस्तित्वें त्यांस अस्पृश्य, अश्राव्य, अदृश्य, पण आपल्यावर प्रभाव चालविणारीं म्हणून वाटत असतात त्यांजबद्दल विचार करूं लागतो. दर्शनातीत अशीं हीं कांहीं आपल्यावर स्वव्या-

पार करणारीं कारणें विश्रांत आहेत हें त्यास वाटण्यास काय कारण होतें? स्वाभाविकविषयक ज्या कल्पना त्यांजपासून अस्वाभाविक किंवा अद्भुतविषयक ह्या कल्पना कशा उत्क्रान्त होतात? हें संक्रमण कांहीं एकदम होऊं शकणार नाहीं; आणि धर्माच्या उत्पत्तीचा जर इतिहास द्यावयाचा असेल तर प्रारंभीं हें संक्रमण ज्या पायऱ्यांवरून होतें त्यांचें वर्णन करणें अवश्य आहे.

पिशाचक्लृप्तीवरून ह्या पायऱ्या स्पष्टपणें लक्षांत येतात. तिजवरून असें दिसतें कीं दृश्य व स्पृश्य जशा सत्त्वांपासून अदृश्य व अस्पृश्य अशा सत्त्वांचें मानसिक विशिष्टीकरण हळू हळू आणि मुक्काट्यानें होत जातें. आपला दुय्यम स्वप्नांत भटकत असतो असें कल्पून स्वप्नांत जें दिसलें असेल तें त्यानें प्रत्यक्ष केलें आणि पाहिलें असें प्राथमिक माणसास वाटतें ही गोष्ट— तद्वतच, हा दुय्यम मरणाच्या वेळेस निघून जातो, व लवकरच परत येण्याचा संभव असतो, असें तो समजत असून तो मूळमाणसा इतकाच द्रव्यमय म्हणून समजला जात असतो ही गोष्ट—ह्यांवरून हें स्पष्ट दिसतें कीं, प्रारंभीं अद्भुत कर्ता नैसर्गिक कर्त्यापासून फारच अल्परीतीनें भिन्न म्हणून समजला जातो; म्हणजे, तो मूळचाच माणूस असतो, मात्र त्यास इकडे तिकडे गुप्तपणें जाण्याचें आणि बरें वाईट करण्याचें सामर्थ्य असतें. आणि मृतमाणसाच्या दुय्यमाबद्दलचीं स्वप्नें तो जिवंत असतांना माहीत असलेल्यांस पडावयाचीं बंद झालीं, म्हणजे तो कायमचा मेला असें समजतात ह्यावरून असें दिसतें कीं, हे प्रारंभींचे दैविक पु-

रुष मर्त्यच समजले जात असतात; म्हणजे काय, तर, दैविकाबद्दलची कायमची ज्ञानवत्ता उत्पन्न करण्याच्या खटपटी प्रथम निष्फळ होतात.

पुष्कळ ठिकाणीं नैसर्गिक व निसर्गोत्तर ह्यांजमध्यें ह्याच्याहून ज्यास्त विशिष्टीकरण उत्पन्न होऊं शकत नाहीं. भुतांची संख्या एकीकडे आणखी माणसें मरून जरी वाढत असली तरी दुसरीकडे वर सांगितल्याप्रमाणें दुय्यम किंवा भुतेंच मरून कमी होत असल्यामुळें वाढूं शकत नाहीं; आणि त्यांच्यांतील कोणतींच भुतें पिढ्यानुपिढ्या कायम राहतात म्हणून समजलीं जात नाहींत. उदाहरणार्थ, झुलूलोकांचा अंकुलंकुलू, किंवा सगळ्या जातीचा बाप हा कायमचा किंवा पूर्णपणें मरतो असें समजतात; आणि ते लोक अलीकडील भुतांचें तेवढें संतर्पण करीत असतात. अशा रीतीनें नैसर्गिक सत्त्वें आणि निसर्गोत्तर सत्त्वें यांजमध्यें वरच्याहून ज्यास्त ठळक भेद लोकांच्या मनांत उत्पन्न होतो. ह्याबरोबरच ह्या कल्पित निसर्गोत्तर सत्त्वांची संख्याहि वाढत जाते; कारण तीं सर्वत्र वास करितात, आणि सर्व प्रकारच्या विलक्षण गोष्टी घडवून आणितात, असें समजण्याची प्रवृत्ति आतां वाढावयास लागते.

लवकरच ह्या भुतांच्या कल्पित सामर्थ्यांमध्यें भेद उत्पन्न होऊं लागतात. हे भेद सहजच जिवंत माणसाच्या दृष्ट सामर्थ्यभेदांवरून लोकांच्या मनांत येत असतात. म्हणून असें होतें कीं, सामान्यतः माणसें जरी आपल्या पूर्वजांच्या भुतांचीं तेवढींच संतर्पणें करीत असतात, तरी कधीं कधीं इतर भुतांचींहि तीं भीतिप्रद

असें समजून संतर्पणें करणें शहाणपणाचें होय असें लोकांस वाटूं लागतें. एवंच पुढें निसर्गोत्तर सत्त्वांमध्यें जे ठळक भेद उत्पन्न होतात त्यांस सुरवात अगदीं प्रारंभींच होते.

नेहमींच्या लढाया हे भेद प्रथम उत्पन्न करीत असून, ते ज्यास्त ठळक करण्यास व आणखी भेद उत्पन्न करण्यास त्याच कारण होत असतात. कारण लढाईमुळें लहान समाज संयुक्त होऊन मोठे समाज, आणि मोठे समाज पुनः संयुक्त होऊन त्यांच्याहून मोठाले समाज बनत असतां जिवंत माणसांत अर्थात् अधिकारभेद वाढत जात असतात, आणि त्यामुळें त्यांच्या भुतांच्या कल्पित सामर्थ्यांमध्यें तसलेच भेद असल्याची कल्पना माणसाच्या मनांत उत्पन्न होऊं लागते. अशा रीतीनें कांहीं काळानें मोठीं भुतें किंवा देव, लहान भुतें किंवा अर्धवट देव, इत्यादि देवमंडळ उत्पन्न होतें, पण त्यांत अद्यापि जातिभेद उत्पन्न झालेला नसतो. उदाहरणार्थ, रोमनलोक सामान्य भुतांना प्रेतदेव म्हणत असत, आणि हीब्रूलोक त्यांस 'इलोहिम' असें म्हणत. शिवाय, परलोकींचें जीवित त्यावेळीं ह्या लोकींच्या जीवितासारखेंच समजत असल्यामुळें अद्भुत सत्त्वांमध्यें त्यांच्या सामर्थ्याच्याच संबंधानें पदवीभेद उत्पन्न होतात असें नाहीं, तर त्यांचे स्वभाव व उद्योग ह्यांच्यासंबंधानेंहि होतात. म्हणून स्थानिक देव, आणि हा किंवा तो चमत्कार उत्पन्न करणारे देव उत्पन्न होतात; अनेक प्रकारचीं दुष्ट व सुष्ट सत्त्वें उत्पन्न होतात; आणि जेथें विजयामुळें एक समाज दुसऱ्यावर जाऊन बसला असेल, आणि

त्यांचे भुतांवरून उत्पन्न झालेले समज निरनिराळ्या प्रकारचे असतील, तेथें त्या समजांचें एक मिश्र कोडबोळें उत्पन्न होतें, व तो एक पौराणिक धर्म बनतो.

आतां हें उघडच आहे कीं भुतें हीं माणसांचीं दुय्यम असून तीं सर्व गोष्टींत मूळमाणसांसारखींच असल्यामुळें, आणि देव हे विजेत्या जातींतील जिवंत घटक जेथें नसतील तेथें विशेष प्रबल माणसांचे दुय्यम असल्यामुळें, ते त्यांचे शारीरिक विशेष, मनोविकार, आणि बुद्धि ह्या बाबतींत इतर भुतांप्रमाणेंच मानवी आहेत असें प्रारंभीं समजत असतात. उदाहरणार्थ, सामान्य मृतांच्या भुतांप्रमाणें ते मांस, रक्त, भाकरी, मद्य इत्यादि जे पदार्थ त्यांस अर्पावे ते ते खाऊन टाकितात असें समजतात; प्रथम, ते ते पदार्थ आपल्यासारखेच प्रत्यक्ष खातात अशी समजूत असून, मागाहून ते त्यांचें सत्त्व खातात असें समजूं लागतात. ते दृश्य व स्पृश्य असतात इतकेंच नाहीं, तर, ते माणसांशीं लढाया करितात, त्यांस जखमा होतात, व वेदनाहि भोगाव्या लागतात. तेव्हां माणसें व ते ह्यांच्यांत एवढाच भेद असतो कीं त्यांच्या अंगीं जखमा बऱ्या करण्याचें अद्भुत सामर्थ्य असतें, आणि म्हणून ते मरत नाहींत. ह्या ठिकाणीं एक अपवाद सांगितला पाहिजे; तो हा कीं, देवांना एक पहिलें मरण येत असतें असें पुष्कळ जातींचे लोक समजतात इतकेंच नाहीं, तर माणसांप्रमाणें त्यांनाहि दुसरें अखेरचें मरण येत असतें असें समजत असतात. पुढें सुधारणा जशी वाढत जाईल तसा नैसर्गिक सत्त्वें व निसर्गोत्तर सत्त्वें ह्यांच्यांतील भेद ज्यास्त ज्यास्त

ठळक होत जातो. भुतें व देव ह्यांचें द्रव्यमयस्वरूप हळू हळू निघून जाऊं लागतें; आणि मग देव स्पृश्य आहे ही कल्पना निघून जाते, आणि नंतर तो दृश्य किंवा श्राव्य आहे हींहि नाहींशी होते. देवांच्या शारीरिक विशेषांचें माणसांच्या तसल्या विशेषांपासून ह्याप्रमाणें विभिन्नीकरण चाललें असतां त्यांच्या मानसिक गुणांचेंहि विभिन्नीकरण ज्यास्त मंदगतीनें चाललेलें असतें. रानटयाचा देव जिवंत माणसापेक्षां बुद्धीनें फारसा वरिष्ठ समजला जात नसल्यामुळें तो सहजगत्या फसला जातो. अर्धवट सुधारलेल्यांचे देव देखील फसतात, चुका करितात, व आपल्या योजनांबद्दल पश्चात्ताप पावतात; आणि देवांस सर्व दिसतें व सर्व समजतें ही कल्पना कालेंकरूनच उत्पन्न होते. त्यांच्या मनोवृत्तींविषयींचीहि समजूत याबरोबरच वदलत जाते. त्यांचे क्षुधा, तृषा, काम इत्यादि जे जडतर मनोविकार प्रथम ढळढळीत असून त्यांचे भक्त तृप्त करण्यास तत्पर असतात, ते हळू हळू अंधक होत जातात, आणि पुढें शारीरिक उपभोगांशीं कमी संबद्ध तेवढेच मनोविकार कायम राहतात; आणि शेवटीं ह्यांचेंहि मानवी स्वरूप अर्धवटरीत्या निघून जातें.

देवांचे हे कल्पित स्वभाव विशिष्ट सामाजिक स्थितीला ज्या गोष्टी आवश्यक असतील त्यांना नेहमीं अनुरूप असे बनत जात असतात. युद्धशीलतेस जोर असेल तेव्हां आज्ञाभंग करणें हा सर्वांत मोठा अपराध देवास वाटतो, त्याचा राग कधीं निवत नाहीं, आणि तो क्रूरपणें शिक्षा करितो, अशी त्याबद्दल लोकांची क-

ल्पना असते; आणि कांहीं सौम्य गुण त्याच्या अंगीं लावीत असल्यास ते लोकांच्या मनांत फारसे जागृत नसतात. पण जेथें युद्धशीलता क्षीण होत जाईल, आणि त्यास योग्य असें कडक जुलमी शासन जाऊन त्याबद्दल उद्यमशीलतेस योग्य असें शासन उत्पन्न होत जाईल, तेथें शांततेच्या नीतीला अनुरूप असे जे देवाच्या अंगीं कल्पिलेले गुण ते लोकांच्या मनांत ज्यास्त ज्यास्त येऊं लागतात; म्हणजे, देवाचें प्रेम, त्याची क्षमाशीलता, त्याची दया, ह्या गुणांची लोक महती गाऊं लागतात.

मानसिक प्रगति आणि बदलत जाणारें सामाजिक जीवित ह्यांचे परिणाम जे हे वर सामान्यतः सांगितले त्यांचीं आतां विशिष्टरूपें सांगूं; म्हणजे ते स्पष्टपणें लक्षांत येतील. उदाहरणार्थ, मनांतील सर्व पूर्व ग्रह काढून टाकून इजिप्शनलोकांच्या दंतकथा, लेख, आणि स्मारकस्तंभ यांजकडे पाहिलें असतां आपल्या नजरेस असें येतें कीं पशुरूप व मनुष्यरूप देवांविषयींच्या ज्या त्यांच्या प्राथमिक कल्पना त्यांपासून त्यांच्या त्यांच्या संबंधाच्या आत्मरूप कल्पना उत्क्रान्त झाल्या, आणि शेवटीं एका देवाची तसलीच कल्पना उत्क्रान्त झाली; त्यामुळें पुढच्या काळचे उपाध्ये ह्या अस्सल पूर्ण कल्पना नव्हत, तर त्यांचीं भ्रष्ट स्वरूपें होत, असें म्हणून त्या टाकून देऊं लागले; कारण हल्लींच्या धर्मवाद्यांप्रमाणें व पुराणवाद्यांप्रमाणें त्यांचाहि कल प्रारंभींची स्थिति सर्वांत उत्तमच होती असें मानण्याकडे असे. तद्वतच, इलियड या काव्याकडे ऐतिहा-

सिकदृष्टय्चा न पाहतां झ्यूस देवाबद्दल प्रारंभींच्या ग्रीक-लोकांची कल्पना त्याजवरून दिसून येते एवढ्याच दृष्टीनें पाहिलें, आणि प्लेटोची जी देवविषयक कल्पना तिच्याशीं तिची तुलना केली, तर आपल्यास असें दिसून येईल कीं, ग्रीकलोकांत झालेल्या सुधारणेमुळें निदान श्रेष्ठतर लोकांच्या मनामध्यें तरी देवविषयक जी मानवरूप कल्पना ती बरीच बदलून गेली होती; कारण प्लेटोच्या देवविषयक कल्पनेंत माणसाचे खालच्या दर्जाचे गुणविशेष मुळींच दिसत नाहींत, आणि उच्चतरांचें रूपांतर केलेलें आढळून येतें. त्याचप्रमाणें हीब्रू-लोकांच्या मूळच्या दंतकथांमध्यें देवाचें माणसासारखें जें स्वरूप व स्वभाववर्णन आढळतें त्याच्याशीं, नंतरच्या भविष्यवाद्यांनीं देवाच्या केलेल्या वर्णनाची तुलना करून पाहतां, देवाचें सामर्थ्य वाढलेलें, आणि त्याचा स्वभाव माणसापासून ज्यास्त ज्यास्त भिन्न झालेला दिसून येतो. आणि त्या देवाच्यासंबंधानें हल्लीं ज्या कल्पना आहेत त्यांजकडे पाहतां त्यांमध्यें हें रूपान्तर अगदीं कळसास गेलेलें आढळून येतें. तात्पर्य, जो देव प्रारंभीं माणसांनीं त्यांस शिक्षा होईल अशीं कृत्यें करावीं म्हणून त्यांचीं मनें घट्ट करितो आणि त्यांस फसविण्याकरितां खोटें बोलणाऱ्या भुताचा उपयोग करितो म्हणून वर्णिलेला आढळतो, तोच देव आतां आपणास जे सद्गुण सर्वांत उच्चतम म्हणून वाटतात, त्यांहूनहि उच्चतर गुणांचा पुतळा म्हणून कल्पिला जातो.

अशा रीतीनें, प्राथमिक माणसाच्या मनांत धर्मविषयक कल्पना किंवा मनोभाव मुळींच नसतो ही गोष्ट

ध्यानांत घेतां, आपल्यास असें आढळून येतें कीं सामाजिक उत्क्रमण आणि त्याबरोबरच होणारें बुद्धीचें उत्क्रमण, हीं चाललीं असतां, ज्यांस आपण धार्मिक कल्पना व भावना म्हणून नांव देतों त्या उत्पन्न होतात; आणि स्पष्टपणें लक्षांत येणाऱ्या कार्यकारणपंरपरेनें, सुधारलेल्या जातींमध्यें त्या कल्पना व भावना अशा पायऱ्यांवरून जातात कीं, तेणेंकरून त्यांस सद्यःस्वरूप प्राप्त होतें.

७५. आतां आपण असा प्रश्न करूं कीं ह्यापुढें ह्या कल्पनांचें व भावनांचें उत्क्रमण कशा प्रकारचें होण्याचा संभव आहे? एका पक्षीं, ज्या फेरबदलांमुळें धर्मविषयक ज्ञानवत्तेस तिचें प्रस्तुत रूप प्राप्त झालें आहे ते एकदम बंद होतील अशी कल्पना करणें अयुक्तिक होईल. बरें, दुसऱ्या पक्षीं, ही जी स्वाभाविकरीतीनें उत्पन्न झालेली धार्मिक ज्ञानवत्ता ती नष्ट होऊन मनांत रिती जागा उत्पन्न करील अशी कल्पना करणेंहि अयुक्तिक होईल. तेव्हां हें उघडच होतें कीं, ह्या ज्ञानवत्तेंत आणखी फरक होत गेले पाहिजेत. तर, मग, हे फरक काय होण्याचा संभव आहे? वर निरूपिलेल्या पद्धतीस जर आपण देववेल तितकें सूक्ष्म स्वरूप दिलें तर आपल्यास ह्या प्रश्नाच्या उत्तराचा मार्ग दिसूं लागणार आहे.

"आदितत्त्वें भाग दुसरा" ह्यांमध्यें दाखविल्याप्रमाणें उत्क्रमणामध्यें अपक्रमणानें सारखा कमज्यास्तपणा होत जात असतो. धर्मपंथांची उत्पत्ति आणि क्षय व हल्लींच्या धर्मांची भावि स्थिति, हीं बरोबर लक्षांत येण्याकरितां हें सत्य आपण लक्षांत घेतलें पाहिजे. प्रारंभींच्या ज्या फेरबदलांमुळें देव, अर्धवट देव, प्रेतदेव,

आणि निरनिराळ्या जातींचीं व दर्जाचीं भुतें, ह्यांचें मंडळ उत्पन्न होतें, त्यावेळेस अपक्रमणामुळें उत्क्रमणांत फारसा कमज्यास्तपणा होत नाहीं. तेव्हां उत्पन्न होत असलेलें देवमंडळ वाढत जाऊन धर्मपंथाचें शरीर मोठमोठें वाढत असतां तें ज्यास्त ज्यास्त विविधस्वरूप होत जातें. व त्याचे भागहि ज्यास्त ज्यास्त निश्चितस्वरूप होत जातात; पण सरतेशेवटीं उलट दिशेनें व्यापार करणाऱ्या अपक्रमणास जोर येतो. स्वाभाविक कार्यकारणपरंपरेचें ज्ञान पसरत गेल्यामुळें, त्या ज्ञानाशीं विरुद्ध जे धर्मविषयक समज ते हळू हळू शिथिल होऊं लागतात. भुतें व गौण देवता ह्यांच्या माथीं मारिलेले सृष्टचमत्कार कांहीं ठराविक क्रमानेंच नेहमीं होतात हें जसजसें ज्यास्त ध्यानांत येईल, तसतसा त्या देवतांबद्दलचा विचार मनांत कमी येऊं लागतो; आणि अशा रीतीनें धर्मपंथांतील हे छोटे देव विरघळून जाऊं लागतात. त्याबरोबरच मुख्य देवाचें महत्त्व वाढत जाऊन ज्या कृती पूर्वीं अनेक दुय्यम देवांच्या माथीं मारिल्या जात असत त्या आतां ह्या एका देवाच्या माथीं मारिल्या जाऊं लागतात; म्हणजे काय, तर, देवसामर्थ्याचें घनीभवन होतें. ह्याप्रमाणें एकीकडे सर्वशक्तिमान् व सर्वगामी अशा देवाची कल्पना जशी वाढत जाईल, तसे त्याच्या अंगीं लाविलेले मानवी गुणविशेष कमी होऊं लागतात. म्हणजे काय, तर, ह्या श्रेष्ठ पौरुषेय सत्त्वावर त्याच्या अंगीं लाविलेल्या स्वरूपाच्या व स्वभावाच्या संबंधानें अपक्रमणाचा पगडा बसूं लागतो.

आधींच ह्या पगड्यामुळें विशेष सुधारलेल्या समा-

जांत, व त्याच्या विशेष पुढें सरसावलेल्या घटकांत अनेक दैविक सत्त्वांचें एक दैविक सत्त्वांत मज्जन झालेलें आहे, आणि ह्या सत्त्वाला लाविलेले माणसांचे जडतर गुणविशेष निघून गेलेले आहेत. म्हणून हल्लींचा क्रम असाच चालू राहिल्यास आणखीहि मानवी गुणविशेष देवाच्या अंगांतून हळू हळू निघून जाऊं लागतील. म्हणून आतां आपण असा प्रश्न करूं कीं ह्यामुळें माणसाच्या समजांत ह्या विषयाच्यासंबंधानें कोणते प्रत्यक्ष फेरबदल होण्याचा संभव आहे ?

ते फेरबदल दोन गोष्टी एकत्र होऊन झाले पाहिजेत. एक गोष्ट, माणसांत उच्चतर मनोभावांची वृद्धि होणें; कारण ती झाली म्हणजे देवाच्या अंगीं नीचतर मनोभाव लाविलेले माणसास सहन होत नाहींत. दुसरी गोष्ट, माणसाच्या बुद्धीची वाढ होणें; कारण ती झाली म्हणजे पूर्वी सृष्टिचमत्कारांच्या लाविलेल्या अपक्व उपपत्ती मान्य होत नाहींतशा होतात. आतां ह्या कारणांचीं कार्यें सांगतांना कित्येक परिचित गोष्टी सांगाव्या लागणार आहेत; पण त्यांजकडे इतर (अपरिचित) गोष्टींबरोबर नजर फेंकणें जरूर आहे.

७६. फीजीयनलोकांचा देव मृतांचे आत्मे खाऊन टाकितो असें वर्णन आढळतें; आणि ख्रिस्तीलोकांचा देव त्यांच्या आत्म्यांना सतत वेदना करीत रहातो असें वर्णन आढळतें. ह्यामध्यें दुसऱ्या देवाचें क्रौर्य पहिल्या देवाच्या क्रौर्याच्या मानानें ज्यास्त दिसत असल्यामुळें तें विशेष चांगल्या स्वभावाच्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांस इतकें किळसवाणें वाटतें कीं, हें धर्ममत त्यांच्यापैकीं

कित्येक कबूलच करीत नाहींत, आणि दुसरे त्यास आपल्या उपदेशांतून उल्लेख करीत नाहींत. तेव्हां नरक आणि त्यांत सतत वास करण्याची शिक्षा ह्या गोष्टी धर्ममतांतून नाहींतशा होई तोंपर्यंत हा फेरबदल चालूच राहिला पाहिजे. अन्यायाबद्दल लोकांच्या मनांत जो तिटकारा वाढत आहे तो ह्या गोष्टी धर्मांतून काढून टाकण्यास साहाय्यभूत होणार आहे. आडामनें थोडासा आज्ञाभंग केला म्हणून त्याच्या हजारों पिढ्यांच्या वंशजांना भयंकर शिक्षा करणें; ह्या पापाबद्दल ईश्वरापासून क्षमा मिळविण्याचा कल्पित मार्ग ज्यांनीं ऐकिलाहि नाहीं अशांनाहि तो न स्वीकारिल्याबद्दल नरकवासाची अखंड यातना भोगावयास लावणें; आणि देवाचा आडामच्या पापाबद्दलचा राग निवविण्यासाठीं म्हणून अगदीं निरपराधी अशा त्याच्या पुत्रास सुळावर चढवून देवाशीं समेट करणें; ह्या ज्या गोष्टी आहेत त्या एकाद्या मानवी शास्त्याच्या अंगीं लाविल्या तरी त्याच्याबद्दल लोक अगदीं तिटकारा व्यक्त करितील; आणि म्हणून ह्या गोष्टी सर्व वस्तूंच्या **आदिकारणा**च्या अंगीं लावणें, जें हल्लींच दुर्धर म्हणून वाटूं लागलें आहे, तें पुढें अशक्यच झालें पाहिजे. तद्वतच, अनंत पोकळींतील असंख्य जगांमध्यें हजर असूं शकणारी जी **महाशक्ति**, जीस पृथ्वीच्या पूर्वकालीन अस्तित्वामध्यें कोटचवधि वर्षें तेथें वस्ती करणारांपासून मानमरातबाची जरूरी लागली नाहीं, तीस आलीकडेच स्तुतीची हांव सुटली आहे, आणि तिनें मानवजाति निर्माण केली असून माणसांनीं तूं केवढी मोठी आहेस हें जर तिला

सारखें सांगितलें नाहीं तर ती त्यांच्यावर रागावते, हे समज नष्ट झालेच पाहिजेत.

तद्वतच धर्मसमजुतींमध्यें ज्या विचारविषयक असंबद्धता दृष्टीस पडतात त्यांचेंहि असेंच झालें पाहिजे. देवाच्या अंगीं लाविलेले कांहीं गुण त्याच्या अंगीं लाविलेल्या दुसऱ्या गुणांच्या विरुद्ध आहेत—ज्या देवास आपण केलेल्या एकाद्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप होतो त्याच्या ठिकाणीं सामर्थ्याची किंवा दूरदृष्टीची वाण असली पाहिजे; त्याला राग येतो ह्यावरून त्याच्या बेताच्या विरुद्ध एकादी गोष्ट घडली असें दिसतें, आणि ह्यांवरून त्याच्यापाशीं साधनांची वाण आहे असें व्यक्त होतें; ह्या ज्या नेहमींच्या अडचणी त्या एकीकडे ठेविल्या तरी त्यांच्याहून देखील अधिक मोठी अडचण अशी उभी होते कीं, इतर सर्व मनोविकारांप्रमाणें हे मनोविकार मर्यादित अशा ज्ञानवत्तेंतच उत्पन्न होणें शक्य आहे. कोणतीहि उकळी फुटण्यापूर्वीं मनांत कांहीं कल्पना उत्पन्न व्हाव्या लागतात, आणि अशा कल्पना देवाच्या ठिकाणीं उत्पन्न होतात अशी सामन्य समजूत दिसते: म्हणजे, तो अमुक अमुक पाहतो किंवा ऐकितो, आणि त्याचा परिणाम त्याच्या मनोवृत्तीवर होतो, असें म्हणत असतात. आतां असल्या स्वभावविशेषांनीं युक्त अशी देवकल्पना म्हटली म्हणजे ती मानवरूप म्हटलीच पाहिजे; कारण हे मनोविकारच मानवी आहेत असें नाहीं, तर ही ज्ञानवत्ताहि मानवीच आहे; कारण मानवी ज्ञानवत्ता क्रमिक अवस्थांची बनलेली असते. आतां देवाच्या ज्ञानवत्तेबद्दलची ही कल्पना त्याच्या अंगीं ला-

विलेल्या नित्यस्वरूपाशीं आणि सर्वज्ञतेशीं अर्थातच विरुद्ध आहे. कारण पदार्थ व घडणाऱ्या गोष्टी ह्यांनीं उत्पन्न केलेल्या कल्पनांची व मनोवृत्तींची बनलेली जी ज्ञानवत्ता ती विश्वांतील सर्व पदार्थ व विश्वांत घडणाऱ्या सर्व गोष्टी ह्यांनीं एकसमावच्छेदेंकरून व्यापृत असूं शकणार नाहीं. दैविक ज्ञानवत्ता खरी मानण्यास ज्ञानवत्ता म्हणजे काय ह्याचा विचार करण्याचें माणसांनीं सोडून दिलें पाहिजे—म्हणजे त्यांनीं शाब्दिक विधानें करूनच थांबलें पाहिजे; आतां ज्या विधानांस विचारांचें स्वरूप देतां येत नाहीं त्या विधानांपासून दिवसेंदिवस माणसांचें कमी कमीच समाधान होणार आहे.

देवाच्या इच्छेबद्दल जेव्हां आपण विचार करूं लागतों तेव्हां असल्याच अडचणी उत्पन्न होतात. इच्छा या शब्दाचा जोंपर्यंत आपण कांहीं निश्चित अर्थ घेतला नाहीं, तोंपर्यंत सर्व वस्तूंच्या आदिकारणाच्या ठिकाणीं इच्छा आहे हें विधान, वतुर्लाचे ठिकाणीं स्तुति असते ह्या विधानाइतकेंच बिनदिक्कत आपणास करतां येईल; पण आपण केवळ शब्दांपासून निघून तद्दर्शित विचारांकडे गेलों म्हणजे, दुसऱ्या विधानांतील उद्देशविधानाइतकींच पहिल्यांतील उद्देशविधानें ज्ञानवत्तेंत एकत्र आणणें अशक्य आहे असें दिसून येतें. ज्या कोणासहि आपल्या इच्छेव्यतिरिक्त इतर इच्छेची कल्पना करणें असल्यास ती आपल्या इच्छेच्या स्वरूपानेंच केली पाहिजे, कारण त्याची इच्छा तेवढीच त्यास प्रत्यक्ष माहीत असते; इतर सर्व इच्छा तो अनुमानानें ताडीत असतो. पण प्रत्येकास इच्छेची जी ज्ञानवत्ता आहे ति-

जवरून पाहतां तिला कांहीं पूर्वहेतु, म्हणजे तीस उत्तेजित करणारी कांहीं वासना, असावी लागते. अगदीं तटस्थवृत्ति घेतल्यास इच्छेच्या भावनेस थाराच मिळत नाहीं. शिवाय इच्छेस ज्याअर्थीं प्रेरक अशी पूर्व वासना असलीच पाहिजे म्हणून म्हणावें लागतें, त्याअर्थीं तिला कांहीं तरी साध्य हेतु असला पाहिजे, व तो साध्य झाला म्हणजे ती वासना संपली पाहिजे; आणि तिच्या ऐवजीं कांहीं अन्य हेतुयुक्त अन्य इच्छा उत्पन्न झाली पाहिजे. म्हणजे काय, तर, मनाच्या उकळीप्रमाणेंच इच्छेला ज्ञानवत्तेच्या क्रमिक अवस्था असाव्या लागतात. तद्वतच दैविक इच्छेची भावना मानवी इच्छेच्या भावनेपासून उत्पन्न झालेली असल्यामुळें तिच्याप्रमाणेंच तिला वेळ व स्थळ ह्यांचा निश्चितपणा लागतो. एकादा हेतु साधण्याची इच्छा मनांत उत्पन्न झाली म्हणजे त्या वेळेपुरती दुसऱ्या हेतूची इच्छा मनांत आणण्याची क्रिया ज्ञानवत्तेंत येऊं शकत नाहीं; म्हणून अनंत हेतू एकसमयावच्छेदेंकरून साध्य करणारी जी सर्वगामी शक्ति तिला ही गोष्ट विरुद्ध दिसते. परमेश्वराचे अंगीं बुद्धिमत्ता लावण्याचा जो प्रयत्न त्याचीहि गोष्ट अशीच आहे. पूर्वींप्रमाणें बुद्धिमत्तेंत क्रम व मर्यादितपणा हीं येतात इतकेंच नाहीं, तर आपल्याला जी बुद्धिमत्तेची कल्पना आहे तिच्यांत तिच्यापासून स्वतंत्र, व ती ज्यांच्यावर चालेल, अशीं कांहीं अस्तित्वें आहेत ही गोष्ट अंतर्भूत होते. बुद्धिमत्ता चालते ती ज्ञानवत्तेच्या बाहेरच्या गोष्टींनीं उत्पन्न केलेल्या ठशांनीं, व त्या ठशांवरून उत्प-

न्न झालेल्या कल्पनांनीं, जे फेरबदल उत्पन्न होतात त्यांच्या रूपानें चालते. अशा बाह्य व्यापारांच्या अभावीं अस्तित्वांत असूं शकणाऱ्या बुद्धीविषयीं बोलणें म्हणजे अर्थविहीन शब्दांचा उपयोग करणें होय. ह्यावर जर कोणी असें उत्तर देईल कीं हीं बाह्य अस्तित्वें आदिकारणानें निर्मिल्यामुळेंच उत्पन्न झालीं, आणि तत्पूर्वीं तीं **आदिकारणां**तच समाविष्ट झालेलीं होतीं, तर त्याला असें प्रत्युत्तर आहे कीं, ह्या विश्वनिर्मितीच्या पूर्वीं ज्या फेरबदलांची बुद्धिमत्ता बनते तसे फेरबदल आपल्यामध्यें उत्पन्न करण्यास आदिकारणापाशीं कांहीं नव्हतें, आणि म्हणून जेव्हां विश्व कसें निर्माण करावयाचें हें ठरविण्यास बुद्धिमत्तेची अत्यन्त जरूरी होती तेव्हां तें बुद्धिविहीन होतें, असें म्हणावें लागतें. एवंच असें स्पष्ट होतें कीं देवावर ज्या बुद्धिमत्तेचा आरोप केला जातो ती त्या नांवानें जी आपण समजतों तिच्यासारखी मुळींच नाहीं. तर ती अशी आहे कीं तिचे घटक असे सर्व विशेष तिच्यांतून निघून गेलेले आहेत.

ह्या व असल्या ज्या अन्य अडचणींचा लोक कधीं कधीं विचार करितात पण निकाल लावीत नाहींत. त्यांमुळें ह्यापुढें पूर्वीं त्यांनीं आदिकारणाचे अंगीं लाविलेले नीचतर मनुष्यगुणविशेष जसे काढून टाकिले आहेत तसे उच्चतरहि काढून टाकावे लागतील. तात्पर्य, आदिकारणविषयक कल्पना जी पहिल्यापासून विस्तृत होत चालली आहे ती ज्यास्त विस्तृत होत गेली पाहिजे. आणि शेवटीं तीस स्पष्ट विचारातीत अ-

शा एका ज्ञानवत्तेचें स्वरूप आलें पाहिजे; मग ही ज्ञानवत्ता मात्र नेहमीं कायम राहणार.

७७. " पण अज्ञेयाची ही जी अखेरची ज्ञानवत्ता, जीस आपण एथें मुकाट्यानें खरी म्हणून म्हणत आहों, ती जी कल्पना अगदीं खोटी होती तिच्यामध्यें एका मागून एक फेरबदल होऊन कशी उत्पन्न होऊं शकेल? रानट्याची पिशाच क्लृप्ति निराधार आहे. मृतमाणसाच्या ज्या मूर्त दुय्यमावर त्याचा विश्वास बसतो, तो अस्तित्वांत कधींच नव्हता. आणि ह्या दुय्यमास हळू हळू अमूर्त स्वरूप येऊन जर सामान्य दैविक कर्त्याची कल्पना उत्पन्न झाली आहे–तद्वतच, ह्या कर्त्याच्या अंगीं लाविलेले कांहीं मानवी गुणविशेष टाकून देऊन, आणि दुसऱ्या कांहींचें रूपान्तर करून जर देवाची कल्पना उत्पन्न झालेली आहे–तर हीच सरणी आणखी पुढें चालवून बनवलेली जी पक्क व शुद्ध कल्पना तीहि खोटीच नव्हे काय? मूळ समजच जर अगदीं खोटा होता तर त्याच्यावरून उत्पन्न झालेले सर्व समज अगदींच खोटे असलेच पाहिजेत."

हा आक्षेप अगदीं घातुकसा दिसतो; आणि तो ज्या मूळ पायावर रचलेला आहे तो बरोबर असता तर तो घातुकच झाला असता. पण वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, रानट्याच्या मूळकल्पनेंतच सत्याचें बीज होतें तें सत्य हें कीं, ज्ञानवत्तेंत जी शक्ति प्रादुर्भूत होते ती जी शक्ति ज्ञानवत्तेच्या पलीकडे प्रादुर्भूत होत असते तिचेंच भिन्न अवस्थेंतील स्वरूप आहे.

प्रत्येक स्वैच्छिक क्रियेवरून आपल्यामध्यें शक्तीचा

उद्गम आहे अशी रानट्याची खात्री होते. तो आपल्या अंतरनुभवांबद्दल विचार करितो असें नव्हे, तर ह्या अनुभवांमध्यें ही कल्पना लीन झालेली असते. आपल्या अवयवांमध्यें गति उत्पन्न करीत असतांना, आणि अवयवांच्या द्वारा इतर वस्तूंत गति उत्पन्न करतांना, जो जोर करावा लागतो तो त्याच्या लक्षांत येतो. आणि जो हा जोराचा प्रत्यय त्यानें उत्पन्न केलेल्या फेरबदलांचा पूर्वगामी म्हणून त्यास प्रत्यक्ष समजतो तो त्यानें स्वतः उत्पन्न न केलेल्या फेरबदलांचा पूर्वगामी म्हणून तो कल्पूं लागतो; म्हणजे हे बाह्य फेरबदल उत्पन्न कसे होतात ह्याची उपपत्ति लावण्यास त्यास ह्यावरून मानसिक साधन सांपडतें. त्याच्या सभोंवतीं होणाऱ्या असामान्य गोष्टींचे पूर्वगामी स्नायुविषयक जोर असतात ही जी कल्पना तिच्याबरोबर तिच्याशीं सहचारी अशा सर्व कल्पना त्याच्या मनांत येत असतात. म्हणजे, ते जोर आपल्यासारखेच जीव खर्च करीत असतात असें तो समजत असतो. कालेंकरून जे हे मृतांचे दुय्यम अगदीं सामान्य फेरबदलांव्यतिरिक्त इतर फेरबदलांचे कर्ते म्हणून समजले जात असतात, त्यांच्याबद्दलच्या कल्पनेंत फेरबदल होतो. ते पहिल्यापेक्षां कमी ठळक द्रव्यमय बनतात, इतकेंच नाहीं, तर त्यांच्यापैकीं कांहीं पूर्वींहून मोठे पुरुष (महापुरुष) बनतात, व ते सामान्यतः नियमितपणें घडणाऱ्या चमत्कारांचे अधिष्ठाते समजले गेल्यामुळें त्यांच्याबद्दल अशी कल्पना उत्पन्न होते कीं ते जरी माणसांपेक्षां फारच बलवत्तर आहेत तरी त्यांच्या क्रियासरणी माणसांच्या सरण्यांपेक्षां कमी बदलणाऱ्या आ-

हेत. म्हणून ह्या सत्त्वांची शक्ति भुताच्या शक्तीपासून निराळी म्हणून वाटूं लागते. आणखी प्रगति होऊन छोटेखानी दैविक सत्त्वांच्याबद्दल एका मोठ्या दैविक सत्त्वाची कल्पना जशी उत्पन्न होते, आणि त्या सत्त्वाचें पौरुषेय स्वरूप जसें ज्यास्त प्रसृत परंतु कमी स्पष्ट होत जातें, तशी ह्या बाह्यशक्तीची कल्पना ज्ञानवचेस भासणाऱ्या शक्तीच्या कल्पनेपासून ज्यास्तच भिन्न होऊं लागते; आणि ही भिन्नता शास्त्रवेत्त्याच्या विचारांच्या ठिकाणीं अगदीं कळसास जाऊन पोहोंचते; कारण ज्ञानेंद्रियगम्य वस्तूंमध्यें होणाऱ्या दृश्य फेरफारांचीच उपपत्ति शक्तिव्यंजक शब्दांच्या द्वारा तो लावितो असें नाहीं तर सर्व भौतिक फेरबदलांची उपपत्ति तो अशाच रीतीनें लावीत असतो. तथापि अखेरपर्यंत ह्या शक्तीचा विचार तो जो आंतर उत्साह स्नायूंचा जोर म्हणून त्यास ज्ञात होत असतो त्याच्याच रूपानें किंवा शब्दांनीं तो करितो. सारांश, बाह्यशक्तीची कल्पना अंतःशक्तीच्या स्वरूपीं करणें त्यास भागच पडतें, कारण त्यास दुसरें साधनच नाहीं.

आतां ह्यामध्यें काय काय गोष्टी गर्भित होतात त्या पहा. जो अंतर्गत जोर प्राथमिक माणसाच्या अनुभवास आपण केलेल्या सर्व फेरबदलांचा अगदीं नजीकचा पूर्वगामी म्हणून येतो—जो जोर बाह्यसृष्टींतील फेरबदलांची उपपत्ति लावतांना आपल्यामधील मानवी गुणविशेषांशीं संबद्ध आहे म्हणून तो समजतो—तोच जोर शास्त्रज्ञ ते सर्व गुणविशेष काढून टाकून सर्व बाह्यचमत्कारांचें कारण म्हणून समजतात. ह्या ज्ञानवृद्धीची शेवटची पा-

यरी म्हटली म्हणजे हें सत्य ध्यानांत आणणें कीं, ज्ञानवत्तेच्या बाहेर असणारी शक्ति आपल्या ज्ञानवत्तेंत असणाऱ्या शक्तीशीं सदृश असूं शकणार नाहीं; आणि तथापि त्यांच्यापैकीं प्रत्येक शक्ति ज्याअर्थीं दुसरीस उत्पन्न करण्यास क्षम आहे त्याअर्थीं त्या एकाच शक्तीच्या भिन्न सरणी असल्या पाहिजेत. म्हणून, प्राथमिक माणसानें सुरू केलेल्या विचाराला अखेरचें स्वरूप असें येतें कीं, ज्या एकंदर विश्वास आपण द्रव्यरूप म्हणून नांव देतों त्यामध्यें प्रादुर्भूत होणारी शक्ति आपल्यामध्यें ज्ञानवत्तेच्या रूपानें जी शक्ति उद्भूत होते तीच आहे.

एवंच, अगदीं खोट्या समजापासून खरा समज उत्क्रान्त करण्याचा प्रस्तुत ग्रंथांतील कोटिक्रमाचा उद्देश आहे असा जो वर आक्षेप घेतला तो बरोबर नाहीं. उलट, धार्मिक ज्ञानवत्तेचें अखेरचें स्वरूप, ज्या प्राथमिक ज्ञानवत्तेंत अनेक चुकांबरोबर सत्याचें बीज गुरफटलेलें होतें त्या ज्ञानवत्तेचें अखेरचें पक्कस्वरूप आहे.

७८. शास्त्र हें धर्मविषयक समजुती व मनोभाव ह्यांना हुसकावून लावीत आहे असें जे समजतात, त्यांच्या लक्षांत ही गोष्ट येत नाहींशी दिसते कीं, शास्त्रप्रगतीमुळें जुन्या उपपत्तींतील जें गूढ निघून जातें त्याची नव्या उपपत्तींत भर पडते. किंवा कदाचित् असें म्हणणें ज्यास्त बरोबर होईल कीं, जेवढें गूढ जुन्या समजुतींतून निघून जातें, त्याहून ज्यास्त गूढ नव्या समजुतींत उत्पन्न होतें. कारण जुनी उपपत्ति जर बाह्यतः तरी सर्व गूढ उकलणारी दिसते, तर नवी उपपत्ति

कांहींसें गूढ उकलून बाकीचें गूढ मुळींच उकलण्यासारखें नाहीं असें स्पष्ट म्हणते.

एका दृष्टीनें शास्त्रीयप्रगति म्हणजे सृष्टीचें एकप्रकारचें हळू हळू रूपान्तर करणेंच असतें. जेथें सामान्य दृष्टीस अगदीं साधें स्वरूप दिसून येतें तेथें शास्त्रदृष्टीस मोठी संकीर्णता दिसून येते. जेथें अगदीं निश्चलता दिसत होती तेथें अत्यन्त मोठी हालचाल दिसून येते; आणि जी केवळ अगदीं पोकळी म्हणून भासत होती, तेथें शक्तीचा लोकोत्तर व्यापार चालत आहे असें दिसून येतें. सृष्टिशास्त्रज्ञांच्या पूर्वपिढीस ज्या शक्ती अविश्वसनीय म्हणून वाटल्या असत्या त्या नंतरची शास्त्रज्ञांची पिढी शोधून काढिते; उदाहरणार्थ, एका ठिकाणीं बोललेलें हजारों मैलांवर हुबेहूब उठविण्याचें सामर्थ्य लोखंडाच्या केवळ पत्र्याच्या ठिकाणीं कसें आलेलें आहे तें पहा. सृष्टिशोधकाच्या जेव्हां दृष्टीस पडतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तू जरी निश्चल दिसतात, तरी त्यांजवर अत्यन्त अल्प शक्तीचाहि प्रभाव होत असतो,—जेव्हां त्यास प्रकाशविवरकयंत्रांतून असें स्पष्ट दिसतें कीं, पृथ्वीवरील अणूंप्रमाणेंच ताऱ्यांवरील अणू हालचाल करितात, जेव्हां त्याला असें स्पष्ट दिसूं लागतें कीं, पोकळींतील प्रत्येक बिंदूंतून अनंत लाटा जिकडे तिकडे चाललेल्या आहेत, तेव्हां त्याची खात्री होते कीं, विश्व हें मृत किंवा जडद्रव्यानें भरलेलें नसून तें सर्वत्र सजीव द्रव्यानें भरलेलें आहे; मात्र 'सजीव' ह्या शब्दाचा अर्थ आकुंचित न घेतां व्यापक घेतला पाहिजे.

भौतिकशास्त्रज्ञाच्या शोधांनीं जें हें रूपान्तर सारखें

वाढत चाललेलें आहे तें त्यास आधिभौतिकशास्त्रज्ञांच्या शोधांनीं जें अन्यप्रकारचें रूपान्तर होत आहे त्याची मदत होत आहे. आत्मविषयक विवरण केलें म्हणजे आपणास असें कबूल करणें भाग पडतें कीं, वस्तूंचे ठिकाणीं दिसणाऱ्या चमत्कारांच्या आपल्या उपपत्त्या आमच्या स्वतःच्या अनेक तऱ्हांनीं संयुक्त झालेल्या इंद्रियसंवेदनांच्या व कल्पनांच्या भाषेनें आपण व्यक्त करीत असतों, म्हणजे ज्ञानवत्तेच्या घटकांगांच्या रूपानें व्यक्त करीत असतों, आणि ज्ञानवत्तेचीं हीं घटकांगें ज्ञानवत्तेच्या पलीकडील अशा कांहींचीं चिन्हेंच आहेत. आतां प्रत्येक प्रकारच्या चमत्कारसमूहाच्या मागें कांहीं तरी सूत आहे, आणि चमत्कार हे बदलणारे असून हें सूत कांहीं कधीं बदलत नाहीं, असें जरी ज्यास्त विवरणाअंतीं आपल्यास दिसून येतें, आणि तेवढ्यापुरते आपले प्राथमिक समज जरी पुनः सजीव होतात, तरी आपल्यास असें दिसून येतें कीं, हें नित्य किंवा सत्यरूपी सूत आपल्या ज्ञानवत्तेस कधींच गम्य होत नाहीं. आतां ज्ञानवत्ताघटक हालचाली अगदीं मर्यादाबद्ध असल्यामुळें त्या मर्यादांपलीकडील हालचालींचा समावेश त्यांच्यांत होऊं शकत नाहीं; म्हणून त्या अचेतन दिसतात, तथापि त्यांच्यापैकीं कोणत्याहि एका प्रकारच्या हालचालींनीं दुसऱ्या प्रकारच्या हालचाली उत्पन्न होत असल्यामुळें त्या जात्या एकच आहेत असें दिसून येतें. अशा रीतीनें बाह्य हालचालींबद्दल अंतर्गत हालचालींच्या शब्दांनीं आपणास विचार करणें भागच पडल्यामुळें जरी विश्व भौतिक न दिसतां आध्यात्मिकसें दिसतें,

तथापि आणखी विचार करतां हें सत्य आपणास लक्षांत आणणें भाग पडतें कीं, ह्या अन्तिम शक्तीची तज्जन्य चमत्कारांवरून बनलेली जी आपली भावना ती ती शक्ति काय आहे हें मुळींच दाखवूं शकणार नाहीं.

एकीकडे विवरणात्मक शास्त्राच्या योगानें अशा रीतीनें जे समज उत्पन्न होतात ते धर्मविषयरूप द्रव्य नष्ट करीत नाहींत, तर त्यास केवळ अन्यस्वरूप देतात; आणि दुसरीकडे भौतिकशास्त्र धर्मविषयक मनोभावाचें क्षेत्र विस्तृत करितें. प्रारंभापासूनच ज्ञानवृद्धीबरोबर आश्चर्य वाटण्याचें माणसाचें सामर्थ्य वाढत गेलेलें आहे. रानटीलोकांतील जे अगदीं खालच्या पायरीवरचे आहेत त्यांस सुधारलेल्या कलाकौशल्यानें तयार केलेल्या चिजा पाहून सर्वांत कमी आश्चर्य वाटतें; आणि हें पाहून प्रवासी लोक विस्मित होतात. बरें, सृष्टींतील अत्यन्त भव्य चमत्कार पाहूनहि त्यांस त्यांमध्यें कांहींच लोकोत्तरपणा वाटत नाहीं, आणि म्हणून त्यांच्याबद्दल चवकशी करणें म्हणजे व्यर्थ काल घालवणें असें त्यांस वाटतें. अत्यन्त नीच व अत्यन्त उच्च माणसांमध्यें जी ही मानसिक तफावत आढळून येते तसल्याच प्रकारची तफावत निरनिराळ्या प्रमाणांवर सुधारलेल्या माणसांमध्येंहि दृष्टीस पडते. अंडें उबून त्यांतून पोर बाहेर पडणें ह्यामध्यें कांहीं तरी विलक्षण आहे असें जें वाटतें तें केवळ गांवढेकऱ्यास, किंवा सुतारसोनारांस, किंवा उदम्यास नव्हे, तर जीवशास्त्रज्ञास होय; जो जीवविषयक चमत्कारांचें विवरण होईल तितकें बारीक करितां करितां, जीवबिंदूचा कण सूक्ष्मदर्शकयंत्राखालीं घालून पाहूं ला-

गला, आणि त्याचें जीवित सर्वांत सरल आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें, म्हणजेच अगदीं गुंग होऊन जातो; आणि त्याची खात्री होते कीं शक्तींचें विलसित अमक्या अमक्या पद्धतींनीं होतें ह्याबद्दल आपण कितीहि नियम बसविले तरी, तें विलसित प्रत्यक्ष कसें चालतें ह्याची कांहीं कल्पना आपल्यास होत नाहीं. उंच डोंगरांतील दरी पाहून सामान्य प्रवासी किंवा हरणाची पारध करणारा ह्यांच्या डोक्यांत शिकार किंवा वनश्री यांच्या कल्पनांव्यतिरिक्त कल्पना उत्पन्न होत नाहींत; पण तोच जर भूगर्भशास्त्रज्ञ असेल तर त्याच्या मनांत ह्यापलीकडे कांहीं कल्पना उत्पन्न झाल्याशिवाय रहावयाच्या नाहींत. तो आपण ज्या दगडावर बसलों आहों तो दगड मानवी सुधारणेस प्रारंभ होण्याच्या पुष्कळच अगोदरच्या कालापासून तों आजपावेतों ऊन, वारा, पाऊस इत्यादिकांनीं केवळ अर्धाच इंच झिजला आहे ही गोष्ट ध्यानांत आणून, हळू हळू दगड, माती वगैरे निघून जाऊन ती सर्व दरी कशी बनली असेल ह्या गोष्टीची कल्पना करण्याचा यत्न करीत असतां त्याच्या मनांत काल व शक्ति ह्याबद्दलचे जे विचार येतात ते सामान्य प्रवाशाच्या किंवा पारध्याच्या गांवींहि नसतात. बरें, तो जेव्हां वांकडे तिकडे झालेले आपल्या भोंवतालचे खडक पाहतो तेव्हां त्यास वरील कालाच्या अत्यन्त पूर्वकालाचीहि कल्पना होते, ज्याकालीं ते खडक अर्धवट वितुळलेल्या पृथ्वीच्या पोटांत होते; आणि नंतर तत्पूर्वीं फार फार प्राचीनकाळीं त्यांचे वाळू व चिखल हे घटक जेव्हां तेव्हांच्या समुद्रकांठीं होते त्या

काळाची कल्पना त्याच्या मनांत येते; आणि ह्या कल्पना ते काळ बरोबर रीतीनें मनांत आणण्यास किती अल्पतम अंशानें समर्थ आहेत हेंहि त्याच्या लक्षांत येतें. विश्वाच्या संबंधानें अत्यन्त मोठ्या भावना ज्या दृष्टीस पडतात, किंवा त्याच्याबद्दलचा विचार करून जें अत्यन्त आश्चर्य वाटतें तें ज्या प्राथमिक लोकांस आकाश डोंगरावर टेंकलेलें आहे असें भासतें त्यांस नव्हे, किंवा त्यांचीच विश्वविषयक कल्पना घेऊन आलेले त्यांचे जे वंशज आकाश देवाचा कीर्तिदुंदुभि वाजवीत आहे असें म्हणतात त्यांस नव्हे; तर ज्योतिःशास्त्रज्ञालाच होय. कारण त्याच्या असें नजरेस येतें कीं, सूर्य इतका विशाल आहे कीं त्याच्यावरील डागरूपी एकाद्या खोलग्यांत आपली सबंध पृथ्वी त्याच्या कडांस स्पर्श न करितां अलग टाकतां येईल; आणि दुर्बिणीमध्यें जसजशी सुधारणा होत जाईल तसतसे अधिकाधिक सूर्यसमूह त्याच्या दृष्टीस पडतात, व त्यांजपैकीं पुष्कळ आपल्या सूर्याहून फारच मोठे आहेत असें त्यास आढळून येतें.

आजपर्यंतच्याप्रमाणें ह्यापुढेंहि उच्चतरबुद्धीच्या व दीर्घतर अंतर्दृष्टीच्या माणसामध्यें हा मनोभाव कमी न होतां उलट वाढतच जाणार आहे. हल्लीं अत्यन्त जोरदार व सुशिक्षित अशा मनाच्या माणसाला देखील एकंदर विश्वाची कल्पना मनांत आणण्यापुरतें ज्ञानहि नाहीं, आणि सामर्थ्यहि नाहीं. सध्यां शास्त्रव्यासंगी माणूस सृष्टीच्या ह्या किंवा त्या एकाच भागाचा विचार करण्यांत गुंतलेला असल्यामुळें, सृष्टीच्या इतर भागांचें, तद्विषयक चमत्कारांची विस्तृतता व संकीर्णता ह्यांची

ओबडधोबड कल्पना करण्याइतकें देखील त्यास ज्ञान असतें; आणि ह्या प्रत्येक भागाचें त्यास पुरेसें ज्ञान आहे असें मानिलें तरी त्या सर्व भागांचा एकत्र विचार तो करूं शकत नाहीं. ह्या पुढील शास्त्रज्ञाची बुद्धि ज्यास्त व्यापक व ज्यास्त जोरदार होऊन त्यांची सर्वांची अस्पष्टशी कल्पना करण्यास तो कदाचित् समर्थ होईल. गानविषयक अपक्कशक्तीच्या माणसास साध्या ताना तेवढ्या समजत असून मिश्र ताना जशा समजत नाहींत, तर त्या ती शक्ति ज्याची पक्क झाली आहे अशासच समजतात; तद्वत् जो सृष्टिक्रम हल्लीं केवळ भागाभागांनींच लोकांस समजत आहे तो भविष्यत्काळच्या ज्यास्त उत्क्रान्त बुद्धीच्या माणसास सर्व एकत्ररीत्या समजूं लागेल; आणि त्यामुळें हल्लींच्या शास्त्रज्ञाचा त्यापासून उत्पन्न झालेला मनोभाव रानट्याच्या मनोभावाच्या जितका पलीकडे आहे, तितका भविष्यत्कालीन सुशिक्षित माणसाचा हल्लींच्या सुशिक्षित माणसाच्या मनोभावाच्या पलीकडे जाणार आहे.

आणि हा मनोभाव जें ज्ञानविवरण त्यास अज्ञेयमत ग्रहण करण्यास भाग पाडूनहि, अभेद्य म्हणून त्यास माहीत असलेल्या **महागूढाची** कांहीं तरी उपपत्ति कल्पिण्यास सारखें लावीत असतें, त्या विवरणानें कमी होण्याचा संभव नाहीं, तर वाढण्याचाच संभव आहे. ' उद्गम ', ' कारण ', ' हेतु ' ह्या कल्पना सापेक्ष असून त्या मानवी विचाराच्याच संबंधाच्या आहेत, आणि म्हणून मानवी विचारातीत जें **अंतिम सत्य** त्याच्या संबंधानें त्या बहुधा असंबद्धच होत, ह्या गोष्टीचें जेव्हां त्यास

स्मरण होतें, तेव्हां वरील विचार त्याच्या मनांत विशेषंकरूनच येतो; आणि ह्या अंतिमसत्यास स्पष्टीकरण हा शब्द लावणें अगदीं निरर्थक असा जरी त्यास संशय येतो, तरी त्या गूढाचें कांहींतरी स्पष्टीकरण असलेंच पाहिजे असें मानणें आपल्यास जरूरच पडतें, ही गोष्ट जेव्हां त्याच्या ध्यानांत येते, तेव्हां तर वरील विचार त्याच्या मनांत ज्यास्तच जोरानें येतो.

तें कसेंहि असलें तरी एक सत्य सारखें ज्यास्त ज्यास्त स्पष्ट होत गेलें पाहिजे; तें हें कीं **अगम्य** असें एक **अस्तित्व** सर्वत्र प्रादुर्भूत होत असून तें असें आहे कीं त्याचा आदि किंवा अंत आपल्यास सांपडत नाहीं, किंवा कल्पितांहि येत नाहीं. जीं गूढें, त्यांजबद्दल जितका ज्यास्त विचार करावा तितकीं ज्यास्त गूढ होत जातात अशा गूढांमध्यें एक अगदीं पूर्ण निश्चित गोष्ट राहणार आहे; ती ही कीं, सर्व वस्तूंचा उगम अशा एका **अनंत** आणि **शाश्वत शक्ती**च्या समोर नेहमीं आपण उभे आहों.

परिशिष्ट

स्पेन्सरसाहेबांच्या कल्पनांची वाढ (पूर्वार्ध)

एकाद्या माणसाचा पूर्ण जीवनवृत्तांत द्यावयाचा म्हटला म्हणजे त्याची कारकीर्द व वर्तणूक एवढ्यांची हकिकत देऊन भागत नाहीं; तर त्याच्या मनोवृत्तिविषयक आणि बुद्धिविषयक मानसिक वाढीचाहि इतिहास त्याजमध्यें आला पाहिजे, आणि त्या वाढीपासून जी काय फलनिष्पत्ति झाली तिचाहि आला पाहिजे. चरित्रकार चरित्रनायकाच्या शीलाचें उत्क्रमण कसें होत गेलें ह्याजबद्दल कांहीं हकीकत कधीं कधीं देत असतात, पण त्याच्या मनांत निरनिराळ्या कल्पना प्रथम कशा उत्पन्न झाल्या, व पुढें त्यांची वाढ कशी होत गेली ह्याजबद्दल ते फारशी माहिती देत नाहींत. आतां हें खरें आहे कीं, असला इतिहास ज्याचा त्यानेंच दिला तर त्यापासून कांहीं बोध होणार, पण असा प्रयत्न ज्याचा तो फारच क्वचित् करतो.तसला प्रयत्न **स्पेन्सरसाहेबानीं** एका स्वतंत्र लेखांत केला आहे, त्यावरून ही त्यांच्या मानसिक वाढीची हकीकत एथें दिली आहे.

त्यांच्या आत्मचरितांत ('स्पेन्सरचरित्र' पहा.) त्यांच्या विचारवृद्धीच्या पायऱ्यांचें दिग्दर्शन केलेलें असून कांहीं प्रधानकल्पनांची उत्पत्तिहि कशी झाली तें सांगितलेलें आहे; पण तें तेथें पूर्णपणें सांगितलेलें नाहीं, आणि ती हकीकत सुसंबद्ध होण्यास ज्या बारीकसारीक गोष्टी सांगितल्या पाहिजेत त्या गाळलेल्या आहेत.

शिवाय, ती हकीकत त्यांच्या कारकीर्दीच्या पूर्वार्धाचीच केवळ आहे. म्हणून ती हकीकत होईल तितकी पूर्णपणें देण्याचा, आणि त्यांचे घटना, वळण, आणि परिस्थिति ह्यासंबंधाचे जे विशेष त्यांचें वर्णन करण्याचा हा यत्न केलेला आहे. त्यावरून माणूस बौद्धिक उद्योग काय करील हें त्याच्या मनोवृत्तिविषयक घटनेवर किती अवलंबून असतें, आणि त्याचीं ठाम मतें त्या घटनेवरून किती निश्चित होत असतात हें दिसून येईल.

२. त्यांच्या आत्मचरितांत सांगितलेल्या गोष्टींवरून बाबावाक्याचा प्रभाव त्यांच्या मनावर किती अल्प प्रमाणावर पडत असे हें दिसून येतें. ते आज्ञाभंग करितात अशी जी त्यांच्या वडील माणसांची त्यांच्या विरुद्ध तक्रार असे त्या आज्ञाभंगाचें कारण शास्तेवर्गाबद्दल त्यांच्या मनांतील तिरस्कारबुद्धि हीच होय. ह्या स्वभावविशेषाचा त्यांच्या एकंदर कारकीर्दींत त्यांच्यावर परिणाम झालेला दिसतो. तो असा कीं, कोणताहि विषय त्यांच्यापुढें विचाराकरितां आला म्हणजे त्याविषयींचें आजपर्यंतचें ठराविक मत काय आहे ह्याची ते कधीं चवकशी करीत नसत, आणि म्हणून त्याचा विचार ते अगदीं स्वतंत्रपणें करीत.

हा त्यांचा जो स्वभावविशेष त्याला, त्यांच्या बापाची कारणांविषयीं चिकित्सा करीत बसण्याची, आणि ह्यांच्या विचारशक्तीस वळण लावण्यासाठीं ह्यांना त्या बाबतींत विचार करण्यास लावण्याची जी संवय, तिनें उत्तेजनच मिळालें. अशा प्रकारचे प्रश्न ह्यांच्यापुढें त्यानें ठेविल्यामुळें आपलें म्हणणें ठांसून सांगण्याचा जो

ह्यांचा स्वभाव, ज्याच्याविषयीं तो एरवीं कुरकूर करी, त्यास जोर आला; तथापि ही गोष्ट त्याच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. पण ह्यामुळें **कारण**विषयक जाणीव ह्यांच्या मनांत उत्पन्न झाली, व तो विषय ह्यांस अगदीं परिचित होऊन गेला. आतां कारणाचा शोध पृथक्करणापासूनच लागत असतो; पृथक्करण म्हणजे अर्थात् चमत्कारांच्या निरनिराळ्या अंगांमध्यें काय मुख्य संबंध आहेत हें पाहण्यासाठीं ते उकलून पाहणें होय. म्हणून ज्यास कारणें शोधीत बसण्याची संवय असते त्यास पृथक्करणाचीहि संवय असते.

ही संवय ह्यांच्या बापास फार होती; तेव्हां ती त्याच्यापासून ह्यांस वंशपरंपरेनें आलेली असून त्यानें वर सांगितल्याप्रमाणें तिची जोपासना केली होती. शिवाय अमुक एक गोष्ट दैविककारणामुळें घडली असें तो ह्यांस कधीं सांगत नसे; कारण त्याचा स्वधर्माच्या मुख्य मतांवर जरी पूर्ण विश्वास असे तरी सर्व गोष्टी स्वाभाविकपणेंच घडून येतात असें तो मानीसें दिसे. शिवाय, हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं ह्यांच्या शिक्षणांत अधिकारमूलक शिक्षणाचा भाग फारच कमी असे; कारण तो भाषाविषयक शिक्षणांत फार असतो, आणि तें तर ह्यांनीं झुगारूनच दिलें होतें. म्हणून कोणतीहि गोष्ट दुसरा सांगतो म्हणून खरी मानावयाची अशी ह्यांस संवयच नसे. उलट भूमिति, यंत्रशास्त्र, इत्यादि ज्या विषयांचा हे लहानपणीं अभ्यास करीत ते असे आहेत कीं त्यांमध्यें सिद्ध करण्याच्या प्रत्येक पायरीवर व्यक्तीला ती बरोबर आहे किंवा नाहीं हें आपल्या विचारशक्तीस

विचारावें लागत असतें, आणि त्यामुळें व्यक्तीला असल्या गोष्टींचा स्वतः विचार करण्याचा आपल्यास हक्कच आहे असें सहजच वाटूं लागतें. शिवाय, हे हवा शोषून घेण्याचा पंप, विद्युद्यंत्र, वगैरेच्या साहाय्यानें करावयाचे जे प्रयोग ते करतांना बापास मदत करीत असत, आणि भौतिककारणविषयक कल्पनांचा ठसा ह्यांच्या मनावर वरचेवर उमटत असे. शिवाय, कीटकसंवर्धनामुळें तद्विषयक जें अल्पज्ञान यांस प्राप्त झालें त्याचाहि परिणाम वस्तूंची जनिति स्वाभाविकरीत्याच होत असते, दैविकरीत्या नव्हे, ही कल्पना ह्यांच्या मनाला ज्यास्त परिचित होऊन गेली.

३. ह्यांना लहानपणींच मनोराज्यांत गढून जाण्याची बरीच संवय लागली हें ह्यांच्या आत्मचरितांत सांगितलेलेंच आहे; आणि एणेंकरून कल्पनाशक्तीला—पुनःस्मरणरूप कल्पनाशक्तीला नव्हे तर रचनारूप कल्पनाशक्तीला—चांगलें वळण लागतेंसें दिसतें. शिवाय ह्यांच्या बापाकडून आणखी एक स्वभावविशेष ह्यांस प्राप्त झालेला होता; तो कोणता म्हणाल तर त्याचें ध्येय नेहमीं फार उच्च असे; आणि त्याला, जी पूर्णपणाची फार आवड तिजवरून तें व्यक्त होई. त्याला ही आवड इतकी असें कीं ती कधीं कधीं अपायकारक होई. एकादी गोष्ट पुरी झाली म्हणून ती तो कधीं एकीकडे सारीत नसे. ह्यांना देखील आपण केलेल्या कृतींत आणखी सुधारणा करावी असें जरी बऱ्याच प्रमाणावर वाटे तरी बापाइतकें फाजील वाटत नसे. तथापि कोणतीहि गोष्ट अपुरी ठेवून ह्यांस चैन पडत नसे. हें यांनीं आपल्या ग्रंथांत

ज्या पुनःपुनः भाषाविषयक सुधारणा केल्या आहेत त्यांवरून व्यक्त होतें. एकदां शुद्ध करावें, पुनः शुद्ध करावें, आणखी पुनः शुद्ध करावें—असा ह्यांच्या बहुतेक ग्रंथांचा इतिहास आहे. प्रत्येक प्रकरण पुरें झालें म्हणजे त्याची गोळाबेरीज सांगावयाची ही जी ह्यांची संवय तिजवरून देखील प्रारंभासून यांस पूर्णतेची आवड किती असे हें फार चमत्कारिक व चांगल्या रीतीनें दिसून येतें. ह्यांना कोणतीहि गोष्ट तिचीं टोंकें विस्कळित ठेवून सोडून देववत नसे, तर तीं एकत्र गोळा करून जेव्हां हे बांधतील तेव्हांच ह्यांस चैन पडे. उदाहरणांवरून एकादें सत्य स्थापन केल्यानें ह्यांचें समाधान कधीं होत नसे, तर तें विचारावरूनहि जेव्हां बरोबर ठरेल तेव्हांच ह्यांस बरें वाटे, ही जी ह्यांची संवय तिजवरूनहि हाच स्वभाव विशेष व्यक्त होतो. कारण कोणत्याहि सत्यास केवळ अनुभवसिद्धाचेंच स्वरूप देऊन थांबणें म्हणजे त्याचीं टोंकें जणूंकाय विस्काळित ठेवणेंच होय; आणि त्यास विचारसिद्धाचें स्वरूप देणें म्हणजे, एका अर्थी, त्यांतील अंगभूत गोष्टी एका मोठ्या गोष्टीचे भाग म्हणून एकत्र गोळा करणेंच होय.

अशा प्रकारचे जे हे स्वाभाविक विशेष आणि अशा प्रकारचें जें हें वळण ह्याचा एक सामान्य परिणाम असा झाला कीं, दंतकथेनें आलेल्या ज्या कल्पना व भावना त्यांपासून हें अगदीं अलग राहिले. त्यामुळें सृष्टीशीं प्रत्यक्ष परिचय करून ज्या कल्पना व जे ठसे उत्पन्न होतील त्यांचें ग्रहण करण्यास ह्यांची नेहमीं पूर्ण तयारी असे. प्रस्तुतास्थितिप्रेम ही एक प्रत्यक्ष शक्ति आहे असें मो-

ठमोठे शास्त्रज्ञ म्हणत असतांहि वयाच्या तेराव्या वर्षीं ह्यांनीं ती गोष्ट कबूल करण्याचें नाकारिलें, हें ह्यांच्या चरितांत सांगितलेलेंच आहे; ह्यावरून ह्यांची विचारशक्ति किती स्वतंत्र होती, आणि भौतिक सत्यांची उपजतबुद्धीनेंच ह्यांस किती विलक्षण जाणीव होती, हें स्पष्ट दिसतें. हे दोन विशेष, आणि विलक्षण रीतीनें चंचल (उद्योगी) रचनात्मक कल्पनाशक्ति आणि पूर्णत्वाची मोठी आवड एवढीच ह्यांची प्रारंभींची प्रत्यक्ष मानसिक सामग्री होती असें म्हणतां येईल; आणि भाषा, इतिहास वगैरे जे तत्कालीन उदारशिक्षणाचे विषय त्यांचें अज्ञान ही एक अप्रत्यक्ष मानसिक सामग्री ह्यांजपाशीं होती असें, पाहिजे तर, आणखी म्हणतां येईल.

पण ह्यांचा आणखी एक स्वभावविशेष येथें सांगण्यास विसरतां कामा नये; तो हा कीं, ह्यांना कृतीच्या मानानें विचाराचीच आवड विशेष असे. कांहींकांच्या शारीरिक घटनेवरून त्यांस इतका उत्साह वाटत असतो कीं ते स्वयंस्फूर्तीनेंच कांहींतरी उद्योग करीत असतात; तशी ह्यांची शरीरघटना नव्हती. पुष्कळ वेळीं कृति करण्याचा प्रसंग आला म्हणजे हे अंमळ नाखुषीनेंच ती अंगावर घेत; पण विचार करण्याचें काम मात्र हे मोठ्या खुषीनें करीत. विचार करण्याकडे जो ह्यांचा हा विशेष कल तो ह्यांच्या ग्रंथलेखनरूप कारकीर्दीस एक विशेष कारण झालेला आहे हें उघडच आहे.

४. वयाच्या सतराव्या वर्षीं ह्यांच्या लंदनांतील इंजिनियरिंगच्या कारकीर्दीस सुरुवात झाल्यावर ह्यांनीं बापास लिहिलेल्या पत्रांवरून ह्यांचे विचार किती दूरवर

धांव घेत हें दिसून येतें; त्यांमध्यें वाफेच्या उष्णतेच्या
मानानें तिची जी प्रसरणशक्ति तिजसंबंधी कांहीं कल्प-
ना ह्यानीं गोंविलेल्या आहेत. त्या अगदीं चुकीच्या आ-
हेत; पण त्यांवरून ह्यांची भौतिकविषयांत भरारी आणि
आत्मप्रत्यय हीं दोन व्यक्त होतात; आणि स्वाभा-
विक-कारणपरंपरेची कल्पना ह्यांच्या ठिकाणीं प्रबल
झालेली दिसते. मोजणी करणें आणि यंत्रांचे नकाशे
काढणें हा जो ह्यांचा त्यावेळचा रोजचा उद्योग तेणेंक-
रून ह्यांना तंतोतंत विचार करण्याची संवय लागूं ला-
गली; आणि भूमितिविषयक सत्यें, व संबंधविषयक आ-
वश्यक गोष्टी ह्या ह्यांचे मनावर ठसूं लागल्या.

पुढें सरासरी एका वर्षानें हे जेव्हां बर्मिंघाम ते ग्लूस्टर
ह्या रेलवेवर काम करण्यास गेले तेव्हांहि अशाच प्रकार-
च्या गोष्टींचा प्रभाव ह्यांच्या मनावर पडत राहिला.
पण कृतीपेक्षां विचाराची ज्यास्त आवड हा जो वर
सांगितलेला ह्यांचा स्वभावविशेष तो एव्हां दिसावयास
लागला. पहिली जी अगदीं नवी क्लृप्ति ह्यानीं बसविली
ती पुलाच्या कमानींच्या वांकणाचे थोडक्या श्रमानें न-
काशे काढण्याची होय; आणि त्यास प्रोत्साहक कारण
शारीरिक श्रम वांचावे हें होतें. ह्यापुढेंहि ह्यानीं ज्या
नूतन कल्पना काढिल्या त्यांस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या
प्रोत्साहककारण हेंच होतें. त्यांवरून ह्यांची विचारश-
क्तीची भरारी, स्वावलंबन, आणि रचनात्मक कल्पनाश-
क्ति हीं व्यक्त होतात. ह्यांच्या इंजिनियरिंगच्या पहि-
ल्या कारकीर्दीच्या द्वितीयार्धांत ह्यांचा माणसें आणि
व्यवहार ह्यांशीं बराच संबंध आला; आणि इंजिनियरिं-

गचें कांहीं काम ह्यांच्याच नमुन्यांप्रमाणें करण्याची ह्यांस त्यावेळीं मुभा मिळाल्यामुळें यंत्रविषयक सत्यांशीं ह्यांचा पूर्वींहून ज्यास्त परिचय झाला, आणि ह्यांचें स्वावलंबन ज्यास्त वाढलें. पण एथें दुसरी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे, ती ही कीं, ह्यांस ह्यावेळीं भूगर्भशास्त्राचा नाद लागला, आणि यांनीं लायेलचें तद्विषयक पुस्तक विकत घेतलें. पण त्याचा परिणाम असा झाला कीं वाढीच्या क्लृप्तीविरुद्ध त्यानें जीं प्रमाणें आणिलीं होतीं तीं ह्यांस मान्य झालीं नाहींत; आणि तीच क्लृप्ति ह्यांस योग्य वाटून तिचा ह्यांच्या पुढील विचारांवर कायम परिणाम झाला. ह्यावेळीं हे वीस वर्षांचे होते.

ह्या अमदीनात हे वूर्स्टरं एथें असतां राजकीय विषयांकडे यांचें मुळींच लक्ष गेलें नव्हतें. पण पुढें जेव्हां ती नोकरी सुटून डार्बीला हे परत आले तेव्हां त्या विषयाकडे यांचें लक्ष गेलें, आणि १८४२ च्या जून महिन्यांत ह्यानीं "नॉन्कन्फार्मिस्ट" नामक पत्रास "शासनाचें योग्य क्षेत्र" या विषयावर कांहीं पत्रें लिहिलीं; बावीस वर्षांच्या तरुणानें असला विषय घेणें अंमळ चमत्कारिकच होय. ह्या पत्रांच्या सामान्य धोरणावरून ह्यांच्या मनोवृत्तींचा सामान्य कल काय होता हें दिसून येतें. व्यक्तिवैशिष्ट्य हें ह्यांच्या कुटुंबांतील सर्वच माणसांमध्यें ठळक प्रमाणावर दिसत असे; आणि ठळक व्यक्तिवैशिष्ट्याचें बाबावाक्याशीं कमज्यास्त तेढें असावयाचेंच. जो मनुष्य स्वावलंबी व स्वाधिकारदर्शी आहे तो न्यायनिर्बंधाच्या पलीकडे जाणाऱ्या एकंदर शासनास विरोध करावयाचाच. ह्यांच्या कुटुंबांतील माणसें

इंग्लंदांतील स्थापित किंवा सरकारी धर्मापासून भिन्नधर्मीय होतीं, आणि असें असणें म्हणजे स्वैच्छिक नियंत्रणाला विरोध करणेंच होय. तेव्हां सरकारच्या कृतिक्षेत्राला मर्यादा घालावी असें असल्या माणसास सहजच वाटतें; आणि वरील पत्रांचें धोरण अशी मर्यादा घालण्याचेंच होतें. ह्या ह्यांच्या स्वभावाच्या कलाशिवाय दुसरा एक कल ह्या पत्रांतून दिसून आला, आणि तो सामाजिक चमत्कार हे सृष्टिविषयक नियमाचे अंगभूत आहेत असें मानण्याचा होय; हे दोन कल अप्रत्यक्षरीत्या एकमेकांशीं संबद्धच आहेत. ह्यांना वर सांगितल्या प्रकारचें जें शिक्षण मिळालें होतें त्यामुळें ह्यांच्या ठिकाणीं असा समज उत्पन्न झाला होता कीं एकंदर जगाप्रमाणें समाजामध्येंहि संबंधांचा एकसारखेपणाच आहे; आणि एकंदर जीविताशीं राष्ट्रीयजीविताचीं कांहीं तरी सादृश्यें आहेत अशीहि अस्पष्ट कल्पना ह्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली होती. तात्पर्य, समाज हा एक देह आहे अशी अंधक कल्पना ह्यांचे मनांत ह्यावेळीं आलेली होती, जरी तीस स्पष्ट स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें.

पुढच्या बऱ्याच वर्षांत ह्यांचे उद्योग संकीर्ण प्रकारचे पण निष्फळ असे चाललेले होते, ते उद्योग मुख्यत्वेंकरून नवीन यंत्रें शोधून काढण्याचे होते; पण कांहीं अंशीं राजकीय, नैतिक व भाषाविषयक क्लृप्त्या काढण्यांतहि ह्यांचीं तीं वर्षें गेलेलीं होतीं; त्या सर्व क्लृप्त्या नेहमींप्रमाणेंच अनेक विषयांतर्गत होत्या; आणि शिवाय ही अमदानी नकाशे काढणें, नमुने बनवणें, आणि गानवादन ह्या कलांचे अध्ययनांतहि गेली होती; तेवढ्यांत

ह्यांचे पूर्वीं सांगितलेले स्वभावविशेष ज्यास्त ठळक होण्यापलीकडे सांगण्यासारखें दुसरें कांहीं झालें नाहीं. पण ह्या अमदानींत घडलेली एक अंमळ महत्त्वाची गोष्ट मात्र एथें नमूद केली पाहिजे. वयाच्या सुमारें अकराव्या वर्षीं स्पर्झीम नामक शास्त्रज्ञानें कपाळलक्षणविद्येवर दिलेलीं व्याख्यानें ह्यानीं ऐकिलीं होतीं, तेव्हांपासून त्या विद्येवर ह्यांचा विश्वास बसला होता. पुढें ह्यांचा त्या विद्येवरील विश्वास अगदीं उडाला; तसा एकवीस ते चोवीस ह्या वयाच्या दरम्यान उडालेला नव्हता. तथापि त्यावेळेस ह्यांचें कांहीं बाबतींत त्या विद्येविरुद्ध मत झालेलें असून त्यावर यानीं 'झॉइस्ट'नामक पत्रांत कांहीं लेख या सुमारास लिहिले. पैकीं एकांत ह्यानीं असें म्हटलें होतें कीं "अनुकरण" नामक जें इंद्रिय आहे त्याचा व्यापार सहानुभूति उत्पन्न करण्याचा आहे, आणि सहानुभूति ही औदार्याच्या मुळाशीं आहे. पुढें कित्येक वर्षांनीं ह्यांस असें समजलें कीं अर्थशास्त्रावरील प्रसिद्ध लेखक आडाम स्मिथ ह्यानें हेंच विधान कित्येक वर्षांपूर्वीं केलें होतें; पण यावेळीं त्या गृहस्थाबद्दल "राष्ट्रांची संपत्ति" ह्या ग्रंथाचा लेखक एवढेंच केवळ ह्यानीं ऐकिलेलें होतें; याच्या पलीकडे त्याची यांस मुळींच माहिती नव्हती.

इंजिनियरिंगच्या यांच्या दुसऱ्या अमदानींत गहनविचारविषयक ह्यांचे उद्योग फारसे चालले नाहींत. तेंच तेंच करण्याची कंटाळवाणी मेहनत कमी करण्यासाठीं ह्यानीं त्यावेळीं कांहीं युक्त्या काढिल्या, आणि सुधारणेचा विचार तर ह्यांच्या मनांत सारखा घोळतच होता; आणि ह्या सर्वांच्या मुळीं रूढ गोष्टींचा यांच्यावर मुळीं-

च पगडा बसत नसे ही गोष्ट नेहमींप्रमाणें होतीच. यांची आगगाडीसंबंधाची कारकीर्द १८४५ त संपली, आणि लेखनाची कारकीर्द १८४८ त सुरू झाली; या दरम्यान यांच्या मनांत यंत्रविषयक कांहीं नव्या कल्पनांची उत्पत्ति झालीच असली पाहिजे; पण त्यांबद्दल त्यांस खात्रीलायक असें कांहींच आठवत नसे, तथापि कांहीं तरी नव्या कल्पना यांच्या डोक्यांत नेहमीं घोळत असत हें मात्र खास.

इंजिनियरिंगच्या ह्या ह्यांच्या दुसऱ्या कारकीर्दींत "शासनविषयक-क्षेत्राच्या मर्यादा" या विषयावरील ह्यांच्या लेखांतील कल्पनांची वाढ ह्यांच्या डोक्यांत होतच गेली असली पाहिजे. सरकारच्या कृतींस निश्चित मर्यादा कां घालावी ह्याचें कारण त्या पत्रांत आलेलें नव्हतें. तेव्हां ह्याच्या बुडीं काय मुख्य तत्त्व असलें पाहिजे हा प्रश्न सहजच उद्भवला. त्याचें उत्तर देण्यास पृथक्करणाची जरूर उत्पन्न झाली आणि तें मूलतत्त्व जेव्हां यांचे लक्षांत आलें तेव्हांच "सामाजिकस्थिति" (Social Statics) हा ग्रंथ लिहिण्याची यांस स्फूर्ति झाली. वरील पत्रें लिहिल्यावर पांच वर्षांनीं हा ग्रंथ लिहिण्यास यांनीं सुरवात केली.

ह्या ग्रंथासंबंधानें कांहीं विशेष गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. एक ही कीं, त्यांत इतर ग्रंथकारांचे आधार मुळींच घेतलेले नाहींत. राजकीय व नैतिक विषयांवरील ग्रंथकारांस थोडेसे उल्लेख केलेले आहेत, पण ते बहुतेक त्यांच्या मतांशीं आपला विरोध दर्शविण्यासाठीं केलेले आहेत; आणि तीं त्यांचीं मतें ह्यानीं त्यांच्या ग्रं-

थांतून पैदा केलेलीं नसून अडप झडप वाचनांतच तीं यांच्या नजरेस आलेलीं होतीं. याचें कारण ज्या ग्रंथाचीं मूलतत्त्वें ह्यांस मान्य नसतील असले ग्रंथ ह्यांच्याच्यानें वाचवत नसत. म्हणून ह्यांच्या इतर ग्रंथांप्रमाणें ह्या ग्रंथाच्या संबधानें ह्यानीं असें केलें होतें कीं इतरांचे आधार न घेतां मानवी समाज आणि मानवी वर्तन ह्यांच्या मध्यें प्रत्यक्ष काय दिसून येतें तें पहावयाचें आणि त्यावरून प्रत्यक्ष अनुमानें काय निघतील तीं काढावयाचीं.

कोणतीहि गोष्ट होईल तितकी पूर्ण करावी ह्या यांच्या इच्छेस अनुसरून, त्या ग्रंथाच्या प्रारंभीं, पद्धतशीर नीतिशास्त्रानें किती प्रदेश व्यापिला जातो हें ह्यानीं दाखविलें. त्यावेळची धर्मग्रंथांवरून नीतिविषयक शास्त्राची कल्पना अशी बनलेली होती कीं तें शास्त्र म्हणजे माणसानें इच्छिलेल्या अशा कांहीं कृतींच्या निषेधांचें, आणि त्यानें न इच्छिलेल्या अशा कांहीं कृतींच्या विधींचें बनलेलें आहे. सारांश, आनंददायक अशा कृती करण्यास नीतिशास्त्राची फारशी किंवा मुळींच आज्ञा नव्हती; ह्या कृतींवर त्या शास्त्राचा गर्भितरीत्या रोष असे, किंवा रोष नसला तर निदान प्रेम तरी नसे; कारण त्या कृती करा असें तें शास्त्र माणसास कधीं सांगत नसे. पण या ग्रंथाच्या पहिल्या भागांत, जीविताच्या योग्य व्यापारांची पूर्ति करण्यास आणि ते व्यापार करितांना जीं सुखें होतात त्यांची संपादणी करण्यास ज्या कृती कराव्या लागतात त्यांस नीतीचा आधार आहे, असें यानीं दाखविलें होतें. सरांश, विशिष्ट मर्यादांच्या आंत स्वाभावि-

क वासनांची तृप्ति करून घेण्याचा व्यक्तीस नैतिक हक्क आहे असें विधान त्या भागांत केलेलें होतें.

त्या मर्यादा ह्या होत कीं प्रत्येकास आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याचा जो हक्क तो त्यानें अशा रीतीनें बजाविला पाहिजे कीं तो बजावतांना त्यानें इतरांचा जो स्वेच्छेप्रमाणें वागण्याचा हक्क त्याचें अतिक्रमण करितां कामा नये. जर्मन तत्त्वज्ञानी **क्यांट** ह्यानेंहि हेंच तत्त्व आपल्या ग्रंथांत निरूपिलें होतें. पण त्याच्या व ह्यांच्या या निरूपणांत एक महत्त्वाचा फरक हा होता कीं, माणसास इच्छेस येईल तें करण्याचा हक्क आहे, ही गोष्ट यानीं प्रथम सांगितली असून त्या हक्काच्या बजावणीच्या मर्यादा कोणत्या हें मागाहून सांगितलें होतें. **क्यांटनें** माणसाच्या स्वेच्छांनुरूप कृतीस मर्यादा कोणत्या कोणत्या आहेत हें प्रथम सांगितलें होतें, आणि त्यावरून स्वेच्छेस अनुसरून वागण्याचा त्यास हक्क आहे असें अनुमान गर्भितरीत्या काढावयाचें होतें. सारांश, दोघांनीं जरी एकच सिद्धांत काढिला होता, तरी तो काढण्यास ते परस्परविरुद्ध मार्गांनीं गेलेले होते. एकास व्यक्तीचें कृतिस्वातंत्र्य प्राधान्येंकरून दिसत होतें, दुसऱ्यास त्या कृतीच्या मर्यादा प्राधान्येंकरून दिसत होत्या. ह्याचें कारण एक इंग्लंदसारख्या स्वतंत्र देशांतला, आणि दुसरा जर्मनीसारख्या राजांच्या स्वेच्छाचारी अमलांतील. शिवाय, व्यक्तिवैशिष्ट्य कायम राखावयाचें हा तर ह्यांचा विशेषच बाणा होता, आणि त्यास हें अनुसरूनच होतें. ह्यावरून मनोवृत्तींचा माण-

साच्या बौद्धिकसिद्धांत काढण्यावर किती पगडा बसतो हेंहि व्यक्त होतें.

ह्या ग्रंथाच्या संबंधानें दुसरी एक अशी गोष्ट ध्यानांत ठेवावयाची कीं, अनुभवजन्यज्ञानाकडून विचारजन्यज्ञानाकडे जाण्याचा जो यांचा कल तो ह्या ठिकाणीं प्रथम दिसून आला. सरकारची कृति अमुक अमुक क्षेत्रांत व्हावी, आणि अमुक अमुक क्षेत्रांत तीस मज्जाव असावा, ह्यासंबंधानें यानीं पूर्वलेखांत जीं मतें प्रदर्शित केलीं होतीं तीं सर्व विस्कळित होतीं; त्या प्रत्येकास आधार दाखविलेला होता; पण तीं सर्व कोणत्या एक व्यापक तत्त्वापासून निष्पन्न झालेलीं आहेत हें यांच्या लक्षांत तेव्हां आलेलें नव्हतें; म्हणून ह्यांस चैन पडेना. तेव्हां ते त्याच्या शोधास लागले, आणि तें जेव्हां यांस सांपडलें तेव्हां त्यावरून ह्या मर्यादा जशा निष्पन्न होऊं लागल्या तसे व्यक्तीचे जे हक्क म्हणून म्हणतात तेहि निष्पन्न होऊं लागले. सारांश, न्यायविषयक एकंदर नैतिक कल्पनांस येणेंकरून सुसंबद्ध असें स्वरूप आलें, आणि त्यामुळें पूर्णत्वाची जी यांची आवड ती तृप्त झाली.

ह्या ग्रंथाच्या संबंधानें दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, मानवी स्वभावघटनेच्या संबंधानें उत्क्रमणाची पद्धति त्याच्यांत अथपासून इतिपर्यंत गृहीत केलेली दिसते. माणूस हा नैतिकदृष्ट्या बदल होत जाणारा प्राणी आहे, आणि त्याचा स्वभाव सारखा बदलत जाऊन समाजस्थितीशीं नेहमीं अनुरूप बनत असतो असें या एकंदर ग्रंथांत गृहीत धरलेलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, त्याच्यांत सहानुभूतीची वृद्धि हो-

ईल तसें त्याचें नैतिक उत्क्रमण होत जातें, कारण न्याय आणि परोपकार ह्यांच्या मुळांत सहानुभूतिच आहे. "योग्यतमांचा तगाव" ह्या तत्त्वाचीहि त्यांत जातां जातां ओळख दाखविलेली आहे. तद्वतच, इतर प्राणी व माणसें ह्यांपैकीं कमी योग्य असतील ते ज्या सरणीच्या योगानें नष्ट होत जातात, आणि ज्यास्त योग्य असतील ते जिवंत राहून वंश चालवण्यास संतति उत्पन्न करितात, ती सरणी अपकारक नसून उपकारकच आहे असेंहि त्याच्यांत विधान केलेलें आहे; पण यापासून जे परिणाम होतात म्हणून डार्विनच्या ध्यानांत आलें त्या परिणामांची ओळख मात्र त्याच्यांत दिसत नाहीं.

'सामान्य विचार' म्हणून त्या ग्रंथांतील जें शेवटचें प्रकरण आहे त्यांत उत्क्रान्तिविषयक भावना अनेक रीतींनीं स्पष्टरीत्या दृग्गोचर झालेली आहे. तेथें सुधारणा म्हणजे माणसें समाजस्थितीशीं सारखीं अनुरूप बदलत जाणें, आणि तीं बदलत जातील तशी ती (समाजस्थिति) त्यांच्याशीं अनुरूप बनत जाणें,— म्हणजे या दोहोंची एकमेकांवर क्रिया व प्रतिक्रिया होत जाणें, असें सुधारणेचें लक्षण केलेलें आहे. ह्याबरोबरच व्यक्तिघटित समाज, आणि सजीव सूक्ष्म पिशव्यांचा बनलेला प्राणी ह्यांमध्यें साम्य आहे ही गोष्ट तेथें ध्यानांत घेतलेली आहे, जरी त्याकाळीं (१८५०त) प्राणी असा बनलेला आहे असें कोणीं कोठें ध्वनित केलें कीं त्याची थट्टाच होत असे. व्यक्तिदेह व समाजदेह ह्यांच्या अन्तिमघटकांमध्यें हें सादृश्य आहे हें जसें ह्या वेळेस ह्यांच्या लक्षांत आलें, तशी दुसरीहि एक फारच

ज्यास्त महत्त्वाची गोष्ट त्यावेळीं ह्यांच्या लक्षांत आली. ती ही कीं, हलक्या प्रतीचा प्राणी सदृश-व्यापार करणाऱ्या अनेक सदृश-भागांचा बनलेला असून उच्च दर्जाचा प्राणी विसदृश-व्यापार करणाऱ्या वरच्याहून संख्येनें बऱ्याच कमी अशा विसदृश भागांचा बनलेला असतो. पण ही कल्पना त्यांना कोठून प्राप्त झाली हें मात्र यांस आठवत नसे. पण ती कशीहि प्राप्त झालेली असली तरी असलाच भेद हलक्या दर्जाचे समाज आणि उच्च दर्जाचे समाज ह्यांजमध्येंहि दिसतो हें मात्र यांच्या ताबडतोब लक्षांत आलें. उत्क्रमणाच्या सामान्य क्लृप्तीचें हें अगदीं पहिलेंच अंधुक अंधुक दर्शन होय.

कारण एकस्वरूपघटनेकडून विविधस्वरूपघटनेकडे प्रगति होत जाते, आणि ही प्रगति व्यक्तिदेह आणि समाजदेह ह्यांमध्यें सारखीच होत जाते ही गोष्ट ध्यानांत येणें म्हणजे एकंदर प्रगति समस्वरूपाकडून विविधस्वरूपाकडे होत असते हें सत्य ध्यानांत आणणेंच होय, जरी ह्या अर्थाच्या शब्दांची त्या ग्रंथांत योजना केलेली नव्हती. त्यावेळीं त्या कल्पनेस असें व्यापक स्वरूप देण्याची कल्पना यांच्या डोक्यांत मुळींच आलेली नव्हती; तथापि त्या कल्पनेचें बीज ह्यांच्या मनांत रुजत घातलें गेलें होतें, आणि तें लवकरच वाढीस लागणार होतें एवढें मात्र खचीत.

वरील ग्रंथ प्रसिद्ध होण्याच्या अंमळ अगोदर किंवा नंतर लागलींच ह्यांची **जार्ज हेन्री ल्युइस** (**जॉर्ज** इलियटचा नवरा) ह्याशीं ग्रंथप्रकाशक **चापमनच्या** घरीं ओळख झाली. तिकडून परत येत असतांना ह्यांचें त्या-

चें जीवांच्या वाढीच्या प्रश्नावर भाषण झालें, आणि व्यापारविषयक अनुरूपता हेंच वाढीचें एकाकी कारण आहे हें ह्यांचें मत ऐकून त्यास फार आश्चर्य वाटलें. ह्यावरून ह्या विषयावर १८५०-५१ सालीं ह्यांचें मत काय बनलेलें होतें हें स्पष्ट दिसतें.

हा ग्रंथ छापल्यावर ह्यांचे जे मानसिक निष्क्रियतेमध्यें कांहीं दिवस गेले त्या मुदतींत ह्यांच्या कल्पना ज्यास्त पक्क होण्यास कांहींच घडून आलें नाहीं. तथापि प्रोफेसर ओवेन ह्यानें तुलनात्मक शारीरावर कांहीं व्याख्यानें दिलेलीं ह्यानीं ऐकिलीं, तेणेंकरून विचार करण्यास ह्यांना आणखी कांहीं सामग्री सांपडली असें दिसतें.

ल्युइसशीं ओळख झाल्यानंतर १८५१ च्या पावसाळ्यांत हे दोन वेळां त्याच्याशीं लांबवर सहल करण्यास गेले. त्यावेळीं त्याचें यांचें तात्त्विक विषयावर पुष्कळ भाषण झालें. ह्याचा एक परिणाम त्यास शास्त्रीय विषयांची फार गोडी लागली हा झाला. दुसरा असा झाला कीं ह्यानीं एक जातां जातां पान तोडिलें त्यावरून वनस्पतिघटनेच्या संबंधाच्या कांहीं गोष्टी ह्यांच्या लक्षांत आल्या; आणि त्यावरून इंद्रियसमतेचा नियम ह्यांच्या लक्षांत आला. दुसऱ्या सालांत मिल्न एडवर्ड्स ह्याचें एक छोटेंसें पुस्तक वाचीत असतां 'इंद्रियविषयक श्रमविभाग' ह्या बोधप्रद कल्पनेशीं ह्यांचा परिचय झाला. त्यामुळें सामाजिकदेह आणि व्यक्तिदेह ह्यांच्यांतील साम्याबद्दलचे जे ह्यांचे विचार त्यांस ज्यास्त स्पष्टपणा आला. ल्युइसनें लिहिलेला "तत्त्वज्ञानाचा चरित्रात्मक इतिहास" वाचून यांच्या म-

नांत कांहीं विशेष कल्पना उत्पन्न झालेल्या ह्यांस आठवत नव्हत्या; पण तेणेंकरून तत्त्वज्ञानविषयक व मानसशास्त्रविषयक प्रश्नांकडे यांचें पूर्वीहून ज्यास्त लक्ष जाऊं लागलें. सारांश, गतकालीन निरनिराळ्या दर्शनांचा इतिहास वाचून त्यांतील विचार यानीं उचलिले असें नाहीं, तर तेणेंकरून यांच्या विचारांस उत्तेजन आलें, आणि हा परिणाम लवकरच दिसूं लागला.

१८५२ च्या प्रारंभीं "लोकसंख्यावृद्धीची मीमांसा" हा निबंध लिहिण्यांत हे गुंतले होते. जीवनमुन्याची वाढ जशी होत जाईल तशी त्याची संतत्युत्पादनशक्ति कमी होत जाते ह्याबद्दलचें ह्यांचें मत ह्यानीं 'वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू' ह्या मासिकाचा मालक चापमन ह्यास कळविलें होतें, म्हणून त्या विषयावर एक निबंध यानीं त्या मासिकांत लिहावा अशी त्याची फार इच्छा होती. तदनुसार एप्रिल महिन्याच्या त्या मासिकाच्या अंकांत यानीं त्या विषयांवर एक लेख लिहिला त्यामध्यें प्रतिपाद्यकल्पना ही होती कीं जीवास व्यक्तिवैशिष्ट्य प्राप्त होणें आणि त्यानें संतत्युत्पादन करणें ह्या दोन गोष्टी परस्परविरुद्ध आहेत. यांपैकीं जीवित म्हणजे व्यक्तिवैशिष्ट्य प्राप्त करून घेणें ही शेलिंगची कल्पना ह्यानीं कालरिजच्या "जीवितकल्पना" ह्या ग्रंथांतून घेतली होती, आणि ह्या कल्पनेमुळेंच लोकसंख्यावृद्धि या विषयावरील यांच्या कल्पनांस सुसंबद्ध स्वरूप आलें होतें. शिवाय वरील ग्रंथ वाचल्यापासून ह्यानीं जीविताचें वरच्याहून चांगलें लक्षण बसविलें. तें हें कीं, जीवित म्हणजे व्यक्तिवैशिष्ट्य प्राप्त

करून घेणें नव्हे, तर क्रियांची सुसंबद्धता स्थापन करणें होय. हें ह्या निबंधांतील त्या कल्पनेचें लक्षण होय. हें जरी कालरिजच्या लक्षणाहून बरें होतें तरी अपुरेंच होतें, कारण त्यांत जीवाच्या आंत चाललेल्या क्रियांना तेवढा उल्लेख होता, पण ज्या बाह्य क्रियांशीं त्या अनुरूप बनत असतात त्यांस नव्हता.

ह्या निबंधामुळें ह्यांची हक्स्लेशीं ओळख झाली ही गोष्ट आत्मचरितांत सांगितलीच आहे. ती एथें सांगण्याचें कारण हें कीं ती झाल्यावर थोडे दिवसांनीं एक गोष्ट घडून आली तिजवरून ह्यांचें एकमत ह्यांस कधीं प्राप्त झालें हें दिसून येतें. ह्यांनीं हक्स्लेस सुचविलें कीं ल्युइसशीं तूं ओळख करून घे; आणि म्हणून त्याच्या घरीं हे त्यास घेऊन गेले. तेथून परत येत असतांना जीवनमुन्यांची वाढ या विषयाची चर्चा सुरू झाली, आणि “ जीवांची शृंखला ” असा जो शब्द जीवनमुन्यांची वृद्धि दर्शविण्याकरितां त्यामध्यें आला त्याची त्यानें टर उडविली. हे म्हणाले, मलाहि हा शब्द बरोबर वाटत नाहीं, आणि त्या वृद्धीला वृक्षाच्या वृद्धीची उपमा ज्यास्त समर्पक आहे. ही कल्पना ह्या पूर्वीं किती दिवस ह्यांचे डोक्यांत आली होती हें सांगतां येत नाहीं, पण ह्या विचाराचा पुढील पुष्कळ विचारांवर फारच परिणाम झाला असें लवकरच दिसून येईल. एथें हें लक्षांत आणण्यासारखें आहे कीं झाडांच्या मुख्य ओंड्यास निरनिराळ्या दिशांनीं फुटणाऱ्या फांद्या, व त्यांस पुन्हां तशाच फुटणाऱ्या डहाळ्या ह्यांच्यामध्यें वाढत जाणाऱ्या विविधस्वरूपाची किंवा विविधजातीयाची कल्पना

अंतर्भूत होते; म्हणजे, एक वस्तु पुष्कळ वस्तूंस कशी उत्पन्न करिते हें त्यावरून समजतें. सारांश, ह्या दोन्ही उघडच परस्परांशीं सदृश आहेत.

ल्युइसच्या आग्रहावरून तो संपादक असलेल्या "लीडर" नांवाच्या एका पत्रांत ह्यानीं कांहीं छोटे निबंध लिहिले. त्यांपैकीं दुसरा 'वाढीच्या क्लृप्ती'वर असून त्याचें महत्त्व विशेष होतें. त्यावरून असें दिसतें कीं सेंद्रिय–उत्क्रमणाची कल्पना ह्यांच्या डोक्यांत ह्यावेळीं फार खोल गेलेली होती, व तिला अनुकूल असा वरासचा पुरावा ह्यांच्या डोक्यांत जमला होता. हा पुरावा विशिष्ट उदाहरणांवरून मिळालेला नव्हता तर सेंद्रियघटनेचें जें सामान्यस्वरूप त्यावरूनच प्राप्त झालेला होता; आणि प्रत्येक जीवनमुना ईश्वरानें मुद्दाम निर्मिलेला आहे ही विशिष्टनिर्मितीची कल्पना टाकून दिली म्हणजे उत्क्रान्तीची कल्पना ग्रहण करणें जें आवश्यक होतें त्यावरूनहि ती प्राप्त झालेली होती. विशिष्टनिर्मितीची कल्पना ह्यानीं मनांतून झुगारून दिल्याला आज कित्येक वर्षें होऊन गेलेलीं होतीं, तेव्हां ह्यांच्या मनाला उत्पत्तिविषयक कोणत्याहि कल्पनेविना फार दिवस लोंबकळत रहाणें शक्यच नव्हतें; म्हणून बुद्धिगम्य अशी जी उत्क्रान्तिरूप दुसरी क्लृप्ति तिचें ग्रहण करणें ह्यांच्या मनास भागच होतें. आणि हें यानीं या निबंधांत स्पष्ट व सार्वजनिकरीत्या करून टाकिलें, जरी 'समाजस्थिति' ह्या ग्रंथांत दर्शविल्याप्रमाणें तद्विषयक विचार ह्यांच्या मनांत कित्येक वर्षें अस्पष्टरीत्या घोळत होते.

६. ह्या वेळापासून एकंदर वस्तूंची उपपत्ति उत्क्रा-

न्तिदृष्टच्या लावणें हें ह्यांच्या आंगवळणींच पडून गेलें, आणि तें चमत्कारिकरीतीनें दिसून येऊं लागलें. उदाहरणार्थ, भाषापद्धतिमीमांसा या विषयावरील निबंधांत तें दृग्गोचर व्हावें असें कोणास सहसा वाटणार नाहीं; पण १८५२ च्या अखेरीस ह्यानीं लिहिलेल्या त्या निबंधाच्या अखेरीस, भाषासरणीची प्रगति सरलस्वरूपाकडून विविधस्वरूपाकडे होत असते हें सत्य ग्रथित केलेलें आढळून येतें; आणि यावरून असें दिसतें कीं सृष्टिजात-वस्तूंतच केवळ नव्हे, तर मनोजात-वस्तूंतहि उच्चघटनेचें विशेषक काय हें यावेळीं ह्यांचे लक्षांत येऊं लागलें होतें. " सार्वत्रिक गृहीत गोष्ट " ह्या दुसऱ्या निबंधावरून दुसऱ्या एका दिशेनें ह्यांच्या विचारांची होणारी प्रगति दिसूत येते. ह्यावेळीं हे मिल्लचा तर्कशास्त्रावरील सुप्रसिद्ध ग्रंथ वाचीत होते. त्यांत त्यानें व्हेवेलच्या तद्विषयक मतांवर प्रतिकूल टीका केलेली आहे; आणि ती टीका जरी यांस मान्य होती तरी तिला दाखविलेले आधार मान्य नव्हते, आणि हेंच हा निबंध लिहिण्याचें कारण होय. तो लिहितांना अध्यात्मविषयक आपले समज व्यक्त करून दाखविणें ह्यांस प्रथम भाग पडलें. कारण त्यांत केलेल्या कोटिक्रमापासून विश्वांत दिसणारी स्थिति वास्तविक आहे, काल्पनिक नव्हे, हें जें मत तें बरोबर आहे हा सिद्धान्त निष्पन्न झाला. आजपर्यंत ह्यांचे विचार मुख्यत्वेंकरून मूर्तविषयक असत, आतां ते अमूर्तविषयक होऊं लागले; आणि तेव्हांपासून पुढें मूर्त आणि अमूर्त हीं ह्यांच्या विचारांत बरोबर संचार करूं लागलीं, जशीं ह्यापूर्वीं पुष्कळकाळपर्यंत

अनुभवजन्य व विचारजन्य हीं करीत होती. ह्या निबंधावरून मिलशीं ह्यांचा वाद सुरू झाला, व तो पुढें पुष्कळ वर्षें चालून अखेरीस हे दोघे परस्पर स्नेही बनले.

"चालीरीती" ह्यावरील निबंधांत उत्क्रान्तिविषयक कल्पना पुनः दृग्गोचर झाल्या. संस्थांची उत्पत्ति उत्क्रमणसरणीनेंच होते हें त्यांत गृहीतच केलें होतें; आणि मूळच्या एकप्रकारच्या शासनापासून विधिविषयक, राजकीय, आणि धर्मविषयक हीं निरनिराळीं शासनें विभिन्नीकरणानें कशीं उत्पन्न होतात हें दाखविलेलें होतें. तद्वतच चालीरीतींच्या सरल मूलस्वरूपांपासून त्यांच्या संमिश्र निरनिराळ्या स्वरूपांची जनिति कशी झाली आहे हेंहि ह्या तत्त्वाच्या आधारावरच त्यांत दाखविलें होतें.

"नार्थ ब्रिटिश रिव्ह्यू" नामक मासिकांत "शिक्षणाची कला" ह्या विषयावर जो निबंध ह्यानीं लिहिला, व ज्यासच पुढें 'शिक्षण' नामक ह्यांच्या सुप्रसिद्ध ग्रंथाचें स्वरूप आलें, त्यांतहि असल्याच तऱ्हेची विचारसरणी दिसत होती. मानवजातींत ज्या सरणीनें मनाची वाढ होत जाते त्याच सरणीनें मुलाच्या मनाचा विकास होत जातो, ह्या सिद्धान्तावरून अनेक उत्क्रमणविषयक उपसिद्धान्त ह्यानीं त्या निबंधांत काढिले होते. उदाहरणार्थ, त्यांत असें दाखविलें होतें कीं शिक्षणाची प्रगति सरलाकडून संमिश्राकडे झाली पाहिजे, कारण मन हें वाढत जाणाऱ्या इतर सर्व वस्तूंप्रमाणें समस्वरूपाकडून विविधस्वरूपाकडे जात असतें. त्यांत असें प्रतिपादिलें होतें कीं, मनाची प्रगति अनिश्चिताकडून निश्चिताकडे होत असते, आणि म्हणून शिक्षणाची प्रग-

ति त्याच दिशेनें झाली पाहिजे. आणखी एक उपसिद्धान्त त्यांत असा काढिला होता कीं, मानवजातीची सुधारणा केवळ आत्मशिक्षणानेंच झालेली आहे; म्हणून मुलास स्वतःच स्वतःचा विकास करून घेण्यास साधेल तितकें उत्तेजन द्यावें.

ह्याच सुमारास (१८५४ सालीं) काम्टेच्या ग्रंथांचें मिस् मार्टिनो हिनें केलेलें संक्षिप्त भाषान्तर प्रसिद्ध झालें. त्याच्या मतसरणीची कांहीं कल्पना ह्यांस ल्युइसपासून अगोदरच प्राप्त झालेली होती, कारण तो त्याचा शिष्य असून 'लीडर' पत्रांत त्या सरणीचा गोषवारा देण्याकरितां कांहीं लेख त्यानें लिहिलेले होते; आणि १८५२ सालीं जॉर्ज इलियटच्या आग्रहावरून आणि साह्यानें ह्यानीं त्याच्या मूळ फ्रेंच ग्रंथाची प्रस्तावना वाचिल्यावरून त्याच्या मुख्य मतांची ह्यांस आणखी माहिती झालेली होती. पण ती वाचल्याचा तात्कालिक परिणाम हा झाला कीं त्यानें केलेलें शास्त्रांचें बरोबर वर्गीकरण यानीं नापसंत ठरविलें; त्यामुळें शास्त्रांचें बरोबर वर्गीकरण कसें करावें ह्याबद्दलचा ह्यांस विचार करणें भागच पडलें, आणि त्यावरून "शास्त्राची जनिति" हा निबंध "ब्रिटिश कार्टर्ली" नामक त्रैमासिकांत यानीं लिहून तद्विषयक आपल्या कल्पनांचें निरूपण केलें. नंतर लवकरच ज्या मानसशास्त्रविषयक कल्पनांचें यानीं सविस्तर विवेचन केलें त्यांशीं ह्या कल्पनांचा महत्त्वाचा संबंध होता. कांहीं मूलकल्पना आणि मूलविचार अनुभवांना हळू हळू व्यवस्थित स्वरूप येऊन उत्पन्न होत असतात असें त्यांत म्हटलें होतें. सादृश्यकल्पना कशी उत्पन्न होते व ति-

जपासून समता आणि वैषम्य एतद्विषयक कल्पना कशा निघतात, हें त्यांत सविस्तर निरूपिलें होतें. वस्तूंचीं सादृश्यें आणि वैसदृश्यें यांजवरून संबंधांचीं सादृश्यें आणि वैसदृश्यें ताडिलेलीं होतीं, आणि ह्यावरून संबंधांची समता जी उत्पन्न होते तीच सर्व विचाराचा पाया आहे असें दाखविलें होतें. नंतर असें दाखविलें होतें कीं ही शास्त्राची वाढ चालली असतां त्यास फांद्या फुटणें आणि त्या फांद्यांस फांद्या फुटणें हें चाललेलेंच असतें, आणि त्यामुळें शास्त्रांची संख्या व विविधजातीयता हीं दोन्ही वाढत जात असतात; आणि हें दाखविण्यास एथेंहि वृक्षाचेंच उदाहरण घेतलें होतें, आणखी असें दाखविलें होतें कीं शास्त्रांचें विभिन्नीकरण चाललें असतां त्यांचें परस्परावलंबन म्हणजे संकलनहि वाढत जात असतें. एवंच मानसशास्त्रविषयक क्लृप्ति अंधकरीत्या दर्शविणारे जसे त्यांत कांहीं विशेष होते, तसेच बुद्धि आणि तिचीं उत्पत्तें एतद्विषयक उत्क्रमणकल्पना तशाच रीतीनें दर्शविणारेहि कांहीं विशेष त्यांत होते.

" मानसशास्त्राचीं तत्त्वें " ह्या विषयावर पुस्तक लिहिण्याचें यानीं कधीं ठरविलें तें यांस आठवत नसे. परंतु १८५३ सालीं त्यांतील एक महत्त्वाचें तत्त्व यांस प्राप्त झालें; आणि त्यास कारण वर सांगितल्याप्रमाणें जीविताच्या लक्षणांत त्यांतील सुसंबद्ध क्रियांत त्यांशीं संबद्ध असलेल्या परिस्थितींतील सुसंबद्ध क्रियांची भर घातली पाहिजे हें सत्य यांच्या लक्षांत आलें हें होय. तेव्हां एकदम यांच्या डोक्यांत अशी कल्पना आली कीं अंतःक्रिया आणि बाह्यक्रिया यांतील हा संबंध मुळा-

पासून शोधून काढिला पाहिजे, असें कीं तेणेंकरून मन हळूहळू जीवितापासून कसें उत्क्रान्त होतें हें दाखवितां यावें. ह्याच विचारावर त्या पुस्तकाची बहुधा मूल उत्पत्ति झाली, व हेंच त्याचें अत्यन्त मोठें विशेषक बनलें; पण सर्वच वस्तू उत्क्रान्त असतात असें मानण्याचा यांच्या मनाचा कल जो वाढत चालला होता तेणेंकरून त्या विषयाला विशेष महत्त्व आलें. मानवी स्वभाव उत्क्रान्त आहे ही गोष्ट 'समाजास्थिति' ह्या ग्रंथांत ह्यानीं सर्वत्र गृहीत केलेली होती, आणि 'वाढीची क्लृप्ति' ह्या निबंधांत सेंद्रियसृष्टि उत्क्रान्त आहे असें आपलें मत यानीं स्पष्ट दिलें होतें. सेंद्रियजालें (जीव) आणि समाज यांची प्रगति समस्वरूपाकडून विविधस्वरूपाकडे होत जाते, हें सत्य यांच्या ध्यानांत आलेलें होतें, आणि त्यांचे भाग ज्यास्त ज्यास्त परस्परावलंबी होत जातात, हा विचार मिल्न एडवर्ड्स् यानें "इंद्रियविषयक श्रमविभाग" असे शब्द योजिलेले पाहून ज्यास्त दृढ झाला होता. नंतर व्हानबीर यानें "वाढ म्हणजे समजातीयाकडून विविधजातीयाकडे जाणें" असें वाढीचें लक्षण केलें आहे तें यांच्या पाहण्यांत आलें. त्याबरोबरच विभिन्नीकरण आणि पुनर्विभिन्नीकरण, आणि त्यापासून उत्पन्न होणारी वाढती विविधस्वरूपता हीं जीवांत, शासनसंस्थांत आणि शास्त्रजनितींत दिसून येतात ही वरील म्हणण्याशीं सुसंबद्ध अशी कल्पना यांच्या मनांत उत्पन्न झाली. व्यक्तीचें मन आणि मानवजातीचें मन यांमध्यें प्रगति अनिश्चिताकडून निश्चिताकडे होत जातेशी दिसते हें सत्यहि यांच्या लक्षांत

आलेलेंच होतें. एवंच, उत्क्रान्तिविषयक क्लृप्तिघटक निरनिराळ्या कल्पना यांच्या मनांत सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त करून घेण्यास जणूं काय तयार होऊन बसल्या होत्या. म्हणून "शास्त्रांची जनिति" हा निबंध प्रसिद्ध केल्यावर, "मानसशास्त्राचीं तत्त्वें" या ग्रंथास यानीं सुरवात केली, कारण तीं तत्त्वें तत्पूर्वीं एकदोन वर्षें यांच्या मनांत आकारास येतच होतीं.

त्या ग्रंथाचा 'सामान्य संघटना' हा भाग यानीं प्रथम हातीं घेतला, आणि तो लिहिण्यानें यांस उत्क्रान्तीची ज्यास्त व्यापक आणि ज्यास्त सुसंगत अशी कल्पना प्राप्त झाली. या भागाच्या कांहीं प्रकरणांस "अनुरूपतेचा प्रत्यक्ष व समजातीय या दृष्टीनें विचार", "अनुरूपतेचा प्रत्यक्ष पण विविधजातीय या दृष्टीनें विचार", "आनुरूप्यांचें संकलन" अशीं नांवें दिलेलीं आहेत. यावरून प्रगति ही समजातीयाकडून विविधजातीयाकडे होत असते ही गोष्ट यानीं आणखी एका विषयाच्या संबंधानें ध्यानांत घेतलेली दिसून येते. एवंच, निरनिराळ्या क्षेत्रांत हेंच सत्य दिसून येतें असें जेव्हां यांच्या ध्यानांत आलें तेव्हां यानीं सहजच असा प्रश्न केला कीं, समजातीयाकडून विविधजातीयाकडे होत जाणारा हा फेरबदल सार्वत्रिक तर नसेल ना? ह्या प्रश्नाचें होकारार्थी उत्तर देण्यास तो केवळ विचारण्याचीच जरूरी होती. आतां अनुभवावरून हें जें होकारार्थी उत्तर आलें त्याची विचारदृष्ट्या कशी उपपत्ति लावावयाची असा त्यांच्या आधीं सांगितलेल्या स्वभावविशेषावरून सहजच यांस प्रश्न उत्पन्न झाला. ह्या सार्वत्रिक

कलाचें कांहीं तरी सार्वत्रिक कारण असलेंच पाहिजे; तें काय असावें? आणि या प्रश्नास लवकरच असा जबाब मिळाला कीं परिणामांचें बहुलीभवन हें तें कारण होय. हा अनुभवजन्य आणि विचारजन्य सामान्य सिद्धान्त १८५४ च्या आगष्ट महिन्यांत ट्रेपोर्ट मुक्कामीं यांच्या लक्षांत आला, आणि लागलेंच यानीं असें ठरवून टाकिलें कीं “मानसिकशास्त्राचीं तत्त्वें” हा ग्रंथ पुरा झाल्याबरोबर “सर्व प्रगतीचें कारण” असा एक निबंध आपण लिहावयाचा. नंतर तें वर्ष पुरें होण्याच्या अगोदर ‘वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू’ मध्यें तो प्रसिद्ध करावयाचा असें चापमनचें व ह्यांचें ठरलें, आणि वरील नांव त्यास फाजील डौलाचें वाटल्यामुळें “प्रगतिः—तिचें कारण व नियम” असें नांव यानीं त्यास दिलें.

आतां हें उघडच आहे कीं अंतःक्रिया व बाह्यक्रिया यांच्यामधील अनुरूपतेचा मन हा एक विषय असल्यामुळें एकंदर प्राणिकोटीमध्यें मनाचें उत्क्रमण कसें होतें हें दाखविण्याचा यानीं प्रयत्न केला, व तो स्पष्टपणें वाचकांच्या ध्यानांत यावा म्हणून तदनुषंगी अनेक गोष्टींचीं यांस उपपत्ति लावून दाखवावी लागली. त्यासाठीं “बुद्धीची घटना”, व “बुद्धीचा नियम” हीं प्रकरणें ह्यांस लिहावीं लागलीं; आणि “अनैच्छिक क्रिया”, “उपजतबुद्धि” व “विचारशक्ति” ह्यांचें निरूपण सामान्य विचारसरणीस अनुसरून ह्यांस करावें लागलें. अखेरीस, जीव आणि परिस्थिति ह्यांमध्यें चालणारा जो व्यवहार त्याला व्यवस्थित स्वरूप येऊन माणसाच्या मानसिकशक्ती उत्पन्न होतात अशा दृष्टीनें त्यांजकडे

पाहून त्यांचा विचार जेव्हां करण्यांत आला तेव्हां असा सिद्धान्त प्राप्त झाला कीं ज्यांस आपण विचाराचे सांचे म्हणून म्हणतों ते अंतःसंबंधांचा बाह्यसंबंधांशीं सारखा मेळ बसविल्यानें उत्पन्न होत असतात; म्हणजे परिस्थितींतील कायमचे संबंध मनामध्येंहि कायमचे संबंध उत्पन्न करीत असतात. अशा रीतीनें अनुभवजन्य सिद्धान्त आणि विचारजन्य सिद्धान्त यांचा मेळ बसला. मानसिक वाढीची जी ही कल्पना तिच्या बुडीं अशी गृहीत गोष्ट होती कीं आंतर व बाह्य ह्यांतील अनुरूपता हळू हळू स्थापन होण्याचें कारण हें आहे कीं एका पिढीच्या ज्ञानतंतुजालावर जे ठसे नोंदिले जातात ते पुढील पिढीच्या ठिकाणीं त्या जालाचें बदललेलें स्वरूप म्हणून वंशपरंपरेनें संक्रान्त होतात. पण अशा रीतीनें ह्या सर्व प्रकरणांच्या कोटिक्रमामध्यें मनाच्या संबंधानें उत्क्रान्तिरूप मत जरी व्यक्त झालें होतें, तरी त्यांत त्यास ठळक स्थान दिलेलें नव्हतें; ह्याचें एक कारण बहुधा हें असावें कीं जीवित हें उत्क्रमणानें विकास पावलेलें आहे ही क्लृप्ति त्यावेळीं बहुतेक कोणासच मान्य नव्हती, व बहुतेक लोक तिची थट्टाच उडवीत.

वस्तूंची समता आणि संबंधांची समता ह्यांच्याबद्दलच्या कल्पनांच्या वाढीसंबंधानें "शास्त्रांची जनिति" ह्या निबंधांत जे निर्णय यानीं ठरविले होते त्यांवरून "विशिष्ट विवरण" ह्या मानसशास्त्राच्या दुसऱ्या भागांतील प्रतिपाद्य विषयाचें निरूपण करण्याचें यांस सुचलें. या विशिष्ट विवरणावरून एक महत्त्वाची गोष्ट अशी सिद्ध झाली कीं, तर्कशास्त्र हें आत्मविषयक नसून अनात्मविषयक आहे. हें

सिद्ध करण्यास त्या ग्रंथांत ह्यानीं तिवार पुरावा दिला आहे. तथापि जुन्या समजुतीचा पगडा लोकांच्या मनावर इतका दृढ आहे कीं तो बदलण्याचें चिन्ह अद्यापि दिसत नाहीं.

हा खंड १८५५ च्या जुलै महिन्यांत प्रसिद्ध झाला तेव्हां "भौतिक संघटना" हा विषय त्यांत घालावयाचा राहिला; तो पुढें यानीं त्यास जोडून दिला.

ह्या ग्रंथांतील कल्पनांच्या संबंधानें एवढीच गोष्ट सांगावयाची राहिली आहे कीं मायावादाविरुद्ध जो वस्तुवाद खरा मानिल्याशिवाय एकंदर मतसरण्यांप्रमाणें उत्क्रमणविषयक मतसरणी बुद्धीला केवळ अग्राह्य होते तो वस्तुवाद तर्कशास्त्रदृष्टया बरोबर आहे हें "सा[illegible] विवरण" ह्या भागांत दाखविलें होतें. "सार्वत्रिक गृ[illegible]त गोष्ट" आणि तिजवरून निघणारे सिद्धान्त ह्यांचेंच तें सविस्तर विवेचन होतें, आणि त्याचा सामान्य रोंख असें दर्शविण्याचा होता कीं जी कसोटी मायावादी मुकाटयानें नाकबूल करितो, तीच तो आपलें म्हणणें खरें करितांना पदोपदीं खरी म्हणून धरून चालतो.

७. पुढें १८५५ ची जुलै ते १८५७ ची जानुआरीपावेतों यांची प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें नंतर यानीं वर सांगितलेला प्रगतिविषयक निबंध तयार केला, आणि त्या सालच्या एप्रिल महिन्यांत छापिला. त्यांत १८५४ च्या आगस्ट महिन्यांत यांस प्राप्त झालेली क्लृप्ति यानीं सविस्तर निरूपिली होती. ह्यांची विचारसरणी नेहमीं कांहीं मूलतत्त्व घेऊन त्याच्यावर रचलेली असते आणि अनुभवांवरून सामान्यसिद्धान्त बसविणें अशा प्रकारची

नसते, सारांश, ती अनुभवमूलक नसून तत्त्वमूलक असते, असा यांच्यावर लोक वरचेवर आरोप करीत, पण या निबंधाच्याच जनितीकडे पाहतां तो आरोप खोटा ठरतो. उदाहरणार्थ, प्रगति ही समजातीयत्वाकडून विविधजातीयत्वाकडे होत असते ही गोष्ट यांच्या लक्षांत आज एकप्रकारच्या चमत्कारांसंबंधानें आली तर उद्यां दुसऱ्या प्रकारच्या चमत्कारांसंबंधानें आली; अशा रीतीनें या उदाहरणांची संख्या वाढून विविधहि झाली; आणि नंतरच हें रूपान्तर सार्वत्रिक आहे असा व्यापक सिद्धान्त त्यांवरून यांनीं बांधिला; आणि त्यानंतरच हा अनुभवजन्यसिद्धान्त ज्यावरून निष्पन्न होईल अशा अढा[illegible]त्याच्या शोधार्थ हे लागले. पण कांहीं लोकांना [illegible]कविचारपद्धतीचा द्वेष इतका वाटतो कीं [illegible] हक्स्लेला तर विशेषच वाटे), एकाद्या सिद्धा[illegible]त्त्वदृष्ट्या उपपत्ति लागते एवढ्याच गोष्टीवरून त्या सिद्धान्ताच्या याथार्थ्याबद्दल त्यांच्या मनांत संशय उत्पन्न होतो. क्रिया व प्रतिक्रियारूप जें आंदोलन आहे तें मतांनाहि अगदीं शेवटच्या कडांवर नेऊन टाकीत असतें; म्हणून जीवशास्त्र व भूगर्भशास्त्र यांमधील तत्त्वमूलकविचारसरणीविरुद्ध जी प्रतिक्रिया हक्स्लेप्रभृति जीवशास्त्रज्ञांच्या मनांत उत्पन्न झाली तिचा परिणाम असा झाला कीं, अनुभवजन्यविचारसरणीखेरीज इतर सर्व सरण्या त्यांस अगदीं खोट्या वाटूं लागल्या.

ह्याच्या पुढची पायरी यांस कशी प्राप्त झाली तें यांस आठवत नसे. म्हणजे, परिणामांच्या बहुलीभवनाचा विचार करितां करितां, पहिला परिणाम कसा उत्पन्न

झाला हा प्रश्न यांस उत्पन्न झाला किंवा कसें, तें यांस आठवत नसे. पण एवढें खरें कीं, वरील निबंध प्रसिद्ध केल्यावर थोडेच दिवसांनीं, समजातीयत्वाची स्थिति ही अस्थिरस्थिति आहे, हें सत्य यांच्या ध्यानांत आलें. ह्या सत्याचें न्याशनल रिव्ह्यूमध्यें १८५७ च्या आक्टोबर महिन्यांत " अतींद्रिय इंद्रियविज्ञान " नामक निबंधांत यानीं प्रथम निरूपण केलें. हें सत्य यांस इतर सत्यांप्रमाणें अनुभवरीत्या प्राप्त झालेलें नव्हतें, तर विचार व विवरण यांवरूनच निष्पन्न झालेलें होतें. पण जरी तें ह्यांस अवलोकनानें प्राप्त झालेलें नव्हतें तरी प्रस्तुत निबंधांत त्यानीं तें अनेक उदाहरणें देऊन व्यक्त केलें होतें; म्हणजे, विवरणात्मकसत्याचा अनुभवावरून पडताळा दाखविला होता. त्याबरोबरच, हेंहि त्यांत दाखविलें होतें कीं संकलन होणें हा सेंद्रिय व सामाजिक दोन्ही प्रकारच्या उत्क्रमणसरणीचा एक भागच आहे. पण संकलन ही सरणी दुय्यम नसून प्राथमिक आहे ही गोष्ट " मानसशास्त्र " लिहितांना जशी यांच्या लक्षांत आलेली नव्हती, तशी हा निबंध लिहितांनाहि आलेली नव्हती. ह्या दिशेनें ह्यांच्या विचाराची प्रगति सरासरी आणखी सात वर्षें अशीच थबकून राहिली.

याच वर्षाच्या उन्हाळ्यांत, स्काटलंदमध्यें भटकत असतां, दुसरा एक निबंध यानीं लिहिला, त्याचें नांव " गानवादनाचा उद्गम आणि व्यापार " तो जरी उघड उघड उत्क्रमणविषयकक्लृप्तीचा भाग नव्हता, तरी त्याचें सार तेंच होतें. स्वराच्या ज्या चढउतारांवरून मनोवृत्तीची कमज्यास्त खळबळ दिसून येते त्या चढ-

उतारांचा विकास करून त्यांस तात्त्विकस्वरूप दिल्यानें गानवादनाची उत्पत्ति होते ही कल्पना ह्यांच्या मनांत कशी उत्पन्न झाली हें ह्यांस आठवत नसे; पण त्यावरून स्वाभाविक जनितीवर यांचा विश्वास होता, म्हणजे, संमिश्राची वाढ सरलापासून होते असें यांस वाटत असे, हें दिसून येतें. कदाचित् यांना असा प्रश्न सुचला असेल कीं, गान हें कोठून येतें? आणि त्याचा दैविक उद्गम यांस कबूल नसल्यामुळें दुसरा उद्गम जो यांस शक्यसा दिसला तोच यानीं निरूपिला.

८. अशा रीतीनें जी ही विचारसरणी ह्यांच्यामध्यें अनेक तऱ्हांनीं व्यक्त होत होती ती यानीं आजपर्यंत लिहिलेले निबंध एकत्र छापण्याकरितां जेव्हां पुनः वाचिले तेव्हां ज्यास्तच ठळक बनली. १८५७–५८च्या एका सुप्रभातीं (तो रविवार असेल किंवा कदाचित् वर्षाचा पहिला दिवस असेल) हे फिरावयास गेले असतां एका जलसंचयाच्या बाजूस क्षणभर उभे राहिले; तेव्हां वारा मंद मंद वहात असून त्यामुळें त्या संचयांत लाटा उत्पन्न होऊन त्या त्याच्या कांठावर येऊन आदळत होत्या. ह्या लाटांचा विचार करीत असतां दुसऱ्या लाटांची, दुसऱ्या आंदोलनांची, ह्यांस आठवण झाली; आणि ती कदाचित्, यांच्या नेहमींच्या संवयीस अनुसरून, अत्यन्त मोठ्या आंदोलनांची—उदाहरणार्थ, इथरच्या आंदोलनांची किंवा पैसा, कंपन्यांचे भाग, माल इत्यादिकांच्या किंमतींच्या आंदोलनांची—असेल. तेव्हां तेथून पुढें फिरत जातां जातां यानीं स्वतःस असा प्रश्न केला कीं, हें आंदोलन सार्वत्रिक तर नसेल ना? आणि

लवकरच या प्रश्नास होकारार्थी उत्तर मिळालें. ह्याचा लागलाच, किंवा थोड्या दिवसांच्या आंत, एक महत्त्वाचा परिणाम झाला. गतीच्या आंदोलनाच्या ह्या सामान्यसिद्धान्तावरून, मानसशास्त्राच्या अद्यापि न लिहिलेल्या ज्या भागांत गति ही अल्पतमविरोधाच्या रेषेंत होते हा सिद्धान्त हे गोंवणार होते, त्या सिद्धान्ताची यांस आठवण झाली. शिवाय, शक्ति ही अविनाशी आहे, व निरनिराळ्या प्रकारच्या भौतिकशक्ति एकमेकींशीं संबद्ध असतात, हीं सत्यें यांस अगोदरच परिचित झालेलीं होतीं. तेव्हां अर्थातच समजातीयाची अस्थिरता आणि परिणामांचें बहुलीभवन हीं जीं दोन सार्वत्रिक तत्त्वें हे नुक्तेच उदाहरणें देऊन व्यक्त करीत होते, त्या तत्त्वांच्या पंक्तीस हींहि सार्वत्रिक तत्त्वें जाऊन बसलीं. तेजोमेघांच्या जनितीपासून तों भाषा,शास्त्र, कला, इत्यादि सर्व चमत्कारवर्गामध्यें, बदल होऊन, सरलास संमिश्राचें आणि समस्वरूपास विविधस्वरूपाचें स्वरूप कसें येतें हें आज एक वर्षभर ज्याअर्थीं हे दाखवीत होते, त्याअर्थीं सहजच यांच्या मनांत असा विचार आला कीं, हीं सार्वत्रिक सत्यें एका सार्वत्रिक रूपान्तराचीं निरनिराळीं स्वरूपें असलीं पाहिजेत. तर मग, तीं तशीं आहेत हें दाखविणें—म्हणजे ज्योतिःशास्त्र, भूगर्भशास्त्र, जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, आणि समाजापासून उत्पन्न झालेल्या गोष्टी, ह्यांचें क्रमानें उत्क्रान्तिदृष्ट्या विवेचन करणें, हाच योग्य मार्ग होय. उघडच, शक्तीच्या ज्या ह्या सार्वत्रिक नियमांत अनुसरून हें द्रव्य व गति ह्यांचें अविश्रांत पुनर्विभजन

चालतें, ते नियम ह्या मूर्त शास्त्रांचे परस्परबंधक असले पाहिजेत, म्हणजे ज्या घटनासाम्यावरून तीं शास्त्रें एका सगळ्याचे भाग बनतात तें त्यांचें घटनासाम्य ह्या नियमांवरून व्यक्त होतें. म्हणून त्या शास्त्रांचें अशा दृष्टीनें विवेचन करण्याचा यत्न करण्याची कल्पना यांच्या डोक्यांत आली. संघटनामीमांसा लिहिण्याचा जो यानीं प्रथम बेत केला, व त्याचा नकाशा जो पुढें यानीं थोड्याच दिवसांनीं लिहून काढिला, त्यास कारण असलेच कांहीं तरी विचार झाले असले पाहिजेत. हा नकाशा यानीं ता० ९ जानेवारी १८५८ रोजीं आपल्या बापाकडे पाठविला.

पुढच्या दोन वर्षांत हा बेत सिद्धीस नेण्याचे हे निष्फल प्रयत्न करीत असतां ह्या नकाशास आणखी कांहीं विस्तृत स्वरूप यांनीं दिलें असावेंसें दिसतें; तथापि त्यांतील प्रधानकल्पनांत यानीं कांहीं महत्त्वाची भर त्या मुदतींत घातल्याचें यांस स्मरत नसे. कदाचित् एका सिद्धान्ताची ह्यानीं त्यांत भर घातली असेल. तो हा कीं, रूपान्तराचे हे नियम आणि ज्या अन्तिम भौतिकनियमांवरून ते निष्पन्न होतात ते नियम 'शक्तींचें नित्यस्थायित्व' ह्या सिद्धान्तापासून निघणारे उपसिद्धान्त होत. हा सिद्धांत यांच्या डोक्यांत मागाहून आलेला असेल, पण केव्हांहि आला असला तरी त्यावरून ह्यांची विवरण करण्याची संवय व्यक्त होते. कारण समजातीय अस्थिर कां असतें? परिणामांचें बहुलीभवन कां होतें? आणि गति आंदोलनरूपी कां आहे? ह्या प्रश्नांस त्यावरून उत्तर मिळालें. ज्याच्या

पलीकडे जातांच येत नाहीं असें जें हें अन्तिम सत्य तें प्राप्त होई तोंपावेतों मध्यें विश्रांति घेण्याची सोयच नव्हती, कारण वस्तु अवस्तूपासून कधीं उत्पन्न व्हावयाची नाहीं, किंवा ती अवस्तूंत कधीं विलय पावावयाची नाहीं ह्या सत्याशीं समस्वरूप असेंच तें सत्य होतें.

९. उत्क्रान्तिमतावर अशा रीतीनें ह्यांचा विश्वास बसल्यामुळें, ते त्याच्या स्वरूपावरून ज्या ज्या प्रकारच्या चमत्कारवर्गांमध्यें दिसण्याचा संभव होता, त्या त्या सर्व वर्गांकडे यांचें लक्ष वेधूं लागलें. म्हणून भौतिकज्योतिषाकडे हे लक्ष देऊं लागले. लॉर्ड रॉस ह्यांच्या भव्य दुर्बिणींतून जेव्हां तेजोमेघ म्हणून समजले ज़ाणारे आकाशांतील बरेच शुभ्र पट्टे ताऱ्यांचे बनलेले दिसूं लागले तेव्हांपासून आज कित्येक वर्षें क्यांट व लाप्लेस ह्यांची तेजोमेघविषयक क्लृप्ति अजीबात खोटीशी तज्ज्ञ लोकांस वाटावयास लागली होती; आणि त्यांची अशी समजूत व्हावयास लागली होती कीं ज्यांस तेजोमेघ म्हणून म्हणतात तीं सर्व आपल्या ताराचक्राच्या बाहेरचीं अत्यन्त दूरचीं ताराचक्रें आहेत. म्हणून आतां हे हे लोक असें कोणत्या पुराव्यावर समजतात तें बारीक रीतीनें पाहूं लागले; तेव्हां त्यांचा कोटिक्रम अगदीं चुकीचा आहे असें यांच्या लक्षांत आलें. म्हणून १८५८ च्या जुलै महिन्यांत वेस्टमिन्स्टर रिव्ह्यूमध्यें यानीं “ अलीकडील ज्योतिष आणि तेजोमेघविषयक क्लृप्ति ” या विषयावर एक निबंध लिहिला. त्यांत त्यानीं असें सिद्ध केलें कीं वरील मत चुकीचें आहे, आणि रॉसच्या दुर्बिणींतून दिसणारे तारापुंज

आपल्या ताराचक्राच्या बाहेरचे नसून त्यांतीलच आहेत. हें यांचें मत हल्लीं सर्वसंमत झालेलें आहे. इतकें दाखविल्यावर यानीं पुढें असें दाखविलें कीं, आपली सूर्यमाला तेजोमेघापासूनच उत्पन्न झालेली आहे असें मानण्यास कारणें आहेत. ह्याबद्दल आणखीहि महत्त्वाचीं कारणें त्यांत यानीं दिलीं होतीं. त्यांपैकीं एक हें कीं प्रत्येक ग्रहाची मध्योत्सारिणीशक्ति आणि गुरुत्वाकर्षणशक्ति ह्यांमधील प्रमाणाच्या मानानें त्याच्याभोंवतीं फिरणारे उपग्रह संख्येनें कमी किंवा ज्यास्त असतात. दुसरें एक असें कीं हें प्रमाण प्रत्येक ग्रहामध्यें भिन्न भिन्न असल्यामुळें निरनिराळ्या ग्रहांचीं विशिष्ट गुरुत्वाकर्षणें निरनिराळीं असतात. सूर्याभोंवतीं फिरणाऱ्या ग्रहांपैकीं एक ग्रह सांपडलेला नाहीं ही जी ओल्बर्सची कल्पना ती मान्य करून तिजवरून यानीं असें अनुमान काढिलें कीं आकाशस्थ गोल हे आंतबाहेर घनहि नाहींत किंवा द्रवरूपहि नाहींत; तर त्यांचे अंतर्भाग वायुमय असून ते वायू अत्यन्त मोठ्या दाबामुळें द्रवांच्या इतके दाट झालेले आहेत. पूर्वीं यानीं असें दाखविलेलेंच होतें कीं वायू इतके दाबले तरी त्यांस द्रवरूप येत नाहीं; आणि प्रोफेसर आण्ड्रूस यांच्या प्रयोगावरून हें म्हणणें बरोबर आहेसें दिसतें. आतां हें उघडच आहे कीं, असला गोल फुटल्यास त्याच्यापासून छोटे ग्रह उत्पन्न होतील ह्या अनुमानास, जसजसे असले ग्रह ज्यास्त सांपडत आहेत तशी ज्यास्त बळकटी येत आहे; कारण असला गोल फुटल्यानें जे त्याचे अनेक तुकडे होतील त्यांतील मोठाले थोडेच असतील, आणि

लहान लहान ज्यास्त ज्यास्त असतील; आणि वस्तुस्थिति अशीच आहे. ह्या निबंधांत शेंडेनक्षत्रें आणि उल्का यांचीहि उपपत्ति लाविलेली होती. दुसरी एक गोष्ट अशी सांगितली पाहिजे कीं सूर्याच्या घटनेसंबंधानें हर्शेलचें जें मत होतें त्याहून भिन्न मत दर्शविण्याचा यानीं त्या निबंधांत हिय्या केला होता. हर्शेलचें म्हणणें असें होतें कीं सूर्याचें बाहेरचें जें तेजोमंडळ आहे, त्याच्या आंत एक कृष्ण गोल आहे, आणि तो गोल ज्यास आपण सूर्याचे डाग म्हणून म्हणतों त्या तेजोगोलांतील फटींतून दृश्य होतो. सूर्य घनीभवन पावणाऱ्या तेजोमेघांचा बनलेला आहे असें जें यांचें मत त्यास अनुसरून यांचें असें म्हणणें पडलें कीं सूर्याचा तेजोगोल जो आहे तो उंच उडणाऱ्या व खालीं बसणाऱ्या अशा धातुघटित वायूंचा बनलेला आहे; आणि हें ह्यांचें म्हणणें कर्शॉफ व बन्सेन ह्यांनीं लाविलेल्या शोधांवरून खरें ठरलें आहे. बाबावाक्याची पर्वा करावयाची नाहीं हा जो यांच्या स्वभावाचा कल त्याचें हें एक अत्यन्त ठळक उदाहरण होतें, कारण सर जॉन हर्शेल म्हणजे ज्योतिर्विदांपैकीं एक मोठें धेंड होतें. शेवटीं ह्या निबंधाच्या संबंधानें एथें हेंहि सांगणें रास्त दिसतें कीं त्यांत कित्येक चुकाहि होत्या, आणि विशेष चूक शेंडेनक्षत्रांच्या आकाशांतील वांटणीच्या संबंधाची होती.

उत्क्रमण हें सर्व प्रकारच्या चमत्कारांस लागू आहे ही कल्पना खरी करून दाखविण्याची जी यांची इच्छा तिनें प्रेरित होऊन ह्यांनीं दुसऱ्या शास्त्राच्या बाबतींत देखील असेच मतभेद ह्यावेळीं प्रदर्शित केले.

उदाहरणार्थ, १८५८ च्या आक्टोबर महिन्यांत मेडि-को-सर्जिकल रिव्ह्यू नामक एका वैद्यकी मासिकांत प्रोफेसर ओवेन ह्याचें मणक्याच्या प्राण्यांच्या सांगाड्यांचें कांहीं ठराविक नमुने आहेत असें जें मत तें ह्यानीं खोडून काढिलें; कारण, इतर सर्व वस्तूंप्रमाणें प्राण्याच्या सांगाड्यांचीहि उत्पत्ति व वृद्धि उत्क्रमणानें झालेली आहे ह्या सिद्धान्ताविरुद्ध तें मत होतें. ह्या निबंधाचा उद्देश दोन प्रकारचा होता, एक प्रो० ओवेन ह्याच्या कोटिक्रमांतील दोष दाखविणें, आणि दुसरा, इंद्रियजाल आणि परिस्थिति ह्यांच्या क्रियाप्रतिक्रियांच्या योगानें हाडांच्या पिंजऱ्याचे निरनिराळे खंड कसे पडतील हें दाखविणें.

ह्याच पद्धतीस अनुसरून त्या वर्षीं यानीं " अयुक्तिक भूगर्भविषयक मतें " म्हणून एक निबंध लिहिला, आणि त्यांत लायेल, मर्किसन व ह्यू मिलर ह्यांचीं तद्विषयक कांहीं मतें ह्यानीं खोडून काढिलीं. त्या वेळच्या ह्या भूगर्भशास्त्रवेत्त्यांची कल्पना अशी होती कीं, गतयुगांमध्यें केव्हां केव्हां जुने जीव-नमुने पार निघून गेले आहेत आणि नवे निर्माण केले गेले आहेत. ही कल्पना अर्थात् ह्यांस बिलकूल पसंत नव्हती, म्हणून ह्या विषयाच्या पुराव्याचें हे परीक्षण करूं लागले, आणि त्या पुराव्यावरून हें त्यांचें म्हणणें खरें ठरत नाहीं असें यानीं दाखविलें.

१८५८ ते १८६० या काळांत असल्याच विचारसरणीचे आणखी कांहीं निबंध ह्यांच्या डोक्यांतून निघाले. त्यांपैकीं एक, " इंद्रियसमविभजनाचा नियम " हा १८५९ च्या जानेवारींत वर सांगितलेल्या रिव्ह्यूंत ह्यानीं प्रसिद्ध केला. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें १८५१ सालीं यानीं

ल्युइसबरोबर सहल करीत असतां जें एक निरीक्षण केलें होतें त्यावरून तो उत्पन्न झाला होता. ह्या विषयाचें-हि विवेचन ह्यानीं उत्क्रमणदृष्ट्याच केलेलें होतें. त्यांत ह्यानीं असें दाखविलें होतें कीं, गोलविषयक समविभजन आणि मूलविषयक समविभजन ह्यांकडून मधल्या कांड्याच्या दोहों बाजूंच्या समविभजनाकडे आणि त्याच्या अभावाकडे जी संक्रान्ति झालेली आहे ती ह्या सामान्य-सत्यास अनुसरून झालेली आहे कीं, शरीराच्या भागांचे जे आकार बनतात ते सभोंवतालच्या क्रियांशीं जे त्यांचे संबंध त्यांवरून निश्चित होत असतात; कारण जेथें आघात करणाऱ्या शक्ती सम असतील तेथें वाढीहि सम होत असतात, आणि जेथें विषम असतील तेथें विषम होत असतात. पण ही यानीं इंद्रियविभजनाची लाविलेली उपपत्ति अपुरी होती, कारण यानीं ती लावतांना उष्णता, प्रकाश, गुरुत्वाकर्षण इत्यादि ज्या निरिंद्रिय-शक्ती त्यांचाच विचार केलेला होता, आणि सेंद्रियशक्तींचा —उदाहरणार्थ, फुलांचे आकार ठरण्याच्या कामीं त्यांजवर बसणाऱ्या कीटकांचा जो प्रभाव पडतो त्याचा—विचार केला नव्हता.

‘ मनाच्या उकळ्या आणि इच्छा ’ नामक प्रो० बेन यांच्या ग्रंथावर याचवेळीं यानीं एक टीकात्मक लेख लिहिला, आणि तो अर्थात् उत्क्रान्तिदृष्ट्याच लिहिला. ही गोष्ट विशेषतः मनःस्थितींचें यानीं एक वर्गीकरण सुचाविलें होतें त्यामध्यें दिसत होती; कारण त्या वर्गीकरणाच्यासंबंधानें यानीं असें म्हटलें होतें कीं, मानसिक प्रगति कशी झाली आहे हें आपण प्राणिकोटीच्या

निरनिराळ्या पायऱ्यांमध्यें पाहिलें, किंवा मनुष्यकोटीच्या पायऱ्यांमध्यें पाहिलें, किंवा व्यक्तीच्या वाढीच्या पायऱ्यांमध्यें पाहिलें, तरी हें वर्गीकरण बरोबर ठरतें.

ह्यानंतर "समाजरूपी इंद्रियजाल" हा यांचा निबंध आला, आणि त्यांत १८५० ते १८६० याच्या दरम्यान यांच्या कल्पनांची झालेली जी वाढ ती दिसून येते. कारण १८५० सालीं "समाजस्थिति" ग्रंथांत व्यक्तिदेह आणि समाजदेह यांमध्यें साद्दश्य असल्याची यांची कल्पना प्रथम दिसून येते. १८५०च्या ग्रंथाप्रमाणें १८६०च्या निबंधांतहि मुख्य साद्दश्य जें यानीं या दोहोंमध्यें दाखविलें आहे तें त्या दोहोंमध्यें त्यांचे निरनिराळे भाग एकमेकांवर अवलंबून असतात हें होय; आणि त्यांत असेंहि दाखविलें आहे कीं, व्यक्ति किंवा समाज यामध्यें घटनाविषयक जे चमत्कार द्दष्टीस पडतात त्या सर्वांस मूलकारण हें आहे. शिवाय प्रस्तुत निबंधांत असें दाखविलें होतें कीं, भागांच्या परस्परावलंबनामुळें सगळ्याचें संकलन वाढत जातें, आणि शिवाय असें म्हटलें होतें कीं, सर्व प्रकारची प्रगति समजातीयाकडून विविधजातीयाकडे होते इतकेंच नाहीं, तर ती त्याबरोबरच अनिश्चिताकडून निश्चिताकडेहि होत असते.
